पंचोपाख्यान

पंचोपाख्यान

संपादक
डॉ. वि. भि. कोलते

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

आवृत्ति पहिली १९७९

© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

मूल्य : रु. ३१

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
नागपूर.

अनुक्रमणिका

पंचोपाख्यान

अनुक्रमणिका

निवेदन

आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांत त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे हा मुख्य उद्देश ध्यानात ठेवून साहित्य-संस्कृती मंडळाने वाङ्मय निर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा आधुनिक प्रमाण कोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतर-भारती-विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना मंडळाच्या वाङ्मयीन कार्यक्रमात अंतर्भूत आहेत.

२. मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगल्भ स्वरूप व दर्जा येण्याकरिता मराठीत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयांवर संशोधनात्मक व अद्यावत माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने मराठी भाषेचा विकास होईल ही गोष्ट तर निर्विवादच आहे. पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङ्मय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंत माणसे परकीय भाषेच्याच आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार व्यक्त करतात तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही. संशोधनाला परावलंबित्व राहते व विचाराला अस्सलपणा येत नाही. एवढेच नव्हे तर वेगाने वाढणाऱ्या ज्ञानविज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वंचित राहतात.

३. वरील उद्देश ध्यानात ठेवून मंडळाने उपरिनिर्दिष्ट जो बहुविध वाङ्मयीन कार्यक्रम आखला आहे त्यात इतर वाङ्मयीन कार्याबरोबरच जुन्या प्राचीन वाङ्मयाचे संशोधन करून ते प्रकाशित करण्याचा कार्यक्रमही अंतर्भूत आहे. ज्या साहित्यकृतींमुळे मराठी इतिहास, संस्कृती व वाङ्मय या दालनात फार मोलाची वैचारिक भर पडली आहे अशा प्रख्यात साहित्याचेही संपादन आणि पुनःप्रकाशन करणे किंवा इतर कोणी करीत असल्यास त्यास आर्थिक मदत करणे हाही मंडळाच्या या कार्यक्रमाचा एक भाग आहे. या योजनेखाली आजवर पुढील विविध ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. भरतमुनींचे “भरतनाट्यशास्त्र” (अध्याय ६ व ७ आणि अध्याय १८ व १९), विशाखादत्ताचे “मुद्राराक्षसम्”, “कात्यायन शुल्बसूत्रे”, पाली भाषेतील “धम्मपद्म”, शार्ङ्गदेवाचे “संगीत रत्नाकर” भाग १ इत्यादी संस्कृत ग्रंथांची भाषांतरे मंडळाने प्रकाशित केली आहेत. तसेच “भरत नाट्यशास्त्र” (अध्याय २८), “चार शुल्बसूत्रे” या संस्कृत ग्रंथांची भाषांतरे तसेच “तंजावरची नृत्यसाधना”, कवी हाललिखित “गाथा सप्तशती”, कवी बिहारीलिखित “सतसई”, जयदेव कवी विरचित “गीतगोविंदम्” या भाषांतरीत ग्रंथांचे मुद्रण चालू आहे.

४. प्राचीन मराठी वाङ्मयात महानुभवीय मंडळींनी फार मोलाची कामगिरी पार पाडली आहे. मराठीच्या प्रारंभकाळीच अत्यंत विपुल आणि श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय या लोकांनी लिहिले आहे. महानुभाव पंथाचा काळ हा ज्ञानेश्वरसमकालीन आहे. एकीकडे भक्ती संप्रदाय होता तर त्याच्या विरुद्ध बाजूला महानुभाव पंथाचे कार्य चालले होते. अनेक विद्वान आणि प्रतिभाशाली साहित्यिक या पंथात उदयाला आले. साहित्य आणि भाषा अशा दोन्ही अंगांनी त्यांनी मराठी भाषेला समृद्ध केले आहे. त्यांचे मराठी भाषा व साहित्य यांवरील ऋण वादातीत आहे. लीळाचरित्र, श्री चक्रपाणी चरित्र, श्री गोविंदप्रभु चरित्र व स्मृतीस्थळ हे चार चरित्रात्मक महानुभावीय ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी “लीळाचरित्र” हा ग्रंथ चक्रधर

स्वामींच्या जीवनचरित्राच्या दृष्टीने तर महत्त्वाचा आहेच, पण शिवाय यादवकालीन मराठी भाषेतील धार्मिक व सामाजिक चालीरीती व व्यवहार यांची माहिती होण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे.

"पंचोपाख्यान" महानुभावीय ग्रंथाची संशोधित आवृत्ती संपादन करून प्रकाशित करण्याचे मंडळाने ठरविले आणि संपादनाचे काम नागपूर विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरू व महानुभाव वाङ्मयाचे गाढे पंडित व संशोधक डॉ. वि. भि. कोलते यांजकडे सोपविले होते. मंडळाच्या विनंतीस मान देऊन डॉ. कोलते यांनी "पंचोपाख्याना"च्या या आवृत्तीचे वस्तुनिष्ठ दृष्टीने संपादन केले आहे त्याबद्दल मंडळाच्या वतीने त्यांना धन्यवाद! डॉ. कोलते संपादित "पंचोपाख्यान" या आवृत्तीचे मंडळाच्या प्राचीन वाङ्मयामालेत प्रकाशन करण्यास मंडळास आनंद होत आहे.

मुंबई :
पौष १, शके १९००.
शुक्रवार, दि. २२ डिसेंबर, १९७८.

लक्ष्मणशास्त्री जोशी,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ.

अनुक्रमणिका

दोन शब्द

प्राचीन मराठी वाङ्मयातील काव्याचे दालन अतिशय समृद्ध आहे. त्या मानाने गद्याचे दालन फार रिकामे आहे. लीळाचरित्र, श्रीगोविंदप्रभूचरित्र, स्मृतिस्थळ इत्यादी काही महानुभावीय गद्य ग्रंथ सोडले तर ते दालन जवळजवळ रिकामे आहे असे म्हणण्यास हरकत नाही. अशा स्थितीत, मी संपादन केलेला प्रस्तुत 'पंचोपाख्यान' हा लौकिक ग्रंथ प्रकाशनार्थ स्वीकारल्याबद्दल साहित्य-संस्कृति मंडळाचा मी फार आभार आहे. मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, यांचे मी विशेष आभार मानतो.

या ग्रंथाच्या संपादनात मला अनेकांचे साह्य झाले आहे. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे; राजवाडे संशोधन मंडळ, धुळे; श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे; सरस्वती महाल ग्रंथसंग्रह, तंजावर; नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, नागपूर या संस्थांचे व त्यांच्या अधिकाऱ्यांचे आभार मानणे अवश्य आहे. त्यांनी बहुमोल मदत केली आहे. याशिवाय श्री. देवीसिंग चौहान, डॉ. प्रभुदेसाई, डॉ. ढेरे इत्यादी स्नेह्यांनी मला निरनिराळ्या रीतींनी उपकृत केले आहे. त्यांचाही मी आभारी आहे.

नागपूर येथील शासकीय मुद्रणालयाने ग्रंथ सुबकपणे मुद्रित केला, त्याबद्दल मुद्रणालयातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेही मी आभार मानतो.

वि. भि. कोलते.

अनुक्रमणिका

पंचोपाख्यान

अनुक्रमणिका

निवेदन ५
दोन शब्द ७
प्रस्तावना ११
तंत्र १. मित्रभेद ६०
मूळकथा : पिंगळक सिंह, संजीवक बैल, आणि करकंटक व दमनक कोल्हे ६०
कथा १ * अव्यापारेषु व्यापार करणारा वानर ६४
कथा २* कोल्हा व दुंदुभी ६९
कथा ३* वृध्द बक आणि तीन मासे ७१
कथा ४* दंतिल प्रधान व गोरभ सावा ७३
कथा ५* महात्मा देवशर्मा आणि जुआरी आखाडभूती ७७
कथा ६* कावळा आणि सर्प ८३
कथा ७* वृध्द बक आणि किरिचील ८४
कथा ८* मदोन्मत सिंह आणि चतुर ससा ८६
कथा ९* विष्णुरूपधारी कोळी आणि राजकन्या ८९
कथा १०* ब्राम्हण आणि व्याघ्र, वानर व सर्प ९६
कथा ११* मंद विसर्पिणी जू व दीडीम मत्कुण ९८
कथा १२* निळीत पडलेला चंडरव कोल्हा १००
कथा १३* भाबडा कऱ्हा आणि धूर्त वाघ, कोल्हा व कावळा १०३
कथा १४* हंस आणि डुडुळ १०७
कथा १५* देवगुफ वाढै आणि वाघ १०८
कथा १६* टिटवा, टिटवी आणि समुद्र ११०
कथा १७* बडबड्या कासव आणि हंस १११
कथा १८* चिडी, काष्ठकूट, बेडूक आणि हत्ती ११३
कथा १९* बळभद्र प्रधान व श्रावणक ११६
कथा २०* सर्पदेहधारी पुरुष व त्याची पत्नी ११७
कथा २१* थंडीने गारठलेला वानर वपक्षी ११८
कथा २२* धर्मबुद्धी आणि दुष्टबुध्दी ११८
कथा २३* बग, सर्प आणि किरिचील ११९
कथा २४* राजकन्या दमघोषा व कामुक ब्राम्हण १२०
कथा २५* वानर सेवक व विप्रचोर १२२
तंत्र २ मित्रसंप्राप्ति १२५
मूळकथा : हिरण्यक उंदीर, लघुपतनक कावळ, मंथरक कासव आणि चित्रांगद हरीण १२५
कथा १* दोन तोंडांचा पक्षी १२६

कथा २* कोल्हा आणि गाढव १२९
कथा ३* बटुकर्ण आणि बृहत्कटी १३१
कथा ४* प्राप्तव्यमर्थ लभते मनुष्यः..१३३
कथा ५* सोमलिंग साळी १३६
कथा ६* लंबवृषण पोळ आणि कोल्हा १३८
कथा ७* राणी, वेश्या आणि गौळण झालेली ब्राम्हणस्त्री १३९
कथा ८* उंदीर आणि हत्ती यांचे मित्रत्व १४२
तंत्र ३ काकोलुकीय १४४
मूळकथा : मेघवर्ण कावळा आणि अरिमर्दन उलूक. १४४
कथा १* चतुर्दंत हत्ती व चंद्रदूत ससा १४९
कथा २* ससा, तित्तूर आणि दधिकर्ण मांजर १५०
कथा ३* परवंचक व्याघ्र व वनार...१५४
कथा ४* अग्निहोत्री ब्राम्हण व तीन धूर्त १५६
कथा ५* विष्टीने कुष्ट नष्ट करणारा पक्षी १७०
कथा ६* सिंहाची मावशी शेळी १७२
कथा ७* सिंह आणि –अहोबिल ◦ कोल्हा...१७४
कथा ८* बेडकांचे वाहन झालेला सर्प १८०
कथा ९* देवदत्त ब्राम्हण व त्याची छिनाल स्त्री १८१
तंत्र ४. लब्धप्रणाशन १८६
मूळकथा : विकराळमुख मगर व रक्तमुख वानर... १८६
कथा १* गंगदत्त बेडूक १९१
कथा २* धूर्त कोल्हा व कामातुर गाढव...१९६
कथा ३* स्त्रीजित राजा व प्रधान..१९९
कथा ४* सत्यवादी युधिष्ठिर कुंभार २०१
कथा ५* सिंहकुळात वाढलेला कोल्हा २०३
कथा ६* वाघाचे कातडे पांघरलेला गाढव २०६
कथा ७* मूर्ख सुतार व त्याची छिनाल पत्नी...२०७
कथा ८* शाळंकायन तपोधन व जातीवर गेलेली उंदरी २१०
कथा ९* वृध्द वाणी, त्याची तरुण त्री व चोर २१३
कथा १०* वृध्द ब्राम्हण, त्याची छिनाल बायको, चोर आणि कोल्हा २१६
कथा ११* चिडी आणि वानर २१९
कथा १२* चतुरक कोल्हा २२०
कथा १३* परदेशात गेलेला चित्रगु कोल्हा २२२
तंत्र ५. अपरीक्षितकार्य २२४
मूळकथा : मणिभद्र सेठी, क्षपणक आणि बारीक. २२४
कथा १* ब्राम्हण व त्यांचे मुंगूस २२८
कथा २* चक्रं भ्रमति मस्तके...२२९
कथा ३* सिंहाला जिवंत करणारे मूर्ख पंडित २३२

कथा ४* एकबुध्दी बेडूक आणि शतबुध्दी व सहस्त्रबुध्दी मासे २३४
कथा ५* गाणारा गाढव २३५
कथा ६* स्त्रीबुध्दी मंथरक कोळीक २३७
कथा ७* कल्पनासाम्राज्यात रमणारा सोमशर्मा ब्राम्हण २३९
कथा ८* आंधळा, पांगळा आणि त्रिस्तनी राजकन्या २४०
कथा ९* विषनालप्रयोजक वेश्यामाता २४२
कथा १०* लोभाविष्ट चंद्रभूप व वानरतेल २४३
कथा ११* कामसेना गमिका आणि रावा २४६
कथा १२* काष्टघंटा विडंबना २४८
कथा १३* छिनाल राणी व मूर्ख राजा २४९
कथा १४* राक्षस घोडा आणि वानरी २५०
कथा १५* सिगुजी, मेहुणा आणि फुइजी २५१
शब्दकोश २५५

प्रस्तावना

१

संस्कृत पंचतंत्राचे अपूर्वत्व

केवळ संस्कृत वाङ्मयातच नाही तर जगातील कथावाङ्मयात 'पंचतंत्र' या ग्रंथाचे स्थान व महत्त्व फार मोठे आहे. हा कथासंग्रह अत्यंत प्राचीन आहे हे तर खरेच, शिवाय तो अत्यंत मनोरंजकही आहे. त्याचे आबाल वृद्ध सुबोधत्व कुणालाही नाकारता येणार नाही. त्यातील रोचक कथा लहान मुलांची अंतःकरणे चटकन वेधून घेतात आणि प्रौढांना नीतिशास्त्राचे मार्गदर्शन करतात. प्रौढांच्याच नव्हे तर लहान मुलांच्या अंतःकरणावरही नीतिशास्त्राचे अप्रत्यक्ष ठसे उमटवल्याशिवाय त्या राहात नाहीत. कारण, मुळात 'पंचतंत्र' हा नीतिशास्त्राचाच ग्रंथ आहे. 'सकला**र्थशास्त्र**सारं जगति समालोक्य' हा ग्रंथ तयार करण्यात आला आहे. 'अर्थशास्त्र' म्हणजे नीतिशास्त्रच. 'तुझीया पुत्रातें सा महीनामध्यें **नीतीसास्त्र** सकळ जानते करीन' असे विष्णुशर्म्याच्या प्रतिज्ञेचे मराठी रूपांतर आपल्या या ग्रंथात आरंभी केले आहे तेय याचमुळे. हे अर्थशास्त्र किंवा नीतिशास्त्र विष्णुशर्म्याने निरनिराळ्या कथांच्याद्वारे आम्रसिंह राजाच्या अज्ञ मुलांना शिकविले आहे. या कथा ऐकून 'मग राजपुत्र सकळकळा ज्ञान प्रवीण जाले' असे ग्रंथाच्या शेवटी म्हटले आहे. त्यावरून या कथांची परिणामकारकता प्रत्ययाला आल्यावाचून राहणार नाही. लहान मुलांना नीतिशास्त्र शिकविण्यासाठी हा ग्रंथ रचला असला तरी प्रौढांनाही तो तितकाच बोधप्रद वाटतो. त्यातील कथांच्या रंजकतेने आणि जीवनविषयक शिकवणुकीने सर्वांना सारखेच वेड लावले आहे. म्हणूनच की काय, हा ग्रंथ भारताच्या मर्यादा ओलांडून जगभर वाऱ्यासारखा पसरला व लोकप्रिय झाला आहे.

प्राणिकथांचा उपयोग

'पंचतंत्रा'तील कथा बव्हंशाने प्राणिकथा आहेत. याच्या खालोखाल त्यात मानवकथा आहेत. इतर कथांत प्राणिकथा व मानवकथा यांचे मिश्रण आहे, म्हणजे प्राणी व मानव यांच्या त्या संमिश्रकथा आहेत. या सर्व कथा लेखकाने म्हणजे विष्णुशर्म्याने आपल्या स्वतःच्या कल्पनेतून निर्माण केल्या असतील असे मात्र म्हणता येणार नाही. लोकमानसात परंपरने दीर्घकाळ रुळलेल्या कथा नीतिशास्त्राच्या सूत्रात गुंफण्याचे अपूर्व कार्य त्याने आपल्या प्रतिभेने केले, असे म्हणावे लागेल. मानवी आचारविचारांचा पशुपक्ष्यांदिकावर आरोप करून त्यांच्याद्वारा मानवी स्वभावाचे चित्रण करणे हा प्राणिकथांचा आत्मा होय. अशा कथा कल्पकनेते रचण्याचे कार्य मानवी संस्कृतीच्या आरंभकाळापासूनच सुरू झाले असले पाहिजे. जगातील सर्वात प्राचीन वाङ्मय म्हणजे वेद व उपनिषद् वाङमय होय. त्यात विशुद्ध प्राणिकथा आढळत नाहीत, हे खरे असले तरी त्यांची बीजे मात्र अवश्य आढळतात. उदा : छांदोग्य उपनिषदात दोन हंसांच्या परस्पर संभाषणाने रैक्वाचे लक्ष वेधून घेतले होते, असा उल्लेख आढळतो. सत्यकाम जाबालीला एका बैलाने, हंसाने व जलचर प्राण्याने उपदेश केल्याचाही निर्देश त्यात आला आहे. [ए. बी. कीथ, ए हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर (आवृत्ती पहिली), पा. २४२.] प्राणिकथा किंवा प्राणि आणि मानव यांच्या संमिश्र कथांची ही बीजेच नाहीत काय? बौद्धांच्या जातक कथांत अशा अनेक प्राणिकथा आहेत. महाभारतातही त्या आढळतात. गुणाढ्याची बृहत्कथा, त्याच्या आधारे क्षेमेंद्राने रजलेली बृहत्कथामंजरी व सोमेश्वराचा कथासरित्सागर हे ग्रंथ तर सर्व

अनुक्रमणिका

प्रकारच्या कथांचे अपूर्व संग्रह होत. या सर्व ग्रंथांतील कथा त्या त्या लेखकाने आपल्या प्रतिभेने निर्माण केल्या असे मात्र नाही. मानवाने मानव संस्कृतीच्या आरंभकाळापासून त्या तयार केल्या असल्या पाहिजेत. मानव वंशाचा प्रचार व प्रसार जसजसा होऊ लागला तसतशा त्या कथाही निरनिराळ्या लोकात प्रचार पावून रूढ झाल्या असतील. लोकवाङ्मय म्हणून दीर्घकाळपर्यंत लोकमानसात त्या रुजल्या असतील. कालांतराने त्या कथावाङ्मयात समाविष्ट झाल्या असतील. एकच कथा निरनिराळ्या ग्रंथांत आढळते, क्वचित तीच कथा निराळे रूप धारण करून अन्य ग्रंथात आढळते, याचे कारण हेच होय. लोककथा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे, एका मानवसमूहातून दुसऱ्या मानवसमूहात जेव्हा जातात तेव्हा त्या दुसऱ्या व्यक्ती किंवा दुसरे मानवसमूह आपापल्या कल्पनांप्रमाणे, निवेदनप्रसंगाच्या आवश्यकतेप्रमाणे त्याला नवीन वेश चढवतात, नवीन रूप देतात, असा नेहमीचा अनुभव आहे. एखादा ग्रंथकार त्या कथांचा आपल्या साहित्यात जेव्हा उपयोग करतो तेव्हाही तो आपल्या आवश्यकतेप्रमाणे त्यांत परिवर्तन करतो. 'पंचतंत्रा'तील कथाही अशाच मुळात 'लोककथा' असल्या पाहिजेत. त्यांना नीतिशास्त्राच्या सूत्रात गुंफण्याचे महत्त्वाचे कार्य विष्णुशर्म्याने केले असावे, असे म्हणण्यास हरकत नाही.

पंचतंत्र आणि गुणाढ्य

संस्कृत 'पंचतंत्र' हा ग्रंथ केव्हा रचला गेला हे निश्चित सांगता येणे कठीण आहे. इ. स. ११ व्या शतकात [ए. बी. कीथ, तत्रैव. पा. २८१.] होऊन गेलेल्या काश्मिरी पंडीत सोमदेवाने लिहिलेल्या 'कथासरित्सागर' या ग्रंथात पंचतंत्रातील अनेक कथा आढळतात. किंबहुना, स्थूल मानाने कथासरित्सागराच्या [सोमदेव कथासरित्सागर. (निर्णयसागर तिसरी आवृत्ती १९१५.)] शक्तियशोलंबकातील चतुर्थ तरंग म्हणजे पंचतंत्रातील मित्रभेद तंत्र,; पंचम तरंग म्हणजे मित्रलाभ, षष्ठ तरंग म्हणजे काकोलुकीय, सप्तम तरंग म्हणजे लब्धप्रणाशन आणि, अष्टम तरंग म्हणजे अपरीक्षितकारक तंत्र होय. म्हणजे कथासरित्सागरात संपूर्ण पंचतंत्राचा समावेश झालेला आहे. त्यापूर्वी लिहिण्यात आलेल्या क्षेमेंद्राच्या बृहत्कथामंजरीतही [क्षेमेंद्र, बृहत्कथामञ्जरी. (निर्णयसागर दुसरी आवृत्ती १९३१.)] (शक्तियशोलंबक-१६) अशाच प्रकारे पंचतंत्रातील अनेक कथा आलेल्या आहेत. विद्वानांचे मत असे आहे की, या दोघांनीही आपापल्या ग्रंथात विष्णुशर्माविरचित 'पंचतंत्र' समाविष्ट केले असावे. सोमदेवाच्या बृहत्कथासरित्सागराच्या बाबतीत हे एक वेळ मान्य करता येईल. कारण, त्याला कथांचा समुद्रच निर्माण करायचा होता. पण बृहत्कथा 'मंजरी'चे ध्येयच मुळी सक्षेपाचे होते. 'कथासरित्सागर' सोमदेवाने जसा गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'च्या आधारे रचला म्हणून तो सांगतो त्याचप्रमाणे क्षेमेंद्रही गुणाढ्याची पैशाची भाषेतील 'बृहत्कथा'च आपण संस्कृतमध्ये आणली म्हणून सांगतो (लं. १९-२९, ३०) जेथे मुळातील कथाभागाचा संक्षेप करण्याचे ध्येय आहे तेथे इतर कथा मागाहून समाविष्ट केल्या असण्याचे फारसे संभवत नाही. तेव्हा गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'त 'पंचतंत्रा'चा समावेश असणे, निदान त्यातील बऱ्याच कथांचा समावेश असणे विशेष संभवनीय दिसते. याचा अर्थ असा की, गुणाढ्याने आपली 'बृहत्कथा' लिहिण्यापूर्वी 'पंचतंत्रा'ची रचना झाली असावी. गुणाढ्याचा प्रतिष्ठान येथील सातवाहन राजाशी संबंध होता, हे त्याच्या विषयीच्या चरित्रात्मक आख्यायिकेवरून [ए. बी. कीथ, तत्रैव. पा. २६७.] स्पष्ट दिसते. 'सातवाहन' या नावाचा कोणी राजा, सातवाहनांच्या वंशात होऊन गेला नाही असे एक मत प्रचलित होते. पण अलीकडे 'सादवाहन' हे नाव असलेली काही नाणी सापडली आहेत. त्यांवरून सातवाहन नावाचा राजा होऊन गेला व तोच सातवाहन वंशाचा संस्थापक असावा असे आता दिसून आले आहे. [डॉ. व्ही. व्ही. मिराशी, स्टडीज इन इन्डॉलोजी, भाग-३, पा. १—३.] हा सातवाहन राजा इ. पू. तिसऱ्या शतकाच्या शेवटच्या चरणात होऊन गेला. त्याच्याच दरबारात गुणाढ्य असल्यामुळे त्याचाही जीवनकाळ इ. पू. तिसऱ्या शतकाचा

उत्तरार्ध ठरतो. [पाहा, ए. जी. कीथ, तत्रैव. पा. २६८.] त्यापूर्वी मूळ संस्कृत पंचतंत्राची रचना झाली असावी, असे अनुमान करण्यास हरकत नाही.

पंचतंत्र आणि जातक कथा

'पंचतंत्रा'तील काही कथांसारख्या कथा बौद्धांच्या 'जातककथा'तही आढळतात. उदा : पंचतंत्राच्या पहिल्या तंत्रातील पिंगलक सिंह व संजीवक बैल यांची कथा व जातकातील 'सन्धिभेद जातक' [जातक कथांचे क्रमांक 'जातक'–(लेखक : भदन्त आनन्द कौसल्यायन. प्रकाशक : हिन्दी साहित्य संमेलन, प्रयाग) खंड १ ते ६ या ग्रंथांतून दिले आहेत.] (३४९), तसेच, दुसऱ्या तंत्रातील लघुपतनक, हिरण्यक, मंथरक व चित्रांगद या प्राण्यांची कथा व जातकातील 'कुरंगमृग जातक' (२०६) यात बरेच साम्य आहे. चौथ्या तंत्रातील वानर व मगर यांची कथा म्हणजे जातकातील 'वानरिन्द जातक' (५७) व 'संसुमार जातक' (२०८) यांचे मिश्रण होय. तंत्र १ मधील बडबड्या कासव व हंस (कथा १७) आणि जातकातील 'कच्छप जातक' (२१५); तसेच, तंत्र ४ मधील वाघाचे कातडे पांघरलेला गाढव (कथा ६) व जातकातील 'सिंहचम्म जातक' (१८९) यातही विलक्षण साम्य आहे. पंचतंत्रातील कथेतील वाघ, जातक कथेत सिंह म्हणून आला आहे एवढेच. तंत्र १ मधील ढोंगी बगळा व खेकडा (कथा ७) म्हणजे जातकातील 'बक जातक' (३८); ब्राम्हण, व्याघ्र, सर्प व सोनार यांची कथा (तंत्र १, कथा १०) म्हणजे 'सच्चंकिर जातक' (७३); तंत्र ३ मधील दधिकर्ण मांजराची कथा (कथा २) म्हणजे जातकातील 'बिळारव्रत जातक' (१२८); आणि तंत्र ४ मधील सहस्रबुद्धि, शतबुद्धि मासे व एकबुद्धि बेडूक यांची कथा (कथा ४) म्हणजे 'मितिचिन्ति जातक' (११४) होय. वानरसेवक व विप्रोचर (तंत्र १, कथा २५) आणि 'मकस जातक' (४४) यातील कथावस्तूही आशयाच्या दृष्टीने सारख्याच आहेत. अशी आणखी काही थोडी उदाहरणे शोधून सापडतील.

आता प्रश्न असा की, बौद्धांच्या जातककथांतून विष्णुशर्म्याने ह्या व अशाच काही इतर कथा आपल्या 'पंचतंत्रा'त घेतल्या, की पंचतंत्रातून त्या जातककथांमध्ये प्रविष्ट झाल्या? या दोन्ही मतांचे समर्थक व आक्षेपक आढळतात. काही असले तरी वरील केवळ दहापंधरा कथांच्या आधारावरून 'पंचतंत्र' हा मुळात बौद्ध ग्रंथ असला पाहिजे हे बेनफेचे मत [ऱ्हीस डेव्हिस, बुद्धिस्ट बर्थ स्टोरीज. प्रस्तावना. पान LXII पाहा.] मान्य करता येत नाही. इतकेच नाही तर पंचतंत्राच्या मूळ लेखकाने उपरोक्त कथा प्रत्यक्ष जातककथांतून उचलल्या असतील हेही मत टिकू शकत नाही. सोमेश्वराच्या कथासरित्सागरात 'पंचतंत्र' ज्या स्वरूपात आढळते त्याच किंवा तत्सदृश स्वरूपात ते गुणाढ्याच्या बृहत्कथेत विद्यमान असेल तर असे अनुमान काढण्यास हरकत नाही की, गुणाढ्याच्याही पूर्वी मूळ पंचतंत्राची रचना झाली असणे शक्य आहे. अर्थात्, जातककथा लेखनसमाविष्ट होण्यापूर्वी पंचतंत्र तयार झाले असले पाहिजे. कारण, जातककथासंग्रहाचा काळ स्थूल मानाने इ. पू. दुसरे शतक मानला जातो. ते काहीही असले तरी पंचतंत्र व जातककथा यात आढळणाऱ्या कथांच्या साम्यावरून एवढे निश्चित म्हणता येते की, या ग्रंथांच्या रचनेपूर्वी ह्या कथा, लोककथांच्या स्वरूपात जनसामान्यात रूढ होत्या. कदाचित, बौद्ध जातककथालेखकांनी व विष्णुशर्म्याने स्वतंत्र रीतीने त्यांचा आपापल्या हेतुपूर्तीसाठी उपयोग करून घेतला असेल [भारहूत येथील शिल्पपटात (ख्रिस्तपूर्व २ रे किंवा ३ रे शतक) काही जातक कथा कोरलेल्या आहेत. त्यावरून मॉरिस विन्टरनिझने काढलेला निष्कर्ष असा : "They prove that even at that early time many worldly narratives, which were found already current by the Buddhist monks, were 'Buddhistised'; that accordingly they must have been known in India Long before and possibly belonged to the pre-Buddhist period." (मॉरिस विन्टरनिझ, हिस्ट्री ऑफ इन्डियन लिटरेचर, भाग–२, पान १२१)]. वादविवादाच्या भरीस न पडता एवढे मान्य करण्याला काहीच हरकत नाही.

अनुक्रमणिका

पंचतंत्राचा विश्वसंचार

पंचतंत्राच्या लेखनकालाविषयी निर्विवाद व निश्चित असा एकच पुरावा आज उपलब्ध आहे. तो म्हणजे या ग्रंथाच्या पहलवी भाषेतील भाषांतराचा. इराणमधील सासानी राजवंशातील प्रथम खुस्त्रौ अनुशेर्वान बादशहाच्या आश्रयाखाली असलेल्या बुरजोय नावाच्या हकिमाने इ. सनाच्या सहाव्या शतकात अनेक भारतीय कथांचे पहलवी भाषेत भाषांतर केले. त्यात त्याने 'पंचतंत्रा'तील बहुतेक कथा अंतर्भूत केल्या. यावरून इ. स. सहाव्या शतकापूर्वी पंचतंत्र विद्यमान होते, इतकेच नाही तर ते अत्यंत लोकप्रिय होते हे स्पष्टपणे दिसून येते. पंचतंत्राच्या जागतिक प्रवासाला या पहलवी भाषांतरापासूनच सुरवात झाली. बुरजोयचे हे पहलवी भाषांतर आज उपलब्ध नाही. पण त्याच्या त्या ग्रंथावरून बूद नावाच्या लेखकाने पंचतंत्राचे सीरियाई भाषेत इ. स. ५५० च्या सुमारास भाषांतर केले. नंतर इ. स. ७५० मध्ये बुरजोयचे पहलवी भाषांतर नामशेष झाले. पहलवीतून सीरियाई भाषेत जो अनुवाद झाला होता त्यावरूनच इ. स. ७५० मध्ये अब्दुल्ला इब्नुल मुकफ्फा नावाच्या इराणी पंडिताने पंचतंत्राचा अनुवाद अरबी भाषेत केला. त्याला त्याने 'कलीला व दमना' असे नाव दिले. 'कलीला व दमना' ही पंचतंत्राच्या पहिल्या तंत्रातील 'करटक व दमनक' या कोल्ह्यांच्या नांवाची अपभ्रष्ट रूपे होत, हे सहज लक्षात येईल. मुकफ्फाचा हा ग्रंथ फारच लोकप्रिय झाला. या अरबी ग्रंथाची पुढे युरोपातील अनेक भाषांत भाषांतरे झाली. इ. स. १०८० च्या सुमारास सीमिऑन सेथ नावाच्या ज्यू गृहस्थाने 'कलीला व दमना' या उपरोक्त अरबी ग्रंथाचे ग्रीक भाषेत भाषांतर केले. या अरबी ग्रंथाच्या किंचित वेगळ्या संहितेवरून पुढे इ. स. १२५० मध्ये दुसऱ्या एका ज्यू पंडिताने त्याचे हिब्रूत भाषांतर केले. आणि नंतर या हिब्रू ग्रंथावरून जॉन कॅपुआ नावाच्या ज्यू पंडिताने इ. स. १२६३ ते १२७८ च्या दरम्यान लॅटिन भाषांतर केले. मुकफ्फाच्या अरबी ग्रंथाचे हिब्रूत भाषांतर झाले त्याच सुमारास त्याच अरबी ग्रंथावरून एक स्पॅनिश भाषेत व दुसरे लॅटिन भाषेत भाषांतर झालेले आढळते. मुकफ्फाच्या 'कलीला व दमना' या अरबी ग्रंथावरूनच फारशी भाषेतही काही भाषांतरे झाली. त्यात इ. स. १२२० च्या सुमारास नुस्त्रुल्लाने केलेले भाषांतर प्रसिद्ध आहे. त्याच्याच आधारे हुशेन काशिफीने केले 'अन्वारे सुहैली' नावाचे भाषांतर विशेष लोकप्रिय झाले. युरोप व आशिया खंडांतील अनेक भाषांतील भाषांतरे 'अन्वारे सुहैली' वरून झालेली आहेत. पूर्वी निर्दिष्ट केलेले जॉन कॅपुआने केलेले हिब्रू भाषांतरही असेच लोकप्रिय ठरले. त्याच्याही आधारे युरोपातील अनेक भाषांतील भाषांतरे तयारी झाली. त्यांतील इटालियन भाषांतरावरून सर थॉमस नॉर्थ याने इ. स. १५७० च्या सुमारास पंचतंत्राचे इंग्रजी भाषांतर प्रथम प्रसिद्ध केले. त्यानंतर इंग्रजीत या ग्रंथाची अनेक भाषांतरे झाली ती मात्र मूळ संस्कृत पंचतंत्राच्या आधारे. ['पंचतंत्रा'च्या विश्वसंचाराचा हा वृत्तांत, ऱ्हीस डेव्हिस, बुध्दिस्ट बर्थ स्टोरीज (प्रस्तावना) व देवीसिंग चौहान यांच्या 'पंचतंत्राचा प्रवास' (मराठी आणि दक्खिनी हिंदी, पा. १३१) यांच्या आधारे दिलेला आहे.] कित्येक साक्षेपी संशोधकांनी 'पंचतंत्रा'च्या अधिकृत संहिता संपादन केल्या. त्यात हारवर्ड ओरियंटल सीरीजमध्ये प्रसिद्ध झालेली डॉ. जोहान्स हर्टेल आवृत्ती व एडगर्टन यांची आवृत्ती आज विशेष प्रसिद्ध आहेत.

पंचतंत्र आणि प्राचीन मराठी

संस्कृत पंचतंत्र हा लोकप्रिय ग्रंथ असल्यामुळे त्याचा परिणाम प्राचीन मराठी वाङ्मयावर होणे स्वाभाविक होते. 'लीळाचरित्र' हा मराठीतील अत्यंत प्राचीन गद्यग्रंथ होय. त्यात चक्रधरांनी सांगितलेल्या अनेक लोककथा आलेल्या आहेत. पण आज उपलब्ध असलेल्या या ग्रंथात पंचतंत्रातील एकही कथा आढळत नाही. तथापी, चक्रधरांना 'पंचतंत्र' माहीत नसावे हे संभवत नाही 'लीळाचरित्रा'त आलेल्या 'मोकळ्या दृष्टांतां'ची एक यादी आढळते. त्यात 'नीळकंठ पतीता जंबूकाचा' (दृ. ८४) दृष्टांत नोंदलेला आहे. हा दृष्टांत म्हणजे 'पंचतंत्रा'तील 'निळीत पडलेला चंडरव कोल्हा' (तंत्र १, कथा १२) ही कथा होय,

अनुक्रमणिका

यांत शंका नाही. 'लीळाचरित्र'कार म्हांइंभट यांच्याविषयीची एक आठवण 'स्मृतिस्थळा'त आलेली आहे. तीत 'यावरि म्हांइंभटीं प्रस्तावीक वाक्य म्हणितलें : अपरीक्ष्य न कर्तव्यं कर्तव्यं सुपरोक्षितं । पश्चाद्भवति संतापो ब्राह्मणीनकुलो यथा ॥' (स्मृस्थ. १३९). हा श्लोक 'पंचतंत्रा'च्या पाचव्या तंत्रातील ७ वा श्लोक होय. यावरून मराठी गद्याच्या आरंभकाळात, म्हणजे तेराव्या चौदाव्या शतकात बहुश्रुत व्यक्तींचा 'पंचतंत्रा'शी चांगला परिचय होता, असे दिसून येते. त्यातील कथांचे निर्देश त्यांच्या तोंडी येतात, यावरून त्याची लोकप्रियताही दिसून येते. पुढे तर या ग्रंथाची मराठीत भाषांतरे होऊ लागली. ती 'पंचोपाख्यान' या नावाने. सोळाव्या शतकात विश्वनाथबासाने लिहिलेल्या 'आचारवंदा'त 'जाणीव' आणि 'सिहाणीव' यांचे स्पष्टीकरण करतांना ग्रंथकार म्हणतो : 'तरि जाणीव म्हणजे वेद : शास्त्रे : पुराणें : स्मृति : ऐसी एक एक जाणीव : मग एकासी संगीत रागमानाची जाणीव : एका जोतिष शास्त्राची : एकासि वैद्यकाची : एकासि उपशास्त्रें : **वृद्धकथांची** : इत्यादि जाणीवा असति : आणि सिहाणीबा तिया साम दाम दंड भेद या चौ ग्रंथांचीया राज्यव्येवस्थेमध्यें : तथा स्ववर्णी व्येवहार चालवणें : यामध्यें सिहाणीवा असति : तथा **पंचोपाख्यानादि** लघुदीर्घ चाणाख्यें.......'. यात 'वृद्धकथा' या शब्दाचा उपयोग लक्षणीय आहे. 'पंचोपाख्यान'चा तर स्पष्ट निर्देश आहे. १६ व्या शतकापूर्वीच 'पंचतंत्रा'ची भाषांतरे मराठीत झाली होती हे यावरून स्पष्ट दिसते.

पंचतंत्रातील काही कथांचे निर्देश ज्ञानेश्वर-मुक्तेश्वरादी कवींच्या काव्यांत आढळतात. [विविध ज्ञान विस्तार वर्ष ६०, पान २९-३०.] उदा : 'कां टिटिभु चांचुवेन्हीं । माप सुये सागरीं । मीं नेणतु तियापरी । प्रवर्तें एथ' (ज्ञाने. १·६८) ; 'पतंगा नावडे वाति । खद्योता भानुची खंति । टिटिभें अपांपति । वैरी केला । (ज्ञाने. १६·२३२). ज्ञानेश्वरीतील या ओव्यांमध्ये 'पंचतंत्रा'तील 'टिटवा आणि समुद्र' (तंत्र १, कथा १६) या कथेचा संदर्भ आहे. तसेच 'अथवा निधान हें प्रकटलें । ह्मणौनि खदिरांगार खोळे भरिले । कां साउली न पांतां घातलें । कुहां सिंहें' (ज्ञाने. ९·१४८); 'आपुलें बिंब नेदखतां । सिंहु कुहां घालील देखों आतां । ऐसा धरिजे तेवि अनंता । राखिलें मातें' (ज्ञाने. ११·५५); 'जैसा कुहां आपणचि बिंबे । सींहु प्रतिबिंब पांतां खोभे । खोभला समारंभें । घाली तेथ' (ज्ञाने. १५·४५४) या तिन्ही ओव्यांत 'मदोन्मत सिंह आणि चतुर ससा' ही पंचतंत्रातील कथा (तंत्र १, कथा ८) आलेली आहे.

मुक्तेश्वराच्या महाभारततही पंचतंत्रातील काही कथा आढळतात. 'वनपर्वा'त स्थालिपाक प्रसंगी द्रौपदीने केलेल्या श्रीकृष्णाच्या धाव्यात (अध्याय ११) 'विष्णुरूप धारण करणारा कोळी (कौलिक) आणि राजकन्या' ही पंचतंत्रातील कथा (तंत्र १, कथा ९) पुढीलप्रमाणे निर्देशिलेली आहे. 'कौलिक कृत्रिम वेश नटी । राजकन्या भोगी कपटी । निर्वाण मांडल्या संकटीं । म्हणे धाव श्रीकृष्णा' ॥ (अ. ११–) त्याच्याच पुढे 'समुद्रें हेळिली पक्षिकुळें । सागरें हरिलीं त्याचीं वाळें । दुःखें पक्षियांचे पाळे । आड पडिले गरुडातें ॥ देवें पाचारिला सिंधू । नावरे प्रलयाग्नी क्रोधू । रागें करावया वधू । सुदर्शना परजिलें । समुद्रें रिघोनियां शरण । दीधली वाळकें आणोन । ते वेळी गरूड संतोषोन । विष्णुसेवे लागला' (अ. ११·८२-८७) ही पंचतंत्रातील 'टिटवा आणि समुद्र' (तंत्र १, कथा १६) ही कथा होय. मुक्तेश्वराने निर्देशिलेल्या या कथेचे स्वरूप ' गरूड पुराणात' आलेल्या कथेसारखे आहे. तेव्हा, मुक्तेश्वराने ती तेथून घेतली असणे शक्य आहे.

सारांश, ज्ञानेश्वर-मुक्तेश्वरादी मराठी कवींचा पंचतंत्राशी परिचय होता यात शंका नाही. हे कवी संस्कृत भाषेचे पंडित होते. तेव्हा त्यांनी पाहिलेले पंचतंत्र 'संस्कृत'च असणार, हे निराळे सांगण्याची गरज नाही.

अनुक्रमणिका

संस्कृत पंचतंत्राची भारताबाहेरील भाषात जशी भाषांतरे झाली तशी ती भारतीय देशी भाषातही झालेली आहेत. त्यांतील मराठी भाषेत केलेल्या पंचतंत्राच्या भाषांतरांचा मागोवा घेण्याच प्रयत्न या ठिकाणी करावयाचा आहे.

२

पंचतंत्र ऊर्फ पंचोपाख्यानाचा शोध : भावे, वि. ल.

मराठी पंचतंत्र ऊर्फ पंचोपाख्यान, या ग्रंथांचा शोध घेऊन त्यांपैकी काहींचा मराठी अभ्यासकांना प्रथम परिचय करून दिला तो 'महाराष्ट्र सारस्वत'कार वि. ल. भावे यांनी. 'गद्य व पद्य मिळून दहापेक्षा जास्त पंचतंत्रे दृष्टीस पडतात. बाराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत ही निरनिराळ्या काळी रचिलेली आहेत.' असा उल्लेख त्यांनी आपल्या 'महाराष्ट्र सारस्वता'त प्रथम केलेला आढळतो. [वि. ल. भावे, महाराष्ट्र सारस्वत (आवृत्ती तिसरी), भाग १, पा. ३१.] भावे यांनी पाहिलेल्या दहा पंचतंत्रांपैकी दोन निश्चितच पद्यबद्ध असावी. त्यातील एक निर्मळ पाठकाचे व दुसरे महालिंगदासाचे. कारण, या दोन्ही ओवीबद्ध 'पंचतंत्रा'चा ओझरता परिचय त्यांनी 'महाराष्ट्र सारस्वतां'त करून दिलेला आहे. [तत्रैव, पा. २१३ व २६९.] इतर आठापैकी निदान दो पंचतंत्रे तरी गद्यात्मक असावीत हे पुढील विवेचनावरून दिसून येईल.

भावे यांनी इ. स. १९०७ मध्ये 'महाराष्ट्र कवि' मासिकातून मराठी गद्य पंचतंत्र प्रथम प्रसिद्ध केले. ते संपूर्ण असले तरी अनेक ठिकाणी त्रुटित आहे. उदा : पहिल्या तंत्रात कौलिकाने विष्णुरूपाने राजकन्येचा उपभोग घेतला, या कथेचा पूर्वभाग त्यात नाही. या पहिल्या तंत्राचा शेवटचाही भाग त्यात नाही; दुसरे तंत्र तर फारच त्रुटित आहे. हस्तलिखित पोथीतील या भागांची पाने गहाळ झाली असली पाहिजेत. तथापि, त्रुटित असले तरी मराठी गद्य पंचतंत्राची ओळख अभ्यासकांना करून देणारा हा पहिला ग्रंथ आहे, म्हणून तो महत्त्वाचा होय.

भावे यांनी 'महाराष्ट्र सारस्वता'ची दुसरी आवृत्ती इ. स. १९१९ मध्ये प्रसिद्ध केली त्या वेळी 'पंचतंत्रा'ची ओळख करून देताना 'महाराष्ट्र कवि' मासिकात पूर्वीच छापलेल्या पंचतंत्रातील उतारा देण्याऐवजी आपल्या जवळील दुसऱ्या एका हस्तलिखितातील उतारा त्यांनी दिला आहे. (पा. ८४-८५). १९२४ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'महाराष्ट्र सारस्वता'च्या तिसऱ्या आवृत्तीत (भाग पहिला) मात्र त्यांनी तो उतारा गाळला. का गाळला ते सांगता येत नाही. हा उतारा मी खाली उध्दृत करीत आहे.

भावे यांची सारस्वत प्रत

> "कव्हणी येके नगरीं देवशर्मा म्हणीजे ब्राह्मणु : तयाचीये भार्येसि प्रसूती जाली : एकु पुत्रु एकु मुंगस : ऐसें तया मुंगसासि : पुत्राचियापरि वाढवितातिं : पुणु तयासि विश्वासती नां : कव्हणी येकी समयीं कथमपि हे मुंगस बाळकासि विरुद्ध करैल : ऐसे एकु दिवसु पुत्रातें पालकां निजउनि उदकाचा घटु घेउनि पाणियांसी निगाली : मग भर्तारासी म्हणे : तुम्ही हा बाळु मुंगसापासाव रक्षावा : ऐसी ते पाणींयांसी गेलीया उपरी : ब्राह्मणूं शून्य घर सांडौनि एकाचिया घरा निस्त्रावयासी गेला : यीतुकां समयीं कृष्णसर्पु पालकेयावरी उतरतां मुंगसें देखिला : सहजवैरी देखौनि बाळकासि खाईल म्हणौनि शतखंडु केला : रुधीरें भांबळ तोंड ऐसा देखौनि म्यां पुरुषार्थु केला म्हणौनि माये

अनुक्रमणिका

पुढां सांघावया गेला : तवं माया रुधीरें भांबळतोंड देखौनि म्हणे : अलोट माझें बाळ येणें मारिलें असैल : ऐसें म्हणौनि तयावरी उदकाचा घट्ट टाकिला : तेणेंकरुनी मुंगस मेलें : या उपरी मुंगसातें मारौनि घरासी ये : तवं सुखें पालकें बाळक खेळत असे : आणि पालकेया खाली सर्पु मारीला देखिला : मग थोरु विळापु करुं आदरीला : कटाकटा म्यां पापीणीयां अविचार्य कार्य केलें : एतुका समयीं तो ब्राह्मणुं घरासि निस्रावा घेउनि आला : तवं तेणें पुसीलें : तूं का विळापु करीतेसी : तवं ते म्हणे पापीया तुं घरीं असतासी तरि ऐसें कां होतें : तुज तृष्णां बहुत : तरि आतां दुःख भोगी : ॥"

भावे यांची 'महाराष्ट्र कवि' प्रत

'महाराष्ट्र कवीं'त प्रसिद्ध झालेल्या 'पंततंत्रा'तील याच कथेचा उतारा तुलनेसाठी येथे देतो.

"कोण्हे येके ठाईं देवशर्मा नामें ब्राह्मणु । तयाचिये भार्येसि दोनि लेंकुरें जावळिं जाहालिं । येकु मुंगसु । आणि येकु पुत्रु । तीयां दोघांतें वाढविलें । परि लेंकुरासि मुंगस मारिल यैसें भय असे । येक वेळ ते पाणियासि गेलि । भर्तारातें म्हणे । मि पाणियाचा हेलु आणिन । पाळणां लेंकुरूं आहे । तें पाहात घरिं असा । तो नावेक होता । इतुकेनि कवाड अडकुनि । निश्रया आणावयासि गेला । तंव सापु पाळणेयावरि । वोळकंबतु असे । तो मुंगसें देखिला । तेणें खालि पाडिला । आणि मारुनि त्याचे तुकडे केले । तंव ते पाणि घेउनि आलि । तंव तें मुंगुस तिये जवलि आलें । तें लाडिजेत मागें पुढें रिघों लागलें । तयातें पाहे तंव त्याचें तोंड रक्तें माखलें । तें देखौनि न विचारितां । भरलि घागर त्यावरि टाकिली । म्हण चांडाळा लेंकरुं खादलें । घरांत आलि । तंव लेंकरुं पाळणां सुखें असे । सर्पु मारिला असे । तें देखौनि मग रडत बैसलि । तंव तो ब्राह्मणु आला । त्यातें म्हणे माझें म्हणतीलें न करिसीच । तेणें येसणें दुःख पडलें । तृष्णा अपार करितां ऐसे जालें ।"

हे दोन्ही उतारे 'ताडून पहातां स्वच्छ दिसेल की, दोन्ही उताऱ्यांत बराच फरक आहे. हा फरक दोन प्रकारचा आहे. एक भाषेचा व दुसरा मजकुराचा. भाषेचे जे रूप सारस्वतातील उताऱ्यात दिसते ते कवीतील भाषास्वरूपापेक्षा प्राचीन आहे यात शंका नाही. दुसरे, मजकुर पाहिला तरी पुष्कळ तफावत आहे. यावरून ही दोन्ही पंचतंत्रे एकाच्याच नकला नसून दोन निराळी भाषांतरे होती असे ठरते' असे द. वा. पोतदार यांनी म्हटले [भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, वर्ष ३, अंक २-४, पा. ४५.] ते बरोबर आहे. भावे यांच्या जवळ दोन स्वतंत्र गद्य पंचतंत्रे होती. त्यांपैकी 'महाराष्ट्र कवी'त छापलेले पंचतंत्र जसे त्रुटित, म्हणून अपूर्ण आहे, तसेच 'महाराष्ट्र सारस्वता'त ज्यातील उतारा दिला आहे तेही अपूर्ण आहे. त्या पंचतंत्राची फक्त ४ व ५ ही दोनच तंत्रे भाव्यांना उपलब्ध झाली होती, असे द. वा. पोतदार यांनी केलेल्या निर्देशावरून दिसते. [तत्रैव, पा. ४५ (तळटीप).]

पोतदारांना उपलब्ध झालेले पंचतंत्र

द. वा. पोतदार यांनाही गद्य पंचतंत्राच्या एका पोथीतील तृतीय तंत्राची काही पाने उपलब्ध झाली होती. ती त्यांनी भा. इ. सं. मंडळाच्या पूर्वोक्त अंकात प्रसिद्ध केलेली आहेत. मजकुराच्या दृष्टीने 'महाराष्ट्र कवी'तील गद्य पंचतंत्राशी ताडून पाहता; आणि भाषेच्या दृष्टीने 'महाराष्ट्र सारस्वता'तील उताऱ्याशी ताडून पाहता पोतदारांना उपलब्ध झालेले हे तिसरे स्वतंत्र गद्य पंचतंत्र असावे असे स्पष्ट दिसते. त्यातील एक उतारा [तत्रैव, पा. ५१.] येथे देतो.

अनुक्रमणिका

“कोण्ही एक्ये नगरीं : चित्ररथु नावे राजा : तेयाचां धनुर्धरी उ तं पत्ष्ट द्मवन नावे सरोवर : तिथे वहुतसरो सुवर्णाचे हंस वसति : ते सासां मासां सुवर्णाचे एक पित्स त्यजीती : ययामध्ये : तया सरोवरा एकु सुवर्णाचा पक्षीया आळा : तेही हंसी ह्मणितळे : तुवा आह्मामध्यें न वसावे : जेणे कारणे सासां मासां आह्मी रायासी एक पिछ देयावे : ऐसे ह्मणौनि विकत सरोवर घेतळे : वर्त्ते का*ई म्हणौ । एणें प्रकारे ज्या पक्षीयासि द्वैधीभावु मांडळा : तीये वेळे तो पक्षीया तयाजवळि शरण जाउनि : बोळीळा : अगा जी हे पक्षीये ऐसें ह्मताति : जे राॐ आह्मासि का*ई करिल येथे आह्मी कोण्हासी ही वसो नेदु : म्या ह्मणितळे : तुह्मी वोषटे बोळिळेति : मी जाउनी रायापुढे सांगैन : यैसे राॐ चित्ता ए ते करु इतुके राए आईकोनि ओ सेवका प्रति बोळिळा अगा तुह्मी जाउनियां अवघे पक्षियांथे मारूनि आणा : मग रायाच्ये निरोपे ते सेवक निघाळे या नंतरे ळांकुडे हस्ता राजपुरुषाथें देषौंनि तेथे येक वृधं पक्षीये ह्मणितळे अगा स्वजातिया पासौनि ओषटे मांडळे : तरि सकळहीं एकं च उत्पवन करावें : तेहीं पक्षी तैसेचि केळे :”

हीच कथा महाराष्ट्र कवींतील पंचतंत्रात [वि. ल. भावे, महाराष्ट्र कवि, पंचतंत्र, पा. ४०.] पुढीलप्रमाणे आहे :

“कोण्हे एके नगरि । चित्ररथ नामें राजा । तयाचें पद्मसरोवर । तेथें सोनियांचे हंस । ते मासा प्रत्येके पिसें सोनियांचीं दोनि दोनि तया रायातें देति । तंव तेथें सोनियाचा पक्षी थो आला । तया पक्षियातें हांसि म्हणितलें । आम्ही रायासि सां मासां पिसेंर दोनि दोनि देतु असों । म्हणौनि तुं येथुन वेगां जाये । तंव तो पक्षि रागे ठेला । रायापासिं यैसे जाउनि म्हणितिलें । जें हंससरोवरिचे पक्षि तुमतें न मनिति । म्हणति आम्हि रायापासिं पिसें देतु असों । रावो आमुचे काये करिल । तुम्हि कोण्ही आमचे सरोवरिं न रहावें । तंव त्या राजेयानि न विचारितां । राजपुरुषांसि निरोपु दिधला । जें अवघे हंस धरुनि आणा । ते धरावया येतु देखौनि । वृद्ध पक्षियाचेंनि वचनें । येकेच वेळे उडौनि गेले :”

या दोन्ही उताऱ्यांतील कथेत मजकुराचा व निवेदनशैलीचा फरक तर आहेच पण भाषेच्याही दृष्टीने तफावत आहे. भावे यांच्या जवळील दोन व पोतदार प्रत यांचा विचार केला असता ‘सारस्वत प्रत’ सर्वात जुनी, ‘पोतदार प्रत’ त्यानंतरची आणि ‘महाराष्ट्र कवी’त प्रसिद्ध झालेली प्रत सर्वात आर्वाचीन असावी, असे स्पष्ट दिसते. पोतदार प्रतीतील गद्य पंचतंत्र हे तेराव्या शतकातील, ज्ञानेश्वरानंतर पाचपन्नास वर्षात झालेले असावे, असे पोतदार म्हणतात. पण त्यातील निघालों, गे**लों**, **ज्या ज्या**, लोहकरा**च्या**, इंधना**च्या**, बाणा**च्या**, ऐ**स्या** ओख**ट्या** इत्यादी रूपांवरून तो १४ व्या शतकातील किंवा त्याही नंतरचा असावा असे वाटते. ज्ञानेश्वर काळातील या शब्दांची रूपे निघा**लां**, गे**लां**, जे**या** जे**या**, लोहकारा**चेया**, इंधना**चेया**, बाणा**चेया**, ऐसे**या**, ओखटे**या**, अशी होती. ल चे **ळ** लेखन; द्वितीया किंवा चतुर्थीच्या **तें** प्रत्ययाचे **थें** असे लेखन, ही त्या काळातील भाषेची वैशिष्ट्ये नाहीत. सारस्वत प्रत, आज जो लहानसा उतारा उपलब्ध आहे त्यावरून पाहाता, अशा रूपांपासून मुक्त आहे. ती अधिक जुनी असावी असे मला वाटते. ‘महाराष्ट्र कवी’तील प्रत ही बरीच अर्वाचीन म्हणजे सुमारे पंधराव्या शतकातील किंवा त्या नंतरची असावी असे वाटते. हे पंचतंत्रही ‘ज्ञानेश्वरीच्या सुमारास लिहिले गेले असावे’ असे प्र. धों. कानिटकर म्हणतात, [विविध ज्ञान विस्तार, वर्ष ५६, पा. ४०७.] ते बरोबर नाही. बोलि**लों**, उबग**लों**, गाडीं जुपि**लो** हो**तो** अशी प्रथम पुरुषी ओकारांत रूपे यात पुष्कळ आहेत. करितो, आणितो, येतो, जेथे, तेथे, तुझ्या, त्याच्या, त्याचा, त्यासि अशी उत्तरकालीन रूपेही या ग्रंथात पुष्कळ आहेत. या ग्रंथात ‘एकही परकीय शब्द नाही’ हे त्यांचे म्हणणेही बरोबर नाही. अगदी आरंभीच ‘कौतुकाचे **हौसि**चे’ असा **हौस** शब्द आला आहे. तो फारशी ‘होस’ किंवा अरबी ‘हवस’ मधून मराठीत आला आहे. तेव्हा हा ग्रंथ ज्ञानेश्वरकालीन किंवा त्याच्या जवळपासचा निश्चित नाही. डॉ.

अनुक्रमणिका

तुळपुळे यांच्या मते तो १४ व्या शतकातील असावा. आपल्या 'ओल्ड मराठी रीडर' या पुस्तकात त्यांनी या पंचतंत्रातील एक उतारा दिला आहे. [शं. गो. तुळपुळे, ओल्ड मराठी रीडर (आवृत्ती पहिली), पा. ११७.] तेथे या ग्रंथाचा काळ 'सुमारे १२७० शक किंवा इ. स. १४ वे शतक' असा दिला आहे. पण हा ग्रंथ चौदाव्या शतकातील आहे हे अभ्यासकांना पटावे म्हणूनच की काय त्यांनी मूळ उताऱ्यातील काही शब्दरूपांत बदल करून ते दिले आहेत. काही उदाहरणे देतो. या उदाहरणांत भावे प्रतीत आढळणारे मूळ रूप आधी देऊन तुळपुळे यांनी केलेले बदल कंसात दिलेले आहेत. उदा : सां**गे** (सां**घे**), **त्या** (**तेया**), ते**थे** (ते**थ**), **द्या**वे (देयावे), **त्या**सि (**तया**सि), आमु**च्या** (आमु**चेया**), सां**गों** (सां**घों**), सां**गि**तला (सां**घि**तला) इत्यादी. या बदलांचा अर्थच असा की, तुळपुळे यांच्या मते ग्रंथातील या शब्दांची मूळ रूपे १४ व्या शतकातील मराठीची नाहीत.

पोतदारांना मिळालेले दुसरे गद्य पंचतंत्र

द. वा. पोतदार यांनीच 'मराठी गद्य पंचतंत्राचे एक पान' इ. स. १९३६ मध्ये प्रसिद्ध केले. [भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, वर्ष १७, पा. ६०-६१.] ते एक स्वतंत्र गद्य पंचतंत्र आहे अशी समजूत होण्याचा संभव आहे. त्याचे स्वरूप लक्षात येण्यासाठी त्या पानातील मजकूर प्रथम येथे उध्दृत करतो.

> "सा कोज्लाळु : ऐसें बोलतांची कंबुग्रीउ पडला : तो लोकी शतषंड केला : टीटीवि म्हणे तैसें तुं माझें वचन गर्वास्तव नाईकसिची : म्हणौनि आंडी समुद्रें नासलीं : ऐसे आइकोनी टिटिवा क्षोभातें पाउन म्हणे : आतां मी हा समुद्रु सोषीन : तेव्हां : टिटिवि म्हणे : तुज आणी समुद्रा वैर केवि घडे : परस्परें समानता नाही : टिटिवि म्हणे तुज समुद्रा वैर जरी करणे : तरी बहुतां पक्षीयातें मेळवी : मग वैराचा उद्यमु करावा : बहुतीं काये असाध्य : ॥ उक्तं च ॥ बहुनामल्पसाराणां समुदायो हि दुर्जयः । तृणैरारभ्यते रजुस्तया बध्नाति कुंजरान् ॥ ७ ॥ चिट्टिका काष्ठकुटेन मक्षिकासह दर्दुरी । बहुजनविरोधेन कुंजराः प्रळयं गताः ॥ ५ ॥ ते कैसी कथा : टिटिवासी टिटिवि सांघे : कोण्ही ऐके वटवृक्षाचां ठाईं : चिडि येकि व्यालि होति : तव तीये मार्गींचि हस्ती येकु जात होता : तेणें सोंडी घालुंनी षांदि मोडलि : चिडिचीं आंडी मेली : ते चीडि थोर दुःखातें पावली : हस्तीचा द्वेषु धरुनी काष्ठकुटा पक्षीयापासी गेलि : तया पुढे दुःख नीवेदन केले : तेणे समजाविली : तो म्हणे चीडिये तुझा वैरी मी मारीन : मग तो काष्ठकुटा आणी चिडी मासीयपासी येउनी : दुःख नीवेदन करती जालि : ते मासी म्हणे मोहाळ खातां माझें गोत्र तेणें हस्तीये खादले : तरी मज निरोपु काये तो सांघ : तव मासी म्हणे माझा मैत्रु मेघदुतु बेंडुक असे : तयापासी दुःख सांघो : तो आपुलें कार्य करील : मग तया प्रती जाउनी तो बेडुक सावधु केला : तयातें म्हणीतलें : आडकडा राहुंन बोबावे : मग काष्ठकुटें हस्तीयाचे डोळे टोचीले : मासीया बैसोनी असाडी पडलि : किडे पडले : तो हस्ती अंधु जाला : ऐसा कोण्हे येके समयीं हस्ती तृषाक्रांतु जालां : पाणीया जातां सोये नेणेचि । तवं आडकडांहुंन बेंडूक बोबाईले : तो हस्ती ते सोई निगाला : कडा होउनी खोरीं पडला : प्राणु गेला : म्हणौनी बहुत काये करूं......"

हा उतारा आपल्या मुद्रित संहितेतील पान ५१, ओळ १५ पासून तो पान ५२, ओळ २० पर्यंतच्या मजकुराशी ताडून पाहावा. वरील उताऱ्यातील आरंभीचे शब्द 'सा कोज्लाळु'–हे '[काइ]सा कोल्हाळु' असे असले पाहिजेत. काही ठिकाणचे शब्दभेद जर सोडले तर वरील उतारा व मुद्रित संहितेतील उतारा यात विलक्षण साम्य आहे. मुद्रित संहितेत, पान ५१ वरील २५ व २६ या ओळी जास्तीच्या आहत. नमुना प्रतीवरून नकल करताना काही ओळी गाळल्या जातात तर काही अधिक लिहितात. क्वचित शब्द

बदलतात, हा अनुभव नेहमी येतो. या दोन उताऱ्यांतील साम्यावरून हे एकाच परंपरेतील पंचतंत्र असावे, असे म्हणण्यास हरकत नाही. ते अगदी निराळे व स्वतंत्र भाषांतर मानण्याचे कारण नाही. आपल्या मुद्रित संहितेच्या शाखेतीलच ते होय.

पंचोपाख्यानाची महानुभावीय प्रत

प्रथम इ. स. १९३८ मध्ये भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकाच्या वर्ष १९ च्या तिसऱ्या अंकात व नंतर वर्ष २२ च्या दुसऱ्या अंकात ह. ना. नेने यांनी पंचोपाख्यानाच्या महानुभावीय प्रतीचा परिचय करून दिलेला आहे. नेने यांनी ज्या प्रतीचा परिचय करून दिला आहे तिच्या मूळ पोथीवरूनच [भारत इतिहास संशोधन मंडळाच्या त्रैमासिकात नेने यांनी लिहिलेल्या लेखांवरून असे दिसते की, त्यांनी पाहिलेली पोथी मंडळातील असावी. सध्या मंडळाच्या पोथीशाळेत ती नाही. उपरोक्त लेखात पोथीचे वर्णन करताना, तिच्यातील संस्कृत श्लोक तांबड्या शाईत लिहिले असल्याचा निर्देश दोनदा केला आहे. तसे माझ्याजवळील पोथीत नाही. त्यामुळे असे वाटते की, माझ्याजवळील महंत पायधन बुवांच्या मठातील पोथीवरून हा ग्रंथ महंत दत्तराज किंवा त्यांच्यासाठी इतर कोणीतरी नकललेला असावा. ती प्रत त्यावेळी मंडळात असावी. नेने यांनी उध्दृत केलेल्या उताऱ्यावरून नकलकाराकडून ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार इत्यादिकांच्या बऱ्याच चुका झालेल्या दिसतात. एरवी मजकुरात फरक नाही. पुढे महंत पायधन बुवांच्या मठातील मूळ पोथीही त्यांना महंत गोपीराज यांच्याकडून मिळाली असे दिसते. कारण, नेने यांच्याजवळ असलेली पोथीच पुढे मला महंत गोपीराज यांच्याकडून मिळाली. तो वृतांत पुढे योग्य ठिकाणी दिला आहे.] प्रस्तुत पंचोपाख्यान मी संपादन केलेले असल्यामुळे त्याविषयी येथे विचार करण्याचे कारण नाही. पुढे त्यासंबंधी मी. सविस्तर लिहिलेले आहे.

आतापर्यंत मुद्रित स्वरूपात अभ्यासकांना ठाऊक असलेल्या मराठीतील गद्य पंचतंत्रांचा ऊर्फ पंचोपाख्यानांचा शोध घेतला. त्यावरून असे निष्पन्न होते की, भावे यांनी 'महाराष्ट्र कवीत' छापलेले पंचतंत्र, महाराष्ट्र सारस्वतात ज्यातील उतारा आला आहे ते पंचतंत्र, पोतदारांना प्रथम उपलब्ध झालेले पंचतंत्र व नेने यांनी ज्याचा परिचय करून दिलेला आहे ते पंचोपाख्यान, अशी चार निरनिराळी मराठी गद्य पंचतंत्रे, पूर्ण किंवा त्रुटित स्वरूपात आज ठाऊक आहेत. याशिवाय अनेक ठिकाणी पोथ्यांचा संग्रह उपलब्ध आहे. त्यांचा शोध घेऊन मला ज्या 'पंचतंत्रां'चा ऊर्फ पंचोपाख्यानाचा शोध लागला त्यांची माहिती यापुढे सादर करीत आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

मंडळाच्या संग्रही असलेल्या हस्तलिखितांच्या मुद्रित यादीत '**पंचतंत्र**'—या नावाने पुढील नोंदी आढळल्या. (१) क्रमांक २९·१६१६. पंचतंत्र , पाठक निर्मळ. (२) क्रमांक ३७·३५२. पंचतंत्र, महालिंगदास. (३) क्रमांक ४१·१०२. त्रुटित. ही पोथी संग्रहात शोधूनही मिळाली नाही. '**पंचोपाख्यान**' या नावाने पुढील नोंदी आढळल्या. (१) क्रमांक २१·४२ पंचोपाख्यान. कृष्णराज. हा ग्रंथ ओवीबद्ध आहे. (२) क्रमांक २१·६३ पंचोपाख्यान महालिंगदास (त्रुटित) (३) क्रमांक २२·९७ पंचोपाख्यान (त्रुटित). ही पोथी मी तपासून पाहिली. त्रुटित भाग निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानातील आहे. (४) क्रमांक ३६·३४३. पंचोपाख्यान (त्रुटित). ही पोथी संग्रहात मिळाली नाही. (५) क्रमांक ४१·१६५. पंचोपाख्यान (त्रुटित). या हस्तलिखिताची सुटी २४ पाने मी तपासून पाहिली. इ. स. १८२१ मध्ये एल्फिन्स्टनने, वैजनाथ पंडिताकडून करवून घेतलेल्या व शिळाप्रेसवर छापलेल्या ग्रंथातील भागाचीच ही नक्कल आहे. (६) क्रमांक ४८·६ पंचोपाख्यान (त्रुटित). ही पोथी सुद्धा संग्रहात मला मिळाली नाही.

सारांश, **भाइसंमं** च्या पोथीशाळेतील हस्तलिखितांच्या यादीत मराठी पंचतंत्र आणि पंचोपाख्यान या नावाखाली एकूण ९ हस्तलिखितांची नोंद आहे. त्यांपैकी तीन हस्तलिखिते पोथीशाळेत नाहीत. इतर ६

हस्तलिखितांपैकी एक आधुनिक आहे. त्याचा विचार करण्याचे कारण नाही. बाकीच्या पाच हस्तलिखितांपैकी दोन महालिंगदासाच्या व दोन निर्मळपाठकाच्या पंचोपाख्यानाची आहेत. त्यांची माहिती यापूर्वी मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना आहेच. पाचवे हस्तलिखीत कृष्णराज कवीच्या ओवीबद्ध पंचोपाख्यानाचे आहे. [या कवीची व त्याच्या 'पंचोपाख्याना'ची नोंद नागपूर विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या 'वाङमयकोशा'त आहे. ही नोंद कशाच्या आधारे केली हा संदर्भ तेथे नाही. 'मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालया'च्या संशोधन मंडळात या 'पंचोपाख्याना'चे हस्तलिखित आहे असे डॉ. म. रा. जोशी यांनी मला कळवले आहे. तेथून उपरोक्त नोंद घेतली आहे. संशोधन मंडळातील हस्तलिखित त्रुटित आहे.] या कवीची व त्याच्या या ग्रंथाची माहिती नव्याने होत आहे. **भाइसंमं**.च्या संग्रहामुळे या नवीन कवीचा व त्याच्या पंचोपाख्यानाचा शोध लागला, ही महत्त्वाची गोष्ट होय.

राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

राजवाडे संशोधन मंडळातील हस्तलिखितांच्या मुद्रित यादीत पुढील नोंदी आहेत.—(१) क्र. ५१६/प.४०. पंचोपाख्यान (अपूर्ण), कर्ता, प्रल्हाद भास्कर. पत्रे २४८. (२) क्र. ५१६/प.४१. पंचोपाख्यान. कर्ता, प्रल्हाद भास्कर. अथर्ववेदी. लेखक नारायणात्मज लक्ष्मण. काल : १६४७ व १६७६. पत्रे १२ + ३८ = ५०. तंत्रे—तृतीय व पंचम पूर्ण. (३) क्र. ५१६/ प.४२. पंचतंत्र पंचोपाख्यान : (त्रुटित) विशेष : पाने पाण्याने भिजून चिकटून विस्कळीत झालेली आहेत. पत्रे. २५ ते २८ व ४० ते ६८.

मंडळाकडे पत्रद्वारा चौकशी केली तेव्हा त्यांच्या संग्रही क्र. ४१०/ पु. ३५. पंचोपाख्यान. कर्ता, निर्मळ पाठक. शके १७४. पाने १५२, असे आणखी एक हस्तलिखित असल्याचे समजले. क्युरेटर श्री. द. रा. भट यांनी कळविले की, 'हस्तलिखित क्रमांक ५१६/ प. ४२ ..... सदर पोथीतील ओव्या, क्रमांक ४१०/ पु. ३५ ह्या निर्मळ पाठकाच्या ग्रंथाशी ताडून पाहता वरील त्रुटित ग्रंथ निर्मळ पाठकाच्या ग्रंथाचीच एक ओवीबद्ध प्रत आहे.' त्यांनी आणखी असेही कळविले आहे की, 'क्रमांक ५१६/ प. ४० हा ग्रंथ प्रल्हाद भास्कराचा असल्याचे म्हटले आहे ते नजरचुकीने तसे म्हटले गेले आहे. परंतु तो ग्रंथ निर्मळ पाठकाचाच आहे. क्रमांक ५१६/ प. ४१ यात या वेष्टनात तिसरे व पाचवे अशी दोन तंत्रे आहेत. वेष्टणावर खुद्द कै. राजवाडे यांच्या हातचा–'कर्ता प्रल्हाद भास्कर' असा स्पष्ट उल्लेख आहे. दोन्ही तंत्रे पद्यात आहेत. ५ व्या तंत्राचा शेवट : 'वोवीप्रबंध जाला करितां । प्रल्हाद भास्कर ॥ ६९ ॥ स्वस्ताक्षर लिखीते प्रल्हाद भास्कर । अथर्वण वेदी भारद्वाज गोत्र । पिपलायन शाखा पै विचित्र । जाणावी आमची ॥ १०० ॥ छ ॥ शके १६१६ वर्षे भावनाम संवत्सरे वैशाखमासे ग्रंथ समाप्तीं नीतः । श्रीमद् जनार्दनार्पणमस्तु तथास्तु'

सारांश, राजवाडे संशोधन मंदिरातील संग्रहात पंचोपाख्यानाची एकूण चार हस्तलिखिते आहेत. त्यांपैकी तीन निर्मळ पाठकाची व एक प्रल्हाद भास्कराचे. प्रल्हाद भास्कर हा कवी व त्याचे ओवीबद्ध पंचोपाख्यान, ही उपलब्धी नवीन व म्हणून महत्त्वाची आहे.

श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, धुळे

मंदिरातील हस्तलिखितसंग्रहाच्या यादीत (रामदासी संशोधन) बाडांक, ८८ : 'मराठी पंचतंत्रापैकी काही भाग मोडीत लिहिलेला'—अशी नोंद आहे. मंदिराचे कार्यकारी विश्वस्त श्री. गोगटे यांनी अत्यंत सहानुभूतीने त्यातील दुसऱ्या तंत्राच्या आरंभीच्या ७८ ओव्या नकलून पाठविल्या. त्या तपासून पाहताच लक्षात आले, की त्या ओव्या निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानातील आहेत.

सरस्वती महाल ग्रंथसंग्रह, तंजावर

या संग्रहात 'पंचतंत्र' या नावाखाली तीन, व 'पंचोपाख्यान' या नावाखाली चार, अशा एकूण ७ नोंदी आहेत. त्या पुढीलप्रमाणे—(१) १७५८ पंचतंत्र, व. क्र. ७; अरा. २४३. गद्य-पद्य. पाने १-१८३. ग्रंथ २४०१. (२) १७५९ पंचतंत्र, व. क्र. ८; अरा. २४३. गद्य-पद्य. पाने १-१३. ग्रंथ १६०. (३) १७६० पंचतंत्र, व. क्र. ९; अरा. २४३. तंत्र २ व ३. अपूर्त पाने २-८२. ग्रंथ ८८०. (४) १७६१ पंचोपाख्यान, व. क्र. १०; अरा. २४३. गद्य-पद्य. तंत्र २-५. पाने १-१३९. ग्रंथ १७२४. (५) १७६२. पंचोपाख्यान, व. क्र. ११; अरा. २४३. तंत्र १-५. [तंत्र १ अपूर्त] ग्रंथ १५५५. (६) १७६३. पंचोपाख्यान, व. क्र. १२; अरा. २४३. तंत्र १-५. पाने १-७४, ग्रंथ १७८५. (७) १७६४ पंचोपाख्यान, व. क्र. १३; अरा. २४३. तंत्र १-६. पाने १-८६. ग्रंथ १७८५. तंजावर येथील या हस्तलिखितांचा **वक्र** लक्षात घेऊन त्यांना अनुक्रमे **त** ७, **त** ८, **त** ९, **त** १०, **त** ११, **त** १२, आणि **त** १३ अशी नावे मी दिली आहेत.

या सात हस्तलिखितांपैकी क्र. १७५९ चे म्हणजे **त** ८ हे हस्तलिखित ओवीबद्ध पंचोपाख्यानाचे आहे, तर बाकीची सर्व सहा हस्तलिखिते गद्य पंचोपाख्यानाची आहेत. गद्य पंचोपाख्यानापैकी क्र. १७५८ म्हणजे **त** ७ आणि क्र. १७६४ म्हणजे **त** १३ मधील मजकूर स्थूल मानाने सारखा आहे. क्र. १७६२ म्हणजे **त** ११ आणि क्र. १७६३ म्हणजे **त** १२ मधील मजकूर स्थूल मानाने सारखा आहे. तसेच क्र. १७६० म्हणजे **त** ९ आणि क्र. १७६१ म्हणजे **त** १० मधील मजकूर स्थूल मानाने सारखा आहे. आणि या सहाही गद्य पंचोपाख्यानातील मजकूर कमीअधिक प्रमाणात मी आता प्रसिद्ध करीत असलेल्या पंचोपाख्यानातील मजकुराशी मिळताजुळता आहे. तुलनात्मक अभ्यासासाठी या हस्तलिखितातील काही भाग पुढे उध्दृत करीत आहे.

त ७ (क्र. १७५८). प्रथम तंत्र. कथामुख

सकळार्थशास्त्रसारं जगति समालोक्य विष्णुशर्मेदं ।
तंत्रैः पंचभिरतुलं चकार सुमनोहरं शास्त्रम् ॥

अस्यार्थः । दक्षिण देशामध्ये महिलारोप्य नाम नगर येक असे । तये नगरी अमरसिंव्ह नामा राजा राज्य करी । तो राजा सकळ नीतिशास्त्र जाणे । सकळ शास्त्रप्रवीण । तया रायासि तीघे पुत्र जाले । परंतु ते तीघेही मुर्ख । एकाचे नाव सुशर्माशक्ति । दुसरीयाचे नाव सुरुद्रशक्ति । तीसरीयाचे नाव अनिकशक्ति । ते मोठे जाले । परि मुर्ख । मग राजानी प्रधानाते म्हणितिले । प्रधाना पुत्र मूर्ख जाले । आम्हा माघे राज्य जाईल । तरि हे पुत्र सुविद्य होती ऐसे विचारिजे । आणिक येक असे । मुर्ख पुत्राचे जीणे काही नाही ॥ उक्तं च ॥

अजातमृतभूर्खेभ्यो मृताजातौ सुतौ वरम् ।
अतस्तौ स्वल्पदुःखाय यावज्जीवं जडो दहेत् ॥

अस्यार्थः । पुत्र नव्हति हे भले । अथवा होउनि तात्काल मरेति । हे थोडे दुख । परंतु मुर्ख पुत्र जव जीवे तव पितियाचे शरीर जाली । तर यामध्ये पुत्र बुधिवंत करावा । ऐसे राजियाचे बोलणे ऐकोनि सुबुत्धि प्रधान विष्णुशर्मा ब्राम्हण बोळाविळा । मग राजानी तयाते विनेविळे । विष्णुशर्माजी आमचे पुत्र मुर्ख असे । तर तुम्ही कृपा करूनि यास विद्या कराळ तर तुम्हाकारणे सोनिया देईन । ऐसे रायाचे बोलणे आईकौनि

विष्णुशर्मा तया पुत्राळागि पंचतंत्रे निर्मिळी । प्रथम मित्रभेदु दुसरी संप्राप्ती तीसरे काकोकुळुकी चौथे लबधप्रणाशन पाचवे अपरिक्षित । ऐसे सकळ शास्त्राचे सार काढोनि पंचोपाख्यान नावे ग्रंथु निर्मिळा ॥ उक्तं च ॥ अनंतपार किल शब्दशास्त्र ... (इत्यादि) आता मित्रभेद तंत्र सांगेन ।

त १३ (क्र. १७६४) प्रथम तंत्र

सकळार्थशास्त्रसारं जगति समालोक्य विष्णुशर्मेदं ।
तंत्रैः पंचभिरतुलं चकार सुमनोहरं शास्त्रम् ॥

अस्यार्थः । दक्षण देशामध्ये महिलारोप्य नगर येक असे । तये नगरी अमरसिंह नाम राजा असे । तो राजा सकल नीतिशास्त्र जाणे । सकलशास्त्रप्रविण । तया तीघ पुत्र । तयांची नांवे सुशक्ति अनंतशक्ति उग्रशक्ति । ऐसे तीघे पुत्र प्रबुध्य थोर जाले । परंतु मुर्ख जाणोन राजा मंत्रियासि म्हणे बोलाउन । या पुत्रासि पढौ घालुन । आणिक येक असे । मुर्ख पुत्राचे जिणे काही नसे ।

अजातमृतमूर्खेभ्यो मृताजातौ सुतौ वरम् ।
यतस्तौ स्वल्पदुःखाय यावज्जीवं जडो दहेत् ॥

राजपुत्र नव्हेति हे भले । अथवा होउनि तात्काल मरती हे दुख थोडे । परंतु मुर्ख पुत्र जवरि जिये तवरि पितियाचे शरीराते जाली । तरि आमचे पुत्रे सुबुद्धिवंत करावे । ऐसे राजयाचे बोलणे आइकुन सुबुद्धि प्रधाने विचारून विष्णुशर्मा नाम ब्राम्हण राजयाते भेटविला । मग राजानें तयातें विनविलें । स्वामी आमुचे तीघ पुत्र असति । तरि कृपा करून तुम्ही विद्यावंत कराल तरि तुम्हास प्रतिदिवसी सोनटका देईन । ऐसें राजयाचे बोलणे आइकुन विष्णुशर्मा बोलिला । जे राया तुझे पुत्र सामासां प्राज्ञ राज्या.....करीन । न करी तरि माझा अवमान करावा । ऐसे म्हणोनि राजपुत्रास पढवाया नेले । त्यालागि पंचतंत्रे निर्मिली । मित्रभेद मित्रप्राप्ति काकोलुक तथैव च । लब्धप्रणाशनं चैव पंचमं अपरीक्षितम् । पहिले मित्रभेद । दुसरे मित्रप्राप्त । तिसरे काकोलिक । चौथे .....प्रणाशन । पाचवे अपरिक्षित । ऐसे सकलशास्त्रसार काढुन पंचोपाख्यान ग्रंथ निर्मिला ॥ अनंतपारं किल शब्दशास्त्र — (इत्यादि) ॥ आता मित्रभेद तंत्र सांगेन ।

त ११ (क्र. १७६२) प्रथम तंत्र—

सकळार्थशास्त्रसारं जगति समालोक्य विष्णुशर्मेदम् ।
तंत्रैः पंचभिरतुलैश्चकार सुमनोहरं शास्त्रम् ॥

पुर्वि महिराळाप्य नाम नगरि । तेथे अमरशक्ति नाम राजा होता । तयासि तीघे पुत्र । तयाची नामें वसुशक्ति अनंतशक्ति उग्रशक्ति । ऐसे तिघे जण प्रबुध थोर जाहाले । परंतु मुर्ख जाणोनि राजा मंत्रियासि बोलाउनि म्हणे । हे माझे पुत्र मुर्ख जाले । तरि हे पढवा आणि राज्यायोग्य करा । यैसें सांधितलें मग मंत्रियें विचारूनि विष्णुशर्मा नामें ब्राम्हणुं बोलाविला । तयाचे सांभाळि रायें तिघे पुत्र केले । विष्णुशर्मा बोलिला राया तुझे पुत्र सां मासां प्राज्ञ पढते राज्यायोग्य करीन । न करिं तरि माझी दुर्दशा कराविं । यैसें म्हणोनि राजपुत्रा पढवावया नेले ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

अनंतपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः ।
यत्सारभूतं तदुपासितव्यं हुंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥
श्रीमद्वटे वससि यक्षणि निर्मळाशये । भक्तानुकंपितजगत्रयगीतकीर्तिः ॥
लोकस्य वांछित फळा विददासि देवि । तुभ्यं नमोस्तु सकळासुरवृंदवंद्ये ॥

हा श्लोक पढोनि राजपुत्रासि नितिशास्त्र पंचोपाख्यान सांगे । म्हणें तंत्र पांच । त्याची नामें मित्रभेदु । १ । मित्रसंप्रति । २ । काकोलुकीये ॥ ३ ॥ लब्धप्रणाश । ४ । अपरिक्षीत कार्य । ५ । ऐसी पांचही तंत्रें । प्रथम मित्रभेदु सांगे ।

त १२ (क्र. १७६३) प्रथम तंत्र—

सकलार्थशास्त्रसारं जगति समालोक्य विष्णुशर्मेदम् ।
तंत्रैः पंचभिरतुलैश्चकार सुमनोहरं शास्त्रम् ॥

पुर्वि महिरालोप्य नाम नगरि । तेथें अमरशक्ति नामें राजा होता । तयासि तिघे पुत्र । तयाची नामे वसुशक्ति अनंतशक्ति उग्रशक्ति । ऐसे तिघेजण प्रबुद्द थोर जाहाले । परंतु मुर्ख जाणुनि राजा मंत्रीयासि बोलाउनि म्हणे । हे माझे पुत्र मुर्ख जाले । तरी हे पढवा आणि राज्यायोग्य करा । ऐसें सांगीतलें । मग मंत्रियें विचारूनि वीष्णुशर्मा नामे ब्राम्हण बोलाविला । जे राया तुझे पुत्र सा मासा प्राज्ञ पढते राज्यायोग्य करिन । न करिं तरि माझी दुर्दशा करावि । ऐसें म्हणोनि राजपुत्रांस पढवावयास नेले ॥ उक्तं च ॥

अनंतपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः ।
यत्सारभूतं तदुपासितव्यं हुंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥
श्रीमद्वटे वससि यक्षिणि निर्मलाशये । भक्तानुकंपितजगत्रयगीतकीर्तिः ॥
लोकस्य वांछितफलानि ददासि देवि । तुभ्यं नमोस्तु सकलासुरवृंदवंद्ये ॥

हा श्लोक पढोनि राजपुत्रासि नीतिशास्त्र पंचोपाख्यानि सांगे । म्हणे तंत्रें पांच । त्यांची नामें मीत्रभेदु । १ । मीत्रसंप्रति । २ । काकोलकिया । ३ । लुब्धप्रनासी । ४ । अपरीक्षीत कार्ये । ५ । ऐसी पांचहि तंत्रें । प्रथमं मित्रभेदु सांगेन ।

त ९ (**क्र**. १७६०) या हस्तलिखिताच्या प्रथम तंत्राचे पहिले पान उपलब्ध नाही. तसेच **क्र**. १७६१ या हस्तलिखितातील प्रथम तंत्र उपलब्ध नाही. म्हणून पहिल्या तंत्राचा आरंभीचा भाग उध्दृत करता येत नाही. या दोन्ही हस्तलिखितांतील दुसऱ्या तंत्राच्या शेवटच्या भागातील उतारे पुढे देत आहे.

त ९ (क्र. १७६०) दुसरे तंत्र. शेवटचा भाग

मग तो काउला उडोन झाडी बैसला । तो मृग उडोण करून गेंला । तव तो उंदीर वोहे निघाला । मग कासव पारथीये धरीला । पाये बाधोनि लांकडी घातला । तें लांकुड खांदीये घेउनि निघाला । तव तिया तिघ्यां मित्रासी थोर दुख जाले असे । मग म्हणेति । आता काये करणे । तव हीरण्यक चित्रांगदातें म्हणें । तुवां हरीणा पुढे जाउनि नदीचीये थडीस पासले पडावें । आणि

अनुक्रमणिका

काउलेया तुंवां हरीणावरी बैसोन डोलीयावरी चंचु घालावी । मग वायाच शब्द करावा । तेही तैसेंची केलीं । मग उंदीर मागें हलुहलु निघाला । तव तो पारथी नदी पावला । मग पाहे तव हरिण वाल्वन्ठी पडीला असे । मग खांदीचा कासव थडीये ...... तव कासव पाणीयात रीघे । मग उंदीर वोहे निघे । पारथी हरीणाकडे धाविनला । तव काउला उडोन बैसे । तो हरीणा फडकोनि परता जाय । तव पारथी मागील वास पाहे । तव कासव नाही । तो पारथी विस्मयो करीत आपलीया ग्रहाप्रति गेला । मग ते चौघेजण मीत्र येकवाट मिलाले । ते सुखे असों लागले । म्हणौन मीत्र ऐसे करावे ॥ उक्तं च ॥

असाध्य वीहित कार्यः बुद्धिमंतो बहुश्रुताः ।
साधयंत्याशु कार्य्याणि काककूर्ममृगमूखकाः ॥

इति द्वितीय तंत्र मित्रसंप्राप्ती समाप्त ॥

त १० (क्र. १७६१) दुसरे तंत्र. शेवटचा भाग

मग तो काउळा उडोनि झाडी बैसला । तो मृग उडोण करून गेला । तव तो उंदीर खोहे निघाला । मग कासव पारधीयें धरिला । पाय बाधोनि लांकडि घातला । ते लाकुड खांदीये घेउनी नीघाला । तव तया तीघा मैत्रासी थोर दुख जालें असे । मग म्हणती आतां काये करांवें । तव हिरण्यक चीत्रांगदातें म्हणे । तुवा पुढे जाउनी नदीचीये थडीसी पासले पडावे । आणी कावळीया तुवा हरीणावरी बैसोन डोळीयावरी चुंचू घालावी । मग वायाच शब्द करावा । तेही तैसेच केलें । मग उंदीर मागे हलु नीघाला । तव तो पारधी नदी पावला । मग पाहे तव हरीण वोळवंटी पडीला असें । मग खांदीचा कासव थडीये टेउनिया हरीणाकडे धावीनला । तव कासवाचें फासे उंदिर तोडीता होय । तव कासव पाणीयात रीघे । मग उंदीर आ (वो) हेंत रीघे । पारधी हरिणाकडे धावीनला तव काउळा उडाला । झाडावरी बैसला । तो हरिण फडकोनी परता जाय । तव पारधी मागील वास पाहे । तव कासव नाही । तो पारधी वीस्मयो करीत आपलीया गृहाप्रती गेला । मग ते चौघे जण मीत्र येकवाट मीळाले । ते सुखें असों लागले । म्हणौनी मीत्र ते ऐसें करावे ॥ उक्तं च ॥

असाध्य वीहीतं कार्य बुद्धीमंतो बहुश्रुताः ।
साधयंत्याशु कार्याणि काककूर्ममृगमखकाः ॥

ईति द्वीतीये मीत्र तंत्र समाप्त ॥

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथसंग्रहात उपलब्ध झालेल्या सहाही गद्य पंचोपाख्यानांच्या हस्तलिखितातील उतारे वर दिले आहेत. त्यावरून दिसून येईल की, **त ७** आणि **त १३** या हस्तलिखितांतील मजकूर सामान्यतः सारखा आहे. संस्कृत श्लोकानंतर 'अस्यार्थः' शब्दाचा प्रयोग, 'सु' आणि 'शर्मा' या दोन शब्दांचा अतिरिक्त उपयोग दृष्टीआड केला तर दोन्ही उताऱ्यांत आलेली राजपुत्रांची नावे 'अजातमृतमूर्खेभ्यो–' या श्लोकाचे भाषांतर, आपली प्रतिज्ञा पूर्ण न झाली तर आपली दुर्दशा करावी, या अन्यत्र आढळणाऱ्या वाक्यांचा दोन्ही उताऱ्यांतील अभाव इत्यादी बाबी लक्षात घेतल्यास त्यांतील साम्य दिसून येईल. तथापी, ही दोन्ही पंचोपाख्याने एकाच प्रतीवरून नकललेली आहेत असे मात्र म्हणता येत

अनुक्रमणिका

नाही. **त ७** (**क्र**. १७५८) च्या हस्तलिखितात पाचव्या तंत्राच्या शेवटी 'फुइजी'ची कथा आलेली आहे. तशी ती **त** १३ (**क्र**. १७६४) या हस्तलिखितात नाही. त्यामुळे ही दोन्ही पंचोपाख्याने स्वतंत्र असावी असे वाटते.

आज मी प्रसिद्ध करीत असलेल्या **मु** प्रतीतील 'पंचोपाख्याना'तील आरंभीचा भाग व या दोन प्रतींतील आरंभीचा भाग यांत बरेच साम्य आहे. या तिन्ही प्रतींत राजाचे नाव आम्रसिंह आहे. आम्रसिंह याचेच चुकीचे लेखन 'अमरसिंह' असे दोन्ही हस्तलिखितांत आहे. असे लेखनदोष दूर करून पाहिले तर राजपुत्रांची नावे सुशक्ति, उग्रशक्ति व अनेकशक्ति अशी, या तिन्ही ठिकाणी आहेत. भाषांतरातील गद्य, 'अजातमृतमूर्खेभ्यो'— या श्लोकाचे भाषांतर, 'ऐसे सकळ शास्त्राचे सार काढौनि पंचोपाख्यान निर्मिले' हे क्वचित एखाददुसऱ्या शब्दाच्या फरकाने आलेले वाक्य इत्यादी गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे ही तिन्ही पंचोपाख्याने एकाच परंपरेतील असावीत असे दिसते. त्याचे दोन विभाग करता येतील. आपल्या **मु** प्रतीत व तंजावर येथील **त** ७ च्या हस्तलिखितात पाचव्या तंत्राच्या शेवटी फुइजीची कथा आलेली आहे. तेव्हा या दोहोंचा एक विभाग व फुइजीची कथा नसलेल्या **त** १३ च्या हस्तलिखिताचा दुसरा विभाग मानायला हरकत नाही.

त ११ आणि **त १२** या हस्तलिखितांतील आरंभीचा उध्दृत केलेला भाग सामान्यतः सारखाच आहे. हा मजकूर वर चर्चिलेल्या दोन हस्तलिखितांतील मजकुराहून बऱ्याच बाबतीत वेगळा आहे. 'अजातमृतमूर्खेभ्यो' हा श्लोक या दोन्ही प्रतींत उध्दृत केलेला नाही, किंवा त्याचे भाषांतरही नाही. 'अनंतपारं किल शब्दशास्त्रं' या श्लोकानंतर या दोन्ही प्रतींत श्रीमद्वटेश—' हा देवीनमनाचा श्लोक आहे, तसा तो वरील दोन प्रतींत नाही. या दोन्ही प्रतीत 'तुझे पुत्र सां मासां..... राज्या योग्य करीन। न करिं तरी माझी दुर्दशा करावी' हे विष्णुशर्म्याच्या तोंडी असलेले वाक्य वरील दोन्ही प्रतींत नाही. राजपुत्रांची नावे या दोन्ही प्रतींत सारखी आहेत. ती वरील दोन प्रतीहून भिन्न आहेत. यावरून, वरील दोन प्रतींहून या दोन प्रतींची भिन्नता जशी दिसून येते तशीच या दोन्ही प्रतीत असलेले परस्पर साम्यही लक्षात येते. या साम्यावरून व विशेषतः दोन्ही प्रतींत आढळणाऱ्या 'श्रीमद्वटेश—' या श्लोकावरून त्या दोन्ही प्रती एकाच वर्गातील पोथ्यावरून नकललेल्या असाव्यात असे दिसते. या दोन्ही प्रतीतील आरंभीच्या भागाचे **भावे** प्रतीशी तंतोतंत साम्य आहे. तेव्हा या तिन्ही प्रती एकाच वर्गातील होत.

त ९ आणि **त १०** या दोन्ही हस्तलिखितांत पहिले तंत्र उपलब्ध नाही म्हणून त्याच्या आरंभीचा भाग घेता आला नाही. त्याऐवजी दुसऱ्या तंत्रातील शेवटच्या भागाचे उतारे तुलनेसाठी घेतले आहेत.

नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, नागपूर

या ग्रंथालयातील हस्तलिखितांच्या मुद्रित यादीत पंचोपाख्यानाच्या दोन नोंदी आहेत. (१) **Acc. No.** 3951. पंचोपाख्यान. पत्रसंख्या १९. **Author** कान्हो पाठक (?) (२) **Acc. No.** 5597. पंचोपाख्यान. तंत्रे १—५. पत्रे ७५. **Author**. ?

यापैकी दुसरे हस्तलिखित म्हणजे इ. स. १८२१ मध्ये एल्फिन्स्टनने भाषांतर करवून घेतलेल्या व शिळाप्रेसवर छापलेल्या पंचोपाख्यानाची प्रतिलिपी होय. तिचा विचार करण्याचे कारण नाही. दुसरे हस्तलिखित क्रमांक ३९५१ ची 'केवळ प्रारंभीची काही पत्रे विद्यमान. संकीर्ण. अतिखंडित.' त्यातील प्रथम तंत्राच्या आरंभीचा भाग (संस्कृत श्लोक वगळून) पुढीलप्रमाणे :

अनुक्रमणिका

"आता पंचोपाख्यान सांगेन दक्षीण देशामध्ये महीला नाम नगरी । तेथे [अ]मरसिंह नांम राजा राज्य क[री] । तो सकळ शास्त्रें जाणता । तयासी तीघे पूत्र जाले ते मुर्ख जाले । येकाचे नाम सुमती दुसरीयाचे नाम रुद्रशक्ति तीसरीयाचे नाम अनंतशक्ति । ते प्रबुद्ध जाले परंतु मुर्ख ॥ मग राजा प्रधानासी बोले पुत्र मुर्ख जाले आह्मानंतर राज्य बुडाले ऐसे दिसतसे तरी पुत्र बुद्धिमंत होते ऐसा धरूनिया हेत पुत्र मुर्ख देखोनी नीयत दुःख होतसे । जरि हे पुत्र बुद्धिवंत होती ऐसें वीचारावें । आणीक येक आसे ॥ उक्तं च ॥

अजातमृतमूर्खेभ्यो मृताजातौ सुतौ वरम् ।
यतस्तौ स्वल्पदुःखाय यावज्जीवं जडो दहेत् ॥

म्हणौनि पुत्र बुद्धिवंत व्हावे । तरी यासी काही उपाय करावा । ऐसें राजयाचें बोलणे आईकोनी मग प्रधानें वीष्णुशर्मा ब्राह्मण बोलावीला । मग राज्याने तयासी सन्मान केला । वीज्ञापना केली । राजा ह्मणे । श्वामी आमुचे पुत्र मुर्ख जाले । तरी तुह्मी कृपा करून हे सज्ञान होती ऐसे करावे । तुह्यांसी प्रतीदिवसी सोनटके १०० येकशत देउन । ऐसे राजयाचे बोलणे आईकोन वीष्णुशर्मा ह्मणे । जी राजेश्वामी आह्मी वीद्यावीक्रय करीत नाही । मज द्रव्याचि चाड नाही । तरी राजया माझी पैज आईके । तुझीया पुत्रासी सा मासा नितीशास्त्रज्ञ वीद्वांस करीन । जरी न करी तरी माझें नाव फेडी । मग वीष्णुशर्में तया राजपुत्राकारणे हे पांचही तंत्रे रचिलीं । मीत्रभेद १ । मीत्रसंप्राप्ती २ । काकालूकीये ३ । लब्धप्रणाशन ४ । अपरोक्षीत ५ । ऐसे सकळही शास्त्रांचे सार काहाडोनी पंचोपाख्यान रचिलें ॥ उक्तं च ॥

अनंतपारं किल शब्दशास्त्र । स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः ॥
यत्सारभूतं तदुपासितव्यं । हंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥

३

मराठीतील पद्यबद्ध पंचोपाख्याने

उपलब्ध असलेली पाच ओवीबद्ध पंचोपाख्याने पुढीलप्रमाणे : (१) निर्मळ पाठकाचे, (२) महालिंगदासाचे, (३) कृष्णराजाचे, (४) प्रल्हाद भास्कराचे व (५) एका अनामक कवीचे.

निर्मळ पाठकाविषयी माहिती देताना, 'वडवाळसिद्ध नागेश यांच्या शिष्यवर्गात 'पाठक' मंडळीचा उल्लेख वारंवार करण्यात येतो. पाठकांत तीन नावे विशेषेकरून प्रसिद्ध आहेत. एक कान्हो पाठक, दुसरे नामा पाठक, तिसरे निर्मळ पाठक. यांपैकी निर्मळ पाठकाचे एक ओवीबद्ध पंचतंत्र मात्र उपलब्ध आहे.' — एवढीच माहिती 'महाराष्ट्र सारस्वत' कार भावे देतात. [वि. ल. भावे, महाराष्ट्र सारस्वत (आवृत्ती तिसरी). भाग पहिला, पा. २१३.] त्याच्या कालाविषयी ते काही लिहीत नाहीत. पांगारकर [ल. रा. पांगारकर, मराठी वाङमयाचा इतिहास. खंड दुसरा, पा. ३६.] याहून थोडा अधिक खुलासा करतात. 'पहिले कान्हो पाठक हे नामदेवांच्या पश्चात शके १२७५ च्या सुमारास आटोपले. त्यांचा नातु कान्हो पाठक हाही नागेशाचाच शिष्य होता. नागनाथ ऊर्फ नागेश हा त्या काळातला महासिद्ध पुरुष होता व त्याच्या शिष्यांचा काल शके १२८० ते १३५० हा असला पाहिजे. ह्या कान्हो पाठकाचा एक मुलगा नामा पाठक व त्याचा पुत्र निर्मळ पाठक याने ओवीबद्ध पंचतंत्र रचिले...... गद्य पंचतंत्र शके १३०० च्या सुमाराचे असावे व त्याच्या आधाराने ६०-७० वर्षांनी निर्मळ पाठकाने आपले

ओवीबद्ध पंचतंत्र रचिले असावे.' यावरून निर्मळ पाठकाच्या पंचतंत्राचा (पंचोपाख्यानाचा) लेखनकाल स्थूलमानाने शके १३७० असावा असे पांगारकरांचे मत दिसते. नामा पाठकाचे विद्यमान वंशज श्री. रामचंद्र हरी राजपाठक यांच्याजवळून मिळालेल्या माहितीच्या आधारे श्री. ज. शा. देशपांडे लिहितात : 'नागेशशिष्य कान्हो पाठक यांचे पुत्र हरी पाठक व नातू नामा पाठक. कान्हो पाठकापासून नववे दामोदर पाठक. यांना इ. स. १७६६ मध्ये देवी अहिल्याबाईंनी मांजरगावची सनद दिली. कान्हो पाठकापासून रामचंद्र पाठक पंधरावे. दामोदर पाठकापासून नंतरच्या आतापर्यंतच्या ६ पिढ्यात सरासरीने सुमारे ३३ वर्षे दर पिढीची होतात. असेच मागे गेले तर नामा पाठक सुमारे इ. स. १५०० (म्हणजे शके १४२२) च्या आसपास झाले असा तर्क करता येईल [ज. शा. देशपांडे (संपादक), प्राचीन मराठी कविता. खंड २. प्रास्ताविक, पा. ३.].' स्थूलमानाने श्री. ज. शा. देशपांडे यांचे हे मत मान्य करण्यास हरकत नाही. नामा पाठकाचा पुत्र (?) निर्मळ पाठक, म्हणजे आणखी एक पिढी. तेव्हा त्याचा व त्याच्या पंचोपाख्यानाचा काळ साधारणपणे शके १४५० मानता येईल.

महालिंगदासाने आपल्या 'पंचोपाख्याना'चा लेखनकाल पुढीलप्रमाणे दिला आहे. 'ईती शाळीवाण शक। चौदाशत चौऱ्यानौ देख। अंगीरा संवत्छरी आईक। ग्रंथ संपुर्ण जाला ॥ ३१७१ ॥ चैत्रशुध्द येकादसी। तै ग्रंथ संपला परीयेसी। वीनवीले क्षर्तवंसासी। म्हणे माहालिंगदासु ॥ ३१७२ ॥' म्हणजे शके १४९४ अंगिरा संवत्सर, चैत्र शुद्ध एकादशीला 'पंचोपाख्याना'ची रचना महालिंगदासाने पूर्ण केली. अर्थात, निर्मळ पाठकाच्या ग्रंथानंतर महालिंगदासाने आपला ग्रंथ लिहिला हे स्पष्ट दिसते.

'कृष्णराजा'च्या 'पंचोपाख्याना'त ग्रंथाचा लेखनकाळ दिलेला नाही. त्यातील भाषेवरून तो महालिंगदासाच्या नंतरचा असावा, असे मला वाटते.

'पंचोपाख्यान'कर्ता चौथा कवी प्रल्हाद भास्कर याने पाचव्या तंत्राच्या शेवटी, म्हणजेच ग्रंथाच्या शेवटी 'स्व(ह)स्ताक्षर लिखीते। प्रल्हाद भास्कर अथर्वण वेदी भारद्वाज गोत्र। पिपलायन शाखा पै विचित्र। जाणावी आमची ॥ १०० ॥' असा निर्देश केल्याचा उल्लेख यापूर्वी आलेलाच आहे. त्यानंतर लागलीच त्याने लिहिले आहे की, 'शके १६१६ वर्षे भाव नाम संवत्सरे वैशाखमासे ग्रंथ समाप्तीं नीतः । श्रीमद् जनार्दनार्पणमस्तु.' यातील शकसंवत्सरांचा मेळ बरोबर जुळतो. तेव्हा प्रल्हाद भास्कराचे 'पंचोपाख्यान' शके १६१६ मध्ये लिहिले गेले असे स्पष्ट आहे.

पाचव्या पद्यबध्द 'पंचोपाख्याना'च्या कर्त्यांचे नाव ठाउक नाही. म्हणून मी त्याला 'अनामक कवी' असे संबोधिले आहे. त्याच्या उपलब्ध ग्रंथावरून त्याचा लेखनकाळही ठरविता येणे शक्य नाही. भाषेवरून तो या सर्वांपेक्षा अलीकडचा असावा असे मला वाटते. या पाचही ओवीबद्ध 'पंचोपाख्याना'त निर्मळ पाठकाचा ग्रंथ सर्वात प्राचीन असून, त्यानंतर महालिंगदास, कृष्णराज, प्रल्हाद भास्कर व अनामक कवी यांनी आपापले ग्रंथ लिहिले असे दिसून येते. त्याच क्रमाने त्यांची ओळख करून घेऊ.

निर्मळ पाठक व त्याचे पंचोपाख्यान

निर्मळ पाठकाची वैयक्तिक माहिती फारशी उपलब्ध नाही. नागेशशिष्य कान्हो पाठकाचा पुत्र नामा पाठक. निर्मळ पाठक हा त्याचा पुत्र होता, अशी माहिती पांगारकरांनी दिली आहे. ती कोणत्या आधाराने, हे कळत नाही. या पाठक कुळातील आजचे विद्यमान वंशज श्री. रा. ह. राजपाठक, यांच्याकडे चौकशी केली तेव्हा त्यांनी, त्यांच्या जवळील पाठक घराण्याच्या वंशावळीत निर्मळ पाठकाचे नाव आढळत नाही, असे

अनुक्रमणिका

मला कळविले आहे. या निर्मळ पाठकाने आपला 'पंचोपाख्यान' ग्रंथ स्थूल मानाने शके १४५० च्या सुमारास लिहिला, असावा, हे आपण पाहिलेच आहे. 'ॐ नमो परब्रह्मनिर्गुणा । जेणें करविली प्रपंचरचना । तयासी रीघालों जी शरणा । मनोभावें करोनीया ॥ जयाची जे निजांगशक्ति । जयाची दाही दिशा व्याप्ति । ते नमिली सगुण मुर्ती । जगव्यापिनी जाणोनी । नमीन वडील कवीश्वरा । व्यासवाल्मिक पाराशरा । बृहस्पति आणि श्रीशुक्रा । नारदादि देवासि ॥ सकळ शास्त्राचें सार काढोनि । विष्णुश्रमें कथिलें पंचोपाख्यानि । तयाचे अर्थी चित्त देश्नी । परिसावें श्रोतया ॥' (१-४) असा आरंभ करून पुढे पंचोपाख्यानाची पाचही तंत्रे अनुक्रमाने वर्णिली आहेत. 'कथामुखा'त राजपुत्राची नावे सुशक्ति, रुद्रशक्ति आणि अनेकशक्ति अशी दिली आहेत. 'मनुष्याचिया काहन्या । श्वापदावरी घालोनिया । राजनीतिमार्ग तया । दाविजे विष्णुश्रमें जी' (तंत्र १-३३) असे 'पंचोपाख्याना' तील पशुपक्षादिकांच्या कथांचे स्पष्टीकरण निर्मळ पाठकाने केले आहे.

आपल्या मुद्रित (गद्य) प्रतीत प्रत्येक तंत्रात अनुक्रमाने ज्या कथा आलेल्या आहेत. त्याच कथा निर्मळ पाठकानेही वर्णन केल्या आहेत. त्यात फक्त चारपाच ठिकाणी फरक आढळतो : पहिल्या तंत्रात, 'भुताचे लिंग लावणारी राजकन्या,' ही कथा अधिक आहे. मुद्रित प्रतीच्या दुसऱ्या तंत्रातील, 'दोन तोंडाच्या (भेरूंड) पक्ष्याची कथा' निर्मळ पाठकाने दिलेली नाही. तिसऱ्या तंत्रात त्याने 'पोटातील व वारूळातील सर्पांची कथा' जास्तीची सांगितली आहे. चौथ्या तंत्रात मुद्रित प्रतीतील 'चित्रगु कुतऱ्याची कथा' (१३) नाही. त्याऐवजी, 'कीकला नगरातील मयोरध्वज राजाची कथा' वर्णन केली आहे. पाचव्या तंत्रात, पहिल्या तंत्रातील 'राजसेवक वानर व विप्रचोर' ही २५ वी कथा पुनरुक्त आहे. या कथेची पूर्वपीठिका या ठिकाणी अगदीच निराळी आहे. पदभ्रष्ट झालेला चंद्रभूपती रानात भटकत असताना त्याला एक वानर भेटला. 'मला प्रधान करशील तर तुझे राज्य तुला मिळवून देतो.' असे वानराने सांगितले. राजाने ते मान्य केले. पुढे वानराने राज्य मिळवून दिले म्हणून राजाने त्याला प्रधान केले. नंतर पूर्वीचा प्रधान परत आला. त्याने राजाला म्हटले, माझे प्रधानपद मला दे. या वानराला प्रधान करू नये. पूर्वी एका राजाने वानराला प्रधान केले होते, इत्यादी. अशी पूर्वपीठिका देऊन मग विप्रचोराची कथा पुन्हा सांगितली आहे. याशिवाय 'मांजराचे चार पाय' ही कथा या तंत्रात अधिक आहे.

यावरून दिसून येईल की, मुद्रित प्रतीतील 'दोन तोंडांच्या पक्षाची कथा' (तंत्र २) व 'देशांतरी गेलेल्या चित्रगू कुत्र्याची कथा' (तंत्र ४) या दोन कथा सोडल्या तर इतर सर्व कथा निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानात आहेत. याशिवाय 'भुताचे लिंग लावणारी राजकन्या' (तंत्र १); 'पोटातील व वारुळातील सर्पांची' (तंत्र ३); 'मयोरध्वज राजाची' (तंत्र ४); व 'मांजराच्या चार पायांची' (तंत्र ५); या ४ कथा त्याने जास्तीच्या अंतर्भूत केलेल्या आहेत. या जास्तीच्या चार कथांपैकी 'पोटातील व वारुळातील सर्पांची कथा' म्हणजे 'परस्परस्य मर्माणि ये न रक्षन्ति जन्तवः । त एव निघनं यान्ति वल्मीकोदरसर्पवत्' या संस्कृत श्लोकाच्या स्पष्टीकरणार्थ संस्कृत पंचतंत्रात आलेली कथा होय. संस्कृत पंचतंत्राच्या प्रतीपैकी ती फक्त निर्णय सागर (तंत्र ३, कथा १०) व हर्टेल (तंत्र ३, कथा १०) या प्रतींत आढळते.

निर्मळ पाठकाची ओवी गद्यप्राय व सुबोध असली तरी ती सुश्लिष्ट नाही. अनेक ठिकाणी तिच्यातील खडबडीतपणा जाणवतो. ओवी पूर्ण करण्यासाठी त्याने केलेली शब्दांची पुनरुक्ती व पादपूरक अव्ययांचा उपयोग खटकतो. त्याच्या भाषेत दमामा, हलालखोर, ऐवज, हाजर, वायदा, अक्कल, मस्त, खर्च, लाजीमा असे उर्दूफारशी शब्द आलेले आहेत, ते त्याच्या लेखनकाळावर प्रकाश टाकतात. त्याच्या निवेदनशैलीचा परिचय व्हावा म्हणून एक उतारा देतो. आपल्या मुद्रित प्रतीतील तंत्र ४, कथा ११ पाहा. ही

कथा निर्मळ पाठकाने पहिल्या तंत्रात घेतलेली आहे. चिडीचा खोपा वानराने शतचूर्ण केल्यानंतर चिडीला तिचा पती म्हणतो :

"मग पक्षीया म्हणे वो सुंदरी । हा उपकार केलीयाउपरि । तुज जाली भूताची गत परी । ते आइके प्राणप्रीये सखीये ॥ एक चंद्रसेन राजा महीपुरीं । तयासी पुत्र न होती कुमरी । मग करिता जाला दुसरी नारी । तीयेसींही कन्या जाली ॥ ऐस्या स्त्रीया जाल्या बारा जणी । परि पुत्र नोव्हे तयालागोनी । प्रसवली बरवी कामीनी । कन्यारत्न सुशोभीत ॥ मग बारावी जाली वीचारती । मजवरी येईल सवती । मग सुइणेसी जाली प्रार्थीती । आइके बाइ सुइणी गे ॥ कन्येसी तुवां मुखवचनी । पुत्र जाला ऐसे म्हणोनी । इतुकेन होइल संपादणी । माझी प्रसंसा वाढेल ॥ पांचसे सोनटके जाण । मी देइन तुजलागुन । मग तीने पुत्र जाला म्हणोन । टाळीया नाद केला हो ॥ राय हर्षीत जाला मनीं । दानें दीधली रुषीब्राह्मणालागोनी । सकळ जण हर्श मनी । संतोशवीलें सर्व जनां ॥ थोर गजर आणि कौतुकें । बारसें केंले नगरनायेंकें । मेळवीले सोइरे सखे । केले नानावीध प्रकार ॥ मग पटकुळीं गुंडुनी देख । सुइणीनें आणिलें तें बाळक । रायें पाहिलें पुत्रमुख । वृद्धपणीं सुखलाभ । मग सुइणीलागुनी । दीधली लुगडीं वीचीत्र लेणीं । देशदुर्गातें देउनी । आभार केलें याचकां ॥ कीं सुक्लपक्ष चंद्राची दशा । तैसी त्या बाळकाची वयेसा । वाढताये दीवसदीवसां । आधिकाआधिक जाण ॥ .....तवं प्रौढदशा पावला वेळा । वरुशें द्वादशाची । तवं उठले मुग्धदशेचे उद्गार । उरी उचावले पयोधर । संपुर्ण जाला मुखचंद्र । नेत्रीं चपळता आली । ऐसा प्रौढदशा जाला कुमर । म्हणोनी रायें वीचारीला स्वयेंवर । आणि मेळवीली आती सुंदर । कन्यारत्नें रूपवंती । लग्न धरीलें साता दीसांचे । मोहर्ता करा हरीद्रकेचे । ऐसें वीप्र बोलताती वाचे । रायाप्रती सकळ ॥ तव तो पुत्र वीचारी मनीं । म्हणे मी जातीत्वें कामीनी । नोवरी मेळवीली मजलागौनी । तरि हें कैसें कर्तुत्वें ॥ आतां हें पुसों मातेसी । म्हणोनी आला मातेपासीं । माये काये सांग वो वेळेसी । वैर करीसी कवणाचें ॥ मग मातेनें पुत्रालागी ततक्षणीं । मागील सांगीतली कथनी । पुढें कैसी करावी संपादणी । तेंही मज न कळे रे ॥ मग तो वीचारी आपुले मनीं । म्हणे जीव देऊं जाऊं बनीं । मान राहील इतुकेनी । मातेचा आणी माझा ॥ म्हणोनी आस्वारूढ होउनी । गेला माहा घोर वनीं । नदी येक देखीली नयेनीं । थोर प्रचंड जळडोहो ॥ कुवर आला डोहाजवळी । स्नान करुनीयां तया वेळीं । जवं उडी घालावी तया जळीं । तवं ते हो भूतें देखीली ॥ म्हणे आगा माहापुरुशा । तुझी दीसताये प्रथम वयेसा । जळीं उडी घालतोसि कैसा । कवणें गांजीले तें सांग ॥ तो म्हणे मी पुरुश नव्हे, वनीता । कपटें करुनी माझी माता । मज नटधारी केलें तत्वता । तें लाघव काये सांगो रे ॥ तें संपादीलें बाळपणीं । पीता वर्तलासे लग्नीं । तारुण्येदशा आली मजलागूनी । कन्या मेळवीली आती रम्यें ॥ तरि आंतर पडे सोइरीयासी । लज्ञा होइल मातयापीतयासीं । म्हणोनी मी जळीं प्रवेसी । आत्मघातासी प्रवर्तलों । मग भूत वीचारीतें होये मनीं । म्हणे प्राण वाचउं यालागोनी । मी आपुले लींग देउनी । परउपकार करूं यासी । भूत म्हणे राजपुत्रा कारणे । व्यर्थ कां जासील रे मरणे । माझें लींग घेउनी जाणे । मास एक उसणेची । तुझें कार्य सीद्ध जालीयां । माझें मज देइ आणोनीयां । हें वचन आयकुनीयां । थोर संतोश जाला ॥ मग म्हणे भूताकारणें । पक्षा दीवसा वायेदा करून । वीव्हाह जालीयानंतरें जाण । तुझें लींग तुज देउं ॥ ऐसें आइकोनीया भूतें । लींग दीधलें तयातें । मा घेतलें योनीतें । आणि ते स्थनद्वये ॥ मग जाला पुरुशाकार । नीळीमा फुटला मीसुर । नेत्र आरक्त पुरुश उग्र । कंठ घोर शब्द जाहाला ॥ मग आस्वारुढ होउनी । नगरासी आला परतोनी । मायेपासी सीघ्र येउनी । व्रतांत सांघे सकळ ॥ तेणें सुख जालें मायेसीं ॥ नींबलोण केलें तयासीं । मुहुर्त केले हरीद्रीसी । ब्राम्हण बोलवीले त्वरीत ॥ मग मुहुर्त वऱ्हाडीका । बरवी मांडली असे देखा । रायें प्रणुनी सन्मुखा । माहागजरें करूनीया । मग रायें

अनुक्रमणिका

श्रृंगारवीली नोवरी : मंचक घालुनी पुस्पसेजवरी । ते नोवरा आणि नोवरी । पहुडली दोघे जणे ॥ तो तोये नोवरीसी रातला । मागील आवघेची वीसरला । समयो नीघोनी गेला । परी भूताची सये नाही ॥ भूतें योनी आंगीकारलीयावरी । थोर पडीले वीचारी । म्हणे वीडी देउनी तांबोळापरी । जीया मुखें आस कीजे ॥ भूत आंगोळी दिवस मोजीत । म्हणे आझुनी कां न ये राजसुत । वायेदा केला तो सरला आंत । आवधी टळली तयाची । मग आला राजभवनीं । राजकुमरासी बोले वचनीं । लींग दे माझें मजलागुनी । जळप्रवेशात कां वीसरला ॥ राजपुत्र बोले बोली । भुता काये तुझी आकल गेली । आतां मज हे गोडी लागली । तुज देउं कैसे काये । म्यांही मागीतलें नाहीं तुज । तुवां बळेंचि दीधलें मज । फीरून मागतांची न ये लाज । तुझें कर्म ऐसेंचि । आतां बहु बोलसी जरी । बोलावीन पंचाक्षरी । खीळवीन झाडाभीतरी । सुटवे ना मग मुर्खा । बोला भूत भ्यालें । आपल्या परिवारापासीं गेलें । भूतें म्हणती तुज काये जालें । पालटे रे चीन्ह तुझें ॥ भूतें मागील सर्व कथन । आवघीयांस केलें जी श्रवण । मां ते म्हणती सकळही जण । हें भूत भूतीण जाली जी ॥ औठ कोडी भूतावळी । तेहीं तीसि लाविली पाळी । गर्भ राहाला तीये वेळीं । प्रसूतसमइं ते आक्रंदे ॥ तो आकांत देखोनी वेधना । भूतरायासी आली करुणा । वीवेक उच्चारीत वचना । तो श्लोक आइका जी ॥ उक्तं च ॥ परोपकाकार न कर्तव्यं कर्तव्यं आत्मरक्षणं । राजपुत्रप्रसादेन भूतो भवति गर्भीणी । ऐसें पक्षीया पक्षीणीतें बोले । परि म्या प्रथम तुज सांगीतलें । व्याळासी दुधपान करवीलें । तरी तें वीशचि होये प्रिये ॥"

महालिंगदास व त्याचे पंचोपाख्यान

महालिंगदासाची काही माहिती 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथात आली आहे. (पा. ३०९–३१०). ल. रा. पांगारकर यांनीही 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड २ मध्ये (पा. ५८५–५८८) बरीच माहिती दिली आहे. पण या दोन्ही ग्रंथांत कवीच्या 'पंचोपाख्याना'विषयी फारसे लिहिलेले नाही. महालिंगदासाने आपल्या 'पंचोपाख्याना'त आपल्याविषयी माहिती दुसऱ्या तंत्राच्या आरंभी स्वतःच दिलेली आहे. ती पुढीलप्रमाणे :

माझे वास्तवे पुर्वस्थाने । बाहाळसमिप वाडेग्राम गहण ।
खानदेसी गीरजेतीरी जाण । ठाव पुर्वजांचा ॥
निपनजा वेसदेव । त्याचा पुत्र सीमदेवो ।
त्यांचा सुत जगळदेवो । तो आजा होये मज ॥
त्याचा पुत्र वीकदेवो । तो पीता मज साचमेवो ।
यैसा बोलीला भावो । माहालींगदासु ॥
पुर्वजाची पाटीलकीपन । वाडेग्रामीची जाने ।
तेणे माहालींगदास कथने । केले मान्हाष्ट ॥ (८५९)

हीच माहिती त्याने 'पंचोपाख्याना'च्या शेवटीही दिलेली आहे. त्यात आलेली जास्तीची माहिती अशी :

बाहाळे समीप वाडेग्रामीं वासु । ग्रीजातीरी खानदेशु ।
ब्रह्मचालुकी वंसु । आडनावो अहीरावो ॥
....
तो वीकदेवो माझा पीता । वाडेग्रामी अधीष्टा होता ।

अनुक्रमणिका

रामकृष्ण गुरुदेवता । मज कारणें ॥
त्याचीया चरणा कर जोडुन । करी माहालींगदासु नमन ।
दुसरे केले वंदन । वीश्नुसर्मयासी ॥ (तंत्र ५ ३१६९-३१७०).

यावरून दिसून येईल की, खानदेशात गिरिजा (गिरणा) नदीच्या काठावर, बाहाळे गावाजवळ असलेले वाडेगाव हे माहालिंगदासाचे वसतिस्थान होय. वेसदेव—सीमदेव—जगळदेव—वीकदेव—माहालिंगदास, अशी त्याची वंशपरंपरा असून हा वंश 'ब्रम्हचालुकी' (ब्रम्हचालुक्य) वंश म्हणून ओळखला जात होता. त्याचे गोत्र भारद्वाज. आडनाव अहीरावो. पांगारकरांनी त्याच्या 'चाणक्य नीती' या ग्रंथातून दिलेल्या उताऱ्यात 'वंशु कश्यपाचा । गोत्र भारद्वाजाचा । कुळ वासुकीचा । उपनाम अहिररावो' असा उल्लेख आहे. पांगारकर लिहितात : 'अहिरराव हे यजुर्वेदी ब्राम्हण घराणे पुणे प्रांती आहे. हा कवि ब्राम्हण असेल किंवा क्षत्रियही असू शकेल. निर्णय सांगता येत नाही.' पण माहालिंगदासाने सांगितलेल्या त्याच्या 'ब्रम्हचालुक्य' वंशावरून तो क्षत्रिय असणे अधिक संभवते. भावे यांनी 'महाराष्ट्र सारस्वता'त लिहिले आहे की, 'कदाचित पुढे हा महानुभाव पंथात शिरला असावा.' (पान ३१०) ते कोणत्या आधाराने, ते कळत नाही. 'पंचोपाख्याना'शिवाय माहालिंगदासाने वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी, चाणक्यनीती, शालिहोत्र इत्यादी ग्रंथ लिहिले आहेत.

आपल्या मुद्रित प्रतीशी तुलना केल्यावर असे आढळून येते की, महालिंगदासाच्या पंचोपाख्यानात पुढील कथा नाहीत. **तंत्र १**. कथा १०. ब्राम्हण आणि व्याघ्र, वानर, सर्प व सोनार. कथा १४. हंस व घुबड. कथा १५. वाघ व लाकुडतोड्या. कथा १८, चिडी व हत्ती. कथा १९. दांभिक श्रपणक व बळिभद्र प्रधान. कथा २०. ब्राम्हण कन्या व सर्प पति. कथा २१. वानर, आग्या व चिडी. कथा २२. धर्मबुद्धि व दुष्टबुद्धी कथा २३. बग व कीरिचील. कथा २४. राजकन्या दमघोषा व कामातुर कमळनायक जोशी. (राजसेवक वानर व विप्रचोर ही **मु** प्रतीतील २५ वी कथा महालिंगदासाच्या पंचोपाख्यानाच्या चौथ्या तंत्रात आलेली आहे.) **तंत्र २**. कथा २. कोल्हा व गाढव. कथा ४. प्राप्तव्यमर्थं लभते मनुष्यः (हत्ती व उंदीर यांची मैत्री ही **मु** प्रतीतील ८ वी कथा महालिंगदासाच्या तिसऱ्या तंत्रात आली आहे). **तंत्र ३**. कथा ५. विष्टीने कुष्ट घालवणारा पक्षी. कथा ८. बेडकांना पाठीवर फिरवणारा सर्प. कथा ९. छिनाल ब्राम्हणी. **तंत्र ४**. कथा २ कोल्हा व कामातुर गाढव. कथा ३. खिंकाळणारा राजा व मुंडित प्रधान कथा ७. छिनाल पत्नीला डोक्यावर फिरवणारा मूर्ख सुतार. कथा ९. कामातुर वृद्ध, त्याची तरुण पत्नी व चोर. कथा १३. परदेशात गेलेला चित्रांगद कुतरा **तंत्र ५**. कथा ५. गाणारा गाढव. कथा ६ दोन शिरे व चार हात मागणारा कोष्टी. कथा ९. विषनाल प्रयोग करणारी वेश्यामाता. कथा ११. कामसेना गणिका व रावा. कथा १२. कपिला व ओढाळ गाय. कथा १३. कर्पुरचुंबन देणारी छिनाल राणी. कथा १४. राजकन्या व राक्षस.

म्हणजे मुद्रित प्रतीतील २७ कथा महालिंगदासाच्या 'पंचोपाख्याना'त नाहीत. (या कथा निर्मळ पाठकाच्या 'पंचोपाख्याना'त मात्र आहेत). पण मुद्रित प्रतीत नसलेल्या अनेक कथा महालिंगदासाने वर्णिलेल्या आहेत. उदा.: त्याच्या पहिल्या तंत्रात रजक, गर्दभ व श्वान (कथा २), महार्णव मणिभद्र गाढव (कथा ५); दुसऱ्या तंत्रात, कमळाकर गुरू, शिष्य व त्यांच्या कजाग बायका (कथा ७), धनिक सांडनायक (कथा १०); तृतीय तंत्रात, अप्रसीखा ब्राम्हण व वररुची पंडित (कथा १), सोनटके देणारा सर्प (कथा ३), पाषाणसिंहाच्या मुखात व्यालेली कापोळी (कथा ८), न्याय करणारा ब्राम्हण व त्याची कन्या (कथा १०); चौथ्या तंत्रात, कावळा व हंस (कथा ८), भुताचे लिंग लावणारी राजकन्या (कथा १४); पांचव्या तंत्रात, ब्राम्हण व त्याची बहुभाषी पत्नी (कथा १), राजा व त्याचा सेवक लगड (कथा २), राजा व त्याने पाळलेला

राघो (कथा ३), या कथा महालिंगदासाच्या पंचोपाख्यानात अधिक आहेत. यांपैकी ‘भुताचे लिंग लावणारी राजकन्या’ ही कथा निर्मळ पाठकानेही पहिल्या तंत्रात वर्णिली आहे. ‘सोनटके देणारा सर्प’ ही कथा पंचोपाख्यानाच्या भावे प्रतीत (तंत्र ३. कथा ५) आलेली आहे. संस्कृत पंचतंत्राच्या निर्णयसागर व हर्टेल प्रतीतील तिसऱ्या तंत्रात ती आढळते. इतर कथा महालिंगदासाने कोठून घेतल्या हे सांगता येत नाही. त्याला माहीत असलेल्या लोककथा त्याने वर्णिल्या असे म्हणावे तर त्या त्या कथा वर्णन करताना आधारभूत असे संस्कृत श्लोक काही कथात दिलेले आढळतात.

यावरून असे दिसून येते की, आपल्या मुद्रित प्रतीचा लेखक व निर्मळ पाठक यांच्यासमोर आधारभूत ‘पंचतंत्रा’च्या प्रतीत विशेष साम्य आहे. बहुधा दोघांच्याही समोर पंचतंत्राचा एकच पाठ असावा. महालिंगदासाने आधाराला घेतलेला पंचतंत्राचा पाठ त्याहून अगदीच वेगळा असला पाहिजे.

महालिंगदास गोष्टीवेल्हाळ आहे. त्याने पुष्कळ नवीन कथा आपल्या ग्रंथात वर्णिल्या आहेत. क्वचित, एखाद्या सुभाषितवजा संस्कृत श्लोकातूनही तो कथा निर्माण करतो. भर्तृहरीच्या ‘नीतिशतका’तील ‘भग्नाशस्य करण्डपीडिततनी :...’या ८४ व्या श्लोकातून त्याने ‘पेटाऱ्यातील सर्प व उंदीर’ ही कथा रचून ती दुसऱ्या तंत्राच्या आरंभी घातली आहे. आपल्या ओवीबद्ध रचनेत ‘अति निकट जेथे प्रीति राहात नाही। प्रगट दिसत भानू वंद्य कोणासि नाही। सकळ जन द्वितीयं तं वंदिती ते स्वभावे। म्हणउनि सजणा रे दूरदेशी राहावे ॥’ असा श्लोकही तो घालतो. त्याच्या कथांच्या निवेदनशैलीचा परिचय व्हावा म्हणून, ‘भूतो भवति गर्भिणी’ या कथेचा उतारा पुढे देत आहे :

> “पक्षीया म्हणे वो सुंदरी। तुज जाली त्या भुताची परी। तवं पक्षीणी बोले नारी। म्हणे हे कैसी कथा। पक्षीया ह्मणे ऐक कांते। कोन्ही एक दोन्ही राजे होते। परस्परें बोलती येरयेरातें। क्रीयाभाक केली ॥ येक ह्मणे तुमचे पोटी पुत्र होईल। त्यासी आपली कन्या देईजैल। आम्हासी पुत्र निपजैल। तरी द्यावी कन्या तुमची। तवं दोघाचीया स्त्रीया गरोधरी। प्रसुत जाल्या तव निपजल्या क्वारी। त्या त्याही करोनी दूरी। आनीक वीव्हाव केले ॥ त्याही प्रसुत होती। कंन्याचि उदरी येती। त्याही वसारीती। आनीक सातपाच वीव्हाव करीती। परी होये कन्येचेची धन ॥ येक दिसी ठकीलें येकीनं। ह्मणे मज जाले पुत्ररत्न। कंन्या लोपोन सुईणीनं। पुत्र सांगीतला रायासी ॥ रावो दे द्रव्यदान गव्यदान। सोहोळे होती राणीसी वाजांत्रें नीशान। बाळांतवीडा धाडीला मैत्रानं। सोइरे जालों आम्ही तुम्ही ॥ रायाचे दृष्टी नाही घातली। कंन्या दिसामासा थोरावली। तवं मैत्रें मुळचिठी धाडिली। म्हणे यावं पर्णावया। कन्या म्हणे माये कैसे करिसी। घात होईल दोघांसी। आतां मीच मरैन ह्मणौनी गेली वेगेसी। नदितीरा पैं। येका व्रक्षातळी बैसली। चींतेच्या प्रवाही बुडाली। तवं भुतानं पाचारिली। ह्मणे चींतातुर कां वो तु ॥ समस्त वार्ता तीनं सांगीतली। भुतासि तीची कृपा आली। लींग देउन प्रष्णावति घेतली। परोपकार केला तिये ॥ येरी गेली राजमहला ॥ वीवाह सोहळा जाला। लींगासि भुत मागो आला। ह्मणे मी कीती लपुं भुताभेणें ॥ तो ह्मणे येक पुत्र होईल। मग तुह्मी यावं वहीलं। मग भुतं प्रयान केलं। पुत्र जाला बहुता दिसा ॥ फीरोनी आला मागावयासी। तेणें पाचारीलें पंचाक्षऱ्यासी। पीटोनी लाविलें तयासी। पाहे परोपकार कैसा हा ॥ समस्त भुतें मीळोनी। तीयेसी केलें गर्भीणी। दुख न साहे तीये लागोनी। वाक्य मग बोलीली ते ॥ श्लोक ॥ भूतनी उवाच ॥ परोपकार न कर्तव्यं कर्तव्यं आत्मरक्षणं। राजकन्यालिंग ह (द)त्वा भुतो भवति गर्भिणी ॥ पक्षीया ह्मणे वो सजनी। भुताची जाली भुतिनी। परोपकार न सांगा वो पक्षीणी। तैसे जालें तुज ॥”

अनुक्रमणिका

हीच कथा निर्मळ पाठकाने व महालिंगदासाने कशी निवेदन केली आहे ते तुलनात्मक दृष्टीने पाहण्यासारखे आहे. दोघांच्याही कथेतील घटनांत आरंभी थोडा फरक आढळतो. निर्मळ पाठकाने ही कथा विस्ताराने वर्णिली आहे तर महालिंगदासाने बऱ्याच संक्षेपाने सांगितली आहे. पाठकाने केलेला विस्तार त्या त्या ठिकाणच्या भावनांना पोषक आहे. त्यातून मनुष्यस्वभावाचे ज्ञान अधिक चांगले होते. महालिंगदासाच्या संक्षेपामुळे आपण त्याला मुकतो.

कृष्णराज व त्याचे पंचोपाख्यान

कृष्णराजाने आपल्या 'पंचोपाख्याना'त स्वतःविषयी काहीच माहिती दिलेली नाही. या कवीची आणि त्याच्या काव्याची उपलब्धी नवीन आहे. त्यामुळे अन्यत्रही त्याची माहिती कुठेच आलेली नाही. ग्रंथाच्या शेवटी त्याने लेखनकालही निर्देशिलेला नाही. त्यामुळे त्याच्याविषयी काहीच लिहिता येत नाही. 'कवि प्रार्थी कुळस्वामिनी । मातापुरनिवासिनी । ऱ्हदयकमळी स्मरोनी । बोलवी ग्रंथ' असे त्याने आरंभी म्हटले आहे. त्यावरून माहुरची रेणुकादेवी त्याची कुलस्वामिनी होती असे कळते. तंत्र १ मधील विष्णुरूपधारी कोळ्याच्या कथेत, आपण तुझ्या भेटीसाठी कसे आलो, याचे कोळी राजकन्येजवळ वर्णन करतो. तेव्हा तो म्हणतो, 'म्हणे तूं मज निरंतर ध्यासी । जे भर्तार व्हावा हृषीकेशी । तयावांचूनि आणिकासी । न वरी जाण ॥ मज हें कळलें ज्ञान । मग मी आलों द्वारकेहून मार्गी येतां लवणक्षार स्थान । लोणारासी आलो । तेथे लवणासुर मर्दिला । लक्ष्मीरूप जे कमला । तया तळियांत पाय पडला । मग फुटीर ते जाहाले ॥' कृष्णराजाने लोणारचा हा जो जाणूनबुजून उल्लेख केला आहे त्यावरून व त्याची कुलस्वामीनी माहुरची देवी होती यावरून असे वाटते की, हा कवी विदर्भातील असावा.

आपल्या मुद्रित प्रतीशी त्याच्या 'पंचोपाख्याना'ची तुलना करून पाहिली तर त्यात फार फरक असलेला दिसून येतो. मु. प्रतीतील पुढील कथा कृष्णराजाच्या 'पंचोपाख्याना'त नाहीत. **तंत्र १**. राजकन्या दमघोषा व कामातुर कमळाकर जोशी, (मु. १४ वी कथा 'हंस व घुबड' ही कृष्णराजाने वर्णिली आहे. पण तिच्यात 'घुबडा'येवजी 'पिंगळा' पक्ष्याचे वर्णन आहे.) **तंत्र २**. मु. प्रतीतील बटुकर्ण संन्यासी व उंदीर (कथा ३), आणि सोमलिंग साळी (कथा ५) या दोनच कथा कृष्णराजात आढळतात. इतर कोणतीही नाही. **तंत्र ३**. या तंत्रातील चतुर्दन्त हत्ती व चंद्रदूत ससा (कथा १), परवंचक व्याघ्र व वानर (कथा ३) आणि 'अहो विल' कोल्हा व सिंह (कथा ७) यांखेरीज इतर कथा कृष्णराजात नाहीत. मु. प्रतीतील(तंत्र ३. कथा ६) 'सिंहाच्या मावशी'ला कृष्णराजाने सिंहाची सावत्र आई, केले आहे. **तंत्र ४**. या तंत्रातील सुद्धा गंगदत्त बेडूक (कथा १), कोल्हा आणि कामातुर गाढव (कथा २), आणि सत्यवादी युद्धिष्ठिर कुंभार, या तीन कथांखेरीज इतर कोणतीच कथा कृष्णराजाच्या पंचोपाख्यानात नाही. **तंत्र ५**. या तंत्रातील मु. प्रतीतील विषनाल प्रयोग करणारी वेश्यामाता (कथा ९), आणि राजकन्या व राक्षस (कथा १४) या दोन कथा कृष्णराजाच्या पंचोपाख्यानात नाहीत. इतर सर्व आहेत. कपिला व ओढाळ गाय (कथा १२) ही कथा कृष्णराजाच्या २ ऱ्या तंत्रात थोड्या फरकाने आली आहे.

मु. प्रतीत नसलेल्या पुढील कथा त्याने वर्णिलेल्या आहेत. **तंत्र १**. रजक, गर्दभ व श्वान. (ही कथा महालिंगदासानेही वर्णिली आहे.) कृष्ण सर्प व विरोळा, शिंगे वाढलेला मेंढा, उंदराने खाल्लेली तुळा, आणि, पुंसी व तिची पिले. **तंत्र ३**, पुराणिकालासोनटके देणारा सर्प, विरक्त हत्ती (महालिंगदासाने वर्णिलेल्या 'महार्णव व मणिभद्र गाढव' या कथेचेच हे निराळे स्वरूप होय. गाढवाच्या ऐवजी हत्तीचे वर्णन आहे, हा त्यातील आणखी एक विशेष). यांपैकी कृष्णसर्प व विरोळा, उंदराने खाल्लेली तुळा, पुंसी व तिची पिले,

आणि, पुराणिकाला सोनटके देणारा सर्प, या कथा निर्मळ पाठक व महालिंगदास यांनीही वर्णिलेल्या नाहीत. **भा** प्रतीत मात्र यातील 'उंदराने खाल्लेली तुळा' व 'सोनटके देणारा सर्प' या दोन कथा आहेत. या दोन कथा संस्कृत पंचतंत्राच्या निर्णयसागर, हर्टेल व कोसगार्टेन यांच्या प्रतींत आहेत. पण त्यांत इतर कथा नाहीत. तेव्हा या सर्वाहून वेगळी अशी 'पंचतंत्रा'ची प्रत कृष्णराजासमोर असावी असे दिसते.

कृष्णराजासमोर असलेली 'पंचतंत्रा'ची प्रत अगदीच वेगळी असावी, असे म्हणण्याला आणखीही एक कारण आहे. पंचोपाख्यान, सिंहासनबत्तिशी, वेताळ पंचविशी इत्यादी कथा —'तरि हे प्रथम पीठिका ऐसी । कथा होत्या स्वर्गाशी । त्या आल्या मृत्युलोकासी । ऐसीयापरी'—स्वर्गलोकातून मृत्यूलोकात कशा आल्या याची त्याने मनोरंजक हकीकत सांगितली आहे. 'पार्वती आणि त्रिपुरारी । कैलासी बैसली होती' तेव्हा पार्वतीने विनंती केली की, 'जी जी देवा त्रिपुरारी । कृपा करावी मजवरी । कथा त्रैलोक्यसाजिरी । सांगावी मज ॥ जे नाहीं कोणे पुराणीं । ऐकिली नाही कोण्ही । ते सांगा मजलागुनी । कृपा करूनि स्वामिया ॥' तेव्हा पूर्वी कोण्हा श्रुत नव्हत्या' अशा कथा शंकराने पार्वतीला एकांतात सांगितल्या पण त्यावेळी 'तव तेथे पुष्पदंत गुप्त । स्थिती ऐकत होता कथा ॥ तो नंदीनें जातां वारिला । मग तेणें वेश पालटिला । मक्षिकारूप जाहला । संचरला ते स्थळीं ॥' अशा रीतीने पुष्पदंताने त्या सर्व कथा ऐकल्या. घरी गेल्यावर त्याने त्या सर्व कथा आपल्या पत्नीला सांगितल्या. पुढे एका प्रसंगी आपल्या सख्यांसहित पार्वती सरोवरात क्रीडा करण्याला गेली. तेथे तिने आपल्या सख्यांना कथा सांगितल्या. कथा सांगताना एके ठिकाणी तिला विसर पडला, तेव्हा 'तेथे पुष्पदंताची कांता । विजया सांगती झाली.' तिला या कथा माहीत असलेल्या पाहून पार्वती शंकरावर रागावली. शंकराला अंतज्ञानाने सर्व कळले. त्याने पुष्पदंताला बोलावून विचारले. पुष्पदंताने अपराध मान्य केला. तेव्हा पार्वतीने पुष्पदंताला शाप दिला. 'म्हणे तु जाय मृत्यूलोकाभितरी । होई राक्षस ।' नंदीने मधेच तोंड घालून म्हटले, 'शिक्षा फार कडक झाली.' तेव्हा पार्वतीने नंदीलाही शाप दिला. 'म्हणे ऐके रे दुर्मती । भवांतक होई निश्चिती । मृत्युभुवनीं ।' त्यांनी उःशाप मागितला. 'मग बोलिली भवानी । तुम्हां दोघा असतां मृत्युभुवनीं । परस्परे भेटलीया श्रापखंडणी । होईल तुमची ॥ तेधवा या कथा कथाल । मृत्युलोकीं प्रगट होतील । मग तुम्ही पावाल । पूर्वस्थिती ।'

शापामुळे पुष्पदंत राक्षस होऊन व नंदी भवांतक होऊन मृत्युलोकात आले. पुष्पदंत राक्षस एका वटवृक्षाखाली राहून येणारी जाणारी माणसे खाऊ लागला. शाप संपण्याची वेळ जवळ आली तेव्हा तेथे एके दिवशी भवांतक येऊन बसला. राक्षसाने मनुष्यवेष धारण करून त्याला विचारले, 'तू कोण? कुठून आलास? कुठे जाणार?' भवांतक म्हणाला, 'मी स्वर्गाला जाणार आहे.' पुष्पदंत राक्षसाला खूण पटली. त्याने भवांतकाला बसवले आणि आपण पूर्वी गुप्त रूपाने ऐकलेंल्या कथा तो त्याला सांगू लागला. 'एकमेका कथा सांगती । वटपत्रीं लिहीती । राक्षस सांगे ॥ भवांतक हें ऐकोनी । ते वनश्वापदें ऐकोनि कानीं । पक्षी विसरले चारापाणी । कथा ऐकों ठेलीं ॥' तेव्हा तेथे एक पारधी आला. त्याने एक पक्षी धरून नेला. नगरमार्गाने जातांना लोकांनी त्याला विचारले, 'तुला हा पक्षी कोठे मिळाला?' पारध्याने वटवृक्षाजवळील वृत्तांत सांगितला. 'तो वृत्तांत रायें ऐकिला । मग राव तेथूनि निघाला । वटाजवळी आला । तवं स्वर्गा गेले उभयता । मग राव येऊनी विश्रामला । वृक्षातळीं बैसला । पाहे तवं देखता जाला । पानें लिहिलीं होतीं ॥ कथानुसंघानें लाविलीं होतीं पानें । मग रायें घेऊनी ते क्षणे । .... । दिधली प्रधानाहातीं । मग राव भद्रास आला । प्रधानाप्रति बोलिला । कथाविलास लिहविला । लोकोपकाराकारणें । मग ते कागदी लिहीली । कथामाळा ते वेगळाली । चाऱ्ही ग्रंथ ते काळी । लिहिविले प्रधानें । तया ग्रंथाची नामें जाण । सांगेन तुम्हालागुन । एक हें पंचोपाख्यान । दुजें सिंहासनबत्तिशी । तिसरी वेताळपंचविशी । चौथा ....। ऐसी

अनुक्रमणिका

चौप्रकारीसी । लिहिल्या होत्या ॥ तयामध्यें हें पंचोपाख्यान । येथें राजनिती गहन । ते तुह्मा सांगेन । विस्तारेसी ॥ तरि हे प्रथमपीठिका ऐसी । कथा होत्या स्वर्गासी । त्या आल्या मृत्युलोकासी । ऐसीयापरी ॥" (अध्याय २)

स्वर्गातून मृत्युलोकात या कथा कशा आल्या, त्याचा हा वृत्तांत 'पंचतंत्रा'च्या कोणत्याही परंपरेतील संहितेत आढळत नाही. सोमेश्वराच्या 'कथासरित्सागरा'–तील द्वितीय लंबकाच्या प्रथम तरंगात तो आलेला आहे.

कैलासे धूर्जटेर्वक्त्रात् पुष्पदन्त गणोत्तमम् ।
तस्मात्वररुचीभूतात्काणभूतिं च भूतले ॥
काणभूतेर्गुणाढ्यं च गुणाढ्यात्सातवाहनम् ।
यत्प्राप्तं श्रृणुतेदं तद्विद्याधरकथाद्भुतम् ॥

असा आरंभ करून सोमेश्वराने हा वृतांत विस्ताराने वर्णन केलेला आहे. क्षेमेन्द्राच्या 'बृहत्कथामञ्जरी'तही तो आलेला आहे. हाच वृत्तांत कृष्णराजाने आपल्या पंचोपाख्यानाच्या प्रारंभी वरीलप्रमाणे सांगितला आहे. वरील दोन संस्कृत ग्रंथांपैकी कोणत्या तरी एका ग्रंथाच्या आधारे तो वृत्तांत आपल्या 'पंचोपाख्याना'त प्रारंभी वर्णन करण्यात कवीची कल्पकता दिसून येते यात शंका नाही. त्यावरून त्याची बहुश्रुतताही प्रत्ययाला येते.

कृष्णराजाने आपले 'पंचोपाख्यान' संस्कृत ग्रंथावरून सरळ मराठीत ओवीबद्ध केले की त्याच्यासमोर एखादे गद्य पंचोपाख्यान होते याचा निर्णय करणे कठीण आहे. 'पूर्वी विष्णुशर्मा ब्राम्हण । त्यानें कथिलें होतें पंचोपाख्यान । गोष्टीविलासेकरून । कथिल्या कथा ॥ नव्हता केला वोवीप्रास । कथिला होता गोष्टीविलास । करावया वोवीप्रबंधास । आयास तुमचा पाहिजे ॥' असे तो म्हण्तो. (अ. १-२३ २४) त्यावरून संस्कृतवरून त्याने ओवीबद्ध रूपांतर केले असावे असे वाटते. पण लागलीच पुढे तो असेही म्हणतो की, 'पूर्वीचा पाया आहे जाण । तेणेंचि प्रमाणें वोवी बांधन ।'—हा 'पूर्वीचा पाया' म्हणजे संस्कृत 'पंचतंत्र' की त्याचे एखादे गद्य रूपांतर? चौथ्या तंत्राच्या शेवटी तो सांगतो : 'ऐशी हे लुब्धप्रणांश कथा । विष्णुशर्मा सांगे राजसूता । ते उच्छिष्ट काव्यकथा । सांगतसे श्रोतियां' (अ. २२-११२) यावरून पहिल्या तर्काला पुष्टी मिळते. आपण ओवीप्रबंध का करतो हे सांगतांना त्याने दिलेली कारणेही याबाबतीत उद्बोधक ठरतील. तो म्हणतो : 'मी आरूष वचनीं । माडिलीसे ग्रंथ रचनी । वोवी प्रबंध करूनी । करूं पाहे ॥ नसता वोवी प्रास । कथा न वाटे सुरस । जैसें लवण नसता मिष्टान्नास । रूची नाही भोजनीं ॥' (अ. १-२५, २६) अन्यत्र तो म्हणतो : 'तरी मी मनीं आरंभिलें । पंचोपाख्यान वोवीबंध पाहिजे केलें । पूर्वी गोष्टी विलासें कथिलें । होतें म्हणोनी ॥ (तंत्र ५. अ. २३-२४) पुढील अध्यायाच्या आरंभी पुन्हा तो सांगतो की, 'गोष्टीविलासे करूनी । कथिलीसे कथनी । ते वाचितां वाचका मनीं । रसातें नेदी ॥ वोवीप्रासेविण । कथेसी न ये गोडपण । म्हणोनि केलें कथन । वोवी प्रबंधाचें ॥' (२४-२, ३) पूर्वी गोष्टीविलासेकरून कथा सांगितल्या गेल्या, म्हणून आपण वोवी प्रबंधात सांगतो, असे तो पुनःपुन्हा म्हणतो. विष्णुशर्म्यानेही या कथा 'गोष्टी विलासे करून । कथिल्या कथा' असे त्याने आरंभीच म्हटले आहे. त्यावरून सरळ संस्कृतवरून त्याने आपला वोवी प्रबंध केला असावा असे दिसते. तथापी, 'वोवी प्रासेविण । कथेसि न ये गोडपण' हे त्याचे म्हणणे त्याला परिचित असलेल्या 'पंचतंत्रा'च्या एखाद्या मराठी गद्य रूपांतराला अनुलक्षून असावे, असेही म्हणता येते. निर्मळ पाठकाने

अनुक्रमणिका

ज्याप्रमाणे 'पूर्वी प्रति होती मोकळी । ते वोवीबंधें संकळिली' असे स्पष्ट म्हटले आहे तसे मात्र कृष्णराजाने म्हटलेले नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे.

हा कवी चांगला बहुश्रुत असावा असे दिसते. दुसऱ्या तंत्रात 'येचि विषई ऐका सावधान । कालिदास बोलिले वचन । तें तुज मी सांगेन । जाण हिरण्यका ॥" असे म्हणून, भोजराजा आणि कालिदास यांच्या आख्यायिकांतील 'गतं न शोकं कृतं न मन्ये'—हा श्लोक तो उध्दृत करतो. पहिल्या तंत्रात, दमनक पिंगळकाला 'कुंडगोळका'चा अर्थही सांगतो. 'दौपदी पतिव्रता । पाचांनी भोगिली तत्वता । कुंडगोळक या अर्था । म्हणिजे जाण ॥' अर्थात, हे सर्व कृष्णराजाच्या पदरचे आहे. टिटवी व समुद्र कथेत, गरुडाच्या विनंतीवरून विष्णूने समुद्राला बोलावले व टिटवीची अंडी परत करण्याला सांगितले, अशी कथा सर्वांनीच वर्णन केली आहे. पण कृष्णराज सांगतो : 'ऐसी सांगीतली कथा । परी गरुडपुराणीं अनवार्ता । तेही सांगेन श्रोता । ऐका सावचित्र' अशी प्रस्तावना करून तो गरुडपुराणातील माहिती देतो. पक्षिकुळांच्या विनंतीवरून गरुडाने समुद्राला अंडी परत करण्याला सांगितले. पण तो देईना. तेव्हां 'कोपारूढ जाहला नंदन । कस्यपाचा । मग पृथी घेतली पाठीवरी । उलथों पाहे तये अवसरी । मग धाविला मुरारी देवांसहित ॥' त्याच्या विनंतीवरून समुद्राने अंडी परत केली. विष्णु गरुडावर प्रसन्न झाला. त्याने गरुडाला वर मागण्याला सांगितले. गरुडाने विष्णूचें वाहन होण्याचा वर मागितला. 'मग हरी बोले वचन । होइ माझें वाहन । बैसेन तुजवरी । तैपासून गरुड जाण । विष्णूस लाधलें वहन । हे गरुडपुराणी कथन । बोलीले असे ॥' (तंत्र १. अ. १५) कृष्णराजाच्या बहश्रुततेच्या अशा खुणा त्याच्या 'पंचोपाख्याना'त विखुरल्या आहेत.

प्रल्हाद भास्कर व त्याचे पंचोपाख्यान

ओवीबद्ध 'पंचोपाख्यान' कर्ता चौथा कवी प्रल्हाद भास्कर होय. याचा संपूर्ण ग्रंथ उपलब्ध नाही. तिसऱ्या तंत्राची आरंभीची काही पाने व पाचवे तंत्र, एवढेच उपलब्ध आहे. तिसऱ्या तंत्राच्या आरंभी त्याने जनार्दन गुरूला नमन केले आहे. पाचव्या तंत्राच्या शेवटी 'श्रीमद् जनार्दनार्पणमस्तु' असे लिहून आपला ग्रंथ याने आपल्या गुरूला अर्पण केला आहे. तेव्हा ही दोन्ही तंत्रे प्रल्हाद भास्कराचीच होत यात शंका नाही. शके १६१६ मधे त्याने आपला ग्रंथ लिहिला. तो अथर्वण वेंदी असून त्याचे गोत्र भारद्वाज, पिपलायन शाखा—इत्यादी माहिती यापूर्वीच निर्दिष्ट केली आहे. याशिवाय या कवीविषयी अधिक माहिती उपलब्ध नाही. याच्या कवित्वाची ओळख व्हावी म्हणून प्रथम, तिसऱ्या तंत्रातील दोन उतारे येथे देतो.

> श्रीगणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्रीमज्ञनार्दनगुरवे नमः ॥ अथेदमारभ्यते काकोलुकीयं तृतीयं तंत्रं ॥ आइका कथा पंचोपाख्यान ॥ राजनीती कथा गहन ॥ वक्ता वीष्णुशर्मा आपण ॥ राजपुत्रांप्रति सांगे ॥ १ ॥ त्यामध्यें तीसरें आख्यान ॥ काकोलुकी नामामिधान ॥ ते महाराष्ट्र बोलिं सांगेन । चतुरा जनाप्रति ॥ २ ॥ ते सकौतुक कथा वरवी ॥ श्रोताजनीं अवधारावी । श्रवण करूनि धरावी ॥ ह्रदयामाजि ॥ ३ ॥ जो ये कथेसि लावी मन ॥ हदई करी वीवरण ॥ तो पुरुष कहि जाण ॥ न पवे सीणाते ॥ ४ ॥ बरवी वाक्यें सुभासीतें । प्रस्ताविकें नाना दृष्टांते । निर्मछरे या उपपत्तिते ॥ करावें श्रवण ॥ ५ ॥ पावले कथेचे विवरण ॥ श्रोता हावे सावधान ॥ कथेचा प्रथम श्लोक जाण ॥ बोलिजैल ॥ ६ ॥ श्लोक ॥ **न विश्वसेत्पूर्वविरोधितस्य शत्रोश्च मित्रत्वमुपागतस्य ॥ दग्धां गुहां पश्य उलूकपूर्णां काकश्च प्रीतेन हुताशनेन ॥ १ ॥** टीका ॥ नृपनंदना परियेसि पूर्वि वैर असेल जेणेसि । जाणोनि पुरुषें तेणेसी । मैत्रिकी न कीजे ॥ ७ ॥ तो अनुसंगाही येइल । अत्यंत करुण बोलैल । सेवक होउनि वर्तैल । लावील प्रीति ॥ ८ ॥ तऱ्ही त्यासि मैत्री न कीजे । हितगुज न संगीजे । अनुग्रहो न

कीजे । जाणतेनी ॥ ९ ॥ नृपात्मजा परियेसी । जऱ्ही तो मैत्रिकेसी । तऱ्ही आपण तयासि । विश्वासो नयेचि ॥ १० ॥ विश्वासल्या कैसे होइल । तो आपुले द्वंद स्मरैल । पुढें विपत्ति देइल । सत्य जाणे ॥ ११ ॥ जैसे वायसें स्मरोनि द्वंदाला । उलुकासी शरण गेला । पुढे सकळा दाहो केला । वृक्षकोठर जाळूनि ॥ १२ ॥

आता मूळ कथेचा आरंभ पाहा—

दक्षण देशीं मनोहर । महिलारोप्य नामें नगर । तयासमीप महा थोर वटवृक्ष येकु ॥ १९ ॥ तो बहुता पक्षियांचा आश्रम । श्रांतलिया जनाचा विश्राम । अत्यंत विस्तार उत्तम । सीतळ छाया ॥ २० ॥ थोरा शाखीं आथिला । दिसे गगनेंसी लागला । तेथे समुदावो राहिला । वायसांचा ॥ २१ ॥ तया वृक्षकोटरा आंतु । मेघवर्ण नामें विख्यातु । वायसांचा नृपनाथु । वसे तेथे ॥ २२ ॥ असंख्यात वायससैन्य । अवधियांसि तो मान्य । अवघे वायस आपण । वोळगती त्यातें ॥ २३ ॥ तयाचि नगरी प्रदेशें । दुरस्थ दक्षण दिशे । त्रिसीरा पर्वती असे ॥ शाल्मली वृक्ष ॥ २४ ॥ तया वृक्षकोटरा आंतू । अरिदमनक नामें विख्यातु । वर्ते उलुकनृपनाथु । सकळा उलुकांचा ॥ २५ ॥ सहस्रसंख्या उलुक । तयांचा तो राजा मुख्य । अवघे होउनि सेवक । वोळगती त्यातें ॥ २६ ॥ इत्यादी.

प्रल्हाद भास्कराने पाचवे तंत्रही याच पध्दतीने लिहिले आहे. संस्कृतवरून मराठीत अनुवाद करताना व्यक्तीच्या तोंडी असलेले संस्कृत श्लोक त्याने जसेचे तसे ठेवले आहेत. त्यावरून या व्यक्ती जणु संस्कृत भाषेत बोलतात असे वाटते. उदा : पाचव्या तंत्रात आरंभी नापित क्षमणकांना आमंत्रण करण्यास गेला. हे सांगताना कवी म्हणतो :—ऐसे मनीं विचारुनि । बरवीं खैरकाष्ठे मेळउनि । मग क्षपणिकांच्या घरा जाउनि । आवंतिले तथा ॥ १७ ॥ ॥ उक्तं च ॥ ते जयन्ति जिणो येषां केवलं ज्ञानशालिनां । आजन्मतः स्मरोपत्त्यां मानसं न परं जितं ॥ ५ ॥ ऐसें. म्हणौनि दंडवत केलें । म्हणे जी आह्मातें सनाथ करा वहिले । माझे घरीं पूजेसि अंगिकारिलें । पाहिजे तुह्मी ॥ इत्यादी.

या दोन्ही तंत्रातील कथांचा क्रम सामान्यतः आपल्या मुद्रित प्रतीप्रमाणेच आहे तथापी, मुद्रित प्रतीत आलेली 'सिगुजीची कथा' मात्र प्रल्हाद भास्कराच्या या तंत्रात नाही. 'त्रिस्तनी राजकन्येची कथा' निर्णयसागर, हर्टेल इत्यादींच्या संस्कृत पंचतंत्रात आढळते तशी त्याने वर्णन केली आहे. तिच्याहून मुद्रित प्रतीतील कथेचे स्वरूप निराळे आहे. त्यावरून प्रल्हाद भास्करासमोर निर्णयसागर, हर्टेल (पूर्णभद्र) यांच्या प्रतीसारखी एखादी प्रत असावी असे दिसते. तथापी, त्याच्यासमोर मुद्रित प्रतीच्या पोथीसारखी दुसरी पोथी असावी असे वाटते. कारण 'या कारणे हे कथा सांगीतली' हे मुद्रीत गद्य प्रतीच्या पाचव्या तंत्रात वारंवार आलेले वाक्य प्रल्हाद भास्कराच्याही या तंत्रात आले आहे. (तंत्र ५—९०, ९९).

आपल्या काव्याच्या शेवटी वाचकास त्याने जो उपदेश केला आहे तो पौराणिक पद्धतीप्रमाणे आध्यात्मिक स्वरूपाचा आहे. हा शेवट असा : ह्मणोनि जाणतेनी सर्वथा । पाहावी येथीची योग्यता । तरी सकळ कळा येती हाता । चतुरपणाच्या ॥ संपूर्ण होउनिया चतुर । मग भजण्या परमेश्वर । जो ठाइंचा अचतुर । त्यासि सिद्धि निसिद्ध काइसी । ह्मणौनि ऐसीयाचें कारण । वाचे चिंतावा नारायण । तोचि जाणावा नर नारायण । चातुर्य फळे । मनोभावें नेमेसिं । जो ध्यानी चिंती सदासिवासि । तोचि तरला भवसागरासि । येर मूर्ख पाशांडि ॥ पाशांडिया नावडे परमार्थु । तो हृदयीचा मूर्ख संततु । सज्ञना आवडे परमार्थ अनंतु । परम पुरुष जो ॥ पंचोपाख्यान कथा । समाप्त केले ग्रंथा । वोवी प्रबंध जाला करिता । प्रल्हाद भास्कर ॥

अनुक्रमणिका

एक अनामिक कवि व त्याचे पंचतंत्र

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयातील **क्र.** १७५९ च्या हस्तलिखितात एक ओवीबद्ध पंचतंत्र आहे, याचा निर्देश यापूर्वीच केलेला आहे. त्याची केवळ १३ पाने आज उपलब्ध आहेत. या पानावर तिसऱ्या तंत्रातील आरंभीच्या भागाच्या १६० ओव्या लिहिलेल्या आढळतात. हे तिसरे तंत्रही, अर्थात, अपूर्ण आहे. त्यामुळे या ओवीबद्ध 'पंचतंत्रा'चा कवी कोण, तो केव्हा होऊन गेला याविषयी काहीही सांगता येत नाही. त्यातील काही ओव्या येथे उध्दृत करतो :—

> आता संधिविग्रहाख्य तिसरे । प्रकरण आरंभिजेते बरे । त्याचा पहिल्या श्लोक सादरें । श्रोती बरे परिसावा ॥ १ ॥ न विश्वसेत्पूर्वविरोधि तस्य । शत्रोश्च मित्रत्वमुपागतस्य । दग्धां गुहां पश्य दिवांधपूर्णा । काकप्रकीर्णेन हुताशनेन ॥ आधी शत्रुभावातें पावुनि । मग जे लाधले मित्रपणालागुनि । तैशाते विश्वासू नये कावळ्यांनी । दिवाभीतपूर्ण गुहेलागुनि जाळियेलें ॥ २ ॥ हे कैसे म्हणतां मुलांनी । विष्णुशर्मा सांगता झाला गुणी । तो वृत्तांत चित्त देऊनि । श्रोतेजनी परिसावा ॥ ३ ॥ येक्या थोर वनामाझारी । होता वटवृक्ष उंच भारी । तो सर्व पांखरा आश्रये पालन करी । जलरहित मेघापरी दिसतसे । तेथें उदंड वायसकुलयुक्त । मेघवर्णनामा काक राजशक्त । राहता झाला स्वजनी अनुरक्त । मंत्र्यासमवेत गुणशाली ॥ ५ ॥ त्याजवळि दिवाभीत संघपरिवृत । अरिमर्दननामा विख्यात । उलुकराज बुध्दिवंत । राहतसे निश्चित समजा तुम्ही ॥ ६ ॥ येकदा पुर्ववैरें कडुन । काकास रात्र्यंधत्व समजून । निशीथिनीचे ठांई येऊन । काककुलातें वेढून मारिजेले ॥ ७ ॥ मेघवर्ण काकराज तदा भयें । वृक्षाचे कोठरीं लपुन स्वयें । रक्षियेलें आत्मकाय । मग जाहलें ते काय सांगतो ऐका ॥ ८ ॥

नमुन्यासाठी ह्या आठच ओव्या येथे उध्दृत केल्या आहेत. त्यांचे निरीक्षण केले म्हणजे पहिली गोष्ट लक्षात येते ती अशी की, ह्या ओव्या साडेचार चरणी आहेत. प्रत्येक ओवीच्या चौथ्या चरणातही यमक साधले आहे. तेथे वस्तुतः चौथा चरण पूर्ण होतो. ही रचना एकनाथांच्या ओवीसारखी आहे. त्यावरून हा कवी एकनाथकालीन किंवा त्यानंतरचा असावा, असा तर्क करण्यास हरकत नाही. 'झाला' या क्रियारूपावरून तो बराच आधुनिक असावा असे वाटते. कोणत्याही उपलब्ध ओवीबध्द 'पंचोपाख्यानां'च्या तिसऱ्या तंत्राच्या आरंभी या ओव्या आढळत नाही त्यावरून असे दिसते की, 'पंचोपाख्याना'ची ओवीवद्ध रचना करणाऱ्या इतर कवीहून हा निराळा कवी होय, व त्याचे 'पंचतंत्र' अथवा 'पंचोपाख्यान' हा ग्रंथ होय यात शंका नाही. त्याची रचना संस्कृतप्रचुर व सामासिक शब्दांनी युक्त आहे. त्यावरून तो चांगला संस्कृततज्ञ असावा असे वाटते.

४

संपादनासाठी मिळालेली पोथी : वर्णन

मला ही पोथी कै. महंत गोपीराज यांच्याकडून दिनांक ३०-११-१९५४ रोजी मिळाली. त्यापूर्वी काही दिवस ती श्री. नेने यांच्याजवळ होती. मला पोथी देताना माझ्या समोर गोपीराजांनी पहिल्या पानावर पुढील नोंद केली. 'श्री. नेने यांच्या येथून ही पोथी ३०-११-१९५४ रोजी आणली. श्री. कोलते यांना दिली महंत गोपीराज रिध्दिपुर. ३०-११-१९५४.' या मजकुराच्या डाव्या बाजूला 'गो. म. ग्रं. सं' (गोपीराज महात्म्य ग्रंथ संग्रहालय) अशी नोंद त्यांनी त्याच वेळी केली. याच पानावर वरच्या बाजूला मध्यभागी पुढील

नोंद आहे. ‘अथ पंचोपाख्यान महाराष्ट्री टीका जीर्ण पुस्तक प. महंत बोवा पाहेघण, मठ चांदूरबाजार यांच्या जवळील असे, प्रतीकरितां म. दत्त. पे. यांनी घेऊन चिठ्या लाऊन पुठ्ठण केला असे, का. शु ॥ ११-१८३०’

पोथीची बांधणी महानुभावीय पद्धतीची आहे. या पद्धतीत पोथीचे कागद मधोमध आडवे शिवून नंतर त्यांतील निम्या कागदांचा वरून व राहिलेल्या निम्या कागदांचा खालून असे दोन जुडगे केलेले असतात. त्याच पद्धतीची या पोथीची बांधणी आहे. तिची पुन्हा बांधणी करताना दोन्ही जुडग्यांना तीन कोरे कागद (नवीन) लावलेले आहेत. त्यातील आरंभीच्या पानावरच उपरोक्त नोंदी आहेत. वर दिलेली पहिली नोंद श्री. गोपीराज महंतांच्या हातची आहे, तर दुसरी (वरच्या भागावरील) नोंद महंत श्रीदत्तलक्षराज (पेशावरकर), संस्थान माहूर, यांच्या हातची आहे. ती नोंद कार्तिक शुद्ध ११, शके १८३०, म्हणजे इ. स. १९०८ मधली आहे.

‘चिठ्ठ्या लावून पुठ्ठण केला असे’ असे म. श्रीदत्तराजांनी लिहिलेच आहे. अशा चिठ्ठ्या काही पानांच्या मध्यभागी व काही थोड्या पानांच्या बाजूला लावलेल्या आहेत. मध्यभागी लावलेल्या चिठ्ठ्यामुळे तेथील ओळी, अर्ध ओळी झाकल्या गेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे वाचन कठीण झाले आहे. तथापी, अशा ओळी फार नाहीत.

महंत दत्तराजांनी पोथीची वरीलप्रमाणे डागडुजी केल्यानंतरही कसरीने पोथी खराब झाली आहे. ११३ पर्यंतच्या पानांचा खालचा भाग कसरीने खाल्ला आहे. त्यामुळे तेथील काही अक्षरे गेली आहेत श्रीदत्तराजांनी डागडुजी केल्यानंतर हे झाले असावे. असे म्हणण्याचे कारण असे की, त्यांनी दिलेले अनेक पानांवरील पृष्ठांक, तेथील भाग कसरीने खाल्ल्यामुळे आता नाहीसे झालेले आहेत. पोथीचा कागद इतका जीर्ण झाला आहे की पाने थोडी निष्काळजीपणाने उलटली गेली तर लागलीच तुकडा पडतो. पोथी हाताळण्यामुळे मध्यभागी अनेक पाने फाटून ती मोकळी सुटली आहेत.

मूळ पोथीच्या आरंभीच्या पानावर पृष्ठांक नाही. त्याच्या पाठीमागील बाजूवर १ असा पृष्ठांक दिला आहे. याचप्रमाणे सर्वत्र पृष्ठांक दिलेले आहेत. हे पृष्ठांक म. श्री. दत्तराज यांच्या हातचे आहेत, हे त्यांच्या हस्ताक्षरावरून लक्षात येते. आरंभीचा मोकळा भाग व पुढील दोन पृष्ठे यांवर काही संस्कृत व मराठी सुभाषिते लिहिली आहेत. यातील अनेक संस्कृत सुभाषिते पंचतंत्रातीलच आहेत. एके ठिकाणी : ‘रवी दर्पण : ससी चंदन : भोमें धनें बुधे गुळ भ्रहस्पते राई सुकरें दधीभात करें भलाई सने वावडिग चाबे चार जो नर जावें सो नर अष्टमासीधी घर लावें ॥ ८ ॥’

ही ज्योतिषग्रंथातील हिंदी नोंद आहे. मराठी सुभाषितात ‘बोले विठल हा पदार्थ उगवा सन्नमासीचा वायेदा ॥ ३३ ॥’ हे व याप्रकारची आणखी दोन सुभाषिते आहेत. असे एकूण ३ श्लोक यात आहेत.

पान ३ पासून मूळ ग्रंथ ‘पंचोपाख्यान’ लिहिण्याला आरंभ केला आहे. ३ ऱ्या पानावरील वरचा व खालचा, अशा दोन्ही भागावर लाल शाईने एक मोठी व दुसरी लहान अशा चौकटी आखल्या आहेत व त्यात मजकूर लिहिला आहे. या पानाच्या प्रत्येक भागावरील वरच्या दोन व खालच्या दोन ओळी लाल शाईने लिहिल्या आहेत. पान ४ पासून पुढच्या सर्व पानांवर दोन्ही बाजूंनी दोन दोन लाल उभ्या रेषा आखून घेऊन मधल्या भागात काळ्या शाईने मजकूर लिहिला आहे. प्रत्येक तंत्र ज्या पानावर संपते त्या पानावर ३ ऱ्या पानाप्रमाणे वरील दोन व खालच्या दोन ओळी आणि तंत्राचा समाप्तिलेख लाल शाईने लिहिलेला

आढळतो. १६३ व्या पानावरील समाप्तिलेख हाही लाल शाईत आहे. ग्रंथ लिहितांना 'उक्तं च' ही संस्कृत अक्षरे, त्याचप्रमाणे संस्कृत श्लोकांचे अनुक्रमांक, यांच्या आरंभी व नंतर दोन दोन उभ्या रेषा लाल शाईने काढलेल्या आहेत. उदा : ॥ उक्तं च ॥; ॥ १ ॥ —यातील उभे दंड तेवढे लाल शाईने काढलेले आहेत. पण 'उक्तं च' ही अक्षरे व १ हा आकडा मात्र, इतर मजकुराप्रमाणे काळ्या शाईतच आहे.

पृष्ठ ३ ते १६३ पर्यंत 'पंचोपाख्यान' हा ग्रंथ लिहिलेला आहे. पृष्ठ १६३ च्या वरच्या भागावर ग्रंथाचा समाप्तिलेख आहे. त्यानंतर थोडी मोकळी जागा सोडून नंतर '॥ श्री ॥ ॐ आस्य श्रीमत् दत्तात्रय द्वादश नामानीः' असा आरंभ असलेले दत्तात्रेयस्तोत्र, (पृष्ठ १६३); त्यानंतर 'अथ रूणहरंण स्तोत्र (पृष्ठ १६४ वरचा भाग); त्यानंतर 'श्री दत्तात्रयवज्रकवचस्तोत्र' (पृष्ठ १६४ ते १६८ वरचा भाग); नंतर 'दत्तात्रयमनकामनास्तोत्र' (पृष्ठ १६८ खालचा भाग); नंतर, 'दारीद्रदावानां स्तोत्र' (पान १६९, वरचा भाग); नंतर 'संकटनाशन स्तोत्र' अपूर्ण, अशी काही स्तोत्रे लिहिली आहेत. त्यानंतरची सर्व पाने कोरी आहेत.

पोथीचा लेखनकाळ

मूळ ग्रंथ 'पंचोपाख्यान' याच्या शेवटी आलेला समाप्तिलेख पुढील प्रमाणे :

"सकें सोळासें : ॥ १६०० सतांनेउ : ९७ : दुरमुख नावं समत्सरें : भादवा वद पंचमी : तदीनें पुस्तक संपुर्ण जालें : हस्ताक्षर : आंकुनेरकर दतु मुनीचें : यथाप्रतें लीखतें मम दोश न लीप्यते : ॥ * ॥

यावरून शके १६९७, दुर्मुख संवत्सर, भाद्रपद वद्य पंचमीला या ग्रंथाचे यथाप्रति लेखन पूर्ण झाले, असे दिसते. पिल्ले यांच्या जंत्रीप्रमाणे गतशक १६९७ ला मन्मथ संवत्सर येतो. गतशक १६९८ ला दुर्मुख संवत्सर येतो. अर्थात, या कालोल्लेखात शकसंवत्सराचा मेळ बसत नाही. तथापी, हा कालोल्लेख चुकीचा असावा असे मात्र म्हणता येत नाही. काही पोथ्यांतून व शिलालेखांतून अशी उदाहरणे आढळतात उदा : नरेंद्र कवीच्या नावावर असलेल्या संपूर्ण 'रुक्मिणी स्वयंवर' काव्याच्या शेवटी आलेल्या कालोल्लेखात शके १२१३, नंदन संवत्सराचा उल्लेख आहे. पण नंदन संवत्सर गत शक १२१३ ला येत नाही, तो गत शक १२१४ ला येतो. नागपूर येथील म्यूझियममधे असलेल्या सीताबर्डी शिलालेखात 'शक १००८ प्रभव संवत्सर' असा कालोल्लेख आहे, पण प्रभव संवत्सर गत शक १००९ ला येतो अशीच स्थिती आपल्या पोथीतील कालोल्लेखाची आहे. शके १६९७ त दुर्मुख संवत्सर असल्याचे त्यात म्हटले असले तरी पंचांगानुसार गतशक १६९८ मधे दुर्मुख संवत्सर येतो. संवत्सराच्या अनुरोधाने या कालोल्लेखाचा विचार केल्यास लेखकाला गतशक १६९८ हाच या ठिकाणी अभिप्रेत आहे. तोच या पोथीच्या लेखनाचा काळ मानणे योग्य ठरेल. या कालोल्लेखात वार दिलेला नसल्यामुळे भाद्रपद वद्य पंचमी ही तिथी ताडून पाहता येत नाही. ती बरोबर आहे असे गृहीत धरून चालण्यास हरकत नाही. सारांश, शके १६९८, दुर्मुख संवत्सर, भाद्रपद वद्य ५, हा या पोथीचा लेखनकाल होय पिल्ले यांच्या जंत्रीप्रमाणे तो दिवस बुधवार येतो. या कालोल्लेखाची इंग्रजी तारीख बुधवार, ता. २ ऑक्टोबर १७७६ ही येते.

अनुक्रमणिका

अक्षरवटिका

पोथीच्या पानांचा आकार १८ सें. मी. लांब व १०॥ सें. मी. रुंद असून प्रत्येक पानावर साधारणपणे १३ किंवा १४ ओळी लिहिलेल्या आढळतात. प्रत्येक ओळीत सुमारे २३ ते २४ अक्षरे आहेत. अक्षरे घोटीव काळ्या शाईत लिहिलेली असून ती चांगली ठसठशीत व सुवाच्य आहेत. लिपी देवनागरी असून तिचे वळण बाळबोध आहे. **अ** हे अक्षर बहुतेक सर्वत्र बाळबोध वळणाचे असले तरी क्वचित ते **ऋ** असेही लिहिलेले आढळते. **क** हे अक्षर एरवी नेहमीसारखेच लिहिलेले आहे. पण काही ठिकाणी सारखे (आज आपण **क्र** लिहितो, त्यातून **र** चे चिन्ह काढून टाकल्यावर **क** चे जे स्वरूप राहील तसे) लिहिलेले आहे. **क** चे हे स्वरूप जुन्या पोथ्यांत आढळते. शके १४५७ च्या पोथीवरून मी संपादन केलेल्या 'उद्धवगीते'च्या दुसऱ्या आवृत्तीत त्या पोथीतील काही पानांची छायाचित्रे दिलेली आहेत. त्यात **कु** हे अक्षर असे अनेक ठिकाणी आढळेल. अर्थात, त्यातील **क** चे वळण असेच असल्याचे लक्षात येईल. **कृ** चे वळण असे आहे. जुन्या पोथात ते आढळते. **झ** हे अक्षर त्यातील उजवीकडचा भाग शिरोरेषेला न जोडता **झ** असेही आढळते. **थ** च्या दंडाच्या उजव्या बाजूचे चिन्ह नेहमी बुटके असते. **य** आणि **थ** या अक्षरात घोटाळा होऊ नये म्हणून असे लेखन केले असावे. त्याचप्रमाणे **ध** अक्षराचेही चिन्ह शिरोरेषेच्या वर बरेच उंच काढलेले असते. त्यामुळे **घ** आणि **ध** मध्ये घोटाळा होत नाही. **फ** अक्षर नेहमीसारखेच आहे. पण काही ठिकाणी दंडाच्या डाव्या बाजूकडील अधोमुख चिन्हाच्या शेवटी गाठ देऊन तेथून खाली तिरपा फाटा ओढलेला आढळतो. फ असे ते वळण आहे. **भ** अक्षरातील दंडाला लागून असलेल्या चिन्हाला काही ठिकाणी खाली गाठ दिलेली आहे (आजच्या भ अक्षराप्रमाणे), तर काही ठिकाणी त्या चिन्हातील रेषा खाली ओढून मधूनच ते आडव्या रेषेने दंडाला जोडले आहे. (**भ**). याशिवाय एक दोन ठिकाणी प्राचीन शिलालेख, पोथ्या इत्यादिकात आढळतो त्यासारखा तो लिहिला आहे. हे वळण वरेच जुने आहे यात शंका नाही. **श** हे अक्षर श असे तर लिहिले आहेच. पण अनेक ठिकाणी त्याचे दुसरे रूप असेही लिहिलेले आढळते. **श्री** सारख्या संयुक्त अक्षरात आपण आजही तसे लिहितो. वर निर्देशिलेल्या अक्षरांव्यतिरिक्त इतर अक्षरांची वळणे देवनागरी लिपीतील बाळबोध अक्षरांच्या वळणाप्रमाणेच आहेत.

अक्षरांना 'ऋ' कार जोडतांना त्या अक्षराचा दंड खालपर्यंत काढून नंतर त्याला तो आपण एरवी जोडतो. या पोथीतील अक्षरांना हा 'ऋ'कार जोडतांना दंड पूर्णपणे न काढता तो अर्धाच काढून तेथेच त्याला तो जोडला आहे. या सदंड ऋकाराचे वळण सारखे दिसते.

काही लेखनविशेष

अक्षरांच्या या वळणाबरोबरच काही लेखनविशेषांचाही निर्देश केला पाहिजे. **ए** व **ऐ** ही अक्षरे लिहिताना या पोथीत काही ठिकाणी **अ** ची बाराखडी वापरली आहे ही अक्षरे **ए**, **ऐ** अशी लिहिलेली आहेत. **ख** साठी अनेक ठिकाणी **ष** लिहिला आहे. यजुर्वेदी ब्राम्हण **ष** चा उच्चार **ख** सारखा करतात हे प्रसिद्धच आहे. त्यामुळेच **ख** साठी **ष** हे अक्षर लिहिण्याची प्रथा पडली असावी **य** साठी **अ** लिहिल्याची उदाहरणे तर या पोथीत अनेक आहेत. (पाहा : पान २·१; ४·७; ९·१६ इत्यादी) याच्या उलट **अ** साठी **य** लिहिल्याचीही उदाहरणे आहेत. (पाहा : पान ११·७; ५९·८; ७२·११). **य** हा अर्धस्वर असल्यामुळे त्याचा उपयोग निरनिराळ्या स्वरांसाठी कसा होतो हे यावरून दिसून येईल. जोडाक्षरात **थ** साठी **छ** बहुतांश ठिकाणी लिहिला आहे. जुन्या पोथ्यांत असे लेखन सर्वत्र आढळते. **थ** आणि **छ** या अक्षरांच्या उच्चारांचा ध्वनिशास्त्रदृष्ट्या विचार करावयास लावणारा हा प्रश्न आहे, यात शंका नाही **स्थान**, **स्थ**ळ हे शब्द या

पोथीत **स्छा**न, **स्छ**ळ असे लिहिलेले असले तरी काही ठिकाणी **स्था**न, **स्थ**ळ, असेही लिहिले आहेत, हे लक्ष्यात घेतले पाहिजे. **ग्न** या संयुक्ताक्षरासाठी **ज्ञ** लिहिलेला आहे. प्राचीन पोथ्यांतही असे लेखन आढळते. **ष्णु** हे जोडाक्षर सर्वत्र **ष्लु** असे लिहिलेले आहे. **ण** या अक्षराच्या प्राचीन वळणाचा अवशेष यात दिसतो. पूर्वी **ण** हे अक्षर असे लिहिले जात असे. **ष्** हा जोडल्यानंतर जो आकृतीबंध तयार होतो त्यात हा **ल** सारखा दिसतो. म्हणून पुढे जुन्या च्या ऐवजी **ष्** ला **ल** जोडण्यात येऊ लागला असावा. आणि म्हणून **ष्ण** चे लेखन **ष्ल** असे सुरू झाले असावे असे समजतात. वस्तुतः हा **ल** म्हणजे प्राचीन चेच रूप होय.

संपादनातील धोरण

संहिता तयार करताना पोथीतील अक्षरलेखनाच्या बाबतीत पुढील धोरण स्वीकारले आहे :—

१. अ ची बाराखडी (जेथे वापरली असेल तेथे) कायम ठेवली आहे.

२. **य** साठी जेथे **अ** वापरला आहे तेथे **अ** चे रूपांतर **य** करून संहितेत दिलेले आहे. उदा : **आ**सी हा शब्द **या**सी असा रूपांतरित केला आहे. अशा अक्षरांचे पोथीतील मूळ लेखन तळटीपेत नमूद केले आहे.

३. तसेच, **अ** साठी जेथे **य** वापरला आहे तेथेही वरील प्रमाणेच धोरण स्वीकारले आहे. उदा : '**य**भिळाषु' हा शब्द '**अ**भिळाषु' असाच संहितेत घेतला आहे.

४. पोथीत **ऐ**क (एक-साठी), **ऐ**से, असे जेथे लिहिले आहे तेथे **ए**क, **ऐ**से अशीच रूपे संहितेत दुरुस्त करून घेतली आहेत. त्यांचेही मूळ लेखन तळटीपात दिले आहे.

५. **ख** साठी जेथे **ष** असेल तेथे **ख** च स्वीकारला आहे.

६. **स्छ**, **ज्ञ**, व **ष्ल** ही अक्षरे **स्थ**, **ग्न** व **ष्ण** अशी आधुनिक पध्दतीने दुरुस्त करून लिहिली आहेत. अर्थात, त्यांचे मूळ लेखन तळटीपात नमूद केलेले आहेच.

सकळ संकेत

या पोथीची नमुना प्रत, म्हणजे ज्या पोथीवरून ही पोथी नकललेली असेल ती पोथी सकळ लिपित लिहिलेली असावी. तिच्यावरून बाळबोध लिपीत नकलताना मूळातील सकळ संकेताच्या अनेक खुणा या पोथीत शिल्लक राहिलेल्या आहेत. पुढील काही उदाहरणे पाहा :

ड् (द्र)व्य—१·१८; २·१७; १६·१६; नीड्रा (द्रा)—१९·७; मा**ळौ**(गौ)ता—१९·२०; खाड(द)ली—२२·२२; **था**(ठा)ईं—५२·४; ७४·८; **यो**(को)न्ही—४५·२१; **था**(ठा)य—१५·२०; ८२·६; प्र**ढा**(धा)नु—५५·१२; **ग**(ल)ग्न—५९·१५, २०; **ळ**(ग)रूडापासि—८३·१४; **स**(अ)संभाव्य—१५७·३ इत्यादी.

या सकळ संकेताच्या खुणांवरून असेही म्हणता येणे शक्य आहे की, नमुनाप्रत ही बाळबोध लिपीतच असावी. पण तिची नकल करताना, प्रतलेखक महानुभाव असल्यामुळे व त्याचा सकळ संकेताशी नित्य परिचय असल्यामुळे, वरील अक्षरे लिहिताना त्याच्याकडून त्या त्या ठिकाणी चुकीने सकळ संकेताची अक्षरे पडली असावीत. ज्या बाळबोध नमुनाप्रतीवरून ही प्रत नकलली त्या प्रतीतही त्या त्या ठिकाणी ही सांकेतिक अक्षरे पडली असावीत, हे अनुमान नाकारता येणार नाही हे खरे. पण चुकून सकळ संकेत अक्षरे

लिहिली जाण्यापेक्षा मूळ सकळ लिपीतील पोथीचे लिप्यंतर करताना वरीलप्रमाणे काही ठिकाणी मुळातील सकळ संकेताची अक्षरे नकलली गेली, त्याचे बाळबोध लिप्यंतर करण्याचे राहून गेले, ही शक्यता मला अधिक वाटते. आपल्या प्रमाणपोथीत जेथे जेथे सकळ संकेतातील अक्षरे लिहिली गेली आहेत तेथे तेथे त्यांचे बाळबोध वाचन करून ती संहितेत स्वीकारली आहेत. त्यांचीही त्या त्या ठिकाणची मूळ संकेताक्षरे तळटीपात नमूद केली आहेत आणि त्याच ठिकाणी त्या त्या सकळ संकेताचे बाळबोध रूप कंसात दिले आहे.

लेखनदोषदुरुस्ती

प्रतिलिपी करीत असताना नकलकाराच्या हातून जे दोष घडले आणि जे त्याच्या लक्ष्यात आले ते त्याने स्वतःच दुरुस्त केले आहेत. या दुरुस्तीसाठी त्याने पुढील रीतीचा अवलंब केलेला आहे.

(१) एखादे अक्षर, शब्द किवा वाक्य चुकून लिहिले गेले असल्यास त्यांच्या सूचना केली आहे. उदा : पो. पा. ४ वर **क**यक, उ**प**द्यम असे शब्द आलेले आहेत. पहिल्या शब्दातील आरंभीच्या **क** वर आणि दुसऱ्या शब्दातील **प** वर टिंबे देऊन ती वगळली आहेत. अर्थात, तेथे **यक**, **उद्यम** असे शब्द वाचावे, हेच सूचित केले आहे. पो. पा. ७९ वर अशा रीतीने अनेक शब्द व वाक्ये वगळल्याची चिन्हे आहेत.

(२) काही ठिकाणी, आज आपण करतो त्याप्रमाणे, नको असलेले अक्षर, शब्द किंवा वाक्य यावर आडव्या रेघा ओढून ती खोडली आहेत. पो. पा. १०, ७८ इत्यादीवर अशी उदाहरणे आढळतात.

(३) नको असलेला काना, त्याच्या मध्यातून डावीकडे तिरपी रेघ काढून खोडलेला आहे.

(४) नको असलेली मात्रा, तिच्यावर आडवी रेघ ओढून खोडली आहे.

(५) लिहिताना सुटलेल्या अक्षरांच्या ठिकाणी काकपद चिन्ह करून पुढे ती कंसात दिली आहेत. उदा : सांगि ⅄ ला (त); करीतु ⅄ ससि (आ); याचा अर्थ असा की हे शब्द, सांगितला, करीतु आससि—असे वाचायचे.

(६) क्वचित सुटलेले शब्द किवा वाक्य, त्या ठिकाणी काकपदचिन्ह करून समासात लिहिलेली आहेत.

(७) काही ठिकाणी सुटलेला काना तेथेच मागाहून दिलेला आहे.

(८) लिहिताना लेखकाकडून काही ठिकाणी चुकून वर्णविपर्यय झाला आहे. त्याठिकाणी त्याअक्षराच्या शिरोरेषेवर आडवीरेषा देऊन, ती अक्षरे वर्णविपर्यय करून वाचण्याची सूचना केली आहे. उदा : त्रीरा; ढोराला याचा अर्थ असा की, त्रीरा या अक्षरांचा विपर्यय

अनुक्रमणिका

करून 'रात्री' असे वाचावे. दुसऱ्या शब्दातील **रा ला** यांचा विपर्यय करून ढो**लारा** असे वाचावे.

लेखकाने स्वतः दुरुस्त न केलेले लेखनदोष

नमुना प्रतीवरून नक्कल करीत असताना लेखकाकडून झालेले दोष त्याच्या लक्षात आल्यावर त्यानेच वरीलप्रमाणे केलेल्या दुरुस्त्यांची अशी अनेक उदाहरणे या पोथीत आहेत; पण त्याच्याकडून नकळत झालेल्या, लेखनदोषांचे काय? संहितासंपादकाने ते दुरुस्त करून घेतले पाहिजेत, असे मला वाटते. असे नकळत घडलेले दोष बहुतेक हस्तलिखितांत आढळतात. म्हणूनच प्रतिलिपी करणारा लेखक आपल्या प्रतीच्या शेवटी 'यदक्षरपदभ्रष्टं मात्राबिंदुविवर्जितम् । तत्सर्वं क्षम्यताम्–' हा श्लोक लिहून क्षमा मागत असतो. नक्कल करताना आपल्याकडून काही अक्षरे, पदे, मात्रा, बिंदु (अनुस्वार) वगैरे सुटलेले असण्याचा संभव तो स्वतःच बोलून दाखवतो. त्यासाठी त्याने क्षमा मागितलेली असली तरी वाचताना किंवा त्यावरून पुन्हा प्रतिलिपी करताना हे दोष दुरुस्त करून घेण्याची सूचनाच तो करीत असतो, हे लक्ष्यात घेतले पाहिजे. आपल्या पोथीतही असे अनेक लेखनदोष झालेले आहेत. ते लेखनाचे 'दोष'च आहेत हे लक्ष्यात येण्यासाठी एक सुंदर उदाहरण आपल्या पोथीत आढळते. प्रस्तुत पोथीतील ७८ व्या पानावरील आरंभीच्या दहा ओळीतील मजकूर ७९ व्या पानावर पुन्हा नकलला गेला आहे. नमुनाप्रतीवरून नक्कल करीत असताना अनवधानाने हे घडले असेल यात शंका नाही. म्हणूनच ७९ व्या पानावर पुन्हा नकलला गेलेला मजकूर त्या ओळीवर टिंबे देऊन लेखकाने वगळला आहे. या दोन्ही पानांवर दोनदा नकललेला हा मजकूर नमुनाप्रतीतील एकाच पानावरून नकललेला गेला असला पाहिजे, यात शंका नाही. त्या एकाच पानावरील हा मजकूर दोनदा नकलताना लेखकाकडून लेखनदोष कसे घडले हे अभ्यासण्यासारखे आहे. त्यासाठी या दोन्ही पानावरील हा मजकूर उध्दृत करतो.

पान ७८

आसें : म्हणें हा सरोवरौ वं माझ...... स्छान तुम्ही डहुळीत असा ससें म्यां राखण ठेवीलें असती : तरि तु या सरोवरा आजीहोउनी न यावें : जरी येसील तरि आपुलें केलें पावसी : तरि तुवां न यावें : आम्ही सांगौनि उतराई : ॥ उंक्तं च ॥ परेशामात्मनश्चैवव यो विचार्ये बळा बळा : म्हणें मी आजीलागौनि यश कारियार्थे वततो मोहात् : पदापदं स गछति : ॥ १७ ॥ तेधवां चतुरदंतु हस्ती भ्याला म्हणो मी आजीलागौनी ये सरोवरि न यें : मग ससें सुखीये जालें । म्हणौनि समर्थु राजा करावा : ऐसें काउळ म्हणें : या डुडुळाचेनि कोण कारिये होववैल : ॥ : उक्तं च : ॥ समर्थप्रतिमप्राप्य कुतोपी वचणं सुखं : ॥ : १ उभावपि क्षयं प्राप्तौ

पान ७९

असें । म्हणे ह सरोवरू माझे [यत स्छान तु]म्ही डहुळीत असा ससें म्यां राखण ठेवीलें असती : तरि तु या सरोवरा आजीहोउनी यावें । जरि येसील तरि आपुलें केले पासील : तरि तुवा न यावें । आम्ही सांगौनि उतराई : ॥ उक्तं च : ॥ : परेशामात्मनश्चैव व यो विचार्ये बळाबळा : ॥ : कार्येर्थे यततो मोहात् दापदं स गछती : : ॥ १७ ॥ तेधवा चतुर्दंतु मणी भ्याला : म्हणे मी आजीलागौनि ये सरोवरि न ये : मग सशें सुखीय जालें : म्हणौनि समर्थु राजा करावा : ऐसें काउळा म्हणें : या

डुडुळाचेणि कोन कार्ये हववैल : ॥ : उक्तं च : ॥ समर्थ प्रतिमप्राप्य कुतोपी वचणं सुखं : ॥ उभावपि क्षयं प्राप्तौ...........:

या दोन्ही पानांवरील उताऱ्यांत आलेल्या संस्कृत श्लोकांच्या शुद्धाशुद्धतेचा विचार या ठिकाणी कर्तव्य नाही. आपण गृहीत धरून चालू की नमुनाप्रतीच्या पोथीत सुद्धा हे श्लोक असेच अशुद्ध स्वरूपात लिहिलेले असतील. पण त्यावरून नक्कल करताना झालेले हस्तदोष विचारात घेतले पाहिजेत. पहिल्या उताऱ्यातील ‘उक्तं च’ या शब्दातील **उ** वर एक निरर्थक अनुस्वार पडला आहे. त्या श्लोकाच्या दुसऱ्या चरणात आलेला ‘कारियार्थे’ हा शब्द दुसव्या उताऱ्यात ‘कार्येर्थे’ असा नकललेला आहे. पहिल्यात ‘पदापदं’ शब्द आहे तर दुसऱ्यात ‘दापदं’ आहे. तसेच पहिल्यातील ‘गछति’ या क्रियापदातील ऱ्हस्व ‘ति’ दुसऱ्यात दीर्घ झाली आहे.

दोन्ही पानांवरील मराठी मजकुराच्या नकलांत आढळणारा फरक पुढे देतो.

आसें	**असें**	तेध**वां**	तेध**वा**	सुखी**ये**	सुखी**य**
म्ह**णें**	म्ह**णे**	चतुर**दं**तु	चतु**र्दं**तु	काउ**ळ**	काउ**ळा**
हा	**ह**	**हस्ती**	**मणी**	को**ण**	को**न**
सरोव**रौ**	सरोव**रू**	म्हणो	म्ह**णे**	का**रिये**	का**र्ये**
न यावें	यावें	लागौ**नी**	लागौ**नि**	**हो**ववैल	**ह**ववैल
पाव**सी**	पा**सी**ल	न **यें**	न **ये**		
तु**वां**	तु**वा**	स**सें**	स**शें**		

एकाच नमुनापोथीवरून एकाच लेखकाने, किंचित कालांतराने पण एकाचवेळी नकललेल्या या दोन उताऱ्यांतील फरक मोठा उद्‌बोधक आहे. प्रथम नकललेल्या उताऱ्यातील ‘आजीहोउनी **न** यावें’ या वाक्यातील महत्त्वाचा **न** शब्द दुसऱ्या उताऱ्यात गळाला आहे. पहिल्यातील ‘पावसी’ हे क्रियापद दुसऱ्यात ‘पासील’ असे झाले आहे. यावरून असे वाटते की, नमुनापोथीत ‘पावसील’ हे रूप असावे. पहिल्या नकलेत त्यातील **ल**, तर दुसऱ्या नकलेत **व** गळाला आहे. पहिल्यातील ‘सरोवरौ’ हे रूप दुसऱ्यात ‘सरोवरू’ असे झाले आहे. नमुनाप्रतीतील पाठ कोणता असावा? ‘सरोवरू’ हा मूळ पाठ असावा असे वाटते. ‘चतुरदंतु’ ‘कारिये’ हे पहिल्या नकलेतील शब्द दुसऱ्यात ‘चतुर्दंतु’ ‘कार्ये’ असे संस्कृत झाले आहेत. मुळात ते असे संस्कृत असून पहिल्या नकलेत लेखकाने ते आपल्या उच्चारपध्दतीप्रमाणे लिहिले असतील काय? याशिवाय आसें—असें, काउळ—काउळा या शब्दांत कुठे तरी काना गळाला. म्ह**णें**—म्ह**णे**, तु**वां**-तुवा, तेध**वां**—तेध**वा**, न यें—न **ये** यातील दुसऱ्या नकलेत संबंधित अक्षरावरील अनुस्वार गळाले आहेत **हा—ह** यातील दुसऱ्या ह चा काना गळाला, तर **हो**ववैल—**ह**ववैल यातील दुसऱ्या **ह** चा काना व त्यावरील मात्राही गळाली आहे. सुखी**ये**—सुखी**य** यात एका **य** वरील मात्रा गळाली असावी किंवा एकावर जास्तीची मात्रा दिली गेली असावी. पहिल्या उताऱ्यातील स**सें** हा शब्द दुसऱ्यात स**शें** असा लिहिला आहे, हेही लक्ष्यात घेण्यासारख आहे.

पहिल्या उताऱ्यातील आणखी एक मौज नमूद करण्यासारखी आहे. त्यात ‘म्हणें मी आजीलागौनि यश’ हे शब्द प्रथम लिहून ते खोडले आहेत. ते वाक्य पुढे आलेले आहे. लेखकाने चुकीने ते लिहिले. चूक

अनुक्रमणिका

लक्ष्यात आल्यावर खोडले. पुढे योग्य ठिकाणी ते पुन्हा लिहिले. त्यात पहिल्यातील ‘म्हणें’ वरचा अनुस्वार गळाला, इतकेच नाही तर **णे** ला अनावश्यक काना जोडून त्याचे ‘म्ह**णो**’ हे चुकीचे रूप तयार झाले. पहिल्यातील ‘लागौनि’ या शब्दातील **नि** दीर्घ होऊन **नी** झाली. पहिल्यातील **य**, **श** या अक्षरावरून असे वाटते की हे वाक्य त्याने पूर्ण नकललेले असते तर त्यात ‘य शरोवरी’ (ये सरोवरी) असे शब्द आले असते. म्हणजे **ये** वरील मात्रा तेथे गळाली आहे आणि **स** साठी **श** लिहिण्यात आला आहे.

सारांश, नमुनापोथीवरून एक लहानसा उतारा दोनदा नकलताना नकलकारा कडून जवळजवळ सर्व प्रकारचे दोष झालेले आहेत, असे दिसून येईल. ज्या ग्रंथाची एकच पोथी उपलब्ध आहे अशा ग्रंथाची संहिता संपादन करताना मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यासाठी या तुलनात्मक निरीक्षणाचा चांगला उपयोग होईल.

संहितेतील लेखनदोषदुरुस्ती

प्रमाण पोथीवरून नकलून प्रस्तुत संहिता तयार करताना नकलनवीसाकडून झालेले अनुस्वारांचे उघड दोष दुरुस्त करून घेतले आहेत. उदा : जेथे अनुस्वार गळाले आहेत अशी खात्री झाली तेथे ते अनुस्वार देऊन शब्द लिहिले आहेत. उदा : पीगळीक (पींगळीक), **मा**डले (**मां**डलें), **हि**डतां **हि**डतां (**हिं**डता **हिं**डता), **शा**तीपण (**शां**तीपण), **ची**ता (**चीं**ता), ये**का**तीं (ये**कां**ती), **तो**ड (**तों**ड), राडे (**रां**डे) इत्यादी. क्वचित जेथे उकार, एकार, मात्रा, गळाले आहेत तेथेही ते देऊन शब्द लिहिले आहेत. उदा : लेनी**ल**गडीं (लेनी लु**ग**डीं); **ए**सें (**ऐ**सें) वगैरे. शब्दातील एखादे दुसरे अक्षर जेथे गळले आहे तेथे चौकोनी कंसात ते अक्षर घालून ते तारकांकित केले आहे. जेथे एखादा शब्द किंवा वाक्य चुकून पुन्हा लिहिले गेले आहे तेथे संहितेत ते गाळले आहे. पण या पुनरुक्तीचा किंवा दुबार लेखनाचा तळटीपात आवर्जून उल्लेख केला आहे.

प्रमाण पोथीतील लेखनातील अनुस्वारासंबंधी दुरुस्तीचे जे धोरण मी स्वीकारले त्याचा उल्लेख करणे अवश्य आहे. प्रस्तुत पोथीत स्पष्टोच्चारित अनुस्वार जसे अनेक ठिकाणी दिलेले नाहीत तसे व्याकरणाच्या दृष्टीने अवश्य असलेले अनुस्वारही दिलेले नाहीत. याच्या उलट प्रकारही अनेक ठिकाणी आढळतो. म्हणजे असे की, जेथे व्याकरणाच्या दृष्टीने अनुस्वार मुळीच नकोत तेथेही नकलनवीसाने अनुस्वार दिलेले आहेत. किंबहुना, अनुस्वारांच्या बाबतीत या लेखनात कोणतेही नियम पाळण्यात आलेले नाहीत. तेव्हा संहिता तयार करतांना अनुस्वारांच्या बाबतीत कोणते धोरण स्वीकारावे, हा मोठाच प्रश्न माझ्यासमोर उपस्थित झाला. स्पष्टोच्चारित अनुस्वार जेथे गळले असतील तेथे ते देऊन संहिता तयार करण्याला हरकत असण्याचे कारण नाही. पण इतर गळलेल्या किंवा जास्तीच्या दिलेल्या अनुस्वारांचे काय? अनुस्वार हे अनेकदा व्युत्पत्तीचे किंवा व्याकरणरूपांचे निदर्शक असतात, म्हणून प्रमाण पोथीतील अनुस्वार जसेचे तसे कायम ठेवावे हे धोरण उत्तम, यात शंकाच नाही. पण आपल्या संहितेच्या प्रमाण पोथीच्या बाबतीत मात्र ते स्वीकारणे मला इष्ट वाटले नाही. कारण, या पोथीत एकच शब्द अनेक ठिकाणी लिहिताना त्यावरील अनुस्वाराच्या बाबतीत नियमितपणा आढळतो असे म्हणावे तर तसेही दिसत नाही. उदा : ‘आतां’ हा शब्द काही ठिकाणी ‘आता’ असा निरनुस्वार लिहिला आहे, तर काही ठिकाणी ‘आतां’ असा तत्कालीन व्याकरणसरणीनुसार **तां** वर अनुस्वार देऊनही लिहिला आहे. अनेक ठिकाणी कधी केवळ **आ** वर अनुस्वार देऊन ‘**आं**ता’ असा लिहिला आहे, तर काही ठिकाणी ‘**आंतां**’ असाही लिहिला आहे. म्हणजे, आता, आतां, आंता, आंतां अशी चार रूपे आढळतात. यातील सर्व ठिकाणी बुद्धिपुरस्सर अनुस्वार

दिले असतील असे समजणे चुकीचे होईल. 'आळंकार' या शब्दातील '**आ**'वर अनुस्वार देऊन तो '**आं**ळकार' असाही लिहिला आहे. इतकेच काय, गेला, ठेविला, जेववी, जाळिले, खाता, जाउनि, इत्यादी शब्द या पोथीत काही ठिकाणी **गें**ला, **ठें**विला, **जें**ववी, **जां**ळीले, **खां**तां, **जां**उनि असे लिहले आहेत. म्हणीजे, कीजे, देइजे हे शब्दही पुष्कळ ठिकाणी म्हणी**जें** की**जें**, देइ**जें** असे लिहिले आहेत. 'इज्ज' प्रत्ययाच्या या रूपावर अनुस्वार देण्याचे वस्तुतः काहीही कारण नाही. प्राचीन मराठीत ते आढळतही नाहीत. पण नकलनवीसाने ते दिले आहेत. बरे, या रूपांवर सर्वच ठिकाणी निरपवादपणे त्याने अनुस्वार दिले आहेत असे म्हणावे तर तसेही नाही. म्हणें, सांगें, पुसें, याही रूपांवर, असेच निरर्थक अनुस्वार आले आहेत. यांच्या प्रथमपुरुषी रूपावरच अनुस्वार आहेत असे नाही, इतरपुरुषी रूपांवरही ते आहेत, आणि काही ठिकाणी नाहीतही. अनुस्वारांच्या बाबतीत असा केवळ अनियमितपणाच नाही तर स्वैर प्रकार या पोथीत आहे. अशा परिस्थितीत संहिता सिद्ध करताना या अनुस्वारांच्या बाबतीत कोणते धोरण स्वीकारावे? मूळ पोथीतील अनुस्वारांचा हा गोंधळ जसाचा तसा राहू देणे मला इष्ट वाटत नाहीं. मी संहिता सिद्ध करताना हा गोंधळ काढून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातील मुख्य धोरण असे की, निरनुस्वार किंवा सानुस्वार, अशी भिन्न रूपे आढळत असतील तेथे तत्कालीन प्रमाण ग्रंथांत आढळणारी रूपे स्वीकारून संहिता सिद्ध करायची. उदा : आता, आतां, आंता, आंतां — प्रस्तुत पोथीत आढळणाऱ्या या चारही रूपातून 'आ**तां**' हे प्रमाण रूप स्वीकारून सर्वत्र तेच ठेवायचे. व्याकरणरूपांवरील अनुस्वारांच्या बाबतीतही जेथे अशी रूपभिन्नता आढळते तेथे तत्कालीन भाषेतील व्याकरणाप्रमाणे अनुस्वारयुक्त किंवा निरनुस्वार रूपे प्रमाण मानून त्याप्रमाणे ती अन्यत्र ठेवायची. म्हणजे त्या प्रमाण रूपांनुसार, अन्यत्र जेथे अनुस्वार नसतील तेथे ते अनवधानाने गळले आहेत असे समजून तेथे ते द्यायचे, किंवा अनावश्यक अनुस्वार दिले असतील तर ते वगळायचे. अशा अनुस्वारांच्या बाबतीत पोथीचे मूळ स्वरूप व त्यात दुरुस्ती करून सिद्ध केलेल्या संहितेतील स्वरूप लक्षात यावे म्हणून त्यातील महत्त्वाच्या बाबींचा सविस्तर निर्देश करणे अवश्य आहे.

(१) आतां, जेथें, तेथें,—यातील तां वर, **थें** वर, आणि म**ध्यें** या शब्दातील **ध्यें** वर पोथीत काही ठिकाणी अनुस्वार आहेत, काही ठिकाणी नाहीत. संहितेत ते सर्वत्र दिले आहेत.

(२) काही—या शब्दातील **ही** वर सामान्यतः अनुस्वार आढळतो. जेथे तो नाही तेथे दिला आहे. यातील **का** वर बहुधा अनुस्वार नाही. पण जेथे तो आहे तेथे कायम ठेवला आहे.

(३) तु (तू)—या सर्वनामावर बहुतेक ठिकाणी अनुस्वार आहे. जेथे तो नाही तेथे तो अनवधानाने गळला असावा. अशा ठिकाणी अनुस्वार दिला आहे. **मी, आम्ही**—यावर सामान्यतः अनुस्वार नाही. क्वचित, जेथे तो दिलेला आहे तेथे तो कायम ठेवला आहे.

(४) विभक्तिप्रत्ययांवरील अनुस्वारांच्या बाबतीत पोथीत फार अनियमितपणा आहे. तो काढून टाकला आहे. नियमांनुसार जेथे अनुस्वार आहेत तेथे ते कायम ठेवले आहेत. जेथे नाहीत तेथे, ते अनवधानाने गळाले असे समजून, दिले आहेत.

(५) **म, न** या अनुनासिकांवर पोथीलेखकाने अनेक ठिकाणी अनुस्वार दिले आहेत. उदा : रा**णीं** (राजपत्नी), **नां**ही, **नें**म, सुच**नां**, म्ह**णां**वें, इत्यादी. हे अनुस्वार निरर्थक आहेत. ते गाळले आहेत.

याचप्रमाणे **गें**ला, **ठें**विला, **में**ला, **जें**विला, **जां**ळिलें इत्यादी शब्दांत जे अनुस्वार आले आहेत तेही निरर्थक आहेत, म्हणून संहितेत गाळले आहेत.

(६) पुसें, सांगें, म्हणें, असें—या रूपांवर पोथीलेखकाने बहुतेक ठिकाणी, अनुस्वार दिले आहेत. (ते सर्वत्र आहेत असे मात्र नाही). उदा : दमनीकु म्हणें, दमनीकु पु**सें**, करकंटकु सांगें, बगु बैसला अ**सें**—इत्यादी. हे अनुस्वार व्याकरण, व्युत्पत्ति, तत्कालीन लेखन—यांपैकी कोणत्याही दृष्टीने समर्थनीय नाहीत. पोथीलेखकाचे ते स्वैर लेखन आहे. असे अनुस्वार काढून टाकले आहेत. व्याकरणनियमांना (उदा : प्रथमपुरुषी रूपे) जे धरून असतील तेथे मात्र ते कायम ठेवले आहेत.

(७) करूं, देऊं, घेऊं—अशा तुमन्त रूपांवर काही ठिकाणी अनुस्वार आहेत तर काही ठिकाणी नाहीत. संहितेत ते सर्वत्र दिले आहेत. केलेया, गेलेया, अशा रूपावरील अनुस्वारांची स्थिती वरीलप्रमाणेच आहेत. संहितेत ते सर्वत्र दिले आहेत.

(८) कीजे, देइजे, म्हणीजे—या विध्यर्थी रूपातील **जे** वर पोथीत अनेक ठिकाणी अनुस्वार दिला आहे. संहितेत ते गाळला आहे. कारण, तत्कालीन शुद्धलेखन पद्धतीला धरून, अशी निरनुस्वार विध्यर्थी रूपेही पोथीत आहेतच.

(९) वृक्षा**चां** ढोलरी, प्रधाना**चां** घरीं—अशा सप्तम्यंत विशेषणात्मक रूपातील **चा** वर सप्तमीचा निदर्शक म्हणून अनुस्वार देण्याची पद्धती प्राचीन मराठीत आढळते. आपल्या पोथीत असे अनुस्वार काही ठिकाणी आहेत, काही ठिकाणी नाहीत. संहितेत ते सर्व ठिकाणी दिले आहेत.

(१०) आरें, रें—अशा संबोधनावरही पोथीत काही ठिकाणी अनुस्वार दिले गेले आहेत. ते संहितेत गाळले आहेत.

मूळ पोथीवरुन संहिता सिद्ध करताना 'यदक्षरपदभ्रष्टं मात्राहीनं च यद्भवेत्' असे अनवधानाने घडलेले दोष दुरुस्त करून घेतले आहेत. अनवधानाने गळलेल्या अनुस्वरांच्या दोषांचा उल्लेख यापूर्वी केलेला आहे. अक्षरभ्रश, पदभ्रंश जेथे आढळला तेथे तो काढून टाकून मूळ अपेक्षित पाठ त्याठिकाणी संहितेत दिला आहे. या बाबतीत पुढीलप्रमाणे योजना केलेली आहे :—

(१) मूळ मजकुरात जेथे एखादा शब्द किंवा शब्दातील अक्षर गळले असेल तेथे ते चौकोनी कंसात घालून तारकांकित केले आहे. उदा : पा. ४·६; ५·३; ८·२१ पाहा.

(२) मुळात असलेल्या एखाद्या अक्षराऐवजी तेथे दुसरे अक्षर अभिप्रेत असावे. असे जेथे मला वाटते तेथे मूळ अक्षरासमोर माझ्या दृष्टीने अभिप्रेत असलेले अक्षर त्याच्याचपुढे अर्धवर्तुळाकार कंसात दिले आहे. उदा : पा. ६४ वर 'साम**दान** या शब्दातील 'दान' ऐवजी 'दाम' शब्द अर्थात **न** ऐवजी तेथे **म** वाचणे इष्ट आहे असे मला वाटले. म्हणून **न** च्या पुढे **म** हे अक्षर अर्धवर्तुळाकार कंसात दिले आहे.

(३) मूळ पोथी काही ठिकाणी फाटली असल्यामुळे, तसेच पूर्वी फाटलेल्या जागी पोथीसंग्राहकाने चिठ्ठी चिपकवली असल्यामुळे त्या ठिकाणी अक्षर, शब्द किंवा वाक्ये अस्पष्ट आहेत. ती नीट

वाचता येत नाहीत. ती मी काळजीपूर्वक वाचण्याचा प्रयत्न केला आहे. असे शब्द आणि वाक्ये संहितेत चौकोनी कंसात घातलेली आहेत. त्याचा अर्थ एवढाच की, तेथील वाचन निराळे असू शकते हे अभ्यासकांच्या लक्षात यावे. उदा : पा. १७·१०; २१·९; २३·८ पाहा.

(४) मुळात काही ठिकाणी **स** साठी **श** किंवा **ष** अक्षर लिहिले आहे. तेथे ते **स** असे दुरुस्त करुन घेतलेले आहे. मूळ अक्षरासहित तो शब्द तळटीपात नमूद केला आहे.

(५) मूळ पोथी ज्या प्रमाणप्रतीवरून नकललेली आहे ती सकळ संकेत लिपीत लिहिलेली असावी, हे यापूर्वी दाखविलेच आहे. सकळ संकेताचे बाळबोधीत लिप्यंतर करतांना काही सकळ संकेत जसेचेतसे लिहिले गेले. ते बाळबोध लिपीप्रमाणे वाचून संहितेत घेतले आहेत. मूळ पोथीतील संकेताक्षरे तळटीपात नमूद केली आहेत.

(६) सकळ संकेत लिपीतील पोथ्यांत **न—ण** चा घोटाळा फार होतो. बाळबोधीत लिप्यंतर करतांनाही हे घोटाळे राहातात. लिप्यंतर करणारा प्रतकार आपल्या उच्चाराप्रमाणे त्यांचे लेखन करतो. ते बहुजनसमाजातील उच्चारांचे द्योतक असते. म्हणून त्यात बदल केला नाही. फक्त म्हणो**णी**, विचारो**णी** अशी रूपे जी फार थोड्या ठिकाणी आली आहेत. ती म्हणो**नी**, विचारो**नी** अशा याच पोथीत अन्यत्र आढळणाऱ्या लेखनाप्रमाणे दुरुस्त करून घेतली आहेत. जे**णें**-जे**नें**, ते**णें**-ते**नें** ही रूपे मात्र मुळाप्रमाणेच ठेवली आहेत.

५

संस्कृतचे भाषांतर नव्हे—रूपांतर.

प्रस्तुत ‘पंचोपाख्यान’ हे संस्कृत ‘पंचतंत्रा’चे भाषांतर आहे, असे आपण स्थूलार्थाने म्हणत असलो तरी सूक्ष्मार्थाने ते खरे नाही. त्याला भाषांतर न म्हणता ‘रूपांतर’ म्हणणे अधिक योग्य होईल. भाषांतरात किंवा अनुवादात मूळ ग्रंथाच्या प्रत्येक शब्दाचे मराठीत भाषांतर व्हायला पाहिजे. तसे प्रस्तुत ‘पंचोपाख्याना’त आढळत नाही. या ग्रंथाच्या लेखकाने संस्कृत ‘पंचतंत्रा’ची कोणती प्रत आधाराला घेतली होती हे निश्चित सांगता येत नाही. ‘पंचतंत्रा’चे अतिप्राचीन स्वरूप ‘तंत्राख्यायिके’त आढळते, असे समजण्यात येते. पुढे त्यात भर पडतपडत तिचे परिष्करण होत गेले व त्याला आधुनिक ‘पंचतंत्रा’चे स्वरूप आले. ‘तंत्राख्यायिके’त आधुनिक पंचतंत्रातील आरंभीचे ‘अजातमृतमूर्खेभ्यो—’ ‘अनन्तपारं किल शब्द शास्त्रं’ इत्यादी श्लोक मुळीच नाहीत. ते पूर्णभद्राच्या पंचतंत्रात आहेत. त्याचप्रमाणे ‘मित्रभेद’ तंत्राच्या आरंभी वर्धमान श्रेष्ठीची कथा सांगताना, आपल्या जवळील धन वाढविण्यासाठी तो विचार करीत असतांनाच्या प्रसंगी धनाचे महत्त्व वर्णन करणारे अनेक श्लोक निर्णयसागर प्रतीत आहेत, तसे ते ‘तंत्राख्यायिके’त आणि पूर्णभद्राच्या ‘पंचतंत्रात’ नाहीत. तेव्हा पूर्णभद्राच्या पंचतंत्रानंतरचे कोणतेतरी संवर्धित संस्करण आपल्या ग्रंथकारासमोर असले पाहिजे. निर्णयसागर प्रत उदाहरणादाखल घेऊन आपण आपल्या ग्रंथकर्त्याने केलेल्या भाषांतराचे स्वरूप पाहण्याचा प्रयत्न करू.

निर्णयसागर प्रतीत महिलारोप्य नगरीचा राजा अमरशक्ति, याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. ‘तत्र सकलार्थिकल्पद्रुमः प्रवरमुकुटमणिमरीचिमञ्जरीचर्चितचरणयुगुलः सकलकलापारंगतोऽमरशक्तिर्नाम

राजा बभूव' (हीच विशेषणे पूर्णभद्र प्रतीत आहेत. शिवाय 'सकलार्थशास्त्रविशारदः' हे विशेषण अधिक आहे. 'तंत्राख्यायिके'त त्याहून अधिक विशेषणे आहेत). याचे भाषांतर आपल्या 'पंचोपाख्यान' कर्त्याने 'तिय नगरी आम्रसीहं राजा राज करि : तो सकळ सास्त्रें जाणे' एवढेच केले आहे. यात पूर्णभद्रप्रतीतील 'सकलार्थशास्त्रविशारदः' या विशेषणाचा भावार्थ मात्र आला आहे. इतर विशेषणांचे रूपांतर लेखकाने केले नाही. कारण, त्याला शब्दशः भाषांतर करायचेच नव्हते. 'पंचतंत्रा'तील कथा सुबोध भाषेत मराठीत सांगणे एवढाच त्याचा हेतू दिसतो. याची अनेक उदाहरणे देता येतील. पण, ग्रंथकर्त्यासमोर असलेले 'पंचतंत्र' निश्चित कोणते हे माहीत नसल्यामुळे संस्कृतातील गद्याची त्याने केलेली रूपांतरे तपासून पाहता येत नाहीत. केवळ नमुना म्हणून, इतर पंचतंत्रातील एक उदाहरण वर दाखविले आहे.

तथापी, त्याच्या भाषांतराचे किवा रूपांतराचे स्वरूप 'पंचतंत्रा'तील पद्यांच्या किंवा श्लोकांच्या त्याने केलेल्या भाषांतरावरून पाहाता येणे शक्य आहे. कारण, ते संस्कृत श्लोक त्याने आपल्या ग्रंथातच उध्दृत केलेले आहेत. त्या दृष्टीने पाहाता काय दिसून येते ते पाहू.

पहिली गोष्ट अशी की, मूळ संस्कृत ग्रंथातून त्याने स्वतःच उध्दृत केलेल्या प्रत्येक श्लोकाचे त्याने भाषांतर केले आहे असे नाही. उदा : 'अनन्तपारं किल शब्दशास्त्रं'— (तंत्र १·३) या श्लोकाचे भाषांतर नाही. तंत्र १, श्लोक ५-१२ या श्लोकांचेही भाषांतर केलेले नाही. या श्लोकांचा भावार्थ 'द्रव्यावाचौनि पुरुशु काही नाहीं' असा दोन ठिकाणी सांगितला आहे. (पा. २. ओ. १८; पा. ३. ओ. १५). तंत्र १, श्लोक ६०, ६१, ६८, ९१,) इत्यादी श्लोकांची ही भाषांतरे नाहीत. अशी पुष्कळ उदाहरणे देता येतील.

प्रत्येक श्लोकाचे भाषांतर न केल्यामुळे काही श्लोक या गद्य पंचोपाख्यानातील मजकुराचे अविभाज्य अंग बनले आहेत. उदा : 'उक्तं च। आकारैरिङ्गितैर्गत्या—' म्हणौनी जे काळीं जें बोलों ये—तें मी जाणत आसें' (पा. ६, ओळ ११-१४) येथे संस्कृत श्लोकाचे भाषांतर नसल्यामुळे जणु दमनक हा संस्कृत श्लोक म्हणतो असे मानावे लागते. एरवी तेथील 'म्हणौनी' या शब्दाची पूर्वसंगती लागत नाही. तंत्र १, श्लोक २६ च्याही बाबतीत तसेच झाले आहे. या संस्कृत श्लोकात गुह्य कोणाकोणाला सांगावे, ते सांगितले आहे. त्याचे भाषांतर करून मग 'ईतुकाप्रती गोप्य सांघावे' असे म्हणणे योग्य झाले असते. आहे या स्थितीत, गद्य पंचोपाख्यानात हा संस्कृत श्लोकच जणु दमनकाने म्हटला, असे मानावे लागते. असे या ग्रंथात अनेक ठिकाणी झाले आहे.

काही ठिकाणी संस्कृत श्लोकाचे भाषांतर न करता त्यातील भावार्थ तेवढा एखाददुसऱ्या वाक्यात लेखकाने सांगितला आहे. उदा : तंत्र १, श्लोक १ याचे संपूर्ण भाषांतर नाही, पण त्याचा भावार्थ 'ऐसें सकळ शास्त्राचें सार काढौनि पंचोपाख्यान रचिलें :' (पा. २, ओळ ३). तंत्र १, श्लोक ११८ या श्लोकाचाही संपूर्ण अर्थ न देता 'जयाचा भृत्यु स्वामीसी आपती कांमा न ये : तो भृत्यु नरकातें पावे' असा भावार्थ मोजक्या शब्दांत सांगितला आहे. तंत्र ४, श्लोक ५५ या अश्लील श्लोकाचा भावार्थही न देता 'स्पष्टार्थ जाणावा' (पा. १३८, ओळ ६) असे सांगण्यात लेखकाने औचित्य प्रगट केले आहे यात शंका नाही.

वरच्यासारखे काही अपवाद सोडले तर मूळ संस्कृत श्लोकांची रूपांतरे लेखकाने चांगली केली आहेत, असे म्हणण्यास हरकत नाही. उदा : तंत्र १, श्लोक ३१ चे रूपांतर पाहावे. 'येथे दृष्टांतु' असे स्पष्टीकरण केल्याने तर रूपांतराच्या सुबोधतेत भर पडली आहे. उदाहरणे देऊन जागा अडवण्यात अर्थ नाही. अभ्यासकांनी श्लोक व त्याचे लेखकाने केलेले रूपांतर या दृष्टीने पारखून पाहिल्यास त्यांना याचा

प्रत्यय येईल. अर्थात, सर्वच ठिकाणी रूपांतरे बरोबर झाली आहेत असे नाही. उदा : 'शत्रुणा योजये**च्छत्रुं**' याचे रूपांतर 'शत्रु जो तो मोटें तिक्ष्ण शस्त्रेंकरौनी उन्मळावाः' (पान ११८·१५) यात 'शस्त्रेंकरौनीं' हे रूपांतर चुकीचे आहे. 'शत्रु' साठी 'शस्त्र' हा शब्द योजण्यात चूक झाली आहे. 'पूर्वमेव मया ज्ञातं' —तंत्र १, श्लोक ३२, या श्लोकाचा अर्थ करण्यातही अशीच चूक झाली आहे. 'अनुप्रविश्य विज्ञातं' याचा अर्थ 'त्या दुंदुभीच्या आत प्रवेश केल्यावर' असा आहे. रूपांतरकाराने 'माहारंण्यामध्यें प्रवेसौनि' असे रूपांतर केले आहे, ते बरोबर नाही. मूळ श्लोकाचा अर्थ या रूपांतरात नीट उतरलेला नाही. 'पादशौचन पितरः' (तंत्र १, श्लोक ५४) यातील 'पादशौचेन' चे रूपांतर '**पदार्थ** केलेयां' हेही असेच चूक होय. 'उत्क्षिप्य टिटिभः पादावास्ते भङ्गभयाद्दिवः' (तंत्र १, श्लोक १३७) याचे रूपांतर 'टिटभ आकाशाआंत उडौनि पायां स्थीरू होत आसे : पक्षासि भंगु करित नाहि : ऐसा गर्वु तयासी आसे' असे केले आहे. तेही चुकीचे आहे. मूळ श्लोकाचा अर्थ रूपांतरकाराच्या लक्षात आला नसावा असे यावरून दिसते.

अशा काही गोष्टी सोडल्या तर संस्कृत श्लोकांचे रूपांतर समाधानकारक झाले आहे असे म्हणायला हरकत नाही. शब्दानुसारी भाषांतर नव्हे, तर रूपांतर, भावार्थ निवेदन हे त्याचे ध्येय होते असे त्यावरून दिसते. सुबोधता हा या रूपांतराचा प्रमुख गुण होय.

मुद्रित गद्य संहिता आणि निर्मळ पाठकाचे पंचोपाख्यान—

निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानाचा परिचय करून देताना, त्यातील कथा व आपल्या प्रस्तुत पंचोपाख्यानातील कथा यांचे तुलनात्मक निरीक्षण यापूर्वी केलेले आहे. त्यावरून लक्षात आले असेल की, इतर कवींच्या पंचोपाख्यानापेक्षा निर्मळ पाठकाचे पंचोपाख्यान व प्रस्तुत मुद्रित संहिता यांत विशेष साम्य आहे. या दोन्ही ग्रंथांतील कथांमध्ये काही कमीअधिकपणा आहे यात शंका नाही. पण या कमीअधिकपणापेक्षा साम्ये विशेष आहेत, हे लक्षात घेतले म्हणजे आपल्या मुद्रित संहितेची पोथी निर्मळ पाठकासमोर असावी की काय अशी कल्पना मनात येते.— 'पहिली प्रति होती मोकळी । ते वोवीबंधें संकळीली । माहासाक्षेपें नीफजवीलीं । कवी नीर्मळ पाठकें ॥' असे निर्मळ पाठकाने आपल्या पंचोपाख्यानाच्या शेवटी म्हटलेले आहे. 'मोकळी प्रत' म्हणजे 'वोवीबंधात **न** संकळलेली', अर्थात, गद्यात लिहिलेली प्रत. ही गद्य प्रत कोणती, कुणी लिहिलेली, यासंबंधी त्याने काहीही निर्देश केलेला नाही. आपणाला आज दोन मराठी गद्य पंचतंत्रे उपलब्ध आहेत एक प्रस्तुत मुद्रित ग्रंथाची संहिता व दुसरी भावे यांनी 'महाराष्ट्र कवी' मासिकात छापलेले पंचतंत्र, अर्थात, **भा** प्रत. या दोहोंची निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानाशी तुलना केली तर प्रस्तुत मुद्रित प्रतीची संहिता निर्मळ पाठकाच्या समोर असावी असे मानण्याकडे मनाचा कल होतो. पहिली गोष्ट अशी की, ज्या संस्कृत पंचतंत्राच्या आधारे भावे प्रतीतील भाषांतर केले गेले आहे ते पंचतंत्र व आपल्या प्रतीचे मूळ संस्कृत पंचतंत्र ही वेगवेगळी होती, हे त्यात आलेल्या कथांच्यावरून स्पष्ट दिसते, हे पूर्वी दाखविले आहे. त्यामुळे **भा** प्रतीची संहिता निर्मळ पाठकासमोर असणे व तीच त्याने 'ओवी बंधात' संकळित केली असणे संभवनीय वाटत नाही आपली प्रत व निर्मळ पाठकाचे पंचोपाख्यान यांतील कथांवरून या दोहोंच्याही लेखकासमोर एकच संस्कृत पंचतंत्र असावे असे दिसते. त्यामुळे आपल्या पंचोपाख्यानाची संहिता निर्मळ पाठकासमोर असणे अधिक सभवते.

पण याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की, आपल्या या गद्य पंचोपाख्यानातील भाषा, वाक्यरचना, शब्दयोजना यांचे निर्मळ पाठकाच्या ग्रंथातील भाषेशी विलक्षण साम्य आहे. काही उदाहरणे

अभ्यासकांसमोर ठेवतो. आपल्या संहितेतील वाक्ये व नंतर निर्मळ पाठकाच्या ग्रंथातील वाक्ये पुढे नमूद केली आहेत.

१ (मु) राजा पुसे : 'क्षेम आसा?' 'जी : आतां येथौनी'

(नि) 'आतां क्षेम वाटे येथुनि'

२ (मु) हा डोहो कुर्माचीये पुष्टीवरि उदकें पूर्ण आसे : हा कहिच नाटे : तेणें बगें तुज चाळवीलें

(नि) हा डोह कुर्मपुष्टीवरी वसे । उदकें सदोदित भरला असे ।
हा काही केलीया न आटे । त्या बगें तुज चाळवीलें ॥

३ (मु) रायाची कंन्या साता खणाचें दामोदरि : तयावरि केस वाळवीतां देखीली.

(नि) साता खणाचे दामोदरी । रायाची कन्या ते सुंदरी
केश वाळवीतां हो द्वारीं । देखीलें या कोळीयें ॥

४ (मु) त्यासि उलफा लावौनी दिघला : तो प्रत्यहिं प्रातःकाळीं राजदर्शनासी येत असे :

(नि) उलफा लाउनिया तयासि । मग तो प्रत्यहि ये राजदर्शनासी ।

५ (मु) रायाची राजकंन्या सातां खणाचें मंदीरा दामोदरावरी न्हाउनी केस वाळवीत होती :

(नि) तवं एके समई राजकंन्या । उभी होती साता खना ।
दामोदरावरी नीहाळुनी जाणा । केश वाळवी सुकुमार ॥

६ (मु) तवं तो कासउ बाहिर निगाला : दोघां क्षेमाळींगन जालें : येरयेराचीं आष्टांगें निवालीं :

(नि) तव कासव बाहिर येउन । दीधलें क्षेमालींगन । येरायेरां दर्शनें करुन । आष्टांगें हो नीवालीं ॥ (९९९)

७ (मु) मौवाळ मांस लोणीयांऐसें भक्षीतां जीव्हे गुदगुलीया उठती : तरि हें मांस आतां तुटौनि पडैल :

(नि) लोणीयासारखे दीसती । भक्षीतां गुदगुलीया येती । हे आतांचि गलोनि पडती । म्हणोनी सवें हींडत ॥ (११०९)

८ (मु) तुवां न यावें : आम्ही सांगौनि उतराई

(नि) तुम्ही न यावें राजेश्री...... सांगौनी होती उत्तीर्ण

९ (मु) धनदासारिखा भंडारि : शुक्रासारिखा मंत्री : जयाचे हृदइं अमृतसंजीवनी विद्या : तया रावणांसी मोटका संकेतु पुरुला : ईतुकेन वेळू न लगतां राज गेलें : मग नाथीलें निमीत्यें ठेवीती : अमुकाचेनि संगें अमुकें जालें । हें आवधें लटीकें : इस्वरू सानकुळ होये तेधवां वीप्रित तें सुप्रीत होये : पुन्यसंचयो मोटका सरे : ईतुकेनि विलया जातां वेळु न लगे

(नि) धनदासारीखा भांडारी । शुक्रासारिखा मंत्री । जयाचीये मुखपवीत्रीं । संजीवनी विद्या ॥ तया रावणा संकेत पावला । तो वेळ न लगतां नाशातें पावला । आमुकेयाचेनि योगें । आमुकें जालें तें सांगे । पाहतां लटीकेंचि आवघें । इश्वरु एकु सानुकूळ व्हावा ॥ तैसें विपरीताचें सुपरीत । आणि सुपरीताचें विपरीत । पुण्येसंचयो मोटके सरीत । मग

विपरीत भोगावें ॥ (१५०७-१५१०)

१० **(मु)** तव रावो सभा विसर्जौनि राणीवासां आला : तवं राणी कोमाईली देखिली : तवं राजा म्हणे : कां खंति करतेसी :.... तव ते राणी बोलीली : मज आवघड मांडले आसें..... तुम्ही कटकीं गेले होते तै मज थोर अवस्ता लागली असे : तेधवां म्यां हुडेचिये जाखमातेसी नवस नवसीलें होतें : राव गौसांवि सुखें समाधानें येतिल : मग मी रायातें घोडा करौनि पाठीवरि बैसौनि हीसु करवीन :

(नि) राजाने सभा वीसर्जीली । आला राणीवसासी ॥

तव राणी कोमाइली देखीली । राजा म्हणे कांखंति मांडिली ।

.... तव ते राणी बोलिली वचन । .... मज आवघड कारण । माडलें असे तें काये सांगू ॥ राजा म्हणे सांग वीतलें तें । राणी म्हणे कटका गेले होते । तै मज थोर चींता चीतें । सुख न वाटे शरीरीं ॥ या हुडाची जाखमाता । तीयेसी नवस केला होता । रायासी सुखें गावासी येतां । रावची घोडा करीन ॥ आणि तयापाठी बैसोन । तोंडीं कडाळ घालीन । हींसकार शब्दें करून । येईन तुझीया दर्शना । (१७८०—१७८५).

अशी अनेक साम्यस्थळे आहेत. उदाहरणांदाखल केवळ दहांचा या ठिकाणी निर्देश केला आहे. ही साम्यस्थळे पाहाता ज्या मोकळ्या प्रतीवरून निर्मळ पाठकाने आपले ओवीबद्ध पंचोपाख्यान लिहिले ती आपल्या मुद्रित संहितेची तत्कालीन एखादी पोथी असावी, असे वाटल्यावाचून राहात नाही. कदाचित, तत्सदृश अशी दुसरी एखादी प्रत असेल. पण ती आपल्या मुद्रित संहितेच्या परंपरेतील असावी असे वाटते.

दुसरा एक प्रश्न या ठिकाणी उपस्थित करावासे वाटते. निर्मळ पाठकाने 'पहिली प्रति होती मोकळी । ते वोवीबंधें संकळीली' असे म्हटले आहे. त्याचा निश्चित कर्य काय? भावे व पांगारकर यांनी उध्दृत केलेल्या ओवीत 'पहिली' ऐवजी 'पूर्वी' असा पाठ आहे. मी पाहिलेल्या सर्व पोथ्यांत 'पहिली' 'पहिलें' असाच पाठ मला आढळला. यातील 'पहिली' किंवा 'पहिलें' याचा अर्थ 'आधी' असाच केला पाहिजे. ही 'आधी' ची 'मोकळी' म्हणजे 'गद्यात' लिहिलेली प्रत कोणाची? निर्मळ पाठक त्या लेखकाचा निर्देश करीत नाही. कदाचित असे असेल काय की, निर्मळ पाठकानेच पंचतंत्राचे रूपांतर प्रथम गद्यात केले असावे व मग तेच त्याने ओवीबद्ध केले असावे? तसे असेल तर निर्मळ पाठकाचेही एक स्वतंत्र गद्य पंचोपाख्यान असावे असे अनुमान करता येईल. आपल्या मुद्रित संहितेतील गद्य पंचोपाख्यान हेच निर्मळ पाठकाचे होय असे मानता येणे कठीण आहे. कारण, त्याच्या वोवीबद्ध पंचोपाख्यानात काही कथा कमीजास्त आहेत. गद्य मजकूर ओवीबद्ध करताना त्याने स्वतःच हे फरक केले असणे संभवनीय मानता येणे शक्य असले तरच वरील अनुमान टिकू शकेल. त्यासंबंधी आताच काही निश्चित सांगणे शक्य नाही.

६

लेखन व भाषाविशेष : स्वर

१. ऋ आणि ऌ हे दोन स्वर स्वतंत्र रीतीने या ग्रंथात आलेले नाहीत. **ऌ** चा पूर्णपणे लोप झालेला आहे. **ऋ** हा स्वर मात्र आ**मृ**त, **मृ**त्य, भृत्य, **मृ**ग, **कृ**ष्ण, **कृ**त इत्यादी शब्दांत इतर व्यंजनाशी संधी होऊन झालेल्या जोडाक्षरात तो आलेला आहे. 'चिंता**गृ**स्त' या शब्दात **र** या व्यंजनाचा ऋ झालेला

आढळतो. अन्यत्र कधी **ऋ** चा **र** झालेला आहे, उदा. **क्र**त्रिम, **ग्र**हरूप, **घ्र**त, **व्र**क्ष, **व्र**तांत, **व्रं**द, इत्यादी; तर कधी ऋ चा रु झालेला आहे. उदा : **क्रु**पा, **ग्रु**ह, **त्रु**ष्णा, **त्रु**प्ती, **प्रु**थ्वी, **भ्रु**त्य, मा**त्रु** इत्यादी.

२. तत्सम शब्दाच्या आरंभी असलेल्या **अ** चा **आ** झालेला आहे. उदा : आती (सं. अति), **आ**कुळीन, आग्नी, **आ**प्रयोजक, इ. '**असे**' हे तद्‌भव रूप अनेक ठिकाणी '**आ**से' असे लिहिलेले आहे. शब्दांतर्गत अनादि **अ** च्या पुढील प्रक्रिया आढळतात. (१) कधी **अ** चा **आ** होतो. उदा : वा**रा**ह, भ**या**चकित, आ**क्रां**दन, स्फु**राण**, मळी**या**गीरू. (२) कधी **अ** चा **इ** होतो. उदा : अ**पी**मान, म**ळी**यागीरू. (३) कधी **अ** चा **उ** होतो. उदा : आ**पु**ण. (४) कधी **अ** चा **ए** होतो. उदा : रा**क्षे**स, **क्षे**ण, क्षेमा, **क्षे**पणीक.

३. तत्सम शब्दाच्या आरंभीचा **आ** अनेक ठिकाणी **अ** झाला आहे. उदा : **अ**छादी, **अ**छादीले, **अ**पति (सं. आपत्ति), **अ**व्हन (सं. आवाहन), **अ**स्वादीले, इ. शब्दांतर्गत **आ** चाही क्वचित **अ** होतो. उदा : द्र**व्य**वांचौनि.

४. ऱ्हस्व **इ** व दीर्घ **ई** यांच्या लेखनात बराच अनियमितपणा आढळतो. उदा : इष्ट शब्द इष्ट आणि ईष्ट अशा दोन्ही प्रकारे लिहिला आहे. तसेच, उ**चि**त शब्द उ**ची**त असाही लिहिला आहे. अशी उदाहरणे या ग्रंथात पुष्कळ आहेत. काही ठिकाणी शब्दाच्या अंती आलेल्या **इ** चे **अ** मध्ये रूपांतर झालेले आहे. उदा : आग्न (सठ. अग्नि.), प्रची**त**, आति**थ** (सं. अतिथि) इ. काही ठिकाणी श**ब्दां**तर्गत **इ** चाही **अ** झाला आहे. उदा : द**क्ष**ण, जो**त**क (सं. ज्योतिष), उप**ज**वीका, चं**ड**कायेतन, इ.

५. शब्दांतर्गत **उ** चा **अ** झाल्याची उदाहरणे : सा**न**कूळ, पु**र**ष, उ**न्म**ळीला उ**न्म**ळावा, इ. शब्दांतर्गत **उ** चा कधी **ओ**, तर कधी **औ** झालेला आढळतो. उदा : का**पो**स, ग**रौ**ड. अंत्य **उ** चा **अ** होतो. उदा : मृत्य (सं. मृ**त्यु**). '**प**रोहित' शब्दांत आरंभीच्या **उ** चा **अ** झाला आहे.

६. **ए** हा स्वर अनेक ठिकाणी **ये** असा लिहिला आहे. उदा : **य**कवाट, **य**काधा **य**कासन, **यर**, **य**ऱ्हवी, **य**व्हडें इत्यादी. **ऐ**कणे शब्द **आइ**कणे असा लिहिला आहे, तर **जैन** शब्द '**जइ**न' असा लिहिलेला आढळतो.

व्यंजनप्रक्रिया

वि**खो**प या शब्दात सं. वि**को**प शब्दातील **क** ला महाप्राणत्व येऊन त्याचा **ख** झालेला आहे. सुक (सुख) या शब्दातील **ख** चे महाप्राणत्व लोपून त्याचा **क** झालेला आहे. रीघणे, निघणे, सांघणे इ. शब्दांतील घ मधेही असेच महाप्राणत्व आलेले आहे. हे शब्द रीगणे, निगणे, सांगणे, या स्वरूपातही आढळतात. रीगणे व सांघणे या धातूंची रूपे यादवकालीन मराठीचे अवशेष आहेत असे म्हटले पाहिजे. प्रस्तुत ग्रंथाच्या मूळ पोथीत **ख** या वर्णाचे लेखन अनेक ठिकाणी **ष** असे केले आहे, याची चर्चा यापूर्वी आलेलीच आहे.

काही वर्णांना जसे महाप्राणत्व आलेले आहे, तसे काही वर्णातील, विशेषतः **थ** या वर्णातील महाप्राणत्व गेलेलेही आहे. आव**स्ता**, ध्यान**स्त**, **स्ता**न इ. याची उदाहरणे होत. कवण-क**व्ह**ण, कोणी-को**ण्ही**, होणार-हो**ण्हा**र इत्यादी शब्दरूपांतही या प्रवृत्ती दिसून येतात. या ग्रंथात 'रो**ज**न' (२४·३) असा

एक शब्द आलेला आहे. ते संस्कृत 'रोदन' शब्दाचे रूप होय. यात संस्कृत शब्दातील **द** चा **ज** झालेला आहे. **द** चा **ज** होण्याची ही प्रक्रिया ध्वनिशास्त्राच्या दृष्टीने अभ्यसनीय आहे.

ण व **न** या वर्णांच्या लेखनाविषयीही यापूर्वीच निर्देश केला आहे. आर**न्य**, तारु**न्य**, पाहु**ना**, पाहु**ने**र, मा**नी**क, आ**नि**क, पु**न्य**, उडा**न**, जा**नी**तले इत्यादी शब्दातील **न** हा त्यावेळच्या किंवा पोथीलेखकाच्या उच्चारपद्धतीचा द्योतक होय. **य** हा अर्धस्वर असल्यामुळे त्याचा उच्चार **ए** कडे झुकतो. त्यामुळेच 'त्यजणे' हा शब्द **त्ये**जणे असा लिहिला गेला आहे. **त्ये**जावे, **त्ये**जुनि, **त्ये**जीली इत्यादीही त्याचीच रूपे आहेत. **ते**जावा, **ते**जीले, **ते**जती इत्यादी रूपांत **य** चे रूपांतर **ए** मध्ये झालेले आहे. गाइन (गायन), दइता (दयिता) या शब्दांत **य** चे रूपांतर **इ** मध्ये झालेले आढळते. **श-ष-स** या वर्णांच्या लेखनासंबंधीही असेच म्हणता येईल. या वर्णांचे सामान्यतः **स** असे उच्चारांतर व लेखन करणे ही विशेष प्रवृत्ती या ग्रंथात (आणि प्राचीन मराठीत) आढळते. **सी**रोमनी, **सु**क्र, **सी**तळ, **ई**स्वर, **स**नीस्वर, आ**स्व**, अ**स्व**मेध, **स्वा**न, **स्वा**पद, **सू**ळ, **सृं**घार, **सं**का, नी**सं**क इत्यादी शब्दांत मूळ तत्सम शब्दातील **श** चा **स** झालेला आहे. भु**स**न, **सो**डस, अभिळा**स**, **स**डरस, **स**डविधी इत्यादी शब्दांत **ष** चा **स** झालेला आहे. (पुर**श**, पुरु**शार्थ** या शब्दात **ष** चा **श** झाला आहे,) उलट, क्वचित तत्सम शब्दातील **स** चे उच्चारांतर **श** असेही केलेले आढळते. उदा : सह**श्र**.

अनुस्वार

अनुस्वाराच्या बाबतीत आढळणाऱ्या एका वैशिष्ट्याकडे अभ्यासकांचे लक्ष वेधणे अवश्य आहे. या ग्रंथात 'कंन्या' या शब्दातील **कं** वर अनुस्वार दिलेला आहे. उच्चारानुसारी लेखनाचे हे द्योतक होय. संस्कृत 'कन्या' हा शब्द उच्चारतांना आपण 'कन्न्या' असा उच्चारतो' म्हणजे '**या**' वर्णापूर्वीच्या 'न्' चे द्वित्त करून उच्चारतो. (पु**ण्य**, लाव**ण्य** इत्यादी शब्दांचेही उच्चार तसेच करतो). पण हा मूळ तत्सम शब्द जसा लिहिला जातो, त्यात हा वास्तव उच्चार स्पष्ट होऊ शकत नाही. उच्चारासाठी कन्या शब्दातील न चे द्वित्त व्हायला पाहिजे. तसे ते करून त्यातील एक न्, **क** वर्णावरील अनुस्वाराच्या रूपाने दाखविलेला आहे. प्रस्तुत ग्रंथात **कं**न्या शब्दाप्रमाणे अरंण्य, अंन्य, अंन्यावो, अनुपंम्य इत्यादी शब्दांतील जोडाक्षरापूर्वीचे वर्ण अनुस्वार देऊन लिहिले आहेत ते याच हेतूने असले पाहिजेत, यात शंका नाही. संस्कृत 'प्रसन्न' शब्द या ग्रंथात 'प्र**सं**न' असा लिहिला आहे, तोही लक्षात घ्यावा.

प्रमाण मराठीत 'मागे' हा शब्द निरनुस्वार उच्चारला व लिहिला जातो. तशी त्याची रूपे, उदा : मागुता, मागौता इत्यादी या ग्रंथात आहेतच. पण एके ठिकाणी 'मांगुता' असा शब्द लिहिलेला आहे. तो ग्रामीण विभागातील उच्चारप्रवृत्तीचा द्योतक असावा असे मला वाटते. कारण, ग्रामीण विभागात '**मां**गे' असा हा शब्द सानुस्वार उच्चारला जातो. याच्या उलट जुतला, जुतले, जीकवे, जीकसील, माजर, चीच, आथुरला इत्यादी, एरवी सानुस्वार उच्चारले व लिहिले जाणारे शब्द निरनुस्वार लिहिले आहेत. तेही तत्कालीन ग्रामीण उच्चारपद्धतीचे द्योतक असले पाहिजेत अर्थात्, हे लेखन चुकीचे आहे असे मानण्याचे कारण नाही.

जोडाक्षरे

जोडाक्षरातील संयुक्त अक्षरांची स्वरविभक्ति किंवा वर्णविश्लेष करून लिहिण्याची प्रवृत्ती या ग्रंथातील भाषेत अनेक ठिकाणी आढळते. उदा : अस्वल—असवल, अमर्याद—अमरयाद, उपार्जना—

अनुक्रमणिका

उपारजना, पूर्वी—पुरवी, कर्पूर—करपूर, मूर्ख—मुरख, धूर्त—धूरत, कर्कश—करकस, कार्तिक—कारतीक, चतुर्थ—चतुरथ, निर्भर—निरभर, इत्यादी. याच्या उलट प्रकार, चर्ण (चरण), मर्ण (मरण), सुप्रीत (सुपरीत), विप्रीत (विपरीत), कर्वी (करवी), प्राक्रम (पराक्रम), इत्यादी शब्दांत आढळतो. 'क्रमिति' हे रूप 'क**र्मी**ती' असे लिहिताना 'र' चे स्थानांतर झाले आहे. जोडाक्षरातील पूर्व वर्णाचा लोप होऊन केवळ दुसरा वर्ण उच्चारण्याची प्रवृत्ति प्राचीन मराठीत आढळते. या ग्रंथातील उतर (उत्तर), वृधी (वृद्धि), वलभ (वल्लभ), वृध (वृद्ध), उछेद (उच्छेद), मदोन्मत (मदोन्मत), इछावा, ईछति (इच्छ) इत्यादी शब्दांत ती आढळते.

वाक्यरचना

'आमचे पुत्र बद्धीवंत होये' 'तुम्ही कृपा कराल तरी जानते होईल' अशी अनेकवचनी नामांना एकवचनी क्रियापदे योजून केलेली वाक्यरचना या ग्रंथात बऱ्याच ठिकाणी आढळते. 'उद**का**स्थानापासी', 'का**को**उलकीय', 'घ**रा**स्थितीचा' असे काही संधिदोषही आहेत. 'सा मही**ना**मध्ये 'द्रव्यवांचोनि', 'प्र**जा**चेया', 'वा**डा**बाहीर', 'राजसे**वा**वांचोनि' इत्यादी ठिकाणी सामान्यरूपे केलेली नाहीत.

शब्दसंपत्ती

प्रस्तुत 'पंचोपाख्याना'त यादवकालीन मराठीतील अनेक शब्द आळतात. 'अवडळ' 'होते' व 'क्रियापार' हे या ग्रंथात आढळणारे तीन शब्द तर 'लीळाचरित्रा' शिवाय अन्यत्र मला पाहायला सापडले नाहीत. याशिवाय, अवस्वर, अवसरी, अवस्था, उतराई, उखर, चौबारें, जुझ, झळंबणे, टाकणे (पोचणे, प्राप्त करणे), पुडती, पाहानवट, भांबळ, जीयाले, दळवै, देशाउर, धवळे, पडदणी, पाणपणे, राउळ, वाकडी (झड), वाडवेळ, वोळग, वोली, सांचल, हडुती, हातसाहानी असे यादवकालीन अनेक शब्द या ग्रंथात आढळतात. दंती**लु**, अं**तु**, आंत**कु**, प्रधा**नु**, सन्मा**नु**, प्रणिपा**तु** इत्यादी उकारान्त नामे, व विदारी**तु** असे, करी**तु** आसे, झाडी**तु** आसे, खा**तु** असे, इत्यादी उकारांत धातुरूपे; पुरुषाहोउनी (हून), आजीहोउनी, दुरहोउनी अशी पंचमी विभक्तीची रूपे, त्याचप्रमाणे करौ**नि**, टाकौ**नि** अशी भविष्यकालीन प्रथमपुरुषी, अनेकवचनी रूपे, 'मी विश्वासलां' हे प्रथमपुरुषी एकवचनी रूप, व गर्जी**नला**, जागी**नला**, उप**न**ली, **ने**दी, **ने**घे, **ने**घेतांचि, **ने**णु, **नो**हति इत्यादी रूपे पाहिली म्हणजे हा मूळ ग्रंथ फार प्राचीन काळी, साधारणपणे शकाच्या चौदाव्या शतकात लिहिला गेला असला पाहिजे असे अनुमान करण्यास हरकत वाटत नाही.

या ग्रंथात काही अरबी, फार्सी शब्दही आलेले आहेत. उदा : मिस्कीन, ज्वाब (जबाब), फीरादी, भर्वसा, रौय, लाजीमा, सकलाद, हिसेब, दुकान, दीवान, गस्थी (गस्त), खरच (खर्च), वस्तु (अरबी, वास्तह-कडून). पण या शब्दांची संख्या पंधराच्या वर नाही. शिवाय असे काही शब्द तत्कालीन संतांच्या अभंगांतही आढळतात हे विसरता येत नाही. त्यामुळे या ग्रंथाच्या लेखनकालाविषयी केलेल्या अनुमानाला फारशी बाधा येत नाही.

अनुक्रमणिका

संक्षेप

अ.	अरबी.
अ.	अध्याय.
अव.	अनेकवचन.
आ.	पंचतंत्राची आचार्य संपादित प्रत.
उगी.	उद्धवगीता (संपा. : वि. भि. कोलते).
एपि. इंडिका.	एपिग्राफिया इंडिका.
एभा.	एकनाथी भागवत.
एव.	एकवचन.
ओ.	ओळ.
ऋव.	ऋद्धिपूरवर्णन (संपा. : य. खु. देशपांडे).
का.	कानडी.
को.	पंचतंत्राची कोसेनगार्ट संपादित प्रत
कृ.	कृष्णराजाचे पंचोपाख्यान.
क्र.	क्रमांक.
गोप्रच.	श्रीगोविंदप्रभुचरित्र. (संपा. : वि. भि. कोलते).
चोंभा. उह.	चोंभा कविकृत उखाहरण (संपा. : वि. का. राजवाडे).
ज्योरमा.	ज्योतिषरत्नमाला (संपा. : डॉ. पानसे).
तत्रैव.	यापूर्वी उल्लेखिलेला संदर्भ.
देप्रा.	देशीप्राकृत.
दृ.	दृष्टांत.
दृ.	दृष्टांतपाठ.
धवळे.	महदंबेचे धवळे (संपा. : वा. ना. देशपांडे).
नरुस्व.	नरेंद्रविरचित रुक्मिणी स्वयंवर (संपा. : वि. भि. कोलते).
नि.	पंचतंत्राची निर्णयसागर प्रत.
पं. भा.	पंचतंत्र, वि. ल. भावे. प्रत.
पंचो.	पंचोपाख्यान.
पा.	पान.
पा.	निर्मळ पाठकाचे पंचोपाख्यान.
प्रपु.	प्रथम पुरुष.
प्रस्ता.	प्रस्तावना.

अनुक्रमणिका

भा.	वि. ल. भावे संपादित पंचतंत्र.
भाप्र.	भाषाप्रकाश (संपा. : शं. गो. तुळपुळे).
म.	महालिंगदासाचे पंचोपाख्यान.
म.	मराठी.
मु.	प्रस्तुत ग्रंथातील मुद्रित पंचोपाख्यान.
मू.	मूळ पोथी.
मूप्र.	मूर्तिप्रकाश. (संपा. : वि. भि. कोलते).
मोरो.	मोरोपंत.
रुस्व.	रुक्मिणी स्वयंवर.
लं.	लंबक.
लीचए.	लीळाचरित्र, एकांक.
लीच. पू.	लीळाचरित्र, पूर्वार्ध.
लीच. उत्त.	लीळाचरित्र, उत्तरार्ध.
व. क्र.	वही क्रमांक.
वछा.	वछाहरण. (संपा. : वि. भि. कोलते).
शिशु.	शिशुपाळवध (संपा. : वि. भि. कोलते).
सव.	सह्याद्रिवर्णन (संपा. : वि. भि. कोलते).
संपा.	संपादक.
सं. नरुस्व.	संपूर्ण रुक्मिणी स्वयंवर (संपा. : सुरेश डोळके).
सिसूपा. वि.	सिद्धांत सूत्रपाठ, विचार प्रकरण.
स्मृस्थ.	स्मृतिस्थळ (संपा. : वा. ना. देशपांडे).
ह.	पंचतंत्राची हर्टेल प्रत.
हिं.	हिंदी.
ज्ञाने.	ज्ञानेश्वरी (शासकीय आवृत्ति).
ज्ञाने. मा.	ज्ञानेश्वरी (संपा. : माडगावकर).
ज्ञाने. रा.	ज्ञानेश्वरी (संपा. : राजवाडे).
ज्ञाप्र.	ज्ञानेप्रबोध (संपा. : वि. भि. कोलते).

अनुक्रमणिका

पंचोपाख्यान

तंत्र १. मित्रभेद

मूळकथा : पिंगळक सिंह, संजीवक बैल, आणि करकंटक व दमनक कोल्हे

श्रीकृष्णायेन्मा ॥ श्रीदत्तात्रयेन्मा ॥

सकलार्थशास्त्रसारं जगति समालोक्य विष्णुशर्मेदम् ।
तन्त्रैः पञ्चभिरतुलं चकार सुमनोहरं शास्त्रम् ॥ १ ॥

दक्षण देशामध्यें महिळारोप्य [सं. महिलारोप्य. (क्वचित, या नगराचे नाव 'मिहिलारोप्य असे आढळते). 'पंचतंत्रा'च्या ह प्रतीत 'पाटलीपुत्र' असे या गावाचे नाव दिले आहे. 'हितोपदेशा'तही या नगराचे नाव 'पाटलीपुत्र' असे दिले असून ते भागीरथीच्या तीरावर असल्याचे स्पष्ट म्हटले आहे. **भा** प्रतीत 'महिळारोप्य' हेच नाव आहे. **म** प्रतीत महिळारोप्य', **कृ** प्रतीत 'मोहळारोप्य', तर **पा** प्रतीत ते 'महितलापुर' असे दिले आहे. **आम्रसिंह** : महिळारोप्य नगरीतील राजाचे नाव संस्कृत पंचतंत्रात 'अमरशक्ति' असे आहे. ह प्रतीत व 'हितोपदेश' ग्रंथात ते 'सुदर्शन' असे आहे. मराठी **भा** आणि **म** प्रतीत 'अमरशक्ति' हेच नाव आहे, तर कृ प्रतीत ते 'अमरसेन' आहे. **पा** प्रतीत मात्र 'तेथे राजा राज्य करी। आमरावती जैसा' एवढेच म्हटले आहे. याच्या तीन मुलांची नावे आपल्या प्रतीत सुशक्ती, रुद्रशक्ती व अनेकशक्ती अशी आहेत. बहुतेक संस्कृत प्रतीत ती वसुशक्ति, अनंतशक्ति व उग्रशक्ति अशी आहेत (क्वचित बहुशक्ति, उग्रशक्ति, अनेकशक्ति अशीही ती आढळतात) तशीच ती **भा** प्रतीत आहेत. 'वसुशक्ति' हे नाव कृ प्रतीत 'वस्तुशक्ति' तर **पा** प्रतीत 'सुशक्ति' असे लिहिले आहे.] नाम नगर आसें : तिय नगरीं आम्रसीहं राजा राज
करि : तो सकळ सास्त्रें जाणे : तया राजयासि तीघे पुत्र जाले : परंतु ते तीघे मुर्ख :
येकाचें नाम सुशक्ती : रूद्रशक्ती : आनेकशक्ती : ते वडील जाले : परंतु ते मुर्ख :
[राजा मंत्रियासि बोलाउनि म्हणे*] "आम्हामागें राज्य जाईल : तर पुत्र
सुवीद्य होये : ऐसें वीचारिजे : आनीक येक आसे ॥ उक्तं च ॥

अजातमृतमूर्खेभ्यो मृताजातौ सुतौ वरम् ।
यतस्तौ स्वल्पदुःखाय यावज्जीवं जडो दहेत् ॥ २ ॥

म्हणौनी पुत्र नोहे तें बरवें : परि मुर्ख पुत्र कामा न येती : अथवा पुत्र होउनी
तात्काळीक मरे तें बरवें : हे दोन्ही ठाय थोडिया दुखा कारणें : परंतु मुर्ख पुत्र जवं
जीवे तवं तो पितेयाचां देहातें जाळी : म्हणौनी आमचे पुत्र बुद्धीवंत होये तो तुम्ही
उपावो करावा :" ऐसें रायाचें वचन आईकौनी : मग प्रधानें विष्णुश्रमा बोलावीला :
मग राजे तयातें वीनवीलें : "विष्णुशर्मे [मू. ०शर्म्रे.] हो : आमुचे पुत्र मुर्ख जाले : तुम्ही कृपा
कराल तरी जानते होईल : आन तुम्हांसी प्रतदीनीं येकसत सोनये देईन :" ऐसें
रायाचें बोलणें आईकौनी विष्णुशर्मा म्हणे : "राजेया : मी विद्याविक्रयो करित
नाहीं : मज द्रव्यें [मू. 'द्रव्यें'. (सकळ संकेत ड = द).] चाड नाहीं : तुझेनि पुन्यें मज द्रव्य [मू. 'द्रव्य'.] उदंड असें : तरि
राजया :

अनुक्रमणिका

माझी प्रतज्ञां आईक : राया : तुझीया पुत्रा तें सा महीनामध्यें नीतीसास्त्र सकळ जानते करिन : जरि न करीं तरी या [मू. आ.] बोलाचें उनें आसें [माझ्या या बोलण्याला दोष लागेल. उनें : सं. ऊन= कमीपणा, दोष.] :" मग तेणें वीष्णुशर्मेनि ईयें
पांच तंत्रें सृजलीं ॥ प्रथम मीत्रभेदु : मीत्रसंप्राप्ती : काकोउलुकीयं :
लब्धप्रणासन : अपरोक्षित ॥ ५ ॥ ऐसें सकळ शास्त्राचें [या वाक्यात पहिल्या संस्कृत श्लोकाचा सारांश आलेला आहे. 'मित्रभेद' तंत्रातील मूळकथा म्हणजे संजीवक वृषभ व पिंगळक सिंह यांच्यांत दमनीक कोल्ह्याने घडवून आणलेली मैत्री व त्यानंतर त्याने त्यांच्यांत भेद निर्माण करून पिंगळकाकडून संजीवकाचा घडवून आणलेला वध. हा या कथेचा सारांश ओळ १२ व १३ मध्ये आलेला आहे.] सार [मू. शार.] काढौनि पंचोपाख्यान
रचिलें ॥ उक्तं च ॥

> अनन्तपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विद्याः ।
> यत्सारभूतं तदुपासितव्यं हंसैर्यथा क्षीरमिवाम्बुमध्यात् ॥ ३ ॥

म्हणौनी सकळ कळामध्यें सार तें घ्यावें ॥

आतां मीत्रभेदु : राजपुत्राप्रती वीष्णुशर्मा सांगता जाला : ते[थ*] प्रथम श्लोकु ॥ उक्तं च ॥

> वर्धमानो महान्स्नेहः सिंहगोवृषयोर्वने ।
> जम्बुकेनातिलुब्धेन पिशुनेन विनाशितः ॥ ४ ॥

प्रथम सीहें [वृशभेसी*] [मुळात 'सीहे **सीहेसी मैत्रि** वाढवीली' असे आहे. '**सीहेसी**' ऐवजी 'वृशभेसी' हा शब्द तेथे पाहिजे, हे स्पष्ट आहे.] मैत्रि वाढवीली : पीशुन जो जंबुक : तेणें मीत्रभेदु करौनि सीहाकरवी वृशभु मारवीला ॥ "हे कैसी कथा?" राजपुत्र पुसती : वीष्णुशर्मा सांगे :

"परीयसी राजपुत्रा हो : ये महीतळ नाम नगरी ['वर्धन' किंवा 'वर्धमान' नावाच्या या व्यापाऱ्याच्या गावाचे नाव आपल्या प्रतीत 'महीतळ' असे आहे. बहुतेक संस्कृत ग्रंथात 'महिलारोप्य' हे त्या गावाचे नाव आहे. क्वचित ते 'मिहिलारोप्य' असे लिहिलेले आढळते. 'हितोपदेशा'त या नगरीचे नाव 'सुवर्णा' किंवा 'सुवर्णवती' असे आहे. मराठी **भा. म.** प्रतीत 'महिळारोप्य' तर **पा** प्रतीत 'महितलापुर'— असे नगरीचे नाव आहे. **कृ** प्रतीत 'वर्धमान' हेच नगरीचेही नाव दिले आहे. येथील वाण्याचे नाव आपल्या प्रतीत 'वर्धन' आहे. अन्यत्र सर्वत्र ते 'वर्धमान' 'किंवा' 'वर्धमानक' असे आहे. **भा. कृ** आणि **पा** प्रतीत वर्धमान हेच नाव आहे.] : येथें पुर्वी वर्धन नावें वानीया होता : त्यापासि आमरयाद धन होतें : तो जवं रात्रीं पहुडला आसे त्यासी चींता यक उपंनली : जेमज द्रव्य [मू. 'ड्रव्य'. (सकळ **सं**केत ड = द).] बहुसाल आसें : तरी द्रव्येंकरूनि उद्यमेंकरूनी : धन वृधितें पावे तो उद्यम करूं : जेणें आर्थु जोडे तो प्रकारू कीजे : द्रव्यवांचौनि पुरुशु काही नाहीं ॥ उक्तं च ॥

> यावद्भाग्यमहोदयो नहि भवेत्तावन्निरर्थाः गुणाः
> सर्वे वेदविवादवादकविताचातुर्यधैर्यादयः ।
> भाग्ये सत्यपि निर्गुणोऽपि गुणवानग्रेसरो जायते
> मान्यः पूज्य इति क्षितीशभवने भाग्याय तस्मै नमः ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

॥ तथा च ॥

न हि तद्विद्यते किंचिद्यदर्थेन न सिध्यति।
यत्नेन मतिमांस्तमादर्थमेकं प्रसाधयेत् ॥ ६ ॥

॥ तथा च ॥

यस्यार्थास्तस्य मित्राणि यस्यार्थास्तस्य बान्धवाः।
यस्यार्थाः स पुमाँल्लोके यस्यार्थाः स च पण्डितः ॥ ७ ॥

वयोवृद्धास्तपोवृद्धा ज्ञानवृद्धाश्च येऽपरे।
ते सर्वे धनवृद्धस्य द्वारे तिष्ठन्ति किंकराः ॥ ८ ॥

॥ अन्यदपि ॥

यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः स पण्डितः स श्रुतवान्गुणज्ञः।
स एव वक्ता स च दर्शनीयः सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ति ॥ ९ ॥

॥ तथा च ॥

वरं वनं व्याघ्रगजेन्द्रसेवितं द्रुमालयः पत्रफलाम्बुभोजनम्।
तृणानि शय्या वसनं च वल्कलं न बन्धुमध्ये धनहीनजीवनम् ॥ १० ॥

उद्यमं साहसं धैर्यं बुद्धिः शक्तिः पराक्रमः।
षडेते यत्र वर्तन्ते तत्र देवः सहायकृत् ॥ ११ ॥

त्यजन्ति मित्राणि धनैर्विहीनं पुत्राश्च दाराश्च सुहृज्जनाश्च।
तमर्थवन्तं पुनराश्रयन्ति ह्यर्थो हि लोके पुरुषस्य बन्धुः ॥ १२ ॥

म्हणौनी द्रव्यावांचौनि पुरुश काही नाहीं।" ऐसें [मू. 'ऐसें तो विचारोनि' –येथे तो हा शब्द जास्तीचा पडला आहे. तो संहितेत वगळला आहे.] वीचारौनि तो वानीयां
शर्कराचेया उद्यमा नीगाला : गाडा [गाडीला. **गाडा** या शब्दाची द्वितीया. **डा** वर अनुस्वार पाहिजे होता. नंदक व संजीवक हीच बैलांची नावे सर्व प्रतीत आहेत. 'चिंतावृतुट (चिंतावृत्त) होउनि **विचारूं लागला**=विचार करू लागला.] दोघे बैल जुतले : येकाचें नांव नंदकु : येकाचें
नांव संजीवकु : ऐसा मार्गी जातां वानीया यमुना पावला : तवं संजीवकु चीखलांत [मू. ची**ष**लांत.]
गुतला : तेथें आरंण्य वोश : जवळी धन बहुसाल : ऐसा तो वानीया चींतावृतु
होउनि विचारूं लागला ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

न स्वल्पस्य कृते भूरि नाशयेन्मतिमान्नरः ।
एतदेव हि पाण्डित्यं यत्स्वल्पाद्भूरिरक्षणम् ॥ १३ ॥

स्वल्पास्तव बहुत रक्षीजे : हें जाणपणें वीचारौनि तो बैलु वानीयें तेथें सांडिला : आनीक बैलु गाडा जुतला ॥ उक्तं च ॥

पथिच्युतं तिष्ठति दैवरक्षितं गृहासिनं दैवहतं विनश्यति ।
जीवत्यनाथोपि वने विसर्जितः कृतप्रयत्नोपि गृहे न जीवति ॥ १४ ॥

॥ तथा च ॥

वने रणे शत्रुजलाग्निमध्ये महार्णवे पर्वतमस्तके वा ।
सुप्तं प्रमत्तं विषमस्थितं वा रक्षन्ति पुण्यानि पुरा कृतानि ॥ १५ ॥

ऐसा तो संजीवकु दैवास्तव चीखलाबाहीरी हळुहळु नीगाला : ऐसा तो कीतीयेकां दीवसां [मू. 'दीवशा'.] पुष्ट जाला : चहुकडें चरे : सादढ डरे : तेणें नादें गगन गर्जे : तवं तीये वनीचा राजा पींगळीकु सीहुं : सकळां स्वापदासहीत : उदकाकारणें जवं यतो : तवं तेणें त्या बैलाचा भयानकु शब्द आ[इ*]कीला : दृष्टी सांपडली [संपुटाप्रमाणे दृष्टी—डोळ्यांची दोन्ही पाती मिटली. भीतीमुळे पिंगळकाचे डोळे मिटले.] : मनीं भय उपजलें : मग म्हणे : "जया [मू. जआ.] स्वापदाचा शब्दु ऐसा तो केव्हडाक जुझार होईल [केवढा मोठा योद्धा असेल? होईल=असेल. उदा० : 'ह्मणे गार्ग्य गेला नामकरण करूं । तरी तो **होईल** वसुदेवाचा कुमरू' (कृष्णदास श्यामा. श्रीकृष्णचरित्रकथा. ५·१०८. संपा. प्रभुदेसाई व मुंडी). **करकंटक व दमनीक** अशी या कोल्ह्यांची नावे आपल्या प्रतीत आहेत. संस्कृत ग्रंथात ती सर्वत्र 'करटक' व 'दमनक' अशी आहेत. भा. प्रतीतही तीच आहेत. आपल्या प्रतीत काही ठिकाणी **करकंटक** हा शब्द करंकटक असाही लिहिलेला आढळतो.] :" ऐसें म्हणौनी उदक न घेतांचि मागुतां प्रतला : जाउनी आपुली जाळीआंतु रिगाला : ईतुका समईं जुनवटु प्रधानपुत्र : भ्रष्टाधीकार कोल्हे दोघै आसती : येकाचें नावं करकंटकु : एकाचें नावं दमनीकु : तीहीं [त्यांनी (दमनीक व करकंटक यांनी) पिंगळकाला भ्यालेला] पिंगळीकासी भयाचकीत देखौनि : तवं [त्यावेळी करकंटक दमनीकाला म्हणाला. या वाक्यात 'देखौनि तवं' ही वाक्यरचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. **तवं** शब्दाचा उपयोग केला नसता तर चालले असते. 'तवं दमनीकु करकंटकाप्रति बोलता जाला'—याऐवजी मूळ पोथीत 'तवं करंकटकु दमनिकाप्रति बोलता जाला :' असे आहे. हा व यापुढील भाग नकलताना प्रतलेखकाकडून महत्त्वाच्या चुका झालेल्या आहेत. 'मित्रभेद' या कथेचा खलपुरुष दमनक आहे. संजीवक बैलाच्या डरण्याने भयभीत झालेल्या पिंगळक सिंहाजवळ जाऊन त्याला 'भिण्याचे कारण' विचारावे असे दमनकाच्या मनात आले. करकंटकाला वाटत होते की, ही नसती उठाठेव आपण करू नये. याचसाठी त्याने 'कीलोत्पाटी वानरा'ची कथा सांगितली, असे 'पंचतंत्रा'च्या सर्व आवृत्तीत आहे. **भा. म. पा.** कृ प्रतीतही तसेच आहे. आपल्या पोथीतील या भागाच्या नकलेत या नावांची अदलाबदल झालेली आहे ती मुद्रित संहितेत दुरुस्त करून घेतली आहे.] दमनीकु [मुळात 'तवं करंकटकु दमनिकाप्रति बोलता जाला' असे आहे. टीपा पहा.] करकंटकाप्रती बोलता जाला : म्हणे "हा आमचा राजा पींगळीकु : उदकाकारणें सपरिवारि गेला होता : तो मागुतां उदक न घेतांचि भया (य) चकीत जाला : तरि येथें कांही कारण आसें :" तवं करकंटकु [मुळात येथे 'दमनीक' आहे.] म्हणे : "आम्हा तेथे व्यापारू नाही [आम्हाला हा व्यापार, ही उठाठेव करण्याचे कारण नाही. या बाबतीत आपणाला काही कर्तव्य नाही.] : तुज बोलावया काय कारण?"
॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

अव्यापारेषु व्यापारं यो नरः कर्तुमिच्छति ।
स एव निधनं याति कीलोत्पाटीव वानरः ॥ १६ ॥

तवं दमनीकु [मुळात येथे 'करंकटकु' हे नाव आहे] म्हणे : "हे कैसी कथा?" करकंटकु सांघे :

कथा १ *
अव्यापारेषु व्यापार करणारा वानर

"कोन्हे एक नगरीं : येक धनवंत वानीयें : नगराबाहीरी देवळ मांडलें [देऊळ बांधायला घेतले.] : तवं वाढै गांवाआंतु जेवावया गेला : तवं तेथे वानरसमुहु [मू. वानरासमुहु.] आला : कोन्हेकें वानरें फळें खाउं लागलीं [येथे 'वानर' शब्द नपुंसकलिंगी वापरला आहे. पुढील वाक्यात तो पुल्लिंगी वापरला आहे. (वानरू.....हालउं लागला).] : कीतीक क्रीडा करूं लागलीं : तवं तेथें यकु वानरू पाटीवरी बैसौनी खीळी हालउं लागला : हालवीतां खीळी हातासी आली : वृखण मध्यें सीरलें : त[वं*] वानरू कळ लागुनी मेला :

म्हणोनी आ (अ)व्यापारिं व्यापारू करूं न ये" ॥ उक्तं च ॥

अव्यापारेषु व्यापारं यो नरः कर्तुमिच्छति ।
स एव निधनं याति कीलोत्पाटीव वानरः ॥ १७ ॥

दमनीकु म्हणे : "कर[कं*]टका : तुं काय जाणसी? राजसेवावांचौनी [अव्यय जोडण्यापूर्वी 'राजसेवा' शब्दाचे सामान्यरूप केलेले नाही. हे रूप पुढे ८ व्या ओळीतही आलेले आहे.] पुरुषधर्म नाही ॥ उक्तं च ॥ [वानराची कथा संपल्यानंतर संस्कृत 'पंचतंत्रा'च्या सर्व प्रतीत दमनिकाचे उत्तर आहे की, 'कर(कं)टका, तुला राजधर्म कळत नाही' इत्यादी. आपल्या पोथीत वानराच्या कथेचा मूळ श्लोक कथेच्या शेवटी पुन्हा आल्यानंतर, म्हणजे श्लोक १७ नंतर, 'अपि च' असे म्हणून राजधर्माचे एक अंग स्पष्ट करणारा 'राजमातरि देव्यां च—', हा श्लोक आलेला आहे. त्याचा संबंध येथे जुळत नाही. मला असे वाटते की, या ठिकाणी प्रथम 'दमनीकु म्हणे : करकंटका तू काय जाणसी' असे वाक्य असावे व त्यानंतर राजनीतीचे वर्णन असावे. म्हणजे कथानकाच्या भागाचा सर्व संबंध योग्य जुळतो. त्यादृष्टीने योग्य ती दुरुस्ती करून संहिता निश्चित केलेली आहे.]

सुहृदामुपकारकारणात् द्विषतामप्यपकारकारणात् ।
नृपसंश्रय इष्यते बुधैर्जठरं को न बिभ्रर्ति केवलम् ॥ १८ ॥

राजसेवा करौनिया सोईरेयां उपकार कीजे : वैरी नीर्दाळीजे : हे दोघै प्रकारू नेणे तो मातेचां उदरा वांयां आला : पोट काय स्वांनें न भरिती? परि राजसेवावांचौनि पुरुशधर्मु नाही ॥

अप्रधानः प्रधानः स्यात्सेवते यदि पार्थिवम् ।
प्रधानोप्यप्रधानः स्याद्यदि सेवाविवर्जितः ॥ १९ ॥

जरी रायाची सेवा कीजे तरि आ (अ) प्रधानु तो प्रधानु होये : जया प्रधानासी राजाची सेवा नाही तो पदावेगळा होये ॥ अपि च ॥

अनुक्रमणिका

राजमातरि देव्यां च कुमारे मुख्यमन्त्रिणि ।
पुरोहिते प्रतीहारे वर्तितव्यं नृपे यथा ॥ २० ॥

तरी रायाची माता : रायाची राणी : रायाचा पुत्रु : रायाचा मुख्य मंत्री : रायाचा प (पु) रोहीत : रायाचा आवसरीया [सेवक. (सं. अवसर). स्वामीची वेळ सांभाळणारा, यावेळी ते कोणत्या कामात आहेत, त्यांना वेळ आहे की नाही, इत्यादी पाहाणारा सेवक. 'शिशुपाळवध काव्यात राजसेवकांची नावे आहेत. त्यात 'इशानु **अवसरी** : कुबेरू भांडारी' (ओ. ४९) असा हा शब्द आलेला आहे. टीपग्रंथात 'अवसरी=अवसर सांगता ओळगिया' असा त्याचा अर्थ दिलेला आहे.] : ईतुकेयातें रायासमान मानीजे : तो प्रधानु [लाभा] [हा शब्द येथे चुकून लिहिला गेला असावा 'तो प्रधानु लाभाते पावे' असे वाचावे.] लाभातें पावे [राजाच्या परिवाराला जो राजासमान मानतो तो प्रधान 'लाभालाभातें पावे'=त्याला अनेक लाभ होतात. 'लाभालाभातें' हा अभ्यस्त शब्द असून त्यातील पूर्वपद सामान्यरूपात्मक आहे. का**ठा**काठाने, हा**ता**हाताने इत्यादी शब्दांच्या रूपाप्रमाणेच 'लाभालाभातें' हे रूप होय. तळटीप **रद्द** समजावी.] : म्हणोनि राजसेवा जाणे तो नीका :" करकंटक म्हणे : "राजसेवा ते कैसी?" दमनीक सांगे : "रायापासी जर चावटी [सं. वाचाट. वर्णविपर्यय होऊन 'चावट'=बडबड करणारा. त्यापासून **चावटी**=बडबड. पाहा : 'तैसा मी जरी तुम्हांप्रति । **चावटी** करीतसें बाळमती' (ज्ञाने. ९·१६. कुंटे प्रत).] कीजे ते राजसेवा नव्हे ॥ उक्तं च ॥

मौनान्मूकः प्रचवचनपटुर्वातुलो जल्पको वा
धृष्टः पार्श्वे भवति च तथा दूरतस्त्वप्रगल्भः ।
क्षान्त्या भीरुर्यदि न सहते प्रायशो नाभिजातः
सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ॥ २१ ॥

रायापासी मौन्य धरूनि बैसीजे तर मुका म्हणती : दुरी बैसे तरी भेदु(डु) म्हणती : बहुत शांतीपण धरे तरि मीस्कीन म्हणती : जरी रायासी उखरू बोले [(सहन न करता) उद्धटपणे, रूक्षपणे बोलतो. **उखर** (सं. ऊषर) = बरड जमीन. त्यावरून जाडेभरडे, रूक्ष, उदासीन. पाहा : 'असतां आहाच उखर : अन्यथा होए आणिकांचें अंतर :' (मूप्र. २४५१) यावरून **उखर बोलणे** = फटकळ बोलणे, असभ्य बोलणे.] तरी आकुळीन म्हणती : म्हणौनी सेवाधर्मु आवघडु आसे : योगआभ्यास होय परंतु सेवाधर्म नोहे : म्हणोनि : तरी करकंटका मी राया पींगळीकापासी जाउनी राजा वस्य करिन [मुळात १७ व्या श्लोकानंतर 'अपि च' (पा. ५, ओ. १३) पासून तो 'परंतु सेवाधर्म नोहे' (पा. ५, ओ. २७) येथपर्यंत व त्यानंतर 'म्हणोनी दमनीकु म्हणे कर[कं]टका : तु काय जाणसी—' येथून तो 'मी राया पींगळापासी जाउनी राजा वस्य करीन' येथपर्यंत मजकूर आहे. मुळात १७ व्या श्लोकानंतर 'अपि च' इत्यादि जो मजकूर आलेला आहे त्याची वरील मजकुराशी संगति लागत नाही. करकंटकाने अव्यापारेषु व्यापार करणाऱ्या वानराची कथा सांगितल्यावर, त्यावर दमनकाचे उत्तर पाहिजे. तसे मुळात नाही. त्यावरून येथे मजकुराची अदलाबदल झाली असली पाहिजे हे स्पष्ट दिसते. त्यामुळे संगती नीट लागण्याच्या दृष्टीने मुळातील मजकूर वरखाली करून तो संहितेत स्वीकारला आहे.] : तरि राजा भयातें पावला आसे : तयासि भयाचें कारण पुसीन : संधि : वीग्रहो : यान [**मू.** याने.] : आसन : संश्रयो : द्वैधिभावो : ऐसी सडवीधी नीति [यासंबंधीचा संस्कृत श्लोक पुढीलप्रमाणे :—

संधिविग्रहयानानि आसनं संश्रयस्तथा ।
द्वैधीभावश्च भूपानां षड्गुणाः परिकीर्तिताः ।

संधि : शत्रूबरोबर तह करणे. **विग्रह** : शत्रूबरोबर वैर करणे, शत्रुत्व बाळगणे, युद्ध करणे. यान : शत्रूवर चालून जाणे, हल्ला करणे. **आसन** : शत्रूबरोबर युद्ध न करता आहे त्या स्थितीत कालप्रतीक्षा करीत बसून राहाणे. **संश्रय** : बलाढ्य शत्रूशी युद्ध करण्यासाठी एखाद्या मित्राचा आश्रय घेणे, त्याचे साह्य घेणे. **द्वैधीभाव : द्वैधीभाव** नीतीचा अर्थ दोन रीतींनी करण्यात येतो. (१) वरून मैत्री पण आतून कपटकारस्थान करणे. 'बलिनो द्विषतोर्मध्ये वाचात्मानं समर्पयन् । द्वैधीभावेन तिष्ठेत्तु काकाक्षिवदलक्षितः' (२) आपले सैन्य द्विधा करून, त्याचे दोन भाग

करून दोन बाजूंनी शत्रूवर चालून जाणे. ‘द्वैधीभावःस्वबलस्य द्विधाकरणम्’ (संस्कृत–इंग्रजी कोश : आपटे).] बोलौनि राजा वस्य करीन : प्रधानु होईन :” तवं करंकटकु म्हणे : “तुवां राजसेवानीती जानीतली नाही : राजा पुसैल तेव्हां उतर काय देसील?” तवं दमनीकु म्हणे : “राजा पुसेल तयासी सन्मुख बरवें उत्तर देईन ॥ उक्तं च ॥

उत्तरादुत्तरं वाक्यं वदतां संप्रजायते ।
सुवृष्टिगुणसंयोगाद्बीजाद्बीजमिवांकुरम् ॥ २२ ॥

बोलके जे पुरूस त्यासी बोलतां उतरापाठीं उतर आठवें : जैसें वृष्टीकरौनी बीजापासाव बीज होय : तरि रावो भयातें पावला असे : ऐसें म्यां जानीतलें : ॥ उक्तं च ॥

आकारैरिङ्गितैर्गत्या चेष्टया भाषणेन च ।
नेत्रवक्त्रविकारैश्च गृह्यतेऽन्तर्गतं मनः ॥ २३ ॥

म्हणौनी जे काळीं जें बोलौं ये : पुसलेयां देउं ये तें सर्वही मी जाणत आसें :” तवं करकंटकु म्हणे : “ही कां : तुं रायापासि जाये : तयाचा अभिप्रावो मनासी आनी!”

तेधवां तो दमनीकु सीहाजवळी गेला : आती दुरी ना आती जवळी उभा राहीला ॥ उक्तं च ॥

नातिदूरो समीपस्थो नरो तिष्ठति मध्यगः ।
तथा सेवत रायं तं यथा वह्निगुरुस्त्रियः ॥ २४ ॥

ऐसा तो दमनीकु उभा राहुनी राजा जुहारिला : राजेनी नेत्रखुणें बोलाविला : राजा पुसे : “क्षेम आसा?” “जी : आतां येथौनी [येथौनि (यावेळेपासून) आता क्षेम आहे.] :” ऐसें दमनीकु म्हणे : पींगळीकु म्हणे : “बहुता दीसा भेटौं आलासी :” परिवारासी म्हणे : “हा आमचा जुनट प्रधानाचा पुत्र :” ऐसें म्हणौनी [**मू.** ‘म्हौनी’.] राजे दमनीकासी सन्मानु केला : मग राजा पुसे दमनीकासी : “तुं कोणां कारिया [(कार्या) =कामासाठी.] आलासी? तरि आपूर्व आसेल तरि सांघ :” दमनीकु म्हणे : “राया येकांतीं [**मू. के**कांतीं. (सकळ संकेत क = य).] सांघैन ॥ उक्तं च ॥

षट्कर्णो भिद्यते मन्त्रश्चतुष्कर्णः स्थिरो भवेत् ।
द्विकर्णस्य तु मन्त्रस्य ब्रह्माप्यन्तं न गच्छति ॥ २५ ॥

म्हणौनी द्वीकरणी [‘षट्करणी’ हा शब्द पाहिजे.] मंत्र करूं नये :” तेधवां पींगळकें सभा विसर्जली : परिवारासी

अनुक्रमणिका

पाठवणी दीधली : दमनीकासी राजे पुसीलें : “तुं कवणा कार्या आलासी तें मज सांघ :” तवं दमनीकु म्हणे : “गोसावी सपरीवारी यमुनेसी उदक स्वीकरावया गेलेंति : तरी उदक नेघेतांचि मागुतें परतलेति : तें राजेनी कारण सांगावें : तुं म्हणसील यासी गुह्य कैसें सांगावें [**मू.** ‘सागांवें’.] : तरि आईक ‖ उक्तं च ‖

> दारेषु किंचित्स्वजनेषु किंचित्गोप्यं वयस्येषु सुतेषु किंचित् ।
> युक्तं न वा युक्तमिदं विचिन्त्य वदेद्विपश्चिन्महतोनुरोधात् ‖ २६ ‖

ईतुकाप्रती गोप्य सांघावें :” तवं पींगळीकु म्हणे : “तुजप्रती न सांघौं तरि कोणाप्रती सांघों? तुं आमचा जुनट मंत्रिपुत्रु [मुळात, ‘मीत्रपुत्रु’ असे आहे, ते ‘मंत्रीपुत्रु’ असे असले पाहिजे. ‘चिरंतनस्त्वमस्माकं **मन्त्रिपुत्रः**’ असे सर्व संस्कृत प्रतीत आहे, **न्त्रि** अक्षरावरील वेलांटी मागे गेल्यामुळे ‘मीत्रपुत्रु’ असे चुकून वाचून लिहिण्यात आले असावे. प्रथम ‘मीत्र०’ असे लिहून नंतर त्याचे ‘मंत्रि०’ असे केलेले आहे.] : तरी आईक : आम्ही यमुनेसी उदक स्वीकारावया [**मू.** स्वीकाराव**आ**.] गेलौं : तवं आरंन्यामध्यें भयानकु शब्द जाला : तो शब्द आईकौनि भय उपजलें : जयाचा शब्दु ऐसा : तो जुंझारू आसैल कैसा? तरि आतां मी हें स्थान [**मू. स्छा**न.] सांडैन : तरि आतां येथें वस्ती करूं न ये ‖ उक्तं च ‖

> सोपद्रवं त्यजेद्देशं दुष्टभार्यां तु संत्यजेत् ।
> दुश्चरित्रं त्यजेन्मित्रं दुष्टपुत्रंहि संत्यजेत् ‖ २७ ‖

सोपद्रव [**मू.** सोपद्रव्य.] स्थान [**मू. स्छा**न.] तेजावें : दुष्ट भार्या तेजावी : दुश्चारीण [दुस्+चारीण=वाईट आचरण करणारा. ‘चारीण’ हे ‘चारिन्’ चे रूप होय.] मीत्रु तो त्येजावा : दुष्ट पुत्र तेजावा :” तवं दमनीकु म्हणे : “पींगळीका राया : तुवां हें वन पुर्शार्थे [पुरुषार्थे, पराक्रमाने.] उपार्जीलें : आणी या वनामध्यें आनेक शब्द होति : तरि शब्दभयास्तव हें स्थान [**मू. स्छा**न.] सांडौं पाहातोसी : हें तुझें अनुचीत ‖ उक्तं च ‖

> यस्य न विपदि विषादः संपदि हर्षो रणे न भीरुत्वम् ।
> तं भुवनत्रयतिलकं जनयति जननी सुतं विरलम् ‖ २८ ‖

राजेया : जयासी संपती जालेयां हरिखु नाही : आणी विपती जालेयां विशादु नाही : आणी रणवीसे [रणाविषयी. **विसे**–हे विषयी शब्दाचे अपभ्रष्ट रूप. ‘ऐसेया सुतासी कोन्ही येकी स्त्री प्रसवे.’–अशा मुलाला कोणी एक (एखादीच, विरळाच) स्त्री जन्म देते. संस्कृत श्लोकातील ‘जनयति जननी सुतं विरलम्’ हे वाक्य लक्षात घेतले तर ‘स्त्री (जननी, आई) अशा **कोन्ही येकी सुतासी** (कोण्या एका मुलाला, एखाद्याच मुलाला) जन्म देते’ असा अर्थ करता येईल.] जयासी भय नाही : ऐसेया सुतासी कोन्ही येकी स्त्री प्रसवे ‖ उक्तं च ‖

> शक्तिवैकल्यनम्रस्य निःसारत्वाल्लघीयसः ।
> जन्मिनो मानहीनस्य तृणस्य च समा गतिः ‖ २९ ‖

आणी आईक राजया : शक्तीकरूनि [शक्तीने, शक्तीमुळे. या वाक्यात ‘शक्ती नसल्यामुळे’– असा अर्थ आहे. पाहा : ‘शक्तिवैकल्यनम्रस्य’=शक्ती क्षीण झाल्यामुळे (वैकल्य) जो नम्र झाला, त्याचे.] जो नम्र जाला : जेणें नीसत्वपण धरीलें : जयासी मानआपीमान समान : धैरत्व जेणें टाकीलें : तयाची गती आणि त्रुणाची

अनुक्रमणिका

गती सामान [मू. शांमान.] जाणावी : तरी आईक राया : मी रंक आप्रयोजक : तरी राया : तुं म्हणसील हे आकुळीन : याचें काये आईकावें : तरि आईक राजया : ॥ उक्तं च ॥

कौशेयं कृमिजं सुवर्णमुपलाद्दूर्वापि गोरोमतः
पङ्कात्तामरसं शशाङ्क उदधेरिन्दीवरं गोमयात् ।
काष्ठादग्निरहेः फणादपि मणिर्गोपित्ततो रोचनम्
तस्मात्पूजयते गुणो न तु भवः किं जन्मना हे नृप ॥ ३० ॥

कोसयापासाव [कोशाच्या किड्यापासून.] पाडसुत [(सं. पट+सूत्र) रेशमी वस्त्राचे सूत, धागे (तयार होतात.) किड्यासारखा क्षुद्र प्राणी, पण तोही रेशमाचे धागे तयार करण्याच्या उपयोगी पडतो, हा भावार्थ. **पाड**=रेशमी काठाचे व सुती पोताचे वस्त्र' असा एक अर्थ 'महाराष्ट्र शब्दकोशा'त दिलेला आहे. हा अर्थ 'नाशिक भागात रूढ असल्याचेही तेथे निर्दिष्ट केले आहे. सं. पट पासून तयार झालेला **पाट** हा शब्दही वस्त्र या अर्थाने वापरला जातो. **गाईचेया रोमापासौनि** (केसापासून) **दूर्वा'** तयार करीत, असे दिसते.] : पाखाणापासौनि सुवर्ण : गाईचेया रोमापासौनि दुर्वा :
पंकापासौनी कमळ : समुद्रापासौनि [समुद्रमंथनाच्यावेळी समुद्रातून जी चौदा रत्ने निघाली त्यात चंद्र होता, हे लक्षात घ्यावे.] चंदु [मू. चंडु. (सकळ संकेत ड = द).] : फणीपासौनि [नागाच्या फणात मणी असतो अशी समजूत आहे.] मणी : गोमयापासौनी
इंदीवर : काष्टापासौ[नी*] आग्नी [लाकडावर लाकूड घासल्याने अग्नी निर्माण होतो.] : गाईचीया पीत्तापासौनी गोरोचन : म्हणौनी
जन्मस्थान [मू. स्छान.] लटीकें : गुण तोची साधु ॥ उक्तं च ॥

गुणाः सर्वत्र पूज्यन्ते पितृवंशो निरर्थकः ।
वासुदेवं नमस्यन्ति वसुदेवं न ते जनाः ॥ ३१ ॥

गुणातें सर्वत्र पुजीजे : पीतृवंश तो नीरर्थ : येथें दृष्टांतु : वासुदेवाकारणें [श्रीकृष्णामुळे, त्याच्या गुणामुळे लोक श्रीकृष्णाला भजतात. तो वसुदेवाचा पुत्र असला तरी 'वसुदेवाकारणें'– वसुदेवाला भजत नाही. **कारणें** शब्दाचा उपयोग लक्षात घेण्यासारखा आहे.] जन
नमस्कारयुक्त भजती : येणें वसुदेवाकारणें नाही भजताती :" ऐसें दमनीकु बोलीला :
तवं पींगळीकु म्हणे : "तुं आमचा मंत्रीपुत्र [प्रथम 'मीत्र०' असे लिहून नंतर त्याचे 'मंत्रि०' असे केलेले आहे. मुळात, 'मीत्रपुत्रु' असे आहे, ते 'मंत्रीपुत्र' असे असले पाहिजे. 'चिरंतनस्त्वमस्माकं मन्त्रिपुत्रः' असे सर्व संस्कृत प्रतीत आहे, न्त्रि अक्षरावरील वेलांटी मागे गेल्यामुळे 'मीत्रपुत्रु' असे चुकून वाचून लिहिण्यात आले असावे.] होसी : तुं जे सांगसी तें मी आइकीन :"
तवं द[म*]नीकु म्हणे : "सहसा ठावो न सांडीजे : हें उचीत नव्हें : ये डोंगरीं आनेक शब्द होती : परंतु वीचारावें ॥ उक्तं च ॥

पूर्वमेय मया ज्ञातं पूर्णमेतद्धि मेदसा ।
अनुप्रविश्य विज्ञातं यावच्चर्म च दारु च ॥ ३२ ॥

पूर्वी भय जालें : पूर्ण जाणौनि [पूर्णपणे माहीत करून घेतल्यानंतर] : मग वीचारलें [विचार करणे (सं. विचारणम्) संस्कृत श्लोकाचा भावार्थ यात उतरलेला नाही. श्लोकाच्या पहिल्या चरणाचा अर्थ असा आहे : 'अगोदर मला असे वाटले की हे चरबीने भरलेले (मेदसा पूर्णम्) आहे'.] : मग माहारंण्यामध्ये प्रवेसौनि :
दारुमय ['दारुमय चर्ममय' (लाकूड व चामडे यांनी युक्त, यांनी बनवलेला)] चर्ममय ऐसा दुंदुभि [(एक चर्मवाद्य) देखौनि

(पाहिल्यावर) कोल्हेनीं तो दुंदुभि=ढोलू (पोकळ) आहे असे देखिले (पाहिले, ज्ञान त्याला झाले).] देखौनि कोल्हेनीं ढोलु [एक चर्मवाद्य, या अर्थाने हा शब्द रूढ असला तरी त्याचा मूळ अर्थ 'पोकळ' हाच होय. ढोली (पोकळ जागा), ढोलार (झाडाच्या बुंध्यातील विवर) इत्यादी शब्द पाहा. हा शब्द सं. द्रोणिः शब्दापासून तयार झाला असावा. सं द्रोणिः > म. डो. (=रांजणातून पाणी काढण्याचे लाकडी पोकळ भांडे. यापासूनच **डोल**=नारळाची कवड, नारळातील खोबऱ्याचा पूर्ण किंवा अर्धा गोल. हाही पोकळच असतो. यावरून **ढोल**=पोकळ भाग.] देखीला : मग तयाचें [भय*] फीटलें :" तवं पींगळीकु म्हणे : "हे कैसी कथा?" दमनीकु सांगे : "आईका राजया :

कथा २*
कोल्हा व दुंदुभी

पुर्वी येक कोल्हा आरंन्यामध्यें आसे : तयासी वनामध्यें हिंडतां हिंडतां रणभुमी देखीली : तेथें अवचीता भया[न*]कु शब्दु जाला : ते आ[इ*]कौनी कोल्हेयासी भय उपजलें : पळावें ऐसें चीतीं तेणें धरिलें : मग विचारौनि सामोरा जवं जाय तवं दुंदभी येकु देखीला : वृक्षाचा फाटां लागलियां वाजीला : तवं तेणें कोल्हेनी आपपें [आपण. मूळ शब्द **आपप**=आपण, असा घेतलेला दिसतो. त्याची तृतीया विभक्ती. एरवी, **पें** हा चतुर्थीचा प्रत्यय. तो येथे निश्चित नाही. 'कोल्हा आणि दुंदुभि'– या कथेला आधारभूत असलेल्या संस्कृत श्लोकातील भावार्थ आपल्या कथेत पूर्णपणे आलेला नाही. प्रथम कोल्ह्याला वाटले की, (ज्याअर्थी वरून चामडे आहे त्याअर्थी) आत चरबी असेल. म्हणून त्याने त्या दुंदुभीच्या एका बाजूचे चामडे फाडले व तो आत शिरला. पण तेथे मांस, चरबी वगैरे काही नसून, वर चामडे असले तरी ते लाकूड आतून पोकळ आहे, असे त्याच्या लक्षात आले. असा कथाभाग संस्कृत प्रतीत आहे. मराठी **भा. म.** प्रतीतही तसाच आहे. पिंगळक सिंह संजीवकाच्या आवाजाला भ्याला होता, हे लक्षात घेऊन या कथेतील दुंदुभीचा आवाज होण्याचा भाग तेवढा आपल्या लेखकाने घेतलेला आहे.] वाजवीला : तें देखौनी भय फीटलें : चींता हरली :

तरी राजया विचारूनी जो कृत्य करि तो पुरूस दुखातें न पावे ॥ उक्तं च ॥

भये वा यदि वा हर्षे सम्प्राप्ते यो विमर्शयेत् ।
कृत्यं न कुरुते वेगान्न स संतापमाप्नुयात् ॥ ३३ ॥

तरि पींगळीका राजया : मजसारीखा पाइकु आसतां तुज भय काई आसे?..... [पोथीच्या पानाचा कोपरा या ठिकाणी फाटला आहे.] तो कैसा वीरू : कवणें कारणें येथें आला आसे [हें मी पाहौनि येईन*] [पोथीच्या पानाचा कोपरा या ठिकाणी फाटला आहे.] : तवं राउळीं [मुळात 'राउळी **स्ळी** रहावे' असे आहे.] रहावें : मग जे बुधी करूं ये ते [करूं :" ऐसें म्हणौ*] [पोथीच्या पानाचा कोपरा या ठिकाणी फाटला आहे.] नी तो कोल्हा शब्दाचे मार्गे नीगाला : तवं पींगळीकु [चिं*]तीता जाला : म्हणे : "म्यां बोखटें केलें : जे तो दमनीकु माझीये आज्ञेमध्यें नाही : आणी तयासी [मू. त**आ**सी.] मी वीस्वासलां : तो कैसें करील तें न कळे : ज्यासि पुर्वी वोखटें कीजे त्यासि दडकरी न वीचारिजे [त्याला एकदम विचारू नये; किंवा त्याच्याशी एकदम विचारविनिमय करू नये.] : की हा तयासि मीळौनी माझा भावो पाहावया आला? तरि हें स्थान [मू. **स्छा**न.] सांडौनी दुरौनि पाहों : कदाचीत तयासी मीळौनी मज मारणें : ऐसें केलें आसैल :" ऐसें म्हणौनी स्थान [मू. **स्छा**न.] सांडौनी दुरौनि पाहातो :

तवं दमनीकु तेथें गेला : तवं तो बैल देखीला : मग समाचार पाहुनि आला : तवं तो पींगळीकें देखीला : मग पींगळीकु हरूसैला : मग येउनी राजा नमस्कारिला : मग दमनीकु बोलतां जाला ॥ उक्तं च ॥

सर्वदेवमयो राजा मनुना संप्रकीर्तितः ।
तस्मादेनं नमस्कृत्य पश्चाद्वाक्यं समावदेत् ॥ ३४ ॥

मनु जो तेणें सर्व देवमय ऐसा राजा बोलीला : या कारणें आधी रायासी जोहारू करुनी जें बोलणें आसें तें बोलावें : तेव्हेळी दमनकु पींगळीकासी बोलता जाला : "राया : मी तेथें गेलों होतों : तया वीरातें देखीलें : मग म्यां भीत भीत पाचारीलें [(सं. प्राचारणं): चौकशी केली, विचारपूस केली. सामान्यतः पाचारणे=हाक मारणे, बोलावणे, या अर्थाने हा शब्द आज रूढ आहे. पण, हटकणे, चौकशी करणे, विचारपूस करणे या अर्थानेही हा शब्द पूर्वी वापरला जात असे. उदा : "तराळीं **पाचारिलें** : 'तुम्ही कोण गा?' 'तवं तराळीं मातें **पाचारिलें** : 'तुम्ही कोण हो?' (लीच. उत्त. ११), "भटोबासां जातां देखेति : परि पाचारिती ना" (लीच. उत्त. १०९) पुढे [कथा ३*] पाहा.] : 'तुं कोण गा? कोणें या वनामध्यें पाठविलासी? ये वनीचा राजा पींगळीकु सीहु : तो भद्रजातीचीं कुंभस्थळें [**मू.** कुंभ**स्छ**ळें.] विदारितु आसे : ऐसा तो समर्थ : आनी सत्वबळु : तो जरि तुतें देखैल तरि तुतें मारैल' हा शब्द आइकीला : मग थोरें गर्जीनला [(सं.गर्ज) गर्जना केली. 'इनल' प्रत्ययान्त भूतकाळाचे रूप. (तुळपुळे. यादवकालीन मराठी भाषा. पा. २९५ पाहा).] : मग मातें म्हणे : 'तुं आलासी हें भलें जालें : मी ईस्वराचा [शंकराचा. **ईश्वर** हा शब्द विशेषत्वाने भगवान शंकरासाठी वापरला जातो.] नंदि : मज हें वन ईस्वरें चरावया दीधलें असें : आणी तो सीहुं पार्वतीचें वाहान : तरि तो आमसि मैत्रत्व करूनि आसैल तरि तेणें य वनीं राहावें [**मू.** राहा**वं**.] : नाहि तरि आनीकेया ठाया वेगी जावें :' ऐसें तेणें बोलीले : 'मी ईस्वराचा नंदी : पर्वतु झडेसवें फोडौं शके : सीहाचा हिसेबु नसे [सिंहाची तेथे गणती नाही. तेथे सिंहाची किंमत काय?] :' ऐसें तो बोलीला :" "तरि ऐसेयाचें काय कीजे हें वीचारिजे :" तवं दमनकु म्हणे : "आपण तयासी मीळौनी वर्तीजे :" "तवं सीहं म्हणे : "दमनीका : तुझीया-वस्तु [तुझ्याकडून. वस्तु (अरबी. वासितह्)=कडून. बखर वाङ्मय व ऐतिहासिक कागदपत्रे यातून हा शब्द पुष्कळ आढळतो : उदा : 'दौलत उद्या जात असेल तर आज जावी. मी जोडा संभाळून उभा राहीन. परंतु **माझे वस्तु** गोष्ट सुतराम होणार नाही', (होळकरांची कैफियत. पा. ७६.); '**त्याचे वस्तु** श्यामलाचे गलबतासी अडावणी करवत नाही' (पेशवे दप्तर. खं. ३३. पा. ३८). कथा ३ : अनागतविधाता, प्रत्युत्पन्नमति व यद्‌भविष्य या तीन माशांची ही कथा संस्कृत–मराठी कोणत्याच 'पंचतंत्रा'त या ठिकाणी आढळत नाही. पुढे ती टिटवीच्या आख्यानात आढळते. आपल्या प्रतीत मात्र ती येथे आहे. अन्यत्र या कथेचे स्वरूपही निराळे आहे. पाण्यातील पुष्ट मासे पाहून तेथे आलेल्या कोळ्यांनी दुसऱ्या दिवशी तेथे जाळे टाकण्याचा विचार केला. तो ऐकून अनागतविधाता व प्रत्युत्पन्नयति हे तो डोह सोडून गेले. यद्‌भविष्य मात्र तेथेच राहिल्यामुळे दुसऱ्या दिवशी कोळ्याच्या जाळ्यात सापडला, अशी कथा अन्यत्र आहे.] हें कार्यें होववैल : तरि तयासि मजसी मैत्रत्व करि :" तवं दमनीकु म्हणे : बुधिसी कांही असाध्य असें? बुधीकरूनी सर्वही करूं सकीजे ॥ उक्तं च ॥

न तच्छस्त्रैर्न नागेन्द्रैर्न हयैर्न पदातिभिः ।
कार्यं संसिद्धिमभ्येति यथा बुद्ध्या प्रसाधितम् ॥ ३५ ॥

जें बुधी करूनी कार्ये होये तें नागेंद्रें नोहें : ना घोडेनि नोहें : ना पदाती नव्हें :" मग सीहं म्हणे : "आम्ही काय करावें तें सांघां पां :" तवं दमनीकु म्हणे : "सहसा ठावो न सांडीजे : जरि सांडिजे तरि यद्‌भवीष्णु [हा शब्द य**द्‌भु**विष्णु, य**द्‌भि**विष्णु, य**द्‌भ**वीष्णु अशा

निरनिराळ्या रूपात पोथीत लिहिला आहे. संहितेत सर्वत्र यद्‌भवीष्णु हे रूप स्वीकारले आहे.] मासयाची परी होये : य आर्थी कथा आईक ॥ उक्तं च ॥

अनागतविधाता च प्रत्युत्पन्नमतिस्तथा ।
द्वावेतौ सुखमेधेते यद्‌भविष्णुर्विनश्यति ॥ ३६ ॥

"हे कैसी कथा?" सिंहु पुसे : दमनीकु सांगे :

कथा ३ *
वृध्द बक आणि तीन मासे

"येकु अनागतवीधाता : येकु प्रत्युत्प[त्प*]न्नमति : येकु यद्‌भवीष्णु : ऐसे तीघे मासे येका प्रचंडे डोहीं आसती : तवं तेथें वृधु येकु बगु आला : हातपाये राहीले : हळुहळु उदकस्थान [मू. उद**कास्छा**न.] टाकौनि आला [टाकणे=प्राप्त करणे, पोचणे. **टाकून येणे** : प्राप्त करून घेणे. पाहा : "ना तरी मृगें तृषापीडितें । संभ्रमें विसरौनि जळातें । मग तोयबुद्धि बरडीतें । **टाकूनि एंति** (ज्ञाने. ५·११०).] : बग ध्यान धरौनी राहीला : तवं ते डोहीचा मासा यद्‌भवीष्णु तेथें आला : तवं तया बगातें पुसौं लागला : 'तुं कोण गा? यथें कां बैसलासी? तुज नांव काये?' तवं तो म्हणे : 'मज नाम सर्वभक्षकु : म्यां जीवहींसा बहुत केलीया : आतां माझें मन यक वा (वी)टलें आसें : तरि कीती येका दीवसा माझा प्राणु तेजीन :' तें आईकौनी यद्‌भवीष्णु मासा हरिखीला : म्हणे : 'तुं माझा काको :' ऐसे दोघे आखंड गोष्टी करिती : तवं येके दीवसीं यद्‌भवीष्णु आला : तवं तो बगु रूदना करितु आसे : मग तो मासा म्हणे : 'काको यव्हडें [मू. **अ**व्हडें.] दुख काईसें? काई वर्तलें तें मजपुढां सांग :' तो म्हणे : 'म्यां पुरवीं बहुत पापें [मू. पाप.] केलीं तेणें दुखे (ख)सागराआंत पडलौं :' तवं तो मासा म्हणे : 'तो वृतांतु कैसा?' तवं बगु म्हणे : 'मज परमेस्वराचें ध्यान करितां ज्ञान जालें : जे हा डोहो असका [(सं. अशेष) सर्व, पूर्णपणे. पाहा : 'ब्रह्मकटाही घालावा । **असका** दाढे' (ज्ञाने. ११·४२५). 'असिका' असेही या शब्दाचे रूप आहे. पाहा : 'पैं होऊनि दीपकळिका । एरू आगि विझो कां । ते लागैल तेथ **असिका** । तोचि आहे' (ज्ञाने. १४·२५५). हाच शब्द पुढे 'आसका' असा आला आहे.] आटैल : तवं तुम्ही लेंकुरवां-['लेंकुरूं' या शब्दाचे अनेकवचन 'लेंकुरूवें'.] बाळकांसहीत कोठे जाल? तुम्ही तर जळचरें : स्थळचरें [मू. **स्छ**ळचरें.] नोहां [मू. नोहो.] : म्हणौनि माझें हृदयें फुटत आसें : मज तुमचें वाउगेंची स्नेह लागलें असें :' ऐसें म्हणौनि अधीक रडौं लागला : तवं यद्‌भवीष्णु म्हणे : 'जी काको : उगा [गप्प, मूक, स्तब्ध, शांत. पाहा : 'ऐसी पुढील से घेतु । तो साहाजें जाणे हृदयस्थु । परि **उगाचि** असे निवांतु । तिये वेळे' (ज्ञाने. १·१७९). हा शब्द कानडी 'उके' (=शांत) पासून आला असावा. परभाषेतून मराठीत एखादा शब्द आला म्हणजे त्याचा अर्थ कळावा म्हणून त्याच अर्थाचा मराठीतील रूढ शब्द त्याला जोडून काही जोड शब्द तयार होतात. 'उगामुगा' (मुगा < सं. मूक) हा असाच एक शब्द आहे.] राहें : आम्हांकारणें आनीक स्थान [मू. 'स्छाण उदक' येथे चुकून शब्दविपर्यय झालेला आहे. 'उदकस्थान' असे दुरूस्त करून घेतले आहे. मू. ०स्छन.] पाहुनि यें :' मग तो म्हणे : 'बरवें :' ऐसें म्हणौनी उडाला : येरू यद्‌भवीष्णु आपुली[या*] भाउवांपासी रडतु आला : तवं ते म्हणेति : 'हें काई जालें गा? तुं कोणें गांजीलासी?'

तवं यद्भवीष्णु म्हणे : ‘माझा मीत्रु बगु : त्या ज्ञान जालें :’ तो म्हणे : ‘हा आसका डोह आटैल : तुम्ही मराल; तरि तो आनीक उदकस्थान [**मू.** ‘स्छाण उदक’ येथे चुकून शब्दविपर्यय झालेला आहे. ‘उदकस्थान’ असे दुरूस्त करून घेतले आहे. मू. ०स्छन.] पाहावया गेला आसे : तरि आपुण सकळीक [सं. सकल+एक=सकलैक, सर्वजण. पाहा : ‘माधुर्ये चंद्रिका । सरिसीचि रायारंका । तैसा जो सकळिकां । भूतां समु’ (ज्ञाने. १२·२०३).] तेथें जाइजे :’ तवं ते दोघे म्हणति : ‘हा डोहो कुर्माचीये पुष्टीवरि [कासवाच्या पाठीपर्यंत. **वरि** = वेऱ्ही, पर्यंत. सर्व पृथ्वी कासवाच्या पाठीवर आहे अशी पौराणिक कल्पना.] उदकें पूर्ण आसे : हा कहिच नाटे [न आटे.] : तेणें बगें तुज चाळवीलें : तुं जायें : आम्ही न यों [(आम्ही) येणार नाही.] :’ मग तो यद्भवीष्णु बगस्थानासी [**मू.** ०**स्छा**नासी.] आला : तवं तेथें बगही आला : तवं तो बगासीं म्हणे : ‘ते न येती : मज घेउनि जायें :’ तवं तो बगु म्हणे : ‘तुं आपुली लेकरुवें-बाळें घेऊनी यें :’ ऐसा लेकु(रु)वाबाळासहीतु बगाचीये पाठीवरि वळघला : एकी सीळातळीं घेऊनी गेला [यानंतर मुळात ‘तवं ते दोघे म्हणती : हा डोहो कुर्माचीए पुष्टीवरि उदके परिपुर्ण आसें : हा कहीच नाटे’ हे वाक्य लिहिलेले आहे. ते पूर्वी आलेले आहे. येथे चुकून दुबार लिहिले गेले. म्हणून संहितेत ते गाळले आहे.] : मग मासोळीया [(सं. मत्स्य+ल) स्वार्थे ल प्रत्यय लागून ‘बक + ल’ = बगळा, ‘काक+ल’ = काउळा इत्यादी शब्द तयार झाले आहेत.] खाउं लागला : प्रथम यद्भवीष्णु खादला : उरलीं जळचरें उदकस्थान टाकौनि आलीं :”

“म्हणौनि या कारणें : पींगळीका राया : सहसा ठावो न सांडावा : तरि मी तेथें जाईन : तुमतें त्यातें मीत्रत्व करीन : मग आवघे सुखें आसौनी [सुखाने असू-राहू. **असौनि** : ‘अस्’ धातूचे भविष्यकाळी प्रथमपुरुषी अनेकवचनाचे रूप. ‘ऊनि’ किंवा ‘औनि’ प्रत्यय लावून तयार झालेली अशी अन्य रूपे पाहा : ‘तन्हि प्रेमांचां कडिलगीं : **टाकुनि** कैवल्यदुर्ग’ (उगी. १६५); ‘अवघां म्हणितलें : उठा उठा भटो : मागाल तें **देउनि**’ (स्मृस्थ. १०७);’ ‘मग तूं मागसी तें आम्ही तुज **देउनि** : म्हणसी तें **करुनि**’ (दृपा. १६).] :”

मग तो पींगळीका रायातें जोहारौनि दमनीकु त्या संजीवका बैलापासी आला : मग तयातें पाचारिलें : “आरे ढोरा : तुं कां मरूं पाहातोसी? कां घडिये घडिये डरतोसी? ईय वनीचा राजा पींगळीकु सीहुं जरि आईकैल तरी तुतें मारैल :” या बोला संजीवकु भीयाला : दमनीकातें म्हणे : “मज आणी सीहासी मीत्रत्व करिं :” तवं दमनीकु म्हणे [**मू.** ‘मन्हे’.] : “तुवां जें म्हणीतलें तें मज मानलें : परंतु तुज त्यासी मीत्रत्व जालयां आमतें तुं न मानसी ॥ उक्तं च ॥

नवार्थी भजते लोको यावत्पारं न विन्दति ।
उत्तीर्णे तु पुरेपारे नावया किं प्रयोजनम् ॥ ३७ ॥

नावेंकारणें लोकु तवं ईछती जवं परियंत पार नाही पावला : आणी पार उत्त[र*]ला आसतां नावेचें काय प्रयोजन? म्हणोनी तुझें कार्य जालयां तुं आमतें न मानसी तरी आपायातें पावसी : आम्हासी बोलु नाही : ये आर्थी कथा आसे ॥ उक्तं च ॥

यो न पूजयते गर्वादुत्तमाधममध्यमान् ।

अनुक्रमणिका

नृपासन्नस्स मान्योपि भ्रश्यते दन्तिलो यथा ॥ ३८ ॥

जो गर्वास्तव उत्तम : मध्यम : [अधम*] यातें समईं भजे ना तो भ्रंशातें पावे :" हे कथा दमनीकु सांगे : संजीवकु आईके :

कथा ४*
दंतिल प्रधान व गोरभ सावा

"ईय महीतळीं वर्धमान नांव नगर आसे : तेथें चंद्रचुड नाम राजा ['पंचतंत्राच्या' संस्कृत प्रतीत राजाचे नाव दिलेले नाही. आपल्या प्रतीत ते चंद्रचूड असे आहे, **भा** प्रतीत अमरशक्ती आसे नाव आहे, तर म प्रतीत 'वर्धमान नामे नगरी। तेथे **आरीदमनक** रावो राज्य करी। त्याचा प्रधान दंतळिकु अवधारी। नाव त्याचे' (१-२७८) असे त्याचे नाव दिलेले आहे. **कृ** प्रतीत चंद्रसेन हे नाव आहे.] आसे : त्याचा प्रधानु नांव दंतीलु आसे : तो सकळ पु[र*]नायेक : ऐसा तो प्रधानु समा(मो)त्कर्शें वर्ते [राजा व प्रजा या दोघांचाही सारखाच उत्कर्ष (सम+उत्कर्ष) साधून राहात होता.] : म्हणौनी [**मू.** म्हौनि.] रायासि आनी लोकांसी आवडे ॥ उक्तं च ॥

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन्द्रैः।
इति महत्ति विरोधे वर्त्तमाने समाने नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥ ३९ ॥

ऐसा तो प्रधानु समोत्कर्शें वर्ते : तवं येके समईं प्रधानाचे घरीं कंन्येचें फळप्रदान ["विवाहातील एक समारंभ. वाङ्निश्चयाच्या वेळी नवरीच्या ओटीत नवऱ्याच्या बापाने नारळ वगैरे घालणे".] माडीलें : सकळ लोक बोलावीला [**म.** बालावीला.] : त्या लोकासर्सा रायाचा सांउवा [झाडलोट करणारा सेवक. 'नृपतेर्गृ ह**संमार्जनकर्ता** गोरम्भः' असे संस्कृत कथेत आहे. **भा** प्रतीत त्याला 'केरसुणिकारु' असे म्हटले आहे. त्यावरून, **सांउवा**=झाडलीट करणारा, असा अर्थ स्पष्ट होतो. **सावा** असाही हा शब्द आहे.] आला : त्याचें नांव गोरभु : सकळ सभा बैसली आसे : पानसुपारी लोकासी देउं लागले : तवं तो गोरभु म्हणे : 'मज उसीर होतो : लवकरि पानें पोफळें घाला :' ऐसा तो लाहो [**मू.** ऐसा बा होक (तो ला)रू लागला.] करूं लागला : तवं त्यावरि प्रधानु कोपला : त्या सांवयातें [झाडलोट करणारा सेवक. 'नृपतेर्गृ ह**संमार्जनकर्ता** गोरम्भः' असे संस्कृत कथेत आहे. **भा** प्रतीत त्याला 'केरसुणिकारु' असे म्हटले आहे. त्यावरून, **सांउवा**=झाडलीट करणारा, असा अर्थ स्पष्ट होतो. **सावा** असाही हा शब्द आहे.] मारौनि वाडाबाहीर घातला : तो अवकळा मानुनी ग्रुहाप्रती गेला : तो म्हणे : "या प्रधानातें भीका लागे [भिकेला लागेल, भीक मागावी लागेल असे करीन.] ऐसें करीन :" तेधवां एके समईं थोर पाहाटें [मोठ्या सकाळी. दिवस उजाडण्यापूर्वीची सकाळची वेळ.] रायाचे रायांगना [राजाचे (राजाच्या वाड्यातील) रायांगन=मुख्य आंगण. पाहा : 'आदरेंसीं नमस्करिलें : सोपानमार्ग लंघिलें : मग साष्टांगि दंडवत घातले : **रायांगणीं**' (ऋव. १६०)] : कुची हातीं घेउनि : झाडितु आसे : आनी राजा समिप नीजैला आसे : कांही यक [**मू.** कय. (वर्णविपर्यय).] जागत आसे : तवं सांवां आपेंआप [(१) आपोआप, उत्स्फूर्त रीतीने; (२) आपल्याशीच आपण (बोलता जाला).] बोलता जाला : "पाहा ही दंतीला प्रधानाचें कैसें नवल : राणीवशा प्रवेसौनि : राणीसी गादीरोळु [हा शब्द 'गदारोळ' असा असावा. (१) 'गदारोळ' या

अनुक्रमणिका

शब्दाचा रूढ अर्थ दंगामस्ती, झोंबाझोंबी, आरडाओरड असा आहे. संस्कृत कथेत ‘राजमहिषीमालिङ्गति’ असे वर्णन आहे. या आलिंगन क्रियेलाच गोरभाने **गदारोळु**=झोंबाझोंबी, म्हटले असावे. **म** प्रतीत ‘येके दीवसीं निद्रेमाजी येकसरा । मीथ्याचि वसनावला अवधारा । म्हणे दंतळीका हरामखोरा । रानीये कैसा **झोंबतोसी**?’ (१·२८५) असे वर्णन आलेले आहे. **भा** प्रतीत मात्र ‘प्रधानु रायाचे राणितें **आलिंगतु असे**’ असे म्हटले आहे. (२) यादवकाळात ‘गदारोळ’ हा शब्द प्रेमालाप, या अर्थाने वापरला जात होता. भास्करभट्ट बोरीकर यांच्या ‘शिशुपाळवध’ या काव्यात ‘सांडूनि **गदारोळू** : एणें मज घातला आळु’ (१९२) या ओवीवरील टीपग्रंथातील टीपेत ‘गदारोळ=प्रीतीचें बोलणें’ असा अर्थ दिलेला आहे. तो येथे योग्य होईल. ‘राणीसी गदारोळु करितु आसे’=राणीबरोबर प्रेमालाप करतो. (३) पोथीत आहे त्याप्रमाणे ‘गादीरोळु’ हाच पाठ स्वीकारून अर्थ करायचा झाल्यास तो पुढीलप्रमाणे करता येईल. गादी+रोळु=गादीवर लोळणे. (रोळणे=लोळणे), किंवा रोळणे=आपले शरीर रेलणे=वाकविणे. राणीबरोबर गादीवर लोळतो; किंवा गादीवर (राणीवर) आपले शरीर वाकवतो = राणीशी संभोग करतो.] करितु आसे : आता मी काये करूं? हें कवणांपुढां सांगों नये :” ऐसें उतर राजेन आईकीलें : रायाचां मनीं वीकल्पु गेला [मनात संशय निर्माण झाला.] : म्हणे : “हें सत्य असैल : हा स्त्रीयेचा स्वभावो आसे : चरीत्रें स्त्रीयांचें न कळें ॥ उक्तं च ॥

जल्पन्ति सार्धमन्येन पश्यन्त्यन्यं सविभ्रमाः ।
हृद्‌गतं चिन्तयत्यन्यं प्रियः को नाम योषिताम् ॥ ४० ॥

॥ अपि च ॥

स्त्रियं च यः प्रार्थयते संनिकर्षं च गच्छति ।
ईषच्च कुरुते सेवां तमेवेच्छन्ति योषिताः ॥ ४१ ॥

एकेन स्मितपाटलाधररुचो जल्पन्त्यनल्पाक्षरं
वीक्षन्तेन्यमितः स्फुटत्कुमुदिनीफुल्लोल्लसल्लोचनाः ।

दूरोदारचरित्रचित्रविभवं ध्यायन्ति चान्यं धिया
केनेत्थं परमार्थतोऽर्थवदिव प्रेमास्ति वामभुवाम् ॥ ४२ ॥

॥ उक्तं च ॥

नाग्निस्तृप्यति काष्ठानां नापगानां महोदधिः ।
नान्तकः सर्वभूतानां न पुंसां वामलोचना ॥ ४३ ॥

स्त्रिया आणिकें सांगती : बोलती : आनीकाकडे स[वि*]भ्रमें [मुळात ‘सभ्रमें’ असे आहे. संस्कृत श्लोकात ‘पश्यन्त्यन्यं **सविभ्रमाः**’ असे आहे. त्यावरून येथे ‘सविभ्रमें’ शब्द मुळात असावा असे वाटते. चुकून **संभ्रमें** लिहिले गेले असावे. ते दुरूस्त करून घेतले आहे.] पाहाती [विभ्रम=शृंगारचेष्टा करीत करीत पाहतात. मुळात **संभ्रमें** शब्द आहे तो संहितेत दुरुस्त करून घेतला आहे. तोच शब्द स्वीकारल्यास, संभ्रम=विभ्रम, असा अर्थ करावा लागेल. यौगिकार्थाने तोही बरोबर होईल.] : आनी हृदयामध्यें आनीकेयातें चींतिति : ऐसेंनि स्त्रीयेसी कोण प्रीय ॥ स्त्रीयचा स्वभावो कैसा? वीकसित मुख करौनी पुरुशा पाहाती : आनी येकासंगातें बोलती : आन्येक चरित्रे करिति : ऐसा [**मू**. एसा.] स्त्रीयचा [असा स्त्रीचा (स्त्रीस्वभावाचा) अंत ‘परमाथुतो’ (खरोखर) कोणें जाणावा? ‘परमाथुतो’ असे लिहिले गेले आहे, ते ‘परमार्थतः’ असे असले पाहिजे. संस्कृत श्लोकात तेच रूप आहे.] परमार्थुतो कोणें अंतु जाणावा? काष्टेंकरौनि आग्नी तृप्ती नोहे : समुद्र

नदीकरौनि तृप्ति नोहे : आंतकु सर्व प्राणीयें तृप्ति नोहे : तैसीया आंगना पुरुषेंकरूनी तृप्ती नोहती [न+होती.] : कां जे : स्त्रीयेसी आष्टगुणा कामु ॥ उक्तं च ॥

आहारो द्विगुणः स्त्रीणां कामश्चाष्टगुणः स्मृतः ।
[पुष्कळ लाकडे खाल्ली-जाळली तरी अग्नीची तृप्ती होत नाही, अनेक नद्यांशी मीलन झाले असले तरी समुद्राची तृप्ती होत नाही, सर्व प्राणी भक्षण केले, (त्यांचा अंत केला) तरी अंतकाची (यमराजाची) तृप्ती होत नाही, त्याप्रमाणे अनेक पुरुषांमुळेही स्त्रियांची तृप्ती होत नाही—असा अर्थ.]
षड्गुणो व्यवसायश्च लज्जा तासां चतुर्गुणा ॥ ४४ ॥

पुरूषाहोउनी स्त्रीयसी लज्ञा चतुर्गुण : कामु आष्टगुण [या वाक्यानंतर 'कामु आष्टगुण' हे वाक्य पोथीत दुबार लिहिले गेले आहे. ते संहितेत गाळले आहे.] : व्यवसाय [हा शब्द या ठिकाणी 'निश्चय' या अर्थाने वापरलेला आहे.] शड्गुण [मू. 'शद्गुण' (सकळ संकेत द = ड).] : ऐसा स्त्रीयेचा स्वभावो आसे :" ऐसें राजेनी वीचारिलें : मग दंतीलु प्रधानु स्वस्थानापासौनी [मू. स्वस्छाना०.] दुरी केला : प्रातःकाळीं सीहासनीं बैसौनी आनीकु प्रधानु केला : मग तो आधीला प्रधानु [पूर्वी प्रधान असलेला (पण आता दूर केला गेलेला दंतिल प्रधान).] म्हणे : "म्यां रायाचें राज वाढवीलें : सकळ लोक वस्य केले : मज कोन्हासी वैर नाही : माझें पद जावया काय कारण?" ऐसा रात्रींदिवसीं चींता करी : तवं तो प्रधानु येकें दीवसिं रायांचीय वोळगे बैसावया [सेवा करण्यासाठी.] नीगाला : तवं दारवंठया तो सावां उभा राहिला आसे : तो प्रधानातें देखौनी हासीनला : तोंड गुंडौनी [तोंड गुंडाळून, हातांनी तोंड झाकून.] खुसी जाला : तें प्रधानें देखीलें : मग प्रधानासी आठवीलें : 'आम्ही या सांवयांसी : कंन्येचें फळप्रदान जालें : तै यासी [मू. आसी.] वाडाबाहिर मारौनी घातलें : तरि आमचे पद याचेनि गेलें :' मग तो प्रधानु घरासी आला : तो सांवा बोलावीला : त्यासी सन्मानु केला : लेनीं लुगडीं [मू. लगडी. अलंकार, दागदागिने व वस्त्रे. पाहा : 'वधुवरांचिये मीळणीं । जैसिं वऱ्हाडियांहिं **लुगडीं लेणीं**' (ज्ञाने. ११·३).] दिधलीं : मग प्रधान म्हणों लागला : "तुज आम्ही कोपलौं होतुं [कोपलो होतो. रागावलो होतो. **होतुं** रूप चिन्त्य आहे.] : तो आम्हासी बोलु लागला : तुं जीवीं काही वोखटें धरूं नको : आम्हासी पद जालेयां तुज बहुतपर उपकारू करूं :" ऐसें म्हणौनी समजावीला : तो सांवा थोडेनि मानें संतोसला ॥ उक्तं च ॥

स्तोकेनोन्नतिमायाति स्तोकेनायात्यधोगतिम् ।
अहो सुसदृशी चेष्टा तुलायाश्च खलस्य च ॥ ४५ ॥

तुळेची गती : आनी खळाची [मू. षळेची (सकळ संकेत ष = ख).] गती सामान्य [मू. साम्यान्य.] जाणावी : थोडेनि तुळा उंची होये [तराजूची दोन्ही पारडी समान असतात. पण एखाद्या पारड्यात थोडेसे वजन जास्त घातले तर ते खाली जाते. दुसऱ्या पारड्यातील वजनापेक्षा त्या पारड्यात थोडेसे वजन कमी असले तर ते वर जाते.] : थोडेनि नीच होय : आनी खळू [मू. षळु.] थोडेनी मानें संतोसे : थोडेनि आपीमानें न संतोसे : मग ये[के*] समईं थोर पाहाटे सांवा आंगन झाडतां आपेंआप बोलौं लागला : म्हणे : "राजा चहुटां [चव्हाट्यावर. संस्कृत कथेत 'पूरिषोत्सर्गमाचरंश्चिर्भटीभक्षणं करोति' असे आहे. **भा** प्रतीत 'हागतां **चिभडिं** वाळुकें खातु असे' असे भाषांतर केले आहे. **म** प्रतीतही 'म्हणे राजेनी हागतां दहीकाकडी

अनुक्रमणिका

खादली । ऐसा आमंगळु हा' (१-३३१) असेच आहे. सं. चिभटी किंवा चिर्भटी=काकडी. मराठीत मात्र या दोन्ही प्रतीत 'दहीकाकडी' असे योजले आहे.] बैसौनी दंही-कांकडी खातु आसे :" हा बोलु आईकौनी राजेनी पाचारिला : "हा रे सांवयां [पुढील एक ओळ नष्ट झाली आहे.] ....लें : मग म्हणे : "राया : माझी वातुळ प्रकृती : मी तुताळु सुताळु [असंबद्ध आणि संबद्ध. (बरळतांना) बरेवाईट बोलणे. संस्कृत 'ताल' शब्दावरून 'सु+ताल'=चांगला ताल असलेला, सुसंबध्द (सुताळ) हा शब्द तयार झाला. याच्या विरुद्धार्थी 'तु + ताल' या शब्दातील 'तु' हा उपसर्ग मात्र चिन्त्य आहे. निर्मळ पाठकाने 'आजी आमुची वातुळ व्रति । उतावेळ सुतावेळ नेणें पूढति' (२४५) असे शब्द योजले आहेत] बरळ भलतेंची [मू. शलतेंची. (सकळ संकेत श = भ).] बोलें : तरि राजेनी माझें सत्य म्हणौनी कानिं न धरावें :" तेव्हेळीं राजा वीचारिता जाला : "आम्ही या [मू. आ.] पुर्षाचेनि [पुरुषाचेनि.] शब्दें दंतीलु प्रधानु फेडीला : त्याचें पद हिरतीलें :" तेव्हेळीं राजेनी मागुतें त्याचे पद दिधलें :"

ऐसा प्रकारू दमनकें संजीवकाप्रती सांगीतला : मग संजीवकु सीहापासी आनीला : संजीवकु सीहाजवळी येउनी नमस्कार करौनि पुढां उभा राहीला : दोघासी सौ (स)ख्य जालें : सीहें संजीवकासि थोर सन्मानु केला :

संजीवकासी सीहें प्रधानवट [(सं. प्रधान+पट) प्रधान पदाचे वस्त्र. त्या त्या पदाचे विशिष्ट वस्त्र पूर्वी वापरीत असत. तो पट किंवा ते वस्त्र त्या व्यक्तीच्या अंगावर घालून त्याला तो अधिकार प्रदान करीत.] दिधलें : येकांतीं [मू. 'येकाती'.] बैसोनी दोघे गोष्टी करिती : सीहांकरवी संजीवकें पारधी वर्जवीली : तेधवां करकंटकु-दमनीकु-मुख्य स्वा[प*]दें भुका मरौं लागलीं : तेव्हेळीं करकंटकु दमनीकु विचारूं लागले : म्हणती : "आम्ही काये करावें? संजीवकें राजा वस्य केला आसे : आपणयासी [मू. आपणआसी.] राजा मानीत नाहिं : तरि सर्व मृगजनादीक परिवार क्षुधापीडीता होत सांतां परिवारू आनीके ठायां [मू. थायां (सकळ संकेत थ = ठ).] जाइल ॥ उक्तं च ॥

फलहीनं नृपं भृत्याः कुलीनमपि चोन्नतम् ।
संत्यज्यान्यत्र गच्छन्ति शुष्कं वृक्षमिवाण्डजाः ॥ ४६ ॥

कालातिक्रमणं वृत्तेर्यो न कुर्वीत भूपतिः ।
कदाचितं न मुञ्चन्ति भर्त्सिता अपि सेवका ॥ ४७ ॥

अपि सन्मानसंयुक्ता कुलीना भक्तितत्पराः ।
वृत्तिभङ्गान्महीपालं त्यक्त्वा यान्ति सुसेवका ॥ ४८ ॥

भ्रुत्ये जे फळहिन रायातें सांडौनि आणिकेया स्थाना [मू. स्छाना.] जाती : जया रायापासाव वृतीभंगु होये तया रायापासी राहुं न ये :" ऐसें दमनकु करकंटकाप्रती बोलीला : तवं दमनीकु म्हणे : "करकंटका : आम्ही हा संजीवकु आनीला : म्हणौनि आम्ही क्षुधा पीड (डा) पीडत असों : हा बोलु आम्हांसीची लागला ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

जंबुको मेषयुध्देन वयं चाषाढभूतिना ।
दूतिका परकार्येण त्रयोऽनर्थाः स्वयंकृताः ॥ ४९ ॥

जंबुक जो मेखयुधीं [मेषयुद्ध, मेंढ्यांची लढाई.] आपुण येऊनी मेला : आणी आखाडभुति [संस्कृत शब्द आषाढभूति.] पराभवीला : आर्थेन प्राण घेतला [देवशर्मा व अषाढभूति यांच्या कथेत. अथांमुळे=द्रव्यलोभामुळे शेवटी देवशर्म्याला 'धनपिसें' वेड लागून तो मृत्यू पावला, या कथाभागाला उद्देशून 'आर्थेन (=द्रव्याने, द्रव्यलोभाने) प्राण घेतला' हे म्हटलेले आहे.] : परकार्यें दुतीचें नाक छेदिलें : हे तीन्ही पदार्थ आपणपेंची [आपणाला.] केले [आपल्यावर केले, ओढवून घेतले.] : "हे कैसी कथा?" करकंटकु पुसे : दमनीकु सांगे :

कथा ५*
महात्मा देवशर्मा आणि जुआरी आखाडभूती

"कोन्हें येक नगरीं वीवक्त देशीं [(सं विविक्त=दूरचा, एकांतातील) वसतीपासून दूर असलेल्या, एकांतात असलेल्या प्रदेशात.] येकु मठु आसे : तेथें देवशर्मा [या कथेतील देवशर्म्याचे नाव सर्व प्रतीत आहे. **भा** प्रतीत मात्र नाही. इतर सर्वत्र, त्याचे वित्त हरणाराचे वर्णन "परवित्तापहारी' = चोर, असे केले आहे. आपल्या कथेत त्याला जुंवारी=द्यूतकार म्हटले आहे.] नावं माहात्मा आसे : तयासी लोकु बहुत मानी : भोजनाकारणें लोक प्रत्यहि बोलावी : बरवीं वस्त्रें द[क्ष*]णा लोक तयासी [**मू**. तीसी.] दे : तो ते वस्त्रें वीकी : इतुकेन तयासि कीती येकां दिवसा द्रव्य [**मू**. 'ड्रव्य'. (सकळ संकेत ड = द).] आपार जालें [पुष्कळ पैसा मिळाला.] । तें धन तेणें वेळुची काठि कोरौनि घातलें : सोनटंके ॥ ५०० ॥ ऐसें घालौनी ते काठि घडिभरि न वीसंबे [घटकाभर देखील ती काठी विसरत नसे. **विसंबणे** : [(सं. वि + श्रभ्) विश्वास टाकणे. काठीच्या बाबतीत घटकाभर देखील तो कुणावरही विश्वास ठेवीत नसे, दुसऱ्यावर अवलंबून राहात नसे; म्हणजेच त्या काठीला तो विसरत नसे, सोडीत नसे. म्हणून **विसंबणे** = सोडणे, दूर करणे. पाहा : 'आणि इसाळु जैसा घरा । कां दंदिया हातियरा । न **विसंबे** भांडारा । बद्धकु गा' (ज्ञाने. १३·५००); 'तो देखौनि अदेखणा : कहीं न **विसंबे** आत्मरमणा' (मूप्र. ७०२).] ॥ उक्तं च ॥

अर्थानामर्जने दुःखमर्जितानां च रक्षणे ।
आये दुःखं व्यये दुःखं धिगर्थाः कष्टसंश्रयाः ॥ ५० ॥

तवं तेथें बहुताकां दिवसां : आषा (खा)डभुती येणें नांव (वें)जुंवारी आला : तेणें ते काठी तर्कीली [काठीविषयी तर्क केला.] : म्हणे : 'हे काठी घडिभरी वीसंबित नाही : तरि ये काठीमध्यें काहि द्रव्य आसैल : हे काठि हाता ये ऐसें केलें पाहीजे :' ऐसें वीचारौनि तो मठासी आला : 'ॐ नमोः (मः) शिवाय' ऐसें म्हणौनी माहात्मेयासी साष्टांग प्रणिपातु केला : सकोमळा वचनें बोलता जाला ॥ उक्तं च ॥

"भगवन्, असारः संसारोऽयम् ["हा संसार असार आहे. पर्वतावरून वाहणाऱ्या नदीच्या वेगाप्रमाणे (लौकर वाहून जाणारे असे) तारुण्य आहे. आग लागलेल्या गवताप्रमाणे हे जीवित आहे. आणि शरद्ऋतूतील आभाळाच्या छायेप्रमाणे (लौकर नाहीसे होणारे) भोग आहेत." (संस्कृत श्लोक ५१ चा भावार्थ).],

गिरिनदीवेगोपमं यौवनम् ।
तृणाग्निसमं जीवितम्, शरदभ्रच्छायासदृशा भोगाः” ॥ ५१ ॥

ऐसें म्हणौनी माहात्मायांपुढें : करसंपुष्ट जोडौनी [मू. जौनि.] उभा राहिला : म्हणे : “गोसांवी मजवरि अनुग्रहो कर (रा)वा : उपदेसु द्यावा :” मग महात्मेनी पुसिलें : “तुं कोणु? येथें कां आलासी?” तो म्हणे : “जी : मज मायबाप नाही : आसकीं दुर्भीक्षीं नीवर्तलीं : मज काही नाही : स्वामी : मज वैराग्य उपजलें : म्हणौनी गोसावीयासी सरण आलों : संसारू आसका मिथ्यावाद [मू. मिथावाद.] : या आंतु यक साजें श्रीगुरूचरण [या मिथ्या संसारात श्रीगुरुचरण हेच काय ते एक **साजें**=खरे. सं. सत्य>साच>साज. **साजें**= शोभिवंत असा नेहमीचा अर्थ आहे. पण **मिथ्या** संसारात फक्त गुरुचरण तेवढे (मिथ्याच्या विरूद्ध) सत्य=साच=साजे आहेत, हा अर्थ अधिक योग्य वाटतो. **च** या वर्णाचा येथे **ज** झाला आहे.] :” मग माहात्मा म्हणे : “मी तुज सीक्ष [सं. शिष्य> सिक्ख. यातील **क्ख** साठी **क्ष** लिहिला आहे.] करीन : परी तुवां मठाबाहिर नीजावें :”
“हो कां [होय. ठीक आहे, होय की. पाहा : ‘तवं तेया सुसरें हो कां म्हणितलें’ (पंचतंत्र. भावे. पा. ५०).] :” म्हणौनि मठाबाहिर आसे : ऐसा सकोमळा [वचनीं] रीगावा केला : मग तो भीक्षा मागे : मग यापरि [मू. **आ**परि. यापुढील काही अक्षरे गेली आहेत.] .... तें म्हणे : “आरे आखडभुति : तुं आम्हासांगातें येसील?” तवं तो म्हणे : “मज गोसावीयाचे चर्ण सोडनें नाही :” मग दोघे नीगाले :

मार्गीं जातां अस्तमान जालें : कोन्ही येका नगर पावलें : तीये नगरीं मद्यपानरत [मू. मद्य**मा**नरत.] साळी येकु आसे : तयाचीय गृहीं जाउनि तेहीं त्या साळीयासी म्हणतीलें : “आरे यजमाना : आम्ही या गावांत कोन्हासी नेणुं : तरि तुवां आतीथ्यधर्मु केला पाहिजे : कां जें आतिथ दुर्ल्भु
॥ उक्तं च ॥

संप्राप्तो योऽतिथिः सायं सूर्योढो गृहमेधिनाम् ।
[पूजया तस्य देवत्वं प्रयान्ति गृहमेधिनः ॥ ५२ ॥

तृणानि भूमिरुदक वाक् चतुर्थी च सूनृता*] [श्लोक ५२ मधील दुसरी व श्लोक ५३ मधील पहिली ओळ मुळात गळाली **आहे**.]
सतामेतानि हर्म्येषु नोच्छिद्यन्ते कदाचन ॥ ५३ ॥

॥ तथा च ॥

स्वागतेनाग्नयस्तृप्ता आसनेन शतक्रतुः ।
पादशौचेन पितरः अन्नाद्येन प्रजापतिः ॥ ५४ ॥

जरि अतिथासि ये म्हणीजे : तरी आग्नि प्रसंन्न होये : आसन दीधलेयां [मू. दीधलेआ.] ईंद्र प्रसंन्न होय : पदार्थ केलेयां [मू. केलेआं.] पितर तृप्त होती : आतिथासि

आंन्न दिधलेयां प्रजापती ब्रह्मा तृप्त होती : तरि आम्ही तुझे आतिथ :" ऐसें तयाचें वचन आईकौनी साळी आपुलीये स्त्रीयेसी म्हणे : "या अतीथासी तुवां शयनभोजन द्यावें : तवं मी मद्यपान करूनी येत आसौं :" ऐसें म्हणौनी साळी नीगाला : तवं त्याची स्त्री वीभिचारिणि : ते म्हणे : "आतां भर्तारू घरिं नाही : आतां सीना[ना*]ळापासी [(दे.प्रा. छिण्णाल) व्यभिचारिणी स्त्रीचा प्रियकर, जार. दे.प्रा. 'छिण्णाल' पासूनच 'छिनाल'=व्यभिचारिणी स्त्री, हा शब्द मराठीत आला आहे.] जाईन :" ऐसा [**मू.** ऐस.] हा स्त्रीयेचा स्वभावो असे : हें घडे ॥ उक्तं च ॥

दुर्दिवसेऽसितपक्षे दुःसंचारासु नगरवीथीषु ।
पत्युर्विदेशगमने परमसुखं जघनचपलायाः ॥ ५५ ॥

॥ तथा च ॥

पर्यङ्केष्वास्तरणं पतिमनुकूलं मनोहरं शयनम् ।
तृणमिव लघु मन्यन्ते कामिन्यश्चौर्यरतलुब्धाः ॥ ५६ ॥

कृष्णपक्षीं दुःसंचार नगरवीथिचां ठाईं : आणी भर्तारू गांवीं गेला आसतां चपळजघना [चपल आहेत जघन जीचे, जिच्या मांड्या नेहमी (परपुरुषांशी संभोग करताना) हलत असतात अशी स्त्री, छिनाल. मूळ संस्कृत श्लोकात 'जघनचपला' असा शब्दा आहे.] जे व्येभीचारणी : तीसी परम [सुख*] [मुळात 'परम पुरूस' असे आहे. संस्कृत श्लोकाच्या अनुषंगाने विचार केला असता येथे 'परम सुख' असे पाहिजे. त्याप्रमाणे दुरूस्त करून घेतले आहे. 'परम पुरूस' याऐवजी 'पर पुरूस' अशीही दुरुस्ती करणे शक्य आहे. पण त्यात संस्कृत श्लोकातील अर्थ येणार नाही.] होये : आणी व्यभीचारणीचा स्वभावो कैसा? भर्त्तारांचीये गृहीं पर्यंकावरि बरवें वस्त्र आंथरुण : पती जो तो आपणयासी अनुकुळ : बरवें मनोहर गृह : इतुकें चौरियेरत [चौर्यात, चौर कर्मात, चोरून परपुरुषांशी संभोग करण्यात, रममाण झालेली. चौर्य याचे अपभ्रष्ट रूप चौरिये. (य या अर्धस्वराचा उच्चार ए सारखा होतो म्हणून य हे अक्षर उच्चारानुसारी पद्धतीने ये असे लिहिले जाते, हे लक्षात ठेवावे. याची अनेक उदाहरणे प्रस्तुत ग्रंथात आहेत.)] जीया कामिनी त्या तृणसमान [**मू.** तृणसामान्य.] लघु मानति : ऐसें तया देवशर्मा ['व्यभिचारी स्त्रिया, आपल्या पतीच्या घरातील मंचकावरील सुंदर चादर, बिछाना, आपल्या आधीन असलेला पती, सुंदर घर इत्यादी सर्व गोष्टी तृणाप्रमाणे तुच्छ मानतात' असा भावार्थ.] माहात्मासी मोडकी खाट दीधली : [तया*] प्रती ऐसें बोलीली : "स्वामी हो : तुह्मी दोघे नीद्रा करा : तवं मी बाहिर होउनी [बाहेर जाऊन, बाहेरून. 'होउनि' या धातुसाधितापासूनच पंचमीचे हून, ऊन, हे प्रत्यय सिद्ध झालेले आहेत.] यत आसें : तवं तुह्मी जागत असावें :" ऐसें म्हणौनी शृंगारू केला : मग सीनाळाचें घरिं जात आसे : तवं ती[चा भ*]र्तारू साळी : वाटे एतां सन्मुख देखीला : मद्यपानें [**मू.** मद्यपणे.] नेत्र आरक्त जालेती : तो देखौनियां मागुती पळौनी घरासी आली : शृंघारू फेडीला : ऐसें तेणें साळीयें देखीलें : म्हणे : "रांडे सीनाळी : भीन्न रात्रीं [भिन्न=घोटलेले, मर्दन केलेले. (तुळा : 'उत्पश्यामि त्वयि तटगते स्निग्ध **भिन्ना**ञ्जनाभे'—मेघदूत ५९. 'स्निग्धं मसृणं **भिन्नं मर्दितं** च यदञ्जनं'—मल्लिनाथ; 'क्षणेन **भिन्ना**ञ्जनवर्णतां घनाः' शिशुपालवध. १२-६८; 'भिन्नाञ्जनतां स्नेह**मृदित**कज्जलवर्णतां'—मल्लिनाथ). यावरून **भिन्न रात्र**=घोटलेली रात्र; जिच्यातील अंधार घोटून काढलेला आहे अशी गाढ रात्र; रात्रीचा गाढ अंधार. (**काळाकभिन्न** या शब्दातील 'कभिन्न' शब्द कानडी **कब्बिण्ण**=लोखंड=लोखंडाप्रमाणे काळा, असा व्युत्पादतात. 'भिन्न' हा शब्द 'कभिन्न'चेच रूप असेल काय?)] कोठे जात होतिसी?" तवं ते म्हणे : "मी तुजपासि येत होतीं : तुं मद्यपानें [**मू.** मदपानें.] भलतेंचि बोलसी :" ॥ उक्तं च ॥

वैकल्यं धरणीपातमयथोचितजल्पनम् ।
संनिपातस्य चिह्नानि मद्यं सर्वं च दर्शयेत् ॥ ५७ ॥

ऐसा तीचा शब्द आइकौनि साळी कोपला : म्हणे : “रांडे [मू. ‘राडे’.] सीनाळी : बहुत दीवस म्यां तुझा आपवादु आईकीला होता : तो आजी म्यां डोळां देखीला : ऐसी तुं चंचळ : तरि आजी तुतें सीक लावीन [सीक=शिक्षा करणे. पाहा : ‘मज गोसांवीं **सीक लावीली** : माझी खोडी सांडवीली’ (गोप्रच. १०९).] :” म्हणौनि तेणें सुबंध मारौनि [(सं. सुबद्ध पासून म. सुबंध.) या शब्दाचा मूळार्थ मजबूत, घट्ट असा आहे. जोराने मारताना काठी मजबूत धरावी लागते. यावरून ‘सुबंध मारणे=जोराने मारणे, खूप बडवणे, असा वाक्प्रचार झालेला दिसतो. हाच शब्द पुढे पा. ६८·५ ; १५५·७ मध्ये आलेला आहे, तो पाहावा. तुळा. ‘येरू न सोडी त्यातें । धरीला **सुबंध** हातें । आवळीलें मुष्टिघातें । प्राण निघेवरी’ (कृष्णदास शामाविरचित श्रीकृष्णचरित्रकथा. अवसर १६·६३).] पटसाळें स्तंबेसी बांधिली : ते रडुं लागली : तो साळी जाउनी घरामध्यें निजैला : मदिरापानें [मू. मद्धि रा पानें.] नीद्रा [मू. ‘नीड्रा’ (सकळ संकेत ड = द).] आली : तवं तियेप्रति सीनाळें न्हावीन दुती पाठवीली : “तुझेंनी मीत्रें तुज बोलाउं पाठवीलें आसे : तो तुझी वाट पाहातु आसे : तरि तुं चाल :” तवं सीनाळी म्हणे : “मज बांधौनी त्या पापीयासी नीद्रा आली आसे : मी कैसेनि येउं?” तवं ते वारिकीनी दुती म्हणे : “मज बांधौनि तुं त्यापासि जाउनी ये :” ते म्हणे : “बरवें :” मग तीसी बांधौनी ते सीनाळपासी गेली [मुळात यानंतर ‘ते तीसी बांधौनी गेली’ असे वाक्य चुकून पुन्हा लिहिले गेले आहे. ते संहितेत गाळले आहे.] : मग क्षेण येकां तो साळी जागीनला : बाईलेतें पाचारिलें : तवं ते न बोलेची : मग [तीचें] [हा शब्द येथे चुकून लिहिला गेला असावा. पुढे तो पुन्हा आलेला आहे.] मातलें छंद करूनि [माजलेपणाचे, उन्मत्तपणाचे चाळे करून.] तीचें नाक कापीलें : म्हणे : “रांडे [मू. ‘राडे’.] : सीनाळनी : तुज बरवी सीक लावीली :” ऐसें म्हणुनी मागुता जाउनी घरामध्यें नीजेला : तें चरित्र आवघें माहात्मेनी देखीलें : तवं ते सीनाळी मागुती भोगसंभोग करौनी घरासी आली : तवं ते दुती म्हणे : “तुज-नीमीत्य मज वीटंबना जाली :” मग ते सीनाळी दुतीचां पायां लागली : म्हणे : “क्षेमा करी :” मग आपणेयातें बांधवीलें : दुती आपुलेया घरा गेली : तवं तो साळी मागौता [मू. ‘माळौता’ (सकळ संकेत ळ = ग).] चेईला : बाईलेतें पाचारूं लागला : तवं ते न बोलेचि : तवं तो म्हणे : “नकटीये : कां न बोलसी? नाहीतरी आतां कान कापीन :” ते म्हणे : “नकटी तुझी आई : तुझी बहिन : मी पतीवृता आसैन तरि माझें नाक जैसें होतें तैसेंचि होईल : ऐसें यासी [सा*]क्ष आष्टौदीक्पाळ [मू. ‘दाक्पाळ’. अष्टदिक्पाळ, आठही दिशांचे स्वामी. ‘इन्द्रो वन्हिः पितृपतिर्नैऋतो वरुणो मरुत् । कुबेरईशपतयः पूर्वादीनां दिशां क्रमात्’ ही अष्टदिक्पालांची नावे. ह्या देवता या आठ दिशांचे स्वामी असून त्या दिशांचे पालन करतात अशी पौराणिक समजूत आहे.] आसती ॥ उक्तं च ॥

आदित्यचंद्रावनिलोऽनलश्च द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च ।
अहश्च रात्रिश्च उभे च संध्ये धर्मो विजानति नरस्य वृत्तम् ॥ ५८ ॥

पुरुषाचे धर्म आधर्म ईतुके जानती : आदित्य : चंद्र : वायो : आग्नी :

अनुक्रमणिका

आकास : भुमी : उदक : आपुलें ह्रदये : यम : रात्री : दीव : दोन्हि संधा(ध्या)काळ ['सम्यक् ध्यायते यस्यां' ती सध्याकाळ. सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर ध्यानाची वेळ असते. म्हणून 'दोन्ही संध्याकाळ' असे म्हटले आहे.] : ऐसे माझे साक्ष आसती :" ऐसे ते बोलीली : मग तो साळी या बोलासरिसा उठला : वाती लावीली : जवं पाहे तवं तीचें नाक जेसेचें तैसेंचि असें : मग वीसमीत होउनी तीतें सोडीलें : मग पायां लागला : मग म्हणे : "मज बोलु लागला : क्षमा करावी : तुं पतीवृतासीरोमनी :" ऐ[सें*] म्हणौनी बुझावीली : तें सर्व चरित्र माहात्मेनि देखिलें : मग विस्मीतु जाला ॥ उक्तं च ॥

शंबरस्य च या माया या माया नमुचेरपि ।
बलेः कुम्भीनसेश्चैव सर्वास्ता योषितो विदुः ॥ ५९ ॥

अनृतं सत्यमित्याहुः सत्यं चापि तथानृतम् ।
चपलास्ता कथं धीरैः संरक्ष्याः पुरुषैरिह ॥ ६० ॥

समुद्रवीचीव चलस्वभावाः संध्याभ्ररेखेव मुहूर्तरागाः ।
स्त्रियः कृतार्थाः पुरुषं निरर्थं निष्पीडितालक्तकवत्त्यजन्ति ॥ ६१ ॥

"जे संबरासुराची [शंबर नावाचा असुर.] माया : जे राक्षेसीची माया : ते माया सर्वहि योशीता जाणती : म्हणौनी स्त्रीचरीत्र कळे [**मू.** 'केळे'.] ना ॥ उक्तं च ॥

संमोहयन्ति मदयन्ति विडम्बयन्ति निर्भर्त्सयन्ति रमयन्ति विषादयन्ति
एताः प्रविश्य सदयं हृदयं नराणां किं नाम वामनयना न समाचरन्ति ॥ ६२ ॥

स्त्री पुरुशातें घडीमध्यें मोहातें [**मू.** 'माहातें'.] पाववी : घडिमध्यें मदातें करवी [मदोन्मत्त करते.] : घडीमध्यें वीटंबी : घडिमध्यें नीभ्रंसी : घडिमध्यें रमवी : घडीमध्यें वीशादातें करि [विशाद=दुःख निर्माण करते.] : तरी सदय जें पुरुषाचें ह्रदय त्यातें प्रवेसौनि काय न करिती?" ऐसा माहात्मा वीश[मीत*] [हा शब्द 'विशमीत' (विस्मित) असा असावा.] होउनि बोलों लागला :

तवं ते दुतीका छिंननासीका होउनी : गृहाप्रति जाउनी विचारीती जाली : म्हणे : "हें नाकीचें छीद्र कैसेनी ढापावें? भर्तारासी काय ज्वाब देईन?" ऐसी चींता करितां तीचा भ्रतारू रात्रीं राज्यगृहासी राजाचीये वोळगें गेला होता तो प्रातःकाळीं घरासी आला : बाईलेसी म्हणे : "कव (वा)ड उघडि :" [तवं*] [येथे कागदाला छिद्र पडलेले आहे. पुढील 'ते' या शब्दापूर्वी 'ी' असे अस्पष्ट चिन्ह दिसते. त्यावरून येथे 'तवं' हा शब्द असावा असे दिसते.] ते न उघडेची : मग तो म्हणे : "रांडे : कवाड उघडि : फनीआरें [स्त्रियांच्या वेणीफणीचे सामान ठेवण्याची पेटी. हाच शब्द पुरुषाच्या स्मश्रूचे (हजामतीचे) सामान (वस्तरा वगैरे) ठेवण्याच्या पेटीसाठीही वापरला जातो. महालिंगदासानेही या ठिकाणी हाच शब्द वापरला आहे. 'तो बाईलेशी म्हणे । घरांतुल **फनीयारें** देनें । येरी सुर काढोन ततक्षणे । बाहीर टाकोन दिधला ।' (पंचो. **म.** प्रत. ३६८). आपल्या पोथीत य साठी अ अनेक ठिकाणी लिहिलेला आहे. हे लक्षात घेता 'फनी(णी)**आरें**'=फणी**यारें** हेही रूप अभिप्रेत असू शकेल.] दें : दीवसु उगवला : रायाची डाहाडी करावया

अनुक्रमणिका

जाउ :” तवं त्या फणीआराआंतौनि : सुर येकु कवाडाआंतौनि टाकीला : तवं तो म्हणे : “हा सुरू वाहात नाहि [चालत नाही. आतून वस्तरा फेकल्यामुळे तो जमिनीवर पडला. त्याची धार बोथट झाली. म्हणून तो ‘वाहात नाही’] : आणीकु सुरू दे :” म्हणौनि तो सुरू मागुता तीयेप्रती टाकीला : तवं त्या हांक दीधली : हृदय पीटिलें : म्हणे : “येणें पापीयें माझेया नाकावरि सुरू टाकीला : नाक कापीलें :” ऐसी आक्रांदुं लागली : वारिकासी लोकें म्हणीतलें : “तुझा अंन्यावो थोरू जाला :” मग तेणें वारिकें स्त्री बुझावीली : नासीकासि वोखद केलें [औषध लावणे. ‘औषधपाणी करणे’ हा वाक्प्रचार आजही प्रचारात आहे.] :

ऐसें सर्व चरित्र देखौनि प्रातःकाळीं माहात्मा [मू. ‘मात्मया’.] आणी आखाडभुती तेथौनी नीगाले : तेथौनि …….. दुरि [पावले] [‘तेथौनी दुरि……लें’ असे हे शब्द पानाच्या उजव्या बाजूकडील समासात लिहिले आहेत.] तवं तेणें [मू. ‘तणें’.] मा[हा*]त्में आखाड[भु*]तीचें माथां काडी देखीली : “आरे आखाडभुती : माथांची काडि फेडि :” तो म्हणे : “हे काडि त्या साळीचे वळचनीची : हे काडि जेथेचि तेथें ठेवीन :” म्हणौनि मागुता मुरडला : माहात्मा म्हणे : “बापु नीष्टा कैसी!” मग तो परता जाउनी काडि टाकौनी आला :

मग दोघे जाताती : तवं वाटे दोघी मेढें जुझतां देखीले : कपाळें फुटलीं आसतीं : तवं खाली असुध सांडता [मू. साडता.] देखौनि : कोल्हा यकु आसुध्य चाटा-वया [मू. चाटावआ.] आला : तो त्या दोघांचीये झडेमाजी पडला : आपेंआप मेला :

तें चरित्र माहात्मेनि देखीलें : मग सीक्षासी भेटौनी दोघें घरासी आले : आखाडभुतीचा वीस्व (स्वा)स [पोथीत हा शब्द लिहिताना **व** चा दंड लिहिण्याचे राहून गेले आहे.] मानीला : “आरे आखा [ड*]भुती [मू. ‘आषाभुत’.] : अर्थु जुडे तो प्रकार कीजे :” तवं तो म्हणे : “स्वामी : अर्थ कष्टरूप : मज वीशयापासाव नीवृत्ति होये तो पदार्थ [मू. पदाथु.] करावा : विशय नासीवंत : मज गोसावीयें आत्मा (त्म)साधन सांगावें : पींडु उरे : परत्र जुडे :” या बोला माहा[त्मा*] संतोसला ॥ उक्तं च ॥

पूर्वे वयसि यः शांतः स शान्त इति मे मतिः ।
धातुसु क्षीयमाणेषु शमः कस्य न जायते ॥ ६३ ॥

पूर्वी जो शांतु [पूर्वी =पूर्व वयात, तारुण्यात. शरीरातील ‘धातु (वीर्य, शक्ती) क्षेण (क्षीण) जालेयां (झाल्यानंतर) सर्वांच्याच ठिकाणी शांतता (शम) निर्माण होते.’] तोच शांतु म्हणीजे : धातु क्षेण जालेयां कोणासी पां शांतीपण न ये? मग तयासी [मू. तआसी.] माहात्मेनी उपदेशु दीधला :

तवं एकें दीवसीं प्रजन्यु [(पाऊस) आति (पुष्कळ) वर्सु (वर्षुं) लागला (पडू लागला).] आ (अ)ति वर्सु लागला : वांकडि [पावसाची झड. पाहा : ‘थुई तुषार पाऊस झडीचें नांव **वांकडी**’ (भाषाप्रकाश. १३·२४) : तुळा : ‘कीं द्राक्षमंडपु नव्हे मेहुडें : वरिखत रसांचें **वांकडें**’ (नरुस्व. ५२३); ‘ऐसी तीन दीस **वाकडी लागली**’ (गोप्रच. २४२).] लागली :

मग माहात्मा म्हणे : “आरे आखाडभुती : तुं भीक्षेलागी जायें :” तवं तो म्हणे : “जी, मज स्वानापासाव मृत्य आसे : ऐसें जोतकीं आसे :” तवं तो म्हणे : “आरे मुर्खा : हे माझी काठी घेउनी जायें : लवकरूनि [घाई करून, वेग करून, लौकर. यातील मूळ शब्द **लव**=क्षण, थोडा वेळ. ‘लव करूनि’=थोडा वेळ करून, अर्थात, थोड्या वेळात. लव+करि(कृत्वा)=लवकर, लौकर. अत्यल्प वेळात काम आटोपण्यासाठी घाई करावी लागते. म्हणून लव=घाई, असाही अर्थ या शब्दाला आलेला आहे.] यें :” तेव्हेळीं तो आखाडभुती हरखैला : काठी घेउनि नीगाला : तो मागुता न य (ये)ची : मग तो माहात्मा धनपीसें लागुनी मृत्य पावला : म[र*]न समईं तेणें श्लोकु म्हणीतला ॥ उक्तं च ॥

जम्बुको मेषयुद्धेन वयं चाषाढभूतिना।
दूतिका परकार्येण त्रयोऽनर्थाः स्वयंकृताः ॥ ६४ ॥

तैसें दमनकु म्हणे : “करकंटका : तैसा हा संजीवकु बैलु : आम्ही आपणेयां [मू. आपणेआं.] वैरी केला : आतां कैसी बुधि कीजे? आमचा राजा आम्ही व्यसनीं पाडीला : आम्ही मासभक्षकु : हा तृणचरू : यणें आम्हांसी उपवास पाडिले : राजा बळक्षीणु जाला : तृणचरासी आम्ही मैत्रकी करूनी भुका मरतौं : तरि आतां जाउनी पींगळीका आणी संजीवकासी भेदु करि : उपाय करौनि यासी मारै ॥ उक्तं च ॥

उपायेन हि यत्कुर्यात्तन्न शक्यं पराक्रमैः।
काक्या कनकसूत्रेण कृष्णसर्पो निपातितः ॥ ६५ ॥

उपाय बुधी करुनि जें काहि होये तें पराक्रमें न होये : जैसा काउळीया हार उपाव करौनि कृष्णसर्पु नीपांतीला :” “ते कैसी कथा?” करकंटक पुसे : दमनकु सांगे :

कथा ६*
कावळा आणि सर्प

पूर्वी एका [मू. ऐका.] वटवृक्षाचां ढोलरिं काउळा काउळी दोघी आसती : तवं त्या ढोलारामध्ये सर्प येकु राहुनि वस्ती येकी केली आसे : तेणें सर्षे काउळ्याचीं पीलीं खादलीं [मू. खाडलीं. (सकळ संकेत ड = द).] : [ते* काउळी काउळातें म्हणे] [मुळात हे वाक्य ‘तो काउळा काउळींतें म्हणे :’ तथापी, पुढे ज्याअर्थी कावळ्यानेच घर न सोडण्याचे सांगून सर्पाच्या नाशाचा उपाय सांगितला आहे त्याअर्थी ‘ऐसा ठाईं राहुं न यें’ असे कावळ्याने म्हटले असणे शक्य नाही. ‘काउळीने कावळ्याला म्हटले’ अशाच अर्थाचे वाक्य येथे असावे. त्याप्रमाणे मुळात दुरुस्ती करून घेतली आहे.] : “ऐसा ठाईं राहुं न ये ॥ उक्तं च ॥

यस्य क्षेत्रं नदीतीरे भार्या च परसंयुता।
ससर्पे च गृहे वासः कथं स्यात्तस्य निर्वृतिः ॥ ६६ ॥

जयाचें क्षेत्र नदीतीरीं : आणी भार्या परपुरूसरत [पती सोडून दुसऱ्या पुरुषाबरोबर रममाण होणारी.] : ससर्पि गृहीं [सर्प असलेल्या घरात. जेथे सर्प आहे अशा घरात.] वासु :

अनुक्रमणिका

तयासी कैसें राहाणें होये?” तरी काउळी म्हणे : “ये वृक्षीं आसतां प्राणनासु होईल ॥ उक्तं च ॥

तत्र गृहे न वस्तव्यं यत्र सर्पो निरंतरम् ।
कदा च वसतीं कुर्यात् प्राप्यते मरणं ध्रुवम् ॥ ६७ ॥

काउळा म्हणे : “तुं प्रिये [मू. प्रथे.] : दुःख [नको] करूं : हा सर्पु मरे ऐसा [मू. ऐसा.] उपावो आसे :” ॥ उक्तं च ॥

उपायेन जयो यादृग्रिपोस्तादृङ्न हेतिभिः ।
उपायज्ञोऽल्पकायोऽपि न शूरैः परिभूयते ॥ ६८ ॥

ते काउळी म्हणे : “तो उपावो कैसा?” काउळा सांघे : तो म्हणे : “रायाची राणी शनिवारें आनी बुधवारें [शनिवारी आणि बुधवारी. संस्कृत कथेत कावळ्याचा मित्र कोल्हा त्याने युक्ती सांगितली ती अशी की, नगरातील एखाद्या श्रीमंताच्या घरातील सुवर्णहार ढोलारात आणून टाकावा. आपल्या कथेत कोल्हा नाही. कावळ्यानेच युक्ती सांगितली. त्यात श्रीमंताच्या ऐवजी राणीचा उल्लेख आहे. तिचा हार ढोलारात आणण्याची ही युक्ती.] न्हाआती आसे [न्हात असते. ‘तरि तुवां जाउनि’ यापुढील काही वाक्ये पोथीत गळाली आहेत. ‘तरि तुवां जाउनि [राणीचा अळंकारू आणावा तो ढोलारामध्यें घालावा’] इत्यादी. अशा आशयाची वाक्ये येथे असावी. ती मी संहितेत घातली आहेत.] : न्हातां आपुले अळंकार-भुशणें फेडौनी भुमी ठेवीत आसे : तरि तुवां जाउनि [या पुढील काही ओळी गळाल्या, हे स्पष्ट दिसते. कथासंगतीसाठी त्या येथे संस्कृत कथेतील वाक्याच्या अनुरोधाने घातल्या आहेत.] : [राणीचा अळंकारु आणावा : तो ढोलारामध्यें घालावा : जेणें रायाचे सेवक सर्पातें मारती :” काउळी गेली : राणीचा अळंकारु आणिला : तो*] नवरत्नाचा [‘मुक्तामाणिक्यवैदूर्यगोमेदा वज्रविद्रुमौ । पद्मरागो मरकतं नीलश्चेति यथाक्रमं’ मोती, माणिक, वैदूर्य, गोमेद, वज्र (हिरा), विद्रुम (पोवळे), पद्मराग, मरकत व नील—ही नऊ रत्ने होत.] हार ढोलारामध्यें घातला : तेथें रायाचे सेवकीं देखीलें : तेहीं रायासी जानवीलें : मग सेवकीं तें ढोलर जाळीलें : तेथें सर्पु मेला : तेथौनी हारु काढीला : तो राणीहातिं दीधला :”

दमनीकु म्हणे : “करकंटका : तैसा उपावो संजीवकासी करउं : आनीकु उपावो असे : तो आईक :” ॥ उक्तं च ॥

भक्षयित्वा बहून्मत्स्यानुत्तमाधममध्यमान् ।
अतिलौल्याद्बकः कश्चिन्मृतः कर्कटकग्रहात् ॥ ६९ ॥

दमनीकु उपावो सांगे :

कथा ७*
वृध्द बक आणि किरिचील

“कोन्ही येकें सरोवरिं येकु बगु बैसला आसे : आतिवृधु : क्षुध्येकरौनि

अनुक्रमणिका

दुर्बळु : ऐसा बगु सरोवरातटीं बैसौनी रोजना [सं. रुदन, रोदन> म. रोजन. मध्य द चा येथे ज झाला आहे.] करितु असे : तवं तेथें येकु कीरीचीलु [खेकडा. सं. कुरचिल्लं. संस्कृत 'पंचतंत्रा'त मात्र या ठिकाणी 'कुलीरक' असा शब्द वापरला आहे.] आला : तयाचेनी दुखें दुखीतु जाला : तया बगाप्रती बोलता जाला : तो म्हणे : "मामो : तुं कां आजी आहारवृती [आहाराची (भोजनाची) वृत्ति=नित्यक्रम. भोजनाचा नित्यक्रम तू आज का सोडलास?] त्येजीली? केवळ रूदन करीतु आसीसी : तरि काय कारणें तें मजप्रती सांघ :" तवं तो बगु म्हणे : "भासेया [भाचा.] : म्यां सांप्रत प्रायोपवेशन केलें असें : मज परंम वैराग्य [मू. वैराग.] आलें आसें : समीपवर्तमान [(जवळ) **वर्तमान** असलेल्या मत्सातें'—] मत्सातें मी भक्षित नाहीं :"

ऐसें कीरीचीलें आईकौनि तयाप्रति बोलता जाला : "मामो : तुवां वैराग्य कां धरिलें । तें कारण मजप्रति सांघ :" तो म्हणे : "भाचेया [मू. भाभाचेया.] आईक : जोतकीं ब्राह्मणाचेनि मुखें म्यां ऐसें आईकीलें : जे सनीस्वरु ['सनीस्वरू रोहिणी शकटातें भेदुनि—' इत्यादी. या वाक्यातील भावार्थाची पुनरुक्ती पुढे १६ व १७ व्या ओळीत झालेली आहे.] रोहिणी-शकटातें भेदौनि : भौम शुक्रावरि येईल : तै बारा वरूसें आनावृष्टी होईल :

॥ उक्तं च ॥

यदि रोहिण्याः शकटं भिन्ते रविनन्दनो भूमिसुतः ।
तदा द्वादश वर्षाणि नहि वर्षति वासवो भूमौ ॥ ७० ॥

पृथ्वीमाजी सनीस्वरु रोहीणीतें भेदुनि भुमीसुत सुक्रावरि ये : तै बारा वरूशें वासवो म्हणीजे ईंदु [मू. 'ईद्रु'.] वरुशे ना : म्हणोनी : ये सरोवरीं मि वृधितें [सं. वृद्धिः, वाढ, मोठेपण] पावलों [या सरोवरात मी मोठा झाली.] : तरि ये सरोवरिं स्वल्प तोय आसें : तरि हें आल्पा दिवसामध्यें शोखातें पावैल [शुष्क होईल; कोरडे होईल. हे सरोवर वाळल्यावर (पाणी आटून कोरडे झाल्यावर) **मछाचें** (माशाचें) **बीजमात्र** (लहानसे बीज देखील, लहानसा मासा देखील)] : तरि हा सरोवरू वाळीलेयां बीजमात्र मछाचें उरे ना [सर्व मरतील.] : आणि मी ज्या संगातें वृधीतें पावलों : आनी ज्या संगातें क्रीडा केली ते मरति : आतां सर्वहि तोयआभावास्तव ना[शा*]तें [पाण्याच्या अभावामुळे, पाणी नसल्यामुळे.] पावति : तरी तयाचा वीयोगु मज साहवे ना : म्हणौनि मी उपवेसनीं [(सं. उप+विश्) जवळ बसणे; लक्षणेने उपोषणाला बसणे, अन्नत्याग करून बसणे. 'मी उपवेसनीं बैसलां...आणि हे जळचरें (मात्र) निश्चींत असती' यांना कशाचीच चिंता वाटत नाही, हे आश्चर्य होय.] बैसलां : आणी हे जळचरें निश्चींत [मू. निश्चीत.] असती :" ऐसें तयाचें वचन तेणें कीरीचीलें आईकीलें : मग तो जळचरापासि यउनी बोलता जाला : त्यासी तो वृतांतु सांघीतला : मग ते सर्वहि जळचरें : मछ कछ आदिकरुनी भयत्रस्त [मू. भयत्रास्त.] होउनी मग ते बगापासी [मू. बागा०.] येउनि बोलते जाले : म्हणति : "मामो : कोन्ही [मू. कोन्हा.] येकु उपावो आसे?" तो म्हणे : "येथौनि अर्धकोस : आति प्रचंड डोहो उदकें पुर्ण आसे : तेथें जाईजे तरि वांचीजे :" ते जळचरें म्हणती : "मामो : तया उदकास्थानापासी [मू. उदकास्छानीपासी.] आमतें घेउनी जायें :" मग तो म्हणे : "बरवें : माझीय पाठीवरि बैसा : मी तया उदकास्थानासी [मू. ०स्छानासी.] नेईन :" म[ग*] कीती [मू. कांती.] येक जळचरें पाठीवरि बैसौनि एकी सीळातळीं नेउनी भक्षुं लागला :

तवं दीवसा दोचौ [दोनचार दिवसांनी.] कां कीरीचीलु [मू. करीलु.] म्हणे : "तुजसवें मज प्रथम संभासन जालें : स्नेह [मू. स्नहे.] वाढवीलें : तरि मातें टाकौनि आनीकातें नेतोसी : मछातें नेतोसी : तरि माझा प्राण राख : तरि मातें खांदां बैसौनि नें :" मग तो खांदेवरि बैसवीला : जवं शीळेजवळी आला तवं तेनें मछाचीं हाडें देखीलीं : मग मनीं वीचारिता जाला : "हा मातें भक्षील :" मग बगाचीया गळां दोन्ही सांडस [सं. संदंश. दंश करणारा दात अथवा नांगी. दोन्ही सांडस=दोन्ही नांग्या (दोन्ही नांग्याची पकड) लावल्या. सांडस=पकड, असा अर्थ आहे तो वरील व्युत्पत्तीने. सांडशीचे दोन्ही भाग पकडलेल्या वस्तूला जणू डसतात. ते भाग म्हणजे दोन नांग्याच होत.] लावीलें : ऐसा उपावो करौनि बगु मारिला : ऐसा तो कीरीचीलु उदकस्थान [मू. ०स्छान.] टाकौनि आला : येर आवघीं जळचरें [मू. जळचरि.] वांचलीं :

म्हणौनि उपावो वेगा करणें लागे :" दमनीकु म्हणे : "तैसा हा संजीवकु उपाय करूनि मारूं : यणें आमची आवज्ञा केली : म्हणौनी उपावोबुधी वेगी करावी लागैल :
॥ उक्तं च ॥

बुद्धिर्यस्य बलं तस्य निर्बुद्धस्य कुतो बलम् ।
वने सिंहो मदोन्मत्तः शशकेन निपातितः ॥ ७१ ॥

जया बुधी तयासि बळ : निर्बुद्धीसी कैचें बळ? जैसा मदोन्मतु सीहुं सषेनि बुधी करौनी नीपांतीला :" "हे कैसी कथा?" करकंटकु पुसे : दमनीकु सांगे :

कथा ८*
मदोन्मत सिंह आणि चतुर ससा

"कोन्हे येक [मुळात **कये** असे लिहून त्यावर वर्णविपर्यय करून वाचावे म्हणून आडव्या रेघा दिल्या आहेत.] वनीं मदोन्मत सीहुं होता : तो अति बळे वनीचीं स्वापदें भक्षी : वृथा मारि कीतीयेकें ['कीतीयेकें वृथा मारि' कित्येकांना उगीचच ठार मारीत असे.] : तेव्हेळीं वाराह : महीख : मृग : शशक : ईत्यादीकी सर्वही स्वापदें....... कीतीयेकें येकवट मीळौनी तया मदोन्मता सीहासी वीनवीते जाले : म्हणे : "स्वामी : तुं प्रत्येहीं आनेक स्वापदें वृथा मारितोसी : कां जें : तुज येकेंचि स्वापदें तृप्ती होतसे : तरि येके वेळे मारितोसी हें तुझें आनुचीत : तरि तुज आजीहोउनी नीत्यानी येकची स्वापद बैसलेयाची देनें : आम्ही तुझीया प्रजा : प्रजेचें रक्षण करितां राजा वृधीतें पावे ॥ उक्तं च ॥

शनैः शनैश्च यो राज्यमुपभुङ्क्ते यथाबलम् ।
रसायनमिव प्राज्ञः स पुष्टिं परमां व्रजेत् ॥ ७२ ॥

प्रजानां पालनं चैव शस्यकोशस्य वर्धनम् ।
पीडनं धर्मनाशाय पालनं यशसे स्थिरम् ॥ ७३ ॥

अजामिव प्रजां मोहाद्यो हन्यात् पृथिवीपतिः ।
तस्यैका जायते तृप्तिर्न द्वितीया कथंचन ॥ ७४ ॥

हिरण्यधान्यरत्नानि यानानि विविधानि च ।
तथान्यदपि यत्किंचित्प्रजाभ्यः स्यान्महीपतेः ॥ ७५ ॥

जो राजा यथाबळें [यथाबळें (आपली शक्ती पाहून) रसायन (पौष्टिक औषधी रस) हळूहळू भोगल्याने मनुष्य पुष्ट होतो, त्याप्रमाणे जो राजा राज्य हळूहळू भोगी 'तो पुष्टीतें वृधीतें पावे' असा संबंध घ्यावा.] हळुहळु राज्य भोगी : रसायनाचें परि : तो राजा पुष्टीतें पावे : वृधीतें पावे : प्रजाचें रक्षण केलयां सुख पावे : कां जें : प्रजापासाव रायासी हिरण्य धान्य रत्न यान्नें (नें) : आस्वरथादीका(क) ['आस्व (घोडे) रथ आदीक (इत्यादी) याने (वाहने)' असा अन्वय.] : आनीकही पदार्थ रायासि प्रजापासाव होति : आणि प्रजाचेया [**मू.** प्रजाचें**पां**क्षयास्तव. **यां** ऐवजी अक्षरसाम्यभ्रमाने **पां** असे लिहिले गेले.] क्षयास्तव राजा नासातें पावे ॥ उक्तं च ॥

लोकानुग्रहकर्तारः प्रवर्धन्ते नरेश्वराः ।
लोकानां संक्षयाच्चेव क्षयं यान्ति न संशयः ॥ ७६ ॥

जे राजे लोकासि आनुग्रहो करीति ते वृधीतें पावति : आणि लोकाचेया संक्षयास्तव नासातें पावती :" ऐसें [**मू.** ऐसै.] त्या स्वापदाचें वचन आईकौनी : मदोनमतु सीहं म्हणे : "स्वापदें [**मू.** स्वपदे] हो : तुम्ही जें म्हणीतीलें तें सत्य : हें मज मानलें : तरि मज नीत्यानी तुम्ही येक स्वापद बैसलयाची द्यावें : न द्ययाल [न द्याल. न देयाल.] तरि आवघयांतें भक्षीन :" मग ते आवघे मीळौनी नीत्यानि येक स्वापद देती : ऐसी पाळी लावीली : तवं बहुतांका दीवसां ससयांची पाळी आली : त्यामध्य आती वृधु ससा [**मू.** स**षा**.] तो पाठवीला : तेनें ससेनी [**मू.** **शषे**नी.] बुधी केली : आपण वेळ चुकउनि गेला : मार्गी जातां यकु कुप देखीला : तया कुपावरौनि जातां तेणें ससेनि [**मू.** सषेनि.] आपुलें प्रतीबींब देखीलें : मग आंतःक्रणिं चींतीता जाला : म्हणे : "या [**मू.** **आ**.] आडापासी सीहातें आणौनी : या आडामध्यें सीहांचें प्रतीबींब दाखउनी : यणें उपायकरौनि सीहा [**मू.** सीही.] मारौं :" ऐसें चींतीता तया सीहापासी आला : तयातें देखौनी सिंहं [**मू.** संहं.] क्षोभला : सीहु म्हणे : "कां रे : उसीरू लावीला?" तवं तो म्हणे : "जी : मी येखला नाहिं येत होतां : आणिक पांच ससे घेउनि यत होतां : ते मजपासौनी आनीकें सीहें हीरीतले : तयाचें बळ मोटें दीसत आसे :" ऐसें तया ससाचें [(सशाचे) बोलणें सीहुनें (सिंहाने) आईकीलें'. 'सीहुनें' या शब्दात प्रत्ययापूर्वी सामान्यरूप केलेले नाही.] बोलणें सीहुनें आईकीलें : मग क्रोधायमानु जाला : "हा रे : मी सीहुं : य वनीचा राजा : सीहं आसतां आनीकी सीहुं [आनीक सिंह. आनीकी हे इकारांत रूप येथे चिंत्य आहे.] य वनीं कैचा? तो सीहं मजप्रती दाखवी : तयासि मी युध्य करीन ॥ उक्तं च ॥

भूमिर्मित्रं हिरण्यं च विग्रहस्य फलत्रयम् ।

अनुक्रमणिका

नास्त्येकमपि यद्येषां न तं कुर्यात्कथंचन ॥ ७७ ॥

भुमीनीमीत्त्य मीत्रानीमीत्त्य हिरण्यनीमीत्त्य : आस्त्रीनीमीत्य [स्त्रीसाठी. उच्चारसुलभतेसाठी 'स्त्री' मधील 'स' अक्षरापूर्वी **आ** (**अ**) आलेला आहे. हे आद्यवर्णागमाचे (Prothesis) उदाहरण होय.] युध्य करौनि आपुलें घ्यावें [यानंतर पुढील संस्कृत श्लोक आलेला आहे. तो या ठिकाणी विसंगत आहे. पुढे त्याचे मराठीत भाषांतर किंवा भावार्थही दिलेला नाही. म्हणून तो संहितेतून वगळला आहे. 'यत्र न स्यात्फलं भरि यत्र च स्यात्पराभवः । न तत्र मतिमान्युद्धं समुत्पाद्य समाचरेत् ॥ ७८ ॥']" ॥ उक्तं च ॥

यत्र न स्यात्फलं भूरि यत्र च स्यात्पराभवः ।
न तत्र मतिमान्युद्धं समुत्पाद्य समाचरेत् ॥ ७८ ॥

ऐसें सीहांचें वचन आईकौनी ससा [**मू.** सषा.] काय बोलता जाला : म्हणे : "राजया सीहां : हें सत्य तुवां बोलीलें : जें आपुलीये भुमीनीमीत्ये युध करणें : आणि वैरी मारावें : हा क्षेत्रीधर्मुची आसे : परंतु तया सीहांसी दुर्गाचा आश्रयो असे : तरि दुर्गवंत वैरी असाध्य : साधवें ना ॥ उक्तं च ॥

न गजानां सहस्रेण न च लक्षेण वाजिनाम् ।
यत्कृत्यं साध्यते राज्ञां दुर्गेणैकेन सिद्ध्यति ॥ ७९ ॥

शतमेकोऽपि संधत्ते प्राकारस्थो धनुर्धरः ।
तस्माद्दुर्गं प्रशंसन्ति नीतिशास्त्रविचक्षणाः ॥ ८० ॥

दंष्ट्राविरहितो नागो मदहीनो यथा गजः ।
सर्वेषां जायते वश्यो दुर्गहीनस्तथा नृपः ॥ ८१ ॥

जया रायासि येकें दुर्गें कार्ये साधवें तें सहस्त्रें नागेनि [हजारो हत्तींनी. **नाग** या शब्दाचा एक अर्थ 'हत्ती' असा आहे. ('गजेपि नागमातङ्गौ'—अमरकोश ३-२१). 'न गजानां सहस्रेण'—असे मूळ संस्कृत श्लोकात आहे. पुढील ओळीत **नाग** हा शब्द सर्पाच्या अर्थाने वापरला आहे. मूळ सं. 'दंष्ट्राविरहितो **नागः**........'] साधवें ना : ना लक्ष घोडेनी साधवें ना : आणी डाहाडेंरहित [दंष्ट्रा. **दाढा** असाही संस्कृत शब्द आहे.] नागु सर्वासी वस्यु होय : तरि तयासी दुर्गाचें बळ आसें :" ऐसें तया ससेयाचें वचन आईकौनि : सीहं अती क्रोधें उठिला : म्हणे : "तया सीहासी [**मू.** 'साहासी'.] भलतैसा दुर्गाचा [वाटेल त्या दुर्गाचा आश्रय असला तरी; किंवा, त्याला दुर्गाचा आश्रय 'भलेतैसा'—(कसाही, कितीही चांगला) असला तरी.] आश्रयो आसैल : तऱ्ही तया सीहांसी मारीन ॥ उक्तं च ॥

जातमात्रं न यः शत्रुं रोगं च प्रशमं नयेत् ।
महाबलोऽपि तेनैव वृद्धिं प्राप्य स हन्यते ॥ ८२ ॥

उपेक्षितः क्षीणबलोऽपि शत्रुः प्रमाददोषात्पुरुषैर्मदान्धैः ।
साध्योऽपि भूत्वा प्रथमं पुरस्तादसाध्यतां व्याधिरिव प्रयाति ॥ ८३ ॥

जवं शतृ मोटा नाही जाला तवं तो मारावा : तो शत्रु उपजला देखीला

असतां बळवंतु जालयां मग तो नांगवें :” ऐसें सीहाचें वचन आइकौनि ससा बोलीला : म्हणे [**मू.** मणें.] : “सीहां : आपुलें बळ वीचारौनि तया सिहावरी जाईजे : आणीक येक आसे : आपुलें बळ थोडें : सत्रचें बळ बहुत : तयासी भीडतां नासातें पावे ॥ उक्तं च ॥

अविदित्वात्मनः शक्तिं परस्य च समुत्सुकः ।
गच्छन्नभिमुखो वह्नौ नाशं याति पतङ्गवत् ॥ ८४ ॥

आपुली शक्ती थोडी : पुढीलाची जानीतली नाही : तयाप्रति जातां [त्याच्यावर चाल करून जातांना.] मुर्ख पतंगाचेया [आपले बळ न ओळखून पतंग किडा ज्याप्रमाणे दिव्याच्या ज्योतीवर झडप घालतो आणि प्राणाला मुकतो, तशी गत होईल.] परि नासातें पावे : तरी सीहां राजेया : तुं आपुलें बळ विचारि :” सीहुं म्हणे : “ससया : भलतैसा तो आसैल [वाटेल तेवढा (बलवान) तो असेल.] : तऱ्ही तयातें मारीन : चाल : तयाचा ठावो दाखवी :” ससा म्हणे : “चाल :” मग पुढें ससा : मागें सीहुं : ऐसें ते दोघे आडाजवळी आले : तवं ससा सीहांतें [**मू.** सीहंतें.] म्हणे : “तुझा प्रताप देखौनि तो दुर्गामाजी लपाला आसे :” ऐसें म्हणौनी तेनें ससेनी तो आड तयासी दाखवीला : तवं तो मुर्ख तया आडाआंतु पाहुं लागला : तवं आपुलें प्रतीबींब तेणें देखिलें : ससा जवळी देखीला : तवं तो सीहं म्हणे : “माझेनी धाकें दुर्गाआंतु लपाला आसे : आतां यासी मारिन :” मग तेणें सीहंनाद करौनी [त्याने (सिंहाने) सिंहनाद (सिंहाच्या गर्जनेप्रमाणे गर्जना) करून. सिंहाने सिंहगर्जना केली असे म्हणण्यात पुनरुक्ती होते. **सीहंनाद**=मोठी गर्जना, एवढाच येथे सामान्यत्वाने अर्थ घ्यायचा.] तया आडामध्यें उडी घातली : त्याचें देह शत-चुर्ण जालें [शरीराचे शेकडो तुकडे (तुकडे तुकडे) झाले; चक्काचूर झाला.] : मृत्यातें पावला : मग तेणें ससेनी स्वापदांपुढां वेवस्ता सांघी-तली : मग ते आवधीं स्वापदें सुखियें जालीं :”

म्हणौनी दमनीकु म्हणे : “करकंटका : सानें पुरुशें समर्थासी वोखटें न करावें : ‘मी मोटा’ ऐसें न म्हणावें : बुधि सर्व प्रकारें भलतेथें कामा ये : दांभीकाचा आंत न कळे ॥ उक्तं च ॥

सुप्रयुक्तस्य दम्भस्य ब्रह्माप्यन्तं न गच्छति ।
कौलिको विष्णुरूपेण राजकन्यां निषेवते ॥ ८५ ॥

सुप्रयुक्त जो दंभु [योग्य रीतीने ज्याची योजना केली गेली आहे अशा दंभाचा (ढोंगाचा) अंत ब्रम्ह्याला देखील कळत नाही.] तयाचा आंतु ब्रह्माहि नेणे : जैसा कोळी विष्णुचेन रूपें राजकंन्येतें भोगीता जाला :” हे कथा करकंटकु पुसे : दमनीकु सांगे :

कथा ९ *
विष्णुरूपधारी कोळी आणि राजकन्या

[आपल्या प्रतीत या कथेतील देशाचे नाव ‘गौड’ व नगरीचे नाव ‘पुंड’ असे आले आहे. अनेक संस्कृत प्रतीत ही नावे नाहीत. हर्टेलने संपादन केलेल्या पंचतंत्रात मात्र ‘गौडेषु जनपदेषु पुंड्रवर्धनं नाम नगरम्’ असा उल्लेख आहे. मराठी **भा** प्रतीत या कथेचा आरंभीचा भाग गहाळ आहे. **म** आणि **कृ** प्रतीत नावगाव न देता केवळ ‘एके नगरीं’ एवढेच म्हटलेले आहे. निर्मळ पाठकाने मात्र आपल्या प्रतीप्रमाणे ‘गौड

अनुक्रमणिका

देसी प्रसिध्द । पुंड भुमी नाम नगरी' अशी नावे दिली आहेत. प्रस्तुत कथेत वाढी आणि कोळी यांची कथा आली आहे. संस्कृत 'पंचतंत्रात' त्यांच्यासाठी 'कौलिकरथकारौ' असे शब्द वापरले आहेत. सं. कौलिक या शब्दाचा अर्थ विणकर, वस्त्रे विणणारा असा आहे. त्यासाठी प्रस्तुत संहितेत **कोळी** असा शब्द सर्वत्र वापरला आहे. पण मराठीत 'कोळी' म्हणजे मासे पकडणारा, धीवर. 'विणकर' असा त्याच्या अर्थ मराठीत नाही. त्यामुळे भाषांतरकर्त्याला सं. **कौलिक** शब्दासाठी 'कोळिकु' असा शब्द अभिप्रेत असावा की काय, अशी शंका येते. पण ते रूप या कथेत कोठेही वापरलेले नाही. त्यावरून विणकर याच अर्थाने त्याने हा शब्द वापरला असावा असे दिसते. **भा** प्रतीत (पा. १३, १४) 'कौळिकु' असा शब्द वापरला आहे. पण महालिंगदासाच्या ओवीबद्ध पंचोपाख्यानातील या कथेत सं. कौलिक शब्दासाठी सर्वत्र कोळी याच शब्दाची योजना केलेली आढळते. उदाः '**कोळी** वाढया होते मित्रपण' (तंत्र १·४९२); 'ते सुंदर देखा आती । **कोळी** जाला देखती' (४९३) इत्यादी. निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्याना'तील या कथेतही सं. **कौलिक** शब्दासाठी 'कोळी' हाच शब्द योजला आहे. उदाः 'तेथें येक सुतार दुसरा **कोळी** : त्यासी परस्परें मैत्रकी जाली' (तंत्र १·४३०); 'साता खणाचां दामोदरीं : तयाची कंन्या वो सुंदरी : केश वाळवीतां होत दुरी : देखीली त्या **कोळियानें**' (४३२) इत्यादी. यावरून 'कोळी' हा शब्द त्या काळात 'विणकर' या अर्थानेही प्रचलित होता, असे अनुमान काढता येईल काय, हा प्रश्न आहे. पुढे तंत्र ५, कथा ६ मधे सुध्दा (पा. १५५ पाहा) सं. कौलिक शब्दासाठी 'कोळी' हाच शब्द योजला आहे. अंत्य **कु** गळाला असेल या कल्पनेने तेथे मी 'कोळीकु' अशी दुरुस्ती सुचविली आहे. ती रद्द समजावी. भाषांतरकर्त्याने एके ठिकाणी 'कोई' शब्द वापरला आहे. (पा. १५५ ओ. २५ व तळटीप ९ पाहा) तेव्हा त्याला 'कोळी' हाच शब्द अभिप्रेत होता हे स्पष्ट दिसते.]

गौड देसीं पुंडभुमी नाम नगरी : तेथें येकु वाढे आनी येकु कोळी : हे दोघै जण परस्परें मीत्र आसती : ते सुंघार करौनि प्रत्यहीं चोहोटां : दरवाजे बैसती : वीनोदें काळु कर्मीति : तवं कोन्हे येके समईं आवचीती रायाची कंन्या : साता खणाचे [या शब्दाचा एक अर्थ, इमारतीचा मजला, असाही आहे. 'एकवीस खणांचें=एकवीस मजल्यांचे. यावरून, दामोदर=माडीचे घर, हा अर्थ लक्षात येईल. 'तूं सरिसें करी पां साजणी : धारा **दामोधर'** (नरुस्व. ४१४) या ओवीवरील टीपेत 'धाम= गृह : तयांचे उदर' अशी या शब्दाची व्युत्पत्ती दिलेली आहे. अनेक 'धामे आहेत उदरात ज्याच्या' ते **दामोदर**=अनेक मजल्यांची इमारत, अशी ही व्युत्पत्ती दिसते. त्यावरून मूळ शब्द 'धामोदर' असून वर्णविपर्यासाने त्याचे रूप 'दामोधर' असे झाले असावे'. **खण** : मजला, माडी. 'साता खणांचें'=सात मजल्यांचे. तुळा '**दुखणी** काय नव**खणी** माडी—' (मोरो. कृष्णविजय ८३·१३) यातील 'माडी' शब्दावरून खण=मजला, हा अर्थ स्पष्ट आहे.] दामोदरि (र) ['दामोदर श्रीपती तो माडीचे घर तें तथा' (भाषाप्रकाश. ९·१७८), 'माडीचें घर जें तेंची दामोदर म्हणोनि घे' (तत्रैव. १८·१२). 'घर' या सामान्य अर्थाने हा शब्द अनेकदा वापरला जातो. पण त्याचा विशेष अर्थ, अनेक माड्या किंवा मजले असलेले घर, असा आहे, आणि तोच येथे अभिप्रेत आहे. तुळा : 'तवं देखिलें महाद्वार : जेथ एकवीसां खणांचें **दामोधर'** (शिशु. ३३७)] : तयावरि केस वाळवीतां देखीली : तीचे रूप देखौनि तो कोळी : आ[व*]स्था [मू. आस्छा०. वेध, तुळा : 'स्वामी तुंतें वानितां किन्नरें : मज **अवस्थेचें** सुदलें महुरें : तें कव्हणी धावणिया न धरे : देवाचीये दृष्टीवीन' (नरुस्व. ६८२) **अवस्थापीडिता** : वेध, ध्यास, विरह—त्यामुळे पीडित.] पीडिता जाला : वीरहज्वरें पीडीला ॥ उक्तं च ॥

दर्शनाद्धरते चित्तं स्पर्शनाद्धरते बलम् ।
संयोगाद्धरते वीर्यं नारी प्रत्यक्ष राक्षसी ॥ ८६ ॥

स्त्री दर्शनेंकरौनि चित्तातें हरी : स्पर्शास्तव बळातें हरि : संयोगास्तव वीर्यातें हरि : म्हणौनि स्त्री राक्षसी म्हणिजे : दईता [मू. दईंतासै ऐसे.] ऐसें नांव न घडे : ऐसा कोळी आवस्ताभुत [राजकन्येच्या वेधाने, विरहाने पीडित होऊन.] होउनी घरामध्यें पडला आसे : तवं तेथें वाढै मी[त्र*] आला : आंग पाहे तवं आती ज्वरें व्यापीला आहे : तवं वाढी म्हणे : "आगा मीत्रा : हें काये जालें?" तो कोळी लाजुनी हासीनला : तवं येरू म्हणे : "काय हासीनलासि : तुझीये जीवीचे सांघै[सी ना] [तुझ्या मनात काय आहे, जीवाला काय झाले आहे, ते तू सांगत नाहीस.]?"

तवं कोळी म्हणे : "मीत्रा : काय [**मू.** 'यका' असे लिहिले गेले. वर्णविपर्यय करून वाचण्याची चिन्हे म्हणून शिरोरेषांवर आडव्या रेघा दिल्या आहेत.] सांघों : तुझेयावस्तु [तिच्याकडून.] माझें काय दुख हरवैल?" तवं वाढी म्हणे : "माझीयावस्तु [तिच्याकडून.] हरवैल तें हरिन : तरि मीत्रा तुझें दुःख काई आसें तें मजप्रती सांघ :" तवं कोळी [**मू.** 'काळीं'.] म्हणे : "सुहृदु [**मू.** सुहृआदुणी' – वर्णविपर्यय करून वाचण्याची चिन्हे वर आहेत.]

अनुक्रमणिका

आणी मीत्रु याप्रती दुःख नीवेदन कीजे तरि सुखि होईजे :” ॥ उक्तं च ॥

सुहृदि निरन्तरचित्ते गुणवति भृत्ये प्रियासु दारेषु ।
स्वामिनि सज्जनपुरुषे निवेद्य दुःखं सुखी भवति ॥ ८७ ॥

तरि कोळी म्हणे : “मित्रराया : म्यां राजकंन्या उपरियेवरि केश वाळवीतां देखीली : तिचें रूप देखौनि मज वीरहज्वरू उपजला : मुर्छना आली : तरि ते राजकंन्येसी संभोगु होये तरीच [मू. तारीच.] प्राणु वांचे : अन्यथा प्राणु जाईल : ॥ उक्तं च ॥

युवतीनां वियोगं च कः सहेत विचक्षणः ।
वियोगेनातुराणांहि युवतिस्तनभेषजम् ॥ ८८ ॥

युवतिचा वियोगु कोण पां साहे? युवतीचें वियोगें आतु[र*] जे पुरूष तयासी यौवनाचें स्तन [मू. स्तवण.] मर्दन [‘युवतीचे’—साठी ‘यौवनाचें’ हा शब्द चुकून लिहिलेला असावा. **यौवनाचें स्तन** असाच पाठ घेतला तर ‘यौवनाचे=तारुण्याचे द्योतक असे स्तन’ किंवा ‘यौवनामुळे (पुष्ट) झालेले स्तन’—असा अर्थ करावा लागेल.] वोखद :” ऐसें म्हणौनी तेणें वाढीयें सम-जावीला : वाढी म्हणे : “मीत्रा : तुज गरुडयंत्र [गरुडाच्या आकाराचे लाकडी विमान (यंत्र). या यंत्रासाठी **लाघवी** हा शब्द महालिंगदासाने आपल्या ‘पंचोपाख्यानात’ वापरला आहे. तुळा. ‘येरू चढला **लाघविया**वरी । गेला माडियेभीतरी । रात्रसमई राजकुमरी । रूप देखे विष्णुचें’ (तं. १·५००)] करुनी देईन : तेथें तुं चतुर्भुजा (ज) रूप धरौनि गरौडावरि बैसौनी रात्रीसमई राजकंन्येजवळी जाये :”

मग तेणें यंत्र [मू. अंत्र.] केलें : यरू यंत्रावरि बैसौनी रात्रीसमईं ते राजकंन्येचीया राउळा आला : तवं राजकंन्यें पुसीलें : “तुं कोणु?” तो म्हणे : “मी चतुरभुज विष्णु :” मग राजकंन्यें विष्णुचें रूप देखौनि साष्टांगी नमस्कारू केला : हात जोडौनि उभी राहिली : ते म्हणे : “गोसावि आलेती हें काये कारण?” विष्णु म्हणे : “आम्ही तुजपासी आलौं : गंधर्व वीवाहो [‘ब्राह्मी दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथासुरः । **गांधर्वो** राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमो मतः॥’ विवाहाच्या या आठ प्रकारांपैकी एक; प्रेमविवाह. गंधर्व विवाह=नातेवाइकांना न विचारता आणि कोणताही लग्नसोहळा न करता प्रियकर आणि प्रेयसी यांनी एकांतात केलेला विवाह. (‘गांधर्वः समयान्मिथः’)] करूनि : तुझेपासि [मू. तुझेपसिं.] सयन [मू. सन्य.] करिन :” तवं ते म्हणे : “मी मानुस : राउळ देव : माझें परिणयन [मू. परिणायन.] करितील तरि मी सदैव :” मग ते राजकंन्या वामांगी बैसली : उभय वर्गासी परिणयन जालें : मग तीसी संभोगादीक [मू. संभोगुदीक. असे मुळात आहे ‘संभोगादिक’ पाहिजे. तशी दुरुस्ती संहितेत केलेली आहे.] जालें : आष्टभोग [हे यापुढील श्लोकात (श्लो. ८९) वर्णिले आहेत. त्याचा सारांश पुढे गद्यात दिला आहे तो पाहावा.] जाले ॥ उक्तं च ॥

सुगन्धवनितावस्त्रं गीतताम्बूलभोजनं ।
शय्या च भूषणं चैव अष्टभोगाः प्रकीर्तिताः ॥ ८९ ॥

बरवी सुपरिमळयुक्त [चांगल्या वासाचे (चंदन).] चंदन : तयाचेम...... उद्वर्तन [चोपडणे. अंगाला सुवासिक चंदन

अनुक्रमणिका

चोपडणे.] : सोड[श वा]र्शिकि वार्शिकि : [सोळा वर्षाची तरुण स्त्री.] : बरवें पटकुळादिकें [सं. पट्ट+कूल. पट्ट= (रेशमी वस्त्र) +कूल (काठ). यावरून, रेशमी काठाचे वस्त्र, असा अर्थ करणे योग्य होईल. 'पट्टकूल' हा वस्त्राचा एक प्रकार होय यात शंका नाही. पाहा : 'रत्नें भरीले कनकपरीयेळ : देवांगें वस्त्रें **पटकुळें** केवळ' (संपूर्ण नरुस्व. १७०३).] वस्त्रें : सुलळीत गायनें : सक[रपुर तां]बोळ : षडुरू (र)सी [कटु, अम्ल, मधुर, लवण, तिक्त (तिखट) आणि कषाय या रसांनी युक्त] पक्वानें भोजनें : शैयवरि [शय्येवर, गादीवर.] पहुडणें : बरवीं [मू. बारवी.] भुसणें करणें [दागिने करणे, दागिने आंगावर घालणे. 'कपडे करणे' या वाक्प्रयोगाप्रमाणे 'भूषणें करणे' हा वाक्प्रयोग आहे.] हे आष्टै भोग बोलीजे : ऐसा प्रत्येहीं तो कोळी विष्णुचें रूप धरुनि राज्यकंन्येपासी प्रत्यहिं ये : प्रातःकाळीं मागुता घरासी जाये :

ऐसें आसतां तवं ['आसतां' (असे **असतांना**) असे म्हटल्यानंतर 'तवं' वापरण्याची गरज नव्हती. पण असे प्रयोग या लेखकाने अनेक ठिकाणी केलेले आहेत.] ते कन्या येक समईं पाढीयारें [पाढीयार : सं. प्रतिहार > म. पढिआर = द्वारपाल, सेवक, कंचुकी.] देखीलीं : तेणें रायासी जाणवीलें : राजेनीं [मू. राजनि.] राणी कंन्येजवळी पाठवीली : मातेनीं तीयसी पुसीलें : "तुज पुरूशाचा संबंधु दिसतु आसे?" तवं ते म्हणे : "हे सत्य : वैकुंठै-होऊनि [वैकुंठाहून. 'वैकुंठ'—शब्दाचे सामान्यरूप चिंत्य होय.] वीष्णु माझीये भक्तीनीमीत [माझ्या भक्तीमुळे (श्रीविष्णुवरील माझ्या पूर्व जन्मातील) भक्तीमुळे, आत्यंतिक निष्ठेमुळे.] येतु आसे :" तवं तीची माता म्हणे : "मज प्रचीत दाखववी :" तेधवां [मू. तधवां.] गवांक्षाहोउनी पाहे : तवं चतुरभुज-रूप गरूड [मू. गुरूड.] देखीलें : राणीयसी सुख जालें : मग राणीया रायापुढे सांघीतलें : मग राजा वीष्णु जावाई जा[ला*] म्हणौनि हरूसें नीरभरू [सं. हर्षनिर्भर, आनंदाने परिपूर्ण, जाला; खूप आनंदित झाला.] जाला :

मग तो राजा वीष्णुचेनि बळें पृथ्वीचेया रायाची अवज्ञा करिता जाला : तवं परचक्र त्या रायावरि चालौनि आलें : तेधवां तें कंन्य (न्ये) करौनि राजेनि वीष्णु जावायासी वीनंती करवीली : तवं ते कन्या संभोगसमईं म्हणे : "तुमचेनि बळे राजा जुझौं नीगाला : तो म्यां वारीला : म्यां ऐसें म्हणतीलें : जेणें कृष्णें दैत्य नीरदाळीलें तो तुमचा जावांई जाला आसे : म्हणोनि राउळें जुझौं नीगीजे : परचक्र वीध्वंसीजे :" ऐसी ते राजकंन्या तया कोळीयाप्रति बोलती जाली : मग तो कोळी म्हणे : "भलें केलें : जें आम्हासी जाणवीलें : आतां क्षणायेकामध्यें पारकी मारिन :" मग ते कंन्यें [मू. केन्यें.] रायापुढां सांगीतलें : हें आ[इ*]कौनि सुखीया जाला : तवं तेणें कोळीयें वीचारीले : "जरि पळौनि जाउं : तरी राजकन्येची अवस्तेकरूनि [मू. कौरूणि.] मरैन : नां तरि जुझतां पारकयांचां हातीं मृत्यु होये : हें उतम मरण :
॥ उक्तं च ॥

समरि मृतानां वीराणां या गतिः परिकीर्तिता ।
सा गतिर्मुनियोगीनां कदाचिन्नैव जायते ॥ ९० ॥

समरंगणीं जे मेले : तयासी गती जे सांगीतली : ते योगीजना (न) तये-करौनि पावती ना :

अनुक्रमणिका

इतुकें तेथे वर्तले : तवं नारदें ते वेवस्ता विष्णुपुढें सांगीतली : “जी परमेस्वरा : मृत्यलोकीं येक आश्चर्य जालें : कोन्हा येका रायाची कंन्या : कोळीयें [चतुर्भुज रूप*] धरूनि..... [आ*]युध्यें संखचक्रगदापद्म : ऐसेनि रूपें..... भोगीली..... आतां तो जुझौं जाईल : आणी सम[*]-रंगणीं जरि पडैल तरि तुमचां देवत्वासि मृत्यलोकीं हासतील : तरि तेथें जाणें लागील [जाणे लागेल.] :” ऐसें आईकौनि वीष्णुनें आपुली बळशक्ती त्या कोळीयासी आर्पिली : गरुडाची शक्ती गरूडासी आर्पीली : चक्रीं चक्राची [मू. चीक्राची] शक्ती आर्पीली : तवं अ[व*]चीते कोळीयासी स्फुराण [सं. स्फुरण, आवेश पाहा : ‘विरासी विरश्रीया मीरवे गोमटी : आंगी **स्फूराणाची** दाटी’ (संपूर्ण नरुस्व. २१५६).] आलें : जुझों नीगाला : गरुडासी पाख नीगले : सुदर्शनें पारकयाचीं सीरें छेदीलीं : मागुतें चक्र हातासी आलें : उरलें सैन्य दाही दीशा पळालें : ऐसें तेणें युद्ध केलें : ऐसें देखौनी राजा विष्णुसी साष्टांग नमस्कारू केला : म्हणे : “मी धन्यु : जरी गोसावी सोईरे जालेती :”

ऐसी कथा दमनिकें करकंटकाप्रती सांगीतली : म्हणे : “कर[कं*]टका : दांभिकाचा आंतु कवणा न कळे : तैसा हा [(=या) संजीवकाचा.] संजीवका [चा*] आंतु प्रथम जानीतला नाहि :” तवं कर [कं*]टक म्हणे : “दमनीका : तुं रायासी जाउनी संजीवका आणि पींगळीकासि : मीत्रभेदु करि : यासि यथोनि जाणें होय ऐसें करि :” तेधवां तो दमनीकु पींगळीकापासि जाउनि : दुरूनी नमस्कार करौनि उभा राहिला : पींगळीकु म्हणे दमनीकातें : “तुं बहुत दिवसां आलासि : तरही कांही आपुर्व आसैल तरही सांघ :” दमनीकु म्हणे : ‘राजेया : कांही आपुर्व सांघीजे ऐसें नाही : तथापी एक उतर [उतर=उत्तर शब्दाचा उपयोग चिंत्य होय. दमनक पिंगळकाला म्हणतो, (तू जे काही करीत आहेस, त्याचे) **उतर** (उत्तर)=त्यातून पलीकडे निघून जाण्याचा उपाय, (उत् +तर) सांगण्याला आलो, असा भावार्थ. ‘उतार’ या शब्दाचे दुसरे रूप **उतर**.] तुजप्रती सांघैन : तें चीत देउनी रायें आईकावें ॥ उक्तं च ॥

सुलभाः पुरुषा लोके सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ॥ ९१ ॥

शुभं वा यदि वा पापं द्वेष्यं वा यदि वा प्रियम् ।
अपृष्टस्तस्य तद्ब्रूयाद्यस्य नेच्छेत्पराभवम् ॥ ९२ ॥

सुभ [सुभ (शुभ) आथवा आसुभं (अशुभ); प्रीयें (प्रिय) अथवा अप्रि**यें** (अप्रि**य**).] अथवा आसुभं : प्रीयें अथवा अप्रियें [मू. आप्रयें.] : ऐसें वचन रायाचे आज्ञावांचौनि [सांघीजे”*] : ऐसा तया दमनीकाचा अभीप्रावो पींगळीकें जाणीतला : मग पींगळीक म्हणे : “दमनीका : तुझीय मनीं काय बोलणें आसैल तें सांगें :” तवं तो म्हणे : “जी राजेया : हा संजीवकु बैलु म्हणे : ‘या [मू. आ.] सीहाचें बळ म्यां जाणीतलें : यातें मारौनि मी राज्य घेईन :’ ऐसें आईकौनि मी उगाची राहीलां : तरि आम्ही गोसावीयाचे परंपरागत सेवक : म्हणौनी गोसावियांपुढें सांघावया आलौं :” ...मग पींगळीकु म्हणे : “आम्ही यासि आभयदान दीधलें

आसें : माझा मीत्रु जाला आसे : तरि हा मज वोखटें कैसें चींतील?” तवं दमनीकु म्हणे : “आम्ही तुझे जुने सेवक : तुं आमचें सीकवीलें न करसी तरि अवघड आसे : आम्ही सांगौनी उतराई [सांगायचे ते सांगितले म्हणजे ‘आम्ही आमच्या कर्तव्याच्या ‘ऋणातून मुक्त’ झालो, पुढची जबाबदारी तुझ्यावर **उतराई** : पुढे पा. ८४·१८ मधे हाच वाक्प्रचार पुन्हा आलेला आहे, तो पाहावा.] :” तवं पींगळीकु म्हणे दमनीकातें : “माझा मीत्रु : तो मज कैसेनी वोखटें करील? हें न घडें :” मग दमनकु म्हणे : “बहुत काये बोलौं : तुझें केलें तुं पावसी [तुझ्या कृत्याचे फळ तुला मिळेल.] :” ऐसें पींगळीकु दमनीकाचें वचन कठीण आईकौनि काहि न बोलेचि : चींतावर्तु [**मू.** चीतावर्तु.] जाला :

तवं दमनीकु म्हणे : “हा तवं पींगळकु संजीवकाचां ठाईं सानुरागु आसे : तरि याचि [**मू.** आचिं.] संगतीस्तव राजा नासातें पावैल : ऐसें दीसत आसे :” ॥ उक्तं च ॥

एकं भूमिपतिः करोति सचिवं राज्ये प्रमाणं यदा।
तं मोहाच्छ्रयते मदः स च मदाद्दास्येन निर्विद्यते ॥
निर्विण्णस्य पदं करोति हृदये तस्य स्वतन्त्रस्पृहा।
स्वातन्त्रस्पृहया ततः स नृपतेः प्राणेष्वभिद्रुह्यते ॥ ९३ ॥

“राजा जो प्रधानु राज्यामध्यें प्रमाण करौनी ठेवी [राजा ज्या प्रधानाला प्रमाण (ज्याचे ऐकायचे असा एकमेव मान्य पुरुष) म्हणून करून ठेवतो. ज्या प्रधानाचेच केवळ ऐकतो, त्या प्रधानाला मद चढतो. त्या मदामुळे (गर्वामुळे) ‘तेणें प्रधानें रायाचें पद भेदिलें’=राजाच्या राज्याधिकारात भेद निर्माण करतो. तो अधिकार नाहीसा करतो. (आपल्याकडेच सर्व अधिकार घेतो).] : तया प्रधानासी तोचि मदु होये : तेणें मदें रायाचें पद तेणें प्रधानें भेदीलें : आनी पद भेदीलयां स्वतंत्र-[स्पृहा [**मू.** स्वतंत्रस्पहि. स्वतंत्र होण्याची (स्वातंत्र्याची) स्पृहा=इच्छा प्रधानाला होते.]] प्रधानासि होये : मग तो प्रधानु तेणें बळेंकरौनी रायाचें राज्य आनि प्राणांतेंहि घे : म्हणौनी राजेनी प्रधानासी बहुत सन्मान संगति न करावी : तरि हा पींगळीकें मंत्रि केला आसे : राजा [**मू.** राज.] यासि मानीतु [राजा याला मान देतो, याचेच म्हणणे ऐकतो.] : याचें सीकवीलें करितु : तरि हा संजीवकु राज्याधिपति [राज्याचा अधिपति (स्वामी)=राजा होईल.] होइल : तरी हा प्रबळ जालयां राज्य घेईल [**मू.** घईल.] ॥ उक्तं च ॥

यस्मिन्नेवाधिकं चक्षुरारोपयति पार्थिवः।
अकुलीनः कुलीनो वा स श्रियो भाजनं भवेत् ॥ ९४ ॥

जयावरि राजा कृपादृष्टी पाहे तो कुळीन होये [राजा ज्यावर कृपादृष्टीने पाहतो तो (अकुलीन=हीनकुलोत्पन्न असला तरी) ‘कुळीन होये.’—त्याला लोक कुलीन समजतात आणि तो ‘लक्ष्मीतें भजे’=लक्ष्मीला भोगतो; ऐश्वर्य उपभोगतो.] : आणी तो लक्ष्मीतें भजे :” ऐसें दमनीकु मातु [गोष्ट. पाहा ‘**मात** ते गोष्टि ते बोली भाक ते भाष भाख ते (भाषाप्रकाश ५·२).] बोलीला : तवं वाडवेळा पींगळकु दमनीकाप्रती बोलता जाला : म्हणे : “दमनीका : तुं माझा भ्रुत्यु : प्राणाहोउनी [प्राणाहून.] आधीकु : तरी यासि माझें मन वोखटें करावया प्रवर्तत नाही [मन तयार होत नाही, प्रवृत्त होत नाही.] :” तवं दमनीकु म्हणे : “राजया : तुं जरि

अैसें म्हणसी : हा मोटा दी[सत आसे] : याचेनी [सकला] वैरी मारिन : तरि हा तृणचरू : आम्ही [मांसभ]क्षकु : [तरि याचेनि] काये होववें? तरि यासि मारावें :” तवं पींगळीकु बोलीला ॥ उक्तं च ॥

उक्तो भवति यः पूर्वं गुणवानिति संसदि ।
तस्य दोषो न वक्तव्यः प्रतिज्ञाभङ्गभीरुणा ॥ ९५ ॥

“जयाचे गुण सभेमध्यें वर्णीले : तयाचे दोश मागुतें न बोलावे : कां प्रतज्ञेंसि भंगु होय म्हणौनि :” तरि पींगळीकु म्हणे : “दमनका : तुवां याचे [**मू.** आचें.] गुण पूर्वी वर्णीले : तुझेनि वचनें यासी म्यां आभयेदान दीधलें : तरि यासी [**मू.** आसी.] मी कैसेंनी मारूं? सर्व हा संजीवकु [**मू.** ‘संजीकु**व**’—वर्णविपर्ययाची चिन्हे आहेत.] माझा सखा : प्राणवलभु [सं. वल्लभः प्रिय, आवडता. पाहा : ‘तो योगीयांचा **वलभु** । भक्तांचा सर्वस्वलाभु’ (उगी. ३९२).] : तरि यावरि [**मू.** ‘या**रिव**’— वर्णविपर्ययाची चिन्हे आहेत.] मज कोपु नाही ॥ उक्तं च ॥

उपकारिषु यः साधुः साधुत्वे तस्य को गुणः ।
अपकारिषु यः साधुः स साधुः सद्भिरुच्यते ॥ ९६ ॥

उपकारियाचें ठाईं [पोथीत मूळ शब्द **थाई** असा आहे. सकळ संकेतात **थ** हे अक्षर **ठ** साठी येते. म्हणून ‘थाई’ हा शब्द ‘ठाई’ असा वाचावा. तशी दुरुस्ती स्वीकृत पाठात केलेली आहे. ‘थाई’ हा शब्द पुढे ४१, ५०, ६२ व १८६ पानावर आलेला आहे. तसेच ‘थाय’ हा शब्द ९७, १५६ व १५७ पानावर आलेला आहे, तोही ‘ठाय’ असा वाचावा. ‘थाय’ शब्द ‘ठाय’ असा व ‘थाई’ हा शब्द ‘ठाई’ असा वाचावा की नाही याविषयी मतभेद होऊ शकेल. ‘ठाय’ या शब्दाचे ‘थाय’ हे रूप जुन्या वाङ्मयात आढळते हे खरे, पण त्यात किंचित भिन्न अर्थच्छटा आढळते. **थाय**= [(१) अंत, तळ. उदा : ‘आतां महाशून्याचां डोहीं । गगनासीचि थाउं नाहीं । तेथ तागा लागैल काइ । बोलाचा एआ’ (ज्ञाने. ६·३१५); ‘इयें पदें नव्हति फुडिया । गगनाचियाचि मां घडिया । एथ आमचिये मती बुडिया । थाउं न निगे’ (ज्ञाने. ७-१९०). (२) **थाय** (व) =बळ, सामर्थ. उदा : ‘पापें आपुलेन **थावें** । करिति जन्ममेळावे । तवं जितांचे आघवे । यंति नरका ’ (ज्ञाने. १६·३६९); ‘ना शास्त्राचेन किर नावें । खांकरूहिं न ये **थावें** । परि शास्त्रज्ञाहिं सींवे । टेंको नेंदी’ (ज्ञाने. १७·९२); या दृष्टीने ज्ञानेश्वरीतील पुढील ओवी अभ्यसनीय आहे. ‘देखौनि टाकिता **ठावो** । धांवतां थिरावे पा[illegible] । तैसा ब्रह्मसामीप्यें **थांवो** । अभ्यासु सांडी’ (ज्ञाने. १८·१०७४) या ओवीत ‘ठाव’ आणि ‘थाव’ हे दोन्ही शब्द भिन्नार्थांनी वापरले आहेत. **ठाव**=जागा, ठिकाण, वसतिस्थान, या स्पष्ट अर्थाने ‘थाव’ शब्दाचा उपयोग आढळत नाही. म्हणूनच आपल्या पोथीतील या अर्थाने आलेले ‘थाय’ ‘थाई’ हे शब्द ‘ठाय’ ‘ठाई’ असेच अभिप्रेत असले पाहिजेत, असे मला वाटते. आरंभी सांगितल्याप्रमाणे **ठ** चा सकळ संकेत **थ** असल्यामुळेच थाय, थाई असे लेखन झाले असावे.] जो साधु : यथें काये नवल : अपकारीयाचें ठाईं [**मू. थाई** (सकळ संकेत थ = ठ)] साधु : तोचि साधु बोलीजे : तरि दमनका : हा संजीवकु जऱ्ही द्रोहबुधि करील तरि यासी मी वोखटें न करि :” ऐसें पींगळकाचे [**मू.** पींगळकीचें.] वचन आईकौनी दमनीकु बोलता जाला : म्हणे : “राजया : द्रोहबुधीसी क्षमा करणें हा राज्यधर्मु नव्हे ॥ उक्तं च ॥

तुल्यार्थं तुल्यसामर्थ्यं मर्मज्ञं व्यवसायिनम् ।
अर्धराज्यहरं भृत्यं यो न हन्यात्स हन्यते ॥ ९७ ॥

तरि राजया : आणीक असें : तुवा याचेंनि [**मू.** आचेंनि.] संगस्तीस्तव राज्यधर्मु टाकीला : पारधी कहीचि न जासी : तरि हा संजीवकु तृणचरू : तुं मांश (स)चरू : तरि तृणचराची संगस्ती धरिली असे : तरी सामृथ्य मांसावांचौनि क्षीण होईल : आनी बळहीन जालयां तुतें सर्वहि स्वापदें टाकौनि जाती : मग तुं यासारिखाचि [**मू.** आसारिखाचि.]

अनुक्रमणिका

होसि ॥ उक्तं च ॥

यादृशैः सेव्यते भृत्यैर्यादृशांश्चोपसेवते ।
कदाचिन्नात्र संदेहस्तादृग्भवति पूरुषः ॥ ९८ ॥

जैसी संगस्ती करे तैसाचि पुरूष होये : तेथें संदेहो नाहि :" दमनीकु म्हणे : "राया : बैलाचीये संगस्तीस्तव तुज वोखटें आसे : तुज नीचाची संगती बोलिली नाही : विस्वासु कवणाचा न करावा ॥ उक्तं च ॥

व्याघ्रवानरसर्पाणा यन्मया न कृतं वचः ।
तेन सोनारदृष्टेन मुनुष्याद्भ्रशितोप्यहम् ॥ ९९ ॥

व्याघ्र वांनर सर्पाचे म्यां वचन नाहि केलें : म्हणौनि स्वर्णकारें दुष्टेनि मनुस्यापासाव [मनुष्याकडून. पासून, कडून.] भ्रं[सातें पाव*]वीलें" [ब्राम्हण म्हणतो : 'आडातून व्याघ्र, वानर, सर्प व सोनार या चौघांना मी बाहेर काढले. त्यांपैकी पहिले तीन पशु होते. 'सोनारावर विश्वास ठेवू नको' म्हणून त्यांनी मला सांगितले. मी ते ऐकले नाही. पुढे त्या तिन्ही पशूंनी माझ्या उपकाराची फेड केली. पण 'मनुष्याने मात्र माझा भ्रंश केला, नाश केला.] : "हे [कैसी कथा*?"] पींगळीकु पुसे : दमनीकु साग :

कथा १०*
ब्राम्हण आणि व्याघ्र, वानर व सर्प

[ही कथा संस्कृत पंचतंत्राच्या हर्टेल प्रतीत आहे. अन्य प्रतीत आढळत नाही. मराठी **भा** प्रतीत आहे. निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानातही आहे. म प्रतीत मात्र नाही.]

"कोन्ही एकु [**मू.** ऐकु.] ब्र (ब्रा)ह्मणु उद्‌यमु करावया निगाला : तवं मार्गी जातां मध्यानीं त्रुसाक्रांतु जाला : तवं आड यकु देखीला : तया आडामध्यें चौघे जण पडले असती : येकु व्याघ्र : येकु वांनरु : एकु [**मू.** ऐक.] सर्पु : एकु सोनारू : ऐसा [**मू.** एसा.] त्या ब्राह्मणाचा सांचलु [पावलांचा अस्पष्ट आवाज, चाहूल. पाहा : 'योग निद्रा तरि न मोडे। अकर्तेपणा **सांचलु** न पडे' (ज्ञाने. ५·७८); '**सांचलु** पडिला : आणि चोरें वास पाहिली' (लीच. ए. ६४).] आईकीलेयां बोलते जाले : "तुं कवणु गा पुरुशा?" येरु म्हणे : "मी ब्र (ब्रा)ह्मणु :" ते म्हणती : "आमतें काहाडी [(आज्ञार्थ)—काढ. का**हाडणे**=काढणे.] : मग तुज उपकार करूनु : तुं आमचा प्राणदाता ॥ उक्तं च ॥

एकतो भयभीतस्य प्राणीनां प्राणरक्षणं ।
प्राप्नोति यज्ञजं पुण्यं समस्तं वरिदक्षिणं ॥ १०० ॥

येकीकडे प्राणियाचें भयभीताचें ['भयभीताचें प्राणियाचें'=भ्यालेल्या प्राण्याचे रक्षण केल्याने दक्षिणा देऊन केलेल्या यज्ञांचे पुण्य लाभते—हा भावार्थ.] रक्षण केलयां जें पुन्य होये : तें समग्र दक्षणा-युक्त यज्ञ केलेयाचें तुज पुन्य होये :" ऐसें तयाचें वचन आइकौनी मग तेणें ब्राह्मणें ते चौधै [**मू.** च्योधै.] जण आडाआंतौनी तें काहाडीलें : तवं तो व्याघ्रु ह्मणे : "ब्र (ब्रा)ह्मणा : तुवां यावें मु.... या राना : तेथें मी तुज उपकारू करीन :" वांनरू म्हणे : "मी तीयचि वनीं असें : माझी भेट घ्यावी : मी काहि उपकारू करिन :" सर्पु म्हणे : "आवघड वेळे मातें स्मरावें [**मू.** **सम**रावें.] :

परंतु या [**मू. आ.**] सोनारातें विस्वासुं नकों" : ऐसें म्हणौनी तया ब्राह्मणातें नमस्कार करौनि स्वस्थानासि [**मू.** स्व**च्छा**नासि.] गेले : मग तो सोनार म्हणे : "गोसांवी [**मू.** गो**स्वां**वी.] : तुवां विजयपुरासी येउनि मातें स्मरावें :" ऐसें ब्राह्मणाप्रती बोलौनी सोनारूहि आपुलीया नगरासी गेला :

तवं तो ब्राह्मणु येके समईं वांनरापासी गेला : वांनरू धांउनी पायां लागला : शोडसो[उ]पचारें [या शब्दातील **उ** अनावश्यक असून तो चुकीने लिहिला गेला असावा. षोडशोपचारें. पूजा करण्याचे सोळा प्रकार पुढीलप्रमाणे : 'आगतं स्वागतं पाद्यमर्घ्यमाचमनीयकम् । मधुपर्काचमस्नानं वसनाभरणानि च । गंधपुष्पे धूपदीपौ नैवेद्यं वंदनं तथा ॥' शोड**स**+**उ**पचार. स+उ यांचा संधी होऊन **सो** झाल्यानंतर पुन्हा **उ** लिहिण्याची गरज नव्हती.] पुजा केली : बरवीं पीकलीं फळें समरपीलीं :
तो ब्राह्मणु सुखिया जाला : तो वांनरू म्हणे : "व्याघ्रु पैलीमध्यें असे : तेथें जायें :" तवं तो ब्राह्मणु तया व्याघ्रापासि गेला : तो व्याघ्रु साउमा यउनी पायां लागला : तो म्हणे : "तुम्ही हा प्राणु दिधला [तुम्ही मला माझा प्राण दिला, कारण, तुम्ही मला आडातून बाहेर काढले, म्हणून माझा प्राण वाचला.] : तरि हा रत्न-खचीत हार घेउनी जायें :" मग तो ब्राह्मणु अळंकार घेउनी मार्गीं लागला [वाटेने लागला—चालू लागला. 'मार्गीं'च्या ऐवजी 'मार्गी' असेल काय? 'मार्गीं' हा पाठही चुकीचा नाही. सं. मार्ग>म. माग=रस्ता.] : तया विजयपुरासी [**पु**जयपुरासी. पूर्वी 'विजयपुर' हे नाव आले आहे. तेच येथे अभिप्रेत आहे. प्रतलेखकाकडून **वि** ऐवजी **पु** चुकून लिहिला गेला.] गेला : तया सोनारासी भेटला : तो आळंकारू [**मू.** आंळंकारू.] वीकावया तया[पासी दी]धला : [तेणें... तो] आळंकारू [**मू.** आंळंकारू.] रायाचा वोळखीला : तेणें सो[नारें रायासि] जा[नवीलें : रायें] तो ब्राह्मणु-चोर धरिला : भाकसि घातला [भाकस= बंदिखाना, कैदखाना, असा अर्थ असावासे वाटते. **भा** प्रतीत 'म्हणौनी बंधन करौनी ठेविला' (पा. १६) असे वर्णन आहे. निर्मळ पाठकाने 'तो रायानें धरीला : **बंदीखानीं** घातला' (तंत्र १. ओवी ५३७) असे म्हटले आहे. त्यावरून **भाकस**=बंदिखाना, हाच अर्थ वाटतो. 'लीळाचरित्रा'च्या एका पाठातील लीळेत 'बाहीरवाहीरी दांडी **भांगसि**एसि नेली' असे वाक्य आहे. (पाहाः श्रीचक्रधरचरित्र, पान ३२०) तेथेही 'बंदिखाना' हाच अर्थ दिसतो. **भाकसि घातला**=बंदिखान्यात टाकले.] : ते समईं तेणें ब्राह्मणें तो सर्पु स्मरीला :
सर्प यउनि पुढां उभा राहिला : सर्पु म्हणे : "मी रायाची राणी डंकीन : तुं हात लावीसी तेधवां सजीव होईल : मग तुज राजा मानु करिल : तुज भांडारें लुगडें देईल :" ऐ[सें*] म्हणौनी सर्पु गेला : तवं क्षणा यका रायाची राणी [**मू.** रांणी०.] डंकीली : राणीवांसा [**मू.** रांणी०.] हाहाकारू जाला : तवं राजेनी आइकीलें : मग राजा दुखी जाला : राजा म्हणे : "जो राणीयसी [**मू.** रांणी०.] उठवील तयासी अर्ध राज्य देइन :" अन्येक धन्वंतरिये उतारुनि पाहीलें परि तो न उतरेच : मग ब्र (ब्रा)ह्मणु म्हणे : "मज सोडी : मी राणीयसी सजीव करौनि उठवीन :" मग राजेनी तो आनीला : तेणें हात लावतखेवो [हात लावताक्षणीच. पाहा : 'नां तरि नदनदी होती दळवाडी : परि चातकाची सांकडी : देखतखेओ फेडी : ऐसा जलधरूचि होए' (उगी. ७७०) **खेव** : (सं. क्षेम) आलिंगन, त्वरित भेट. पाहा : 'खळ दुष्ट खळी नाम **खेंव** तत्काळ भेटिही' (भाषाप्रकाश ९·९५). यावरून **खेवो**=तात्काळ, तत्क्षणीच.] राणी उठीली : मग राजेनि तया ब्राह्मणासी अळंकार वस्त्रें दीधलिं : यापरि सर्प उतराई जाला :"

म्हणौनि दमनकु म्हणे : "पींगळीका : टंक [ही एक भामट्यांची जात आहे. निर्मळ पाठकाने ' टंक'च्या जागी 'ठक' आसा शब्द योजला आहे. पाहा : 'दमनीक सांगे वीचारू : **ठक** ठाकुर आणि सोनारू : याचा वीस्वास नये करू : सज्ञान जनीं जाण पां' (तंत्र १·५४६)] ठाकौरु [**मू.** ठाकुौर.] सोनारु [यांचा] विस्वासु न करावा :" ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

राज्ञां च स्वर्णकाराणां धूर्तानां च तथैव च ।
दुर्मित्राणां तथा स्त्रीणां विश्वासं नैव कारयेत् ॥ १०१ ॥

तवं पींगळीकु म्हणे : "आम्ही हस्तीचीं कुंभस्छ (स्थ)ळें विदारितों : आम्ही मासासन : हा त्रुणचरू : मास खातां आम्हासि बळ थोर : तरि हा आ[म*]चिया बळा केवी पुरेल? हें ढोर काये करूं सके?" दमनकु म्हणे : "हा तृ[ण]चरू परि यासी दृष्ट स्वभाव आसति [याचे स्वभाव दुष्ट आहेत. 'स्वभाव' शब्द अनेकवचनी वापरला आहे. जुन्या मराठीत 'दुष्ट' हा शब्द 'दृष्ट' असा अनेकदा लिहिलेला आढळतो. उदा. '**दृष्ट** वैर चुकवीजे' (लीच. ५·६)] : परि भलतेणें पुरूशें दुष्टाची संगस्ति न करावी : नीचाची न करावी : नीचाची संगस्ती [त*]वं मरण पावीजे ॥ उक्तं च ॥

न ह्यविज्ञातशीलस्य प्रदातव्यः प्रतिश्रयः ।
मत्कुणस्य च दोषेण हता मन्दविसर्पिणी ॥ १०२ ॥

जया[चा*] स्वभावो नाहि जानीतला तयासी आश्रयो न द्यावा : जैसें मत्कुणाचेनी [**मू.** मच्कुदाचेनी.] संगें : मंदवीसर्पीनी युका [युका आणि जुका ही दोन्ही रूपे या कथेत योजली आहेत. सं. यूका>जूका. मराठीत ऊ व जू ही दोन्ही रूपे प्रचलित आहेत.] जैसी मारीली :" ऐसी कथा : सीहं पुसे : दमनीकु सांगे :

कथा ११*
मंद विसर्पिणी जू व दीडीम मत्कुण

"कोन्हे एका रायाचा पलंगु होता : तयावरि उतम पासोडा आसे : तया पासोडेयावरि मंदी[वि*]सर्पीणी नांव जुकां [**युका** आणि **जुका** ही दोन्ही रूपे या कथेत योजली आहेत. सं. यूका>जूका. मराठीत **ऊ** व **जू** ही दोन्ही रूपे प्रचलित आहेत.] आसे : ते [**मू. त.**] प्रतदिनीं रायाचें रक्त भक्षितां सुखें आसे : तवं कोन्हे येके समईं : दीडीमु येणें [नामें] मत्कुणु आला : तयातें देखौनी जुका [**युका** आणि **जुका** ही दोन्ही रूपे या कथेत योजली आहेत. सं. यूका>जूका. मराठीत **ऊ** व **जू** ही दोन्ही रूपे प्रचलित आहेत.] म्हणे "[काको :] तुज [जोगा हा ठावो] नव्हे : तुझेनि संगें मज नासु होईल : जवं कोन्ही नेणे तवं तुं यथुनी जायें :" तवं मत्कुण म्हणे : "आजीचा मी तुझा अतीथु [**मू.** अती**थ्यु**.] : या रायाचें असुध थोडची पान करिन : तुझेंनि सुखी होईल : कां : जरि अतिथु दुर्लभु ॥ उक्तं च ॥

अतिथिर्यस्य भग्नाशो गृहात्प्रतिनिवर्तते ।
स तस्य दुष्कृतं दत्त्वा पुण्यमादाय गच्छति ॥ १०३ ॥

गुरुरग्निर्द्विजातीनां वर्णानां ब्राह्मणो गुरुः ।
पतिरेको गुरुः स्त्रीणां सर्वस्याभ्यागतो गुरुः ॥ १०४ ॥

अनुक्रमणिका

अतीथ जयाचेया घरिहोउनी [घराहून, घरातून.] भग्नास होउनी जाये तरि आपुलें दुकृत [पाप. ‘सुकृत’ याचा विरुध्दार्थी शब्द ‘दुकृत’ (सं. दुष्कृत).] देउनी : तयाचें पुन्य घेउनी जाये : यैसें आसें : तरि आनीक आईक : म्यां आन्येक मनुस्याचीं रूधीरें आस्वादीलीं : परांतु रायाचे रूधीर नाहि अस्वादीलें : तरि तुं जरि प्रसादु करीसी तरि रायाचे रक्त भक्षीन :” या बोला मंदिवी-सर्पीणी उगीची राहीली : ते म्हणे : “राजा नीजैल : तेधवां भक्षावें :” ऐसें म्हणीतीलें : या [मू. आ.] [परि तो] ढेकुण पासवडां राहुनी : मग तो राजा नीजैला : तेधवां तो [ढेकुण] पासवडां राहुनी : जागतयाचि रक्त भक्षौं लागला ॥ उक्तं च ॥

स्वभावो नोपदेशेन शक्यते कर्तुमन्यथा ।
सुतप्तमपि पानीयं पुनर्गच्छति शीतताम् ॥ १०५ ॥

स्वभावो जो तो प्राणियाचा अन्यथा करूं न सकीजे : जैसें सुतप्त [मू. सुतत्प.] जऱ्ही पांणी तें मागुतें सीतळ होये ॥ उक्तं च ॥

यदि स्याच्छीतलो वह्निः शीतांशुर्दहनात्मकः ।
न स्वभावोऽत्र मर्त्यानां शक्यते कर्तुमन्यथा ॥ १०६ ॥

जरि शीतळ वन्ही [अग्नी जर थंड असेल आणि चंद्र जर उष्ण असेल तरच प्राण्याचा स्वभाव बदलता येणे शक्य आहे. अग्नी कधीच थंड नसतो आणि चंद्र कधीच उष्ण नसतो, तेव्हा अर्थात् प्राण्याचा स्वभाव बदलता येणे शक्य नाही, हा भावार्थ.] होय : चंद्रमा उष्ण होये : तै मृत (त्य)लोकीचां प्राणियांचा स्वभावो अन्येथा करूं शकीजे : ऐसें आसें : या कारणास्तव दुष्टाचा स्वभावो कांहि केलयां जाय ना : मग रायासी चेउ आला : उठौनि उभा राहीला : सेवकाकरवीं पासोडा झाडविला : मत्कुण खाटेंमध्यें गेला : तवं ते मंदवीसर्पीणी [मू. मांद॰.] सेवकें देखीली : ते मारीली :

तैसा हा संजीवकु दुष्टु : जवळी आसतां तुज मरण होइल : याचें अभ्यांतर तुज [मू. तुजु.] कळले नाही ॥ उक्तं च ॥

त्यक्ताश्चाभ्यन्तरा येन बाह्याश्चाभ्यन्तरीकृताः ।
स एव मृत्युमाप्नोति यथा राजा ककुद्रुमः ॥ १०७ ॥

.............प्रगट केले : तो मृत्यु पावे : जैसा ख[सदुम....कोल्हा ......मृत्यातें] [१२ व्या कथेत सं. प्रतीतील ‘ककुदुम’ — याचे मराठीत ‘खसदुम’ झाले आहे. हेच नाव पुढे खसद्रुम’ असे लिहिले आहे.] पावला : “तें कैसें?” पींगळीकु पुसे : दमनीकु सांगे :.......... .... “आईक राया :

कथा १२*
निळीत पडलेला चंडरव कोल्हा

कोन्ही [मू. कोन्हीं.] यके वनिं चंडरउ [चंडरव. ज्याचा आवाज मोठा आहे असा.] येनें नावें कोल्हा होता : तो कदाचित् क्षुधा-पीडीत होउन नगरामध्यें प्रवेसला : तयातें देखौनि स्वापदें स्वानें पाठि लागलीं : तवं तो पळतां नीळामाजि [निळीमध्ये.] पडला : नीळवर्णु जाला : तवं तो चंडरउ कोल्हा वनां गेला : तयातें [मू तआतें.] देखौनी सर्व सीहव्याघ्र(घ्रा)दिकें स्वापदें बेहालीं : सभवंती पळौं लागलीं : म्हणती : "हा कवणु बळीवंतु आसैल : आम्हांसी न कळे : यासी विस्वासावें ना ॥ उक्तं च ॥

न यस्य चेष्टितं विद्यान्न कुलं न पराक्रमम् ।
न तस्य विश्वसेत्प्राज्ञो यदीच्छेच्छ्रियमात्मनः ॥ १०८ ॥

जयाचें चेष्टीत नाहि कळालें : ना प्राक्रमु नाही जानीतला : तरि श्रीयस्कारें पुरुशें तयाचा वीस्वासु न करावा : तवं चंडरउ तया भ[य*]चकीतातें देखौनी बोलता जाला : 'आरे स्वापदे हो : ना भी : ना भी [भिऊ नका, भिऊ नका.] : तुम्ही भय न धरावें : मज ब्रहोनि [मू. ब्रह्मनि.] स्त्रजीला आसें : म्हणे : स्वापदाचा राजा कोन्ही नाहि : तरि तुवां [मृत्य] लोकीं जाउनी स्वापदाचें रक्षण करावें :' म्हणौनी मी [ये वनिं] आलों आसें : तरि माझी आज्ञें ['माझीए' असे पाहिजे. माझ्या आज्ञेत.] तुम्ही समस्तीं राहावें : मी खसद्रुम [मू. 'स्वसद्रुम.' अन्यत्र 'खसद्रुम' नाव आहे. साम्याभासाने 'स्वसद्रुम' लिहिले गेले असावे.] राजा ऐसें माझें नावं : तरि मी तु[म*]चें आतां रक्षण करिन : समस्ताचें दुख हरीन :" ऐसें आईकौनि सीहाव्याघ्रादीकी (क) समस्तें स्वापदें येउनी पुढां उभीं राहिलीं : "स्वामी : आंम्हासी कांहि आज्ञा दिजे :" तवं तेणें सीहासि प्रधानवट दीधली [मू. 'दीधलों'.] : व्याघ्रासी शैयेनाचा आधि-काररू [शयनाचा, बिछाना वगैरे सज्ज करण्याचा अधिकार.] दीधला : गजासि तांबोळाधिकाररू [विडे तयार करून देण्याचा अधिकार.] केला : वृशभासी द्वारपाळत्व दीधलें : कोल्हयासंगातें बोलेचि ना : आवघी मारौनि दवडिलीं [घालवून दिली.] : सीहा-व्याघ्रादिकी (क) [हेच रूप यापूर्वी १२ व्या ओळीत आलेले आहे. समासातील 'सीहा' हे रूप लक्षात घ्यावे. 'सीहाव्याघ्रादिकी' यातील अन्त्य इकार अकारासाठी वापरला आहे.] मृगातें मारौनि तयापुढां ठेवीती : फुकाचें मांस भक्षीती : तवं सीहादिक म्हणती : "चाला : पारधीसि जाउं :" तवं तो खसदुम म्हणे : "अवंदाचें [मू. अंवदाचे. मूळ शब्द **अवंदा**= या वर्षी. मूळ फारशी शब्द **आयन्दा** असा आहे.] साल आम्हि दुवाड पडलों आसौं [याचा संबंध नीट लागत नाही. 'अवंदाचें साल....आम्**हा** दुवाड पड**लें** आ**से**' असे असावे. 'हे वर्ष आम्हाला फार कठीण आहे—म्हणून आम्ही पारधीला येत नाही' हा भावार्थ. 'आम्ही दुवाड पडलों' असाच पाठ घेतला तर 'अवंदाचां सालीं' असे असावे. तसे घेऊन, आम्ही दुवाड पडलो=आम्ही **कठीण** पडलो—अडचणीत पडलो—असा अर्थ करावा लागेल. तो समाधानकारक नाही.] :" ऐसें तयातें चाळविती [चाळवीत. हे अनेकवचनी रूप नव्हे. अकारांत शब्द इकारांत लिहिला आहे. तो कोल्हा अशा रीतीने (खोटी कारणे सांगून) त्या श्वापदांना फसवीत असे.] : तवं तो कोन्हीं येके समईं : दुरी कोल्हीं बोभाउं लागलीं : तो शब्द आईकौनी तोहि उंच स्वरें रूदन करूं लागला : तवं स्वापदें म्हणति : "आरे : हा

तवं कोल्हा : येणें आम्हांसी चाळविलें :” ऐसें म्हणौनी तयातें....... नीळा यव............कटकी केली [चालून जाणे, हल्ला करणे. सं. ‘कटक’ (सैन्य) पासून कटकी, कटकै (=स्वारी, सैन्यासह शत्रूवर चालून जाणे) असे शब्द मराठीत आले आहेत. तुळा : ‘तो कृदांता संसारावरी : प्रतापमल्लु परेशु कटकै करी’ (मूप्र. ६८५); ‘तेथ रामदरणा उतरला : कटकैये जात असे’ ‘ए वेळेची **कटकै** परते कां’ (लीच. ए. ५६). ‘कटकै’ याचेच दुसरे रूप ‘कटकी’. पाहा : ‘कटकी कटकाई ते लस्केघाई तसींचही’ (भाषाप्रकाश. १९·१०).] : जीवें मारिला :

तैसा हा संजीवकु......याचा [मू. आचा.] [अ]....यम नाहि जानीतला : हा तुमतें मारावयाची हाव धरितु आसे : ऐसेंयाचें [मू. ०आचें.] काय कराल : तें मनासी आनीजे :” तेव्हळीं पींगळीकु म्हणे : “हा आम्हांशी वोखटें कैसें करिल तें सांगां पां?” दमनकु म्हणे : “तो शिंगें समोर करूनी यईल : तेधवां वोखटें जाणावें : सींगापासौनि तुम्हासी भय आसें :” ऐसें पींगळीकाप्रती दमनीकु बोलीला : मग पींगळीकु म्हणे : “ऐसें तरि संजीवकासी : प्रातःकाळीं मारीन जाणावें :”

मग दम[नी*]कु संजीवकापासी आला : संजीवकासी जुहारू करुनि चींतावर्त होउनि बैसला : संजीवकु पुसे : “क्षेम असा? जरि आजी माझेया घरासी आलें तरि आजि मी धन्यु ॥ उक्तं च ॥

ते धन्यास्ते विवेकज्ञास्ते सभ्या इह भूतले ।
आगच्छन्ति गृहे येषां कार्यार्थं सुहृदुत्तमाः ॥ १०७ ॥

ते धन्य : ते वीवेकी : तो मान्य पृथी[वी*]माजी जाणावा : जयाचां घरिं सुहृदवर्ग कार्यार्थ [येती : तरि] मी धन्यु :” ऐसें आईकौनि दमनीकु म्हणे : “सेवक ज[नासि सुख] कैचें?” तवं संजीवकु म्हणे : “तुं कां दुचीता : चींतावर्तु दिसतोसी? काई तुज दुख आसें तें सांग पां :” तवं दमनीकु म्हणे : “सांगता लाज पडति आसे : काई सांगौं? ॥ उक्तं च ॥

संपत्तयः परायत्ता सदा चित्तमनिर्वृतम् ।
स्वजीवितेऽप्यविश्वासस्तेषां ये राजसेवकाः ॥ १०८ ॥

॥ तथा च ॥

सेवया धनमिच्छद्भिः सेवकैः पश्य यत्कृतम् ।
स्वातंत्र्यं यच्छरीरस्य मूढैस्तदपि हारितम् ॥ १०९ ॥ [‘जे पुरूस सेवा करौनि धन ईछीती (सेवा करून धन मिळवू इच्छितात) तेहीं सेवकीं काय केलें?’—याचे उत्तर मूळ सं. श्लोकात आहे ते असे. ‘त्या मूर्खांनी आपल्या शरीराचे स्वातंत्र्यही गमावले’. हे उत्तर आपल्या संहितेत नाही. येथील या आशयाचे वाक्य गळाले असावे.]

जे पुरूस सेवा करौनि ध[न] ईछीती : तेहीं सेवकीं काय केलें? ॥ उक्तं च ॥

जीवन्तोऽपि मृताः पञ्च व्यासेन परिकीर्तिताः ।
दरिद्रो व्याधितो मूर्खः प्रवासी नित्यसेवकः ॥ ११० ॥

जीत होत सांतां [होत्साता, असून.] पांच जण मेले : ऐसें जाणावें : येकु दरिद्री : व्याधीतु : मुर्खु [**मू.** मुखु.] : आणी प्रवासी : आणी सदासेवकु : ऐसें व्यासें नीरोपीलें : तरि संजीवका : सेवकासी सुख कैंचें? आनीक येक आसे : सचीवें [**मू.** 'सचीते'—संस्कृत १११ व्या श्लोकातील 'सचीव' शब्द येथे पाहिजे त्याप्रमाणे दुरुस्ती करून घेतली आहे.] स्वामीयांचा मीत्रभेदु सेवकापासी न सांघावा ॥ उक्तं च ॥

यो मन्त्रं स्वामिनो भिन्द्यात्साचिव्ये संनियोजितः ।
स हत्वा नृपकार्यं तत्स्वयं च नरकं व्रजेत् ॥ १११ ॥

मंत्री जो [होउनियां] रायाचा मंत्रभेदु भेदी : तो नृपकारियातें ['जो मंत्री होउनियां' (असून) स्वतःच राजाचा मंत्रभेद करती (राजाचा मंत्र=गुप्त मसलत फोडतो; ती गुप्त न ठेवता इतरांना सांगतो). 'नृप**कारियातें** (कार्यातें).] नासौनि नरकाप्रती जाये : तथापी तुं माझा सोईरा असे [तू सोयरा आहेस (अससी). 'असे' हे द्वितीय पुरुषी एकवचन म्हणून वापरले आहे. पुढील वाक्यात 'अससी' हेच रूप वापरले आहे.] : मीत्रु अससी [**मू.** अस**षी**.] : तुजपासी सांगी-तलें पाहीजे : तुजवरि पींगळीकु कोपला असे : म्हणे 'या [**मू. आ.**] संजीवकातें मारौनी सर्वहि स्वापदें तृप्त करूं :' ऐसें म्यां आइकीलें : तेनें मी दुचीता जालां :" मग संजीवकु म्हणे : "म्यां काय अपराधु केला जे मजवरि अवकृपा [**मू.** **अन**कृपा.] धरिली आसे : जें मातें मारिल?" तवं दमनीकु म्हणे : "रायाचा वीस्वासु करि [तो*] [हेच वाक्य पुढे आले आहे. (ओ. ११) त्यावरून येथें 'तो' हा शब्द असावा असे स्पष्ट दिसते. म्हणून संहितेत घातला आहे.] मुर्ख" ॥ उक्तं च ॥

काके शौचं द्यूतकारेषु सत्यं क्लीबे धैर्यं मद्यपे तत्त्वचिन्ता ।
सर्पे शांतिः स्त्रीषु कामोपशांतिः राजा मित्रं केन दृष्टं श्रुतं वा ॥ ११२ ॥

तवं संजीवकु परम वैराग्य पावला [अत्यंत विरक्त झाला, निराश झाला.] : "कटाकटा [हाय हाय. सं. कटंकटः—हे भगवान शिवाचे एक नाव आहे. त्यावरून मराठीत कटकटा=शिव शिव, अरेरे—असा शब्द आला असावा. 'हा दुःखोद्गार मूळचा कन्नड भाषेतील असावा' असे डॉ. तुळपुळे म्हणतात. (यादवकालीन मराठी भाषा. पा. ३२६). पण तो वरीलप्रमाणे 'कटंकटः' पासून आला असावा, असे वाटते. 'कष्टं कष्टं' या संस्कृत शब्दावरूनही तो आला असणे शक्य आहे. मराठीत 'कट' किंवा 'कटा' असा एकेरी शब्दही आढळतो. तुळा : '**कट** रे मूर्खिं केवडें । जोडिलें होणे (ज्ञाने. १६·४१८.); '**कटा** रे मियां चाटिला । कुचस्वेदु' (ज्ञाने. १३·५३८). इतर रूपे पाहा : '**कटकट** धात्रया : काइ केलें या देवकीया' (उगी. ११४); '**कटाकटा** धात्रेया । कैसें जालें अनुग्रहा या' (ज्ञाने. ११·३९५) 'कटाकटा' हे रूप पुढे पान १४९·१ मध्ये आलेले आहे, ते पाहावे.] : मी कुमंडळाआंतु [वाईट, दुष्ट लोकांच्या समूहात मी पडलो.] पडलां : कुमित्राची [दुष्ट मित्र.] सेवा केली : तयाचें फळ पावलों : राया[चा*]* [हेच वाक्य वर आले आहे. (ओ. ६) तेथे 'रायाचा' असे पद आहे. त्याप्रमाणे दुरूस्त करून घेतले आहे.] विस्वास करि तो मुर्ख ॥ उक्तं च ॥

अहं हि संमतो राज्ञो य एवं मन्यते कुधीः ।
बलीवर्दः स विज्ञयो विषाणपरिवजितः ॥ ११३ ॥

मी रायासी मान्यु : राजा मज[वांचौनि कां]ही नेणे : ऐसें जो मानि तो मुर्ख जानावा : तो सींगेंवांचौनि बैलो जाणावा : तरि म्यां आयुक्त केलें : या सीहासी मैत्री केली ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

मृगा मृगैः सङ्गमनुव्रजन्ति गावश्च गोभिस्तुरगास्तुरङ्गैः ।
मुर्खाश्च मूर्खैः सुधियः सुधीभिः समानशीलव्यसनेषु सख्यम् ॥ ११४ ॥

मृगासंगातें मृगासी मैत्री घडे : धेनुसांगातें धेनुसी मैत्री घडे : घोडासांगातें ['घोडासांगातें घोडासी'यात सामान्यरूप न करता 'घोडा' शब्द ठेवला आहे.] घोडासी मैत्री घडे : मुर्खासांगातें मुर्खासी मैत्री घडे : संतजनासि संतजनेसी मैत्री घडे : ऐसें समसीळेसी सख्य होये :" संजीवकु म्हणे : "दमनिका : दुर्जनाचिय संगती राहंस कीजे ना : ते दुर्जन उपायांतरें मारतील ॥ उक्तं च ॥

बहवः पण्डिताः क्षुद्राः सर्वे मायोपजीविनः ।
कुर्युः कृत्यमकृत्यं वा उष्ट्रे काकादयो यथा ॥ ११५ ॥

बहुत दुष्ट जण पंडित ऐसें म्हणविति : मायाप्रपंचें जीती [खोटा व्यवहार करून उपजीविका करतात, जिवंत राहातात.] : जैसें काकादिक उष्ट्राचां ठाईं [मू. थाई.] अकृत्य करिते जाले :" "हे कैसी कथा?" दमनीकु पुसे : संजीवकु सांगे :

कथा १३ *
भाबडा कऱ्हा आणि धूर्त वाघ, कोल्हा व कावळा

"कोन्हे एका [मू. ऐका.] रायाचा कऱ्हा ['कऱ्हातें'—सामान्यरूप केलेले नाही.] राजेनी आक्षम म्हणौनी सांडीला :.... तो आरंन्यामध्यें सैरावैरा चरे : तवं [ते वनींचा राजा] .... मदोत्कटु [नामें] सीहं : तेणें कऱ्हातें देखौनि पुसिलें : "तुं कोण गा यथें आलासी?" तो म्हणे : "मी कऱ्हा : राजेनि अक्षम म्हणौनी सांडीलां : तुझेया रानाआंतु असों :" तव्हां तेणें सीहें त्यासी अभयदान दिधलें : "तुवां सुखै रा[नीं*] असावें ॥ उक्तं च ॥

गृहे शत्रुमपि प्राप्तं विश्वस्तमकुतोभयम् ।
यो हन्यात्तस्य पापं स्याच्छतब्राह्मणघातजम् ॥ ११६ ॥

गृहाप्रति सतृ स[रण*] आला : तयासी आभयदान दिधलें : ऐसेंनि त्यासि मारि : तरि त्यासि सतब्राह्मण मारिलयाचें पाप घडे :" ऐसा तो करहा अरंन्यामध्यें सुखें चरे :

तवं येके समईं सीहा आणि गजासि युध जालें : सीहासी गजाचें दांताचे घाये लागले : तेणें घायें सीहासी उपवास पडला : तेव्हेळीं सीहेरायें : आपुले सेवक बोलाविले : ते येउनी नमस्कारू करुनी पुढां उभे राहिले : येकु कोल्हा : यकु काउळा : एकु [वरील ओळीत 'रानाआंतु' असा शब्द आहे. संदर्भ लक्षात घेता येथेही 'रानीं' हाच शब्द

अनुक्रमणिका

असला पाहिजे. लिहिताना 'नीं' हे अक्षर अनवधानाने गळले असावे.] व्याघ्र : तयातें सीहु म्हणे : "मी क्षुधेपीडीत आसें : मज कांहि आहारू मेळवा :" तेधवां कोल्हा काउळा आणी व्याघ्रु विचारुं लागले [विचार करू लागले, विचारविनिमय करू लागले.] : "हा आपुला स्वांमी भुका मरण द[शेतें पाव]ला आसे : तरि चाला जाउं : येकाधें सावज पाहुनी [आनुं :" ऐसें म्ह]णौनि ते रानाआंत नीगाले : फीरतफीरतां कष्टले : परि कांहि सावज सांपुडे ना : तवं शृंगाळू का[उ]ळातें म्हणे [सामान्यरूप केले नाही.] : "आप[ण*] काय फीरत आसौं : आतां हा कऱ्हा मारिजे : याचेंनी मासे सीहासी आहार होईल :" ऐसें वीचारूनि सीहासी म्हणे : "जी स्वांमी : आम्ही बहुत फीरलौं : पण सावज न सांपडेचि : तरी या [मू. ऐकु.] वनाआंतु येकु करहा आसे : तो मारलेयां समस्तांसी पारणें होईल :" ऐसें सृघाळाचें वचन आईकौनि सीहु त्यासि कोपें म्हणे : "आरे पापीष्टा : ऐसें तुज बोलुं न ये : म्यां त्यासि आभयेदान दीधलें आसें : आनी तुं जरि त्यातें मारिसी तरि पातक आसे [यानंतर मुळात 'ऐसें आईकौनि सृगाळु सीहातें म्हणे' हे वाक्य आहे. ११७ व्या श्लोकानंतर ते पुन्हा पुढे आलेले आहे. तेथेच ते योग्य आहे. म्हणून येथे वगळले आहे.] :" ॥ उक्तं च ॥

४. [मू. आ.]

न गोप्रदानं न महीप्रदानं । न चान्नदानं हि तथा प्रधानम् ।
यथा वदन्तीह बुधाः प्रधानं । सर्वप्रदानेष्वभयप्रदानम् ॥ ११७ ॥

ऐसें आईकौनि शृंगाळौ सीहासी म्हणे : "स्वामिसी मज जरि : आभयदान देउनि स्वयें आपुण त्यासि वधु कीजे तरि दोसु घडे : आणि तोच जरि स्वयं आपण स्वामीयालागी प्राणु वेंची तरि दोसु नाहि : [जरि तो क]ऱ्हा म्हणै[ल : 'मातें]चि वधा :' तरिची वधावा : नाही तरी आ[मचां- मधुनि*]....यकाधांस.... [भक्षौनि* [येथे कागद फाटल्यामुळे अक्षरे गेली आहेत. पुढे कावळ्याच्या तोंडी वाक्य आहे. 'मज भक्षौनी प्राणाधारु करावा'. हे लक्षात घेता येथेही 'भक्षौनि' असा शब्द असावा, असे वाटते.]] प्राणाधारू करावा [प्राणाला आधार द्यावा. थोडेफार खाऊन भूक कमी करावी व प्राण वाचवावा.] : जरि स्वांमी मरणावस्तेतें पावले : तरि या प्राणाचा काये उपयोगु?" ऐसें [मुळात हा शब्द 'ऐसें ऐसें' असा दुबार लिहिला गेला आहे.] आईकौनि मदोत्कटु सीहु म्हणे : "तुमचें मनीं येईल तें करावें :"

मग व्याघ्र कोल्हा काउळा तया कऱ्हेयापासि गेले : त्यातें म्हणौं लागले : "गौसांवियां उपवास पडताति : तरि चाल संभाळी :" ऐसें म्हणौनि चौघ जण सीहापासी आले : जोहारू करिते जाले : मग काउळा म्हणे : "आम्ही सर्वत्र फीरलौं : परि कांहि सावज न देखौं : आतां मज भक्षौनी प्राणाधारु करावा [प्राणाला आधार द्यावा. थोडेफार खाऊन भूक कमी करावी व प्राण वाचवावा.] ॥ उक्तं च ॥

आपदं प्राप्नुयात्स्वामी यस्य भृत्यस्य जीवति ।
प्राणेषु विद्यमानेषु स भृत्यो नरकं व्रजेत् ॥ ११८ ॥

अनुक्रमणिका

जयाचा भृत्यु स्वामीसी आपती कांमा न ये : तो भृत्यु नरकातें पावे :” ऐसें काउळाचें वचन आईकौनि कोल्हा म्हणे : “तुझें मास थोडें : मी माझें मास देईन : आणि काउळेयाचें मांस खातां दोस असे :” ॥ उक्तं च ॥

काकमांसं शुनोच्छिष्टं स्वल्पं तदपि दुर्लभम् ।
भक्षितेनापि किं तेन तृप्तिर्येन न जायते ॥ ११९ ॥

तवं शृंगाळु सीहातें [म्हणे] : “काकमांस : तेंहि स्वानें उचिष्टिलें : आणि तेंहि स्वल्प : आणि तेंहि दुर्लभ : तरी तें भक्षीलयां आणि त्रुप्ती नोहे : तरि तें भक्षौं न ये :” मग कोल्हा सीहातें म्हणे : “माझे मांसा भक्षावें : मज सनाथ करावें : स्वामीकाजीं माझे प्राण वेचती तरि मज इहलोकीं परलोकीं बरवें होये ॥ उक्तं च ॥

स्वाम्यायत्ताः सदा प्राणा भृत्यानामर्जिता धनैः ।
यतस्ततो न दोषोऽस्ति तेषां ग्रहणसंभवः ॥ १२० ॥

जे भृत्य स्वामीचें ठाईं : धनप्राणें [धनाने आणि प्राणाने, धन आणि प्राण देऊन.] कामा यती : त्यासि काहिचि पातक नाहि :” ऐसें कोल्हेयाचें वचन आईकौनि व्याघ्र म्हणे : “तुम्ही स्वल्प-काये [स्वल्प आहे काय (शरीर) ज्यांचे; लहान शरीराचे (त्यात मास फार थोडे असणार).] : आणि नखायुध [**मू.** ‘नशायुध’. ज्या पोथीवरून प्रत केली असेल तीत ‘नषायुध असे असावे. **ष** ऐवजी प्रतकाराने **श** लिहिला. ‘नषायुध’ मधील **ष** हे अक्षर **ख** चे द्योतक होय. नखे आहेत आयुधे ज्यांची ते. नखे असलेले प्राणी खाण्याला निषिद्ध आहेत, असे यावरून दिसते.] : तुझें माश भक्षण करितां बरवें नव्हें : तुं प[र*]ता सरि : मी आपुला [**मू.** आपुलो.] देह देईन ॥ उक्तं च ॥

नाभक्ष्यं भक्षयेत्प्राज्ञः प्राणैः कण्ठगतैरपि ।
विशेषात्तदपि स्तोकं लोकद्वयविनाशनम् ॥ १२१ ॥

एतदर्थं कुलीनानां नृपाः कुर्वन्ति संग्रहम् ।
आदिमध्यावसानेषु न ते गच्छन्ति विक्रियाम् ॥ १२२ ॥

प्राज्ञा [‘प्राज्ञा जो (जो जाणता आहे) तो (त्याला) आभक्ष भक्षौं नये’ (अभक्ष्य भक्षण करता येत नाही. त्याने अभक्ष्य भक्षण करू नये).] जो तो आभक्ष भक्षौं न ये : जऱ्ही प्राण कंठगतीतें पाव[ला... तें आभक्ष आल्प] [‘प्राणैः कंठगतैरपि’ याचे भाषांतर. प्राण कंठाच्या गतीने (मार्गाने) पावला (आला)—प्राण कंठमार्गापर्यंत आले, जायला लागले तरी.] लोकद्वयातें [इहलोक व परलोक.] नाशत : आनी जे कुळीन..... तयासि [जे उत्तम कुळात जन्मले आहेत त्यांचा (कोणत्याही) निमित्यें (कारणासाठी) विग्रहो न करिती (त्याग करीत नाहीत). कारण, ते (कुलीन पुरुष) आरंभी, मध्ये किंवा शेवटी (मरणकाळी) कधीही ‘वीक्रयेतें न पावति’—त्यांच्यात (त्यांच्या निष्ठेत) बदल होत नाही.] ....[नी]मीत्यें विग्रहो न करिती : आदि मध्यें आवसानीं ते वीक्रयेतें [(सं. विक्रिया).] ने पावति :” मग व्याघ्र सीहातें विनवी : “जी स्वामी : मजवरी कृपा

अनुक्रमणिका

करावी : मज मारौनी पारणें करावें : मज स्वर्गीं वासु द्यावा : आणी इह-लोकीं परलोकीं यश विस्तारावें ॥ उक्तं च ॥

मृतानां स्वामिनः कार्ये भृत्यानामनुवर्तिनाम् ।
भवेत्स्वर्गेऽक्षयो वासः कीर्तिश्च धरणीतले ॥ १२३ ॥

जे भृत्य स्वांमीकार्या [स्वामीच्या कार्यासाठी, स्वामीप्रीत्यर्थ.] मृत्यातें [मू. भृत्याते.] पावले : तयासि स्वर्गीं वासु होये : आणी धरणीतळीं कीर्ती होये :” ऐसें तया[चे] वचन आईकौनि कऱ्हा म्हणे : “आगा व्याघ्रा : तुहि नखायुध प्राणि [हे वाक्य कऱ्ह्याने व्याघ्राला उद्देशून म्हटले आहे. ‘तू नखायुध आहेस, त्याप्रमाणे कावळा, कोल्हा व व्याघ्र हेही नखायुध आहेत. तुम्ही सर्व एकाच जातीचे आहात. म्हणून ‘हे स्वजाति प्राणि (आपल्या जातीचे हे प्राणी) वधणे तुज युक्त नव्हे. (तुला योग्य नाही) हा भावार्थ.] : स्वजाती तुज वधनें हें युक्त [कावळा, कोल्हा व वाघ हे तिन्ही प्राणी जसे नखायुध होत तसाच सिंहही नखायुध आहे हे लक्षात घेऊन हा भाग वाचावा.] नव्हे :” ॥ उक्तं च ॥

मनसापि स्वजात्यानां योऽनिष्टानि प्रचिन्तयेत् ।
भवन्ति तस्य तान्येव इहलोके परत्र च ॥ १२४ ॥

तवं तो कऱ्हा म्हणे : “जी : जाणतेनी पुरुशें मनें स्वजातीसी आनीष्ट चिंतुं नये : जरि स्वजातीसी वोखटें चींती तरि तोची वोखटें [मू. वोषटें.] पावे :” ऐसें कऱ्हा बोलीला : मग नमस्कार करौनि सीहापासी उभा राहिला : म्हणे : “[स्वामी] हे समस्त अभक्ष : तरि हें माझें देह आनीत्य : तरि गोसांवियाचे कारणीं लावावें : जेणें परम [मू. प्ररम.] गतीतें होये : ॥ उक्तं च ॥

न यज्वानोऽपि गच्छन्ति तां गतिं नैव योगिनः ।
यां यान्ति प्रोज्झितप्राणाः स्वाम्यर्थे सेवकोत्तमाः ॥ १२५ ॥

जे यज्ञकर्ते [मू. ऐज्ञकर्ते. ‘यज्ञकर्ते आणि योगेस्वर जे (ज्या) गतीतें पावती ते गती स्वामीकाजीं जो भृत्यु प्राण त्येजी तो पावे’—असा अन्वय. ‘पावे’ पूर्वी आलेले ‘ते गतीतें’ हे शब्द पुनरुक्त आहेत.] गतीतें पावती : आणि योगेस्वर गतीतें पावती : ते गती स्वामी-काजीं जो भृत्यु प्राणु त्येजी तो ते गतीतें पावे : म्हणौनि” कऱ्हा म्हणे : “मी आपुलें देह गोसांवीयांसि वेचीन :” तवं व्याघ्रु म्हणे : “हा शब्दु दिसे [याचा हा शब्द (म्हणणे, योग्य) दिसे.] :” या बोलासरिसा व्याघ्रु झोंबीनला : कऱ्हा मारौनि असकिं पारणीं केलीं :”

“तैसें” संजीवकु म्हणे “दमनीका : रायासी विस्वासु नये : दुर्जनाचीये संगती मरण होय :” ॥ उक्तं च ॥

अकालचर्या विषमा च गोष्ठी कुमित्रसेवा न कदापि कार्या ।
पश्याण्डजं पद्मवने प्रसुप्तं धनुर्विमुक्तेन शरेण भिन्नम् ॥ १२६ ॥ [या श्लोकानंतर मूळ प्रतीत पुढील वाक्य आहे. 'दमनीकु पुसें संजीवकु सांगें :' आणि नंतर 'कुमीत्रांची सेवा—' इत्यादि मजकूर आहे. संस्कृत श्लोकानंतर त्यावर टीका येणे हेच योग्य. शिवाय पुढे 'दमनीकाप्रति संजीवकु सांगे' हे वाक्य आलेलेच आहे. त्यामुळे आरंभीचे 'दमनीकु पुसें : संजीवकु सांगें' हे वाक्य अनावश्यक होय. म्हणून संहितेत ते वगळले आहे.]

"कुमीत्राची सेवा बरवी केली : जैसा पद्मवनीं हंस येकु होता : तेनें डुडुळासि मैत्रकी केली : म्हणौनि शरेकरौनी मृत्यातें[पावला] :" हे कथा......
[दमनीका प्र]ति संजीवकु सांगे :

कथा १४*
हंस आणि डुडुळ

[आपल्या प्रतीत हंसाचे नाव नष्ट झाले आहे. हर्टेलप्रतीत ते 'मदरक्त' असे आहे. ते संहितेत घातले आहे. **भा.** प्रतीत 'मंदरक' असे नाव आहे. **ह. भा.** प्रतीत हंसाने डुडुळाचे दोष वर्णन केले आहेत व दोष असूनही पाहुणा म्हणून त्याला ठेवून घेतले. मैत्री झाल्यावर डुडुळ परत गेला. त्याला हंस भेटायला गेला. भेटीत घुबड ओरडला. ते ओरडणे ऐकून बाण मारण्यात आला. तो हंसाला लागला व तो मृत्यू पावला—असे वर्णन आहे. आपल्या प्रतीत हा भाग नाही.]

"कोन्ही [मू. **यो**न्ही (सकळ संकेत य=क).] येके [सरोवरिं मदरक्तु*] नावें...हंस... तिए कमळवनीं
आसे : तवं तेथें डुडुळु एकु आला आसे : हंसें पुसिलें : "तुं कवण पक्षी?"
तवं तो म्हणे : "मी डुडुळु : तुजसंगें मैत्रत्व रावया आलौं :" तवं हंसु
म्हणे : "तुं नीसाचरू : तुज रात्रीं दृष्टी : मज दीवसा [मू. दीव**शा**.] दृष्टी : आनी
तुझा बोलु आमंगळु : माझा बोलु सुमंगळु : तुज मज मैत्री नाही :" तवं
तो म्हणे : "तुं उत्तमु : म्हणौनी तुजसवें मैत्रत्व करूं आलों : तरि मि तुझा
अतिथु ॥ उक्तं च ॥

आगते स्वागतं कुर्यात् गच्छन्तं न निवारयेत् ।
अयमेव परो धर्मः गृहिणां परिकीर्तितः ॥ १२७ ॥

जो पाहुणां घरासी आला : त्यासि आगत स्वागत करावी [क्रियापद स्त्रीलिंगी वापरले आहे.] : जाईल त्यासि
न वर्ज्यावें [मू. वर्जा**व्यें**.] : हा गृहस्तधर्मु बोलीला आसे :" मग त्या दोघांसी मैत्रत्व
जालें : तवं कोन्हे एके [मू. **ऐ**के.] समईं रात्रीं मार्गीं वानीय तेथें उतरलीं : तवं
तो डुडुळ रात्रीं तेथें बोभाईला : तवं वानीय शब्दु विंधिला [शब्द भेदला. शब्दाच्या (आवाजाच्या) अनुरोधाने बाण मारला.] : तो बाणु हंसासी
लागला : हंसु मृत्यातें पावला :

तैसें" संजीवकु म्हणे : "दमनीका : पींगळीकु मजसी [माधुरे....बो]ले [माधुर्ये बोले, गोड बोलतो.] : परि
भितरि विख(खा)सारिखा : आणि त्याचा परिवारूहि दुरिजनं [दुर्जन.] : ऐसामध्यें
आसतां मृत्यातें पावला :" ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

जंबुको व्याघ्र पार्श्वे ते तीक्ष्णतुण्डश्च वायसः ।
तेनाहं वृक्षमारूढः परिवारो न शोभनः ॥ १२८ ॥

दमनीकु पुसे : संजीवकु सांगे :

कथा १५*
देवगुफ वाढै आणि वाघ

[ही कथा हर्टेल व भावे प्रतीत आहे. निर्मळ पाठकाने व कृष्णराजानेही ती दिली आहे. इतरत्र नाही. **ह** प्रतीत वाढ्याचे नाव देवगुप्त असे आहे तर **भा** प्रतीत देवगुफ असे आहे. ह प्रतीत त्याला रथकार म्हटले आहे. **भा** प्रतीत वाढई असेच म्हटले आहे. आपल्या प्रतीत वाढ्याला वाघ भेटला असे वर्णन आहे. तर **भा** व **कृ** प्रतीत सिंह भेटला असे आहे. कथाभागही निराळा आहे.]

"कोन्हे एके [**मू.** ऐके.] नगरीं देवगुफ नांव वाढै होता : तो काष्टें तोडावया गेला : डोंगरासी आला : तवं आवचीता पुढां वाघु [**मू.** वाघ्रु. व्याघ्रु–असाही पाठ घेता येईल.] देखीला : मग म्हणे : "पळैन तरी मातें खाईल :" म्हणौनी त्या वाघाजवळी आला : वाघु [**मू.** वाघ्रु. व्याघ्रु–असाही पाठ घेता येईल.] म्हणे : "तुं मातें देखौनी कां पळसी ना? तरि आतां काये म्हणतोसी तरि सांग :" तो म्हणे : "तुझीय जाळेआंतु [जाळींत, वृक्षलतादिकांनी तयार झालेल्या तुझ्या स्थानात.] सायर थोर वाढले आसति : ते मी तोडैन : तुजकारणें पाहुनरू आनीला आसे :" तवं वाघौ म्हणे : "आम्ही मांसभक्षक : कहिं आंन्र खादलेंचि नाहि : तरि तें आन (न्न) आनी :" मग तेनें वाढैयें वाघापुढें दहिभातु मांडिला [**मू.** माडिला.] व्याघ्रेनी भक्षिला : व्याघ्रु सुखीया जाला : मग वाढैयातें म्हणे : "तुवां नीत्य याव्यें [यावे.] : काष्टें घेउनी जावें :" मग तो....... निगे[ला]........[दीवसा] दोचौ जवं जाये तवं त्या वाघा[जवळि प्रधान कोल्हा...... आनी काउळ*] देखिले [**मू.** देषिलें.] : पाहें : मग तयातें देखौनि वाढै व्रक्षावरि वळघला : तवं वाघें म्हणीतलें : "तुं कां भ्यालासी?" मग तो वाढै म्हणे
॥ उक्तं च ॥

जंबुको तव पार्श्वे तु तीक्ष्णतुण्डश्च वायसः ।
तेनाहं वृक्षमारूढः परिवारो न शोभनः ॥ १२९ ॥

"तुजजवळी कोल्हा आनी काउळा : दुष्ट प्रधान देखत आसौं : म्हणौनी वृक्षावरि वेघलौं : तुझी पाहाटें भेट घेईन : दुष्ट जनें वेष्टीत राजा वर्जावा
॥ उक्तं च ॥

गृध्राकारोऽपि सेव्यः स्याद्धंसाकारैः सभासदैः ।
हंसाकारोऽपि संत्याज्यो गृध्राकारैः स तैर्नृपः ॥ १३० ॥

हंसाकार सभासयित्री [सभासद.] आसती : आनी गीधापरि राजा आसे : तरि तो

अनुक्रमणिका

सेवावा :”

“तरि दमनीका : कोन्हे येकें दुर्जनें पींगळकु राजा मजवरि कोपविला : तो जरि मज मारौं पाहातो तरि मी तयासि बरवें युधु करीन : युधीं पडलयां मर्ण होये तें बरवे ॥ उक्तं च ॥

न तान्हि तीर्थैस्तपसा च लोकान्स्वर्गैषिणो दानशतैः सुवृत्तैः ।
क्षणेन यान्यान्ति रणेषु धीराः प्राणान्समुज्झन्ति हि ये सुशीलाः [या श्लोकाच्या उत्तरार्धाऐवजी येथे मुळात १३२ व्या श्लोकातील उत्तरार्ध चुकून लिहिला गेला आहे. (तो १३२ व्या श्लोकात पुन्हा आहेच). तो वगळून, संस्कृत पंचतंत्राच्या आधारे श्लोक पूर्ण केला आहे.] ॥ १३१ ॥

॥ तथा च ॥

मृतैः संप्राप्यते स्वर्गो जीवद्भिः कीर्तिरुत्तमा ।
तदुभावपि शूराणां गुणावेत्तौ सुदुर्लभौः ॥ १३२ ॥

॥ तथा च ॥

होमार्थैर्विधिवत्प्रदानविधिना सद्विप्रवृन्दार्चनै–
र्यज्ञैर्भूरिसुदक्षिणैः सुविहितैः संप्राप्यते यत्फलम् ।
सत्तीर्थाश्रमवासहोमनियमैश्चांद्रायणाद्यैः कृतैः
पुंभिस्तत्फलमाहवे विनिहतैः संप्राप्यते तत्क्षणात् ॥ १३३ ॥

संग्रामीं मरण होये तरि स्वर्गीं पावीजे [स्वर्ग प्राप्त होतो.] : आणी संग्रामीं जींकीजे तरी लोकामध्यें कीर्ती होय : हे दोन्ही पदार्थ सु(शु) रासि दुर्लभ : आनेक होमादिकेंकरौनी : वीवीधें दानें [मू. दान्यें.] करूनि : विप्रवं (व्रं)दें पुजौनि : भुरी दक्षीणें आस्वमेधादीक यज्ञ करौनी : षणमास [सहा महिने तीर्थाच्या ठिकाणी आश्रमात राहून. ‘षण्मास’ हा शब्द मूळ संस्कृत श्लोकात नाही. ‘सत्तीर्थाश्रम’— यातील ‘सत्’ शब्द ‘षट’ समजून हे भाषांतर केले असावे.] तीर्थाश्रम वस्ती करौनि : चांद्रायनाद्यें [चांद्रायण आदी. **चांद्रायण** : एक व्रत आहे. हे व्रत करणाने प्रतिपदेला एक घास, द्वितीयेला दोन घास याप्रमाणे पौर्णिमेला १५ घास अन्न सेवन करायचे व त्यानंतर वद्य पक्षात चंद्राची एकेक कला कमी होत जाईल त्याप्रमाणे दररोज एकेक घास कमी करून अमावस्येला काहीच खायचे नसते. चंद्राच्या कलांनुसार भोजन घ्यायचे असते म्हणून याला ‘चांद्रायण’ व्रत म्हणतात.] तपें करौनि जें फळ होये तें फळ संग्रामीं सस्त्रधारीं : सन्मुख जे पुरुष निहत जाले ते तें फळ पावती :”

ऐसें संजीवकाचें वचन आईकौनि दमनकु वीचारीता जाला : म्हणे : “हा संजीवकु.... कदाचीत पींगळकातें मारि : [तरि....आतां....ऐसें] करिन : संजीवकासी आणी पींगळीकासी युध्य नव्हें : आणि संजीवकु यथौनि [मू. अथौनि.] जाये : ऐसें करूं : आणी स्वामीसेवकासी संग्रामु बोलीला नाही : निर्बळें बळासी विरोधु न करावा ॥ उक्तं च ॥

शत्रोर्बलमविज्ञाय वैरमारभते तु यः ।

अनुक्रमणिका

स पराभवमाप्नोति समुद्रष्टिट्टिभाद्यथा ॥ १३४ ॥

सत्रुचें बळ नेणौनि जो वैर आरंभी तो पराभवातें पावे : [जैसा समुद्र टिटवा-पासौनि*] हे कथा दमनीकु संजीवकाप्रति सांगे : दमनीकु म्हणे : “आईकी संजीवका : सबळीं बुधीसी वर्तिजे [मू. वृत्तिजें. सामर्थ्यवान व्यक्तीबरोबर विचारपूर्वक (बुधीसी) वागावे.] ऐसें नीतीसास्त्रीं आसें :

कथा १६*
टिटवा, टिटवी आणि समुद्र

“पुर्वीं समुद्राचे तीरिं टिटवा टीटवी [मुळात यापुढे ‘समुद्राचें तीरीं’ हे शब्द चुकून पुन्हा लिहिले गेले आहेत. ते संहितेत वगळले आहेत.] होती : दोघें स्त्रीपुरुशे होति : तवं कीती येका दीवसा टिटवीसी प्रसुतसमयो जाला : तवं ते भर्तारातें म्हणे : ‘आगा प्राणनाथा : मज प्रसुतीकाळ आला असे : तरि येकाधें निरु-पद्रव स्थान [मू. स्छान.] पाहुनि ये : तेथें मी आंडिं ठेवीन :’ मग टिटवा म्हणे : ‘प्रीये : हा समुद्राचा उपकंठु रंम्यु आसे : तरि येथेंचि तुवां आंडि ठेवावीं :’ [ते टि-]टवी म्हणे : ‘यथें पुर्णमेचें दीवसीं समुद्राची वेळ चढत आसे [समुद्राची वेळ (लाट, भरती) चढत असते. भरतीमुळे लाटा उंच चढतात.] : ते मदोन्मता हस्तीतेंहि नांगवें [संस्कृत वाक्य ‘मत्तगजेन्द्रानपि समाकर्षति’=मदोन्मत्त हत्तीलाही ओढून नेते. ‘आंगवें’ असा पाठ असता तर हा अर्थ आला असता. **नांगवे** या पाठामुळे पुढीलप्रमाणे अर्थ करावा लागेल. मदोन्मत्त हत्तीलाही ती (समुद्रवेला) वश होत नाही, आटोक्यात येत नाही. मदोन्मत्त हत्तीही पौर्णिमेच्या दिवशी भरतीच्या लाटांना तोंड देऊ शकत नाही. तो वाहून जातो.] : म्हणौनि आणीक ठावो विचारिजे : येथौनि जाउं :’ तीचें वचन आईकौनी वीस्मीत होउनि टिटवा बोलता जाला : ‘प्रीये : तुं हें अयुक्त बोलीलीसी : हा समुद्र कींमात्रु [मू. कीमात्रु.] : जो कां माझीं आंडिं पराभवी : तरि येथें निश्चींत प्रसुती करावि : पराभवास्तव आपुलें स्थान [मू. स्छान.] सांडि तो मुर्ख जाणावा ॥ उक्तं च ॥

यः पराभवसंत्रस्तः स्वस्थानं संत्यजेन्नरः ।
तेन चेत्पुत्रिणी माता तद्वन्ध्या केन कथ्यते ॥ १३५ ॥

॥ तथा चं ॥

दाने तपसि शौर्ये च यस्य न प्रथितं मनः ।
विद्यायामर्थलाभे च मातुरुच्चार एव सः ॥ १३६ ॥

जो पराभवें [मू. परांभव.] स्थान [मू. स्छान.] सांडि तयाची माता वंध्या म्हणीजे [त्याची आई वांझ म्हणावी. जणु हा मुलगा तिला झालाच नाही, हा आपल्या आईचा मुलगा नव्हे असे समजावे.] : तो पुत्रु नाही प्रसवली : तेणें पुत्रें ते पुत्रवंती नोहे :’ ऐसें तयाचें वचन आईकौनि समुद्र मनीं विचारिता जाला : म्हणे : ‘पाहा हो : या पक्षीयाचा केव्हडा

गर्वु ॥ उक्तं च ॥

उत्क्षिप्य टिटिभः पादावास्ते भङ्गभयाद्दिवः।
स्वचित्तकल्पितो गर्वः कस्य नात्रापि विद्यते ॥ १३७ ॥

[टि]टभ आका[शआंत] उडौनि पायां स्थीरू [मू. स्छीरू.] होत आसे : पक्षासि भंगु करित नाहि [मूळ संस्कृत श्लोकाचा (१३६) अर्थ असा आहे की, आपल्या आंगावर आकाश कोसळेल या भीतीने, टिटवा आपले पाय वर फेकून स्थिर राहातो आपल्या पायांनी आपण आकाश अंगावर कोसळू देणार नाही असा जणु त्याला गर्व वाटतो. '**पक्षासि भंगु करित नाही**' या वाक्यात तो अर्थ उतरत नाही.] : ऐसा गर्वु तयासी आसे : तरी आपुला आंतःकरणीं गर्वु कोणासी पां नाही? तरी याचा नीरधार पाहीन :' ऐसें समुद्र बोलीला : मग ते टिटवी समुद्राचें तीरिं प्रसवली : आंडिं ठेवीलीं : तवं एके [मू. ऐके.] दीवसीं टिटवी आणि टिटवा : दोघीं चारा आणावया गेलीं [दोघेही गेले.] : मग तो समुद्र वेळेंकरौनि [लाटेने.] आंडिं हरता जाला : तवं ते चारा घेउनी आली : जवं पाहाति तवं स्थान [मू. स्छान.] सुन्य देखीलें : मग टिटवी आक्रांदु लागली : मग टिटवाप्रति [टिटव्याला.] बोलीली : 'आरे मुर्खा : म्यां तुज पहिलेचि म्हणतीलें : जें दुर स्थान [मू. स्छान.] पाहुनी यें : तरि तुं नाईकसि : त्वां आहांकारू केला : म्हणौनि तुज कुर्माची परि जाली ॥ उक्तं च ॥

सुहृदां हितकामानां न करोतीह यो वचः।
स कूर्म इव दुर्बुद्धिः काष्ठाद्भ्रष्टो विनश्यति ॥ १३८ ॥

जो सोहृदासोइरयांचें वचन नाइके तो कुर्मातें (चे) परि नासातें पावे : जैसा कुर्म येकु काष्टापासाव [लाकडापासून.] नासातें पावला :" "हे कैसी कथा ?" टिटवा पुसे : टिटवी सांगे :

कथा १७*
बडबड्या कासव आणि हंस

"कोन्ही येके सरोवरिं कंबुग्रीउ येणें नावें कछपु आसे : संकट आणि वीकट : ऐसें दोघी हंस तयाचे मीत्र असती : ते हंस प्रतदिनीं सरोवरासि येति : तया कछपासंगातें कथावारता गोष्टी करिती : आस्तमान आपुलीया स्थाना [मू. स्छाना.] जाती : तवं कितियेका दिवसा अनावृष्टिस्तव सरोवर आटलें [मू. आतलें (सकळ संकेत त = ट).] : तें देखौनी दोघी हंस दुखी जाले : मग कासवाप्रति बोलते जाले : 'मीत्र कछपा : आतां तुं काये करसील? हें सरोवर आटतील [ए. व. कर्ता—अ. व. क्रियापद.] :' तवं कंबुग्रीउ म्हणे : 'मीत्र हो : आतां आमचें जीणे पुरलें [जिणे संपले.] : उदक आटलें : म्हणौनि 'मीत्र हो : आतां बुद्धि कांहि केली पाहिजे ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

मित्रार्थे बान्धवार्थे च बुद्धिमान्यतते सदा ।
जातास्वापत्सु यत्नेन जगादेदं वचो मनुः ॥ १३९ ॥

आपतीकाळु प्राप्त जाला आसतां : मीत्राकारणें बंधुकारणें बुद्धीमंतें प्रयत्नु करावा : तरि माझे तुम्ही मीत्र असतां : तरि येकाधी बळकट दोरि : अथवा दृढ काष्ट आणावें । तें काष्ट मी दातेंकरौनी [धरीन]..... आणी [तुम्ही] दोघी जण लाकुडाचें ढोणें दोहीकडे [धरौनि] यके [वेळे उडावें] : जेथें जळपुर्ण सरोवरू आसैल तेथें नेउनी ठेवावें : जरि तुम्ही माझे मीत्र : तरि यैसा उपावो तुम्ही करावा : जेनेंकरौनी माझे प्राण वांचती : प्राणांत-समये जो मीत्रु कामा ये तो मीत्रु : मीत्र ऐसेचि व्होवें ॥ उक्तं च ॥

पापान्निवारयति योजयते हिताय गुह्यानि गुहति गुणान्प्रकटीकरोति ।
आपद्गतं च न जहाति ददाति काले सन्मित्रलक्षणमिदं प्रवदन्ति सन्तः ॥ १४० ॥

मीत्र कैसा जाणावा? जो पापापासाव नीवारि : हीतवचन उपदेशी : आपुले गुह्यातें अछादि : मीत्राचे गुण प्रकट करी : आणी मीत्रु आपतीतें पावला तयातें न संडी : कोन्हे येके काळीं [योग्य वेळी.] मीत्रासी दे [आपल्या मित्राला आपले सर्वस्व देतो.] : ऐसें सन्मीत्रलक्षण मानुभा[व*] [सं. महानुभाव, श्रेष्ठ पुरुष, साधु पुरुष.] बोलती ॥ उक्तं च ॥

विनये वंशपरीक्षा स्त्रियः परीक्षा तु निर्धने पुंसि ।
आपदि मित्रपरीक्षा शूरपरीक्षा रणाङ्गणे भवति ॥ १४१ ॥

वंसाची परिक्षा [वंस (सं. वंश)=वेळू, बांबू. वंसाची म्ह० वेळूची परीक्षा त्याच्या ‘नम्रते’वरून (तो वाकतो की नाही, हे पाहून) करता येते; वेळू जर चांगला वाकत असला तर तो उत्तम वेळू होय. असे ओळखता येते. **वंस** शब्द श्लिष्ट समजून दुसराही अर्थ करता येईल. वंश शब्दाचा दुसरा अर्थ, पूर्वजांचे कुळ. एखाद्या माणसाच्या ठिकाणी ‘नम्रता’—विनय आहे की नाही हे पाहून तो चांगल्या ‘वंशात’ =कुळात जन्मलेला आहे की नाही, तो कोणत्या ‘वंशात’=कुळात जन्मलेला आहे, हे ओळखता येते. नवरा (पुरुष) दरिद्री झाल्यावर त्याची पत्नी (नारी) त्याच्याशी पातिव्रत्याने वागते की नाही, यावरून तिची परीक्षा होते.] विनयो म्हणीजे नम्रताकरौनि जानीजे : निर्धन पुरूश जाला : ते समईं नारि पतीवृतापणें चाले : ते परिक्षा तेधवां ठावी पडे : दोघी समरंगणीं मीळाले : तेधवां जो सुर तयाची परिक्षा [**मू.** ‘परिक्षीता’.] ठावी पडे [**मू.** ‘चडें’. (सकळ संकेत च = प).] :”

मग ते हंस म्हणती : “अगा कुर्मा : आम्ही ऐसेंचि करौनि : परि तुवां मौन्य धरावें : तोंडें कांहि न बोलावें : जरि बोलसी तरि आपलें केलें पावसील [आपल्या करणीचे फळ (प्रायश्चित्त) तुला मिळेल.] : आम्हासी बोलु नाही :” तवं कंबुग्रीउ म्हणे : “आम्ही कांहि न बोलौं :” ऐसा नीश्चयो करौनि : ते दोघे हंस लाकुडासहित उडाले : तवं खाली [**मू.** षाली.] एक नगर आलें : तेथील लोकीं वरौतें लाकुड हंसीं नेईजत [**मू.** नईजत.] देखौनी [हंसाकडून लाकूड नेले जात असलेले पाहून.] : लोक येकवाट [एकत्रित.] मिळौनी : कोल्हाळ करौं लागले : “आहो : इहीं पक्षीं

वक्राकार काई नेईजत असें?” ऐसा लोकाचा बोभाट आइकौनि कंबुग्रीउ बोलता जाला : म्हणे : “हा काईसा कोल्हाळौ?” ऐसें बोलतांची काष्टापासौनी कंबुग्रीउ पडला : तो लोकीं सतखंडु केला :”

मग टीटवी म्हणे : “तैसें तुं माझें वचन गर्वास्तव नाईकसीची : म्हणौनि आंडीं समुद्रिं नेलीं :” ऐसें आईकौनि टीटवा कोपातें पावला : म्हणे : “आतां मी समुद्रातें[सोखीन :”] तेधवां [टीटवी] म्हणे : “तुज आनी समुद्रा वैर [मू. व्यैर.] केवी [घडे? तुं*.....सामान्य.....”] : टीटवी म्हणे : “तुज जरी समुद्रेसीं वैर करणें : तरि तुं बहुता पक्षीयातें मेळवी : मग वैराचा उद्यमु करावा : बहुतीं [अनेकांनी मिळून कार्य केल्यास काहीही असाध्य नाही.] काये आसाध्य आसे? ॥ उक्तं च ॥

बहूनामल्पसाराणां समुदायो हि दुर्जयः ।
तृणैरावेष्ट्यते रज्जुर्येन नागोऽपि बध्यते ॥ १४२ ॥

बहुताचा समुदाय तो जीकवे ना : येथें दृष्टांतु : बहुतें तृणेंकरौनि रजु जे केली : तेहिं कुंजरातें बांधीजे : तरि बहुतीं काय न होये? ॥ उक्तं च ॥

चटकाकाष्ठकूटेन मक्षिकादर्दुरैस्तथा ।
महाजनविरोधेन कुञ्जरः प्रलयं गतः ॥ १४३ ॥

चीडी आणी काष्टकुट पक्षी : आनी बेंडुक : येहिं मीळौनी कुंजरु मारीला :” “हे कैसी कथा ?” टिटवा पुसे : टीटवी सांगे :

कथा १८*
चिडी, काष्ठकूट, बेडूक आणि हत्ती

“कोन्ही येके ठाईं [मू. थाईं. (सकळ संकेत थ = ठ).] वटवृक्षाचां [वडाच्या झाडाच्या] पालवीं [पानांत.] चीडी एकी [मू. ऐकी.] व्याली होती : तवं ते मार्गीं हस्ती जात होता : तेणें ते सोंड घालौनि खांदि मोडिली : चीडीचीं आंडिं मेलीं : ते चीडि थोर दुख पावली : हस्तीवरि कोप करौनि काष्टकुटापासी [(सं. काष्ठकूट) लाकूड कोरणारा पक्षी. मराठीत याला ‘सुतार’ पक्षी असे नाव आहे.] गेली : तयापुढां दुख निवेदन केलें : मग तेनें समजावीली : तो म्हणे : ‘चीडीये : तुझा वैरि मारिन :’ मग तो काष्टकुट आनी चीडी मासियपासी येउनी दुख नीवेदन करिति जाली : ते मासी म्हणे : ‘मोहाळ खातां : माझे गोत्र हस्तीय खादलें [मासीयेपासी, माशीजवळ. ही माशी-मधमाशी होय. हत्तीने “**मोहाळ** (मोहोळ, मधाचे पोळे—त्यातील रस) **खातां माझें गोत्र** (पोळ्यातील माझ्या नातेवाईक मधमाशा) **खादलें**.”] :’ ‘तरी मज नीरोपु काये : तो मज सांघ : तो मी करीन :’ मग मासी म्हणे : ‘चाल जाउं : माझा मीत्रु मेघदुतु बेडुक

अनुक्रमणिका

आसे : तयासी दुख सांगौं : तो आपुलें कार्ये करैल :’ मग तयाप्रती जाउनी तो [बे*]डुकु सावदु केला : तयातें म्हणीतलें : ‘तुवां आडकडा [आड=कूप, विहीर, खोल खड्डा. त्याच्या **कडा**=काठावर.] राहुनि बेडुक शब्द करावा :’ तो म्हणे : ‘बरव्यें :’ मग काष्टकुटातें म्हणीतलें [**मू.** म्ह**णे**तलें.] : ‘ऐसें आम्ही करौनि [आम्ही (आपण) ऐसें करौनि (करू).] : जे हस्तीयाचे डोळे टोचुनी [(टोचूफोडू). डोळे फोडल्यावर त्यावर माशा बसून त्यांनी **खाडी**=खड्डा पाडला. डोळ्याचा भाग खाऊन टाकला व तेथे नुसते खळगे राहिले.] :’ मग तेणें टोचीले : मासीयां बैसौनीयां [**मू.** बैसोनी**आ.**] खाडि पाडीली : तो हस्ती आंधु जाला : ऐसा कोन्हे येके समईं हस्ती तृषाक्रांतु जाला : ऐसें तयासी पाणीया जातां सोये नेणेची [पाण्याची व्यवस्था, पाणी कुठे आहे ते त्याला कळेना.] : तवं आडकडेहोउनी बेंडुक बोलीला : तो म्हणे : ‘इकडें उदक आसें :’ तो हस्ती तेणें सोये निगाला : कड(डा)होउनी धारि पडला : प्राणु गेला :

म्हणौनि बहुत काय करुं न [शकती*?] बहुतेंकरूनि कार्ये होये : ऐसें टिटवीचें बोलनें आईकौनि..... टिटवा..... [चाचु भ]रौनी [चोच भरून. पुढील पानावर ‘ते देखिली’ यावरून ‘टिटवा....टाकी’या ऐवजी ‘टिटवी....टाकी’ असे असावे.] उदक बाहिर टाकी : आणि चांचु भरौनि माती समुद्रांत घाली : ऐसें कीतीयेक दिवस ते देखीली : मग मनिं संतोसला : मग गरूडाप्रती नीगाला : जाउनि गरुडापुढां सांगीतलें : म्हणे : ‘गरूडा : तुझेंनि हटें : समुद्र टिटवासी वैर [**मू.** गैर.] करित आसे : म्हणे : ‘जाये : गरुडासि सांग :’ मग मी तुज सांघावया आलौं : तें आईकौनि गरुड कोपला : समस्त भुमंडळीचे पक्षी हंकारिले : तेहिं येउनी तो समुद्र चांचुभरि शोषिला : तयाचीं पीलीं काढीलीं :”

म्हणौनि दमनिकु म्हणे : “संजीवका : वयसा [‘वयसा’ (वय किंवा आकृती) सान (लहान) थोर (मोठी) न म्हणावीं वय किंवा आकृतीवरून एखाद्याला लहान किंवा मोठे म्हणू नये, हा भावार्थ.] सान थोर न म्हणावी ॥ उक्तं च ॥

हस्ती स्थूलतरः स चाङ्कुशवशः किं हस्तिमात्रोऽङ्कुशः
दीपे प्रज्वलिते प्रणश्यति तमः किं दीपमात्रं तमः ।
वज्रेणापि हताः पतन्ति गिरयः किं वज्रमात्रो गिरि–
स्तेजो यस्य विराजते स बलवान्स्थूलेषु कः प्रत्ययः ॥ १४४ ॥

हस्ती जो स्थुळ [**मू.** **स्छ**ळ.] [आंकुशें*] वस्ये करिजत आसे : तरी काय हस्ती येवढा आंकु[श*]असे? वज्र जें की इंद्राचें वज्र तेणें गीरीपरवत भेदुनी पडती : तरि वज्र काय परवतायेवढें आहे? आणी दीप प्रजळीत असतां तम नाशातें पावे : तरि काये दीपायेवढें तम आसें? तरि वयसा सानां मोटि न म्हणावी : जो तेजें-करूनि बळवंतु तोच मोटा जाणावा : मोटेनि [(नुसते मोठे, आकृतीने स्थूल असून) काये काम? =त्याचा काय उपयोग आहे?] काये काम? म्हणौनि संजीवका : तुं पींगळीकेसी जुझौं पाहातोसी : हा भ्रमु [**मू.** भ्रमुं.] सांडी : त्याची स्तुति करि : त्यासी सरण जायें : इतुकेंनि तयाचा [**मू.** **त्य**याचा.] कोप जाईल :” दमनकु म्हणे : “संजीवका : मी रायापासी जाउनि तयाचें मनीं कैसें आसें तें तुज सांगौं यईन : पहिलें भलते

कार्याचा फळपाकु वीचारावा : मग तें कार्यें करावें [यानंतर 'ऐसें म्हणौनि दमनकु गेला' असे वाक्य मुळात आहे. ते पुन्हा पुढे आले आहे. तेथेच ते पाहिजे म्हणून येथे वगळले आहे.] ॥ उक्तं च ॥

उचितमनुचितं वा कुर्वतां कार्यजातं परिणतिरवधार्या यत्नतः पण्डितेन ।
अतिरभसकृतानां कर्मणामाविपत्तेर्भवति हृदयदाही शल्यतुल्यो विपाकः" ॥ १४५ ॥

ऐसें म्हणौनि दमनीकु गेला : तवं संजीवकु मनीं विचारिता जाला : म्हणे : "पळौं तरि दुष्ट सावजें मारितील : आणी तेणें पींगळकें मज अभयेदान दीधलें [आसें :] या उपरी....वोखटें करिल तरि मी जुझेनि [मू. तुझेनि. अक्षरसाम्यभ्रमामुळे **जु** ऐवजी **तु** लिहिला गेला असावा.] :" ऐसें ह्मणौनि तो प्रभात स [मईं.....आधो]मुख होउनी आला : तवं दमनीकु म्हणे : "पींगळीका : हा सींगें सामोर करौनि जुझावया आला : तुह्मी काये पाहात असा?" तवं सीहु हाक देउनि उठीला : चपट घायें हाणौनि [आपल्या पंजाचा घाव घालून.] मारिला :

तवं कर[कंट*]कु दमनीकातें म्हणे : "तुवां अधर्मु केला : तुं मैत्री(त्र) ['तुं मैत्री (मित्र) नव्हसी'.] नव्हसी : तुवां कुकर्म केलें : मंत्रु करौं नेणसीची : बापुडें पशु अपराधेवीण [मू. '......अपराधेवीण मारवीण मारवीलें'. यातील 'मारवीण' शब्द चुकून व चुकीचा लिहिला गेला आहे. संहितेत तो गाळला आहे.] मारवीलें : मंत्री तो ऐसा असावा : गर्वीष्टातें दंडावें : भंगलयातें हात देउनि [आधार देऊन **उभें राहावें** (राहवावे); किंवा हात देऊन आपण पक्के उभे राहावे, स्थिर राहावे, त्याला हात देण्याची भूमिका सोडू नये.] उभें राहावें : तो मंत्री म्हणिजे : सामदान(म) [यांची वर्णने पूर्वी आली आहेत, ती पाहावी. साम, दान (म) हे विधी, तसेच भेद व निग्रह (विग्रह) हे विधी. पहिलें (प्रथम) सामबुधीं (साम=सलोखा) घडवून आणण्याच्या बुद्धीने कार्य करावे.] विधि भेद निग्रह [मू. 'भेदाग्निग्रह'.] : ऐसे च्यारि उपाव असती : ऐसें नित्यी (ती)शास्त्र असें : पहिलें सामबुधीं कार्ये करावें ॥ उक्तं च ॥

स्माम्नैवादौ प्रयोक्तव्यं कार्याकार्यविचक्षणैः ।
सामसिद्धा हि विधयो न प्रयान्ति पराभवम् ॥ १४६ ॥ [श्लोक १४६ व १४७ मुळात प्रथम १४७ वा व नंतर १४६ वा असे लिहिले गेले आहेत. मुळातील १४६ व्या श्लोकात पुढील कथेचे सूचन असल्यामुळे तो नंतर यायला पाहिजे. हे लक्षात घेऊन त्याप्रमाणे संहितेत घातले आहेत.]

नग्नः श्रवणको दग्धः पार्थिवोऽभिमुखीकृतः ।
आत्मा चैवोन्नतिं नीतो बलभद्रेण मन्त्रिणा ॥ १४७ ॥

पहिलें सामबुधीं [मुळात 'सामसीधी' असा शब्द आहे. त्यातून योग्य अर्थ निष्पन्न होत नाही. ओ. ४ मधे पूर्वी हेच वाक्य आले आहे. तेथे 'सामबुधीं' असाच शब्द आहे. तोच येथे अभिप्रेत असल्याचे स्पष्ट दिसते. म्हणून संहितेत तोच स्वीकारला आहे. 'सामसीधी' असे चुकीने लिहिले गेले असावे. सं श्लोकापूर्वीच्या वाक्यात हाच शब्द 'सामबुधी' असा आलेला आहे. 'साम' या प्रकाराची 'सीधी'=सिद्धी, मंत्र, युक्ती.] कार्ये करावें : सामोपायें कार्ये केलें । तें कहिं पराभवातें न पावें : ऐसें नितीशास्त्रीं असें : श्रावणकु येनें नांवें क्षेपनीकु : बळीभद्र प्रधानु : सामोपायें [सामाच्या उपायाने, सलोखा घडवून आणण्याच्या उपायाने, असा याचा अर्थ होतो. या ठिकाणी 'सामोपाय' = सौम्य

उपाय, प्रीतीचे उपाय, असा अर्थ अभिप्रेत आहे. पाहा : 'कार्याण्युत्तमदण्डसाहसफलान्यायाससाध्यानि ये । **प्रीत्या** संशमयन्ति नीतिकुशलाः **साम्नैव** ते मन्त्रिणः' (पं. निर्णय. १-४०७). पुढे नग्न श्रमणकाची जी कथा आहे तीवरूनही हाच अर्थ निघतो.] जाळीला : जेनें क्षपनीकें राजा वस्य केला होता : म्हणौनि :" हे कथा : दमनीकु पुसे : करकंटकु सांघे :

कथा १९ *
बळभद्र प्रधान व श्रावणक

[**कथा १९ ***] [ही कथा फक्त हर्टेल प्रतीत आहे. मराठी **भा. कृ. पा.** प्रतीतही ती आहे. आपल्या कथेचे स्थळ वंग देशातील अमरपुर आहे. निर्मळ पाठकानेही तेच दिलेले आहे. **ह** आणि **भा. कृ.** प्रतीत ते कोसल देशातील अयोध्या आहे. राजाचे नाव ह प्रतीत व आपल्या **पा.** प्रतीत 'सुरथ' आहे तर **भा** प्रतीत 'दशरथ' आहे. साधूचे नाव **ह** प्रतीत नाही. **भा** प्रतीत **श्रवणु** तर आपल्या प्रतीत **श्रावणकु** असे आहे.]

"वंग देशीं अमरपुर नावं नगर आसें : तेथें सुरथु राजा राज्य करि : त्याचा मंत्री नाम (में) बळीभद्रु : तो राजेनि पारकेया देशावरि कटकीं पाठवीला [स्वारीवर पाठवले.] : तवं मागें तीये नगरि श्रावणुकु नावं क्षपनीकु आला : राजयासि जोहारू केला : तयासि राजेनि पुसीलें : "तुम्ही कोण नवे वितरागी दिसत आसा :" तवं तो दांभीकु म्हणे : "राया आम्ही प्रपंचातीत : आम्ही निस्पृहि [**मू.** नस्पृहि.] : आम्हासी वस्त्रादिक काये करावें आसें? [काय करावयाचे आहे?] ॥ उक्तं च ॥

देशे देशे भवनं भवने भवने तथैव भिक्षान्नं ।
नद्यां सरसि च सलिलं शिवतत्त्वार्थवेदिनां पुंसाम् ॥ १४८ ॥

ग्रामे ग्रामे कुटी रम्या निर्झरे निर्झरे जलम् ।
भिक्षायां सुलभं चान्नं विभवैः किं प्रयोजनम् ॥ १४९ ॥

आम्हां देशीं भुवनें असतीं [सर्व देशात आम्हाला घरे आहेत.] : भुवनाप्रती सुलभी भीक्षाणां (न्नां) [भिक्षान्न सुलभ=सुखाने, सहज प्राप्त होते.] : आणि न[ई*]सी जाउनि करसंपुष्टें उदक घेणें : आम्ही शीव [तत्वार्थवेदि] [शिव (कल्याणकारक) तत्व (रहस्य), त्याचा अर्थ जाणणारे (वेदि).] : आं[म्हा विभ]वादीकों काय प्रयोजन?" ऐसें आईकौनि [राजा] त्यासि सं..... उलफा लावौनी दिधला [दररोज त्याला शिधासामुग्री लावून दिली, शिध्याची व्यवस्था केली. 'उलफा' हा अरबी शब्द आहे.] : तो प्रत्यहिं प्रातःकाळीं राजदर्शनासी येत आसे : तवं येके समईं उसीरे आला : तवं राजेनी पुसीलें : "आजि कां राउळासी उसीरू लागला ?" तवं तो क्षेपनीकु म्हणे : "आजी आम्ही आपुलें देह मढीमध्यें ठेउनी स्वर्गासी गेलों होतों : तेथें तुह्मांसी देव पुसत होते :" तवं राजा म्हणे : "हें आश्चर्यें बोलीलेति :" तवं क्षेपनीकु म्हणे : "ऐसें आम्हि नीत्य जात आसौं :" याउपरी [**मू.** आउपरी.] राजा क्षेपनिकासी आधिक कृपा करौं लागला : तवं रायाचा प्रधानु [**मू.** प्रढानु (सकळ संकेत ढ = ध).] बळीभद्रु कीती येका दीवसा आला : येउनि रायासि भेटला : तवं तेनें रायाचां अर्धसीहासनीं क्षेपनीकु बैसला देखीला : तें देखौनी प्रधानु कोपला : मग म्हणे : "हे कोण मानभाव आसती?" तवं राजा म्हणे : "याची [**मू.** आची.] कथा आश्चर्ये [याची कथा आश्चर्यकारक आहे!] : हे

अनुक्रमणिका

प्रत्यहिं देह ठेउनि स्वर्गासी जात असती : प्रधाना : तुवां ऐसें कोठें देखिलें होतें?" हें आईकौनि रायातें वीनवीलें : "राया : आईकी येक कथा :

कथा २०*

सर्पदेहधारी पुरुष व त्याची पत्नी

[ही कथा संकृतातील फक्त हर्टेल प्रतीत आहे. मराठी **भा. पा.** आणि **कृ**. प्रतीतही आहे. पुढे १५० व्या श्लोकातील 'तक्षकस्य सुरतं यथा' याऐवजी **ह** प्रतीत 'पुष्पकस्य सुरैर्यथा' असे असून त्यावरून पुष्पकाची आणखी एक कथा दिली आहे. ती आपल्या प्रतीत नाही. पण **भा** प्रतीत मात्र आहे. **भा**. प्रतीतील कथेत 'पुष्कु नाम पुंसा बोलिका' याची कथा आहे. (पान २३).]

कोन्ही एके नगरिं देवश्रमा ब्र (ब्रा)ह्मणु होता : त्यासि लेकरूं नाही : कीति एका [**मू**. ऐका.] दीवसां दैवास्तव गर्भु राहिला : त्याचिय अस्त्रियेसी प्रसुती जाली : तवं तो सपुं उपजला : तो पेटारांतु आसे : त्यासि दुधुतुप पाजीती : धन देउनी वीव्हावो केला : तवं ते नोवरी रात्रीं पेटारापासी बाज घालौनि नीजे : तवं तो पुरुशदेह धरूनी रात्रीं रमे : नोवरितें भोगी : तवं तीचां ठाईं यौवन देखौनि ['तीचां ठाईं यौवन (तारुण्यसूचक, यौवनोपभोगसूचक पुष्ट स्तन) देखौनि' 'यौवन' शब्द 'स्तन' या अर्थीही वापरण्यात येतो. त्यापासून तयार झालेला **जोबन**=स्तन, हा शब्द लक्षात घ्यावा.] सासु ती[येतें] पुसती जाली : "तुज पुरुशाचा संभोगु दीसतु आसे :" तवं सुन म्हणे : "हें घडे ॥ उक्तं च ॥

> कृतान्तविहितं कर्म यद्‌भवेत्पूर्वनिर्मितम् ।
> न शक्यतेऽन्यथा कर्तुं तक्षकस्य सुरतं यथा ॥ १५० ॥

जे ब्रह्मेनी पुरवीं लीहीलें तें अन्येथा करूं न शकीजे [**मू**. षकीजें.] : जैसें तक्षकासि सुरत [हा तक्षकाचा उल्लेख तिचा उपभोग घेणाऱ्या सर्परूप पतीचाच होय.] : म्हणौनी काळाची गती न कळे :" मग सुन म्हणे : "हा पेटारां आसे तवं दीवसा सर्पु : बाहिर नीगे आनी पुरूष होउनी रात्रीं भोगु करी :" तें आईकौनी रात्रीं पेटारी जाळीली : तो दीव्य देह उरला : सुखें नांदुं लागला : ऐसें म्यां देखीलें..... ऐसें या [**मू**. आ.] क्षेपनीकाचे [दे]ह मढीमध्यें आसैल : तेधवां तें जाळीजे : आनी दीव्य सरीर उरैल :" तेधवां राजेनि ते मढी जाळीली : मध्यें क्षेपनीकु मृत्यातें पावला :"

ऐसें करकंटकु म्हणे : "दमनीका : ऐसा उपावो करौं नेणसीची : तुवां बुधी भलतेचि केली : हें बरवें नव्हें ॥ उक्तं च ॥

> न शुष्को नाम्यते दारु मूर्खशिष्यं विवर्जयेत् ।
> सच्छिष्ये ह्युपदेशस्तु सर्वेषां हि सुखावहः ॥ १५१ ॥

शुष्क वृक्षु नमे ना : तैसा मुर्ख सीष्यु नमे ना : म्हणौनि मुर्खासी उपदेशु न द्यावा संत सीस्यासि उपदेश दिजे : तरि सर्वासी सुखकारण होये : येविसी कथा आईक :" दमनीकु पुसे : करकंटकु [**मू**. करटु.] सांघे : म्हणे : "आईक दमनीका :

अनुक्रमणिका

कथा २१*
थंडीने गारठलेला वानर वपक्षी

कोन्हे येके वनीं वानर हीवें पीडितो (त) : मग तें रात्रीचां समईं आगी-यावरि [काजवा. याच्या अंगातून प्रकाश बाहेर पडतो. त्यामुळे तो जणु अग्निस्फुल्लिंग आहे असा भास होतो. हाच शब्द **भावे** प्रतीतही वापरला आहे. पाहा : 'सीतकाळी **आगिया** देखौनि आगि म्हणौनि पानिं झांकला' (पंच. भा. पा. २३). आपल्या प्रतीत पुढे याचाच उल्लेख **खदिर आगीया** (खदिर लाकडाच्या स्फुल्लिंगाप्रमाणे लाल दिसणारा काजवा) म्हणून केला आहे.] त्रुण घालौनि फुकौं लागले : तवं तेथें येकु पक्षीया होता : तो बोभा-इला : तो म्हणे : 'आरे वानरा मुर्खा : हा आग्नी नोहे : हा खदिर आगीया :' तवं रागें येकें वानरें धांवौनी तो पक्षीया मारिला : म्हणौनी मुर्खासी उपदेसु न द्यावा :

तैसा दमनीका : तुं मुर्ख : भलतें कार्ये वीचारौनी करावें : अविचारित कार्यें करितां अपाये पावीजे ॥ उक्तं च ॥

धर्मबुद्धिः कुबुद्धिश्च द्वावेतौ विदितौ मम ।
तयोर्विविदते प्राप्तं कुबुद्धिर्मरणं ध्रुवं ॥ १५२ ॥

धर्मबुधि आणि कुबुधि : दोघांसि वेवादु करितां कुबुधीचा पीता मरणातें पावला :" ते कथा करकंटकु सांगे : दमनीकु परिसे :

कथा २२*
धर्मबुद्धी आणि दुष्टबुध्दी

"कोन्हे येकें नगरिं धर्मबुधी आनी दुष्टबुधी दोघी मैत्र होते : ते आपुलें सेत पाहावया गेले : तवं तेहिं येका वोहळाचां आडकडां धनाची चरवी देखीली..... ते काढौनी येकाचां बुडीं बुजीली : तेहिं स्वल्प ऐसें धन [काढौनि*] वाटौनि घेतलें । तया उपरी दीवसां आठां : दृष्टबुधीनें [धन काढौनी*] नेलें : रीती [**मू.** तीरी.] चरवी तेथें बुजीली : मग तो धर्मबुधीतें म्हणे : "[चाला*] [येथे फाटलेले पान ठीक करण्यासाठी कागद चिकटवला आहे. त्यातून पाहता ही अक्षरे अस्पष्ट दिसतात. ती वाचून संहितेत दिली आहेत. या पानावर पुढेही असेच झाले आहे. मी वाचलेली अक्षरेच मुळात असावी. तरीही ती तारकांकित करून दिली आहेत.] धन काढौं :" ऐसें दोघी गेले : जवं पाहाति तवं चरवी रिती [आसे* :] तें देखौनि दुष्टबुधी हाक देउनी पडला : म्हणे : "धर्मबुधी : [तुवां : धन का*]ढौनि नेलें :" ऐसें दोघी[हि भांडतां] : गां[वीचां*] लोकापासी [आले*] : तवं माहजण म्ह[णति :] "आथी : का[ही साक्ष] असे?" [आथी=होय, ठीक आहे; पण काही साक्ष आहे काय?] ॥ उक्तं च ॥

विवादेऽन्विष्यते पत्रं तदभावेऽपि साक्षिणः ।

अनुक्रमणिका

साक्ष्यभावात्ततो दिव्यं प्रवदन्ति मनीषिणः ॥ १५३ ॥

तवं दृष्टबुद्धी म्हणे : “मी वनीचीं झाडें [साक्ष] ...बोलवीन :” तवं माहाजन [मू. माहजान.] : म्हणती : “हें बरवे ॥ उक्तं च ॥

अन्त्यजोऽपि यदा साक्षी विवादे दर्शितो मम ।
न तत्र घटते दिव्यं प्रवदन्ति मनीषिणः ॥ १५४ ॥

जऱ्ही साक्षी आंत्यजु कां नसे [अंत्यज का साक्षीला असे ना. ‘असे ना.’ या शब्दाचा पर्याय म्हणून ‘नसे’ हे रूप वापरले आहे. तो जरी साक्ष देण्याला असला तरी चालेल. मग (तऱ्ही)] : तऱ्ही दी[व्य] न घडे [दिव्य करण्याची गरज नाही. कोणीच जर साक्षीला नसला, अन्य कोणताही पुरावा नसला तर पूर्वी दिव्य करायला लावून वादाचा निर्णय करीत.] : ऐसा माहाणभव [मू. ‘माहाजणभव’. –शेवटच्या ‘भव’ या अक्षरावरून ‘येथे माहाणभव’ हा शब्द अभिप्रेत असला पाहिजे हे स्पष्ट दिसते. संस्कृत श्लो. (१५४) मधील ‘मनीषिणः’ साठी तो योजला आहे.] बोलती : तरि तुं साक्ष देसि तरि बरवें :” ऐसा नीश्चयो करौनि घरासी पाठीवलें :

मग घरासि जाउनी दुष्टबुधी : आपुलेया पीतयापासी म्हणे : “तये वनीं जुना वृक्षाचें ढोलर आसें : तेथे तुं प्रथम जाउनी नीघ [जाऊन रीघ, प्रवेश कर.] : आणी ऐसें बोलावें : जें दृष्टबुधि साच : हें धन धर्मबुधीनें [मू. धर्मबुधीतें. अक्षरसाम्यामुळे **न** साठी चुकून **त** लिहिले गेले.] काढीलें : येथेसंसयो नाही :” तवं त्याचा पीता म्हणे : “आरे मुर्खा : कुडें करीतां आपुण दोघै मरुनि [मू. मरून. मरूं. प्र. पु. अ. व. रूप.] : उपावो करितां अपावो होईल ॥ उक्तं च ॥

उपायं चिन्तयेद्विद्वानपायमपि चिन्तयेत् ।
बुद्धिमान्नकुलेनैव ससर्पो भक्षितो बकः ॥ १५५ ॥

उपाय करितां अपाया पावीजे : म्हणौनि पुढीलासी वाइट चींतावें ना : जैसें बुधीमंतें नकुळे सर्पासहित बग खादलें :” “हे कैसी [मू. कीसी.] कथा ?” दुष्टबुधी पुसे : तयाचा पीता सांगे :

कथा २३ *
बग, सर्प आणि किरिचील

“कोन्ही येका वृक्षाखाली बग बैसले होते : तेथें सर्पु एकु आला : तेणें सर्पें बगाचीं पीलीं खादलीं : तवं ते बग सरोवरासी यउनी रूदन करूं लागले : आहारु नेघेती : तवं तयातें कीरीचीलु म्हणे : “तुम्ही दुख कां करित असा ?” तवं ते म्हणती : “आम्ही जें वृक्षीं आसौं : तेथें येकु सर्पु येउनी आमचीं पीलीं खातु आसे : हें आमचें दुख कवणाप्रति सांघों? कोण निवारण करिल?” तें आईकौनि कीरीचीलु म्हणे : “तुम्ही येथें मासोळीया मुगुसा-कारणें चारा घाला : ईतुकेनी मुगुसें सर्प मारिजैल [मुंगसाकडून सर्प मारला जाईल.] :” मग मनीं कीरचीलु

अनुक्रमणिका

म्हणे : “तुम्ही स[म*]स्त बग आणी सर्प आमचे वैरी : तरि दोघी [मरतील] :” म्हणौनि ऐसा कीरीचीलें बगासी उपदेश दीधला : तवं तेहीं बगीं तैसेंची केलें : मग मुगुसें सर्पहि खादला आणि बगही खादला :”

तैसें पीता म्हणे : “उपाये करितां अपावो पावीजे :” तो बैल दुष्टबुधी ['दुष्टबुधी'ला बैल (=बैलाप्रमाणे मूर्ख असल्यामुळे) म्हटले आहे.] न मानेचि : पीतयातें ढोलारामध्यें बळेंचि घातलें : मग दुष्टबुधी आणी धर्मबुधी आणी सकळ लोकहि वनाआंत गेले : मग तेहिं ऐसें श्रवणीं घातलें [कानावर घातले, सांगितले, म्हटले.] : “वनदेवते : माये : सत्य वदि [वद, बोल.] : हें धन कोणें नेलें?” तवं दृष्टबुधीचा पीता : ढौलाराआंतौनी बोलीला : म्हणे : “हें धन धर्मबुधीनें नेलें :” मग धर्मबुधी म्हणे : “हें सत्य : धन मी देईन : पर हें ढोलार मी जाळीन : तुह्मी येथेंचि बैसा :” तेव्हां ढोलाराभवती अग्न [मू. अज्ञ.] लावीली : मग दुष्टबुधीचा पीता कर्पला : हाक देउनि ढोलाराबाहिर पडला : मग [मुळात 'मग' शब्द चुकून दोनदा लिहिला गेला आहे.] दीवानें [कारभाऱ्याने. हा शब्द येथे महाजनासाठी वापरला आहे.] दुष्टबुधी आणी दृष्टबुधीचा पीता ऐसें दोघी मारीले : धन आवघे घेतलें :”

“तैसा दमनीका : तुं कपटी : उपावो करौं नेणसीचि : तुवां संजीवकु मारवीला : हें अनुचीत केलें : वीस्वासघात कवणासी न करा[वा*] : आणि परकया धनाचा अभीळासु करों नये [मुळात 'न' अक्षर चुकून दोनदा लिहिले गेले आहे.] ॥ उक्तं च ॥

अभिलाषो न कर्तव्यः परवस्तुनि मानवैः ।
नृपकन्याभिलाषेण ऋक्षेण भक्षितो द्विजः ॥ १५६ ॥

पुरूशेनि परवस्तुचा अभीळाषु [मू. यभिळाषु.] न करावा : जैसा कोन्हे येकें ब्राह्मणें [मू. ब्रह्मणें.] राजकन्येचा अभीळासु करितां आसवलाकरि खावविलें :” हे कथा दमनीकु पुसे : करकंटकु सांगे :

४. [मू. कीतीचीलु. पुढे हा शब्द 'कीरी (र)चीलु' असा आहे. तदनुसार येथे दुरूस्त करून घेतला आहे.]

कथा २४*

राजकन्या दमघोषा व कामुक ब्राम्हण

[ही कथा इतर कोणत्याच संस्कृत पंचतंत्रात व मराठी भा प्रतीत नाही. महालिंगदासाच्या पंचोपाख्यानात ती पाचव्या तंत्रात आहे. निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानात ती येथेच आहे. कथेचे स्थूल स्वरूप यासारखेच आहे. अस्वलाच्या ठिकाणी त्या कथेत महालिंगदासाने वाघाची योजना केलेली आढळते.]

“विशाळपुर नाम नगर आसें : तेथें चीत्रसेन नावें राजा राज्य करि : तयासि कीती येका दीवसां येकि कन्या जाली : तीचे नावं [मू. नावें.] दमघोशा : ते कीती येका दीवसां मोटि जाली : पीतेनें उपवर देखौनि मनीं वीचारीलें : “ईचे लग्न [मू. गग्न. (सकळ संकेत ग = ल).] आतां कीजे : आपणयासारिखा वीवाहो मेळवीजे” [आपल्या योग्यतेला शोभेल असे लग्न जुळविले पाहिजे, 'वीवाहो' याचा अर्थ व्याही (वैवाहिक>विवाही>व्याही) असाही होऊ शकेल.] ॥ उक्तं

अनुक्रमणिका

च ॥

> ययोरेव समं वित्तं ययोरेव समं कुलम् ।
> तयोर्विवाहमैत्र्यं स्यान्नोत्तमाधमयोः क्वचित् ॥ १५७ ॥

ऐसें विचारौनि राजेनि येकु जोतीसी : सीधांतवक्ता ऐसा ब्राह्मणौ पाचारिला : तया क[रवीं ते] कन्येची लग्न [मू. लङ्ग.] पत्रीका करवीली : म्हणे : "भटो : य कंन्येसी [कोण] उत्तम लग्न [मू. गग्न. (सकळ संकेत ग = ल). नक्षत्रमार्ग आणि क्षितिज यांचा जेथे छेद होतो तो बिंदू.] आसे? मासतीथी पंचकसुधि [कोणत्याही पाच वस्तूंचा समूह. ज्योतिष्यात नक्षत्रसमूहासाठी हा शब्द योजतात असे दिसतो. 'धनिष्ठाच्या दुसऱ्या अर्धापासौनु पंचक-पांच नक्षत्रें (ज्योरमा. ११९). पाचही नक्षत्रांची निश्चित स्थिती.] दिनसुधी [दिवसाची शुद्धि. निश्चित दिवस.] :

ऐसें विचारौनि : गोसावीं सांगीतले पाहिजे :" ते कमळाकरें जोतिसीयें [मू. जोतसीयें.] तीय मदनघोशेचें रूप देखौनी मदनें व्याकुळ जाला : म्हणे : "इयेसी संभोगु होये तरिचि देहे वांचे : तरि आतां ऐसा प्रकारू केला पाहिजे :" मग वाडवेळें कमळाकरू रायाप्रती बोलता जाला : म्हणे : "इये राज्यकंन्येची जन्मपत्रीका करवीली असे की नसे?" राजा म्हणे : "ईची जन्मपत्रीका केली नाही : आतां तुम्ही वीचारा [(विचार करा) व जन्मपत्रिका तयार करा.] :" तेव्हां राजेनी मास दीवस सांघीतले :

मग तेणें जन्मपत्रीका केली : मग तो ब्राह्मणु बोलीला : म्हणे : "राया : इयेसी जन्मकाळीं मुळ नक्षेत्र दुष्ट ग्रहयुक्त होतें : तरि तुं इचें लग्न [मू. लङ्ग.] करौं पाहातोसी : हें अनुचीत : लग्न [मू. लङ्ग.] करीतांची तुझया राज्यासी क्षयो सांगे : तरि तुवां हे त्येजावि :" राजा म्हणे : "कैसें कीजे?" : ब्राह्मणु म्हणे : "राया : सुवर्णाचा पांजरा करावा : त्या पांजराआंतु हे कंन्या : आळंकारयुक्त करौनि : वस्त्रसहित घालावी : तो पांजरा गंगेमध्यें सोडौनी दीजे : ईतुकेन तुझे राज्य आक्षयें होईल : हें सत्य मानावें :" ऐसा ब्राह्मणु बोलीला : मग तेनें राजेनि तैसेंचि केलें : सुवर्णाचा पांजरा करौनि तयाआंत राजकन्या घातली : पांजरा गंगेमध्यें सोडौनी दीधला : तवं तो ब्राह्मणु तया पांजराचें सोई नीगाला : म्हणे : "आतां पांजरा धरीन :" तवं तो पांजरा : कोन्हे एके नगरीचा राजा तेणें तो पांजरा गंगेमध्यें पाणियाआंतु जातां देखीला : देखौनि रायासी विस्मो [सं. विस्मय. आश्चर्य. पाहा : 'तेविंचि संजयो ह्मणे काइसा । **विस्मो** एथ कौरवेशा' (ज्ञाने. ११·१७५); 'ऐसी देखौनि आस्थानी । **विस्मो** जाला मनीं' (शिशु. ५३).] जाला : म्हणे : "पाहा हे सुवर्णाचा पांजरा कैसा?" तो सेवकजनाकरौनि [कडून.] आणिवीला : राजा जवं पांजरा उघडौनि पाहे तवं कंन्यारत्न देखीलें : ते कंन्या काढौनि घेतली : मग राजेनी कंन्या सुंदर देखौनि स्त्री [पत्नी.] केली : मग तात्काळीं राजेनी असवल आणवीलें : तया पांजराआंत घातलें : मग मागुता पांजरा [नईमध्यें] सोडौनी दीधला : पांजरा जातु असे : तवं तो कम[ळाकर ब्राह्मण] पांजराचें सोई धावत आसे : तेणें पांजरा देखीला : पांजरा झेपुनी धरिला : उचलौनि कष्टें म[स्त*]कीं धरीला : रात्री[स *]मईं घरासी आनीला : मग येक वेगळें गृह होतें : तेथें जाउनी पांजरा ठेविला : मग घरासी गेला :

अनुक्रमणिका

स्त्रीयसि म्हणे : “भोजनासी कांहि आसे?” तवं तयाची स्त्री म्हणे : “आजी तुम्ही कोठे गेले होतें?” तवंतो न सांगेची : मग स्नान देवताआर्च-[न*] करौनि भोजन केलें : मग आपुलीये स्त्रीयेसी म्हणे : “पैल ग्रहामध्यें मी निद्रा करैन : तरि तुवां आजी तेथें न यावें [**मू.** आवें.] : बाहिरौनि कडी घालावी : मग आपण कांहि अन्न : दुग्ध : घ्रत : पानें : फुलें : भोगसंबंधि [(संभोगाविषयीची)] उपभोग [(उपभोगसामग्री). **भोग** हा शब्द भोगाची सामग्री या अर्थाने वापरला जातो. त्याचप्रमाणे, उपभोग=उपभोगसामग्री.] घेउनी तया ग्रहाप्रती गेला : पलंगु आथरौनि पलंगावरी पांजरा आणीला : मग तो ब्राह्मणु बोलीला : “आवो राजकंन्ये : तुं कां मजसि न बोलसि? तुं उपवासी अससी : तरि हें आन्न आसें : तुं खायें : हा उपभोगु करि [या उपभोगसामग्रीचा उपयोग कर; या वस्तूंनी स्वतःला शृंगार आणि मग ‘मजसी संभोगु करि’.] : मजसी संभोगु करि : तुझी आवस्ता मज मोटी लागली आसे : तरि तुजसी संभोगु केलयां माझीं अष्टआंगें नीवतील ॥ उक्तं च ॥

पश्य पश्य मम लिङ्गमुत्थितं देहि देहि मम मैथुनं प्रिये ।
मुञ्च मुञ्च परिधानकञ्चुकी स्पर्शयामि तव योनिमण्डलम् ॥ १५८ ॥

ऐसें बोलतां पांजरा उघडीला : तवं त्या पांजराआंतौनि : आसवल नीगालें : तेणें आसवलें तो ब्राह्मणु खादला :”

म्हणौनि दमनीका : पुढीलेयाचा अभीळासु नीका नव्हे : आनी तुं संजीवकाचा वैरी : आणि [पीं*]गळकाचाहि तुं [हीतकारक*] : परि मुरख ॥ उक्तं च ॥

पण्डितोऽपि वरं शत्रुर्न मूर्खो हितकारकः ।
वानरेण हतो राजा विप्रचोरेण रक्षितः ॥ १५९ ॥

पंडित सत्रु होय हें बरवें : आणि हीतकारक मुर्ख तो कामा न ये : तेथें दृष्टांतु : वांनरू एणें नावें सेवकु परि मुर्ख : तेणें राजा मारिला आसतां : विप्र जो चोरेणें [सं. श्लोकात ‘चोरेण’ असे आहे. त्यालाच तृतीयेचा प्रत्यय लावून रूप तयार केले. किंवा येथे लेखनदोष असावा.] रक्षिला :” “हे कैसी कथा :” दमनीकु पुसे : करकंटकु सांगे :

कथा २५*
वानर सेवक व विप्रचोर

“कोन्ही एके नगरिं : वानरू येणें नावें.... [रायाचा सेव]कु होता : तो रात्रीं खर्ग घेउनी जागतु आसे : तवं [येकु ब्राह्मण*] चोर रायाचीया मंदीरा चोरि करावया निगाला [बाहेर पडणे, हा याचा मूळ अर्थ आहे (सं.निर्गम). ‘रिग(घ)णे’ याच्या विरुद्धार्थाने तो सामान्यतः वापरला जातो. उदा : ‘रिगतां निगतां दातारें । ओलांडिजति उंबरें । ते मी होईन आणि द्वारें । द्वारपाळु’ (ज्ञाने. १३·४१५). तथापी, निगणे=जाणे, प्रवेश करणे या अर्थानेही हा शब्द वापरला जातो. त्याच अर्थाने तो येथेही वापरला आहे.] : तया ब्राह्मणाचें जन्म जालें तै जन्म-

अनुक्रमणिका

पत्रीका तयाची करवीली : तेथें ऐसें लीहलें आसें : जरि हा पंचवीसा वरूशाचा होईल : तै हा चोरी करम करैल : तरि त्यासि ऐ[सी*] बुधि उपजली : जें वीधात्रेनी लिहिलें ललाटि तें अन्यथा नव्हे ॥ उक्तं च ॥

यद्दिने पतितो बिन्दुर्मातृगर्भेषु निर्मितं ।
तद्दिने लिखितं सर्वं हानिमृत्युसुखदुःखम् ॥ १६० ॥

जै मातागर्भी पीतेयाचा [(बापाच्या) **बिंदु** (बिंदूने, वीर्याच्या थेंबाने)] बींदु **नीरमीला** [(प्राणी-जीव निर्माण केला) त्याच दिवशी हानी (तोटा), मृत्यू, सुख, दुःख (विधात्याने) लिहून ठेवलेले असते.] : तत्दीनें हानी मृत्यु सुखं दुखं लीहीलें : म्हणौनी तो ब्राह्मणु [**मू.** ब्रह्मणु.] म्हणे : "खान घेउं तरी रायाचें घरिं घेउं :" म्हणौनि खान [खणून, भिंती फोडून लुटणे. घरफोडी करणे. पाहा : 'गावी ओरपें दरडे पडों लागले : **खाणें** पडों लागलीं' (गोप्रच. ११५). भास्करभट्ट बोरीकर यांच्या शिशुपाळवध काव्यात 'कि कामतत्वाची भारदोरी : बांधता पांचाखरी : ना तो उघडा **खानौरी** अनंगाचा' (२६३) अशी ओवी आहे. त्यावरील टीपेत 'खाणौरी=खाण घालिता : घरफोडा' असा अर्थ दिला आहे. त्यावरून **खाण**=घरफोडी, हा अर्थ स्पष्ट होईल. खाण घालणे, याप्रमाणे 'खाण घेणे' खान पाडणे = घरफोडी करणे, हे वाक्प्रचार रूढ आहेत.] पाडावया घरामध्यें निगाला : तवं तेणें सुवर्णा-रोप्य [सुवर्णात आरोपित केलेले, जडलेले.] मुक्ताफळें : मानीकें सुपसकलादि [सुप+सकलादि. **सुप**=गादी, सुपती. (सं. स्वापवती). **सकलादि** = सकलाद (अरबी शब्द. सकलात), निळ्या किंवा शेंदरी रंगाचे रेशमी वस्त्र. सुपसकलादि=मौल्यवान रेशमी वस्त्रे—हा भावार्थ. पाहाः 'तेणे सुवर्ण रत्न मौक्तिक : हीरे कंकणादीक माणीक : वस्त्रें देखोनि अमौलिकें : वीचार करिता जाला. (निर्मळ पाठक, पंचो. तंत्र १·९२३).] : इत्यादिक आनेक वस्तु देखीलया : परि आमुकें घेईजे ऐसें तयाचें मनीं न ये : जरि कां तो पंडितु : आमुकें घेतां आमुकें पातक ऐसें जानीजे : म्हणौनि कांहि नेघेचि ॥ उक्तं च ॥

ब्रह्महा क्षयरोगी स्यात्सुरापी श्यामदन्तकः ।
सुवर्णस्तेनः कुनखी दृश्चर्मा गुरुतल्पगः ॥ १६१ ॥

तवं तेनें पुढां साळीचा कोंडा देखीला : तो नीरदोश [तो निर्दोष, तो घेतल्याने कोणतेंही पातक लागणार नाही असा.] म्हणौनी मुष्टी एकी [**मू.** ऐकी.] घेउनी खांबाआड उभा राहिला : भवते पाहात आसे : तवं रायावरि सर्पु पडला : तवं वानरें मारावया खर्ग उभारिलें : राजा नीजीला आसे : तें देखौनी [ब्रह्मण]चोरें : 'हा हा' म्हणौनि वानराचा हात धरीला : तवं रायासी चेव आला : सर्प नीगौनि गेला : तवं राजा म्हणे : "तुं कोण गा : भीन्न रात्रीं आंतापुरा आंतु?" तवं तो म्हणे : "मज अभय देसील तरि सांगैन :" तवं राजा म्हणे : "नाभि :" तवं ब्राह्मणें [**मू.** ब्रह्मणें.] जन्मपत्रीकाचा पुर्वव्रत्तांतु सांघीतला : ते आईकौनी राजा वीशमीत जाला : रायें त्यासी आन्येक उचीत [सं. उचित. योग्य बक्षीस, दान. पाहा : 'भूपाळें **उचितीं** वारिला भाटु : तो म्हणे देवा पुरेतेयाचा पाटु' (नरुस्व. १३७).] दीधलें : मग राजेनी स्लोक म्हणतीला ॥ उक्तं च ॥

पण्डितोऽपि वरं शत्रुर्न मूर्खो हितकारकः ।
वानरेण हतो राजा विप्रचोरेण रक्षितः ॥ १६२ ॥

अनुक्रमणिका

म्हणौनि पंडीतु सर्वप्रकारें वाईट न करी : तैसें..... [करकंटकु म्हणे : “दमनीका] : तुं मुर्ख : अपराधेंविण संजीवकु मारिला :”

[मग करकटकु पींग]ळीकापासि येउनि : जोहार करौनि पुढां उभा राहिला : तयातें म्हणे : “राया : तुं चुकलासी : साम : भेद : उपावो आसतां : तुम्ही राजनीति न कराची [मू. नरकाची.] : केवळ दंडुची केला : हें उचित नव्हें : राजेनि ऐसें येक-लयाची [राजाने याप्रमाणे केवळ एखाद्याच्याच बुद्धीला (मसलतीला) लागू नये. केवळ एकाच मंत्र्याच्या सल्ल्याप्रमाणे वागू नये.] बुधी न लागीजे : रायें चौघे मंत्र (त्री) [चौघांशी (चारचौघाशी, अनेकाशी) सल्लामसलत करावी. किंवा चार मंत्री करावे, नेमावे. मंत्र=मंत्री.] करावे : त्याचें भीन्न भीन्न मत घ्यावें : मग आपुलें मनीं वीचारावें : आणि चौघांचें संवादें [चौघाशी संवाद, विचारविनिमय, चर्चा करून.] कार्ये करावें : तो राजा मंत्रसीधु राजा आभंगु होय : एकु धर्मबुध्दिचा : [१*] : येकु राजवटेचा : २ : एकु व्यापारवटेचा : ३ : येकु घरास्थितिचा [मू. घरास्छितिचा.] : ४ : ऐसें चौघे मंत्री त(ज)या राजयासि तो राजा केहि अपायासि न पावे :” ऐसें करकंटकु बोलीला : पींगळीकें तो प्रधानु केला : सुखें आसौं लागला ॥

ईती श्री पंचुपाख्याने राजनीतीसास्त्रे : मीत्रभेदनाम तंत्र : प्रथमो तंत्र सम(मा)प्त ॥ १ ॥ सुभवंभवतू ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥

अनुक्रमणिका

तंत्र २ मित्रसंप्राप्ति

मूळकथा : हिरण्यक उंदीर, लघुपतनक कावळ, मंथरक कासव आणि चित्रांगद हरीण

"आतां दुसरें तंत्र मीत्रसंप्राप्ति सांगैनि ॥ उक्तं च ॥

असाधना वित्तहीना बुद्धिमन्तो बहुश्रुताः ।
साधयन्त्याशु कार्याणि काककूर्ममृगाखुवत् ॥ १ ॥

जें कार्य [मू. **काय**.] साधवें [मू. साधा**वें**.] ना तें कार्ये बुधिमंत बहुश्रुते [बहुश्रुत (ज्यांनी पुष्कळ ऐकले आहे, पठण केले आहे असे विद्वान) या शब्दाचे हे अनेकवचन. कथावस्तूचे स्थळ संस्कृत ह प्रतीत व मराठी **भा** प्रतीत 'प्रमदारोप्य' असे आहे. ते 'महिळारोप्य' याचे पर्याय रूप होय. (महिला=प्रमदा). कावळ्याचे नाव सं. प्रतीत 'लघुप**तनक**' असे आहे. आपल्या प्रतीत ते 'लघुतपन' आहे. हा लेखनदोष असावा.] साधती : जैसें काक-कुर्म-मृग-मुख-कादीकिं [मू. ०मु**क्ष**कादीकिं.] साधीलें :" "ते कैसी कथा?" राजपुत्र पुसती : विष्णुश्रमा सांगे :

"दक्षण देशामध्यें महिलारोप्य नाम नगर आसें : तयाजवळी वटवृक्ष आसे : तेथें लघुतपन नाम काउळा आसे : तो चारा घयावयासि नीगाला : तवं तेणें सन्मुख पारधी येतां देखीला : तेधवां मागुता परतौनि व्रक्षावरि बैसौनि आपुलें काउळेयातें म्हणे : "तुम्ही वृक्षाखाली [मू. ०**वा**ली.] उतरावें ना : चारा न घ्यावा : वेसनीं पडाल :" तवं तेणें पारधीयें वृक्षाखालिं जाळ पसरिलें : चारयां [मू. चार**आं**. चाऱ्यासाठी, चारा म्हणून.] कण घातले : आप[ण*] दोरी धरूनी दुरि बैसला : तें देखौनी पांखरूवें कोन्ही न उतरतींची : तवं वाडवेळ जाला : पारधी न लागेचि [शिकार लागली नाही, सापडली नाही. सं. 'कपोत' पक्ष्यासाठी 'हल'– 'होला' हे शब्द वापरले आहेत. होला= पारवा.] : म्हणौनि [तो पारधी] जाळ सांडौनि गेला : येरे दिवसीं जवं येता जाला तवं [चीत्रांगु] हलियाचा राजा : तो आपुले पुत्रेसी सेवकेसि उतरला : चार घेउं गेला : चारा घेतां समस्त फांसें पडले [फाशात पडले; जाळ्यात अडकले.] : तवं लघुपतनु म्हणे : "म्यां समस्त पक्षियातें वर्जीलें : जरी तुम्ही ['जरी' शब्द **जे** याऐवजी वापरलेला दिसतो.] उतरावें ना :" तेणें पारधीयें होला जाळेआंतु पडला [देखीला *] : तेणेंहि पारधी येतां देखीला : मग होला पुत्रातें म्हणे : "आरे पुत्रा हो : तुम्ही जाळेंसी [जाळ्याबरोबर, जाळे घेऊन.] : एके [मू. **ऐ**के.] वेळें उडावें : सांवटें [सर्व मिळून **न उडाल** : **सावट** : सं. सर्वत : > म. सावट.] न उडाल तरि मराल : जैसें दोमुखें पक्षीयासी जालें : ते परि होईल :" मग होले पुसती : चीत्रांग्रीउ सांगे :

अनुक्रमणिका

कथा १*
दोन तोंडांचा पक्षी

"कोन्ही येक पक्षियासि मुखें दोनि आणि देह येक : तो आरंन्यांतु हींडतां : येकें मुखें [(एका तोंडाने) आमृत (अमृत) लाधलें (मिळविले); एका तोंडाला अमृत प्राप्त झाले.] आमृत [**मू.** आमृ**त्य**.] लाधलें : तवं दुसरें मुख म्हणे : 'मज चाखावया दे :' तें मुख नेदीचि : तवं दुसरें म्हणे : 'मज न देशी तरि पाहें :' तेणें क्रोधें वीस खादलें : मग तो पक्षी मेला :"

"तैसें तुम्ही न करावें : आवघे सावटें जाळ घेउनी उडावें : या परवतापैलीकडें माझा मीत्रु हिरंण्यकु उंदिरू ['उंदी(दि)र' या शब्दातील उ वरील अनुस्वार पोथीत अनेक ठिकाणी गळाला आहे. तो देऊन सर्वत्र दुरुस्ती केली आहे.] आसे : तेथें तो आपुले फांसे छेदील :" तवं इतुका समईं तेथें पक्षी पडतां देखीले : पारधी धांवतु आला : मग ते पांखीरूवें सांवटेंचि उडालीं : ते [जा*]ळेंसहित गगनासि गेलीं : पारधी जाळेंसी नागवला : मग पारधी बरोबरि धांवीनला : तवं ते डोंगर उतरौनि गेले [**मू.** 'गेंला'.] : पारधी वीसमीतु जाला : म्हणे : "ऐसें कोणें [**मू.** 'ऐसें कोणें' हे शब्द दुबार लिहिले गेले आहेत. ते वगळले आहेत.] [पाहिलें*] [**मू.** 'णाडिलें' (?) वर्णसाम्यभ्रमाने असे लिहिले गेले असावे. 'पाहिलें' असा पाठ स्वीकारला आहे. तो तारकांकित करून येथे घातला आहे.] नाही : सिधे जाळ हातिचे गेलें [**मू.** 'गेंले'.] :" मग मुरडौनि निस्ता [जुन्या मराठीत नसुधा (दा)=केवळ, फक्त, हा शब्द येतो. पाहा : 'तेया तोंडि कांटियडें । आंतु **नसुदि** हाडें' (ज्ञाने. १३·६७७); 'तेथ बोधिजे बोधु बोधें । आनंदु घेपे आनंदें । सुखवरि **नसुदें** । सुख भोगिजे' (ज्ञाने. १८·१२०९). **नसुदा (धा)** याचीच उच्चारांतरे नसता, नुसता, निसता (निस्ता) इत्यादी.] घरासी आला :

मग चीत्रांगदु तया उंदिराचां वोहापासी गेला : द्वारि बोभाउं लागला : तो स्मरतांचि होलयापासि आला : तेणें चीत्रांगदें हिरंण्यकापुढे आपुली आडचणी सांघीतली : मग तेणें डोळां देखीलें : मग उंदीरु म्हणे : "होन्हार तें.... जालें : तुं चींता नको करुं ॥ उक्तं च ॥

कस्य दोषो कुले नास्ति व्याधिना को न पीडितः
व्यसनं कस्य न प्राप्तं सुखं कस्य निरंतरम् ॥ २ ॥

कोणासी सदा सुख आसें? कवणाचें कुळीं दोष नाहि? व्याधीकरौनि [व्याधीमुळे.] कोण नाहि [पीडला? वेसन] कव[णा *] नाही? म्हणौनि होणार तें चुके ना :" तवं तेणें हिरंण्य[कें आ]पुले उंदीर बोलवीले : मग तेणें चीत्रांगदाचे फांसे तोडौं आदरिलें [तोडू लागला.] : तवं चित्रांगदु म्हणे : "आधी माझे पक्षीयाचे तोडि :" मग पक्षीयाचे

तोडिले : मग त्याचेहि तोडिले : मीत्र वेसनावेगळा केला : तें देखौनि हिरंण्यकु म्हणे ॥ उक्तं च ॥

संमानं यः सदा धत्ते भृत्यानां क्षितिपोऽधिकम् ।
वित्तक्षयेऽपि हृष्टास्ते न त्यजन्ति कदाचन ॥ ३ ॥

“जो राजा सदा भृत्यावरि [भृत्यावरि ‘मान धरि’=सन्मान धारण करतो, त्यांचा (भृत्यांचा, सेवकांचा) सन्मान करतो.] मान धरि : ते भृत्ये तयासी वित(त्त)क्षयींहि सांडिती ना :” मग हिरंण्यकु म्हणे : “चित्रांगदु : तुझेया सारीखें होवावें : समर्थु आपुलीया सेवकावरि कृपाळु होवावा : आणि जो राजा भृत्यावरि अधिकु मानु धरि [तयातें *] सेवकु कहि टाकी ना : तैसा तुं होसी :” मग चित्रांगदु म्हणे : “हिरंण्यका : व्यसनीं उपकारा ये तोची मीत्रु म्हणीजे ॥ उक्तं च ॥

क्षीरेणात्मगतोदकाय हि गुणा दत्ताः पुरा तेऽखिलाः
क्षीरे तापमवेक्ष्य तेन पयसा ह्यात्मा कृशानौ हुतः ।
गन्तुं पावकमुन्मनस्तदभवत्दृष्ट्वा तु मित्रापदं
युक्तं तेन जलेन श्यांम्यति सतां मैत्री पुन्स्त्वीदृशी ॥ ४ ॥

॥ तथा चं ॥

पापान्निवारयति योजयते हिताय गुह्यानि गूहति गुणान्प्रकटीकरोति ।
आपद्गतं च न जहाति ददाति काले सन्मित्रलक्षणमिदं प्रवदन्ति सन्तः ॥ ५ ॥

जो मीत्रु पापापासाव नीवारि : आणी आपणेंयासी हीतकारण [हीतकारण योजी=हिताचे कारण(साधन)योजतो.] योजी : आपुलें गोप्य प्रगट न करि : गुणातें प्रगट करि : आपतीकाळ पावलेयां मीत्रातें न सांडि : ऐसें सन्मीत्रलक्षण बोलीलें [मुळात ‘बोलीजेलें’ असे आधी लिहून मग **जे** अक्षर रद्द केले आहे.] आसें :”

मग चीत्रांगदु होला [चित्रांगद होला लघुपतनक कावळ्यापाशी गेला व तेथे त्याजवळ त्याने हिरण्यकाचे गुणवर्णन केले, असा वृत्तांत मूळ संस्कृतात नाही.] : आपुलया पक्षियासहिति : लघुतपना [मुळात ‘लघुतेंपना’ असे लिहिले गेले आहे.] काउळेयापासी गेला : तेणें त्यापुढां व्रतांतु सांघीतला : तयापुढें हिरंण्यका उंदिराचे गुण वर्णीले : ते आईकौनि लघुतपनु सुखीया जाला : मग म्हणे : “आम्हीहि पक्षि : तरि मीत्रु

अनुक्रमणिका

येकाधा ऐसा करावा : जो कोन्ही येके व्यसनिं कामा ये :” ऐसें वीचारौनि : लघुतपनु [हिरंण्यकु] उंदिराचेंया ठाया गेला : व्रक्षावरि बैसौनि काव काव [करूं लागला] : तवं हिरंण्यकें म्हणीतलें : “हा करकसु सब्दु कवणाचा? चीत्रांगदु तरि नव्हे :” वोहेचें द्वारिं राहुनि म्हणे : “तुं कोण गा?” तवं तो म्हणे : “मी लघुतपनु काउळा :” तवं हिरंण्यकें म्हणीतीलें : “तुज यावया काये कारण तें सांघः” तवं काउळा म्हणे : “तुझे परोपकार गुण : चीत्रांगदाचे मुखीं [तोंडून.] आईकीले : म्हणौनि तुजसी मीत्री करावया आलौं : ये जगीं उपकारू मोटा धर्मु ॥ उक्तं च ॥

उपकारः परो धर्मः धर्मो दानाधिकः परः ।
एकत्रं तुलिते धात्रा तत्र पूर्वोऽभवद्‌गुरुः ॥ ६ ॥

उपकारू मोठा धर्मु : अनेक दानाहोउनि उपकारु मोटा : ब्रह्मेनि उपकारु आणि धर्मु : दोन्ही यकवाट तोळीले : तवं उपकारु मोटा जाला [‘उपकारु मोटा जाला’=उपकार हा धर्म मोटा=मोठा, वजनदार, म्हणून श्रेष्ठ झाला.] :” तवं हिरंण्यकु म्हणे : “आम्हां तुम्हां मीत्रत्व बोलिलें नाहि ॥ उक्तं च ॥

शत्रुणा सहसंवासी कदाचिन्नहि संमतः ।
सुतप्तमपि पानीयं सम्यक् पचति पावकः ॥ ७ ॥

वैरी द्विवीध आसे : शत्रुसंगातें संगती बोलीली नाही : तेथें दृष्टांतु : जरही पाणि सुतप्त केलें : तऱ्ही आग्नी अधीक जाळीत : वैर द्विवीध : येक क्रत्रीम : आणि एक [मू. ऐक.] सहज” ॥ उक्तं च ॥

कृत्रिमं नाशमायाति वैरं द्राक्‌कृत्रिमैर्गुणैः ।
प्राणदानं विना नैव सहजं याति संक्षयम् ॥ ८ ॥

हिरंण्यकु म्हणे : “आम्हां तुम्हां वैर : कुत्रिम [मू. क्रुत्रिमे.] वैर तें कृत्रीमें गुणेंकरौनी नासातें पावे : सहज जें वैर [तें*] प्राणदाना [मू. प्राणादावांचौनि.] वांचौनि नासातें न पावे : तरि आम्हां तुम्हां सहजचि वैर ॥ उक्तं च ॥

सकृद्दष्टं तु यो मित्रं पुनः सन्धातुमिच्छति ।
स एव निधनं याति जम्बुकाद्रासभो यथा ॥ ९ ॥

अनुक्रमणिका

जयासंगातें आम्हां मैत्रत्व बोलिलें नाही : तयासंगातें मैत्रत्व करि : तो नाशातें पावे : जैसा रासभु : जंबुकेसी मैत्री केली : म्हणौनि नासातें पावला :” “हे कैसी कथा?” लघुतपनु [मू. लघुतनु.] पुसे : हिरंण्यकु सांगे :

कथा २*
कोल्हा आणि गाढव

“कोन्हि येकु कोल्हा प्रत्यहि मळेयाआंतु [मू. मळआंतु. (पुढे ओ. २३ व पा. ६८, ओ. १, २ मधे आलेली रूपे पाहा.).] जाउनी : पीकलीं वाळुकें : बोरें : खाये : तवं येके दिवसीं तेणें वीचारिलें : येक [लें.... मळेया]आंतु जातां बरवें नव्हें : तरि यकु मीत्रु मेळवुं :” ऐसें विचा [रौनि नग*]रा समीप आला : तवं तेथें रासभातें चरतां देखीलें : तयातें कोल्हा म्हणे : “मामो : यथें काई चरतोसी? चाल ये मज संगातें : पैल आ(या) मळेयाआंतु नीळी हरिआळी आसे : पीकलीं वाळुकें आसतीं : तरि तुं चाल : ये स्वईछा [(स्वेच्छेने, मनाला येईल तितके)] खाईल [(खाई, असे असावे).] :” मग तो गर्धवु आणी कोल्हा : दोघी मळयाआंतु [मू. मळआआंतु.] गेले : पीकलीं वाळुकें बोरें खाउं लागले : तवं तीकडौनि माळीयें देखीलें : माळी धावीनला : तवं कोल्हा पळौनि गेला : रासभु सापडला : तो धरौनि सुबंध मारौनि झाडासी बांधला :”

हिरंण्यकु म्हणे : “लघुतपना : दुष्टेंसी मैत्री बोलीली नाही :” मग काउळा म्हणे : “तुज वीस्वासु उपजे ऐसी क्रीया करिन :” हिरंण्यकु म्हणे : “तुझीये क्रीये मज काये काज?” काउळा म्हणे : “तु भय धरौ नको :” तेधवां हिरंण्यकें काउळयासि पाहु[ण*]रू केला : काउळें मृत्यकाचें मांस उंदीरासि दीधलें : दोघां मैत्री जाली ॥ उक्तं च ॥

ददाति प्रतिगृह्णाति गुह्यमाख्याति पृच्छति ।
भुङ्क्ते भोजयते चैव षड्विधं प्रीतिलक्षणम् ॥ १० ॥

॥ तथा च ॥

नोपकारं विना प्रीतिः कथंचित्कस्यचिद्भवेत् ।

अनुक्रमणिका

उपयाचितदानेन यतो देवा अभीष्टदाः ॥ ११ ॥

[कांही*] दे : कांही घे [**मू.** 'मी दे : **कांही** घे :' असे मुळात आहे. येथे **मी** हा शब्द निरर्थक व म्हणून अनावश्यक असल्यामुळे गाळला आहे. पुढील संदर्भावरून तेथे 'काही' हा शब्द असावा. तो संहितेत घेतला आहे. मुळात 'मी दे' = मी देतो, असे प्रथम पुरुषी भाषांतर केले आहे. मूळ संस्कृत श्लोकात तृतीय पुरुषी रूप असून ते सामान्य सुभाषितासारखे वर्णन आहे. 'मी दे कांही घे' येथे 'कांही'च्या अनुषंगाने मागेही 'कांही दे : कांही घे' असे वर्णन असले पाहिजे. त्याप्रमाणे दुरस्ती सुचवली आहे.] : गुह्य सांगे : गुह्य पुसे : जेवे : जेववी : ऐसें परस्परें मीत्रासी सड्वीध प्रीतलक्षण बोलीजे : आणि उपकारावांचौनि कोणासी प्रीत उपजे ना : दिधलयावांचौनि देवहि तृप्ति नव्हे [तृप्ति = तृप्त. अकारांत पदे अनेक ठिकाणी इकारांत लिहिली आहेत. तसेच येथे आहे. 'दे**वा**हि' अशी दुरुस्ती करता येणे शक्य आहे.] : ऐसें ते दोघी मीत्र जाले : परस्परें कथावार्त्ता करौनि काळ क्रमीती :

ऐके दीवसीं काउळा उंदीरातें म्हणे : "माझा मीत्रु [**मू.** मुत्रु.] मंथरकु येणें नावें कासउ आसे : तयासी भेटौं जाईजे : तेथें आम्हांसी पाहुनर होईल : तीघे आपुण गोष्टी करौं : चाल :" तवं तो उंदीरु म्हणे : "तुं खचरु : मी भुचरु : तुज मज मार्गु नाहि [तुला आणि मला (एकच) मार्ग नाही. तुझा आणि माझा एक मार्ग नाही.] :" तवं काउळा म्हणे : "तुं माझीय पाठिवरी बैस :" मग तो उंदिरौ तयाचिय पाठीवरी बैसला : मग दोघे तेथें गेले : सरोवराचें तीरी काउळें सादु के[ला : तवं..... तो] कासउ बाहिर निगाला : दोघां क्षेमाळींगन जालें : [येरयेराचीं आ]ष्टांगें निगालीं ॥ उक्तं च ॥

कुंभोदाऽपि सकर्पूरास्तुषाराश्च सुशीतलाः ।
मित्रगात्रसुखस्यास्य कलां नार्हन्ति शोडषीम् ॥ १२ ॥

ऐसें म्हणौनि येकमेकां आळींगन जालें : ते[थ*] दृष्टांतु : कुंभोदकें शीतळें : करपुरयुक्त ['करपुरयुक्त शीतळें कुंभोदकें' (कापराचा वास असलेले घटातील थंड पाणी); त्याचप्रमाणे 'सीतळ तुशार' (थंड पाण्याच्या थेंबाचा शिडकाव.) 'तेणे करौनि आंग जैसें अत्यंत नीवाये' (निवते)त्याप्रमाणे क्षेमालिंगनाने त्यांची अष्टांगे निवाली.] : जैसें उष्णकाळीं तुशार सीतळ : तेणेंकरौनि अत्यंत जैसें आंग नीवाये : ऐसें म्हणौनि क्षेमाळींगन जालें : हिरंण्यकें मंथरकासी नमस्कार केला : सरोवराचीय पाळी तीघी साउलीये बैसले : मंथरकें काउळेयासि पुसिलें : "हा कवणु?" तवं लघुतपनु म्हणे : "हा माझा पुरवी मीत्रु [पूर्वीचा मित्र, जुना मित्र.] : या नांव हिरंण्यकु उंदीरू ['**उंदीरू**' हा शब्द पोथीत काही ठिकाणी '**उदीरू**' असा लिहीलेला आहे. अनुस्वार चुकून गळाला असावा. सर्वत्र तो देऊन पाठ दुरूस्त करून घेतला आहे.] : हा उंदीराचा रावो : याचीया गुणासी गणीत नाहि : हा थोर दुःखातें पावला आसे : हा

अनुक्रमणिका

म्हणे : ‘मज मंथरकाजवळी नें : मग मी तयापुढें आपुलें दुःख सांगैन :’ तरि तुज-जवळी [मधे म्हटल्याप्रमाणे, हिरण्यकाने आपला वृत्तांत पूर्वी लघुतपनाला सांगितल्याचे वर्णन आपल्या संहितेत नाही. संस्कृत ‘पंचतंत्रात’ मात्र आहे. भाषांतरकार, योग्य ठिकाणी ते घालायला विसरला हे स्पष्ट दिसते.] आला आसे : मग लघुतपनु आणि मंथरकु तयातें पुसते जाले : “हिरंण्यका : तुं कां दुचीता? तुझां चीतीं काये आसें तें नीरूतें सांघ :” तो म्हणे : “चीत द्याल [(चीत=चित्त) मन द्याल, लक्ष घालाल. हिरण्यकाने सांगितलेल्या कथेतील स्थळ आपल्या प्रतीत जयंति आहे. अन्यत्र ते महिलारोप्य किंवा प्रमदारोप्य असे आहे. तेथील मुनीचे नाव ह भा. पा व आपल्या प्रतीत बुटकर्ण आहे तर इतर प्रतीत ताम्रचूड आहे. त्याच्याकडे आलेल्या पाहुण्याचे नाव पा प्रतीत व आपल्या प्रतीत बृहत्कटी तर अन्यत्र बृहत्स्फिक् असे आहे.] तरि सांघैन :” मग सांघता जाला :

कथा ३ *
बटुकर्ण आणि बृहत्कटी

“जयंति नांव नगरि : तेथें नगराबाहिरी येकु वटु आसे : तेथें बुटकर्णु नांवें तपोधनु तप करितो : भीक्षेचें आंन उरलें तें सीकां ठेवीतो : तें आंन मी उडौनि खायें : तवं एके [मू. ऐके.] दीवसीं : तयाचीया घरासी येकु बृहत्कटी नांवं तापसु पाहुणा आला : ते दोघें रात्रीं गोष्टी करौं लागले : तेव्हां मी सीकाचें अंन खाउं लागलौं : तवं बुटकर्णु गोष्टि करितां दुचीता जाला : तवं तो अभ्यागतु ऐसें म्हणे : “तुं कां दुचीता जालासी? तुझा आदर म्यां जानीतला [तुला माझ्याविषयी किती आदर आहे, ते मी ओळखले. फारसा आदर नाही, हा भावार्थ. कारण बृहत्कटीचे लक्ष पाहुण्यापेक्षा शिंक्याकडे अधिक होते.] : प्रभाते मी तुझीये ठाईं न राहें आनीका ठायां जाइन ॥ उक्त च ॥

> अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति ।
> मलये भिल्लपुरन्ध्री चन्दनतरुकाष्ठमिन्धनं कुरुते ॥ १३ ॥

अतीपरीचयकरौनि अवज्ञा होये : आणी नीरंतर येणेंजाणेंकरौनि अनादरु होये : जैसा मळीयागीरु [(मलयपर्वतावरीलं) चंदनतरू, भील स्त्री (कडून) ईंधन ‘**करिजत आसे**’ (केला जातो). सं. मलयगिरी शब्दाचेच ‘मळीयागीरू’ असे लेखन केले आहे.] चंदनतरु : भील स्त्री ईंधन करिजत आसे :” ऐसें आईकौनि बुटकर्णु [म्हणे] : “मी दुची [ता जालां] येणें कारणें : जें मठिं येकु उंदीरु आसे : तो उडौनि सीका[चें आन्न].... प्रत्येहिं खातु आसे : हाणें [(मी त्याला हाणतो, मारतो, किंवा बाहेर काढून देतो).] : परि जाय ना [यानंतर मुळात पुढील मजकूर आहे. ‘तवं बृहत्कटी म्हणें : तो उंदीर उडतु आसें : तो वृत्तांत सांघे ना : तेधवां म्हणें....’. यात ‘तवं वृहत्कटी म्हणें’ हे वाक्य या ठिकाणी विसंगत आहे. ते चुकून लिहिले गेले असावे. त्यातील ‘वृहत्कटी’ हा शब्द पुढील वाक्यात पाहिजे. तेथे तो योग्य ठिकाणी घेऊन दुरुस्ती केली आहे. ‘तवं’ आणि ‘तेधवां’ या शब्दात पुनरुक्ती असल्यामुळे आधीचा ‘तवं’ शब्द ठेवून ‘तेधबां’ शब्द गाळला आहे.] : तो उंदीर

उडतु आसे :” तो वृतांत सांघे ना तवं [सांगत नाही तोच, सांगताक्षणीच.] बृहत्कटी म्हणे : “बुटकर्णा : या उदीरांचे धव धन आसें ['धव' ऐवजी 'धवीं' शब्द येथे पाहिजे. **धव**=बीळ. पाहा : 'मुंगीया रचिति **धवें** : खोपें सावजे सावें' (उगी. ४९१); 'आरे या मुक्षकांचे **धवीं** : आहे धनाची पूर्ण ठेवी' (**पा.** पंचो. तंत्र २·८९). '**धवीं**' (बिळात) **धन आसें**'] : तरि तें वोहे खणुं : धन वांटौनि घेउं :” ऐसें तयाचें बोलनें आईकीलें : मग तो ठावो म्यां सांडिला : सपरिवारू डोंगरीं घातला : तरि मी तया धनाकारणें चींतावृर्त जालां :”

तवं मंथरकु म्हणे : “ ध[न*]लोभु न करावा : जें आदृष्टीं लिहिलें आसें तें ब्रह्मादीकां न चुकें : आर्थ कष्टरूप ॥ उक्तं च ॥

वित्तानामर्जने दुःखमर्जितानां च रक्षणे ।
आये दुःखं व्यये दुःखं धिगर्थं कष्टजीवितम् ॥ १४ ॥

वीत आर्जीतां दुखरूप : आणि वेंचितां दुखरूप : आणि आर्जीलें तयासी रक्षीतां दुखरूप : म्हणौनि जळो जळो अर्थ कष्टरूप : जें कपाळीं लीहिलें असैल तेंची प्राणी पावे ॥ उक्तं च ॥

प्राप्तव्यमर्थं लभते मनुष्यो देवोऽपि तं लंघयितुं न शक्तः ।
तस्मान्न शोचामि न विस्मयो मे यदस्मदीयं न हि तत्परेषाम् ॥ १५ ॥

जें प्राप्तव्य असें [तें]च... पुरुश पावें : त्यासि देवहि उलंघुं न सके । तेणें कारणें पुरुशें शोखु न करावा : आपुलें असैल तें आपणयासि [**मू.** आपण**आ**सि.] होईल : तें आनीकयासि नीहे ॥ उक्तं च ॥

प्राप्तव्यं लभते देही ललाटे लिखितं पुरा ।
सुखं वा यदि वा दुःखं हानिर्मृत्युस्तथा धनम् ॥ १६ ॥

पुरूष जो तो प्राप्तव्ये तेंचि पावें : सुख अथवा दुःख आणि मृत्यु : लाभु अलाभु : जें [कपाळीं*] [**मू.** काळीं. मूळ संस्कृत श्लोकात 'ललाटे' शब्द आहे. त्याचेच हे भाषांतर असल्यामुळे लेखकाला 'कपाळीं' शब्द अभिप्रेत असावा. तोच येथे घेतला आहे.] तेंचि पावें : येवीखीं कथा [आईक* :”] मंथरकु सांगे : हिरंण्यकु आईके :

कथा ४*
प्राप्तव्यमर्थ लभते मनुष्यः

"कोन्ही एकें नगरिं : वेव्हारियासि तीघे पुत्र होते : मग कीतीयका दीवसां : बापें धन उद्यमेंकरौनि [उद्यमाने, व्यापाराने. यातील व्यापाऱ्याचे नाव सं. ग्रंथात 'सागरदत्त' असे आहे भा प्रतीत ही कथा (पाने गहाळ झाली असल्यामुळे) आलेली नाही. निर्मळ पाठकाने 'अनारथ तयाचें नाम : तीघे पुत्र असती ते उतम' असे म्हटले आहे. (तं. २·७७).] वाढवीलें : तें वांटौनि दिल्हें : येकें पुत्रें शतें ५०० [पाचशे, एवढेच लेखकाला म्हणावयाचे आहे.] टके देउनी येका विद्वांसापासौनि श्लोकाचा चरणु विकतु घेतला : 'प्राप्तव्यमर्थं लभते मनुष्यः' ऐसा चर्णु बापासी दाखवीला : बापें निदैवं म्हणौनि मारौनी घराबाहीरी काहाडीला : तो [न*]गरें पाटणें हिंडितां हिंडीतां [येका नगरासी] गेला : ते नगरीचे लोक पुसती : "तुं कोणु गा?" तवं [तेणें श्लोका]चा चरणु म्हणीतला : 'प्राप्तव्यमर्थं लभते मनुष्यः' मग तेहिं लोकीं 'प्राप्ता' ऐसें नावं [संस्कृत प्रतीत 'प्राप्तव्यमर्थ' असे त्याचे नाव आहे.] ठेवीलें : ऐसा तो नगरामध्यें पिशाच रौये [पिशाच्च रूपाने. (सं. रूप > रूअ > रौय.). फारशी 'रूय' = प्रकार, मार्ग, या शब्दापासून 'रौय' हा शब्द आला असणे शक्य आहे.] विचरे : तवं एके समईं : रायाची राजकन्या सातां खणाचें मंदीरा दामोदरा [**'सातां खणांचें'** [(मजल्यांचे)] **'मंदीर'** असे जे **'दामोदर'** = अनेकमजली इमारत. मागे कथा २* वरील टीपा पाहा.] [वरी*] [**मू.** दामोदरा**वी**. ('वरी' ऐवजी चुकून 'वी' लिहिले गेले असावे.)] न्हाउनी केस वाळवीत होती : तवं त्या कोण्हां एका वेव्हारियाचा पुत्रु : स्वळंकृत [सं. सु+अलंकृत. चांगले दागिने घातलेला; चांगला शृंगारलेला.] आतीसुंदरौ देखीला : दैखौनी तीयसि वीरहज्वरु उपजला ॥ उक्तं च ॥

सुस्नातं पुरुषं दृष्ट्वा सुगंधं मलवर्जितम् ।
योनिर्द्रवति नारीणा अम्भःपात्रमिवाम्भसा ॥ १७ ॥

तवं सखीया पुसती : "बाईजी : तुझीये शरीरीं संतापु देखती आहे [मी देखती (पाहात) आहे.] : तें काई?" तवं ते राजकंन्या बोलीली : "आवो सखीय : म्यां पैल वेव्हारियाचा पुत्रु : स्वरूप अतीलावंन्य देखीला : देखौनि मातें मदनें जाकळीलें [व्यापणे, व्याकुल होणे—करणे. पाहा : 'तैसा तूतें मी जेथ स्मरें । तेथ मीपणा मी विसरें । मग जाकळिला ढेंकरें । तृप्तु जैसा' (ज्ञाने. १८·१७).] : तरि तो मेळवीसी तरि प्राणु वांचे :" तेधवां ते सखी तया पुरषापासि जाउनी तयातें म्हणे : "राजकंन्येसी तुझी आवस्ता थोर लागली आसे : तरि तुं तेथे येसील तरिच प्राणु वांचैल :" तवं तो म्हणे : "म्यां कैसेनी यावें [**मू.** **आ**वें.]?"

अनुक्रमणिका

तवं ते म्हणे : "उपरी सींकें माडौनी ['उपरि (वरून) सींकें माडौनी' (मांडू, ठेवू) वरून खाली शिंके सोडून ठेवू. 'मांडणे' हा शब्द 'माडणे' असा अनेक ठिकाणी लिहिलेला आढळतो. त्यामुळे 'मा' वरचा अनुस्वार अनवधानाने गळाला, असे म्हणणे कठीण आहे. 'माडणे' असेही रूप जुन्या काळात प्रचलित असले पाहिजे.] : तेथें तुं बैस : आम्ही वरि वोढौनि घेउन [ओढून घेऊ. माडौनी, घेउनि, ही प्रथमपुरुषी अनेकवचनी रूपे आहेत.] :" तवं तो राजकंन्येतें देखौनी मुर्छागतु जाला आसे ॥ उक्तं च ॥

सौवर्णनूपुररणच्चरणारविन्दा श्रोणीभरादलसगा मृगशावनेत्रा ।
पीनस्तनी सकलचन्द्रमुखी तनोति तन्वी न कस्य हृदि मोहमहो महान्तम् ॥ १८ ॥

सुवर्णाचीं नेपुरें जीचां चरणीं : जीचा माजु मुष्टीमधें समाये : मृगणीचीया परी जीचे नेत्र चंचळ : आणि जीचें स्तनमास वर्तुळाकार : आणि जीचें मुखकमळ चंद्रासारिखें : आणि तन्वी म्हणीजे सोडशवर्शीकी : ऐसी स्त्री देखीलीयां कोन्हाचीया हृदयातें मोहातें न करि : योगेस्वर तोही भुले : मग तेणें भर्वशा दीधला : [त्या सखीया].... जाउनि : राजकंन्येपुढें सांगीतलें : तेधवां रात्रीचां [समई उ]परिखाली सीकें मांडिलें : जावें ते समई वेव्हारियाचेनि पुत्रें विचारू मांडिला [विचार पुढे केला.] : "राजकन्येप्रति जाणें हें अयुक्त ॥ उक्तं च ॥

गुरुभार्यां मित्रभार्यां स्वामिसेवकगेहिनीम् ।
यो गच्छति पुमांल्लोके स भवेत् ब्रह्मघातकः ॥ १९ ॥

गुरूची भार्या आणी मीत्राची भार्या : आणी राजकंन्याप्रति जाये : तो ब्रह्मघातकी म्हणीजे :" ऐसें विचारौनि तो न वचेची : तवं प्राप्ता [**मू.** प्राप्त्या.] ते वाटें जात होता : तेणें तें सीकें देखीलें : मग तो सीकावरि कौतुकें बैसला : तेव्हेळीं वरि वोढौनि नेला : तयासि आंघोळी [**मू. यां**घोळी.] मर्दना ['मर्दना : आंघोळी' असा क्रम पाहिजे. मर्दना = उटणे, तेल वगैरे लावून आंग चोळणे. त्यानंतर आंघोळ. याच अर्थाने 'मर्दना मादणें' हे शब्द 'लीळाचरित्रा'त वारंवार येतात. पाहा : 'रामु देखिजैल तैं मर्दना : मादनें : व्याळी :' (लीच. ए. ७); 'मग मर्दना दीधली : मादनें जालीं :' (लीच. ए. ११); 'गोसावीयांसि मर्दना : मादनें होत होतें :' (लीच. उत्त. ८).] जाली : भोजन जालें : मग राजकंन्येसी संभोगु जाला : राजकंन्या सुखी होउनी म्हणे : "तुंचि माझा प्राणनाथु : तुं मजसी कां न बोलसी?" तवं तो म्हणे : 'प्राप्तव्यमर्थं लभते मनुष्यः' ऐसें बोलनें आईकौनी ते लाजीनली : म्हणे : "येथें प्राप्तव्या कैचा आला?" तो सीकां घालौनी मागुता टाकीला :

मग तो पुढें मार्गी जातां : चौबारां नाटिकराची बाज सुपतीयेसहित [बिछान्यासह. सुपती : (सं.

अनुक्रमणिका

स्वापवती) झोपण्यासाठी घातलेला बिछाना, गादी. जुन्या मराठी वाङ्मयात हा शब्द सूपवती असा येतो. पाहा : ‘वोलेया हरिचंदनाचां सेजवटीं : जळदाचिये सुपवतिये वरिवटी : बाळा बैसविली मुधटी : ढाळु करावया’ (नरुस्व. ५६६); ‘तयाची तेलीणि आंगणीं बाजसूपवतीएवरि नीजैली होती’ (लीचए. ११).]

होती : नाटीकरू [संरक्षणकर्ता, रक्षक, नाटी : संरक्षण. पाहा : ‘अनेगीं संकटीं : देओ दृपदीय करीति घरटी : तरि तिएचेया प्राणाची नाठी : कवणा दीधली’ (उगी. ११९). यावरील टीप : ‘नाटी = नाटकराची वृत्ति’; ‘त्यांचा स्वयें जगदीश होऊनि नाटीकार । संतासाठी धरी नाना अवतार’ (स्वानुभवदिनकर ८-२-७४. मशको.).] गस्थी [**मू.** ग**स्छी**०.] कारणें गावांत गेला होता : तवं तो प्राप्ता येउनि

कौतुकें बाजेवरि नीजेला : तवं प्रधानकन्या नाटकरासी पडकली होती [(नाटकराबरोबर व्यभिचार करण्यात) सोकावली होती. पडकणे : सोकावणे, वारंवार लागू असणे. पाहा : ‘तो दुजा कामाचा अवतारु : जाळुं पडकैला वैस्वान्नरू’ (नरुस्व. ५८४) यावरील टीप : ‘पडकैला = सोकला :’] :

ते संकेतस्थान [**मू.** **स्छा**न. ‘संकेतस्थान (गुप्त मीलनाचे पूर्वीच ठरवलेले स्थान)] टाकौनी आली [त्या स्थानी येऊन पोचली. टाकणे : प्राप्त करून घेणे, पोचणे.] : तवं तेणें प्राप्तें निद्रा केली होती : तयासी

संभोगु जाला : तवं प्रधानकंन्या म्हणे : “आजी कां मजसी आबोला

घेतला?” तवं तो म्हणे : ‘प्राप्तव्यमर्थं लभते मनूष्यः’ प्रधानकंन्या

मागां सरली : लाजौनि आपुलीया राजमंदीरा गेली :

तवं एके समईं नगराआंतु वरकीर्ति नावं नोवरा : वानीयाचेंकंन्येसी

प्रणावया [परिणयासाठी, लग्न करण्यासाठी. सं. परिणय, याचेच उच्चारांतर प्रण = लग्न, विवाह. प्रणणें = वरणे विवाह करणे. पाहा : ‘ऐसा प्रणुं येताये हृषीकेशी : लग्न वेळे’ (संनरुस्व. २७५८); ‘ऐसा बरवतु येताये वनमाली : परणावेया’ (संनरुस्व. २७५९).] जातु आसे : अनेक वांजांतरें वां[जि*]नलि : धवळें मंगळें गाताती :

ऐसा मोहोछावो [सं. महोत्सव. पाहा : ‘आपुला राज्यभुवना गेला : मोहो उछायेंसी’ (मूप्र. २५६१). समासात पूर्वपदी असलेल्या सं. महा या शब्दाचे मोह हे रूप अनेक ठिकाणी आढळते. पाहा : ‘सौंदर्याचा मोहोदधी : जो जीवां जीवन’ (सव. ३०९).] प्रवर्त्तला : तवं रायाचा मदोन्मतु हस्ती सुटला : तो हस्ती

मांडउ टाकौनि आला [मांडव प्राप्त करून घेऊन आला; मांडवात आला.] : वऱ्हाडियासी नोवरेयासि पळु सुटला : नोवरीहि

पळौं लागली : तवं प्राप्तव्यमर्थे देखीली : “[नाभी नाभी]” म्हणौनि

तेनी हातीं धरिली : मग तेणें मंत्रबळेंकरौनी [हस्ती राजमंदी]रासी

नेला : रावो मुख्य [**मू.** मुनुस्य. हे चुकीचे लेखन होय. येथे ‘मुख्य’ हाच शब्द अभिप्रेत असला पाहिजे. तोच स्वीकारला आहे.] करौनि नगरीचा लोकु कवतुक पाहावया आले : नोवरी

प्राप्तेन मारवीतां वांचवीली : नोवरि प्राप्तेतें न [सोडीचि*] [**मू.** सोडवीली.] : म्हणे :

“माझा प्राणु येणें वांचवीला : तरि हाचि माझा प्राणेस्वरू :” तवं मायबाप

बंधु सोयरे म्हणती : “न जानीजे हा कवणु? याचें कुळ नेणिजे?”

तवं नोवरी म्हणे : “तुम्ही आवघे मुर्ख : वेव्हारधर्मु नेणा : जो पराक्रमें

अधिकु तोच पुरुष जाणावा :” तव्हेळीं रायाजवळी समस्त वराडी :

माहाजन आले : रायें सभा केली : जाणते लोक बैसविले : राणी आणि

राजकंन्या : पडदेंआड [पडद्याआड.] कौतुक पाहावया आल्या : राजेनि प्राप्तातें पुसौं

आदरिलें : “तुं कवणें कुळीचा? तुझा मायबापु कोठें? तुझें नगर कवण?” तवं तो बोलीला : “प्राप्तव्यमर्थं लभते मनुष्यः” तवं राजकंन्या बोलीली : “देवोऽपि तं लंघयितुं न शक्तः” : तवं प्रधानकंन्या बोलीली : “तस्मान्न शोचामि न विस्मयो मे” तवं ते नोवरि म्हणे : “यदस्मदीयं नहि तत्परेषाम्” ॥ १ ॥ या बोलासरसी रायें आपुली कंन्या दीधली : प्रधानें आपुली कंन्या दिधली : वाणीयें आपुली कन्या दीधली : ऐसा प्राप्ता सुखीया जाला : मग रायापासि पुर्ववृत्तांतु श्लोकाचा सांगीतला [मू. शांगीतला.] : मग राजेनी गजरथपदाती आंदन दिधलें : आंदना पांच शतें आस्वें दीधलीं : ऐसा प्राप्ता सुखीया होउनी : मायबापासी भेटावया नीगाला : वांजांत्रांचे नाद [मू. नादें.] कानिं पडले : काहि नाईकीजे : मग मायबापासि क्षेमाळींगन जालें : बापाचां हातीं श्लोकाचा चरण दीधला : मातापिता सुखीयें जालीं :”

म्हणौनी कासवु म्हणे : “हिरंन्यका : होन्हार तें बळीवंत : अर्थचींता [मू. अर्थचीतां.] करणें न लगे : आतां म्यां अर्थचींता सांडिली :” मंथरकु म्हणे : “अर्थ आसौनि भोग त्याग [उपभोग. त्याग : दान. पाहा : ‘भीमकीया त्यागा हातसरू हारू : दिन्हला मनोभावें’ (नरुस्व. ३५३); ‘त्यागु दे नादमुर्ति : रीषिश्रींगाचा’ (उगी. ४६३).] न करि तयाचें जन्म व्रथा : आणि जीतुकें जयाचें लाहानें [प्राप्तव्य. लाहाणे : (सं. लाभ) प्राप्त होणे, प्राप्त करणे; प्राप्ती (नाम). पाहा : ‘जया मोक्षांचें लाहाणें : दीधलेयावीण नाहीं उठणें’ (ज्ञाप्र. ८९२). ज्याला जितके प्राप्त व्हायचे असेल तितकेच त्याला मिळते.] तीतुकेंची पुरुश पावें

॥ उक्तं च ॥

अर्थस्योपार्जनं कृत्वा नैवाभाग्यः समश्नुते ।
अरण्यं महदासाद्य मूढः सोमलिको यथा ॥ २० ॥

हिरंण्यु(ण्यकु) पुसे : मंथरकु सांगे :

कथा ५*
सोमलिंग साळी

[‘सोमलींग’ ऐवजी सं. प्रतीत ‘सोमिलक’ हे नाव आहे.]

“कोन्ही येके नगरीं सोमलींगु शाळी होता : तो लाहान [(बारीक, पातळ, नाजुक)] वीणे [(विणत असे). त्यापासून त्याला जे द्रव्य मिळे ते] आणि नीगुतेंचि [(नेमकेच)] पोटभरि [(पोट भरण्याला पुरेसे) होय’.] होय : धन नुरें : धोंगडें वीणे त्यासि उरें : तो आती सुक्ष्म वीणे : परि त्यासी नुरें : मग तो सोमलोंगु आपुलीये स्त्रीसी म्हणे : “प्रीये : हा ठावो धारजीणा नाही : तरि हा ठावो सांडौनी आणीकेया

अनुक्रमणिका

नगरासी जावे : तेथें कांहि उपारजना करूं :" तवं तयाची स्त्री म्हणे :

"प्रीयो : हें मीथ्या बोलीलासी [येथे द्रव्य उरत नाही, आणि दुसऱ्या ठिकाणी उरेल—हे 'मीथ्या बोललासी' =चुकीचे बोललास; हे जे बोललास ते मिथ्या=खोटे, चुकीचे आहे.] : जें येथें नुरें : आनीके ठाईं [मू. थाईं (सकळ संकेत थ = ठ).] धन उरैल? तरि दीधलयांवीण [हे संस्कृत श्लोकातील 'नादत्तमुपतिष्ठति'चे भाषांतर आहे. यात 'दवाने' हा शब्द गृहीत आहे. दैवाने, पूर्वकर्माने 'अदत्तम्' = जे दिले नाही ते 'न उपतिष्ठति' = ते उपस्थित होत नाही, मिळत नाही. मराठी भाषांतरातही 'दैवाने' किंवा 'कर्माने' हा शब्द अध्याहृत घेतला पाहिजे. महालिंगदासाने या श्लोकाचे भाषांतर करताना 'परी पूर्वदत्तंवीना न पाविजे' (तंत्र २·१४२३). निर्मळ पाठकाने मात्र आपल्या संहितेतील वाक्याप्रमाणे 'तरि दीधलेयांवीण न पुरे : पावीजे ते कोठोनि सांगा' (तंत्र २·१४१) असेच म्हटले आहे.] पावीजे ना ॥ उक्तं च ॥

यावत्खनति पाताले श्रमत्याकाशमण्डले ।
अधावत्सकलां पृथ्वीं नादत्तमुपतिष्ठति ॥ २१ ॥

यथा छायातपौ नित्यं सुसंबद्धौ परस्परम् ।
एवं कर्म च कर्ता च संश्लिष्टावितरेतरम् ॥ २२ ॥

न हि भवति यन्न भाव्यं भवति च भाव्यं विना प्रयत्नेन ।
करतलगतमपि नश्यति यस्य तु भवितव्यता नास्ति ॥ २३ ॥

पाताळीं खणो अथवा आकाशमंडळीं भंवो : सकळ पृथ्वी अवधावन करो [सर्व पृथ्वीवर धावत जावी. सं. श्लोकातील 'अधावत् सकलां पृथ्वीं' यातील 'अधावत्' शब्दाचे रूपांतर 'अवधावन' असे केलेले दिसते. पण पहिला शब्द क्रियापदाचे रूप तर दुसरा नाम आहे. 'धावन करो' असे भाषांतर योग्य झाले असते. 'अवधावन' याचा अर्थ 'अतिशय धावाधाव' असा करून आहे त्या रुपाचे समर्थन करता येणे शक्य आहे.] : परि दीधलयांवीन न पावीजे : तरि येथेंचि राहुनी उदीमु करावा : मिळन्हार तें येथें मीळील :" ऐसें स्त्रीयचें वचन आईकौनि : सोमलींगु म्हणे : "प्रीये : ऐसें नको बोलुं : उद्यमावांचौनि कर्म ना फळें ॥ उक्तं च ॥

उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः ॥ २४ ॥

यथैकेन न हस्तेन तालिका संप्रपद्यते ।
तथोद्यमपरित्यक्तं न फलं कर्मणः स्मृतम् ॥ २५ ॥

जैसी एकें [मू. ऐके.] हातीं कांहि ताळी वाजत नसे : तैसें उद्यमावांचौनि कांहि कर्म फळतसें? म्हणौनि देशांतरा जाउनि कांहि उद्यमु करूं :"

अनुक्रमणिका

ऐसा वीचार करौनि वर्धमानपुरासी गेला : तेथें वरुशें तीन राहुनी : शतें पांच सोनटके उपार्जना करूनि : आपुलीया घराप्रती येता जाला : तवं त्यासि मार्गीं येतां : अरंन्यामध्यें रात्री पडली : तवं तो एका वृक्षाखाली निजैला : तवं अर्धरात्रीं दोघें ब्राह्मण : स्वप्नामध्यें म्हणते जाले : "आरे : सोमलींगा : जोडलें धन [तवं नासौ]नि जाईल : पोटापुरतेंचि राहील : त्यामधें भोग भोगी : ध[नाची आ]स सांडि : धनाकारणें कोरडा होसील : आजी जुडैल : पाहाटे जाईल : म्हणौनी प्राण जातिल : तया कोल्हेयाचि पर हाईल [यानंतर पोथीत 'ते कैसी कथा : ऐसें जवं जागुनी पाहे तवं त्याचें धन गेलें। म्हणौनि मंथरकु म्हणें : हिरंण्यका : धनाची चींता न करावी ॥ उक्तं च ॥ 'शिथिलौ च सुबध्दौ च—' (श्लोक २६) त्यानंतर 'मंथरकु सांगें : हिरण्यकु पुसें' असे वाक्य असून त्यापुढे कथा ५ चा मजकूर आहे. त्यानंतर 'म्हणौनि पुरुशें आन्येक चींता न करावी—' इत्यादी मजकूर आहे. यात, लिहिताना वाक्ये चुकीच्या ठिकाणी लिहिली गेली आहेत. उदा.— 'तया कोल्हेयाची पर होईल' या वाक्यानंतर कथेचा सूचक संस्कृत श्लोक येणे अवश्य आहे. तसेच 'ते कैसी कथा' या वाक्यानंतर हिरण्यकु पुसे : मंथरकु सांगे' हे वाक्य येऊन मग कथेचा मजकूर येणे अवश्य आहे. कथेनंतर ऐसें जवं जागुनि पाहे : तवं त्याचे धन गेलें' हे वाक्य पाहिजे. मुळातील विसंगती काढून टाकण्यासाठी योग्य तशी वाक्यांची स्थाने बदलून संहिता तयार केली आहे.] ॥ उक्तं च ॥

शिथिलौ च सुबद्धौ च पततः पततो न वा।
निरीक्षितौ मया भद्रे दश वर्षाणि पञ्च च ॥ २६ ॥

"ते कैसी कथा?" हिरंण्यकु पुसे : मंथरकु सांगे [मुळात 'मंथरकु सांगे : हिरण्यकु पुसें' असे आहे.] :

कथा ६ *
लंबवृषण पोळ आणि कोल्हा

"कोन्हि यक वनिं कोल्हा आणि त्याचि स्त्री : वन हिंडतां आरंण्यांतु : येकु कुळंबीयाचा पोळ गोरा देखीला : तयाचें व्रषण कोल्हें लोंबतां देखीलें : मग तयाची स्त्री म्हणे : "राठ [मू. राथ. (सकळ संकेत च = ठ).] मांस खातां सुख नव्हे : या गोऱ्हाचें मौवाळ मांस लोणीयांऐसें भक्षीतां जीव्हे गुदगुलीया उठती [जिभेवर आनंदाच्या लहरी येतात. जुन्या मराठीत हा शब्द गुतकुली असा आढळतो. पाहा : 'तिया सुखसंपत्ती जोडलिया। मन स्वर्गा वांत वाकुलिया। हृदयाचां जीवीं गुतकुलिया। होंती आथि' (ज्ञाने. ७·१८५); 'देओ दूरौनि चीपोळीया सींपिती। ते तुषार आंगी लागती : तवं तवं गुतकुलीया होती : पुण रवसू न दिसे' (शिशु. ६६५).] : तरि हें मांस आतां तुटौनि पडैल : लौंबौनि आलें आसें :" ऐसा तीचीया बोला : कोल्हा पोळयापाठीं [पोळापाठी, पोळामागे. पोळ = बैल. पाहा : 'सामुदाईक तो बैल जाणिजे तोच पोळही' (भाप्र. २३८); 'रचूनु महत्तत्वाचें खळें। मळी एकेंचि काळुगेनि पोळें' (ज्ञाने. १३·४०)] लागला : तयासवें हिंडतां आठ [मू. आथ. (सकळ संकेत थ = ठ).] उपवास पडले : ऐसा रात्र दीवस हिंडतां परी व्रषण पडेचि ना : ऐसें हिंडतां कोल्हयाचा प्राण गेला :"

ऐसें जवं जागुनी पाहे तवं त्याचे धन गेलें :"

अनुक्रमणिका

म्हणौनि पुरुशें आन्येकचींता न करावी [कोणतीही चिंता न करावी.] : म्हणौनि मंथरकु म्हणे : “हिरंण्यका : धनाची चींता न करावी :” मंथरकु म्हणे : “तुज [धनें*] मरण होईल : तुं धनचींता सांडी : विधिची गती कळेना ॥ उक्तं च ॥

हत्वा नृपं पतिमवेक्ष्य भुजंगदष्टं देशान्तरे विधिवशात् गणिका स्म जाता ।
पुत्रं पतिं समधिगम्य चितां प्रविष्टा शोचामि गोपगृहिणी कथमद्य तक्रम् ॥ २७ ॥

राजयातें मारौनि आणि आपुला पती भुजंगदष्ट [मू. भुजंगदंष्ट्वा. हे रूप चुकीचे आहे. ते दुरुस्त करून घेतले आहे.] जाला : ऐसा देखीला : आणि देशांतरा जाउनि गनीका जाली : तेथें पुत्रातें पती पावली : मग चीताप्रवीष्ट जाली : मग तेथें समुद्रवेळकरौनि वांचिली : मग गोपाळाची स्त्री जाली : आतां तक्रासाटि काये दुख करणें :” “हे कैसी कथा?” हिरंण्यकु पुसे : मंथरकु सांगे :

कथा ७*
राणी, वेश्या आणि गौळण झालेली ब्राम्हणस्त्री

[ही कथा कोणत्याही संकृत प्रतीत नाही. भा प्रतीतही नाही. महालिंगदासाच्या पंचोपाख्यानात ती निराळ्या स्वरूपात आहे. निर्मळ पाठकाने मात्र ती आपल्या प्रतीतल्याप्रमाणे वर्णन केली आहे.]

“कोन्ही एकु वेव्हारिया ब्राह्मणु होता : तयासि सुखें आसतां तेथे परचक्र आलें : तयाची स्त्री धरौनि नेली : कवणि एकें नगरिं ते रायाचें [जवळि आसे*] : तवं तो ब्राह्मणु तयाचिये शुधीसी नीगाला : तया नगरा [टाकौनि *] आला : तवं येके दुकानीं बैसला आसे : तवं तेथें उपर-माडिये-वरि समीप ते स्त्री केश वाळवितां देखीली : त्याहीं आपुला भ्रतारू वोळखीला : मग त्यां बटीक पाठउनी तयासी बोलावीलें : त्यासी भातेंपोतें [शिधासामुग्री व द्रव्य. भातें : तांदूळ, अन्नधान्य. पाहा : ‘ऐसें युगुतिचेनी हाथें । जै इंद्रियां ॲपे भातें’ (ज्ञाने. ६·३५२); पोतें : द्रव्याची थैली. पाहा : ‘खलिती पांचशांची ते पोतें लक्षावधी धन’ (भाप्र. १८·६२).] दिधलें : मग त्यासी म्हणीतलें : “तुवां पैल देउळाआंतु जाउनी राहावें : तवं मी तेथें येईन :” ऐसा निर्धारू केला : मग ते रात्रीसमईं राजयातें मारौनि : कांहि द्रव्ये घेउनी : तया देवुळाआंतु आली : तवं तो भर्तारू सर्पदष्टू [मू. सर्पदंष्टू.] जाला आसे : मग वीतरागें तेथौनि नीगाली : तेव्हेळीं ते कोन्ही यके नगरिचे वैस्या जाली : ते प्रत्यहिं येक सत रात्रीमध्यें पुरुषापासी [‘रात्रीमध्यें पुरुषापाशी येक सत लाजीमा मागे’ असा अन्वय करावा.

अनुक्रमणिका

उपभोगासाठी येणाऱ्या प्रत्येक पुरुषाजवळ ती शंभर (सुवर्ण टक) 'लाजीमा' (कर, उपभोगाचा दर) मागत असे.] लाजीमा मागे : ईतुकेनि तीसी अपार द्रव्य जालें : दानपुन्यहि [सं. दानपुण्य. शिशुपाळवध काव्याच्या काही पोथ्यात हाच शब्द 'धानेपुने' 'धानपुण्ये' असा आलेला आहे. (ओवी १९४ पाहा).] कोणें काळीं करे : ऐसी ते पुन्यवंत :

ऐसें आसतां तीचा पुत्र ब्राह्मणाचा [पूर्वी तिचा ब्राम्हण पती होता, त्यापासून झालेला तिचा पुत्र.] : तो वेव्हारिया [**मू.** व्हेवारिया.] उद्यमार्थे [व्यापारासाठी.] देशांतरा गेला होता : तेणें अन्यक वस्तु उद्यमें करौनी घेउनी येतु आसे : तवं तिये नगरिं रात्रीसमईं राहिला : तेणें ['तेणें...घेउनी येतु असे' वाक्यरचना लक्षात घ्यावी.] ते वेश्येचें गुणस्वरूप आईकीलें : मग तो उपभोग घेउनी [उपभोगाची सामुग्री. हारगजरे, अत्तर, विडे वगैरे. याच अर्थाने पूर्वी 'उपभोग' हा शब्द आलेला आहे. (पान ६०, ओळ २७ पाहा).] : वेश्येचिया गृहाप्रती गेला [**मू.** मेला.] : तीसी संभोगादिक जालें : मग संभोगासमईं तीनें पुसीलें : "तुह्मी कवणीं गावीं असता?" तेणें पूर्ववृत्तांत सांगीतला : नगर ग्राम बापाचें नांव सांगीतलें : त्या जानीतलें : मग 'हा हा' करौनि बोलती जाली : म्हणे : "ऐसें कैसें जालें? पुत्रेंसी कैसा संबंधु जाला?" मग ब्राह्मण बोलावीले : ते म्हणेति : "देहांत प्रायश्चीत करावें :" मग ते चीताप्रवीष्ट [**मू.** चींताप्रवीष्ट.] जाली : तेथें समुद्रवेळ आली : त्या ते चीता वोल्हावली : समुद्रामध्यें वाहों लागली : तवं समीप गोवळा होता : त्यासी ते म्हणे : "मज काढावें :" मग यकु गोपाळ म्हणे : "माझी स्त्री होसील तरि काहाडीन :" मग ते काढीली : गोपाळाची स्त्री जाली : ऐसी ते नगरामध्यें दहिदुध विके : एकें समईं सात पांच गौ[ळ*]नी ताक-दहिदुध विकावया निगाल्या : तेहि नीगाली : चोहटां बै[सलीया]..... आसती : तवं रायाचा हस्ती सुटला : तेणें हस्तीयें दहिदुधा[चीं मड]कीं फोडीलीं : सकळ गोपांगना रडौं लागल्या : आणि ते हांसती आसे : ऐसें राजेनि उपरियेवरौनि देखीलें : तरि "ईसी बोलावा : ईसी कारण पुसौं :" मग तीयसी राजेनी पुसीलें : ते म्हणे : "राजया आईक ॥ उक्तं च ॥

हत्वा नृपं पतिमवेक्ष्य भुजंगदष्टं देशान्तरे विधिवशाद्गणिका स्म जाता ।
पुत्रं पतीं समधिगम्य चितां प्रविष्टा शोचामि गोपगृहिणी कथमद्य तक्रम् ॥ २८ ॥

तरी राजया : ईतुके पदार्थ मज जाले : तरि आजी ताकासाठी काय रडौं?"

ऐसें मंथरकु म्हणे : "हिरंण्यका : होन्हार तें न चुके ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

अघटितघटितं घटयति सुघटितघटितानि जर्जरीकुरुते ।
विधिरेव तानि घटयति यानि पुमान्नैव चिन्तयति ॥ २९ ॥

वीधी म्हणीजे दैव : अघटीतातें घटवी : आणी घडलेयातें विघडना करिवि : आणि जें पुरुश मनेंहि चींती ना : तेंहि समईं घडवी : ऐसी वीधीची गती न कळे :” ऐसीया गोष्टी [मू. ऐसीया गौष्टी.] करितां हिरंण्यकु सुखीया जाला :

ऐसें जवं तीधै गोष्टी करीताती तवं चीत्रांगु नावं हरिणु : तान्हैला पाणियासि आला : तयातें देखौनि ते भ्याले : उंदीरु वोहिं नीगाला : कासवु जळीं नीगाला : काउळा उडौनि वृक्षावरि बैसला : कोन्ही अवडळ न देखेची [हरिणाला पाहाताच कावळा, उंदीर व कासव, तिघेही पळाले. त्यांना ही भीती वाटली की, हरिणाच्या मागोमाग एखादा दुष्ट पुरुष, पारधी येत असेल. यावरून **अवडळ**=दुष्ट, कठीण हृदयाचा पुरुष, असा अर्थ निष्पन्न होतो. ‘लीळाचरित्रा’त ‘अवडळ नाम करणे’ या मथळ्याची एक लीळा आहे (पूर्वार्ध. १००) ती पुढीलप्रमाणे : ‘एकु दीस गोसावीयांपासि बैसलीं असतिं : गोसावी एरातें अवलोकिति : एरातें अवलोकीति :..... एक एल्हंभट वांचौनि यरा अवघेयां स्तीति जालिया : सुख भोगीत होते : येल्हंभटीं म्हणीतलें : “जी जी : इतुकेयाआंतु मीचि एकु **अवडळ** :” सर्वज्ञें म्हणीतले : “तरी तुम्ही **अवडळभट** म्हणा : आणि स्तीती जाली :” या कथेतील संदर्भावरून देखील **अवडळ**=कठोर हृदयाचा, ज्याच्यावर कशाचाही परिणाम होत नाही असा निष्ठुर पुरुष, असाच अर्थ निघतो.] : तेधवां मागुतें एकांतीं बैसले : हरिणातें म्हणे : “तुं सुखें पाणी पें :” हरीणु पाणी पीतां मनीं वीचारि : “या तीघामध्यें असतां भय नाहि : तरि मीत्र ऐसे कीजे :” मग पाणी पीउनी त्या तीघापासी उभा राहिला : घास पाहुं लागला : तवं कासउ म्हणे : “तुं कोणें ठाईं आससी? येथें कां उभा राहिलासी?” तवं तो म्हणे : “मी पाणी प्यावया आलौं : तरि तुमतें देखौनि म्यां ऐसें विचारिलें : जें तुम्हांसी मैत्रीकी कीजे :” तवं कासउ म्हणे : “आम्ही निरबळ : तुं समर्थ : तुज उपकारु आमचेनि केवि होये?” तवं मृगु म्हणे : “माझा बोलु आइका ॥ उक्तं च ॥

कार्याणि बहुमित्राणि सबलान्यबलानि च ।
हस्तियूथं वने बद्धं मूषकैः प्रतिमोचितम् ॥ ३० ॥

भलतेनी [कोणीही, सर्वांनी.] बळ[वंतें आणीक*] नीर्बळें बहुत मीत्र करावे : ते कोन्ही यक आवघड वेळें कामा येती : जैसी गजें मुसकेसी मैत्रीकी केली : म्हणौनि तो गजु [मू. गुजु.] [पासा*]पासाव [मुळात ‘पासाव’ एवढाच शब्द आहे. पुढील संदर्भ लक्षात घेता येथे ‘पासा पासाव’ असे असले पाहिजे. ‘पासा’ ही अक्षरे लागोपाठ पुन्हा आल्यामुळे ती लिहिली गेली आहेत असा समज होऊन लिहावयाची राहून गेली असावीत. हे केवळ धातुसाधित म्हणून वापरलेले दिसत नाही. पासाव=पाशातून, ‘पाशापासाव’ असे पाहिजे होते. त्याप्रमाणे शब्द सुचवला आहे.] सोडविला :” ते कथा तीघांपुढां चीत्रांगदु हरीणु सांगता जाला :

कथा ८*
उंदीर आणि हत्ती यांचे मित्रत्व

“कोन्ही येक विवरीं उंदीरु बहुसाल [स. बहु+शाल. शाल=युक्त. बहुयुक्त; पुष्कळयुक्त म्हणजेच पुष्कळ.] होते : तवं त्या वाटां हस्ती पाणीयांसी जात होता : तेथें तया उंदिरासी आणी हस्ती[सी*] मैत्रत्व जालें : तो हस्ती माडआचि उरी जे उरे ते प्रत्यहीं त्यासी चारा घाली : यापरि तेथें तेणें उंदीर पोसीले : ऐसें दोघी मीत्र जाले : येके समईं पाणीयासी जातां तो हस्ती कुपीं पडला : तेधवां तेणें उंदीरातें समरिलें : तेहिं यउनी तेणें हस्तीचे पांसे तोडीले : कुपाबाहिर हस्ती काढीला :”

ते कथा मंथरकासि मानली : मग तया चौघासी मैत्रत्व जालें : मध्यानकाळीं चौघी बैसौनी गोष्टी कथावार्ता करिती : तवं एके [मू. ऐके.] दीवसीं हरिणु न यचि : तेधवां तेहिं लघुते(त)पनु काउळा मृगाचें सुधीसी पाठवीला : तवं तो हरीणु वागुरें पडला आसे : तें देखौनि काउळा यउनी तयापुढें सांगता जाला : “आरे मीत्रें हो [मित्र हो.] : हरिणु वागुरे पडला आसे : तरि चाला जाउं : तयासी सांभाळुं :” तेधवां मंथ[र*]कु काउळा उंदीरातें [मू. ‘उंदीरातें काऊळा–’ असे आहे. मूळ संस्कृत कथेत असे आहे की, कावळा उंदराला आपल्या पाठीवर बसवून हरिणाचे पाश तोडण्यासाठी गेला व मागाहून तेथे कासव येऊन पोचला. आपल्या कथेत ही सूचना मंथरक (कासवाने) केलेली आहे असे अभिप्रेत दिसते. हे लक्षात घेता ‘मंथरकु, काउळाउंदीरातें (कावळा व उंदीर यांना) म्हणे’ असे हे वाक्य असावे. त्याप्रमाणे दुरुस्ती करून घेतली आहे.] म्हणे : “तुम्ही जाउनी तयाचे पांसे तोडावे : तवं मी मागीलेकडौनी यतों :” ऐसें आईकौनि दोघी नीगाले : जाउनी तयाचे पासें तोडिले : सोडवण केली : तवं मागीलेकडौनी मंथरकु आला : तवं काउळा : उंदीरु आनि हरिणु [मू. ‘काउळा आणि उंदीरु : हरिणु–’] म्हणती : “मंथरका : तुं कां आलासी? पारधी आलेयां आम्ही तुज काय करावें?” ऐसें बोलताती तवं पारधी येतां देखीला : काउळा उडौनी झाडिं बैसला : मृग उडान करौनि गेला : उंदिरु वोहे नीगाला : कासउ पारधीयें धरिला : पाय बांधौनि लाकुडिं बांधला : तें लाकुड खांदि [मू. ‘खाडि’. **खा** वरचा अनुस्वार गळाला आहे. (सकळ संकेत ड = द).] घेतलें : मग नीगाला : तवं ते तीघे मीत्रातें थोर दुख जालें : मनीं वीचारीती : “आतां काये करणें?” तवं हिरंण्यकासी येकी बुधी आठवीली ॥ उक्तं च ॥

शोकारातिभयत्राणं प्रीतिविश्रम्भभाजनम् ।
केन रत्नमिदं सृष्टं मित्रमित्यक्षरद्वयम् ॥ ३१ ॥

[शोकापा]साव रक्षी : भयापासाव रक्षी : आणि प्रितिचें परमस्थान [मू. ०स्छान.] : तरी

अनुक्रमणिका

मीत्र ऐसें दोन्ही अक्षरें : रत्न कोणें स्रजीलें? तवं हिरंण्यकु चित्रांगदातें म्हणे : "तुवां पुढे जाउनि नदिचें तीरिं : सपवास पडावें [सम+वास=शांत राहाणे; अथवा, सम=सपाट, हालचाल न करतां, स्तब्धपणे. वास=राहाणे. **सपवास**=शांतपणे, स्तब्ध.] : आणि काउळा : तुवां हरिणां-वरि बैसोनि चांचु घालावी : वायांचि काव काव करावें :" तेंहिं तैसेंचि केलें : मग उंदीरु मागें हळुहळु नीगाला : तवं तो पारधि नदी पावला : वाल्हावंती [मान वळवून. **वेल्हावणें** : मान डोलवणे, मान वळवणे. पाहा : 'राजहंसाचां पाउलीं : कारुण्य **वेल्हावत** आली' (मूप्र. १८५०); '**वेल्हावत** टापु घाली : चामके मागिलां दोहीं पाऊलीं' (शिशु. १००६). 'वाल्हावत' हे 'वेल्हावत'चेच उच्चारांतरीत रूप होय. **व** वरील अनुस्वार निरर्थक होय.] पाहे : तवं हरिणु [य*]कु पडिला देखीला : मग खांदिचा कासउ थडिये ठेउनि तया हिरिणांकडे धावीनला : तवं उंदीरू कासवाचें पासें तोडीता होये : कासउ पाणीयांतु [**मू.** पाणी**आं**तु.] रीगे : उंदीरु बोहेआंतु रीगे : तो पारधी हरिणांजवळी पावे : तवं काउळा उडौनी झाडावरि बैसे : हिरीनु फडकौनि पुढां जाये : पारधी मागील वास पाहे [वास=दिशा, दिशेकडे पाहाणे; पाहा : 'ते **वास** न पाहे माघौती : तऱ्हीं पाठी धांवे तो नृपचक्रवर्ती' (उगी. ७४४); 'तो जियाकडे **वास** पाहे । तेउती सुखाची सृष्टि होये' (ज्ञाने. ५·७४)] : तवं कासउ नाही : पारधी विस्मयो करितां आपुलेया घरासी जाये : मग चौघी मीत्र येकवट मीळाले : आपुले स्थानीं [**मू.** **स्छा**नीं.] सुखें असुं लागले : म्हणौनि मीत्र ते ऐसे करावे :" ॥ उक्तं च ॥

असाधना वित्तहीना बुद्धिमन्तो बहुश्रुताः ।
साधयन्त्याशु कार्याणि काककूर्ममृगाखुवत् ॥ ३२ ॥

इती श्री पंचुपाख्यानें राजनितिशास्त्रे द्वितीये मीत्रसंप्राप्ति समाप्तं द्वितीय त्तंत्र : ॥ २ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥

अनुक्रमणिका

तंत्र ३ काकोलुकीय

मूळकथा : मेघवर्ण कावळा आणि अरिमर्दन उलूक.

आता तीसरें तंत्र काकउलुकीया सांगीन ॥ उक्तं च ॥

न विश्वासो नृपैः कार्यो शत्रौ मित्रे च वंचके ।
दग्धं गृहमुलूकानां काकेन प्रहितोऽनलः ॥ १ ॥

“जाणतेनि पुरूशें रायाचा आणी शत्रुचा विस्वासु न करावा : जैसें काउळा जो उलुकाचा वैरी : तेणेंसी उलुकेंहि मैत्री केली :..... [विश्वा]सले : म्हणौनि काउळें ते उल्कु जाळीले [मू. जांळीलें.] :” “हे कैसी कथा?” राज[पुत्र पुस]ती : विष्णुसर्मा सांगे :

“दक्षण देशामध्यें नैवत्यनाम नगर [प्रस्तुत कथावस्तूचे स्थळ आपल्या प्रतीत ‘नैवत्य नाम नगर’ असे आहे. **बू. आ.** प्रतीत ‘महिलारोप्य’ तर हर्टेल प्रतीत ‘प्रतिष्ठान’ असे आहे. मराठी **भा** प्रतीतही तेच आहे. महालिंगदासाच्या ‘पंचोपाख्याना’त ते ‘महिळारोप्य’ आहे. निर्मळ पाठकाने ते ‘जयंतिपूर’ म्हणून वर्णन केले आहे. राजाचे नाव मेघवर्ण सर्वत्र आहे. पण प्रधानांच्या नावांत फरक आढळतो. सं. ग्रंथात उज्ञीवि, संजीवि, अनुजीवि, प्रजीवि व चिरंजीवि अशी त्यांची नावे आहेत. हीच प्रारंभीची चार नावे एडगर्टन प्रतीत उड्डवि, संडीवि, आदीवि व प्रदीवि अशी आढळतात. मराठी **भा** प्रतीत ‘स्थिरजीवि’ हे नाव अधिक असून एकूण प्रधान सहा आहेत. आपल्या प्रतीत प्रधान पाच पण त्यांची नावे उजीवी, संजीवि व चिरंजीवि सोडून चुकीची लिहिली आहेत.] आसें : त्या नगराबाहें प्रदेसीं थोरु एकु [मू. ऐकु.] वटवृक्ष आसे : तिये वृक्षीं मेघ[व*]र्णु नाम काउळाचा राजा [राहा*]त आसे : आपुलेनि परिवारेंसी आसे : आणि आणीके डोंगरीं आरिमर्दनु नावं उलकांचा राजा आसे : सपरिवारी आसे : थोरा थोरा व्रक्षाचां ढोलारांमध्यें आसे : तवं तो उलुक आपुलेनि सपरिवारिसी [यातील पुनरुक्ती स्पष्ट आहे. ‘सपरिवारि’ अथवा ‘परिवारीसी’ असे पाहिजे होते. ‘सपरिवारिसी’—या शब्दापुढील काही शब्द गळालेले दिसतात. ‘असता’ हा शब्द घालून वाक्यातील संगती साधता येईल. तशी दुरुस्ती सुचविली आहे.] [असतां*] : मग उलकीं विचारिलें । जे ‘काउळे आमचे वैरी : जेथे देखावें तेथें मारावें :’ मग ते प्रत्येहिं रात्रीं येउनि काउळेयातें मारिती :

मग मेघवर्णु काउळा : आपुला प्रधानासी विचारि : प्रधान चीरंजीवी नांव पाचारौनि मेघवर्णु [मू. मेघवणु.] तयातें पुसे : “रात्रीं येउनी वैरी मारितति : तरि ऐसेयाचें [मू. ऐसे०.] काये करावें? तुम्ही माझे पांच प्रधानु : तरि जयाची जैसी बुधी तेणें तैसें सांगावें :” ते पांच कवण कवण? एकाचें [मू. ऐकाचें.] नां[व*] उजीवी : १ : येकाचें नांव संजीवी : [२*] : येकाचें नांव रंजीवी : ३ : येकाचें नांव वीजवी : ४ : यकाचें

अनुक्रमणिका

नांव चीरंजीवी : ५ : या पांच प्रधानांतें अनुपंम्य ['या पांच अनुपंम्य प्रधानांतें' असा अन्वय करावा.] पुसता जाला : “रात्रीं वैरी येउनी मारिताती : जरि जुंझ करौं म्हणुं तरी रात्रीं डोळां [डोळ्यांनी.] वैरीयाचें वस्तें स्थान [मू. स्छान.] नेनुं [ओळखू (पाहू) शकत नाही.] : ऐसेंयासि काय कीजे तें सांघ : संधिविग्रहो : यानआसन : संश्रयोद्वीधीभाव : ऐसा [मू. ऐसा.] प्रकारांआंतु : कोणेंपरि ते वैरी साधावें : तें तुम्ही मंत्रीहो सांघा :”

॥ उक्तं च ॥

अपृष्टेनापि वक्तव्य सचिवेनात्र किंचन ।
पृष्टेन तु विशेषेण वाच्यं पथ्यं महीपतेः ॥ २ ॥

तेधवां उजीवि प्रधानु बोले : “जया प्रधानासी राजा जऱ्ही पुसे ना तऱ्ही हितवचन प्रधानें रायातें सांघावें : तरि आईकी : मेघवर्णा : हा वैरि बळिकटु : येणेंसी स्पर्धा न कीजे : येणेंसी मीळौनी चालीजे [याच्याशी मिळते घेऊन, स्नेह करून, संधी करून राहावे.] ॥ उक्तं च ॥

बलीयसि प्रणमतां कालेन महतामपि ।
संपदो नैव गच्छन्ति प्रतीपमिव निम्नगाः ॥ ३ ॥

जो बळकटा वैरीया सांगातें नमौनि चाले : तयासि संपती कोणें [ही काळें जा]य ना ['तयासि संपती जाय ना' यातील **सि** प्रत्ययाचा उपयोग लक्षात घेण्यासारखा आहे. सं. षष्ठीच्या प्रत्ययाचा तर हा अवशेष नसेल ना?] : अन्येक परि [अनेक प्रकारे, सर्व प्रकारे.] संधि केलेयां वरवें असें :” हें आई[कौनि] दुसरा संजीवि प्रधानु बोले : “माझें मत ऐसें : जुंझप्रतापें राज्य कीजे हें बरवें ॥ उक्तं च ॥

मृत्योरिव प्रचण्डस्य राज्ञो यान्ति द्विषो वशम् ।
सर्वे ते हन्तुमिच्छन्ति दयालुं रिपवश्च तम् ॥ ४ ॥

मायया शत्रवः साध्या प्रबलास्ते बलोत्कटाः ।
यथा स्त्रीरूपमासाद्य हता भीमेन कीचकाः ॥ ५ ॥

म्हणौनि संग्रामबळें राज्य करावें” : ऐसें संजीवीयाचें वचन आईकौनि : तिसरा विजवी प्रधा[ना*]तें पुसे : तो म्हणे : “मेघवर्णा : यान माझा चीता ये[त*] आसे : ऐसें दोन्ही भेद : बळीकटु [या शब्दाची व्युत्पत्ती सं. बल+का. कट्टु= (बंधन) अशी करतात. सं.

बलोत्कट> म. बळकट अशी व्युत्पत्ति लावणे अधिक योग्य होईल.] वैरी जो नव्हे तयावरि कटकी किजे : देश [(अर्थात, शत्रूचा देश) आपुला होवावा.'] आपुला होवावा : तरि कारतीक मासां कटकाची चाली कीजे : जरि वैरी बळीकटु [**मू.** बळीकट. या शब्दात ट च्या खाली टिंब आहे. ते सकळ संकेतातील उकाराचे चिन्ह होय.] आसे तरि परतें सरिजे [परत यावे; माघार घ्यावी. पुढील वाक्यातही 'मागुता सरे' असे आहे.] ॥ उक्तं च ॥

बलवन्तं रिपुं दृष्ट्वा देशत्यागं करोति यः ।
युधिष्ठिर इवाप्नोति पुनः सोऽपि स्वमेदिनीम् ॥ ६ ॥

बळवंतु रीपु देखौनि जो मागुता सरे : तो युधिष्टिराचीयापरि [हा उल्लेख पंडुपुत्र युधिष्ठिर किंवा धर्मराज याचा आहे. त्याला अज्ञातवासात चौदा वर्षे घालवावी लागली. नंतर युद्ध करून कौरवापासून त्याने आपले राज्य पुन्हा परत मिळविले.] आपुलें राज्य मागौतें [**मू.** मा**र्गा**तें.] पावे : म्हणौनि विग्रहो युक्त नव्हे : वैरी बळकट आसती ॥ उक्तं च ॥

अविदित्वात्मनः शक्तिं परस्य च समुत्सुकः ।
गच्छन्नभिमुखो वह्निं नाशं याति पतङ्गवत् ॥ ७ ॥

आपुली शक्ति थोडि : आणी पुढीलेयाची [समोर असलेल्या (शत्रूची). विजवी प्रधानाने दिलेला सल्ला 'याना'चा आहे. 'विग्रह' आणि 'यान' यातील फरक लक्ष्यात घ्यावा.] शक्ती जानीतली नाहि : तयाप्रती सन्मुख जातां पतंगाचीयापरि नाशातें पावे :" ऐसें [**मू.** ऐसं.] वीजवीयाचें वचन आईकौनि : चौथा रंजवि [रंजवी प्रधानाने दिलेला सल्ला 'आसना'चा आहे. सामान्यतः **आसन** म्हणजे, आहे त्या स्थितीत कालप्रतीक्षा करीत राहणे, असा होतो. या ठिकाणी आसन=आपला दुर्ग (गड) मजबूत करून तेथे घट्ट राहणे, असा केलेला आहे. तो राजनीतीतील 'आसन' या प्रकाराच्या नीतीला धरूनच आहे.] प्रधानु बोले : म्हणे : "मेघवर्णा : संधि : विग्रहो : यान : हे तीन्ही ठाय [**मू.** **थाय**. (सकळ संकेत थ = ठ).] माझीया वीचारा न येती : गोसावीयें दुर्ग नासावें : दुर्गाचें राजेयासि बळ : तो राजा गडाधीपती होये : कव्हणा जीकवे ना ॥ उक्तं च ॥

नक्रः स्वस्थानमासाद्य गजेन्द्रमपि कर्षति ।
स एव प्रच्युतस्तस्माद्रिपुणा परिभूयते ॥ ८ ॥

नरू जो तो आपुलें स्थान [**मू.** **स्छा**न.] आश्रीत असतां वैरी पराभवीजे ॥ उक्तं च ॥

न तच्छस्त्रैर्न नागेन्द्रैर्न हयैर्न पदातिभिः ।
कार्यं संसिद्धिमभ्येति यथा बुद्ध्या प्रसाधितम् ॥ ९ ॥

अनुक्रमणिका

न गजानां सहस्रेण न च लक्षेण वाजिनाम् ।
यत्कृत्यं साध्यते राज्ञा दुर्गेणैकेन विग्रहे ॥ १० ॥

दंष्ट्राविरहितो नागो मदहीनो यथा गजः ।
सर्वेषां जायते वश्यो दुर्गहीनस्तथा नृपः ॥ ११ ॥

जें दुर्गेंकरौनि कार्य होये तें हस्तीयें नोहें : ना घोडेनी नोहें : ना पायदळें नोहें : म्हणौनि राजेनि दुर्ग सोडौं नये [मू. नियें.] : दुर्गाचेयासि जयो आसे : म्हणौनि दुर्गामध्यें संचयो [सर्व सामुग्रीचा संग्रह.] किजे :" ऐसें चौघां[चे*] मत आईकौनि : पांचवा प्रधानु चीरंजीवी : जुनटु प्रधानु : आतिवृधु : नीतीसास्त्र जाणे : मग मेघवर्ण तया चीरंजीवीयातें : थोर सन्मान करौनि पुसौं आदरिलें : "आगा चिरंजीविया : आतां मज काय करणें तें सांघ : चौघी प्रधानें सांगीतलें : तें परिसीलें : आतां तुझें मत सांग कैसें :" मग तो सांगता [मू. सांगेंता.] होये : तो म्हणे : "मेघवर्णा : येहिं प्रधानीं [नी*]तीशास्त्र सांघीतलें : परि हा द्वीधिभावाचा काळ नव्हे : जरि द्विवीधीभावोच [चिरंजीवीच्या बोलण्यावरून 'हा द्वीधिभावाचा काळ नव्हे' हा रंजवीने दिलेला सल्ला द्वैधीभावाचा असावा असे वाटते. पण तसे नाही. पुढे चिरंजीवाचा सल्ला द्वैधीभावाचा होय. हे लक्षात घेता 'हा द्वीधिभावाचा काल नव्हे?'=हा द्वैधीभावाचा काळ नाही का? अर्थात आहे, असा या वाक्याचा अर्थ करावा. मूळ सं. वाक्य 'परमेष द्वैधीभावस्य कालः' असेच आहे.] करणें : तरि आपुण कोणाचा विस्वासु न करावा ॥ उक्तं च ॥

न यस्य चेष्टितं विद्यान्न कुलं न पराक्रमम् ।
न तस्य विश्वसेत्प्राज्ञो यदीच्छेच्छ्रे यमात्मनः ॥ १३ ॥

जयाचें चेष्टित जानीतलें नाहि : ना कुळ जाणीतलें नाही : तयाचा वीस्वासु [मू. वीसस्वासु.] न करावा : तरि वैरी विस्वासौनि मारावे [शत्रूला आपल्यावर विश्वास ठेवायला लावून, त्याचा विश्वास संपादून मग मारावे.] : "क्रमेण [क्रमेणः कपट करून शत्रूला हळूहळू (क्रमेण) मारावे.] शत्रुः [मू. सत्रु.] कपटेन हन्यते :" ऐसा नीतीविभागु आसे : वैरी विस्वासलयां वर्म जानीजे : मग वैरी मारिजे : मेघवर्णु म्हणे : "तें वर्म [मू. वर्मा.] कैसेनि जानीजे?" तवं चीरंजीवी म्हणे : "चार-हेरिं [सं.चार=हेर, असाच अर्थ आहे. एकाच अर्थाचे दोन शब्द मिळून हा शब्द झालेला आहे. उदा : लहानसान; निळासावळा इत्यादी.] जानीजे : मंत्री : पुरोहितु : दळवै : [युव*] राजा [मू. पुर्व राजा.] : दारवंठेकारि : सावासी [सं अन्तर्वासिकः या शब्दाचे भाषांतर म्हणून हा शब्द वापरला आहे. 'अन्तर्वासिक' म्हणजे अंतःपुरावरील अधिकारी. या अर्थाने 'सावासी' शब्द कन्नड भाषेत वापरला जातो. पाहा : 'सावासिगळुं' (एपि. इंडिका, वर्ष १६, पा. ३२). कन्नड मधूनच हा शब्द मराठीत आला असावा. 'सेजवळ सावासी : अंगवळेकार वीस्वासी : मीळति दांडीयापासी : राउळिचेया' (शिशु. ५०४); 'विडे देवविले सकर्पूर : भोइ पाठविले सविकार : वाजिए खंड सावासिए पढियार : राहिले दारवठां' (नरुस्व. ३९२). या दोन्ही ओव्यांवरील टीपात 'अंतरगोष्ठी सांगता' 'सहवासिय' असे त्याचे अर्थ दिले आहेत. त्यावरून, सहवासी, स्नेही, मैत्रीण असे अर्थ मी केले होते. ते स्थूलार्थाने बरोबर आहेत. पण 'अंतःपुरावरील मुख्य' हा अर्थ

अनुक्रमणिका

अधिक योग्य वाटतो. तो वर उद्धृत केलेल्या दोन्ही ओव्यांत बरोबर बसतो. 'पंचोपाख्याना'च्या भा प्रतीत 'अन्तर्वासिकः' साठी 'अंतोरिकु' शब्द योजला आहे.] : प्रहस्तीकु [सं. प्रशासक. या सं. शब्दाचा 'राज्यकर्ता' असा जसा एक अर्थ आहे, त्याप्रमाणे उपदेश करणारा, गुरू, असाही आहे. राज्यकर्ते म्हणून मंत्री, सेनापती वगैरेंचे उल्लेख पूर्वी आलेलेच आहेत. म्हणून या ठिकाणी त्याचा अर्थ 'उपदेशक' असा करणे इष्ट होईल. सं. प्रशास्ता+क<प्रहस्तक, असा शब्द आलेला दिसतो.] :

समहर्तु : संनीधांता [**मू.** सनी**धांनं**. पोथीत 'सनिधानं', 'प्रवद्देष्टा' हे शब्द 'संनिधाता' 'प्रदेष्टा' या ऐवजी उघडउघड चुकीचे लिहिले आहेत. म्हणून संहितेत ते दुरुस्त करून घेतले आहेत.] : प्रदेष्टा [**मू.** प्रवद्देष्टा.] : केशवीचुरा [केस विंचरणारा; राजाचा किवा राणीचा शृंगार करणारा; प्रसाधक. हाच शब्द **भा** प्रतीतही आहे.] : हातसाहाना [**मू.** हात**शा**हाना. सं. पंचतंत्रातील 'गजाध्यक्ष' या शब्दासाठी हा शब्द वापरला असावा. 'हातिसाहानी'—असे रूप मुळात असावे. याचे दोन अर्थ संभवतात. 'शिशुपाळवध' काव्यात श्रीकृष्णाजवळ असलेल्या सेवकांचे वर्णन करतांना 'कऱ्हेरी श्रीकरणी : फुलबडुवे **हातिसाहानी** : राया श्रीचक्रपाणी : जवळिके असती' (शिशु. ३५५) ही ओवी आली आहे. त्यावरील टीपेत 'हातसाहानी=अखंड वेच आणिती ते : अथवा तस्त मिळविती ते : दुसरें : हातसानी=हातिचे सैन्य चालविते पिलावण' असे अर्थ दिले आहेत. 'फुलबडवा' या शब्दापुढे 'हातिसाहानी' शब्द आल्यामुळे तेथे दुसरा अर्थ संभवत नाही. बाजारहाट करणारा सेवक (हाटसाहानी), किंवा तस्त समोर धरणारा सेवक (?) हा अर्थ तेथे योग्य दिसतो. आपल्या वाक्यात 'केशवीचुरा : हातसाहाना : बाळकरक्षक' हे शब्द क्रमाने आलेले पाहता येथेही 'गजाध्यक्ष' याऐवजी तस्त समोर धरणारा सेवक हाच अर्थ असावा असे वाटते.] : बाळक-रक्षकु : घोड-

साहानी : खापरिखी [या शब्दाचा अर्थबोध स्पष्ट होत नाही. संस्कृतमधील 'दुर्गपाल' या शब्दासाठी तो वापरलेला दिसतो. **परिखा**= खंदक, असा शब्द आहे. त्यावरून खापरिखी=दुर्गाच्या परिखाचे (=खंदकाचे) संरक्षण करणारा असा शब्द तयार झाला असावा.] : उत्कृष्ट पाईकु ['प्रोत्कटभृत्य'—याचे हे भाषांतर आहे. विशेष, विश्वासपात्र सेवक.] : येहिं द्वारांतरिं वैरी भेदीजे [या द्वारांनी (द्वारांतरी)—चारहेर खेरीज करून (मंत्री, पुरोहीत इ.) या मार्गांनी शत्रूचा भेद करावा. ही अंठरा द्वारे सं. पंचतंत्रात 'तीर्थे' (तीर्थ=राजाजवळ असलेले पण भेद करण्याला सहाय्यभूत होणारे लोक. 'तीर्थशब्देनायुक्तकर्माभिधीयते') म्हणून वर्णन केली आहेत. त्यातील 'युवराज' या शब्दाचे भाषांतर आपल्या प्रतीत 'पूर्व राजा' म्हणून केलेले आहे. ते चूक आहे. **भा** प्रतीत 'युवराज' हाच शब्द योजला आहे. त्याप्रमाणे दुरुस्ती करून पाठ स्वीकारला आहे.] : आणीक

पैरटि [धोबीण. 'परीट' या शब्दाचे स्त्रीलिंग.] : माळीनी : सेजवळी [(सं. शय्या>म. सेज) सेज घालण्याचे काम करणारी सेविका. पाहा : 'तेथ सेज झाडिली बटिकीं : **सेजवळेचां**' (नरुस्व. ३८८).] : जोसी : वैद्यु : छत्रधरू : तांबोळधरू : येहिं दुर्ग भेदिजे [यांच्याकडून आपल्या दुर्गाचा, स्थानाचा भेद केला जातो. आपल्या घरातील गुप्त रहस्ये यांच्याकडून फुटतात.] :

यापासौनि [**मू. आ॰**.] रायासि विघ्न सांगे : आणी तो जरि ठाईचा स्याणा होये [तो स्वभावताच शहाणा असेल तर.] तरि भये नाहि :" तवं मेघवर्णु चीरंजीवियातें पुसे : "आम्हां आणि डुडुळा वैर होवावया काय कारण :" तवं चीरंजीवी [म्हणे : "आपण] यासी [**मू.** ॰**आ**सी.] आणी डुडुळासी जुनें वैर आसें :" मेघवर्णु [म्हणे : तें कैसें?*] : तवं चीरंजीवि म्हणे : "आईक गा राया मेघवर्णा :

पुरवीं नाना देशीचीं पक्षिकुळें स्वर्गी [**मू.** स्व**र्ळी ळ**रूडापासि (सकळ संकेत ळ = ग).] गरुडापासि [**मू.** स्व**र्ळी ळ**रूडापासि (सकळ संकेत ळ = ग).] गेलीं : म्हणती : "राउळ स्वर्गी आसती : आम्हांसी मृत्यलोकीं येकु राजा पाहिजे : तरि तो स्वामीयं द्यावा :" तवं गरुड म्हणे : "तुम्ही आवघें मीळौनि प्रतिष्टा : तयासी मी राज देउं :" तवं तेहिं पक्षि डुडुळ राजा प्रतीष्टिला : उदैक अभीक्षेकु [सं. अभिषेक. मराठीत **ष** चा **ख** होतो. जुन्या वाङ्मयात **ख** साठी **क्ष** लिहिला जात असे. उदा : **सं.** मु**ष**क>**म.** मू**ख**क, मु**क्ष**क. (पा. ६४·५ व तळटीप पाहा); 'आत्मत्वेंसी अच्युतु : **क्षे**ळुं आदरी बहुतु' (मूप्र. ८४४).] करावा : तवं काउळा तेथें आला ॥ उक्तं च ॥

नराणां नापिको धूर्तः स्त्रीणां धूर्ता च मालिनी।
पक्षिणां वायसो धूर्तः पशुनां चैव जम्बुकः ॥ १४ ॥

तेधवां तो काउळा पक्षियांतें पुसे : "तुम्ही काय वीचारिलें? [काय विचार केला?]" तवं तेहीं म्हणीतीलें : "आम्ही डुडुळ राजा करौनि [करू. (प्रपु. अव).] :" तवं काउळा हासीनला : म्हणे : "महंत पक्षि मोर हंस राहिले : चांडाळ डुडुळासी राज्य काईसें? समर्थु राजा कीजे : जयाचेनि नावे विघ्न लोटतीं [ज्याच्या नुसत्या नावानेच विघ्ने (संकटे) पळून जातील.] ॥ उक्तं च ॥

महतां नाममात्रेण जायन्ते सर्वसिद्धयः।
चन्द्रदूतेन तु गजो शशकेन निवारितः ॥ १५ ॥

थोराचेन नाममात्रें सर्व सीधी होती : जैसा चंद्राचा [मू. **चं**ड्राचा (सकळ संकेत ड = द).] दुतु : म्हणोनि जैसा [ससेनी*] गजु नीवारिला :" "हे कैसी कथा?" पक्षीय पुसती : काउळा सांघे :

कथा १*
चतुर्दंत हत्ती व चंद्रदूत ससा

[ही कथा संस्कृत पंचतंत्राच्या अनेक प्रतीत (**बू. को. आ.**) मूळ कथेतच दिली आहे. हर्टेल व एडगर्टन यांनी ती स्वतंत्र कथा म्हणून दिली आहे.]

"कोन्हे येके वनीं चतुरदंतु [सं. चतुर्दन्त.] नाम हस्तीयांचा राजा आसे : तो चंद्रसरोवरा पानीया आला : तयाचेनि पायरवें [हा शब्द पायांचा आवाज (पाय + रव) चाहूल या अर्थाने सामान्यतः वापरला जातो. येथे मात्र पायांचे चालणे, संचार, या अर्थाने वापरलेला आहे. पायरवें=संचाराने. पायरा=पायाची टाच. पाहा : 'पाउला माघिला भाग पायरा आणि टांच तें' (भाप्र. ९·२१). यापासून **पायरव**=टांचांनी केलेली चाल, संचार **पैरवी**=नेहमी जाणे-येणे, राबता, असा शब्द रूढ आहे. त्याचेच हे रूप.] कीतियेक ससे मृत्यातें पावले : तवं तयामाजी वृध ससा होता : तो दुरी विचारी [दूरवरचा विचार करता झाला.] : म्हणे : "प्रत्येहिं हस्ती सपरिवारि पाणियासी येतो : याचेनि पायरवें बहुत ससे आटलेति : तरि आतां येकी बुधी करौं :" तेधवां तो ससा चतुर्दंता हस्तीयाजवळी बोलता जाला : उंच स्थानावरौनी [मू. **स्छा**ना०.] थोरें शब्दें बोले : "आगा ये चतुरदंता हस्तीया :" तवं तो हस्ती वरुती वास पाहौनी म्हणे : "तुं कोण गा?" तवं तो ससा म्हणे : "मी चंद्राचा दुतु :" हस्ती म्हणे : "तुं काये म्हणतोसी?" ॥ उक्तं च ॥

उध्दृतेष्वपि शस्त्रेषु बन्धुवर्गवधेष्वपि।
परुषाण्यपि जल्पन्तो वध्या दूता न भूभुजा ॥ १६ ॥

ससा म्हणे : “आ[गा हस्तीया] : चंद्र [मू. चंड्र (सकळ संकेत ड = द).] तुजवरी कोपला आसे : म्हणे : ‘हा सरोवरौ माझीये स्थान [मू. स्छान.] : तुम्ही डहुळीत असा : ससे म्यां राखण ठेवीले असती : तरि तुं या सरोवरा आजीहोउनी [आजपासून.] न यावें : जरी येसील तरि आपुलें केलें पावसी :’ तरि तुवां न यावें : आम्ही सांगौनि उतराई [सांगून आम्ही ऋणमुक्त झाली. सांगायचे ते सांगून आम्ही आमचे कर्तव्य केले.] :”

॥ उक्तं च ॥

परेषामात्मनश्चैव योऽविचार्य बलाबलम् ।
कार्यायोत्तिष्ठते मोहादापदः स समीहते ॥ १७ ॥

तेधवां चतुरदंतु हस्ती भ्याला : म्हणे : “मी आजीलागौनी ये सरोवरिं न यें :” मग ससे सुखीये जाले :”

म्हणौनि समर्थु राजा करावा :” ऐसें काउळा [मू. काउळ.] म्हणे : “या डुडुळाचेनि कोण कारिये होववैल? ॥ उक्तं च ॥

समर्थं पतिमप्राप्य कुतो विवदतां सुखम् ।
उभावपि क्षयं प्राप्तौ मार्जाराच्छशतित्तिरौ ॥ १८ ॥

पक्षिये पुसती तितराससेयाची कथा [या कथेचा पूर्वसंबंध मराठी गद्यात आलेला नाही. तो या वाक्यापूर्वीच्या संस्कृत श्लोकात (१९) आहे. पण त्या श्लोकाचे भाषांतर लेखकाने केलेले नाही.] : काउळा सांगे :

कथा २*
ससा, तित्तूर आणि दधिकर्ण मांजर

“कोन्हे एका [मू. ऐका.] वृक्षाचां ढोलारिं यकु तीतुरु होता : तो चारा आणावेया [मू. आणोवआ.] गेला प्रदेशा : तवं एकु ससा [मू. सषा.] ते ढोलारा सुनें देखौनि तेथें राहुं लागला : तवं तीतुरु बहुताकां दीवसां आला : तवं तेणें ससा देखीला : तयातें म्हणे : “तुं कोण : कवणांचा : माझीया घरांतु निगालासी?” ॥ उक्तं च ॥

न तादृग्जायते सौख्यमपि स्वर्गे शरीरिणाम् ।
दारिद्र्येऽपिहि यादृक्स्यात् स्वदेशे स्वपुरे गृहे ॥ १९ ॥

अनुक्रमणिका

दरिद्रि अथवा धनाड्य आपुलें ग्रहिं [**मू.** **ग्रो**हि.] : आपुलें देशीं : यथास्थिति [**मू.** ०**स्छि**ति.] लेकुरवें-बाळेंसहित असे : त्यायेव्हडें सुख नाहि : म्हणौनि तीतुरु म्हणे : "माझेया घराभाहिर नीग :" तवं तो ससा म्हणे : "मी सुनें घर देखौनि नीगालां [बाहेर पडणे, हा याचा मूळ अर्थ आहे (सं.निर्गम). 'रिग(घ)णे' याच्या विरुद्धार्थाने तो सामान्यतः वापरला जातो. उदा : 'रिगतां निगतां दातारें । [illegible]लांडिजति उंबरें । ते मी होईन आणि द्वारें । द्वारपाळु' (ज्ञाने. १३·४१५). तथापी, निगणे=जाणे, प्रवेश करणे या अर्थानेही हा शब्द वापरला जातो. त्याच अर्थाने तो येथेही वापरला आहे.] : म्हणौनि हें घर माझें [**मू.** 'हे घर मा हें घर माझें'.] :" ऐसें झगडतां दोघै : दधिकर्णा रांनमाजरापासि आले : मग त्यातें देखौनि रानमांजरा [रानमांजराने. (तृतीया विभक्तीचे रूप).] आसन घातलें : मग डोळे लावीले : मग सत्य बोलुं वैराग्यची बोलुं लागला : मग म्हणे : "अगा प्राणीये हो : हा संसारू असारू : आणी देहे तवं नासीवंत : तुम्ही भांडौं नका : पुत्र मीत्र घर स्वप्नांत : धनकन [क*] समृधि ऐस्वर्य सत्ता [**मू.** स**स्ता**.] चातुरंग सै[न्य हें अव]घें इंद्रजा[ल *]वत् : ऐसें जाणौनि [मूळ पोथीत पान ७९ वर, पान ७८ वरील 'आसें : हा सरोवरौ माझा....' येथून तो श्लोक १८ मधील 'उभावपि क्षयं प्राप्तौ' या वाक्यापर्यंतचा मजकूर चुकीने पुन्हा लिहिला गेला आहे. तो येथे गाळला आहे.] आपुलें परत्र हित वीचारावें ॥ उक्तं च ॥

अनित्यानि शरीराणि विभवो नैव शाश्वतः ।
नित्यं संनिहितो मृत्युः कर्तव्यो धर्मसंग्रहः ॥ २० ॥

हें सरिरें अनीत्ये : आणी संपती तवं थीर नाही : आणी मृत्यु तवं नीर्धारेसी असे : ऐसें जाणौनि प्राणीयें धर्मसंग्रहो करावा ॥ उक्तं च ॥

यस्यधर्मविहीनानि दिनान्यायान्ति यान्ति च ।
स लोहकारभस्त्रेव श्वसन्नपि न जीवति ॥ २१ ॥

जया प्राणीयांचे दिवस धर्मरहित : येति जाती [**मू.** **जी**ती.] : तयाचें जीवीत लोहोकराचीये भातीऐसें जाणावें ॥ उक्तं च ॥

पुलाका इव धान्येषु पूतिका इव पक्षिषु ।
नपुंसका इव पुंसु येषां धर्मो न कारणम् ॥ २२ ॥

धान्यामध्यें जैसें कुळीथ [सं. श्लोकातील 'पुलाका' या शब्दासाठी हा शब्द योजला आहे. वस्तुतः 'पुलाक' म्हणजे पूर्ण न पिकलेले, कच्चे धान्य, हुरडा, किंवा निःसत्व धान्य. 'कुळीथ' साठी 'कुलित्थ' हा सं. शब्द आहे. निर्मळ पाठकानेही 'पुलाका' याचे भाषांतर 'जसे धान्यामाजी **कुळीथ'** असेच केले आहे. कदाचित लेखकासमोर असलेल्या सं. पंचतंत्रातील पाठ निराळा असावा महालिंगदासाच्या पंचोपाख्यानात 'कुलित्था इव धान्येषु'—असा पाठ आहे. तोच येथील **सं.** श्लोकामधे असावा.] अप्रयोजक : या [**मू.** **आ.**]

अनुक्रमणिका

पक्षीयामध्यें जैसी कांपोळी [सं. श्लोकातील ‘पूतिका’ =कस्तुरी मांजर; किंवा माशी साठी हा शब्द योजला आहे. माशी, हा अर्थ येथे अभिप्रेत असावा.] : पुरुशामध्यें जैसें नीपुंसकु : तैसा धर्महिनु पुरुशु व्यर्थ जाणावा :

॥ उक्तं च ॥

संक्षेपात्कथ्यते धर्मो जनाः किं विस्तरेण तु ।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥ २३ ॥

हे जन हो : संक्षपें [मुळात ‘संक्ष**यो**’ असे आहे. **प** हे अक्षर **य** सारखे लिहिले गेले. लेखकाला अभिप्रेत शब्द ‘संक्षपे’ असाच असावा. **प** हे अक्षर **य** सारखे वाचल्यावर ‘संक्षये’ असे लिहायचे. ते चूक असावे या समजुतीने प्रतकाराने संक्षयो अशी चुकीची दुरुस्ती केली असावी.] धर्म आईका : जें सांघीजैल : परोपकारायव्हडें पुण्य नाहि : आणी परपीडनायेव्हडें पाप नाही :” ऐसें तया रांनमांजराचे बोलणें आईकौनि : ते दोघौ म्हणे[ति : “तरि] [अर्थात, एकमेकांना म्हणाले.] तुम्ही घरविवादें जावें [(न्यायनिर्णय करून घेण्यासाठी) घराचा वाद घेऊन (न्यायाधीशाकडे) जावे.] : तरि येथेंची हा नीका सत्यवादि [तपस्वि*] [पोथीत येथील काही अक्षरे नष्ट झाली आहेत. पुढे मार्जाराला ‘तपस्वि’ म्हणून संबोधले आहे. तोच शब्द येथे असावा. म्हणून तो स्विकारला आहे.] दीसतुसे : तरि यापुढें वेव्हारू सांगों :” मग कपींजळु [हे तित्तराचे नाव. कथेच्या आरंभीच ते द्यायला पाहिजे होते. पण दिलेले नाही.] म्हणे : “हा आमचा शत्रु : आमतें भक्षावयाची श्रधा करैल [मनात निश्चित इच्छा बाळगील; दृढ प्रेम बाळगील.] : तरि दोघातें भक्षिल ॥ उक्तं च ॥

न विश्वासो रिपौ कुर्यात्तपश्छद्मस्थितेऽधमे ।
दृश्यन्ते बहवो लोके मलिनाश्छद्मकारिणाः ॥ २४ ॥

॥ तथा च ॥

शत्रूणां चैव विश्वासो न कुर्याच्च विचक्षणः ।
कदाचिदपि हन्यात्सस्तमाच्छत्रुं न विश्वसेत् ॥ २५ ॥

शत्रुचा विस्वासु जाणतेनी न करावा : कोन्ही येके वेळें तो मारे : म्हणौनि शत्रुसी वीस्वासु न ये : तरि याचें वचन दुरौनि परिसावें :” मग सशेनि म्हणीतलें : “अहो मार्जरा तपस्वि हो : तुम्ही आम्हा दोघांचा वेवादु परिसावा : लटिका होईल त्यासि भक्षावें :” ऐसें सशयाचें वचन आईकौनि : रानमांजरें कानावरि हात ठेवीला : मग म्हणे : “हर हर : शीव शिव : राम राम : ऐसें कां गा ससया बोललासी : जें लटीकयातें भक्षावें? तरि

हें जरि म्यां करावें तरि परत्र तें काइसें? म्यां वेवहार परिसौनि : तुम्हां दोघां ऐक्य करणें कीं : सीकलावनी [शिक्षा लावणे (करणे) हे अनुचित.] हे अनुचीत : आणी भुतहिंसा म्हणीजे केवळ पापासी मुळ ॥ उक्तं च ॥

अहिंसा परमो धर्मो यस्मात्सद्भिरुपासितः ।
यूकमत्कुणदंशादीं दशतोऽपि न हिंसयेत् ॥ २६ ॥

सर्वभुतीं अहिंसा यव्हडें परम धर्मु [**मू.** पराधर्मु.] नाहि : ऐसें मानभाव बोलती : जु आणी मत्कुणादिक दंशती तऱ्ही ते नेमारावें" ॥ उक्तं च ॥

वृक्षांश्छित्वा पशून्हत्वा कृत्वा रुधिरकर्दमम् ।
यद्येवं गम्यते स्वर्गे नरकं केन गम्यते ॥ २७ ॥

ऐसें तया रांनमांजराचे वचन आईकौनी ते दोघें वीस्वासले : जवळीके [जवळीक=सन्निधान. पण येथे 'जवळ' या अर्थानेच हे रूप वापरलेले आहे.] आले : तवं रांनमांजरू म्हणे : "मी वृधु : कानिं नाईकें : तरि आपुलाले शब्द माझें कानिं सांघावे : मग मी तु[म *]चा वेव्हारू बरवा करिन [यापुढे, २९ व्या श्लोकानंतर आलेले वाक्य 'तो नरकाप्रति जाये' हे पोथीत या ठिकाणी चुकून लिहिले गेले आहे. ते गाळले आहे.]"
॥ उक्तं च ॥

मानाद्वा यदि वा लोभात्क्रोधाद्वा यदि वा भयात् ।
यो न्यायमन्यथा ब्रूते स याति नरकं नरः ॥ २८ ॥

॥ तथा चं ॥

उपविश्य सभामध्ये यो न वक्ति स्फुटं वचः ।
तस्माद्दू रेण स त्याज्यो न्यायो वा कीर्तयेदृतम् ॥ २९ ॥

मानास्तव : लोभास्तव : अथवा भयास्तव जो न्यायें अंन्याये करि [न्यायाचा अन्याय करतो. जो न्याय असेल तो अन्याय करून सोडतो, न्याय नाहीसा करतो, म्हणजेच अन्याय करतो, हा भावार्थ. मूळ सं. श्लोकात 'न्यायं अन्यथा ब्रूते' असे आहे. 'अन्यथा' शब्दाऐवजी 'अन्याय' चुकून लिहिले गेले असावे असे वाटते. पण आहे तोच पाठ घेऊन वरीलप्रमाणे अर्थ समाधानकारक लावता येतो, म्हणून दुरुस्ती केली नाही.] तो नरू नरकाप्रती जाये : सभेमाजी बैसौनि स्फुट वचन न बोले : तो दुर त्याजावा :"
ऐसें तया रांनमांजराचे वचन आईकौनि : ते दोघै वीस्वा[स *]ले : रांन-

मांजराचें कानीं लागले : मग तेणें येकु चवडा हाणितला : येकु तोंडिं धरिला :
ऐसें दोघातें मारौनि भक्षिलें :”

म्हणौनि काउळा म्हणे : “भक्ष राजा नीका नव्हे [भक्ष्य=खाद्य; जे भक्षण करावयाचे ते. आपण ज्याचे ‘भक्ष्य’ आहोत तो राजा नीका नव्हे. ‘भक्षक’ या अर्थानेच भक्ष शब्द वापरला आहे. कदाचित, प्रत करताना ‘भक्षक’ शब्दातील **क** चुकून गळालाही असेल. हेच वाक्य पुढे पान ८९·३ मध्ये आले आहे.] : दुष्टासि पातेंजुं न ये [विश्वास ठेवता येत नाही. **पातेजणे** : विश्वास ठेवणे. ‘पातिजणे’ असे याचे जुने रूप आहे. पाहा : ‘श्रद्धा म्हणितलेयाचि साठी । **पातिजों** नये किरीटी’ (ज्ञाने. १७-५१). ‘पातियणे’ असेही त्याचे रूप होते. पाहा : “म्हणौनि ज्ञान कर्मकर्त्तेयां । पांती ए[illegible] नये धनंजया’ (ज्ञाने. १८·५१५). **पाती ए[illegible]**’ असे दोन शब्द करून ते निरनिराळे छापले असले तरी दोन्ही मिळून तो एकच शब्द आहे. ह्या दोहीचे पाठांतर ज्ञानेश्वरीच्या अनेक प्रतीत ‘पातेजों ’ किंवा ‘पातेजुं’ असे आहे, यावरूनही हे स्पष्ट होईल. विश्वनाथबासाच्या ‘ज्ञानप्रबोधा’त पुढील ओवी आली आहे. ‘आहो ब्रम्हींचें सारिखें : कांहीं दीसतें जीवदसे : तरि **पातीयतों** भासे : उपमेचियें’ (६०९) याच्या पाठांतरात ‘पा’ अक्षरावर अनुस्वार आहे. ओवीच्या टोपेत ‘पातियतों=पातिजतों’ असा पर्यायी शब्दात् अर्थ दिला आहे. सं. ‘प्रत्यय’ पासून हा शब्द व्युत्पादिता येईल.] :

येकें व्याघ्रें जयापरि आतिथपुजा मांडौनि [**मू. मा**डौनि.] : भलतयातें सापडौनि [‘सापडणे’ हे क्रियापद प्रयोजकार्थी योजलेले आहे. सापडवून, मिळवून, हा अर्थ. ‘सापडवूनि’ हे रूप उच्चारसादृश्याने ‘सापडौनि’ असे लिहिलेले आहे. मिळवून, गाठून, हा भावार्थ.] मारि :”

त[वं*] पक्षिये पुसती : “ते कैसी कथा सांगां पां?” काउळा सांगे :

कथा ३*
परवंचक व्याघ्र व वनार

[ही कथा या ठिकाणी कोणत्याच संस्कृत पंचतंत्रात आढळत नाही.]

“कोन्हें एकें वनीं व्याघ्रु एकु होता : तया नांव परवंचकु : तयासी दीव-
[स*] चारि आहारू न मीळेची : क्षुधा पीडौं लागला : तवं तेथें वांनरू
एकु [**मू.** ऐकु.] वृक्षावरि देखीला : तयातें व्याघ्रु धरूं पाहातु आसे : परि तो मना-
भीतरि नव्हे [पण तो तावडीत सापडेना, अशा अर्थाने हे वाक्य लिहिले आहे.] : मग व्याघ्रें बुधि येकी केली : परता जाउनी बरवीं सुस्वादें
फळे आणीलीं : आणौनि वृक्षाखाली दोन भाग केले : अतिथ बोलाउं आला :
तवं कोन्ही न यचि : तेंव्हां आपणयातें [**मू.** आपण**आ**तें.] धीककरूं लागला [धिक्करू लागला. धिक्करणे>धिक् करणे.] : म्हणे : “जळो [**मू. ब**ळी. (सकळ संकेत ब = ज).]
माझें जीयालें : अतिथ कोन्ही न मीळेची : तेणेंविन मज च्यारी लंघनें
पडलीं :” ऐसें म्हणौनि रुदना करूं लागला : तें देखौनी वृक्षावरी वांनरू
होता : तेणें म्हणतीलें : “व्याघ्र दादो : हें रुदन काईसें?” तो म्हणे :
“अतीथ मज मीळे ना : अतिथ मीळता तरी पारणें होतें : यें फळें अतिथासी
देतां :” वांनरू म्हणे : “मी अतीथु :” मग वृक्षाखाली उतरला : मग
व्याघ्रु ह[रि*]खैला :” मग म्हणे : “माझें भाग्यु : तुं अतिथ जालासी :”

मग व्याघ्रें संकल्पु घातला [व्रत वगैरे करतांना किंवा ब्राम्हणभोजनापूर्वी आपला पुण्यहेतू उच्चारून त्याप्रीत्यर्थ दानदक्षिणा देण्यासाठी हातावर उदक सोडणे.] : वानरातें म्हणे : “आमृत किजे [भोजनाला सुरवात करा. तुळा : ‘ते ताट भावकळणां मांडिलें : मग नींबलोण केलें : दंडवत घालुनी म्हणीतलें : ‘जी आमृत कीजे’ (संतोषमुनि कृष्णदास, रुस्व. १४·२२८.)] :”

अनुक्रमणिका

वांनर फळें स्वीकारूं लागला : तवं दुचीता जाला [दुश्चित्त झाला, लक्ष ठिकाणावर राहिले नाही.] : व्याघ्रें गळा धरिला : तें देखौनि वांनरासी हास्य आलें : तवं व्याघ्रुहि हांसीनला : तेणेंकरौनि व्याघ्राचें-(चा) हात वी[कळ....गेला] [हात शिथिल झाला, ढिला पडला.] : हास्य करौनि मुख पसरीलें : वांनरू सुटला [मू. श्रुटला.] : इतुकेनी वांनरू वृक्षावरि गेला वृक्षावरि जाउनी रुदन करूं लागला : मग व्याघ्रें म्हणतीलें ॥ उक्तं च ॥

यदा गले गृहीतोऽसि तदा हससि वानर ।
वृक्षशाखासमारूढः रोदनं किं करिष्यसि ॥ ३० ॥

तवं वानरें म्हणीतलें ॥ उक्तं च ॥

आत्मार्थे च न रोदिमि जने रोदिमि चेतरे ।
शीलं तव न जानामि वने आतिथ्यभोजने ॥ ३१ ॥

“आपणेयां कारणें मी नाहिं रडतु : आणिक जो जनु तयाकारणें मी रडतु : कां : तो जनु तुझा अतिथस्वभावातें नेणे : म्हणौनि मी रडतों :”

तैसें काउळा म्हणे : “पक्षीया उलुकासी राज्य देता : तरि मांजराची शांती वृति : आणि व्याघ्राची आतीथ्य जैसें : तैसी परि तुम्हासि होइल : तरि हें जें आदरिलें [हे जे ‘करू आदरिलें’=करण्याचे स्वीकारले, करण्याचे मनावर घेतले.] असें तें उचीत नव्हें : भक्षु राजा नीका नव्हे :”

ऐसी कथा काउळेयाची आईकौनी : अवघी पक्षीये उडौनी गेली : यकला उलुक उरला : मग उलुकु वायसातें म्हणे : “आरे वायसा दुरात्मेया : माझेया अभीशेकासी तुवां वीघ्न केलें : तरि तुं ऐसा पापीया दुष्ट : तरि आजीलागौनी तुम्हां आम्हां वैर जानीजेसु [जाण; समज. (द्वितीय पुरुषी ए. व.).] : आतां माझी करनि पाहें :” ऐसें म्हणौनि उलुक उडाला : काउळा वीचारिं पडला : म्हणे : “हे फडसुळ बोल [फटकळपणाचे बोलणे. फटकळपणाचे, फारसा विचार न करता एकदम फटदिशी मनातले बोलून टाकलेले.] नीकें नव्हती :” म्हणे : “म्यां वैर लटीकेंचि उपजावीलें ॥ उक्तं च ॥

परापवादमपि विदित्वा न कथंचित्पण्डितेन वक्तव्यः ।

अनुक्रमणिका

सत्यमपि तन्न वाच्यं यदुक्तमसुखावहं भवति ॥ ३२ ॥

बलोपपन्नोऽपि हि बुद्धिमान्नरः परं नयेन्न स्वयमेव वैरिताम् ।
भिषङ्ममास्तीति विचिन्त्य भक्षयेदकारणात्को हि विचक्षणो विषम् ॥ ३३ ॥

जर्‍ही बळेंकरौनी पुरुषु बळवंतु जाला : तर्‍ही पण स्वयें आपण कोणासंघातें वैर न करावें : मज वैद्य घरीं आहे : म्हणौनि या कारणास्तव : कोण पां विचक्षण ['कोण पां विचक्षण' यापुढील काही शब्द पोथीत गळालेले दिसतात. यानंतर 'करि' हे क्रियापद लिहिलेले आहे. सं. श्लोकातील 'भिषङ् ममास्तीति विचिन्त्य भक्षयेदकारणात्कोहि विचक्षणो विषम्' या चरणांचा अर्थ लक्षात घेता, गळलेले शब्द 'विष भक्षण' असे असले पाहिजेत हे स्पष्ट दिसते. त्याप्रमाणे दुरुस्ती सुचवलेली आहे.]

[विष भक्षण*] [**मू.** 'कोण पां विचक्षण किरि'. 'विचक्षण' पुढील काही शब्द गळालेले दिसतात. ते 'विष भक्षण' हे शब्द असावे, असे श्लोक ३३ वरून स्पष्ट दिसते. '**कि**रि' शब्दातील 'कि' हे अक्षर **क** ऐवजी चुकन लिहिले गेले असावे.] करि?" ऐसें काउळा म्हणौनि आपुलेया ठायां गेला :

मग चीरंजीवी म्हणे : "मेघवर्णा : तुवां पुसीलें : काउळेयांउलुकांचे वैर :" तवं मेघवर्णु म्हणे : "ऐसीयांसी [काये करावें तें] सांग पां?" तवं चीरंजीवी म्हणे : "आपुलीये बुधीकरौनि काय [नोहे*?... वैरी] मरे : ऐसा प्रकारु [(शत्रू जेणे करून नष्ट होईल असा उपाय मी '**वीचारिला आसे**' (विचार करून ठेवला आहे.).] वीचारिला आसे : बुधीकरुनि काय पां नव्हे?" ऐसें तीघीं धूर्ती [**मू.** धूर्त. (टीपा पाहा.) 'ऐसें' ऐवजी 'जै**सें**' असावे. '**तीघीं धूर्ती**' असे पोथीत मुळात आहे. 'धूर्ती' (तीन धूर्तांनी) हे रूप मुळात असावे. पुढील वाक्यात ते आले आहे, हे लक्षात घेऊन दुरुस्त करून घेतले आहे.] बुधी करौनि ब्राह्मणातें वंचीले :" ॥ उक्तं च ॥

बकबुद्धिसमोपेताः सुविज्ञाना बलोत्कटान् ।
शक्ता वञ्चयितुं धूर्ता ब्राह्मणं छागलादिव ॥ ३४ ॥

तवं मेघवर्णु म्हणे : "तो कैसा व्रतांतु? सांघां पां : वकाचियापरि बुधि असे कां ज्याचि : तीहिं धुर्ती ब्राह्मणातें कैसें वंचीलें?" ऐसी कथा मेघवर्ण पुसे : चीरंजीवी सांगे :

कथा ४*
अग्निहोत्री ब्राम्हण व तीन धूर्त

[सं. पंचतंत्राच्या सर्वप्रतीत 'विष्णुशर्मा' ऐवजी 'मित्रशर्मा' असे ब्राम्हणाचे नाव आहे. **भा** प्रतीतही मित्रशर्मा हेच नाव आहे. **म** प्रतीत कोणतेच नाव दिलेले नाही. निर्मळ पाठकाने 'विष्णुशर्मा' हेच नाव दिले आहे.]

"कव्हणी येकें नगरि : वीष्णुशर्मा नांवं ब्राह्मणु अग्नीहोत्री [**मू.** अ**ज्ञी**होत्री.] दिक्षितु

असे : तो यज्ञालागौनि अजापुत्र मागावया नीगाला : माघमासीं माहा-दारुण वायो वाजतसे [वारा वाहत होता; वाऱ्याचा आवाज होत होता. 'थंडी वाजणे' प्रमाणे 'वारा वाजणे' हा वाक्प्रचार आहे. वाजणे=वाहाणे, असाच अर्थ आहे. सं. व्रज्-पासून वाजणे; जाणे, वाहणे. 'घनु वाजे घुणुघुणा **वारा वाजे** रुणुझुणा' हे ज्ञानेश्वरांचे पद प्रसिद्ध आहे.] : मंद मंद पर्जेन्य वर्शतु असे : ऐसां अवस्वरीं गांवा एका [**मू.** ऐका.] नीगाला : तेथें यजमाना येकातें अजापुत्रु मागीतला : तेणें यज्ञार्थें दिधला : ब्र(ब्रा)ह्मणु अजापुत्र घेउनी नीगाला : मग तो ब्राह्मणु खांदिं घेउनी येतु असे : तवं पैलकडौनि तिघी धुर्त यत आसति : तिहिं ब्राह्मणातें देखीलें : मग ते धुर्त म्हणेति : "हा बोकडु जरि आम्हासी होये : तरि आमची वांकडी नीस्तरिजे [वांकडी=पावसाची झड. सतत पर्जन्यवृष्टीमुळे त्या तिन्ही ब्राम्हणांना काही खायला मिळाले नव्हते. वृष्टीमुळे ते गारठूनही गेले होते. विष्णुशर्म्याच्या खांद्यावरील पुष्ट बोकड पाहून त्यांना वाटले 'हा बोकड जर खायला मिळाला तर या पर्जन्यवृष्टीमुळे झालेला त्रास नाहीसा होईल. 'अस्य पर्शोर्भक्षणादद्यतनीयो हिमपातो व्यर्थतां नीयेत' असे संस्कृत वाक्य आहे. 'हिमपातो व्यर्थतां नीयेत' याचे भाषांतर 'वांकडी नीस्तरिजे' असे केलेले आहे. यावरून '**वांकडी**' शब्द हिमपात (बर्फाचा किंवा थंड जलबिंदूंचा वर्षाव) यासाठी वापरला आहे हे दिसून येईल. 'पावसाची झड' या अर्थाने तो जुन्या मराठीत रूढ आहे. पाहा : 'ऐसी तीन दीस **वाकडी** लागली' (गोप्रच. २४२); 'कुळवाडी रिणें दाटली । कीं **वांकडिया** ढोरें बैसलीं । तैसी नुठी काही केली । जीभचि हे' (ज्ञाने. १३·५६६) 'कीं द्राक्षमंडपु नव्हे मेहुडें । वरिखत रसांचें **वांकडें**' (नरुस्व. ५२३). 'झडी तुषार पाऊस झडीचें नाव **वांकडी**' (भाप्र. १३·२४)] : तरि येकाधी बुधी रचीजे [मुळात यापुढे 'जाउनि' हा शब्द लिहिला आहे. तो पुढे आलेला असून येथे अनावश्यक आहे. म्हणून संहितेत गाळला आहे.] :" ऐसें म्हणौनि तयामधिलु येकु सामोरा जाउनि ब्राह्मणापुढें उभा राहीला : म्हणे : "भटो : तुम्हांसी काय गा जालें हो? लोकु विरोधु [विरोधु (विरोधी) लोक.] तुम्हासी हासैल : हें मृत्य [**मू.** मूर्त्य.] स्वान तुम्ही खांदीं घेउनि नेत असा : तरि तुम्हांसी काय विष्टाळु [विटाळ. विटाळ या शब्दाची व्युत्पत्ती देप्रा. विट्टालु या शब्दापासून काही जण मानतात. त्याचेच संस्कृतीकरण (विष्टालु) मागाहून झाले असावे असे त्यांचे मत आहे. विष्ठेप्रमाणे स्पर्श करण्यास अयोग्य, ही अयोग्यता म्हणजेच विटाळ, हा अर्थ लक्षात घेता सं. 'विष्ठा+ल' अशी व्युत्पत्ती करण्यास हरकत नसावी.] होत नाहि?"

॥ उक्तं च ॥

श्वानकुक्कुटमार्जाराः अस्पृश्याश्चः प्रकीर्तिताः ।
रासभोष्ट्रौ विशेषेण तस्मात्तान्नैव संस्पृशेत् ॥ ३५ ॥

हें आईकौनि ब्राह्मणु तयासी कोपला : मग म्हणे : "पापीष्टा : ऐसें काय बोलतोसी? अजापुत्रातें स्वान कैसें म्हणतोसी?" तवं तो म्हणे : "हो कां जी : तुम्हांसी नीकें वाटत असें तरि ऐसें होये :"

मग पुढारां ब्राह्मणु जाउं लागला : तवं दुसरा धुर्तु पुढां भेटला : म्हणे : "उपाध्या हो : काई जालें? तुम्ही मृत्या वासरू खांदावरी कैसा घेउनि नेत असा? [तुम्हासी... वी]टाळू नव्हे काइ? कैसें ब्राह्मण तुम्ही ऐसें नष्ट :" ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

तिर्यञ्चं मानुषं वापि यो मृतं संस्पृशेत्सुधीः ।
पंचगव्येन शुद्धिः स्यात्तस्य चान्द्रायणेन वा ॥ ३६ ॥

तवं ब्राह्मणु म्हणे : “हा रे : काइ डोळां न देखसी? बोकडातें कैसें मृत वासरू म्हणतोसी : चळलासी काये?” तवं येरु म्हणे : “तुम्हासी नीकें तरि असों द्या जी : मग ब्राह्मणु साउमा नीगाला : तवं तीसरा धुरतु मार्गी भेटला : तो म्हणे : “भटो : हें रासभ खांदीं वावुनी कां नेत असा? या गाढवासी जर आतळीजे तरि सुचीळ स्नान पडें : आणि पुर्वसुक्रीत जोडलें नाशे ॥ उक्तं च ॥

अजारजः खररजस्तथा संमार्जनीरजः ।
दीपमञ्चकयोश्छाया हंति पुण्यं पुरा कृतं ॥ ३७ ॥

यः स्पृशेद्रासभं मर्त्यो ज्ञानादज्ञानतोऽपि वा ।
उपवासेन शुद्धिः स्यात्सचैलं स्नानमाचरेत् ॥ ३८ ॥

सेळीचा रज : गर्धभाचीं रजें : संमार्जनिचीं रजें : दीपमंचकाची [दीपाची आणि मंचकाची. ‘हंती पुण्याये’=(पुण्यांचा नाश क्रूरतात) हे शब्द अनावश्यक आहेत. त्यांचेच भाषांतर पुढील शब्दात सांगितले आहे. ‘पुण्याये (य)’ हे रूपही चुकीचे लिहिले आहे.] छाया :
हंती पुण्याये : पुर्वी सुक्रीतें [पूर्वीची, पूर्वी संपादन केलेली पुण्ये; पूर्वसुकृते.] नाशतीं : येऱ्हवी मानुसें देखती तरी तुमची भाडाईल [मुळात ‘भाडाई होतील’ असे आधी लिहिले गेले. नंतर ‘होती’ या अक्षरावर ती रद्द केल्याची चिन्हे दिली आहेत. तुमची आईबहीण उद्धरील, आईबहिणीवरून तुम्हाला शिव्या देईल. **भाड**=आपल्या आईबहिणीला जारकर्म करायला लावणारा, घरातील स्त्रियांचा कुंटणपणा करणारा. यापासून **भाडइणे**=आईबहिणीचा भाड्या म्हणून शिव्या देणे. तमाशा करणाऱ्या लोकात एक ‘भाड्या’ असतो, हे आठवावे.] : जवं कोन्ही न देखे तवं या रासभातें [**मू**. रायासभातें.] सांडि :” ऐसें आईकौनि ब्राह्मणें तो [**मू**. ‘तों’.] पसु सांडिला : म्हणे : “हा पसु नोहे : यकाधी वीवसी होईल : नाना रूपें धरीत असे : येकें स्वानरूप देखीलें : येकें वासरू देखीलें : एकें गध(र्ध) व ऐसें देखीलें : तरि यावरुतें आणीक रूप धरैल : तरि मातें छळील : आतां नीगीजे तरिची वांचीजे :” ऐसें म्हणौनि जिवाभेण तो पसु सांडौनि पळाला : ते तीघे धुर्त मीळौनि : पसुतें मारौनी भक्षिलें [येथे ‘धूर्त’ शब्द तृतीया विभक्तीच्या अर्थाने आला आहे.] :’

“या कारणें कथा सांगीतली :” चीरंजीवी म्हणे : “मेघवर्णा : बुधि जरी होय तरी आसाध्य तें साधावें ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

अभिनवसेवकविनयैः प्राघुणकोक्तैर्विलासिनीरुदितैः ।
धूर्तजनवचननिकरैरिह कश्चिन्न वञ्चितो नास्ति ॥ ३९ ॥

नवला सेवकु होय : तो धुरेपुढें ‘ऐसें करूं तैसें करूं :’ ऐसें भ[ल*]तेंची बोले : तो भलतैसा धाकडु होय : पण धूर्तासीची भ (भि)ये : पांहुना घरिं आला : तरि घरिं आसौ अथवा [नसौं*]पण तयासी आदरु केला पाहीजे : पढीयंती कामनी रुस[ली तरि प्राण]नाथें सर्वस्वा द्यावें पण तीयेतें बुझवावें : तैसाची धुरतीं वचनेंकरौनी कोण सीतरला नाही? [कोण फसवला गेला नाही? कुणाचा धिक्कार झाला नाही? **सीतरणे** (सिंतरणे)=इतरांना झिडकारणे, फसवणे, जिंकणे. पाहा : ‘सोनेकेतकीचीं गाभेवनें : जेहीं **सीतरीली** सुगंधें सुपरीमळें सुमनें’ (मूप्र. ५२९); ‘**सीतरलीया** अष्टमा सीधी : नागवलिया नवही नीधी : तुष्टिपुष्टीची नाही सुधी : ऐसें जालें’ (मूप्र. २८३९); ‘स्वप्न गा जेयापरी । जागतेयातें न **सिंतरी** । गुणिं तैसा अवधारीं । न चळिजे’ (ज्ञाने. १४·३३९). ‘सिंतरणे हा शब्द संस्कृत स्तृ—स्तृणोति, स्तृणुते, किंवा स्तृ—तृणाति, स्तृणीते या संस्कृत धातुपासून’ श्री. देवीसिंग चौहान व्युत्पादतात. (पाहा. चौहान. मराठी आणि दक्खिनी हिंदी. पा. २).] तरि एकी [**मू.** ऐकी.] बुधी करावी : ते सांगैन : इतुकेनि तुझे [सं. श्लोक ३९ याचा ‘नवीन सेवकाची नम्रता, पाहुण्याचे बोलणे, विलासिनी स्त्रियांचे रडणे व धूर्त लोकांची भाषणे यांनी वंचित होत नाही असा पुरुष विरळा,’ असा भावार्थ आहे. ‘तो (नवीन सेवक) भलतैसा (वाटेल तितका) धाकडु (पराक्रमी) होय (असो) पण तोही धूर्त पुरुषांना **भये**=भितो. भये = भिये.]

वैरी आपसेयाची नीपातती :” मग मेघवर्ण म्हणे : “हो कां : तरि ते बुधी सांगीजे : मग तो प्रकारु आम्ही करौं :” चीरंजीवी [**मू.** चिरंणजीवी.] म्हणे : “आइक गा राया : चतुरवीध उपावो राजनीति बोलीला आसे : आणी पांचवा उपावो मी सांगतु असें : राया : तुवां मजवरि लटीकाचि कोपु करावा : मज आवघया परिवारादेखतां निस्तेजावें : मानखंडना करावी : पांख उपडावे : वृक्षाखाली टाकावें : मातें दवडौनि घालावें [काढून द्यावे, हाणून बाहेर काढावे.] : आणी तुं आनीका स्थाना [**मू.** स्थाना.] येथौनी जावें : जैसेनी तया उलुकांचां ठाईं वार्ता जाये :” ऐसा संप्रधारू मेघवर्णें चीरंजीवीयासी केला : तो संप्रधारू आणीक कोन्ही नेणे :

मग मेघवर्णु वृथाची प्रधानांवरि कोपला : दोघें जण सोनारकळी करूं लागले [**मू.** लागते.] : तें परिवारें आइकीलें : ते म्हणति मेघवर्णातें : “आहा : प्रधानु वोखटा : गोसावियासी सन्मुख भांडतु असे : तरि यासी [**मू.** आसी.] सीख लावीजे :” ऐसें म्हणौनी तयासी अपीमानु अवकळा केली : निर्भंसीला : पांख उपडीले : मृत्य म्हणौनी वृक्षाखाली टाकीला : मग मेघवर्णु परिवारातें म्हणे : “चाला जाउं आतां हें दुर्ग सांडौनि : आतां य दुर्गीं असतां वोखटें आसें : हें दुर्गची [**मू.** दुर्गाची.] बंधनरूप मुळ होइल ॥ उक्तं च ॥

सारासारसमायुक्तं तज्जनं दुर्गमुच्यते ।
अपसारपरित्यक्तं दुर्गव्याजेन बन्धनम् ॥ ४० ॥

जेथें आन्यक [जेथे ‘आन्यक (अनेक प्रकारचा) संग्रहो (वस्तूंचा, साधनसामुग्रीचा संचय); अंन्य (अन्न), उदक, जन (लोक परिवार)

अनुक्रमणिका

शस्त्रादिकें' आहेत तोच दुर्ग. **अन्न** शब्द **अंन्य** असा लिहिला आहे.] संग्रहो अंन्य उदक जन शस्त्रादिकें : तोची दुर्ग : आणी जेथें संग्रहो नाहि तें दुर्ग बंधन जाणावें : तरि ये दुर्गी असावें ना : हें दुर्ग सांडितां कांही संका न धरावी : जीवापरि सपरिवारु बरव्यापरि प्रतिपाळीजे : मग युधअवेस्वरीं कामासी ये : मग युधावसरिं [तयाची] कणव कांहि न धरीजे [युद्धाच्या वेळी त्यांची कीव करू नये.] ॥ उक्तं च ॥

अपि प्राणसमानिष्टान्पालितांल्लालितानपि ।
भृत्यान्युद्धे समुत्पन्ने पश्येच्छुष्कमिव स्रजम् ॥ ४१ ॥

प्राणवद्रक्षयेत् भृत्यान्स्वकायमिव पोषयेत् ।
सदैकदिवसस्यार्थे यत्र शत्रुसमागमः ॥ ४२ ॥

प्राणांहुनि भृत्य अत्यंत आवडेतें : जे बरवें लीळा तें पाळीजे : ऐसें आसतां : तयाची युधावसरिं कणव [**मू.** कवन.] [न*] धरावी : आणीक येक आसें : प्राणांचें [परि*] [**मू.** प्राणांचें परिवारु रक्षावा. **परि** ही अक्षरे लागोपाठ पुन्हा आल्याने एकदा ती लिहिली गेली आहेत अशा समजुतीमुळे अनवधानाने गळली असावी.] परिवारु [या दोहोमधील 'परि' हा शब्द नक्कल करतांना गळालेला दिसतो. सं. श्लोकात 'प्राण**वत्**' असे आहे. पुढील वाक्यात 'सरिराचें परि'=शरीराप्रमाणे (स्वकाय**मिव**) असे आहे. त्याचप्रमाणे येथेही 'प्राणाचें परि' असे असले पाहिजे. पुढे 'परिवार' शब्दात पुन्हा 'परि' ही अक्षरे आल्यामुळे दृष्टिभ्रमाने पहिला 'परि' शब्द गळाला असावा. तो संहितेत स्वीकारला आहे.] रक्षावा : आपुलया सरिराचें परि पोशावें : कां : येकां दीवसा कारणें : जेथें सतृसी भेटी होय तेथें ते कामासी येती [कां (कारण की, पुढे) एखाद्या दिवशी शत्रूशी गाठ पडेल त्यावेळेस ते 'कामासि येती' =उपयोगी पडतील (किंवा, लढाई करून कामास येतील, प्राण अर्पण करतील).] :" ऐसें म्हणौनि तो मेघवर्णु सपरिवारेसी आनीका स्थाना [**मू.** **स्छा**ना.] गेला :

तो सकळ वृत्तांतु उलुकाराया : अरिमरदनासि हेरिं जाणवीलें (ला) [या कर्मणी प्रयोगातील क्रियापदाचे रूप पाहावे. 'जाणविला' असे रूप असावयास पाहिजे होते.] : 'मेघवर्णु दुर्ग सांडौनि पळाला :' ऐसें आइकौनि अरिमर्दनें सकळ परिवारु मेळवीला : म्हणे : "चाला जाउं : शत्रु पळौनी गेला : आमचें मनीचें चींतलें जालें" ॥ उक्तं च ॥

शत्रोः प्रचलने छिद्रमेकमन्यच्च संश्रयम् ।
कुर्वाणो जायते वश्यो व्यग्रत्वे राजसेविनाम् ॥ ४३ ॥

॥ तथा च ॥

न चच्छिद्रंविना शत्रुर्देवानामपि सिध्यति ।
छिद्रं शक्रेण संप्राप्य दितेर्गर्भो हतः पुरा ॥ ४४ ॥

अनुक्रमणिका

ऐसें बोलुनी अरीमर्दनु सपरिवारि तया स्थानासी [**मू. स्छा**नासी.] आला : तो वटवृक्षु भवता वेढीला : जवं पाहाती तवं कोन्ही काउळातें न देखती : मग उलुकराजा वृक्षाग्रीं बैसौनी हरिखयुक्त जाला : तवं भाट कैवार पढौं लागले [अभिमान. पाहा : 'प्रऱ्हादाचेया **कैवारा** भूत एक अवतरले : तेयाचेया कोपापुरतें चराचर विश्व न पुरे' (सिसूपा. वि. ५१). 'सांकडया धर्माचेनि **कैवारें** आपणपेयां धनुष करुनि दुसरें। विजयलक्ष्मी एक मोहरें। केलें त्रेतीं' (ज्ञाने. १०·२३२). लक्षणेने, कैवार = 'एखाद्याचा अभिमान घेऊन त्याप्रीत्यर्थ केलेले पुण्यकार्य किंवा पराक्रम ज्यात वर्णन केलेला आहे असे गीत; सत्कृत्यांचा किंवा पराक्रमाचा पोवाडा. राजासमोर त्याचे भाट त्याच्या पराक्रमाचे पोवाडे गात असत. पाहा : 'तेथ साळेया पुंसे चर्बट : ते वसंता **कैवारू** करिते भाट' (नरुस्व ७४९). यावरून, भाटाकडून स्वामीचा 'कैवार' पढण्याची प्रथा लक्षात येईल. **पढौं लागले** : पठण करू लागले, म्हणू लागले, गाऊ लागले. अरिमर्दनाचा शत्रू मेघवर्ण सपरिवार पळून गेला हा अरिमर्दनाचा विजय होता. म्हणून त्याचे भाट 'कैवार पढौं लागले'.] : म्हणे : "भुतळामाझारि तुझेयासारीखा कवणु आसे? पुढील अवघेंची वीसरौनि जाये : ऐसा तुंची यकु अरिमर्दनु भयानकु :" तवं आनीक येकें उलुकें म्हणितीलें : "जी जी : येणें मार्गें मेघवर्णु गेला : हा मार्गु देखीला : चाला जाउं येणें मार्गें : जवं तो येकाधें स्तान पावे ना : तवं तो धरौं : मग स्थान [**मू. स्छा**न.] आणिक आश्रीलें तरी सत्रु नागवें [अंगवणे=हाती पडणे, सापडणे. न+आंगवे=नांगवे. मुळात ना वरचा अनुस्वार गळाला असावा. तथापी, 'नांगवे' या अर्थी 'नागवे' असेही रूप आढळते. उदा. 'म्हणौनि मायासक्ति किरू नागवे' (उगी. १६७); 'जेया तळीं सकळ दळ। जुंझी **नागवे** माहांकाळा' (चोंभा. उह. १४१५).] ॥ उक्तं च ॥

वृत्तिमप्याश्रितः शत्रुरवध्यः स्याज्जिगीषुणा।
किं पुनः संश्रितो दुर्गं सामग्र्या परया युतम् ॥ ४५ ॥

स्थान [**मू. स्छा**न.] आश्रीलें मग शत्रु नागवें : आणी सामग्रीसहीत दुर्ग आश्रीलें आसतां दुर्ग नागवे : येथें कोण संदेहो?"

ऐसें बोलतबोलतां : तवं पैलकडौनि हळुहळु नाहान [लहान, मंद मंद.] शब्देंकरि [शब्द करून, शब्द करीत असलेला. **ल** चा उच्चार क्वचित **न** असाही करतात. (उदा. सं. **लां**गल>**म. नां**गर) त्याचेच हे उदाहरण आहे. निर्मळ पाठकाने '**ला**हान शब्द बोले दुबळु' (३·२२६) असे म्हटले आहे.] आईकीला : तें आईकौनि अवघे उलुक तयातें वधावयालागौनि चालीले : मग चीरंजीवी म्हणे : "दुर गा दुर : मी मेघवर्णाचा प्रधानु : चीरंजीवी मज नांव : मातें अरिमर्दनासी भेटवा : मग मी कांहियेक सांगैन :" हें आईकौनी तीहिं चीरंजीवीयातें धरौनि अरीमर्दनारायापासी आनिला : मग राजेनि तयातें देखीलें : विस्मीत होउनी तयातें पुसता जाला : म्हणे : "हा गा : ऐशी [**मू.** ऐशी.] दशा तुं कां पावलासी : तें सांघां [**मू.** शांघा.] पां :" चीरंजीवी म्हणे : "राजया : अवधारी : कालीचा दिवसु तुमचे उलुक ये स्थानीं [**मू.** स्छानीं.] येउनी वायसातें मारीलें : तें देखौनि मेघवर्णु कोपाविष्ट जाला : तुम्हासी जुंझावया चालीला : तेव्हेळीं [म्यां*] म्हणीतलें : "मेघवर्णा : तुं हें कायें उत्कृष्ट करितोसी [याचा सरळ अर्थ 'तू हे फार उत्तम काम करतोस.' पण हा अर्थ येथे अभिप्रेत नाही. मूळ सं. वाक्य 'न युक्तं भवतस्तदुपरि गन्तुम्' असे आहे. तेव्हा हे कार्य 'अयुक्त' होय. कारण, ते केल्याने तू 'नाशातें पावसी' येथे 'उत्कृष्ट' ऐवजी 'उत्कट'=(अत्यंत कठीण, भावनेच्या आहारी जाऊन, उत्छृंखल) शब्द असेल काय? **उत्कृष्ट** हाच पाठ घेतला तर त्याचा यौगिक अर्थ, उत्+कृष्'=विदारण करणे,

अनुक्रमणिका

छिन्नविच्छिन्न करणे, हा घ्यावा लागेल, **उत्कृष्ट कार्य**=छिन्नविच्छिन्न झालेले काम, निरर्थक काम, किंवा बळेबळेच वर उचललेले, ओढूनताणून (आपले सामर्थ्य नसताना) केलेले काम.] : तरि नाशातें पावसी : बळीयासी हिनबळें स्पर्धा न करावी

॥ उक्तं च ॥

बलीयसा हीनबलो विरोधं न भूतिकामो मनसापि वाञ्छेत् ।
न वध्यते वेतसवृत्तिरत्र व्यक्तं प्रणाशोहि पतंगवृत्तेः ॥ ४६ ॥

तयावरि कटे [येथे ‘कटकी’ असा शब्द अभिप्रेत असावा. कंसात ‘कटकी’ अशी दुरुस्ती सुचविली आहे. एरवी ‘कटकी’ याचे संक्षिप्त रूप ‘कटे’ हे मानावे लागेल.] (कटकी) न करावी : हिनबळें [बळीया*]सी विरोधु न करावा : जो बळीयासिं हिनबळु वीरोधु करि तो पतंगाचियापरि नाशे : म्हणौनि समृधिकामें पुरुशें समर्थेसी : मनेंहि विरोधु इछावा ना : तरि तयावरि कटकी [येथे ‘कटकी’ असा शब्द अभिप्रेत असावा. कंसात ‘कटकी’ अशी दुरुस्ती सुचविली आहे. एरवी ‘कटकी’ याचे संक्षिप्त रूप ‘कटे’ हे मानावे लागेल. न करावी : ऐणेंसी सीष्टाइ करूं : तया समर्था अनुगता होउनी वर्त्तावें [अनुसरणारे सेवक होऊन राहावे. ‘अनुगता’—तृतीया. विभक्ती **ता** वर अनुस्वार पाहिजे. मुळात तो चुकून गळाला असावा.] ॥ उक्तं च ॥

बलवन्तं रिपुं दृष्ट्वा सर्वस्वमपि बुद्धिमान् ।
दत्त्वा हि रक्षयेत्प्राणान्रक्षितैस्तैर्धनं पुनः ॥ ४७ ॥

बळवंतु रिपु देखौनि सर्वस्व देउनी बुधीवंतें आपुले प्राण रक्षावे : प्राण रक्षिले तरि मागुतें धन होईल :” ऐसें मी सीकवीत होतां : मातें म्हणे : “हा तयातें मीळाला आसे : तयाचा पक्षपातु बोलतु आसे :” म्हणौनि परिवारादेखतां मातें विनिभ्रंसौनि ऐसी दशेतें पाववीलें : तरि अरिमर्दना [**मू.** अरिम**द**ना.] राया : म्यां तुझे चरण देखीले : मी तुझा शरणांगतु : आतां जाणसी तें करी [तुला वाटेल ते कर.] : मी स्वभावता जीवशेश उरला आसें : तुझेनि हातें मज नीधानता होये [हा शब्द ‘निधानं’=ऐश्वर्य, उत्कर्ष, यापासून व्युत्पादावा. निधानता=उत्कर्ष. तुझ्या हातून जर माझा उत्कर्ष होईल; आता माझा केवळ प्राण तेवढा शिल्लक राहिला आहे; पण तुझ्याकडून जर माझा उत्कर्ष होईल, माझा प्राण वाचेल व मी वाढेन, बरा होऊन शरीरसंपन्न होईन तर उत्तम.] तरि बरवें : आतां बहुत काय बोलौं : मज नांवंयेक बळीया होउं दें : मग मी पुढे होउनी आवघेया काउळेयांतें मारवीन : तरि म्हणावें माझें घरि पाईकु आसे :”

ऐसें आईकौनि अरिमर्दनें आपुलें चौघी प्रधान हंकारिले : येकु रक्ताक्षु : क्रुराक्षु : दिप्ताक्षु : वक्रनासु [हा शब्द पोथीत सर्व ठिकाणी ‘वक्रना**श**’ असा लिहिला आहे.] : ऐसें चौघी प्रधान बोलावौनि : प्रथम रक्ताक्षातें पुसौं लागला : “आगा ये रक्ताक्षा : हा वैरीयाचा मीत्रु सांपुडला आसे : क्रुपा काकुळति शरणांगतु म्हणतु आसे : तरि यासी [**मू. आ**सी.] काये कीजे तें सांग :” तवं तो म्हणे : “जी देवा : हा तयाचा पुर्वापरिचा जुना मंत्री : चांगु वीस्वसकु : कवणें गुणें मेघवर्णु [मूळ संस्कृत कथेत रक्ताक्षाने

सल्ला दिला तो चिरजीवीला ठार मारण्याचा. आपल्या पंचोपाख्यानात मात्र तसे नाही. याला आपल्याजवळ न ठेवता मेघवर्णाकडे परत पाठवावे व त्याच्या मार्फत त्याच्याशी शिष्टाई करावी, असा त्याच्या सल्ल्याचा भावार्थ आहे.]

यावरि कोपला : नीस्तेजीला आसे : तुमचा हातिं सांपुडला आसे : तरि माझें मत ऐसें : जें आश्रयो दिधला नीका नव्हे : कां जें : यातें राखावें : मग याचेनि तया मेघवर्णाचें वर्म कर्म ठाउक पडे : मग तयासि विग्रहो किजे : तरि विग्रहो काय वरवा? ॥ उक्तं च ॥

कोशक्षयो न निद्रा च न विलासेषु च स्पृहा ।
विग्रहासक्ताचित्तानां न रतिः कापि जायते ॥ ४८ ॥

विग्रहासक्त जो पुरूष : तयासी कोनीकडे बरवें नाही : तरि राजया ऐसें कीजे : यातें मेघवर्णापासि पाठवीजे : याचेन द्वारें त्यासि सीष्टाई कीजे : इतुकेनी आपण सुखें असीजे ॥ उक्तं च ॥

सामसिद्धानि कार्याणि विकृतिं यान्ति न क्वचित् ।
सज्जनानां मनांसीव भवन्ति प्रमुदे सदा ॥ ४९ ॥

जें सीष्टाई [**मू**. सी**स**ष्टाई.] करौनि [शिष्टाईने.] कार्ये केलें । तें कहिंच विक्रुतीतें [**म**. विक्रु**त्ती**तें.] न पावें : जैसीं संत जनाचीं मनें : सुखाचीं कारणें होतीं : म्हणौनि सिष्टाइ करौ[नि*] काय कार्ये नव्हे? ॥ उक्तं च ॥

शत्रोरुच्छादनार्थाय न साम्नोस्त्यन्यदौषधम् ।
हेमन्ते हिमपातेन किं न दह्यति पद्मिनी ॥ ५० ॥

शत्रुसी उछेदु करावया कारणें : सीष्टाई येव्हडें वोखद नाहि : बरवें सुसीतळें शब्दें वैरी वस्य किजे : जैसें हेमं[त*] ऋतौचां ठाईं [मूळ 'हेम क्रतौचां'. 'ऋ' या स्वरासाठी अक्षरसाम्यामुळे 'क्र' लिहिले गेले. 'हेम' या शब्दाच्या ठिकाणी, संस्कृत श्लोकातील शब्दयोजनेवरून पाहता 'हेमंत' हाच शब्द अभिप्रेत असला पाहिजे. त्याप्रमाणे संहितेत दुरुस्ती केलेली आहे. हेमंत ऋतूत, थंड बर्फाच्या वर्षावाने 'पद्मनी=कमलिनी (सूर्यकमळ) काय जळति नाही?'. जळते, कोमेजून जाऊन नष्ट होते, हा भावार्थ. त्याप्रमाणे 'सुशीतलें शब्दें' (थंड शब्दांनी, सामोपचाराच्या गोड शब्दांनी) 'वैरी वस्य' (वश) होतो व मग त्याचा 'उछेद' (नाश होतो) हा भावार्थ.] हिमपातकरौनि काय पद्मि[नी] जळति नाहि? तरि माझें वचन मानसी तरि सीष्टाई कीजे : सेष्टाईवांचौनि वैरी वस्य नोहति :"

ऐसें रक्ताक्षाचें वचन आईकौनी अरिमर्दनु क्रुराक्षा प्रधानातें पुसता जाला :

अनुक्रमणिका

“अगा ये क्रुराक्षा [मू. कुराक्षा.] : ऐसीयासी [मू. ऐसीयासी.] काये प्रकारु : तो सांधैं” ॥ उक्तं च ॥

चतुर्थोपायसाध्ये तु शत्रौ शीतिरपक्रिया ।
स्वेद्यमानं ज्वरं प्राज्ञः कोऽम्भसा परिषिञ्चति ॥ ५१ ॥

मग कृराक्षु [म. कृताक्ष.] म्हणे : “जी देवा : माझें मत ऐसें : जरि शत्रु फेडावयाची चाड : तरि तयासी वीग्रो कीजे : विग्रहो करुनी वैरी वस्य कीजे : शत्रुसी भेद उपजवीजे : वीग्रहें कायें होये ॥ उक्तं च ॥

भेद्यं परबलं ज्ञात्वा दुर्भेद्यमपि यत्नतः ।
यतः सुखेन भज्येत घुणभिन्नं सुदारुवत् ॥ ५२ ॥

॥ तथा चं ॥

अपि वीर्योत्कटः शत्रुर्यतो भेदेन सिध्यति ।
तस्माद्भेदः प्रयोक्तव्यः शत्रूणां विजिगीषुणा ॥ ५३ ॥

परबळातें दुर्भेद ऐसें जाणौनि : भेदेंकरौनि भेदीजे : जैसें रामें बिभिशणातें भेद उपजुनी [भेद उपजवन, निर्माण करून. (प्रयोजक अर्थाने रूप वापरले आहे).] रावणातें भेदीलें ॥ उक्तं च ॥

असाध्यं शत्रुमालोक्य दायादं च विभेदयेत् ।
राज्यकामं समर्थं च यथा रामो बिभीषणम् ॥ ५४ ॥

शत्रु असाध्य ऐसें जाणौनि : त्याचें गोत्रजेंकरौनि [गोत्रजांनी, नातेवाईकांकडून.] भेदीजे : जैसें राजकाम [या वाक्यात वस्तुतः ‘जऱ्ही’ या शब्दाची आवश्यकता नाही. आहे तसे वाक्य घेऊन पुढीलप्रमाणे अर्थ करावा लागतो. ‘**जऱ्ही बिभीसणु समर्थु**’ होता, (परंतु) ‘**राजकाम** — आपल्याला राज्य मिळावे अशी इच्छा त्याच्या मनात होती.] समर्थु जऱ्ही बिभीसणु : तयाचेंनि द्वारें : रावणाचें राज्य रामें भेदिलें :” तरि कुराक्षु [मू. क्रुताक्षु.] म्हणे : “राजेया अरिमर्दना [मू. अरिमरर्दना.] : हा चिरंजीवी [मू. चरंजीवी.] राखिलेयां : तयाचा भेद सांगील [मू. शांगील.] : मग ते वैरी साधावे :”

ऐसें तयाचें बोलणें आइकुनी : अरिमर्दनु दिप्ताक्षा प्रधानातें पुसता जाला : “अगा ये दिप्ताक्षा : ऐसीयासि काये प्रकार तो सांग :” मग दिप्ताक्षु सांगे : “राजया : साम आणि भेद : हे दोघी माझीया मना न येती : सामभेदेंकरौनि

शत्रु साधवें ना : तरी अरिमरदना राजया : शत्रु दानेंकरौनि वस्य कीजे : मग साधावें ॥ उक्तं च ॥

लोभाविष्टो नरो वित्तं वीक्षते न स चापदम् ।
दृग्धं पश्यति मार्जारो यतो न लकृटाहतिम् ॥ ५५ ॥

॥ तथा चं ॥

अपि स्यात् पितृहा वैरि सोपि दानेन मोहितः ।
गच्छन् विश्वासभावं च शत्रोरात्मानमाददे ॥ ५६ ॥

दुर्गस्था अपि बध्यंन्ते शत्रवो दानसंश्रयात् ।
स्वल्पमांसप्रदानेन कैवर्तैर्मत्स्यबन्धनम् ॥ ५७ ॥

लोभावीष्ट जो पुरुशु : तो वित(त्त)ची देखे : पण आपदा न देखे : जैसें मांजर दुग्धातेंचि देखे : पण लाकुटाहाती न देखे : दुर्गस्थहि [**मू.** दुर्ग**स्छ**हि.] वैरी दानेंकरौनि बांधीजे : जैसें मासप्रदानेंकरौनि : कैवर्तकीं मत्सादिक बांधीजे : तरि राजया : दानेंकरौनि शत्रु बांधीजे :”

ऐसें त्या दीप्ताक्षाचें बोलणें आईकौनी : अरिमर्दनु वक्रनासा प्रधानातें पुसता जाला : “अगा वक्रनासा : तुझें मत सांग कैसें” तो म्हणे : “देवा : यर आवघें बोलीलें तें वायो [व्यर्थ. ‘वाया’ या शब्दाचे रूप ‘वायो’ असे केलेले आहे. कदाचित, **वावो** शब्द अभिप्रेत असावा. ‘व्यर्थ’ या अर्थाने तो वापरला जात असे. उदा. : ‘तेथ म्हणे उद्धवदे[illegible]: जी हें अवघेंचि **वावो**’ (उगी. ५८).] : प्रतापें ब(बा)हुबळेंविन काहि कार्ये होत असें? साम दान आणी भेद : हे प्रकार इतुकेची [हेही प्रकार आहेत इतकेच, (पण त्यांना महत्त्व नाही). ते जितक्यास तितकेच आहेत.] : पण पौरुशत्ववांचौनि [‘पौरुष’ या भाववाचक नामाला पुन्हा भाववाचक ‘त्व’ प्रत्यय लावला आहे. ही पुनरुक्ति होय.] वैरी साधवें ना ॥ उक्तं च ॥

अकृत्वा पौरुषं या श्रीर्विकासिन्यपि किं तया ।
जरद्‌गवोऽपि चाश्नाति दैवादृपगतं तृणम् ॥ ५८ ॥

पौरुशत्वावांचौनि स्त्री मेळवीली त्या काये प्रयोजन? वृध बैलु दैवोपगतु त्रुणादिक काकहि भक्षि ना [दैवोपगत (अनायासे मिळालेले) त्रुणादिक (गवत वगैरे) वृध (वृद्ध, म्हातारा) **बैल** (आणि **काकही** (कावळासुद्धा) **भक्षि ना**? (खात नाही काय?) अर्थात्, खातात. वृद्ध बैलाप्रमाणे किंवा कावळ्याप्रमाणे जे पराक्रमहीन असतात त्यांनी अनायासे

अनुक्रमणिका

मिळालेले गवत खावे; पण पराक्रमी पुरुषांनी मात्र पराक्रम करून मिळवावे, हा भावार्थ.]? हें काये म्हणौनी? सामर्थ्यें युक्त [(योग्य, अनुरूप)] स्त्री [सामर्थ्ये मेळविजे.'] मेळवीजे : तेची

लक्ष्मी :" तरि वक्रनासु म्हणे : "राजया : युधावांचौनि वैरी वस्य नोहति [न होति=नोहति. पाहा : 'सेवंते हीयारी । नोहंति फुलें' (ज्ञाने. १६·१२५).] :

पराक्रमें वर्तिजे हें भले :"

ऐसें चौघि प्राधानां[नां*]चें बोलनें आईकौनि : आणीक येकु प्रकारुकर्णु [हे नाव सं. पंचतंत्रात 'प्राकारकर्ण' असे आहे.] उलकामध्यें श्रेष्ट : तयासि अरिमर्दनु राजा पुसता जाला : "आगा ये प्रकारकर्णा : तुझा कैसा अभीप्रावो तो सांघ :" तवं तो बोले : "हा संप्रधारू बहुत आसे : हा मंत्री सत्रुचा सांपुडला असे : हा तवं अवध्य : रणीं सांपुडलेयां वैरीतें [वैऱ्याला. सामान्यरूप न करता प्रत्यय लावला आहे.] राखीजे तरि केव्हडि कीर्ती उरे? आणिक विशेषें शरणागतु म्हणवीतु आसे : तरि यातें आपुलीया स्थाना [मू. स्छाना.] नेउनी : यासी सन्मानु कीजे : मग यातें [मू. आतें.] पुढें करुनि वैरी संहारावे ॥ उक्तं च ॥

मत्स्यो मत्स्यमुपादत्ते ज्ञातिर्ज्ञातिमसंशयम् ।
रावणोच्छित्तये रामो बिभीषणमयोजयत् ॥ ५९ ॥

मत्सातें पुढां करौनि मछ घेईजे : जैसें रावण जीकावया कारणें रामें बिभिशेणु योजीला : तैसा हा पुढां करौनि वैरी संहारावे : आणीक हा शरणांगतु : यासि वधुं न ये : वधीतां महापातक असें ॥ उक्तं च ॥

वदत्सुदैन्यं शरणागतेषु बहुप्रहारेषु भयेन युक्ताः ।
दयाविहीनाः प्रहरन्ति यत्र ते रौरवादीनि निषेवयन्ति ॥ ६० ॥

॥ तथा च ॥

महापापानि च हयगोब्राह्मणहतानि च ।
तस्यास्तानि भवन्त्येव यो हन्याच्छरणागतम् ॥ ६१ ॥

जे प्रुथ्वीमध्यें माहापातकें होतीं : ते पातकें शरणांगतातें वधीतां होती : तरि शरणांगतातें रक्षितां मोटें पुन्य आसें ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

दक्षिणादिसमृद्धस्य वाजिमेधस्य यत्फलम् ।
तत्फलं सः समाप्नोति यो रक्षेच्छरणागतम् ॥ ६२ ॥

दक्षण देशामध्यें [सं. श्लोक ६२ मधील ‘दक्षिणादिसमृद्धस्य’ (=दक्षिणा वगैरेंनी पूर्ण) याचे भाषांतर आपल्या लेखकाने ‘दक्षण देशामध्ये’ असे केले आहे. ते उघडउघड चुकीचे आहे.] अस्वमेध केलयां [पूर्वी पुत्रप्राप्तीच्या इच्छेने हा यज्ञ केला जात असे. नंतर दिग्विजयाचे द्योतक म्हणून तो करू लागले. घोडा मोकळा सोडायचा. त्याला सर्व देशांतून फिरवून आणायचे. जो त्याला धरील त्याला जिकायचे. अशा रीतीने दिग्विजय करून आलेल्या त्या अश्वाला यज्ञात ठार करीत. म्हणून त्याला ‘अश्वमेध’ यज्ञ म्हणतात, ‘अश्वः मेध्यते यस्मिन्’.] जें पुण्य घडे : तें पुंन्य सरणांगतांतें रक्षितां घडें :”

ऐसा प्रकारुकरणु बोलीला : मग अरिमर्दनु स्वयें बोलता जाला : म्हणे : “ऐसें मदर्थे तेणें यातें पराभवीलें : अवकळा केली : यातें सांडौनी गेला : ऐसा आम्हासी सांपुडला असे : आणी शरणागतु म्हणवीतु आसे : तरि यातें आपुलेयां दुर्ग-स्थाना [मू. स्छाना.] नेईजे : ऐसें केलेयां जरि हा वीकृती जाईल : ऐसें कहिं न घडे ॥ उक्तं च ॥

सत्कृताश्च कृतार्थाश्च कृतज्ञा न भवन्ति ये ।
मृतानामपि नो काकास्तेषां मांसानि भुञ्जते ॥ ६३ ॥

तयासि मान पुरुस्कार केले : जेववीलें : खावविलें [मू. **षा**वविलें.] : ऐसेंनही विस्वासघात करीती : तयाचें मास काकादिकही भक्षीती ना : पुढीलु [(समोरचा, स्नेही)] अवकारि [अवकाळी, संकट काळात,] कामा ये [(उपयोगी पडतो).] : अपतीपासौनि निस्तरवी : तें जरि नरु विसरे [मू. वि**श**रे.] : अथवा वीकृतीतें जाये : तया आगळा [‘तया आगळा (त्याशिवाय, त्याहून) आणीकु दोसु नाही,’ अर्थात्, त्याचे असे करणे हाच मोठा दोष होय.] आणीकु दोसु नाहि : तयाचें देहे गेलयां : काकस्वानादीक आदिकरौनी [‘आदिक शब्द आधी योजल्यावर पुन्हा ‘आदिकरौनि असे म्हणण्याची गरज नव्हती. ही निष्कारण पुनरुक्ती होय.] नातळे : ऐसा तो पापिया : जो वीस्वासलयां घात करि ॥ उक्तं च ॥

ब्रह्मघ्ने च सुरापे च चौरे भग्नव्रते तथा ।
निष्कृतिर्विहिता सद्भिः कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥ ६४ ॥

तरि हा विकृती कहिं न वचे :”

तें आईकौनी वक्रनासु म्हणे : “देवा : तुं बोललासी तें अयुक्त : हा चीरंजीवी [मू. **च**रंजीवी.] सत्रुचा मीत्रु : कवण जाने कवणें स्वरूपें आला असे? तरि यातें आपुलें दुर्ग-

स्थाना [मू. स्छाना.] नेईजे : यातें दुर्ग दाखवीजे हें उचीत नव्हें : हें करणें नितीबाह्य [मुळांत 'नितीबाहा' असे लिहिले गेले आहे.] [निः*]संदेहे ॥ उक्तं च ॥

अज्ञाताः पुरुषा यस्य प्रविशन्ति महीपतेः ।
दुर्गं तस्य न संदेहः प्रविशन्ति द्रुतं द्विषः ॥ ६५ ॥

अज्ञानास्तव जया सत्रुचे हेर दुर्गामध्यें प्रवेसती : तेथें वैरी प्रवेशले ऐसें जाणावें :" हें आईकौनि अरिमर्दनु म्हणे : "हें काइ गा म्हणतोसी? येणें दुर्गस्थान [मू. 'दुर्गछान'.] देखीलें : ईतुकेनि काये? शुर जे आसती तयातें दुर्ग म्हणीजे काये? जयासि आपुले भुजेचें दुर्ग [बाहू हाच किल्ला. बाहूंनी केलेला पराक्रम हाच किल्ला. तो कोणाच्यानेही जात नाही.] : तें कवणास्तव न वचेचि [नष्ट होऊ शकत नाही.] ॥ उक्तं च ॥

यस्य स्यात्सहजं वीर्यं हन्यते शत्रुनारिभिः ।
मणिदीपस्य नो बाह्यं वायुर्बाधयते शिखाम् ॥ ६६ ॥

जयाचा सौर्येप्रतापु सहजें : ऐसा जो बळीया प्रतापवंतु : तयासी वैरी काये करूं सकती? जैसा वायो दीपातेंचि नासी : परि रत्नाचि जे केवळ जोती [(रत्नाचा प्रकाश) हा काय] : ते काये वायोस्तव [वाऱ्याने, वाऱ्यामुळे] नीवारीत असे? [निवारला जातो? नाहीसा होतो? अर्थात्, नाही.] आणि दुर्ग म्हणीजे काये? जान्हार जेधवां असैल तेधवां आपसेंचि जाईल ॥ उक्तं च ॥

दुर्गं त्रिकूटं परिखा समुद्रो रक्षांसि योधा धनदश्च वित्तम् ।
संजीवनी यस्य मुखाग्रविद्या स रावणो दैववशाद्विपन्नः ॥ ६७ ॥

लंकेसारीखें दुर्ग : भवता समुद्रासारीखा [मू. समुद्रा**सीखा**.] अगडु : राक्षेसाआंत इंद्रोजी[त*] [मू. इड्रोजी. (सकळ संकेत ड = द).] कुंभकर्णासारिखे जुझार : धनदासारिखा भंडारि : शुक्रासारिखा मंत्री ['जयाचे हृदईं अमृतसंजीवनी' (अमर करणारी संजीवनी) विद्या, (असा) शुक्रासारिखा मंत्री' असा अन्वय.] : जयाचे हृदईं अमृतसंजीवनी विद्या : तया रावणांसी मोटका संकेतु पुरुला [या दोन्ही वाक्यात 'मोटका' शब्द नेटका, नुकताच, या अर्थाने वापरला आहे. ती क्रिया होते न होते तोच, नुकतीच झाली तत्क्षणी, असा त्याचा अर्थ आहे. '**मोटकी** देहाकृति उमटे । आणि उन्मेखा पाहाट फूटे । सूर्यापुढे प्रकटे । प्रकाशु जैसा' (ज्ञाने. ६·४५०); '**मोटकें** गुरुमुखिं उदैजत दीसे । आणि हृदयीं स्वयंभचि असे जैसें । प्रत्यक्ष फावों लागे तैसें । आपसेया' (ज्ञाने. ९·४९); '**मोटका** मनोर्थ बाणे : आणि देवा आतां होसि म्हणे ' (ज्ञाप्र. ३३१) या ओव्यांतील **मोटका** या शब्दाचा उपयोग पाहा. तोच अर्थ या ठिकाणी आहे.] : ईतुकेन वेळु न लगतां राज गेलें : मग नाथीलें निमीत्यें ठेवीती : 'अमुकाचेनि संगें अमुकें जालें :' हें आवघें लटीकें : इस्वरु सानकुळ [मू. शानकुळ.] होये : तेधवां वीप्रित तें सुप्रीत

होये : पुन्यसंचयो मोटका सरे [या दोन्ही वाक्यात ‘मोटका’ शब्द नेटका, नुकताच, या अर्थाने वापरला आहे. ती क्रिया होते न होते तोच, नुकतीच झाली तत्क्षणी, असा त्याचा अर्थ आहे. ‘**मोटकी** देहाकृति उमटे । आणि उन्मेखा पाहाट फूटे । सूर्यापुढे प्रकटे । प्रकाशु जैसा’ (ज्ञाने. ६·४५०); ‘**मोटकें** गुरुमुखिं उदैजत दीसे । आणि हृदयीं स्वयंभचि असे जैसें । प्रत्यक्ष फावों लागे तैसें । आपसेया’ (ज्ञाने. ९·४९); ‘**मोटका** मनोर्थ बाणे : आणि देवा आतां होसि म्हणे ’ (ज्ञाप्र. ३३१) या ओव्यांतील **मोटका** या शब्दाचा उपयोग पाहा. तोच अर्थ या ठिकाणी आहे.] : ईतुकेनि विलया जातां वेळु न लगे : तरि चाला जाउं आतां दुर्गासी :” मग चीरंजीवी चालवीला : तयासि अस्वासन दिधलें : “तुवां [म. तवां.] कांहि बीहावें ना : म्यां तुतें राखिलें : ऐसें जाण : मग तुझी जाति ठाके ऐसें करीजेसु [तुझ्या जातीला (कावळ्यांच्या जातीला) ठाके (ठीक दिसेल, शोभेल ते तू खुशाल) करिजेसु (कर). तुझ्या जातीप्रमाणे वागलास तरी हरकत नाही. मी तुला पूर्ण मोकळीक दिली आहे.] :” मग चीरंजीवी म्हणे : “हें काय जी देवें ऐसें बोलीलें : जें ‘जाती ठाके तें करि :’ तरि जेधवां मि राहाटैन तेधवां सहजें माझा प्रत्यो [सं. प्रत्यय, अनुभव, विश्वास. पाहा : ‘म्हणौनि इयें विखिंचा मज देवा । **प्रत्यो** घडला माझेया जीवा (ज्ञाने. ११७७); ‘परि हें आंगीं प्रतिपदीं : लागों नेदिजे ब्रह्मविदीं : कां जें तयां भक्तिवादीं : **प्रत्यो** आति’ (ज्ञाप्र. ६००).] तुम्हासी होइल : तरि मी जैसी सेवा अवघेयाची करैन : तरि पाठीं जाणावें :” ऐसें चीरंजीवी बोलीला : मग अरिमर्दनु उलुकराजु : तयातें आपुलीया स्थाना [मू. स्छाना.] घेउनी गेला :

हें आईकौनि वक्रनासु बोलता जाला : “राया : आवघेया उलकाचा क्षयो आला : ऐसें जाणावें : जें येणें अरीमर्दनें नीतिबाह्य केलें : वैरीयासि दुर्ग दाखवीलें : जरि राजा आपणची दोसु आचरे : तरि कवणांसि सांगीजे?

॥ उक्तं च ॥

दोषमात्तो जनः कृत्स्नं पार्थिवाय निवेदयेत् ।
यदा स्याद्दोषवान्भूपस्तदा कस्तं निषेधयेत् ॥ ६८ ॥

सामान्य जनु जरि एकाधा अंन्यावो करि तरि रायासी सांघावें : मग राजा त्यातें नेमी : आणी राजा स्वयें अंन्यावो करि तरि कवणातें सांघावें?” ऐसें वक्रनासु बोलीला : तें अरिमर्दनु नाईकेचि :

त्यानंतरें चीरंजीवी तेथें सुखें असौं लागला : त्या उलकाची चर्या अवधी देखीली : मग मनीं म्हणता जाला : “आतां वैरी मज साधले ऐसें जाणावें :” ऐसा चीरंजीवी तेथें असतां : तयासि रावो आपणेयापासी बैसवी : तयासि अव्हन [आवाहन. अतिथी आला म्हणजे त्यांचे आगतस्वागत करण्याचा प्रकार.] वीसर्जन [पाहुणा जातांना त्याची आदरपूर्वक केलेली बोळवण.] : मानसत्कारु : येकवट अ (आ)सनें [एकत्रित असणे, किंवा एका आसनावर असणे.] : सहपांति भोजन करणें : ऐसीयापरि असौं लागला :

अनुक्रमणिका

तें देखौनि उलुक म्हणती : “यासि केउता सन्मानु? हा वैरीयांचा मंत्री : राजा आपणेंयापासौनि परता जाउं नेंदी : हें उचित नव्हें :” ऐसें तयाचें बोलनें च(चि)रंजीवी आईकौनि : वीचारिता जाला : “म्यां तवं यासि अवस्य वधु करणें : तरि मी याआंतु असौनि काय कार्य? तरि द्वारपाळ होउनी राहों : मग तेथौनी वीचारितां जें मनीं येईल तेंचि करणें :” ऐसें विचारौनि एके [मू. **ऐके**.] दीवसीं : अरिमर्दना रायातें विनवीले : म्हणे : “स्वामीचें यकासने हें अयुक्त : तरि मी तुझा द्वारपाळ होउनी राहिन : आनीक तुझे मंत्री प्रधान आसती : तयातेंहि न साहें : तरि तुम्हांआंतु आंतु असावें : तरि द्वारपाळ होउनि तुमची सेवा जाणवीन [सेवा करणे; सेवा रुजू करणे. **जाणवणे** या क्रियापदाचा पुढील उपयोग पाहा : ‘तवं ठिकलगा सिंहासनावरी : बैसला राओ मुरारी : **वरि जाणविताए चवरी** : चतुराननू’ (शिशु. ५४); ‘क्षिरोदका पासवडेयावरि : पहुडत असे रा[illegible] मुरारी : **विजणे जाणवीति** विद्याधरि : दास्य करिताति’ (वछा. ३१०); ‘जयाचेनि फीटे भवाचा श्रमु : तो चक्रेश जीवविश्रामु : **जाणविला** तिए **प्रणामु** : कमळांबिके’ (सव. १८). यातील, चवरी जाणवणे (ढाळणे), विजणे जाणवणे (पंख्याने वारा घालणे), प्रणाम जाणवणे (प्रणाम करणे) इत्यादीवरून **जाणवणे** = सेवा अर्पण करणे, रुजू करणे, असाच अर्थ घेणे योग्य होईल.] :”

तवं अरिमर्दनें म्हनतीलें : “बरवें :” मग चीरंजीवी द्वारपाळ होउनि राहिला : मास भक्षीतां मोटा जाला : पांख नीगाले :

ऐसें देखौनि वक्रनासु मंत्री राजा अरिमर्दनाप्रती बोलता जाला : म्हणे : “राया या [मू. **आ**.] उलकाचा अंतु आला : जरि तुवां वैरी हा राखीला : तरि तुज वेळुवांची परि [वेलाची गती. मुळात ‘वेळु’ असा शब्द आहे. पुढे पान १०१, ओळ ३ मध्येही तोच आलेला आहे. पण कथेवरून तो ‘वेळु’ होता असे दिसत नाही. पान १२३ वर ‘तो वेलु न तोडेचि’ असे वाक्य आहे. त्यातील ‘वेलु’ हाच शब्द योग्य आहे.] होईल” ॥ उक्तं च ॥

अहं प्रथमतो मूर्खः द्वितीयो लुब्धकस्तथा ।
तृतीयो राजन् त्वं मूर्खश्चतुर्थं मन्त्रिमण्डलम् ॥ ६९ ॥

ते कथा अरिमर्दनु पुसे : वक्रनासु सांगे :

कथा ५*
विष्टीने कुष्ट नष्ट करणारा पक्षी

[संस्कृतमधील फक्त हर्टेल प्रतीत व मराठी **भा** प्रतीत व निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानात ही कथा आलेली आहे.]

“कोन्ही येका आरंण्यामध्यें येकु सरळ वृक्ष गगनचुंबीत आसे : तेथें येकु पक्षिया [आ*]पुलेया शतपुत्रासहित आसे : तवं त्या वृक्षाचां बुडीं डीरू एकु नीगाला : तें देखौनि पितेनि पुत्रातें म्हणतीले : “हा डीरू चांचु हाणौनि मोडावा :” ते न मोडतीची : तवं तो वेलु निबर होउनी व्रक्षावरि गेला : मग तो चांचुवरि [चोचीने. **वरि** याचे जुने रूप **वेन्ही**. या अव्ययाचा तृतीयेच्या प्रत्ययाप्रमाणे उपयोग होत असे. उदा.

अनुक्रमणिका

'बनकरांचीया आंडोरी : रत्नांचे हातगुंडे**वेन्ही** : सोंकरताति तुरंबीयावरी : पुंसेयातें' (शिशु. २५५); 'कां टिटिभु **चांचुवेन्ही** । माप सुये सागरीं' (ज्ञाने. १६८). 'वेन्ही'चेच रूपांतर 'वेरी' होय. **वरि** हे 'वेरी'चेच रूप होय. पाहा : 'येन्हवीं चामाचे डोळे**वरि** । जे देखती देहचि **वरी**' (ज्ञाने. मा. १८·४३७).] तोडौं गेला : तवं तो न तुटेची : मग म्हणे : "पक्षीया : वेळुवाची या उटणि जाली [तो पक्षीया म्हणे : या वेळुवाची **उटणि** (वर चढण्याला उतरण्याला **आधार** झाला, पायरी) झाली. **हा वैरि** (हा वेल आमचा शत्रू आहे)] : हा वैरि : यासी [(या पक्ष्यांना)] काळ होइल [(काळ=यम, मृत्यु, संकटात टाकणारा होईल). 'लीळाचरित्रात' 'पाउटणी (=पायरी) हा शब्द आढळतो. पाहा. '**पाउटणियां** दोनि वेघतां पोटीं धाप न माए' (लीचपू. ३४१). सं. पाद+स्थान>म. पावटण. 'उटणी' हे पाउटणीचेच रूप होय.] :" तवं येके दीवसिं : पारधीयें वरि वेंघौनी आवीसालागी जाळ मांडलें : आपुन घरासी गेला : पक्षि येउनि जवं खोपें बैसती : तवं फांसां पडले : मग वीचारूं लागले : "कैसी बुधि कीजे?" तवं पिता म्हणे : "मज येकी बुधी आठवीली : तुम्ही सतभरि [सं. शतं=१००+भर=समूह. शंभराचा समूह. सं. शतं > सत > सें+भर = सेंभर, शंभर, अशा रीतीने आजचा शंभर शब्द तयार झाला असावा. त्याचे हे पूर्वरूप होय.] असा : तरि पारधी जेधवां येईल : तेधवां तुम्ही नीर्जीव होउनी राहावें : 'पांखरूवें मेलीं' म्हणौनी हडुती [खाली. पाहा : 'आणि सारंगपडितीं **हडुती** मान घातली' (गोप्रच. २७५); '**हडौती**' असेही रूप आढळते. पाहा : 'मग कंठनाळ आटे । हणौटी हडौती दाटे । ते गाढी होउनि निहटे । वक्षस्थळीं' (ज्ञाने. ६·२०७).] टाकुनी देईल : पहिलें जयातें टाकैल : तेनें आवघें लेखौनी [**मू.** लषौनि.] : मग एके [**मू.** ऐके.] वेळें उडौनि जावें :" ऐसी बुधी पीतेनी सांगीतली : तवं पारधी येतु देखीला : तवं आवघीयें पक्षीयें निचेतन जालीं : पारधी म्हणे : "पक्षीयें धाकें मेलीं :" म्हणौनि खाली टाकुं लागला : पहिलें टाकिलें : तेणें आवघें लेखीलें : शतभर भरलें : पिता टाकावा तव त्याचि [(=त्या पारध्याची, त्याच्या हातातील).] कुऱ्हाडि पडली : पक्षि म्हणति : 'पीता टाकीला :' म्हणौनि येकें वेळें उडौनि गेले : जाळमध्यें वृधु तयाचा पीता सांपुडला : तो पारधीयें धरुनि घरासी आनीला शस्त्र घेउनी पक्षि मारौं लागला : तवं त्यासि वाचा जाली : म्हणे : "मातें कां मारू पाहातोसी? माझी विष्टीकरौनि [विष्ठेने, विष्ठेमुळे.] कुष्टी जात आसे :" मग तो पक्षिया पांजरां घालौनि राखिला : त्याचिये विष्टीकरौनि रोगीये उपचारू लागलीं [रोगी उपचार करून घेऊ लागले, त्या औषधीचा उपयोग करू लागले व बरे झाले. उपचारणे : उपचाराने बरे होणे, निरोगी होणे. या अर्थाने हे क्रियापद वापरले आहे.] : ते वार्ता राजेनी आईकीली : पारधीसी [पारध्याला. प्रत्ययापूर्वी सामान्यरूप केलेले नाही.] बोलाउनी पुसीलें : "तुं कुष्टीयातें बरवें करतोसी : तरि तें वोखद कैसें? सांगावें :" तो म्हणे : "राजया : आमतें एकु [**मू.** ऐकु.] पक्षीया आसे : त्याचिय वीष्टीकरौनि कुष्टी जात असे :" राजा म्हणे : "तो पक्षीया पाहावया आणी :" मग तो पक्षी पारधी घेउनी गेला : मग राजेनी त्यासी धन देउनी पक्षीया घेतला : पांजरां पक्षीया असौं लागला : येके दिवसीं पक्षीया रायातें म्हणे : "मातें बंधनीं कां घातलें? माझें भाग्य थोर : जें मी रायाचें येथें पडलौं : परि बंधनावेगळा नव्हेंचि :" या बोला राजा चीत्रसेना प्रधानातें पुसे : "हा पक्षिया सोडिजे परि जाईल :" मग प्रधानु म्हणे : "ऐसा ठावो सांडौनि काये जाईल?" मग तो पक्षीया राजेनि सोडिला :

तो रायाचें मांडियवरि बैसला : ऐसा प्रत्यहिं बैसे : ऐसा राजा वीस्वासला : ऐसा एके दीवसीं उडौनि रानीं [मू. 'उडौनि रानी उडौ झाडि वीडी बैसला' असे आहे. यातील 'उडौ' ही अक्षरे चुकून जास्तीची लिहिली गेली आहेत. 'वीडी' या अक्षरावर ती रद्द केल्याची खूण केलेली आहे.] झाडीं बैसला : मग राजा तयातें बोलावी [मू. बालावी.] : पण तो न येचि : मग पक्षीया म्हणे : "राजा : जोहारू : मज आज्ञा होये :" तवं राजा म्हणे : "तुवां मातें वीस्वासवीलें :" मग पक्षीया म्हणे : "राया : तो आंकुरू उपजतांचि जरि मी तोडीतां : तरि मिं आपया कां पडतों? [मी आपया (या संकटात) का पडतों? **आपया**=अपायां, (संकटात).]
॥ उक्तं च ॥

अहं प्रथमतो मूर्खः द्वितीयो लुब्धकस्तथा ।
तृतीयो राजन् त्वं मूर्खश्चतुर्थं मन्त्रिमण्डलम् ॥ ७० ॥

राया : प्रथम मी [मु*]र्ख : तो वेलु न तोडेंचि : दुसरा पार्धी मुर्ख : मातें तुजपुढां सांगीतलें : तिसरा राजा तुं मुर्ख : माझीया बोला वीस्वसलासी : चौथा तुझा प्रधानु मुर्ख : जे तुतें वर्जीचि ना [ज्याने तुला निवारण केले नाही. **वर्जणे** : वारणे, निवारण करणे.] :"

ऐसी कथा वक्रनासें प्रधानें सांगीतली : मग म्हणे : "राया हा च(ची)रंजीवी दुष्ट : याचा आश्रयो [मू. **या**श्रयो.] नीका नव्हे : नीचाचा आश्रयो न कीजे" ॥ उक्तं च ॥

नीचाश्रयो न कर्तव्यः कर्तव्यो महदाश्रयो ।
अजा सिंहप्रसादेन आरुढा गजमस्तके ॥ ७१ ॥

ये कथा अरिमर्दनु पुसे : वक्रनासु सांगे :

कथा ६*
सिंहाची मावशी शेळी

"कोन्हि येक नदिसी माहापुर ['महापुर **जातो** आसे' — 'जातो' ऐवजी 'जात' असे रूप असावे.] जातो आसे : तवं तेथें सेळी येकी आली : तीचावस्तु उतरवें ना : मग मनीं वीचारीती जाली : म्हणे : "कैसी बुध्दि कीजे?" तवं तेथें हस्ती येकु देखीला : मग हस्तिपासी गेली : हस्ती म्हणे : "तुं कोण?" ते म्हणे : "मी सीहाची मावोसी : मज पैली थडी खांदावरी बैसौनि उतारि :" मग तेनें भयास्तव : सीहाची माउसी म्हणौनि

अनुक्रमणिका

उतारीली :”

“या कारणास्तव अरीमद(र्द)ना : मोटाचा [मोठ्याचा, श्रेष्ठ व्यक्तीचा.] आश्रयो [मू. याश्रयो.] किजे : पण नीचाचा आश्रयो [मू. याश्रयो.] न कीजे : तरि हा चीरंजीवी तुवां राखीला : याची संगस्तीस्तव तुं सपरिवारि मारवीसी [मारविला जाशील. द्वितीयपुरुषी कर्मणी रूप.] :” हा बोलु आइकुनी आवघे उलुक हांसीनले : म्हणती : “या रंकाचेनि काये होववैल?” ते आवघे मरन्हार : तरि वक्रनासाचें बोलनें ना आई[क*]तीच : तरि प्राणीयासि दैवासारिखी [मू. **शा**रिखी.] बुधी उपजे ॥ उक्तं च ॥

रामो हेममृगं न वेत्ति नहुषो नो यान्युनक्ति द्विजान्
विप्रादेव सवत्सधेनुहरणे जाता मतिश्चार्जुने ।

द्यूते भ्रातृचतुष्टयस्वमहिषीं धर्मात्मजो दत्तवान्
प्रायः सत्पुरुषो विनाशसमये बुध्द्या परित्यज्यते ॥ ७२ ॥

“आतां” वक्रनासु म्हणे : “इय स्थानीं [मू. ‘छांनी’ **स्छा** ऐवजी चुकीने केवळ **छां** लिहिले गेले असावे.] राहातां न पुरे :” मग तेनें आपुले इष्टमीत्र : बंधु पुत्र सोइरे उलुक बोलावौनी : तयासी वक्रनासु म्हणे : “आरे सुहृदहो : आतां ये स्थानीं [मू. **स्छा**नीं.] नास उपजला : हा चीरंजीवी समस्ता उलुकातें मारैल : चाला आम्ही तुम्ही आनीक स्थानीं [मू. **स्छा**नीं.] जाउं ॥ उक्तं च ॥

अनागतं यः कुरुते स शोभते स शोच्यते यो न करोत्यनागतम् ।
वनेऽपि संस्थस्य समागता जरा बिलस्य वाचा न कदापि हि श्रुता ॥ ७३ ॥

जवं [सं. श्लोक ७३ याचे भाषांतर किंवा भावार्थ, मराठीत काहीच दिला नाही. ‘**जवं** दुःख प्राप्त होये तवं पहिलेची’—जेव्हा दुःख प्राप्त होते तेव्हा—त्या अगोदर (पहिलेचि); दुःख प्राप्त होण्यापूर्वीच, त्या दुःखाची जो ‘सूचना करी’—असे दुःख येणार आहे, त्यावर सूचना—उपाययोजना करतो तो शोभून दिसतो, त्याला शोभा (तेज) प्राप्त होते. सर्व लोकात तो प्रकाशतो, त्याची कीर्ती होते.] दुःख प्राप्त होये : तवं पहिलेची सुचना [उपाय योजना, उपाय. निर्मळ पाठकानेही या ठिकाणी हाच शब्द वापरला आहे. पाहा : ‘जयापरी एके जंबुकेनी । आपुले बीळद्वारीं येउनी । पुर्व**सुचना**ही करूनी । आत्ममरणा चुकविलें’ । (तंत्र ३·३७४); ‘तयापरी जी **सुचना** । मी करीतसें सर्वजणा । हे समस्ती याहो मना । विवेकदृष्टी येउं द्या’ (तंत्र ३·३९४).] करी : तो शोभातें [सामान्यरूप न करता प्रत्यय लावला आहे.] पावे : म्हणीजे तयासी दुख पराभवी ना : आणी जो दुख आलयां जाणौनि : तयासि नाशावया प्रतीकारू न करि तो सोकातें पावे : जयापरि कोल्हेनी येके बीलद्वारीं सुचना केली : म्हणौनि सीहापासाव मरण चुकला :” तवं ते सुहृद पुसती :

अनुक्रमणिका

“तो वृत्तांतु कैसा सांघ :” मग वक्रनासु सांगता जाला :

कथा ७*
सिंह आणि ‘अहोबिल’ कोल्हा

“कोन्ही येक वनप्रदेसीं खरनखर [मू. खरनर. सिंहाचे नाव ‘खरनखर’ असे सर्व सं. प्रतीत आहे. आपल्या प्रतीत ते चुकून ‘खरनर’ असे लिहिले गेले होते. दुरुस्त करून घेतले आहे.] नावं सींहु होता : तो तीय वनीं असतां : दीस च्यारि आहारू न मीळेची : क्षुधाक्रांत होउनी : इकडे तीकडे भ्रमण करीता : तवं अस्तमान जालें : मग येक विवरस्थळ [मू. विवरस्छुळ.] देखीलें : तेथें भीत-भीत [मू. भीतरिभत. **रि** या अक्षरावर ते रद्द केल्याचे चिन्ह आहे. दुसऱ्या **भी** च्या ऐवजी अनवधानाने केवळ **भ** हे अक्षर लिहिले गेले.] रीगौनि [मू. **रो**गौनि.] राहीला : मग चींतुं लागला : मग म्हणे “हें विवर येकाधा [एखा**द्या**. सामान्यरूप न करता शब्द लिहिला आहे.] स्वापदाचें होईल : तरी रात्रीं आश्रमु टाकौनि यईल [स्वापदाचे **होईल**’ = **आश्रमु टाकौनि येईल** : [आपला आश्रम (आश्रयस्थान) टाकौनि येईल=प्राप्त करून घेऊन येईल; येथे येईल. **टाकून येणे** : **टाकौनि आला**—असे पुढे पुन्हा आले आहे.] : तयाचा आहारू मज होईल :” ऐसें म्हणौनि तया विवराभीतरि : सीहं नीवांतु राहिला :

तवं दीघरोमा [सं. हर्टेल प्रतीत कोल्ह्याचे नाव ‘दधिमुख’ तर इतर प्रतीत ‘दधिपुच्छ’ असे आहे. **भा** प्रतीत ‘दधिमुख’ आहे. आपल्या प्रतीत मात्र त्याला ‘दीघरोमा’ (सं. दीर्घरोमा=मोठेमोठे केस असलेला) असे नाव घेतलेले आहे. निर्मळ पाठकाने ‘दीर्घरोम’ असेच नाव दिलेले आहे.] नांव सृंगाळु रात्रीसमईं वीवरा टाकौनि आला : जवं पाहे तवं सीहाचीं पाउलें : वीवरद्वारें देखीलीं : पर मागुति नीगालीं नाहि : तें देखौनि सृंगाळु वीचारीता जाला : “आहो : माहाविखम [मोठे संकट. सं. विषम>म. विखम. संस्कृतातही विषम=संकट, हा अर्थ होतो. पाहा : ‘कुतस्त्वा कश्मलमिदं **विषमे** समुपस्थितम्’ (गीता. २·२).] उदैलें : आमचीय आश्रमीं सीहुं नीगाला आसे : तरि काये पां कीजे? हा येथें असे कीं नसे : ऐसें कैसेनि जाणीजे? तरि हा बोले ऐसा प्रकार करौं :” ऐसें म्हणौनि वीवर जें होतें : तेनें वीवरेंसी बोलुं लागला : “आहो बील : अहो बिल : आजी तुं कां मासी बोलसी ना? [माझ्याशी बोलत नाहीस. **मासी** : मजशी. पाहा : ‘जेयाचिया आवडी । केली **मासिं** कुळवाडी’ (ज्ञाने. १२·८१); ‘हें देह **मासी** : वैर चाळी अहर्नीसीं’ (उगी. ५०६).] प्रतदीनीं जै मी यें तरी माझें आवाह [न*] विसर्जन करिसी : आजी शब्देंहि पुससि ना : जरि नीत्यमेव बोलसी : तेनें-करौनी मी तुजसी बोलें : तुजपासि यें : आतां न बोलसी तरि मी आनीका आश्रमीं जाईन :” ऐसें सीहें आईकीलें : मग सीहं म्हणे : “हा नित्यमेव या आश्रमासी ये : मग इये स्थानिचे [मू. स्छानिचें.] कोन्ही असति : ते येनेंसी संवादें बोलति : तरि मातें देखौनी ते माझे भयास्तव उगले [उगा, मौन धरलेला; स्तब्ध. पाहा : ‘अहो आइकत असा अवधारा । तंव एया बोला निवांतु ह्मांतारा । जैसा ह्मैसी नुठी कां पुरा । तैसा **उगलाचि** असे’ (ज्ञाने. ९·५१७).] राहिले असति ॥ उक्तं च ॥

भयसंत्रस्तमनसां हस्तपादादिका क्रिया ।
प्रवर्तते न वाणी च वेपथुश्चाधिको भवेत् ॥ ७४ ॥

अनुक्रमणिका

तरी येनें कारणें यथेचें कोंन्ही असती ते न बोलती : तरी आतां हा जाइल : तरी आम्हीच बोलुं : मग यातें साउमे बोलाउं :” ऐसें म्हणौनी सीहुं बोलीला : मग म्हणे : “ये गा ये :” तो पडिवादा [(सं. प्रति+वाद) बोलण्याचा प्रतिध्वनि. ‘पडसाद’ या अर्थाने हा शब्द वापरला आहे. **पडिवादा** : (सिंहाच्या बोलण्याचा प्रतिध्वनी म्हणून).] विवराआंतौनि : माहाभयानकु शब्द उठीला : तेनेंकरौनि कोल्हा पळौनि गेला : आनीकहीं स्वापदें पळौनि गेलों .”

“तरि परिस गा सुहृद हो : येणें कोल्हेनी पुर्वसुचना [‘सूचना’ याचा अर्थ, अगोदरच बातमी काढणे, हेरणे, तपासून पाहाणे असाही आहे. तोच या ठिकाणी आहे. कोल्ह्याने अगोदरच आपले संकट हेरले, त्या संकटावर उपाययोजना केली. म्हणजेच ‘पूर्वसूचना केली’.] केली : म्हणौनि तो वांचला : तरि तयापरि ते सुचना करनी लागैल [त्याप्रमाणे आधीच हेरून, खात्री करून घ्यावी लागेल व त्याप्रमाणे सावधगिरीने वागावे लागेल, उपाय योजावा लागेल. ‘करनी’ हे रूप ‘करणे’ साठी आलेले आहे.] : हें यरां सुहृदाचीया मना आलें : मग वक्रनासु आपुलीया सुहृदवर्गासी आणीकया स्थानासि [**मू. स्छा**नासि.] गेला :

तें देखौनी चीरंजीवी म्हणे : “हें भलें जालें : जे हा वक्रनासु दिर्घदर्शीया येथौनि गेला : आतां आपुलीये स्वेस्छा नीज कार्ये करूं : आतां या उलकाचा नासु जवळीकें आला ऐसें जाणावें : कां जें आपुलें पुर्वापरिचे वृध मंत्री : आपणेया गोमटें चिंतिती : हीत सीकवीती : तयाचें जो पुरुसु सीकवीलें न करि : तया स्थानासी [**मू. स्छा**नासी.] नासु उदैला ऐसें जाणावें : आनीक पुर्वविरोधीया : आपणया येक वेळा घाता प्रवर्तला आसे : तयातें जो जवळी करि तया पुरूशासि गोमटें नाही : ऐसें जानावें :

॥ उक्तं च ॥

न दीर्घदर्शिनो यस्य मन्त्रिणः स्युर्महीपतेः ।
क्रमायाता परित्यक्तास्तत्र नाशो भवेत्दृढम् ॥ ७५ ॥

जया राजयापासी दीर्घदर्शीया मंत्री नाही : जयाचे मंत्री पुर्वापरीचे जेनें राजेनी तेजीलें : तया राज्यासी क्षयो होय ऐसें जाणावें :” ऐसें म्हणौनी तो चीरंजीवी [**म.** चीरंनजीवी.] तया अरिमद (र्द)नातें म्हणे : “तुम्ही जेथें नीजत असा : तेथें तुम्हासी खुपत असे : तरि तुम्हांलागौनी बरव्या मौवाळ सेजा करैन : मज तुमची कांहि शुश्रका [सं. शुश्रुषा. मराठीत ष चा ख होऊन ‘शुश्रुखा’ हा शब्द. त्याचेच उच्चारांतरित लेखन शुश्रका=सेवा.] घडत असे :” ऐसें म्हणौनि मौवाळ [मऊ (सं. मृदु > म. मउ+आल)] त्रुण सांवेरीचा [शेवरीच्या झाडाचा, सावरीचा. या झाडाला कापूस येतो. तो फार मऊ असतो.] बुरू [इतस्तता विखुरलेला, पिंजला गेलेला. ‘बुरी’ शब्द याच अर्थाचा आहे. ‘वोढाळाचां खुरिं । आखरू आते **बुरी**’ (ज्ञाने. १३·५५७) ओढाळ गुरांच्या खुरांनी आखर (गोठाण) ‘बुरी आते’ = चिवंदलेली स्थिती, मातीचे कण वेगळे वेगळे होऊन झालेली स्थिती धारण करते (आते), असा भावार्थ. यावरून **बुरणे** : चिवंदून निघणे, भुरा होणे. ‘भुरा’ शब्दाचेच

पूर्वरूप ‘बुरा’ असावे. **सांवेरीचा बुरू** (इतस्ततः विखुरलेला, किंवा चिरंजीवी कावळ्याने आपल्या चोचीने, सावरीला आलेल्या कापसाच्या बोंडातून वेचून घेऊन, त्या बोंडातील कापसाचा बुरा करून आणलेली] रुई [पिंजलेला कापूस. फार्शी शब्द ‘रू’.] आथुरला : ऐसें आणौनि आंथुरणाचेनि मीसें : अवघया तळीं आंथुरलें : ते गुहा आवघी त्रुणें भरली : ते उलक दिवांधक : कांही जाणतीच ना : तेहिं बरवें मानीलें [निजतांना मऊ आंथरूण मिळत असे म्हणून त्यांना बरे वाटले.] ॥ उक्तं च ॥

अमित्रं मन्यते मित्रं मित्रं द्वेष्टि निहन्ति वा ।
शुभं वेत्त्यशुभं पापं भद्रं दैवहतो नरः ॥ ७६ ॥

दैवहत जो पुरुश तो अमीत्रातें मीत्र मानी : आणी मीत्राचा द्वेसु करि : अथवा मारि : असुभ तें सुभ मानी : पापाचें पुण्य मानी : ऐसें असतां च(चि)रंजीवीयें सनकाडिया [सं. शण =ताग, तागाचे झाड, त्याची काडी. वाळल्यावर ही फार लौकर पेटते व जळते.] बहुत मेळवीलया : मग हळुहळु ताप करि : ते उलक पुसती : “या सनकाडीया काये [करिसी]?” तो म्हणे : “मज द्वारिं शीत [(थंडी)] वाजत आसे : तुम्ही दुर्गाआंतु तु[म्हासी] नाहि वाजत :” यणें मीसें ईंधन बहुत मेळवीलें :

मग येके दीवसीं सजेचेनि मीसें [सज्जेच्या निमित्ताने. सज्जा तयार करण्यासाठी गवत, कापूस वगैरे आणण्याच्या निमित्ताने.] : चीरंजीवि नीगौनी गेला : जाउनि मेघवर्णासी भेटला [**मू.** भे**त**ला. (सकळ संकेत त = ट).] : तयासी जुहारू केला : मग म्हणे “मेघवर्णा राजया : तुमचे अवघे वैरी हाता ये ऐसा उपावो म्यां केला आसे : ते मरण पावती ऐसा प्रकारू म्यां केला आसे : तरि आतां तुम्ही अवघेचि चाला : तया आवघयातें [(सर्वांना)] नीपांतुं [(नष्ट करू)=सर्वांचा निःपात करू.] : कुंभीपाकु नरक [नरकाचा एक प्रकार. या नरकात, कुंभार ज्याप्रमाणे मडकी (कुभ) आव्यात घालून भाजतो, त्याप्रमाणे पाप्यांना अग्नीत घालून भाजतात.] न्यावो [पद्धती. रीत. ‘तयासी कुंभीपाकनरक न्याय करूं=कुंभीपाक नरकात जो न्याय (जी पद्धती, जो विधी) करतात तोच त्यांना करू. सर्वांना आगीत भाजून काढू, जाळू.] तयासी करौं :” मग मेघवर्णु सानंदु जाला : मग मेघवर्णु चीरंजीवीयातें म्हणे : “तुं आपुला वृतांत सांग पां : तेथे जाउनीयां तुवां कैसी परि केली? तुज ते कैसेनी विस्वासले?” मग चीरंजी[वी*] म्हणे : “दैवासरिखी [जसे दैव असेल त्याप्रमाणे. ‘तैसीची’ शब्दाने पुनरुक्ती झाली आहे.] प्राणीयासी तैसीची बुधी होये : शत्रुसी मीत्र म्हणीजे ॥ उक्तं च ॥

कृतान्तपाशबद्धानां दैवोपहतचेतसाम् ।
बुद्धयः कुगामिन्यो भवन्ति महतामपि ॥ ७७ ॥

कृतांतपासें बांधले प्राणी : दैवेंकरुनि [सं. ‘दैवोपहतचेतसाम्’ या सामासिक शब्दाचा विग्रह करून भाषांतर केले आहे.

अनुक्रमणिका

‘दैवेंकरूनि नाशलें आहे मन कां ज्यांचें’] नाशलें आहे मन कां ज्यांचें : त्यासि वीनास-काळीं तैस्या बुधी [बुधी (अनेकवचन) =कल्पना, विचार.] उपजती : पातां [(पाहातां, विचार केला असता) हें (जे मी केले ते) बहुत असें’ (सांगण्यासारखे पुष्कळ आहे). पण ‘आतांचा प्रस्तावा॰’—आताचा प्रसंग (तो सर्व वृत्तांत सांगण्याचा) नाही, हा भावार्थ.] हें बहुत असें : आतांचा प्रस्तावा [प्रारंभ, उपक्रम, प्रस्तावना; लक्षणेने, प्रसंग हा अर्थ. उदा : ‘तेविचि विस्तारूनि दैवी । ज्ञानकथनादि **प्रस्तावि** । मागिलें ग्रंथें बरवी । सांघितली’ (ज्ञाने. १६·२७२);] सांगावयाचा नोहे : कव्हनी आईकील : तरि तयाचें ठाईं वार्ता पावैल : आतां प्रस्तुत कार्यासी चीत द्यावें : उदैलें कार्यासी विक्षेपु न कीजे ॥ उक्तं च ॥

शीघ्रे कृत्ये समुत्पन्ने विलम्बयति यो नरः ।
तत्कृत्ये देवतास्तस्य कोपाद्विघ्नं प्रयच्छति ॥ ७८ ॥

सीघ्र जें करणें तयासी पुरूशें विलंबु न लावीजे : तरि लाभांची देवता ते कोपास्तव विघ्नातें करी ॥ उक्तं च ॥

आदानस्य प्रदानस्य कर्तव्यस्य च वस्तुनां ।
क्षिप्रमक्रीयमानस्य कालः पिबति तद्रसः ॥ ७९ ॥

तरी आधी ते तुझे सत्रु नीपांतुनी येउं : मग आवघें सवीस्तार सांगौं : तरि प्रथम मी पुढां जाउनि तें ईंधन प्रजाळीत असें : तवं तुम्ही मागीलेंकडौनि यावें : येक येक जळीतें [मूळात ‘बळीते’ असे आहे. सकळ संकेतात **ज** साठी **ब** लिहितात. या संकेताचे रूपांतर करण्याचे राहून गेले. हा शब्द **जळीते** असाच मुळात असावा. ‘ज्वलन्तीं वनकाष्ठिकां’ असे संस्कृत शब्द आहेत.] काष्ट चांचु धरौनी : ढोलरद्वारीं घालावें :” ऐसें म्हणौनी तेथें गेला :

अग्नी [**मू.** अझी.] प्रजळविला : तवं मागीलेंकडौनी समस्त काउळे : अरंण्यामध्यें अग्नीप्रजळीत काष्ट [अग्नीने पेटलेली काडी.] येक येक चांचु धरूनि : अवघां आनुनी [तिये] वृक्षिं विव[र *]द्वारें घातलें : तेथें अग्नि प्रजळला : ते दिवांध उलुक निष्क्रमणमार्गु नेणतीची : तेनेंकरौनि अवघे उलुक नीपांतीले :

मग मेघवर्णु काउळेयांचा राजा : आपुलेया वटवृक्षास्थाना [**मू.** ॰**स्छा**ना.] येउनी : हर्षायमान होउनी सपरिवारें सुखें उपवीष्ट जाला : मग चीरंजीवीयातें राजेनि पुसिलें : “तुवां कवणें परि शत्रुचें ठाईं काळु क्रमीला? तो व्रतांतु सांग पां : तें कौतुक मज थोर वाटत असे :” मग चीरंजीवी म्हणे : “देवा : कार्यार्थि जो पुरूषु होये तो काय कष्टासी गणीतु असे? कष्ट साहुनि सर्वप्रकारीं : आपुलें कार्य करिति ॥ उक्तं च ॥

सिद्धिं वाञ्छयता जनेन विदुषा तेजो निगृह्य स्वकं

सत्त्वोत्साहवतापि दैवगतिषु स्थैर्यं प्रकार्यं क्रमात् ।
देवेन्द्रद्रुहिणोपमैर्बहुगुणैरभ्यर्थितो भ्रातृभिः
किं क्लिष्टः सुचिरं विराटनगरेपूर्वन्न धर्मात्मजः ॥ ८० ॥

४. [राजें राजेनि. यातील **राजे** ही अक्षरे चुकून पुन्हा लिहिली गेली आहेत.]

रूपेणाप्रतिमेन यौवनगुणैः श्रेष्ठे कुले जन्मना
गन्तव्यानि दिनानि दैववशतो भूयो धनं वाञ्छता ।
सैरन्ध्रीति विगर्हिता युवतिभिः साक्षेपमाज्ञप्तया
द्रौपद्या ननु मत्स्यराजभवने घृष्टं न किं चन्दनम् ॥ ८१ ॥

जो सीधितें [वावात्सु] ['वावात्सु' हा शब्द 'विवित्सु' असावा. **विवित्सु**= जाणण्याची इच्छा करणारा. वस्तुतः या शब्दाची येथे आवश्यकता नाही. 'सिद्धिं वाञ्छयता' याचे भाषांतर 'जो सीधितें इछे' या शब्दांनी पूर्ण होते. 'सिद्धिं विवत्सुं इच्छति'=सिद्धी माहीत करून घेण्याची जो इच्छा करतो (जो सीधितें वीवीत्सु इछे) असा अर्थ करता येईल.] इछे : तेणें पुरूशें आपुलें तेज लोपावें : दैवगतीचां ठाईं

धैर्ये धरावें : जैसें पुढील कार्य [जैसें=जेणेकरून.] साधवें : म्हणौनि धर्मादिकीं पांडवीं वैराटनगरीं [विराटाच्या नगरात.] कष्ट

साहिले : अभीमान सांडौनि : आपुलें तेज लोपुनी लोकाची सेवा केली : कष्ट न

मानतीच [कष्टांना मानले नाही, त्यांची पर्वा केली नाही.] : जे द्रोपदी श्रेष्ट कुळीं जन्मली : रूपें म्हणे जरि ज्यां [(जिने किंवा ज्याने)] मदन जीवळला [जिंकला. 'जिवळणे' हे क्रियापद आढळत नाही. **जिवाळी** (हृदयाला झालेली जखम, जिव्हारी) यापासून **जिवाळणे**=हृदयाला जखम करणे, झोंबणे, अशी व्युत्पत्ति करता येईल काय? 'ज्यां (द्रौपदीच्या ज्या रूपाने) मदन जीवळला'=मदनाला जिवाळी लावली, मदनाचे अंतःकरण विद्ध झाले असे रूप, असा अर्थ करता येईल.] :

ऐसें नीज लावण्य लोपौनि : सुद्रसेनेची [विराटाच्या पत्नीचे नाव 'सुदेष्णा'होते. तिला 'सुद्रसेना' असे म्हटले आहे. 'सुदर्शन' या संस्कृत शब्दाचे 'सुद्रसेन' हे रूप जुन्या मराठीत नेहमी आढळते. उदा : 'तेव्हळी **सुद्रसेन** चक्र सर्वेश्वरू : पुढें धरिता जाला' (मूप्र. २५५८); 'आधींची लक्ष्मिपति । **सुद्रसेणा** नीरोपु आती' (चोंभा. उह. १८३९). त्याचप्रमाणे 'सुदर्शना>सुद्रसेना' असे रूप झाले आहे. **सेळंद्री** : सं. 'सैरन्ध्री'चे उच्चारांतरित रूप. 'सैरन्ध्री' या शब्दाचा सर्वसामान्य अर्थ 'सेविका, दासी' असा आहे. जुन्या मराठीत 'सेळंद्री' असेच त्याचे रूप आढळते. पाहा : 'तेणे गुपितें सेळंद्री धाडिली होती : रुक्मिणीतें पाहावया' (नरुस्व. २१९); 'साळांकृत केली ततक्षणें : **सेळंद्रीया'** (संनरुस्व. २७१३).] सेवा केली : सेळंद्री नांव पाउनी

स्त्रीयाची सेवा केली : वैराटाचें गृहिं चंदन उगाळी : तरि मेघवर्णा :

कार्याविसें : कार्य संपादतां : काई मान आपीमान पाहिजताती? [काय मानापमान पाहिले जातात? अर्थात्, नाही. (कर्मणी प्रयोग).]

॥ उक्तं च ॥

अपमानं पुरस्कृत्य मानं कृत्वा तु पृष्ठतः ।
स्वार्थं संसाधयेत्प्राज्ञो स्वार्थभ्रंशो हि मूर्खता ॥ ८२ ॥

अपीमान पुढें करावा [अपमानाला समोर ठेवावे, त्याला सामोरे जावे, (तो सहन करावा, हा भावार्थ).] : मान मागें करावा

[पाठिमागे ठेवावा, त्याजकडे पाहू नये, त्याची अपेक्षा करू नये.] : परंतु प्राज्ञु जो तेणें स्वार्थु साधावा : स्वार्थुभ्रंश तोचि मुर्खता : म्हणौनी :” चीरंजीवी म्हणे : “मेघवर्णा : ते उलुक आवघे मुर्ख : येकलेनि [मू. येकेंलेनि.] वक्रनासें माझीय मनीचा अभीप्रावो जानीतला : मग तेणें आरिमर्दनासि जाणवीलें : म्हणे : “आगा अरीमर्दना : हा चीरंजीवी तुवां जवळी केला : पर हा तुज नीका नव्हे : याचें संगस्ती तुज नासु होईल :” ऐसें म्हणीतलें : परि तयाचें वचन न मानतीची : तेनेंकरुनी उलुक राजा : सपरिवारी नासातें पावला ॥ उक्तं च ॥

संतापयन्ति कमपथ्यभुजं न रोगा दूर्मन्त्रिणं कमुपपान्ति न नीतिदोषाः ।
कं श्रीर्न दर्पयति कं न निहन्ति मृत्युः कं स्त्रीकृता न विषया परिपीडयन्ति ॥ ८३ ॥

मूर्खस्य नश्यति यशः पिशुनस्य मैत्री नष्टक्रियस्य कुलमर्थपरस्य धर्मः ।
विद्याबलं व्यसनिनः कृपणस्य सौख्यं राज्यं प्रमत्तसचिवस्य नराधिपस्य ॥ ८४ ॥

ऐसें वक्रनासें जातां जातां तयापुढां सांगीतलें : “आगा राया : तुं आमचें सीकवीलें ना करसी : तरि आमचें येथें उचीत राहाणें नोहें : परि येक वचन आइका : पुढील भवीस्य मी सांगतुसें ॥ उक्तं च ॥

१. [हे शब्द येथे अनावश्यक आहेत. टीपा पाहा.]

अरितोऽभ्यागतो भृत्यो शत्रुसंवासतत्परः ।
विकारहेतुं विज्ञाय न तस्य प्रति विश्वसेत् ॥ ८५ ॥

॥ तथा चं ॥

आसने शयने याने पाने च भोजने तथा ।
किंचिच्छिद्रं समासाद्य ते कुर्वन्ति विरूपता ॥ ८६ ॥

वैरीयाचा जनु आपणयापासि आला : तरि तयाचा वीस्वासु न करावा : तो जरि संग्रहिजे तरि नाशातें पावीजे : आसनीं शयनीं [आसन, शयन (स्थान) इत्यादी ही मर्मस्थळे होत. त्यांच्या द्वारा, त्यांचा आश्रय घेऊन शत्रूचा नाश करता येतो.] बाहिरी नीगालयां : उदकीं भोजनीं ऐसीं छीद्रें [व्यंग, उणीव.] पाहुनि वैरीयाचा जनु नाशातें करि :” ऐसें जातां अरिमर्दनासी वक्रनासें सांगीतलें : परि तो नाईकेच : मग तो वक्रनासु आपुले जनासी [आपल्या लोकासहित.] तेथौनि गेला : [‘यकाधा डोहो

अनुक्रमणिका

टाकौनि जाउं का?' असा अन्वय.]

मग म्यां मान अपीमान सांडौनि इतुके दिवस राहुनि आपुलें कार्ये सीधी नेलें : कोन्ही येके वेळें शत्रुतेंहि स्कंदिं वाहिजे : पण कार्य कीजे :

स्कन्धेनापि वहेच्छत्रुं कालमासाद्य बुद्धिमान् ।
महता कृष्णसर्पेण मण्डूका बहवो हताः ॥ ८७ ॥

कोन्ही येके काळीं शत्रुतेंहि स्कंधिं वाहिजे : जैसें कृष्णसर्पें बेडुक वाहान होउनी : बेडुक सर्वहि भक्षिले :" ये कथा मेघवर्णु पुसे : चीरंजीवि सांगे :

कथा ८*
बेडकांचे वाहन झालेला सर्प

[**भा.** प्रतीत ही कथा नाही. निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानात ती आहे. सर्पाचे नाव सं. पंचतंत्रात 'मन्दविष' असे आहे. आपल्या कथेत ते लेखनदोषामुळे केवळ 'मदवि' असे लिहिले गेले असावे.]

"कोन्हे एके विवरिं [मंदविष*] [मुळात 'मदवी' असे आहे. **म** वरील अनुस्वार व शेवटचे अक्षर **ष** चुकीने गळाले असावे. दुरूस्त करून घेतले आहे.] नाम सर्पु आसे : तेथें तयासि आसतां भक्ष मीळेचि ना : मग तो म्हणे : "जाउं का येकाधा डोहो टाकौनी : मग तेथें मज भक्ष मीळेल :" ऐसें चींतीतु येकु डोहो टाकौनि आला : तया सर्पातें देखौनि सर्वहि बेडुक पळाले : मग तेणें बुधी केली : आहारकृ(वृ)ती सांडौनी : उगाच डोळे लाउनी ध्यानस्तु राहिला : तवं एकें बेडुकें पुसीलें : "अगा सर्पमामो : तुं आहारू कां नेघेसी?" तवं तो म्हणे : "मज एका ब्राह्मणांचा श्रापु असे : तो म्हणे 'बेडुकाचें वाहान होसी : तै तुज आहारू मिळैल :' याकारणें तुम्हापासी आलौं : तरि तुमचें वाहान होईन :" या बोलासरीसें आवघे बेडुक : तयाचीय [पाठी]वरि बैसले : या सर्पातें इकडें तीकडें हिंडवीती : तवं एके दीवसीं सपुं हळुहळु चालौं लागला : तवं ते बेडुक म्हणती : 'तुं कां गा वेगां न चालसी?' तो म्हणे : 'मज आहारेवीन न चालवें :' तवं जळापवादु [हे एका बेडकाचे नाव. संस्कृतमध्ये ते 'जलपाद' असे आहे.] बेडुकांचा राजा म्हणे : 'मामो : तुं वोकटें बेंडुक [वोकटे (सं. ओषट्)=वाईट वास येणारे, वाईट, खराब झालेले असे बेडुक.' मूळ संस्कृत वाक्य 'भक्षय **क्षुद्र** मण्डुकान्' असे आहे.] खायें :' मग सर्प मनीं हर्षला : बेडुक खाउं लागला : मोटा जाला : तवं [आनी]कें सर्पें तया सर्पातें देखीलें : मग तो म्हणे : 'भक्ष पाठीं वाउनि का हिंडतोसी?' तो म्हणे : 'आपुलीया कार्याकारणें : कोन्ही येके काळीं ऐसेंहि होये ॥ उक्तं च ॥

सर्वमेतद्विजानामि यथा वाह्योऽस्मि दर्दुरैः।

किंचित्कालं प्रतीक्षेऽहं घृतान्धो ब्राह्मणो यथा ॥ ८८ ॥

सर्पा : हें सर्वहि मी जाणतसें [येथे संस्कृत श्लोकातील (८८) पहिल्या चरणाचा उत्तरार्ध (यथा वाह्योस्मि दर्दुरैः) गृहीत आहे. मी बेडकाचे वाहन झालो (ही दुर्दशा मी पत्करली) हे मी जाणतो. पण (या) 'दुर्दुराचां ठाईं (बेडकांच्या ठिकाणी) जे बुधी मी आहे (ज्या बुद्धीने, कपट बुद्धीने मी आहे) ती माझी बुद्धि कोणालाच माहीत नाही.] : पण जे बुधी दर्दुराचां ठाईं मी आहें : ते बुधी माझी कोन्ही नेणे : ऐसेंहि कोन्हें येकें काळीं घडे : जैसी [**मू. जे**सी.] घ्रताअंध ब्राह्मणु [तूप, तुपाचे पदार्थ खाऊन आपण आंधळे झालो आहोत, असे सोंग करणारा ब्राम्हण.] जाला :" ऐसी [**मू. ए**सी.] कथा : दुसरा सर्पु पुसे : तो सांगे :

कथा ९*

देवदत्त ब्राम्हण व त्याची छिनाल स्त्री

[संस्कृत पंचतंत्राच्या **ह नि. आ. को** याच प्रतीत ही कथा आहे. मराठी भा प्रतीत ती आपल्या प्रतीत 'देवदत्त' आहे, तर वरील प्रतीत ते 'यज्ञदत्त' आहे.]

"रत्नपुर नावं नगर : तेथें देवदत्तु नांव ब्राह्मणु आसे : तयाची स्त्री व्यभीचारिणी : परपुरुशरत : ते सीनाळी : प्रत्यहिं ते सीनाळासी [**मू.** सीना**ळी**सी.] पक्कांनें रांधी [**मू. रा**धी.] : भर्तारासी ठाउकें पडौं नेदी : सीनाळाचें घरी जाउनी तयासंगातें सुरतसंभोग करि : ऐसें तीचे लोक अपवाद बोलती : तेनें ब्राह्मणें [**मू. ब्र**ह्मणें.] परशधरें [ज्याने हातात कुऱ्हाड घेतलेली आहे अशा त्या ब्राम्हणाने.] आईकीलें : मग म्हणे : "हें सत्य कीं मीथ्या : केवी ठाउकें पडे?" तवं एके दिवसीं तेणें [**मू. त**णें.] ब्राह्मणें पक्कांन्ने रांधितां [**मू. रा**धितां.] देखीली : तेणें पुसीलें : "आजी पक्कांनें काशालागी करतो (ते)सी :" तवं ते म्हणे : "तुम्हांसी दुखत होतें : तै म्यां दैवतेसी बोनें नवसीलें [बोनें (उपहार, भोजनपदार्थ) अर्पण करण्याचा नवस केला. बोनें : देवतेप्रीत्यर्थ भोजनाचा उपहार. पाहा : 'तवं बडवेयाचें आंडोर गोपाळासि **बोणें** घेउनि आले' (गोप्रच. २२९); 'चौदा विद्यांचीं रसायनें : असेखा धर्मांचीं जीवनें : काढुनि ब्रह्मसुखाचे **बोनें** : सुकें केलें भागवत' (नरुस्व. १८).] होतें : आतां नैवेदु दाखवावेया देउळा जाईन :" तवं तो म्हणे : "बरवें केलें :" तवं तो ब्राह्मणु ते सीनाळी देउळा जाये तवं पहिलेंची आपुण देउळाआंतु जाउनी देवतेमागें बैसला : तवं ते सीनाळी बोनें घेउनी आली : देवतेची पुजा केली : देवतेसी बोनें दाखवौनी आड पडली [साष्टांग दंडवत करणे. पाहा : 'तिये कडौनि येंतु वारा : । देखौनु धांवे सामोरा । **आड पडे** म्हणे घरा । बीजें कीजें' (ज्ञाने. १३·३७५); 'प्रतिमठीं भेटि जाली : मग **आड पडीले**' (गोप्रच. ११५).] : म्हणे : "माउलीये जगदंबे : माझीया भर्ताराचे डोळे आंधळे होती ऐसें करावें : हेंचि मी वेळोवेळां मागतसें : "ऐसी ते सीनाळी.... [बोली]ली : तेनें ब्राह्मणें आवघें आईकीलें : तवं तो देवते-आडौनी बोलीलाः म्हणेः "भक्तीणी : तुं माझी भक्ती करीतां बहुत कष्टलीसी : तुज प्रसंन जालीयें : तुं म्हणसी तें होईल : परि तुवां तुझेया भर्तारासी प्रत्यहिं पक्कांनें क्षीप्रा साळीओदन घाली : तुप लाडु साकर ऐसें प्रत्यहिं

अनुक्रमणिका

त्यासी जेउं घाली : इतुकेन महिन्या एका डोळे फुटती :” ऐसें तो ब्राह्मणु देवतेआडौनी बोलीला : मग ते हरसातें पाउनी घरासी आली : मग भर्तारातें म्हणे : “आंघोळी करा : तुम्हांसी ताट करिन :” मग त्या ब्राह्मणांसी वडे क्षीप्रा सांजवरीया तुप लाडु ऐसें जेउं घातलें : तें देखौनि ब्राह्मणु म्हणे : “आजी हें अपुर्व काये?” ते म्हणे : “तुम्ही उगेचि जेवा : तुम्हांसी पुसा-पुसी काईसी?” ऐसा सप्तरात्रीं जेववीला : मग तो म्हणे : “आईकतेसी? काये पां माझीया डोळां दिसत नाहि :” तवं ते अधीक हर्षातें पावली : म्हणे : “तुम्हासी खातांपीतां काये जालें?” तवं तो म्हणे : “प्रिये : तुझीं पक्कांनें मज बरवीं नव्हतीं : वडे वावडें म्हणौनी डोळां दिसत नाहि :” ऐसें आईकौनि ते सीनाळी अधीक तुपपोळीया वडे क्षिप्रा तया ब्राह्मणांसी घालुं लागली : ऐसें खातां तो ब्राह्मणु मोटा जाला : मग अस्त्रीयतें म्हणे : “आतां मी कांही डोळां न देखें : अंधकार पडौनि ठेला असे :” मग ते सीनाळी हरखातें पाउनि दीवसांची सीनाळातें घरि पाचारि : बोलाउनी सुरतसंभोगादीक सुक करि [‘सुरतसंभोगादीक सुक करि’ सुक=सुख करि=करीत असे. सुख करीत असे=सुख उपभोगू लागली. ‘सुक’ शब्द येथे नसता तरी चालले असते. त्यामुळे वाक्यरचना चांगली झाली असती.] : ऐसें तो ब्राह्मणु प्रत्यक्ष डोळां देखौं लागला :

ऐसा दिवस दोनी च्यारी उगलाची राहिला : मग एके दीवसीं : आगळ हातीं धरौनि बैसला : तवं तो सीनाळु आला : मग तेणें ब्राह्मणें [मू. ब्रह्मणें.] सांचलु आयकीला : मग तेनें ब्राह्मणें आगळेंकरौनि सीनाळ मारिला : स्त्रीयेचें नाक कापीलें :”

ऐसा तो सर्पु दुसरा [मू. दुश्रा.] सर्पाप्रति बोलीला : तेनें सर्पें आवघे बेडुक यापरि खादले :”

तैसें चीरंजीवी म्हणे : “मेघवर्णा : तैसी परि म्यां केली : तेहिंसीं [त्यांहींशी, त्यांच्याशी. त्यांहींशीं’ हे रूप आजही ग्रामीण भाषेत वापरतात. त्याचेच दुसरे रूप ‘तेहिशीं’.] बरवें बोलौनि : कोमळ वचनें सीतळपणें : मानहिनां [(मानहीनत्वाने-तृतीया) **वर्त्तलां** (वर्तन केले, वावरलो)’.] तेथें वर्त्तलां : मग म्यां तुझे शत्रु अवघे नीपांतिले” ॥ उक्तं च ॥

वने प्रज्वलितो वह्निर्ज्वलन्मूलानि रक्षति ।
समूलोन्मूलनं कुर्याद्वायुर्यो मृदुशीतलः ॥ ८९ ॥

अनुक्रमणिका

तवं मेघवर्णु म्हणे : “हें सत्य : कां जे मानभाव आसती ते प्रेम आपतीतें पावल ['प्रेम' शब्द येथे निरर्थक आहे. आहे तोच पाठ घेतला तर 'प्रेम पावले किंवा आपतीतें (आपत्तीते) पावले तऱ्ही'—असा अर्थ करता येईल.] जऱ्ही : तऱ्ही प्रारंभीलें कार्ये न सांडिती : भलतेनें प्रकारें कष्ट साहुनी : ते प्रारंभीलें कार्ये करिती ॥ उक्तं च ॥

महत्त्वमेतन्महतां नयालंकारधारिणाम् ।
न मुञ्चति यदारब्धं कृच्छ्रेऽपि व्यसनोदये ॥ ९० ॥

॥ तथा च ॥

प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः ।
विघ्नैः सहस्रगुणितैरपि हन्यमाना प्रारब्धमुत्तमगुणा न परित्यजन्ति ॥ ९१ ॥

महंत जे पुरुश ते प्रारंभीलें कार्यातें न संडीती : जऱ्ही व्यसन प्राप्त जालें तऱ्ही न संडिती : आनी नीच जे पुरुश तीहिं [(त्यांच्याकडून) विघ्नभयास्तव (विघ्न=संकट येईल या भीतीने) कार्ये] विघ्नभयास्तव कार्ये आरंभीजत नाहि [(आरंभ केले जात नाही.)] : आणी मध्ये जे पुरुश [मध्यम प्रतीचे पुरुष. मध्यें (मधेच) जर] तीहिं प्रारंभीलें कार्ये असतां मध्यें जरि विघ्रो [(विग्रह, विरोध) होए तरि सांडिती (आरंभिलेले कार्य सोडून देतात). सहश्रगुणीतें (हजारो) विघ्नेंकरौनि (विघ्नांनी, अडथळ्यांनी) पराभवीले (त्यांचा पराभव झाला, विघ्ने आली तरी) उत्तम पुरुश प्रारंभीलें कार्य न संडिति (सोडत नाहीत, टाकून देत नाहीत)] होये तरि सांडिती : आणी सहश्रगुणीतें विघ्नेंकरौनि पराभवीले जरही ते उतम पुरुश प्रारंभीलें कार्ये न संडिति : कष्ट साहुनी प्रारंभीलें कार्ये करिति : ऐसें च(चि)रंजीवीप्रती मेघवर्णु बोलीला : मग म्हणे : “आगा य च(चि)रंजीवी : तुझेनि पाडें [तुझ्या तुलनेने.] आनीकु बुधीवंतु नाही : तरि तुझेनि प्रसादें [निष्कंटक *] [**मू**. कटक. हा दुरुस्त करून घेतलेला शब्द होय. पोथीत या ठिकाणी 'कटक' असा शब्द आहे. मूळ संस्कृत वाक्य असे : 'तत्कृतं निष्कंटकं मम राज्यं शत्रुनिःशेषतां नयता त्वया' हे लक्षात घेता '**निष्कटक** राज्य' असाच पाठ लेखकाला अभिप्रेत असला पाहिजे हे स्पष्ट होते. 'तुझेनि प्रसादें **कटक** राज्य पावलौं'—असाच पाठ घेतला तर **कटक**= राजधानी, आणि **राज्य** पावलो' असा अर्थ करता येईल. मेघवर्ण पूर्वी आपली राजधानी, अर्थात राहण्याचे मुख्य स्थळ सोडून गेला होता. शत्रूचा नाश झाल्यामुळे पुन्हा तेथे तो आला, म्हणजे त्याची राजधानी (कटक) त्याला मिळाली, असा संबंध लावता येईल. **कटक**=राजधानी. पाहा : 'तेथ मुखांचा अंकणा चंदृ : त्यागें जिंतिला क्षीरसमुदृ : ते **कटक** वानिताये कवि नरिंदृ : यादव रायाचे' (नरुस्व. ८७९);] राज्य पावलौं : माझा सत्रु जो होता : तो तुवां नीशेष उन्मळीला : तरि तुझेया परोपकारासि मी उतराई कैसेनी होउं? ॥ उक्तं च ॥

व्याधिशेषं ऋणशेषं शत्रुशेषं तथैव च ।
पुनः पुनः प्रवर्धन्ते तस्माच्छेषं न धारयेत् ॥ ९२ ॥

व्याधीचें [व्याधी (रोग)चे सेष (शेष)=रोग थोडाही शिल्लक राहिला तर, रुण (कर्ज) शिल्लक राहिले तर, तसेच शत्रू शिल्लक राहिला तर (तो समूळ नष्ट झाला नसेल तर) मागुतें (पुन्हा) वाढील (वाढेल, मोठा होईल)—म्हणून त्याला 'शेष' राहू न देता 'नीशेष=निःशेष

करावे.] सेष [मुळात 'व्याधी वीसेष' असे लिहिले आहे. ते वरीलप्रमाणे दुरूस्त करून घेतले आहे.] : रुणाचें शेष : शत्रुचें शेष : इतुकें मागुतें वाढील : म्हणौनि नीशेश करावें : तरि तुवां माझे वैरी नीसेष फेडीले :" मग चीरंजीवी म्हणे : "जी राजया : हा तुझाची प्रतापु : मी की (कीं)मात्र [माझी मात्रा (पराक्रम) तो काय? फार थोडा.] : तुझेनी प्रतापें वैरी नीपांतीले : म्हणौनि जें कायें होन्हार तें न चुके : जयाचे दीस पुढां उजु होति : तया प्राणीयासि तैसीचि बुधि होये ॥ उक्तं च ॥

वाञ्छैव सूचयति पूर्वतरं भविष्यं पुंसां यदन्यतनुजं त्वशुभं शुभं वा ।
विज्ञायते शिशुरजातकलापचिह्नः प्रत्युद्गतैरपसरन् सरसः कलापी ॥ ९३ ॥

म्हणौनि पुर्वी जें कर्म केलें : तैसी बुधि प्राणीयासि उपजे ॥ उक्तं च ॥

बुद्धौ कलुषभूतायां विनाशे समुपस्थिते ।
अनयोऽपि नयो भाति सर्वेषामपि देहिनाम् ॥ ९४ ॥

विनाशकाळीं बुधि नाशातें पावली असतां पुरुशु अनितितें नीती मानी : म्हणीजे न्याय तो अन्याये मानि ॥ उक्तं च ॥

न निर्मितो केन च दृष्टपूर्वः वने तथा हेममयः कुरंगः ।
तथापि तृष्णा रघुनन्दनस्य विनाशकाले विपरीतबुद्धिः ॥ ९५ ॥

सुवर्णाचा मृगु कोणें निर्मीला नाहि : आणि कोणें देखीला नाही : तथापी रघुनंदनासी तृष्णा उपजली : जे हा मृग मारौनि सीतेसी कांचौळी कीजे : तरि काये तयासि ज्ञान नोहतें? परंतु विनाशकाळीं वीपरित बुधी होय : तैसें :"

चीरंजीवी म्हणे : "मेघवर्णा : पुरुषा सानें हो [या वाक्यात पुरुष शब्द नपुंसकालिंगी वापरला आहे.] अथवा समर्थ हो : परि बुधी-करौनी वर्तावें : वेळेसी मानु द्यावा : शत्रुचा विस्वासु न करावा : आपुलें वर्म रहस्य कवणांपुढां न सांगावें : वृध महंत जें सीकवीती : तयासि चीत द्यावें : जें काये आदरिजे तें कवणां कवणां फळातें परिणामीं प्रसवैल : ऐसें पाहुनि मग आदरिजे : असमानेंसी वीघ्रो न कीजे : अका(क)रणीये तें न करावें : भलतेवीसें आतुरपण आदरिजे तरि तो पुरुश शीनातें न पावे : सर्व प्रकारिं पुर्वविरोधिया जो होये तयाचा विस्व(स्वा)सु न करावा : अन्यथा करि तरि तयासि तया उलुकाचें परि होये ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

अरिपक्षाश्रितं मित्रं मर्मभेदी प्रियं वदेत् ।
विश्वासो नैव कर्तव्यो यदि साक्षाद्बृहस्पतिः ॥ ९६ ॥

कींबहुना" ऐसें चीरंजीवी मेघवर्णाप्रति बोलीला : मग सुखें आसौं लागला ॥"

इति श्री पंचौपाख्याने : राजनितीसास्त्रे : काकोउलुकीयं तृतियं तंत्र समाप्त ॥ ३ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥

अनुक्रमणिका

तंत्र ४. लब्धप्रणाशन

मूळकथा : विकराळमुख मगर व रक्तमुख वानर.

[चौथ्या तंत्राचे नाव सं. पंचतंत्रात 'लब्धप्रणाश' (जे लब्ध=मिळालेले आहे, त्याचा प्रणाश=नाश) असे आहे. आपल्या 'पंचोपाख्याना'त त्याला 'लुब्धप्रणासन' असे म्हटले आहे. ते चूक होय.]

"आतां चतुरथं लु(ल)ब्धप्रणासन कथ्यते : तयाचा आधी ['तयाचा आधी (त्याच्या आधी) श्लोक' (आहे तो असा); किंवा आ**दी** श्लोकु' (पहिला श्लोक).] श्लोकु ॥ उक्तं च ॥

समुत्पन्नेषु कार्येषु बुद्धिर्यस्य न हीयते ।
स एव तरते दुर्गं जलांते वानरो यथा ॥ १ ॥

समुत्पन्न कार्य असतां जयाची बुधि नाशातें न पावे तो दुर्ग ['दुःखेन गम्यते' —चढून जाण्याला कठीण, अत्यंत कठीण, संकट, अशा धात्वर्थाने हा शब्द येथे वापरला आहे.] संसा[र*]तरे [येथे संसा ही अक्षरे निरर्थक आहेत. चुकून असावी. 'संसार' असा शब्द येथे असावा असे मला वाटते. त्याप्रमाणे दुरुस्ती सुचविली आहे.] : जैसा वांनरू जळामध्यें दुर्घष्ट [पासून जिंकण्यास कठीण.] वेसनीं नीस्तरला :" "ते कथा कैसी?" राजपुत्र पुसती :

विष्णुशर्मा सांगे :

"कवणे एकें [**मू. ऐकें**.] ठाईं [**मू. थाईं**. (सकळ संकेत थ = ठ).] समुद्रामध्यें विकराळमुख मगरू आसे : तेथें रक्तमुख वांनरू आसे : ते येकें ठाईं समुद्राचां तीरिं वसती : तवं कोन्ही एकें [**मू. ऐकें**.] समईं : उदकाबाहिर येउनि सुसीतळ वालवंटीं [(सं. वालुका+कण्ठ) रेतीने युक्त असा काठ, किंवा वालका+वत्'—वाळूने युक्त, रेताड.] मगरू येउनि बैसला : तयातें देखौनि रक्तमुख वांनरू म्हणे : "तुं कवणीय ठाईं अससी? तुझा आश्रमु कवणु?" तो म्हणे : "मी समुद्रीं असें :" मग वांनरू म्हणे : "अगा ये मगरा : तुं माझा अतिथु : तरि ये : अमृतासारिखीं जांबुंचीं फळे भक्षि : म्यां तुज दीधलें ॥ उक्तं च ॥

प्रियो वा यदि वा द्वेष्यो मूर्खो वा यदि पण्डितः ।
वैश्वदेवान्तमायातः सोऽतिथिः स्वर्गसंक्रमः ॥ २ ॥

दूरमार्गश्रमश्रान्तं वैश्वदेवान्तमागतम् ।
अतिथिं पूजयेद्यस्तु स याति परमां गतिम् ॥ ३ ॥

अनुक्रमणिका

क्षुधार्थिस्तृषितः शांतो दूराध्वेन समागतः ।
पूजयेत्तं प्रयत्नेन सोऽतिथिः स्वर्गसंक्रमः ॥ ४ ॥

प्रीयु हो अथवा द्वेशु(ष्यु) हो : मुर्ख हो अथवा पंडितु हो : जो वैस्वदेव समई आला : तो देवसामान्यु जानीजे : दुरहोउनि [दुरून.] आला : मार्गी श्रमें श्रांतला : तयातें जो पुजे तो परंम गतीतें पावे : क्षुधारथी आणी तृशीतु : श्रांतु दुरहोउनि आला : ऐसे अतीथी जो पुजे तो स्वर्गलोकातें पावे : तरि तुवां प्रतिदीवसीं यावें [**मू.** **आ**वें.] : जांबुफें भक्षाविं :" ऐसा तो मगरू प्रतदीनीं ये : ऐसें दोघां जनां थोर मैत्रत्व जालें : ते दोघी जांबुचीय साउलीं बैसौनि सुखें गोष्टी करिती : काळाती-क्रमु करिति : यापरि दीवस [**मू.** दीव**श**.] बहुत जाले : ऐसा तो प्रत्येहिं ये : तो मगरू जांबुचीं फळें भक्षीतां उरलीं ते अस्तमान समई स्त्रीयेसी घरासी घेउनी जाये : ऐसें बहुत दीवस [**मू.** दीव**श**.] जाले : एके [**मू.** **ऐ**के.] दीवसीं स्त्रीयेनें पुसीलें : "अहो जी प्राणनाथा : ऐसीं अंमृतासारिखीं फळें : तुं कैची प्रत्येहिं आणीतोसी?" तवं तो मगरू म्हणे : "माझा मीत्रु वांनरू असे : तो प्रत्येहिं मज फळें देतु आसे :" तवं ते म्हणे : "ऐसीं फळें जो प्रतदिनीं खाये : तयाचें काळीज अमृतासारिखें गौल्य [गोडपणा. हे भाववाचक नाम विशेषण म्हणून गोड या अर्थाने योजले आहे. (मूळ शब्द **गुल**=गूळ).] असैल : तरि तें मजलागौनि येथें आणी : मी भक्षीन :" मग तो म्हणे : "प्रीये : तुं ऐसें कैसें बोलीलीसी? तो मीत्रु अवध्यु : प्राणांहोउनी [प्राणाहून, प्राणापेक्षा.] अधीकु : हें तुझें बोलनें अनुचीत : म्हणौनि वाउगा आघ्रो [**मू.** आघ्रां.] सांडी ॥ उक्तं च ॥

एकोदरसमुद्भुता ये ते दायादकाः स्मृताः ।
मनःप्रियाश्च ये मित्रास्ते प्राणसदृशाः स्मृताः ॥ ५ ॥

एकोदर प्रसवले ते गोत्रज म्हणीजे : आणी मनेंकरौनि जो आपला संगातें प्रीती धरि : ते मीत्र प्राणसदृस जाणावे :" ऐसें आईकौनि ते म्हणे : "तरि ते वांनरी असैल : तरि तीयचेनि सानुरागें : असका दिवस [**मू.** दिव**श**.] राहातोसी : यणें कारणें तुं मजसी नांवंएक दुचीता आहेसी : माझें अभीळाषित ना करिसी : रात्रीं तुज नीद्रा न ये : म्हणौनि धृतपण [सं. धूर्त+पण. 'धूर्त' शब्द 'धृत' असा लिहिला आहे. या ठिकाणी सं. पंचतंत्रात 'तते **धूर्त** हृदि स्थिता प्रियतमा' 'सार्ध मनोरथशतैस्तव **धूर्त** कान्ता' असा **धूर्त** हाच शब्द आलेला आहे. पुढील रूपे पाहा : 'तिये अग्नीचा **धूम** नीगे' (संनरुस्व. २३२०). येथे धूम्र>धूम.] करीतोसी [**मू.** करि**तें**सी.] :" ऐसें आईकौनि [**मू.** **या**इकौनि.] मगरू स्त्रीयतें म्हणे ॥ उक्तं च ॥

मयि त्वत्पादपतितेकिङ्करत्वमुपागते ।
प्रिये कामातुरः कोपं कान्ते कोऽन्योऽपनेष्यति ॥ ६ ॥

“मी तुझें पाइं पडतों [पाया पडतो. पुढे ‘**पायां** पडतोसि’ असे रूप आलेलेच आहे.] : मी तुझा किंकरु [(किं करोमि—असे म्हणणारा, आज्ञाधारक)] सेवकु : प्रीये मजवरि कोपु नको करूं : तो माझा मीत्रु : ते वांनरि नोहे :” ऐसें तयाचें वचन आइकौनि ते रूदन करीत जाली : “आरे धुर्ता : तुवां ते स्त्री मेळवीली आसे : माझीया मनापुरता पायां पडतोसी ॥ उक्तं च ॥

सार्धं मनोरथशतैस्तव धूर्तकान्ता सैव स्थिता मनसि कृत्रिमभावरम्या ।
अस्माकमस्ति न च किंचिदिहावकाशः तस्मात्कृतं चरणपातविडम्बनाभिः ॥ ७ ॥

आरे धुर्त्ता : शतप्रकारें ते तुझी स्त्री ऐसें जानीतलें : तेचि तुझीय मनीं रात्रीदिवस वसे : माझीया मनापुरता : कुत्रीम [**मू.** क्रुत्तीम.] भावो आणीतोसी : मजसी [(मला)] तुज [(तुझ्याजवळ, तुझ्या हृदयात)] अवकासु नाहि [(जागा नाही)’. तुझ्या मनात ती वानरीच भरून राहिली आहे. तेथे मला जागा नाही. सं. चरण ‘अस्माकमस्ति न च किंचिदिहावकाशः’ असा आहे. त्याचे हे भाषांतर होय.] : म्हणौनि पायां पडतोसि : तरि ते तुझी वलभा [सं. वल्लभा>म. वलभा=प्रिया पाहा : ‘साळेया व्यक्ता बोलती : पुंसेयाचीया वलभीसीं’ (संनरुस्व. ८२८).] असे : मज काये?” [असेल ती तुझी वलभा? तिचे मला काय? मला तिची पर्वा नाही.] मागुतें [**मू.** मांगतें. ‘मागुतें’ शब्द अभिप्रेत असावा. म्हणून तो स्वीकारला आहे. ‘मग तें’—असेही असू शकेल.] म्हणे ॥ उक्त च ॥

कपटी त्वं न भवसि अस्माकं वचनं कुरु ।
आनीय तां च मित्रं च अस्माकं तु गृहं प्रति ॥ ८ ॥

“जरि तुं कपटीया नव्हसी तरि तुं माझें म्हणीतलें करि : तो तुझा मीत्रु मर्कटु : तो माझीया घरासी आणी : तयाचें काळज आणी : तें मी भक्षिन : जरि नाणसी तरि देहत्यागु करिन :” ऐसा तीचा नीश्चयो जानौनी : मगरू चींतेकरौनि [चिंतेने, काळजीने.] व्याकुळ जाला : मग स्त्रीयेतें म्हणीतलें ॥ उक्तं च ॥

वज्रलेपस्य मूर्खस्य नारीणां कर्कटस्य च ।
एको ग्रहस्तु मीनानां नीलीमद्यपयोस्तथा ॥ ९ ॥

अनुक्रमणिका

मग म्हणे : “आतां कैसें कीजे? मज तो वांनरु कैसेंनी वस्य होईल?” ऐसा चींतावर्तु जाला : मग स्त्रीयतें म्हणतीलें : “तें काळज मी आणौनी [मी आणीन. ‘आणौनी’ हे प्रथमपुरुषी अनेकवचनी रूप आहे. हे लक्षात घेता ‘मी (आम्ही) आणौनी’ (आणू) असा अर्थ करावा लागेल. तेथेही एकवचनी **मी** हे अनेकवचनाच्या अर्थाने योजले आहे असे मानावे लागेल.] : तुवां अंतकरणीं स्थीर [मू. **स्छी**र.] राहावें :” म्हणौनि नीगाला :

तो थडीयेसी आला : तयातें देखौनि वांनरू म्हणे : “आजी तुवां कां उसीरु लावीला?” तवं तो म्हणे : “जी : मज आणी माझीये स्त्रीयेसी कळहो जाला : मज नीष्ठुर वचनिं निर्भसीलें : ते म्हणे : ‘तुझा येवढा मीत्रु : जयाचेनि आपुली प्रत्येहिं उपजवीका होत आसे : तरि तो मीत्रु माझा देरु लागे : तयासी आपुलीया घरिं भेटावया नाणीजे [मुळात ‘**आ**णीजे’ असे आहे. पुढील वाक्य लक्षात घेता ते ‘**ना**णीजे’ असे पाहिजे. तसे दुरूस्त करून घेतले आहे.] : तरि कृतघ्नु ॥ उक्तं च ॥

ब्रह्मघ्ने च सुरापे च चौरे भग्नव्रते तथा ।
निष्कृतिर्विहिता सद्भिः कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥ १० ॥

॥ तथा च ॥

ददाति प्रतिगृह्णति गुह्यमाख्याति पृच्छति ।
भुङ्क्ते भोजयते चैव षड्विधं प्रीतिलक्षणम् ॥ ११ ॥

तरि तुं माझीया देरासी भेटावया आणी : तयासी मी पांहुंणरु करिन :’ ऐसी माझी स्त्री भर्वसेनी बोलीली : तरि मीत्रा : चाल जाउं माझीया गृहाप्रति : माझी स्त्री सोत्कंठ द्वारदेसीं उभी राहुनी वाट पाहाती असैल : तुझीय भेटीचि उत्कंठा असे :” तवं वांनरू म्हणे : “मगरा : तुझी स्त्रीयें म्हणीतलें तें सत्य : पण तुमचें गृह [मुळात ‘**धो**’ असे लिहिलेले आहे. तेथें **गृ** लिहिण्याचा हेतु असावा.] उदकामाझारी आसें : मी कैसेनी उदकामध्यें यउं? मज तेथें वाट नाही : तरि तुझी अस्त्री येथेंचि आणी : मग मी तियसी येथेंचि भेटैन : नमस्कारू करीन : येथेंचि बरवा सन्मानु करिन :” तवं मगरू म्हणे : “मीत्रा : आमचें गृह उदकामध्यें पण वाळवंटिं आसें : बरवें रंम्य स्थान [मू. **स्छा**न.] आसें : तरि माझीये पाठीवरि बैस : तुज क्षेणांमध्यें घेउनी जाईन : तुवां उदकांआंतु भय ना धरावें :” ऐसा तो वांनरू तयाचिये पाठीवरि बैसला : मग मगरू उदकांआंतु झेपावला [(सं. क्षिप्) उडी घातली. **झेपणे** हा शब्द ‘पोहणे’ या अर्थी वापरला जातो.] : मग मार्गिं

अनुक्रमणिका

जातां समुद्रलहरिं वांनरू झळंबला [बुचकळून निघणे, धुऊन निघणे पाहा : ‘अमृताचां कल्लोळीं चंद्रकळा **झळंबली**’ (शिशु. ४१५); ‘पाय धुनि दाटिले चिनांशुकें : मुख **झळंबिलें** कापुरोदकें : (नरुस्व. ३९५).] : कासावीस [**मू.** कासावी**श**.] जाला : मग म्हणे : “दादो मगरा : हळुहळु चाल : मी कासावीस होत असें :” तें आईकौनि मगरें विचारिलें : म्हणे : “हा वांनरू अगाध उदकांआंतु पडला : मज वस्य जाला : यथौनि जाउं न सके : तरि सांगौं आपुलीये मनींचा अभीप्रावो : जैसें ईष्टदेवतां स्मरे :” मग मगरू म्हणे : “आगा ये मीत्रराया : म्यां तुतें वधावया कारणें नेईजत असें [माझ्याकडून तुला नेले जात आहे.] : तरि तुं ईष्टदेवता स्मर :” तवं वांनरू म्हणे : “म्यां तुझें वोखटें काय केलें : जें मज मारू पाहातोसी?” मग मगरू म्हणे : “आगा ये मीत्रराया : माझीये स्त्रीयेसी तुझेया काळजाचा डोहळा : भक्षावयाचा होत आसे : ते म्हणे : ‘ऐसीं जांबुफळें प्रत्यहिं जो भक्षितु असे तयाचें काळीज कैसें गौल्य असैल :’ म्हणौनि तीसि तुझेया ऱ्हुदयाचा डोहोळा जाला : या कारणें तुतें मारावया नेईजत असें :” ऐसें आईकौनि वानरू विचारौनि म्हणे : “आगा मगरा : ऐसें तुझें मनीं असें : तरि वायांची कष्ट केले : तरि तुं मघांचि सांगीतलें नाहि : तरि तें काळज माझेया जांबुवृक्षावरि काढौनी ठेवीलें असें : आमचें पोटीं जरी काळीज होये तरि उडवें ना : काळीज नाहि तरिच उडतों : तरि चाल पां मागुता : मुरड वेगीं : तें काळीज तुझे हातिं देउं : जेणेंकरौनि तुझीये स्त्रीयेसी डोहोळे पुरतील : तें काळज तुझीये स्त्रीयसी उपेका [सं. उपयोग > म. उपे**ग** = उपे**क**.] न ये तरि माझें काय जीनें? तरि चाल पां मागुता जांबुवृक्षाप्रति : तें काळज घेउं :” ऐसें वानराचें वचन आईकौनि मगरू सानंदु जाला : मगरू म्हणे : “बरवें : चाल : काळज घेउं [**मू. देउं**.] : जेणेंकरौनि ते दुष्ट भार्या अनाशनांवेगळी होये : तरि तुतें जांबुवृक्षावरि [जांबुवृक्षापर्यंत. **वरि**=वेऱ्ही (पर्यंत) >वेरी>वरि. पाहा : ‘देवा हें विविध कानी आइकिजे । परि अझुइं**वरि** त्रास नुपजे’ (ज्ञाने. १·२६१) अझुइं**वरि**=अजून**पर्यंत**; ‘व्याधि आणि वरी : कोवळीं जवंचि**वरी** : तवं तोडावीं सर्व प्रकारीं : जाणतेनि’ (शिशु. ४६८). तंत्र ३. काकोलुकीय. कथा ५. पाहा. तंत्र ४. लब्धप्रणाशन. कथा ७. ‘लाकुडे**वरि**’ रूप आले आहे, ते पाहावे.] घेउनी जाईन :” ऐसें म्हणौनि मुरडला : वांनरू थडीये आणीला : थोरें श्रमें उतर्ला : मगरू थडिये उभा राहिला : वांनरू जांबुवृक्षासी वळंघला : मग म्हणे : “भले वांचलौं : येणें दृष्टें [सं. दुष्ट हा शब्द जुन्या मराठीत **दृष्ट** असाही लिहिला जात असे. पाहा : ‘देवा जियालेपणें जगु । धरितिं तूझां ठांइं अनुरागु । आणि **दृष्टां** तेया भंगु । अधिकाअधिकु’ (ज्ञाने. रा. ११·४९९). पुढे तंत्र ५. कथा १० पाहा.] मारिलें होतें : आजी दुसरें [**मू.** दु**श**रें.] जन्म जालें याचा विस्वासु धरूं न ये ॥ उक्तं च ॥

न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्तेऽपि न विश्वसेत् ।

अनुक्रमणिका

विश्वासाद्भयमुत्पन्नं मूलादपि निकृन्तति ॥ १२ ॥

जयाचा अनविस्वासु येक वेळें जाला आसे : तयाचा वीस्वासु न करावा : कां? जरि वीस्वासु तयाचा करि तरि तो समुळ क्षयातें करि : तैसें मज जालें होतें : जें येणें मगरेंसी मैत्रीकी केली :" ऐसें जवं वीचारीतु असे : तवं मगरू म्हणे : "दादो ऱ्हुदये दें : तेणेंकरौनी तुझी भाउजै अनाशना-पासौनि उठील :" ऐसें आईकौनि वांनरू हासौनी बोलीला : "आरे मुर्खा : तुं नेणसी : ऱ्हुदय काय देहावेगळे आसें? तरि तुझें जळो ज्यालें [जीयालें, जीवित, जिवंतपण. जीयालें> ज्यालें.] : आरे वीस्वा[स*]घातका : तुं येथौनि जायें : तुज मज मैत्रत्व नाही :" ऐसें आईकौनि मगरू चिंतीता जाला : मग म्हणे : "मी कैसा मुर्ख : जें म्यां यापुढें आपुला अभिप्रावो सांगीतला : तरी कवणी येकी परि हा [मू. **हार** चुकून **र** जास्तीचा लिहिला गेला असावा.] मागुता विस्वासील : तरि तेथें नेइन :" मग म्हणे : "मीत्रा : म्यां हास्य करौनि [हासून, सहज गमतीने. सं. हास्य=विनोद, थट्टा, असाही अर्थ आहे. मूळ संस्कृत वाक्यातही (मित्र, हास्येन मया तेभिप्रायो लब्धः) हाच शब्द आहे.] तुझें चित्त पाहिलें : तियेसी ऱ्हुदयें कांहि प्रयोजन नाहि : तरि चाल पां मागुता पाहुनरालागी आ[मु*]चीया घरिं : तुझी भाउजै उतावीळपणें वाट पाहाति असैल : तवं वांनरू म्हणे : "आरे दुष्टा : तुं जाये : मी न यों : गंगदत्ता बेडुकाचेयापरि मी मागुता तया स्थानां [मू. **स्छा**नां.] न यों : तुज वीस्वासुं न ये"
॥ उक्तं च ॥

बुभुक्षितः किं न करोति पापं क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति ।
आख्याहि भद्रे प्रियदर्शनस्य न गङ्गदत्तः पुनरेति कूपम् ॥ १३ ॥

मगरू म्हणे : "हे कैसी कथा?" वानरू सांगे :

कथा १*
गंगदत्त बेडूक

"कव्हणें यकें कुपीं गंगदतु नावें बेडुक होता : तो बहुताकां दीवसीं दायादीकीं पराभवला : मग तो राहाटमागें बाहिर नीगाला : मग तेणें

अनुक्रमणिका

वीचारिलें : ‘आतां या दायादा [मू. दयादा.] कैसी सीक लावावी? यासि प्रत्यपकारू [मू. प्रत्युपकारू. हा शब्द उघड चुकीचा आहे. मूळ संस्कृतांत ‘कथं तेषां दायादानां प्रत्यपकारः कर्तव्यः’ असे आहे. त्याप्रमाणे दुरूस्त करून घेतले आहे.] बरवा केला पाहिजे :’

आपदि येनापकृतं येन च हसितं दशासु विषमासु ।
अपकृत्य तयोरुभयोः पुनरपि जातं नरं मन्ये ॥ १४ ॥

ऐसें म्हणौनी कृष्णसर्पातें बीलद्वारिं प्रवेसीतां देखीलें : मग म्हणे : “यातें तेथे नेउं : ईतुकेनी आवघे दायादीक खावबुं ॥ उक्तं च ॥

शत्रुणा योजयेच्छत्रुं बलिना बलवत्तरम् ।
स्वकार्याय यतो न स्यात्काचित्पीडात्र तत्क्षये ॥ १५ ॥

शत्रु जो [मू. जे.] तो मोटें तिक्ष्ण शस्त्रेंकरौनी उन्मळावा : जैसें कंटकेंकरूनि कंटकु फेडीजे :” ऐसें विचारौनि गंगदत्तु तया सर्पाचें बीलद्वारें गेला : तया सर्पाप्रती बोलौं आदरिलें : “आगा जी सर्पराया : साउमां यें :” तवं तो प्रीयेदर्शनु सपुं म्हणे : “हा कवणु पां? येकाधा मंत्रवादि मातें धरावया आला असैल : ना तरि सर्पिणी येकाधी माझीया सौंदरियासि [(सौंदर्याला)] टाकौनि आली आसैल [(प्राप्त करून घेण्यासाठी आली असेल).] : तरि बाहिरी न नीगीजे : येथौनी मनासी आणीजे : कवणाचा विस्वासु करूं न ये” ॥ उक्तं च ॥

यस्य न ज्ञायते शीलं न कुलं न पराक्रमः ।
न तेन संगतिं कुर्यादित्युवाच बृहस्पतिः ॥ १६ ॥

मग हळुचि बाहिरि नीगौनि पाहे : तवं स्वजातीचा नव्हे : मग म्हणे : “तुं कोण गा : मातें बोलावीत आहेसी?” येरू म्हणे : “मी गंगदत्तु : बेडुकाचा [मू. बेडकाची.] राजु : तुजजवळी मीत्रपणालागी आलां :” मग सर्पु म्हणे : “हें अनुचीत : त्रुणासी [मू. त्रुणचरासी. (हे उघड चूक आहे. ‘तृणानां वन्हिना सह संगमः’ असे संस्कृत वाक्य आहे. त्याप्रमाणे दुरूस्त करून घेतले आहे.)] आणी आग्नीसी कोठे मैत्रि आसे?
॥ उक्तं च ॥

यो यस्य जायते वध्यः स स्वप्नेऽपि कथंचन ।

अनुक्रमणिका

न तत्समीपमभ्येति तत्किमेतत्प्रजल्पसि ॥ १७ ॥

जयासि जो वध्यु होये : तयासी मैत्री केवि घडे?” ऐसें आईकौनि गंगदत्तु म्हणे : “तुं म्हणसि तें साच : जें तुं सहज आमचा वैरी ['जें तुं आमचा सहज वैरी' (स्वाभाविक वैरी, जन्मजात शत्रू) असा अन्वय करून अर्थ लावावा.] : पण दायादीकीं पराभवीलें : म्हणौनी तुजजवळी आलौं” ॥ उक्तं च ॥

सर्वनाशे समुत्पन्ने प्राणानामपि संशये ।
अपि शत्रुं प्रणम्योच्चै रक्षेत्प्राणान्धनानि च ॥ १८ ॥

मग सर्पु म्हणे : “तुज कवणें पराभवीलें?” याउपरि गंगदत्तु सांगे : “येका कुपामाझारि माझे दायाद असती : तेहिं मज पराभवीलें : तयातें तुं भक्षी :” तवं सर्पु म्हणे : “आम्हांसी प्रवेसु नाहि : उदक पुर्ण आसे : प्रवेशलेयां राहावयासि स्थान [मू. स्छान.] नाहि : तरि माझेंवस्तु [माझ्याकडून, माझ्यास्तव.] न येववें : तु जायें :” मग गंगदत्तु म्हणे : “तुं चाल : तुतें सुखें घेउनी जाईन : कुपामाझारि उदकाजवळी कोटर असें : तेथें राहाविला असतां तुं बळीया माझीया दाया[दा]दिकातें ग्रासीसी :” तें आईकौनि सर्पु चींतीता जाला : मग म्हणे : “मी क्षुधार्थु [क्षुधार्त, भुकेला.] हींडें : परि बेंडुक कहिं न भेटे : आणी मज जीवन-उपावो होईल : तरि जाउनि सुखें बेडुक भक्षण करूं” ॥ उक्तं च ॥

योहि प्राणपरिक्षीणः सहायपरिवर्जितः ।
स च प्रयत्नादापन्नां वृत्तिमाचरते बुधः ॥ १९ ॥

ऐसें सर्पु विचारि : तवं सर्पाप्रति बेडुक म्हणे : “मी तुतें बरवें मार्गें घेउनी जाईन : तरि यक वेळें [एक वेळी, एकाच वेळी, एकदम.] तयातें तुवां न भक्षावें : जो जो मी दाखवैन तोच तुवां भक्षावा :” येरू म्हणे : “आम्हां तुम्हां यसेनें मीत्रत्व जालें : तरि तुं म्हणसी तोच भक्षीन :” ऐसें बोलौनि दोघै नीघाले : कुपाची थडी पावले : मम राहाटमार्गें मध्यें नीगाले : तया उपरि सर्पातें कोटरीं राहावौनि [राहायला लावून; ठेवून.] : तयाकरवीं दायाद खावीविले : हळुहळु [(कारण, सर्व बेडूक एकदम खाऊ नये असे गंगदत्ताने सांगितले होते, म्हणून)] वीस्वासौनि [आपल्या ठिकाणी गंगदत्ताचा विश्वास उत्पन्न करून.] सर्वहि भक्षीले : याउपरि बेडुक सरले : सर्पु म्हणे : “गंगदता : तुझे वैरि अवघे सरले :

अनुक्रमणिका

तरि मज आतां भोजन वीचारिं [(ज्याअर्थी) तुवां मज येथे आणीलें (त्याअर्थी) ‘आतां मज **भोजन वीचारिं** (माझ्या भोजनाचा विचार कर). ज्याअर्थी तू मला येथे आणलेस त्याअर्थी आता यापुढेही माझ्या भोजनाची व्यवस्था तू केली पाहिजेस—हा भावार्थ.] : आणी जेणें कारणें तुवां मज येथें आणीलें :” मग गंगदतु म्हणे : “तुवां माझें गोमटें कार्ये केलें : तरि आतां येनें घटीका-यंत्रें बीजें करीं :” तवं सर्पु म्हणे : “मी आतां कवणा स्थाना [**मू. स्छा**ना.] जाइन? माझें बील आनीकें व्यापीलें असैल : तरि तुं आपुलीये [(तुझ्या स्वतःच्या)] पैकीचा [(समुदायातील)’—तुझे शत्रू तर मी खाल्ले. आता राहिले ते तुझे बेडूक, त्यातून. पैक : समुदाय, समूह. पाहा : ‘तवं बोलीला भीमकु : आमतें जो असे कवीपैकु : तो एकएका देशा धाडुं एकएकु : विचारूं क्षेत्रियांतें’ (नरुस्व. १२४). या ओवीवरील टीपेत देखील ‘पैक=समूह’ असाच अर्थ दिलेला आहे. **पैकिं** हे सप्तमीचे रूप होय. पुढे तेच ‘अव्यय’ म्हणून उपयोगात येऊ लागले. नरुस्व. १२४ या ओवीतील ‘पैकू’ हा पाठ चुकीचा असून तो मूळ पाठ **बैकू** असावा असे श्री. देवीसिंग चौहान सुचवतात. (मराठी आणि दक्खिनी हिंदी पा. १५) पणे ते बरोबर नाही. रुक्मिणी स्वयंवराच्या सर्व पोथ्यांत ‘पैकू’ हाच पाठ आहे. टीपकाराने देखील **पैकू** याचाच ‘समूह’ म्हणून अर्थ दिला आहे. **पैकू** हाच शब्द जुन्या काव्यात अन्यत्रही आढळतो. उदा० : ‘कें स्वर्ग के मृत्यलोकु । हा असाध्य सोईरीकेचा **पैकु**’ (२४१); ‘देवें द्वारके पाठवीला दारूकु । आणवीला व्रज**पैकु**’=गोकुळातील (लोकांचा) समूह. (प्राचीन मराठी कविता. खंड ६. नृसिंहकृत रुक्मिणी स्वयंवर संपा. : ज. शा. देशपांडे व कृष्णदास महानुभाव). **पैकी** या अव्ययरूप सप्तम्यंत रूपावरूनही तीच गोष्ट स्पष्ट होते.] येकु येकु बेडुक प्रत्यहिं दें : यऱ्हवीं अवघे भक्षीन :” तें आईकौनि गंगदतु चींतीता जाला : मग म्हणे : “म्यां काय केलें : आपणासी मृत्य कैसा घरासी आनीला : आतां यातें वारिन तरि हा आवघेंयातें भक्षीतु : म्यां अमित्रु तो मीत्र केला : म्हणौनि ऐसें पावलौं ॥ उक्तं च ॥

अमित्रं कुरुते मित्रं वीर्याभ्यधिकमात्मनः ।
स करोति न संदेहः स्वयं च विषभक्षणम् ॥ २० ॥

जो आपणयाहोउनी [(आपल्याहून, आपल्यापेक्षा)] अधीक [(श्रेष्ठ, बलवान)] : ऐसा [(ऐशा, अशा)] [अ*]मीत्रातें [(शत्रूला)] मीत्र करि [तेणें०.] : तेणें स्वयें विशभक्षण केलें ऐसें जाणावें : तरि आतां एकु एकु [**मू.** ऐकु०.] प्रतदीनीं देउं : मग आपणयातें वाचउं :” यापरि प्रतदीनीं येक येक मडुक देता जाला : मग गंगदताचा पुत्रु येमुनादतु तोही भक्षीला : तें आईकौनि गंगदतु थोर वीळाप करूं लागला : मग तया गंगदताची स्त्री म्हणे : “आतां काये रोदनां करीतोसी? कुटुंबघातका चांडाळा : पापीया : आतां तुतें सर्पु खाईल : आतां तरही येकाधा ठावो करसी [एखादे दुसरे स्थान करशील, दुसरे घर करशील, दुसऱ्या ठिकाणी जाशील तर वाचशील.] तरि वांचसी :” सर्पाकरी [सर्पाने. पूर्वी करि आला आहे तो पाहा.] आवघे बेडुक खादले : याउपरी सर्पें म्हणीतलें : “गंगदता : मी भुकेला जालों : आतां मज आहारु देईं : जेणें [**मू.** ‘**जणे**’.] कारणें [‘जेणें कारणें (ज्याअर्थी) तुवां मज यथें आणीलें, (त्याअर्थी) आता मज आहारू देईं’—असा अन्वय. वाक्यरचना लक्षात घेण्यासारखी आहे. मागील पानावर हेच वाक्य याच रचनेत आलेले आहे.] तुवां मज यथें आणीलें :” मग गंगदतु म्हणे : “अगा ये मीत्रा : येविखीं [या विषयी, या बाबतीत. पाहा : ‘आगा आत्मजेचां **विखिं** । जैसा जीउ निराभिलाखी’ (ज्ञाने. १२·१३१).] चींता

अनुक्रमणिका

न करावी : जरि मातें सोडसी तरि आणीके कुपीहोउनि [इतर कूपाहून, कूपापासून.] : आणिक बेडुक वीस्वासौनी तुजपासि आणीन :” मग सर्पु म्हणे : “ऐसें जरि करसी तरि तुं [मा*]झा मीत्रु बंधु जालासी : तुतें भक्षें ना :” मग तो गंगदतु राहाटयंत्रमार्गें बाहिर नीगाला : तवं सर्पु तयाची वाट पाहे : तवं बहुत दीवस जाले : मग सर्पें गंगदताची [सामान्यरूप केलेले नाही. मूळ संस्कृत कथेत गंगदत्ताला शोधून आणण्यासाठी तेथील एका ‘गोधा’ (=पाल, सरडा) याला पाठविले असे आहे. आपल्या प्रतीत गंगदत्ताच्या पत्नीलाच पाठवल्याचे म्हटले आहे. कथेचा शेवटचा भाग लक्षात घेता ते बरोबर वाटत नाही.] स्त्रीसी म्हणीतलें : “आवो : तुं गंगदताचि सुधीसी जायें [शोध करण्यासाठी जा. **सुधी** (सं. शुद्धि)=शोध. पाहा : ‘तीकडौनि कोण्ही यत दीसे : तरि जाउनि **सुधि** पुसे’ (ज्ञाप्र. ९८९).] : त्यासी पाचारुनी ये [(बोलावून निरोप सांगून ये.)] : आणी मेडुकहि न धाडी [(बेडके पाठवू नकोस, पण तू ये. कारण)] : तरि तयातें म्हणावें : तुजवीण प्रीयेदर्शनांसि घडिभरि असवें ना [असा या वाक्यांचा अन्वय करावा. ‘येन आगम्यतां एकाकिनां अपि भवता द्रुततरं, यद्यन्ये मण्डूका नागच्छन्ति’—(इतरबेडके येत नसतील तर तू एकटा तरी लौकर निघून ये) असे मूळ संस्कृत वाक्य आहे. त्याच्या अनुषंगाने मराठी वाक्यांचा वरीलप्रमाणे अर्थ लावता येईल. असवत नाही, राहावत नाही. ‘हे माझी भाख’=वचन, शपथ, आण.] : आतां तुज जरि वोकटें करि तरि हे माझी भाख :”

ऐसें तयाचें बोलनें आईकौनि गंगदताची स्त्री सुधीसी नीघाली : मग यउनी म्हणे : “गंगदता : तुझी वाट सर्पु पाहातुसे : तरि तुं वेगां जाये : आणी तेणें आपुलें सुकृत आड केलें आसें [त्याने आपले पुण्य मध्ये घातले, पणाला लावले. आपण जर काही वाईट करू—तुला खाऊ—तर आपले पुण्य जाईल—अशी त्याने शपथ घेतलेली आहे.] : तुज वोखटें न करि : आतां नीसंक होउनी जायें :” ते आइकौनि गंगदतु म्हणे : “प्रीये : तुं वेडी आहेसि : क्षुधेपुढें कवणांचें सुकृत : आणी कवणाचि भाख? ॥ उक्तं च ॥

> बुभुक्षितः किं न करोति पापं क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति ।
> आख्याहि भद्रे प्रियदर्शनस्य न गङ्गदत्तः पुनरेति कूपम् ॥ २१ ॥

भुकेला पुरूषु काये पापातें न करि? द्रव्यें क्षीण [मू. क्षेण.] जाले जे नर ते निर्दय होति : निष्करुण [मू. निष्कारण.] होती : तरि प्रीये : तुवां जाउनि प्रीयदर्शनासि ऐसें सांघावें : जें गंगदतु मागुता कुपाप्रती न ये :”

मग वांनरू म्हणे : “मगरा : हे कथा या कारणें सांगीतली : म्हणौनि पापीया जळचरा : तुं जायें : आतां मी न यें :” मगरू म्हणे : “तुं न येसी तरि मी अनशन [मू. अणाशन.] व्रत घेउनी देहेत्यागु करैन :” वांनरू म्हणे : “चांडाळा : मी काये लंबकर्णु रासभु? ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

दृष्ट्वा प्रत्यक्षदोषं च सिंहं दृष्ट्वा च दारुणम् ।
शृगालेन पुनर्नीत्वा सींहेन रासभो हतः ॥ २२ ॥

प्रत्यक्ष सीहं ऐसा [मू. ऐसा.] देखौनि : मागुता कोल्हेनी रासभु [मू. राषभु.] आणौनि : सीहाकरवीं लंबकर्णु रासभु [मू. राषभु.] मारवीला :” मगरू पुसे : “ते कथा कैसी?” वांनरू सांगे :

कथा २*
धूर्त कोल्हा व कामातुर गाढव

“कोन्ही येकें वनीं : कराळकेसरी [मू. ०केशरी.] नांव सीहुं होता : तयाचा सेवकु कोल्हा असे : तो सींहुं कीती येकां दीवसां अक्षमु जाला : पारधीसी जाववें ना : मग कोल्हयातें म्हणे : “मी भुकां [(भुकेने)] अडलौं [(अडलों, अडचणीत आलो = पीडलो) **अडणे** : पाहाः ‘सिसुपाळ नांवाचेनि महारोगें. : देवा **अडलीं** माझीं सर्वांगें’ (नरुस्व. ६८०).] : मजकारणें कांहि येक स्वापद आणी :” मग तो कोल्हा पारधीसी नीगाला : तवं नदी येकीचां उपकंठीं मोटाधाटा गधडा एकु [मू. ऐकु.] चरतां देखीला : तयाजवळी कोल्हा गेला : तयातें म्हणे : ““मामो : काई करतोसी? तुज लेंकुरवें कीती?” तो म्हणे : “आम्हांसी वीवाहो जाला नाही :” तवं कोल्हा म्हणे : “आमचें गावीं गाढवीया तीन तरुणीया आसती : तारुण्यपणाचेनी माजें परस्परावरि वळंघताती : तेही मज म्हणीतलें : ‘तुं कोन्हा [य*]कीं गांवा जाउनी आम्हांयोग्य भ्रतारू आणी :’ तरि तुजप्रती मी आलौं : जरि तुझे मनीं अस्त्री करणें असैल तरि चाल :” ऐसें तया कोल्हयाचें वचन आईकौनि गाढउ कामें वीव्हळ जाला : येउनि कोल्हयाचें पायां पडला : म्हणे : “कोल्हादादो : आमचें घरबार [घरातील संसार, (सं. गृह >म. घर+भार) =गृहस्थाश्रम.] मांडतें करि [मांडून द्या, लावून द्या. आमच्या गृहस्थाश्रमाची, संसाराची व्यवस्था लावून द्या.] : मी रेव करित आसें [मी विनंती करतो, याचना करतो. रेवणे : अडकून पडल्यामुळे ओरडणे, कण्हणे. लक्षणेने, मदतीसाठी याचना करणे.] :”

॥ उक्तं च ॥

नामृतं न विषं किञ्चिदेकां मुक्त्वा नितम्बिनीम् ।
जीव्यते सङ्गतो यस्या म्रियते च वियोगतः ॥ २३ ॥

॥ तथा च ॥

यासां नाम्नापि कामं स्यात्संगमं दर्शनं विना ।

अनुक्रमणिका

तासां संगप्रसंगेन न नरो द्रवति कौतुकम् ॥ २४ ॥

येकी नीतंबीनी शोडशवार्शीकी : ते वीखहि म्हणीजे : आणी आंमृतहि [म्हणीजे*] [येथे मुळात 'भक्षिजे' असे आहे. पूर्वापर संदर्भावरून 'म्हणीजे' हाच शब्द तेथे असला पाहिजे. त्याप्रमाणे दुरुस्ती सुचवून पाठ स्वीकारला आहे. 'भक्षिजे' या पाठाने अर्थही नीट होत नाही.] : जीचेनि वियोगें पुरूश मरती : आणी संगेंकरौनि जीती : त्या स्त्रीयचेनि नामें [(नावानेच, नाव ऐकताच, स्त्री असा नुसता शब्द ऐकला तरी)] पुरुषासी कामु होये [(मदन जागृत होतो, उपभोगाची इच्छा निर्माण होते).] : ते स्त्रीयचेनि संगमें पुरुश द्रवे [पुरुषाचे वीर्य स्खलन होते.] येथें काय नवल?" तवं कोल्हा म्हणे : "मामो : नोवरि पाहावया चाल : तुझीया मनां इल [येईल. 'इल' हे रूप ग्रामीण भाषेत आजही वापरले जाते.] ते नोवरि तुजकारणें करूं :" म्हणौनि तो लंबकर्णु ['लंबकर्ण' याचे उच्चारांतरित लेखन.] गाढउ तया कोल्हासंगाते नीगाला : तवं पुढां तेणें लंबकरणें गाढवें [सीं]हुं देखीला : देखौनि गाढउ पळाला : तवं कोल्हा सीहातें म्हणे : "तुजपुढांहोउनी [तुझ्या समोर येऊन सुद्धा. (तव समीपे **भूत्वा** = होउनि); तुझ्या समोरून. 'भूत्वा' या अर्थाने आलेल्या 'होउनि' या धातुसाधितापासूनच 'हून' हा पंचमीचा प्रत्यय मराठीत आला आहे. (गोप्रच. प्रस्ता. पा. ४४–४६ पाहा.)] गाढव पळाला : तुझें बळ इतुकेंचि आसें : तरि तुवां आतां ऐसें करावें : जाळीआंतु लपुनी राहावें : मागुतें गाढवासी मी बुधीचि आणिन [बुद्धी करून, युक्तीने आणीन.] :" मग तो कोल्हा लंबकर्णा गाढवापासि गेला : मग म्हणे : "मामो : तुं कां पळालासि?" तवं तो म्हणे : "म्यां सीही देखीला (ली) :" मग कोल्हा म्हणे : "तुतें भेडावयाकारणें [भिवविण्यासाठी. सं. भ्रष् > म. भेड = भीति. **भेडविणे** : भीति दाखवणे, भिवविणे. पाहा : 'यशोदा **भेडविला** : तैं करुणांरसु उठेवला' (वछा. ५२); 'तव चैद्यू म्हणे : हें मातें काइसें **भेडवणें**' (शिशु. ८६४). सं. भ्रेष् (भिणे) पासूनच **भेड** = भ्याड हा मराठी शब्द आला आहे. भेड=भ्याड : पाहा : 'तेथ **भेडांची** कवण मातु । काचेयां केरु फीटतु' (ज्ञाने. १·१३४).] सीहाचें कातडें नोवरियां आंगीं घातलें होतें : ते म्हणे : 'भर्तारु भेड कीं धीट असे?' तरि ते मदनमोहनी गाढवी : तुझें रूप देखौनी विरहज्वरें व्यापीली आसे : ते म्हणे : 'लंबकर्णु मीळे तरिचि प्राण वांचे :' तरी तीचा प्राण गेलेयां तुज हत्या घडैल : तरि तुं चाल : ते तुझी वाट पाहाती आसे :" ऐसें कोल्हयाचें वचन आईकौनि : लंबकर्णु मदनें व्यापीला : मग म्हणे : "चाला :" ॥ उक्तं च ॥

स्त्रीमुद्रां झशकेतनस्य जयिनीं सर्वार्थसंपत्करीं
ये मूढाः प्रविहाय यान्ति कुधियो मिथ्याफलान्वेषिणः ।
ते तेनैव निहत्य निर्दयतरं नग्नीकृता मुण्डिताः
केचिद्रक्तपटीकृताश्च जटिलाः कापालिकाश्चापरे ॥ २५ ॥

ऐसें कोल्हयाचें वचन आईकौनि मागुता तो गाढउ तयासवें नीघाला : तो सीहापासी नेउनी मारवीला :

सीहु उदकस्थाना [मू. ०स्छाना.] आंघोळीसी गेला : कोल्हा मागें राखणा ठेवीला : तेणें कोल्हेनीं त्या गाढवाचें कान आणी ऱ्हुदय खादलें : तवं सीहं स्नान करौनि आला : तवं ऱ्हुदये कान न देखेचि : तवं सीहं म्हणे : “हा रे : कोल्हया : तुवां याचे [मू. आचें.] कान कां उचष्टीले?” तो म्हणे : “यासी [मू. आसी.] कान आणी ऱ्हुदय आधीच नोहतें : जरि ऱ्हुदये कान असते तरि हा मांगुता येता ना ॥ उक्तं च ॥

आगतश्च गतश्चैव सिंहं दृष्ट्वा तु दारुणं ।
अकर्णहृदयो मूर्खो गत्वा यो पुनरागतः ॥ २६ ॥

पहिलें आला : मग सीहुं दारूण देखौनि गेला [‘**दारूण** (भयंकर) सीहुं **देखौनि**’.] : तरि सीहं देखीला : पाहीलें : ऐसें जाणौनि [असे माहीत असून देखील.] मागुता आला : हा कर्ण आणी हुर्दयरहित :” ऐसा बोलु सीहुचेया [सिंहाच्या. सामान्यरूप पाहा.] मना आला : मग दोघीजन खाउं लागले :”

ऐसी कथा वांनरें मगराप्रति सांगीतली : मग म्हणे : “मगरा : तैसा मी मुर्ख नोहें : तुझेनि बोलें मागुता येउं : आणी तुं स्त्रीजितु [बायकोकडून जिंकला गेलेला. बायकोच्या स्वाधीन. स्त्रीयां (बायकोकडून)] : स्त्रीयां चाळविलासी [(चळवला गेला आहेस, नाचवला आहेस). तू पत्नीच्या पूर्णपणे ताब्यात आहेस, हा भावार्थ.] : मज तुज अंतर पडलें : स्त्रीयां जीकीला [जिंकला गेलेला. ‘**जि**कणे’ असे रूप (निरनुस्वार ‘जि’) आहे हे लक्षात घ्यावे. ग्रामीण भाषेत ते वापरले जाते.] पुरुशु काये काये न करि? ॥ उक्तं च ॥

न किं दद्यान्न किं कुर्यात् स्त्रीभिरभ्यर्थितो नरः ।
राजाश्वो यत्र ह्रेषते प्रधानो कृतमुण्डनः ॥ २७ ॥

स्त्रीजीतु पुरुशु काये नेदी आणी काय न करि? जैसा राणीयां राजा घोडा करौनि हीसवीला : आणी प्रधानस्त्रीयां प्रधानाचें मुंडन करवीलें :” “हे कैसी कथा?” मगरु पुसे : वांनरू सांगे :

अनुक्रमणिका

कथा ३*
स्त्रीजित राजा व प्रधान

"कोन्हे येके नगरिं रायाचि राणी : आणी प्रधानाची राणी : दोघी बहीनी असति : तवं धाकुटि बहिणी [मू. बेहिणी.] वडीली बहिणीतें पुसे : "तुं भरतारासि कैसी आवडतीसी?" ते म्हणे : "राजा मजवरि बहुतसाल प्रीति करितुसे : ते तुज आजी प्रचीत दाखवैन : माझे घरिं येकीकडे तुवां उगलेंचि बैसावें आणी चरित्र पाहावें :" मग राणीया नीद्रा [मू. नीड्रा. (सकळ सकेत ड = द).] केली : तवं रावो सभा विसर्जौनि [मू. विशर्जौनि.] राणीवासां आला : तवं राणी कोमाईली देखीली : तवं राजा म्हणे : "कां खंति करतेसी? तुझें मनीं काय आसें तें सांग : तीतुकें करिन मी :" तवं ते राणी बोलीली : "मज आवघड [(=संकट) मांडलें आसें' माझ्यासमोर संकट उभे राहिले आहे.] मांडलें आसें :" राजा म्हणे : "तें कैसें? सांग :" राणी म्हणे : "तुम्ही कटकीं गेले होते : तै मज थोर अवस्ता लागली असे : तेधवां म्यां हुडेचिये [(हुड्यातील, किल्ल्यातील किंवा बुरुजावरील). 'हुडा' हा मूळ कानडी शब्द असून त्याचा अर्थ किल्ला असा आहे. मराठीत त्याला 'बुरूज' हा अर्थ आलेला आहे. श्री. देवीसिंग चौहान या शब्दाची व्युत्पत्ति 'ऊर्ध्वकम्' पासून लावतात (मराठी आणि दक्खिनी हिंदी. पा. १०) पण ती पटत नाही.] जाखमातेसी [यक्षमाता देवीला. **जाखमाता** जाखाई नावाची देवता. 'जाख' हे देवतेचे नाव. तिला 'माता' असे म्हटले आहे.] नवस नवसीलें होतें : राव गौसांवि सुखें सम (मा)धान (नें) येतिल : मग मी रायातें घोडा करौनि [मू. **को**रौनि.] : पाठीवरि बैसोनि [मू. बैसौ**सु**नि. (प्रत लेखकाच्या मनातील 'बसोनि' व 'बैसुनी' या दोन रूपातील संभ्रम येथे प्रगट झाला आहे.)] हीसु करवीन : ऐसा नवसु नवसीला आहे :" तवं राजा म्हणे : "कां नाही? बरवें : पण हा नवसु येकांतीं स्थानीं [मू. **स्छा**नीं.] करावा :" तेधवां राजा घोडा जाला : पाठीवरि जीणु घातला : तोंडिं कडियाळें [याचा मूळ अर्थ 'कडे' किंवा 'कड्याचे वळे, कड्याचा गोल' — (सं. कटक + वलय) असा आहे. संस्कृतमधे 'कटक' = कडे; 'वलय' = कडे, किंवा हातात घालायचा वर्तुळाकार अलंकार, असे अर्थ आहेत. वर्तुळाकार कडे (कटकाचे वलय), किंवा नुसते 'कडे'. कटक आणि 'वलय' हे दोन्ही एकाच अर्थाचे शब्द जोडून एक शब्द तयार केला. **कडियाळें** = कडे. पाहा : 'पै आघवांचि रोममूळीं। आलां स्वेदकणीं निर्मळीं। लेइला मोतियांची कडियाळी। आवडे तैसा' (ज्ञाने. ९·५२४); 'कीं गगन लेइलें **कडियाळी** : मृणाळांचीं' (नरुस्व. ५११). घोड्याच्या लगामाच्या एका बाजूने दोन्ही टोकांना लोखंडाचे एक वर्तुळाकार काटेरी कडे बांधलेले असते. ते घोड्याच्या तोंडात घालून मग लगाम लावतात. या काटेरी कड्यालाही 'कडियाळें' म्हणतात. पाहा : 'धरूनि **कडियाळाचां** गोटी : असीवार जुंझताति हातपीटी' (शिशु. १०४८). यावरील टीपेत '**कडियाळें** तें लगामाचे' असा अर्थ दिला आहे. नरेंद्राच्या संपूर्ण रुक्मिणी स्वयंवरातही हा शब्द आलेला आहे. पाहा : 'ऐसे शब्दें बोलताति प्रौढी : घाये देताति मकरतुंडी : धरूनि **कडीयाळाचा** जोडी : आसुडीती असिवारातें' (२००६). यावरून, **कडियाळें** =लगामाला लावलेले, घोड्याच्या तोंडात घालण्याचे लोखंडी कडे, हा अर्थ स्पष्ट होईल.] घातलें : मग राणी पाठीवरि बैसौनि हिसु केला : ते आवघें चरित्र धाकुटी बहिनीनें देखीलें : मग राजा परता निगौनि गेला :

मग धाकुटी बहीण वडील बहीणीतें म्हणे : "मी प्रधानासी बहुत आवडतें : मजवांचौनि प्रधानु कांहि नेणे : तरि तुं माझीया घरासी यें : तुज माझीया भर्ताराची प्रचित दाखवुं :" मग ते ऐरें दीवसीं वडील बहिण धाकुटी

अनुक्रमणिका

बहिनीचेया घरा गेली : घरांआंतु येकीकडे बैसौनि राहिली : तवं प्रधानाची स्त्री पांघरौनि नीजैली : तवं प्रधानु घरासी आला [**मू.** आली.] : स्त्रीयेतें नीजैलें देखीलें : कोमाईली ऐसी देखीली : तवं प्रधानु म्हणे : “कां कोमालीसी? तुज कोणें काय म्हणतीलें : तें सांघे :” तवं ते म्हणे : “मज थोर सांकडें पडलें आहे :” तवं प्रधानु म्हणे : “तें सांघ : मी करीन :” ते म्हणे : “तुम्ही रायासंगातें कटकीं गेले होते : तै दीवस [**मू.** दीव**श**.] लागले : तै मज गोसाविचि अवसरि वाटली [ध्यास लागला, काळजी वाटली. पाहा : “पैं मानसिं जरि । अहिंसेची **अवसरि** । तरि कैंची बाहिरि । बोसंडैल” (ज्ञाने. १३·२९७); ‘आतां आवडि जेथ पडे । तेयाची **अवसरी** पुढें पुढें । रिगों लागे हें घडे । प्रेम ऐसें’ (ज्ञाने. १६·५३), ‘माझी **अवसरी** ते फेडी । विजयाची सांगे गुढी । येरु जीवी म्हणे सांडी । गोठी इया’ (ज्ञाने. मा. १४·४१०); ‘एकले देव नीगाले रामु करी **अवस्वरी** । चला चला म्हणौनि आफावलिया भेरी’ (धवळे. ५·२५) या ओव्यांतील ‘अवसरी’ शब्दाच्या उपयोगावरून त्याचा अर्थ ध्यास, काळजी, चिंता असा होतो हे स्पष्ट होईल.] : तै म्यां हुडेचि काळीकेसी : नवसु नवसीलें होतें : ‘माझा प्राणेस्वरू सुखें समाधानें येईल : तरि मी प्रधानाचि वेणी तुज देईन [केस अर्पण करणे. वेणी=केस, हा सामान्य अर्थ. वेणीदान= केस वाहण्याचा विधी, आजही प्रसिद्ध आहे.] :” ऐसें बोलणें प्रधानें आयकीलें [**मू. या**यकीलें.] : मग विचारौनि म्हणे : “प्रीये [**मू.** प्ररीये.] हा नवसु करावा :” तेधवां तेणें प्रधानें वारिक बोलावीलें : डोई बोडिली : हें आवघें चरित्र वडिल बहिणीयें देखीलें : ते नीगौनि घरासी गेली :

येरें दीवसीं प्रधान रायाचिये : वोळगे गेला : राजेनि अपुरव देखीलें :

राजा म्हणे : “प्रधाना : हे आपु (प) र्व मुंडन [आश्चर्यकारक मुंडण. ‘आपुर्व’ ऐवजी मूळ पाठ ‘अपर्व’ किंवा ‘आपर्व’ असा असावा. पर्व=शुभ काळ, पर्वणी. अशा पर्वणीच्या काळी मुंडण वगैरे करतात. पण तशी पर्वणी (पर्व) नसतांना प्रधानाने मुंडण केले होते. म्हणून ते ‘अपर्व मुंडन.’ राजाने विचारले की, पर्वकाळ (पर्वणी) नसताना मुंडण कसे केले? मूळ संस्कृत श्लोकात ‘अनश्वा यत्र ह्वेषन्ते शिरोऽ**पर्वणि** मुण्डितम्’ असा ‘अपर्व’ शब्द वापरला आहे. त्यावरून आपल्या पोथीतील पाठ ‘आपर्व’ असाच असावा. त्याप्रमाणे दुरुस्ती सुचविली आहे.] काईसें? तुम्ही कोणें यात्रेसी [**मू. आ**त्रेसी.] गेले होते?” तवं प्रधानु उगाचि राहिला : उत्तर न देववें : ऐसा राजा प्रत्यहिं पुसे : तेणें चिंतेकरौनि रोडैला : मग प्रधानाची राणी पुसे : “तुम्ही कां रोडीलेती?” तो म्हणे : “तुझा नवसु मज भारी जाला [भारभूत झाला.] : जेधवांतेधवां राजा पुसतुसे : तयासि उत्तर काय दीजे?” तेधवां ते म्हणे : “राजा जेधवां पुसैल : तेधवां तुम्ही ऐसें म्हणावें : ‘तुमचेनि नवसें माझा नवसु पुर्ण जाला :’ ऐसें म्हणावें :” तेधवां तो प्रधानु येरे दीवसीं रायाचें वोळगें गेला : राजेनी पुसीलें : “हें आपु(प)र्व मुंडन [आश्चर्यकारक मुंडण. ‘आपुर्व’ ऐवजी मूळ पाठ ‘अपर्व’ किंवा ‘आपर्व’ असा असावा. पर्व=शुभ काळ, पर्वणी. अशा पर्वणीच्या काळी मुंडण वगैरे करतात. पण तशी पर्वणी (पर्व) नसतांना प्रधानाने मुंडण केले होते. म्हणून ते ‘अपर्व मुंडन.’ राजाने विचारले की, पर्वकाळ (पर्वणी) नसताना मुंडण कसे केले? मूळ संस्कृत श्लोकात ‘अनश्वा यत्र ह्वेषन्ते शिरोऽ**पर्वणि** मुण्डितम्’ असा ‘अपर्व’ शब्द वापरला आहे. त्यावरून आपल्या पोथीतील पाठ ‘आपर्व’ असाच असावा. त्याप्रमाणे दुरुस्ती सुचविली आहे.] काईसें?” प्रधानु म्हणे : “तुमचेनि नवसें माझे नवस पुरण जालें [तुमचे नवस पूर्ण झाले म्हणून माझे नवस पूर्ण झाले. येथे राजाला केवळ त्याने पूर्ण केलेल्या त्याच्या राणीच्या नवसाची आठवण करून द्यायची आहे. **पुरण**= ∠ सं. पूर्ण.] :” हें आईकौनि राजा उगाचि

अनुक्रमणिका

राहिला :”

“तैसा मगरा : तुं स्त्रीजीतु : स्त्रीया चाळवीलासि ॥ उक्तं च ॥

भस्माङ्गलिर्बकोड्डायी बालशौची तथा हिहिः ।
धारावर्ती चक्रवर्ती षडेते स्त्रीजिताः नराः ॥ २८ ॥

स्त्रीजितु ऐसा जाणावा : घरासी येउनि चुल्हीमध्यें आ (आं)गोळी घालौनि राहे : रांधलें किंवा नाहि : आणी उगाच येउनी बैसे : अथवा यउ[नि*] बाळकातें खेळवी : शौच करवी : अथवा स्त्रीकडे पाहुनी ‘ही ही’ करौनि हांसे : अथवा न्हातां स्त्री जीकडे धार पाडे तीकडे डोई फोरवी : अथवा भोजनसमयें दुरौनि चक्राचियेपरि रोटी अथवा भाकरी ताटावरि टाकौनि दे : तो चक्रवति [मूळ सं. श्लोकातील ‘चक्रवर्ती’ शब्दाचा आपल्या लेखकाने केलेला अर्थ. भोजनाच्या वेळी दुरून चक्राप्रमाणे भाकरी ताटावर टाकून देतो तो. या अर्थात ‘स्त्रीलंपटत्व’ दिसून येत नाही.] म्हणीजे : ऐसा सां प्रकारीं स्त्रीजीतु जाणावा : तैसा तुं स्त्रीजीतु : स्त्रीय चाळवीलासी : मज तुज अंतर पडलें :” मगरू म्हणे : “दादो : चाल आंमचा घरासी : तुझी भाउजै वाट पाहाति असैल :” येरु म्हणे : “पापी कपटीया : तुवां आपुलें ऱ्हुदय सत्य बोलौनी प्रगट केलें : साचार्येपणें [साचार=खरे. पाहा : ‘जैसें श्रवणसुख चतुर । परिणामौनि **साचार**’ (ज्ञाने. १६·१२३). त्याचे भाववाचक नाम ज्ञानेश्वरीत ‘साचारैव’ असे आढळते. पाहा : ‘ना **साचारैवें** मीखें । ब्रह्माहीं भेदी’ (ज्ञाने. १६·११८). ‘साचारैव’ याचेच उच्चारांतरित दुसरे रूप ‘**साचार्य** (र्ये)’—त्याला पुन्हा ‘पण’ हा भाववाचक प्रत्यय लावला आहे. **साचार्येपण**=खरेपणा, सत्यता.] कार्ये नासलें : जैसें युध्यीष्टीरें [सं. युधिष्ठिर. युधि=युद्धात. ‘युद्ध’ शब्द जुन्या मराठीत ‘युध्य’ असा लिहिला जात असे. तदनुसार सं. ‘युधि’ या सप्तम्यंत पदाचें लेखन ‘युध्यी’ असे केलेले आहे. पुढे मात्र ‘युधीष्टीर’ असेच रूप आले आहे.] कुम्हारें सत्य बोलौनि कार्ये नाशलें ॥ उक्तं च ॥

स्वार्थं संत्यज्य यो दम्भात्सत्यं ब्रूते सुमन्दधीः ।
स स्वार्थात् भ्रश्यते नूनं युधिष्ठिर इवापरः ॥ २९ ॥

मगरू म्हणे : “ते कैसि कथा?” वानरू सांगे :

कथा ४*
सत्यवादी युधिष्ठिर कुंभार

“कवणें एकें नगरिं युधीष्टीर यनें नांवं कुम्हारू आसे : थोर मोटा-धाटा उचा ऐसा दिसतो : तो कोन्ही येकें समईं मद्यपान करौनि घरासी

अनुक्रमणिका

येतु आसे : थोर वेगें धावीनला : तो आवेयापासि [मडक्यांच्या भट्टीजवळ, किंवा समूहाजवळ. **आवा**=मडक्यांचा समूह, असाही अर्थ होतो. पाहा : 'मढासि **आवा** आंणवीला' 'ऐसा आवघा **आवा**....लुटवीला' (गोप्रच. १२४).] तो (तों)ड बुचकडे पडला [तोंडावर पडला, तोंड बुचकडे (बुचकळेल, बुडेल, अशारीतीने).] : तेथें तिखटकांठ राजणाचा काठमोरा [(फुटलेल्या मडक्याचा) काठ, काठाकडचा भाग, किंवा खापराचा तुकडा. जुन्या मराठीत 'काठपरा' हा शब्द आढळतो. उदा : गोसांवीं तयाचीय माथां **कांठपरा** फोडिला' (गोप्रच. १३२); 'काठमोरा' हे त्याचेच रूप होय. हाच शब्द **भा** प्रतीतही वापरला आहे. '**कांठमोरा** त्याचे निडळीं रुतला' (पंच. **भा**. पान ५३). 'जेवी नीचाचा **कांठपरा** । गळां अडकल्या मांजरा । तें रिघोनि शुचीचिया घरा । नाना रसपात्रा विटाळी' (एभा. २६·२०६). यावरून काठपरा=काठमोरा या शब्दाच्या अर्थाची कल्पना येईल. 'उरावरी गळ्या खालें **कांठमोरा** दुहीं हडीं' (भाप्र. १०·२६).] होता : तो कपाळीं रुतला : अपार रुधीर नीगालें : तयाउपरि तो कांठमोराचा घावो विखोपां गेला : कीतीयेका दीवसां [**मू**. दीव**शां**.] पाणपला [पिकला. 'पीकलें ते **पणपलें**–' (भाप्र. १४·३).] : थोर व्रणु कपाळीं समोर घायासारिखा दिसे : तयाउपरि ते देशीं दुर्भीक्ष पडलें : मग तो कुम्हारू दोघेचौघ मीळौनि कोन्ही येक नगरासी गेला : तेथें येक रायाची सेवा करूं आदरीली : मग तेणें रायें तयाचेया कपाळीचा घावो [**मू**. घोवों.] देखौनी विचारीलें : म्हणे : "हा कवनी येकु सु(शु)रू आहे : तयाकारणें यासि संन्मुख घावो लागला आसे :" ऐसें देखौनी अवघया परिवार देखतां तयासी थोर सन्मानु केला : ऐसें कोन्हें येकें समईं रायाचें सभेमध्यें : विराची गोष्टी करित आसतां : अमका वीरू : आमुका जुझारू : प्रतापीया : ऐसी गोष्टी राज[स*]भे होत असतां : तवं रायासम्होर तो कुम्हारु बैसला आसे : तवं राजेनि तयासि पुसों आदरिलें : "राणे हो : हा कपाळीचा घावो कवणें जुझीं लागला?" तवं तो कुम्हारू [**मू**. कुमारू.] सत्य बोलीला : म्हणे : "राजया : हा शस्त्राचा घावो नोहे : तरि मी जातीचा कुम्हारू [**मू**. कुमारू.] : माझें घरी आमु (ने)कें फुटलीं खापरें पडलीं आसतीं : तरी मी कोन्ही यके समईं मद्यपान करौनि घरासी येत होतां : तवं माझें मन भ्रमीत जालें : मग मी तया खापरावरि पडलों : तवं तेथें काठमोरा होता : तो माझें कपाळीं रूतला : अपार रुधीर नीगालें : कीती यका दीवसां तो पाणपला : हा घावो तयाचा दिसतु [**मू**. दि**श**तु.] आसे :" तें आईकौनि राजा म्हणे : "येणें भलें सीतरलौं [याच्याकडून चांगलाच फसविला गेलो. **सीतरणे**=फसविणे. मागे तंत्र ३. काकोलुकीय. कथा ४ पाहा :] : तरि यासी [**मू**. आ**सी**.] गची देउनी [**गची** (देप्रा.)=गळा, मान, कंठ. पाहा : 'नासापुटौनि वारा । जो जांतु असे अंगुळे बारा । तो **गचि** धरूनि माघारा । आंतु घाली' (ज्ञाने. ६·२३६). **गची देणे** : मान पकडणे, पाहा : 'आणि भटोबासीं **गचीए धरूनि** चालविली : पैल ठावोवेन्हीं गेली' (लीच. उ. १२३).] बाहिर काढा :" तवं कुम्हारू म्हणे : "माझी संग्रामीं सु(शु)रपण पाहावें : जाती काये प्रयोजन?" तवं राजा म्हणे : "जऱ्ही सु(शु)र सर्वगुणीं संपुर्ण आहेसी : सु(शु)रपणेंहि विखातु आहेसी : परि जे कुळीं जन्मलासी : ते कुळीं तुवां सु(शु)रपण नसीजे : ज्यापरि कोल्हा येकु सीहाचा बंधु म्हणौनि : हस्तीतें देखौनि पळाला :" हे कथा कुम्हारू पुसे : राजा

सांघे :

कथा ५*
सिंहकुळात वाढलेला कोल्हा

“कोन्हे एकें वनीं सीहंदंपत्यें आसती : बहुतां येकां दीवसां सीहीणी प्रसवली : दोघे पुत्र जाले : सीहं नानावीधें स्वापदें मारौनि तियलागुनी घरासी घेउन ये : येके दीवसीं येकहि स्वापद न सापडेचि : तवं आदीत्यु अस्तमाना गेला : यापरी तया सीहासी घरि जातां येक कोल्हयाचें बाळ सांपुडलें : तें बाळक म्हणौनि दांत न रुपतां तोंडीं धरौनि आणीलें : मग सीहातें सीहीनी पुसे : “हा जी : आजी कांही नाहि आनीलें?” तवं तो म्हणे : “प्राणेस्वरि : ईतुके मी हींडलों : पण कांहि ना सांपडेची [**मू.** शांपडेची.] : हें कोल्हयाचें पीलें सांपडलें : आपुलें जातीचें [सिंह आणि कोल्हा एकाच जातीचे कसे? दोघेही ‘नखी’=नखे असलेले प्राणी म्हणून.] म्हणौनी न मारीतां आणीलें :

॥ उक्तं च ॥

स्त्रीषु लिंगीषु बालेषु प्रहर्तव्यं न कर्हिचित् ।
प्राणान्तेऽपि समुत्पन्ने विश्वस्तेषु तथैव च ॥ ३० ॥

स्त्रीचां ठाईं : बाळाचां ठाईं : तयासी [**मू.** तुंयासी.] प्रहारू न करावा : आणी शरणांगतांचां ठाईं [**मू. थाई.** (सकळ संकेत. **थ** = ठ).] प्रहारू न करावा : म्हणौनी हें दांत न रुपतां आणीलें : तरि आतांचें यातें भक्षी : पथ्य करि [आपले हित कर. याला खाऊन आपला लाभ करून घे. **पथ्य** : हितकारक, असा मूळ संस्कृत शब्दाचा अर्थ आहे. मराठीत मात्र ‘खाण्याला वर्ज्य’ असा अर्थ रूढ आहे. ‘पथ्य तें हित आणीक खाणीयांचा निरोधही’ (भाप्र. ९·२३८). जुन्या मराठीत मात्र मूळ ‘हितकारक अन्न’ या अर्थाने शब्द वापरला जात असे. पाहा : ‘गोक्षीर जऱ्ही जालें । तऱ्हीं **पथ्यासि** नाहीं बोलिलें । ऐसेनिहि विष नोहे सूदलें । देइजे ज्वरिं’ (ज्ञाने. २·१८४). निर्मळ पाठकानेही ‘भक्ष वो **पथ्ये** घेवों’ (तंत्र ४·२३१) असा, ‘पथ्य’ शब्दच येथे वापरला आहे. मूळ संस्कृतात ‘इदानीं त्वमेनं भक्षयित्वा **पथ्यं** कुरु’ असेच आहे.] : प्रभातें कांही आनीक उपार्जुनि आनीन :”

मग सीहीनी म्हणे : “हा जी : तुं बाळक म्हणौनी न मारीसीचि : तरि मी कैसें मारि? मी काय पापीनी असे? ॥ उक्तं च ॥

अकृत्यं नैव कर्तव्यं प्राणत्यागेऽपि संस्थिते ।
न च कृत्यं विमुञ्चेत एष धर्मः सनातनः ॥ ३१ ॥

प्रकृत्ये [‘प्रकृत्ये जें कहिंचि कृत्य नोहें’—हे वाक्य एका दृष्टीने अनावश्यक आहे. कारण, संस्कृत श्लोक ३१ च्या पूर्वार्धाचा अर्थ पुढील वाक्यात आलेलाच आहे. आहे त्या स्थितीत हे वाक्य ‘अकरणीय कृत्या’चे विशेषण म्हणून घ्यावे. ‘प्रकृत्ये (प्रकृतीने, स्वभावतः) जें कृत्य

अनुक्रमणिका

कहिंचि नोहें’ असे ‘अकरणीय कृत्य’.] जें कहिंचि कृत्य नोहें : प्राणत्याग जाला आसतां जऱ्ही : तरी अकरनी[य*] तें न करावें : आपुलीये धर्मी राहावें : तरी मज तीसरा पुत्र होईल [हे कोल्ह्याचे बालक माझा तिसरा पुत्र म्हणून होईल=असेल, राहील.] :” ऐसें म्हणौनि आपुलीये थानीं लावीला : नीकीयापरि वाढविला :

ऐसें तीघी पुत्र मोटे जाले : येकु येकाचा [मू. येकाचां.] जातिविशेसु नेनती : ऐसें [कोण कोणत्या जातीतला आहे हे त्यांना कळणार नाही अशा रीतीने.] वाढविलें : ऐसें तयासी भ्रमण करितां येकु हस्ती सन्मुख आला : तयातें देखौनि सीहाचे दोघे पुत्र थोर कोपें उठीले : कोल्हेनी म्हणीतलें : “हा आमचा वैरी : तरि या सन्मुख न वचावें :” ऐसें म्हणौनि तो घरासी पळौनी आला : ऐसें ते दोघै तयाचेनि भंगें [त्या कोल्ह्याच्या भंगामुळे=पराभवाने; तो निर्वीर्य होऊन पळाल्यामुळे.] बीहाले [भ्याले] : तेहि घरासी पळौनी आले :

॥ उक्तं च ॥

एकेनापि प्रकोपेण सोत्साहेन रणं प्रति ।
सोत्साहं जायते सैन्यं भग्ने भङ्गमवाप्नुयात् ॥ ३२ ॥

येक जण विरू सोत्साहयुक्त [मू. सत्साह०. यात द्विरुक्ती आहे. ‘सोत्साह’ किंवा ‘उत्साहयुक्त’ असा शब्द ठीक झाला असता.] होये : आणीकें भंग काढीला : तरि आवघें भंग काढीला ऐसें जाणावें : याउपरि ते दोघी भाउ घरासी यउनी माता-पीतापुढें हासौनि वडील भावाचें चरित्र सांगते जाले : “जी पीतया : हा हस्ती देखौनि पळाला :” तो कोल्हा आइकौनी थोर कोपावीष्ट जाला : मग माता तयातें येकांत स्थानां [मू. स्छानां.] नेउनी सीकवीती जाली : “बा : आजी-लागौनि झनी कोप करसी [रागाऊ नकोस. सिंहबालकांनी आपल्या भावाच्या (कोल्ह्याच्या पलायनाचे वर्णन ‘हासौनि’—उपहासाने केले होते. म्हणून कोल्हा रागावला होता. त्याला सिंहीण सांगते : ‘आजपासून तू असा रागावू नकोस’ (जुन्या मराठीत ‘झनी, झने’—हे शब्द नेहमी निषेधार्थाने वापरले जातात. जुन्या हिंदीतही ‘**झिन** करें’=करू नकोस, असे ते वापरले जात होते.) कारण, ही तुझी धाकटी भावंडे आहेत. यावर कोल्हा विचारतो : मग हे मला का हासतात? मी काय यांच्यापेक्षा ‘हीन’ आहे?] : हे तुझीं धाकुटीं भावंडें :” तवं तो म्हणे :

“मी काये यापरिस हिनु : जे मातें सु(शु)रपण नां : विद्याभ्यासें हांसताति तरि अलोटतया हास्तीतें मारीन : मजहुनी सु(शु)र कोण आसे?”

तें आईकौनि सींहिणी तया जिवित्वाचिया चाडा [मू. जिवित्वचिया. त्याचे ‘जीवित्व’ राहावे (सिंह बालकाकडून तो मारला जाऊ नये) या इच्छेने.] येकांत सीकउं आदरीलें ॥ उक्तं च ॥

शूरोऽसि कृतविद्योऽसि दर्शनीयोऽसि पुत्रक ।
यस्मिन्कुले त्वमुत्पन्नो गजस्तत्र न हन्यते ॥ ३३ ॥

“आरे : पुत्रकां : तुं सु(शु)र आहेसी : आणी कृतुवीद्वांसु [हा शब्द ‘कृतविद्य’चे भाषांतर म्हणून वापरला आहे. तो चुकीचा आहे. ‘विद्वांस’ म्हणजेच विद्वान. (सं. विद्वान् शब्दाचे अनेकवचन); जुन्या मराठी विद्वांस शब्द विद्वान या अर्थाने एकवचनी वापरला जातो. उदा : ‘तो तुझा उपाध्या विद्वांसु : सुदेवो पिता आमचा’ (नरुस्व. ६४७).] आहेसी : आणी दर्शनीया आहेसी : [परी*] जे कुळीं जन्मलासी : तें कुळीं हस्तीतें न मारिजे : तुं कोल्हयाचा पुत्र : म्यां स्तनपान करौनि वाढवीला : तरि हे पुत्र माझे कोल्हा म्हणौनि जानती तरि मारती : तरि जवं जानीतलें नाहि तवं स्वजातीमध्यें जायें : ना तरि मृत्यातें पावसी :” तो तिय सीहीणीचें वचन आईकौनी बिहाला : ततक्षनीं [‘तत्क्षणीं’चे लेखन. असे रूप पुष्कळ ठिकाणी लिहिलेले आढळते. उदा : “जैसे चळचरां जळ सांडे । आणि **ततक्षणीं** मरण घडे’ (ज्ञाने. ३·११७); ‘तियें लाह्या जाली **ततक्षेणें** : तो तापु कैसा सांघावा’ (नरुस्व. ४५३);] पळाला :”

तरि येणें कारणें रावो म्हणे : “रे कुम्हारा : जवं राजपुत्रें कुम्हार ऐसें जाणीतलें नाहि तवं तुवां जावें : नाही तरि अवकळ(ळा) पावसी :” ऐसें आईकौनि कुम्हारू पळाला :”

तवं वांनरू म्हणे : “मगरा : जैसें कुम्हारें सत्य बोलौनि आपुलें ऱ्हुदये प्रगट केलें ॥ उक्तं च ॥

आत्मनो मुखदोषेण बध्यन्ते शुकसारिकाः ।
बकास्तत्र न बध्यन्ते मौनं सर्वार्थसाधनम् ॥ ३४ ॥

॥ तथा च ॥

सुगुप्तं रक्ष्यमाणोऽपि दर्शयन् दारुणं वपुः ।
व्याघ्रचर्मप्रतिच्छन्नो शुद्धस्फटिकरासभः ॥ ३५ ॥

जैसा सुधस्फटीक रजकाचा रासभु : व्याघ्रचर्मेंकरौनि वेष्टीला : ऐसें आपणयातें प्रगट केलें : ऐसा भयंकरू दारुण लोकासी दीसे : तेणें शब्देंकरौनी : रासभें आपणेयातें प्रगट केलें :” “हे कैसी कथा?” मगरू पुसे : वांनरू सांगे [मुळात ‘वांनरु सांगें : मगरु पुसें’ असे आहे. सुसंगतीच्या दृष्टीने वाक्यें बदलून संहितेत घातली आहेत.] :

अनुक्रमणिका

कथा ६*
वाघाचे कातडे पांघरलेला गाढव

“कोन्ही येक गांवीं सुधस्फुटीक [आपल्या पोथीत सं. श्लोक ३५ मध्ये रजकाचे नाव ‘शुद्धस्फटिक’ असे आलेले आहे. त्याचे उच्चारांतरीत लेखन. **नि**. प्रतीमध्ये रजकाचे नाव ‘शुद्धपट’ असे आहे. **भा**. आणि **म**. प्रतीत कोणतेच नाव नाही. निर्मळ पाठकाने त्याचे नाव ‘स्फटिक’ असे दिले आहे.] नामें रजकु [धोबी, कपडे (स्फटिकासारखे) पांढरे शुभ्र धुतो, म्हणून त्याला हे नाव दिलेले आहे. ‘सुध**स्फ**टीक’ हे रूप वर १३ व्या ओळीत आलेलेच आहे.] होता : तयाचा गर्दभु गवतें-वीन दुर्बळु जाला : ऐसें तेणें कोणां येका ठायां व्याघ्रचर्म देखीलें : मग मनीं वीचारीलें : “बरवें जालें : यणें चर्में वेष्टौनियां रासभातें रात्रीं सेतामध्यें सोडौं [**मू**. सोड.] : यातें देखौनि व्याघ्र म्हणौनी खेतकरी पळती :” ऐसें तेणें रजकें केलयांउपरि रात्रीं गर्दभु स्व(स्वे)छा सेतामध्यें चरे : पाहानवटें [प्रभात काळी. (सं. प्रभात) **पाहानपट** असेही रूप आहे. पाहा : ‘तवं जाला **पाहानपटिचा** पाहारू’ (नरुस्व. ६१९); ‘ते थोरे **पाहानपटीं** : भरीजे शुक्तिसंपुटी, (शिशु. ७८९) ‘पाहातवट’—अशी या शब्दाची पाठांतरे आढळतात. सं. प्रभात>पाहाट-त, अशी व्युत्पत्ति. **त** चा **न** होतो. पण त्यापुढील **वट** किंवा **पट** ची व्युत्पत्ति कशी लावायची? **पटह**= मंगलवाद्य, याचा तो अवशेष मानता येईल. उजेडतांनाचा नगारा. पाहाट होतांनाची (मंगलवाद्य वाजवण्याची) वेळ, असे संभवू शकेल.] रजकु आपुलें घरासी [**मू**. ‘घरिंसी.’ येथेही ‘घरि’ व ‘घरासी’ या दोन रूपांचा, प्रतलेखकाच्या मनातील संभ्रम स्पष्ट दिसतो.] आणी : याउपरि तो बहुता दीवसा खेत खातां [शेत (शेतातील पीक) खाऊन, शेतात चरून.] मोटें(टा) जालें(ला) : थोर कष्टें मागुतां घरासी ने : येके दीवसीं मदावीष्ट तेणें दुरौनि रासंभाचा [**मू**. रा**ष**भाचा.] शब्द आइकौनि : आपणही भुकुं लागला : ऐसें आईकौनि सेतकरि धाउनि आले : ते म्हणती : “व्याघ्रचर्मपृछनु [वाघाच्या चामड्याने झाकलेला. सं. प्रच्छन्न>पृछनु=आच्छादलेला, झाकलेला] हा गाढउ होये :” ऐसें जानुनी लाकुडेवरि [लाकडाने.] तयातें मारिलें : अर्धमेला करौनी सांडिला :”

वांनरू म्हणे : “हे कथा या कारणें सांगीतली : जैसें शब्देंकरौनि गर्दभें आपुलें ऱ्हुदयें प्रगट केलें : तैसें तुवां मगरा केलें : तरि मी मागुता अपायातें देखौनि यें तरि मी काये सुतारू? ॥ उक्तं च ॥

प्रत्यक्षेऽपि कृते पापे मूर्खो वै साधु मन्यते ।
रथकारः स्वकां भार्यां सजारां शिरसाऽवहत् ॥ ३६ ॥

प्रत्यक्ष पापातें देखौनि मुर्ख जो तो बरवें मानी : जैसा रथकारू आपुली स्त्रीयेतें : दुश्चारीणी [दुराचरणी. तंत्र १. मित्रभेद. मूळ कथा : सिंह आणि बैल पाहा.] ऐसें जाणौनि : सीनाळासहित खांदीं [**मू**. **षां**दीं] घेउनी नाचता जाला :” मगरू म्हणे : “हे कैसी कथा?” वांनरू सांगे :

अनुक्रमणिका

कथा ७*
मूर्ख सुतार व त्याची छिनाल पत्नी

“कोन्हें येकें नगरीं वाढी रथकारू आसे : तयाची भारिया परपुरूशरत : तीचा अपवादु जनमुखें तो रथकारू प्रतदिनीं आईके : मग कोन्ही यके दीवसीं : तिची परिक्षा करावयालागी तेणें विचारू आदरिला : “हें साच कीं लटीकें? म्यां कैसेनी जाणावें?” ऐसा संप्रधारू करौनि स्रीयतें म्हणे : “[प्राणे*]स्वरी : उदैक [उदयिक, उद्या. **उदया**= सूर्योदय झाल्यावर; लक्षणेने, पुढील दिवशी.] मी गावां जाईन : कीतीक दीवस मज लागतील : तरि मजलागौनी सीदोरी [(१) प्रवासासाठी अन्नसामुग्री. (२) ही अन्नसामुग्री जिच्यात ठेवलेली असते ती पिशुवी किंवा गाठोडे. सं. शीतोदरी>शिदोरी. थंड झालेले अन्न जिच्या उदरात ठेवलेले आहे अशी पिशवी, अशी व्युत्पत्ति असू शकेल.] करी :” तें आईकौनि ते हरखीत जाली : सर्व कार्य सांडौनि बरवीं पक्वांनें नीफजवीलीं : सद्यस्तप्त घृत [**मू**. ‘**धृ**त’. ‘घृ’ साठी अक्षरसाम्यभ्रमाने ‘**धृ**’ हे अक्षर लिहिले गेले.] आणिलें : तया भर्तारातें भोजन दीधलें : रात्रीं सीदुरी बांधुनि ठेवीली : प्रातःकाळिं रथकारू गांवांसी नीगाला : मग ते स्री सीनाळाचीया घरा गेली : येरु रथकारू वाढै आरंण्यामध्ये दीवसु गमला [वाढ्याने (तृतीया) दिवस घालविला.] : मग ते सीनाळाचीया घरां जाउनी : तयासी म्हणे : “आजी तो पापीया गावां गेला आसे : तरी आजी रात्रीं तुवां घरासी यावे :” ऐसा निर्धारु केला : ऐसा तो रथकारू आरंण्यामध्यें दीवस करमौनि [क्रमौनि, क्रमण करून, घालवून.] : रात्रीं उपरिये [माडी.] वाटे [माडीवरील मार्गाने.] उतरौनि : घराआंतु येउनि : बाजें‐बुडीं बैसला : मग म्हणे : “पाहों ईचें चरित्र : सहसा स्री मारूं न ये :

॥ उक्तं च ॥

नदीनां च कुलानां च मुनीनां च महात्मनाम् ।
उपतापो न कर्तव्यो स्रीणां दुश्चरितेष्वपि ॥ ३७ ॥

नदीचां कुळवंताचां ठाईं : मानभावाचां ठाईं : स्रीयाचें ठाईं इतुकेयाचा पानु न करावा : आणीक येक असें : स्री सुध ऐसी कोणी म्हणावी?

॥ उक्तं च ॥

यदि स्यात्पावको शीतः प्रोष्णो वा मृगलांच्छनः ।
तदा स्रीणां सतीत्वं स्याद्यदि स्याद्दु र्जनो हितः ॥ ३८ ॥

जरि पावकु शीतळ होये : आणी चंद्रमा जरि उष्ण [मू. उष्ट.] होये : तै स्त्री सती म्हणीजे : आणी दुर्जनु जरि हीतु होये [दुर्जन जर (इतरांना) हितकर होईल तर तो सहसा हितकर असत नाही, त्याप्रमाणे स्त्रीही कधी सती (पतिव्रता) असत नाही, हा भावार्थ.] : तरि स्त्री सुध जानावी : तरि सुध कीं असुध ऐसें आजी ठाउकें पडैल : अवघा लोकु तरि परद्वारीणी ऐसें म्हणतु आसे :" ऐसें बाजेबुडीं वीचारिलें : मग नीश्चळ होउनी राहिला : ईतुका समईं तीचा मीत्रु बाजेंवरि येउनि बैसला : तयातें देखौनि रथकारू कोपाविष्ट जाला : मग वीचारितु : "काय पां यातें मारूं? कीं नीजैली दोघी हेळाच [सं. हेला. या शब्दाचा अर्थ, आनंद, तिरस्कार, **सहजता** असे आहेत. मराठीत **हेळा** शब्द वेळ या अर्थाने वापरला जातो. पाहा : 'आतां बहू बोलीनि सांघावें । तें एक **हेळा** घे पां आघवें' (ज्ञाने. ९-२९६). आपल्या वाक्यात **हेळा**=एकाच वेळी, एकदम, या अर्थाने योजला आहे.] मारौं [मू. मरौ.]? पाहों तवं याचें चेष्टीत कैसें आसें :" इतुका समईं तिनें कवाड सुबांध घालौनि [पक्के लावून.] : सयनावरि आरुढ जाली : ऐसें बाजेंवरि बैसतां : तीचे पाये वाढयाचे आंगीं लागले : तवं तीनें वीचारिलें : "हा निश्चयें रथकारू होये :" मग मनीं वीचारिलें : "आतां स्त्रीचरित्र करैन :" [धूर्तता, कपट हा स्त्रियांचा स्वभाव होय. त्याप्रमाणे काही करणे, हे स्त्रीचरित्र. 'स्त्रीचरित्राला शोभून दिसेल अशी धूर्तता मी दाखवीन.'] ऐसें [मू. ऐसें.] विचारीं पडली : तवं तेनें सीनाळीस्तनावरि हात घातले : तवं त्यां नेत्रखुणें खुणाविलें : मग पायां पडौनि तयातें म्हणे : "अगा ये माहानुभावा पुरुशोतमा माहासीनाळा [सर्वश्रेष्ठ व्यभिचारी पुरूषा.–असे संबोधण्यात तिची धूर्तता दिसून येते. मूळ संस्कृत कथेत हे संबोधन वापरलेले नाही. ते भाषांतरकारने वापरले आहे.] : तुवां माझीया आंगीं स्पर्शावें ना : मी पतीव्रता माहासति : मी आपुलेया पतीवीण आणीक पुरुशातें नेणें : ऐसेनि स्पर्श करिसी तरि मी श्राप देईन : भस्म करीन :" एरु [मू. ऐरू.] म्हणे : "ऐसी तुं प्रति-व्रता : तरि मातें कां बोलावीलें?" तवं ते म्हणे : "आईक : आजी मी चंडकायेतनीं [चंडिकेच्या देवळात. सं. चंडिका+आयतन. **य** चा उच्चार **ए** सारखा होतो. म्हणून 'चंडिकायेतन' असे लिहिले गेले आहे.] देवतेचिया दर्शनासी गेलें होतें : तेथें अकस्मात गगनीं आश्रणी वाचा [सं. अशरीरिणी, दैवी वाणी, आकाशवाणी.] जाली : म्हणे : 'पुत्री : आईक : तुं माझी भक्ति करूं आलीसी : तुझें दुख माझें मनीं थोर येत आसें : तें आईक : तरि तुं सा मासामध्यें वैधव्यातें पावसी :' ऐसें आईकौनि म्यां म्हणीतलें : 'तरी माते : देवते : ऐसीयासी काय प्रकारु कीजे?' तवं देवतेनि म्हणीतलें : 'जरि तुं परपुरुस रात्रीं घरा बोलावौनि तयासवें [मू. ०संवें. (**व** हा **घ** चा सकळ संकेत होय. तसे असेल तर या ठिकाणी 'संघें' असा पाठ घेता येईल.)] तुज येकशयनीं नीजनें होईल : तरि तुझा भ्रतारु दोन शत वरुशें जीवील [जिवंत राहील.] :' तरी तेणें कारणे म्यां तुतें बोलावीलें : तरी माझा नवसु पुर्ण जाला : आतां तुवां आपुलीया घरासी जावें :" ऐसें आईकौनि तया वाढीयासी : सर्वांगीं आनंदें रोमांचळ [सं. रोमांच (रोम+अंच) साठी 'रोमांचळ' शब्द वापरला आहे. (सं.

रोमांच+स्वार्थे ल)—आनंदाने ताठ झालेले केस.] दाटले : ऐसें जाणौनि वाढे बाजेंबुडीहोउनि [बाजेच्या खालून] हळुचि नीगाला : मग तीयप्रती बोलता जाला : म्हणे : "नीकी पतिव्रता : माझीया कुळातें नंदवीतिसि [मू. 'नीदवीतिसि' – असे मूळ पोथीत लिहिले आहे. ते 'नंदवीतिसि' असे दुरुस्त करून घेतले आहे. 'नीदवीतिसि' या शब्दाचा, समर्थनासाठी का होईना, अर्थ काहीच लावता येत नाही. मूळ संस्कृत वाक्य 'साधु पतिव्रते साधु **कुलनन्दिनि** असे संबोधन आहे. त्याचे भाषांतर 'नीकी प्रतिव्रता, माझीया कुळाते नीदवीतिसि' असे आहे. संस्कृत वाक्य लक्षात घेता 'कुळातें **नंदवीतिसि**' (माझ्या कुळाला आनंदित करीत आहेस) असाच पाठ असला पाहिजे, हे स्पष्ट होईल.] : तुझेनि माझें कुळ उधरलें : म्यां दुष्टाचे व[च*]नी शंका धरीलि ['म्यां दुष्टाचे **वचनीं** (वचनामुळे, बोलण्यामुळे, तुझ्याविषयी मनात) शंका धरीलि' (संशय धारण केला).] : म्हणौनि गावाचेनि [गावाला जाण्याचे निमित्त करून.] मीसें मी बाजेंखाली तुझी परिक्षा पाहावया राहिलों : तरी तुं पतीव्रता ऐसी ठावी जालीसी [ठाऊक झालीस. कानडी 'टाऊके' शब्दावरून मराठीत 'ठाऊक' 'ठाउवा'=माहीत, ज्ञात हे शब्द आलेले आहेत. ठाव, ठावा, ठावी ही त्याचीच रूपे होत.] : तरी ये पां : मज आळींगन दें :" मग तियतें खांदिं घेतलें : दुसरें खांदिं सीनाळातें घेतलें : मग तया सीनाळाप्रती रथकारू बोलीला : "आगा ये माहानुभावा : तुझेनि मी सनाथ जालों : तुं माझीया घरा आला [**मू. आली.**] हें माझें थोर भाग्य [मू. भ्याग.] : आणी तुझेंनी दोनी शत वर्शें आयुस्य पावलौं :" ऐसें बोलौनि रथकारें काये केलें? पुढां तुराचेनि नादें : वाजंत्राचें मंगळघोशें : आपुण नाचतुसे : अवघेया सोइरेया ईष्टमीत्राचेया घरासी गेला :"

ऐसी कथा वांनरें मगराप्रती सांगीतली : मग म्हणे : "मगरा : ऐसा तो सुत्रधारू [सं. सूत्रकार, या अर्थाने 'सूत्रधार' (=सुतार) शब्द योजला आहे.] मुर्ख : प्रत्यक्ष दोश देखौनि विस्वा[स*]ला : तैसा मी काये मुर्ख? तुझा येवढा विकार देखौनि तुझीया घरासी यईन? आणी जे तुं मातें वीस्वासवीतासी [विश्वासवीत आहेस; विश्वास ठेवायला लावतोस.] : तो तुज दोसु नव्हे : तुमची जाती कुढी : जें संताचेनि संगें पण उजु नोहे : ना तरि दुष्टाचा स्वभावो ऐसाचि आसे ॥ उक्तं च ॥

सूर्य भर्तारमुत्सृज्य पर्जन्यं मारुतं गिरिम् ।
स्वयोनिं मूषिका प्राप्ता स्वजातिर्दूरतिक्रमा ॥ ३९ ॥

सूर्ये भर्तारु सांडीला : मेघु सांडीला : वायो सांडीला : पर्वतु सांडीला : ईतुके भर्तार सांडौनि : आपुलीयें जातीतें मुखीका भजली : म्हणौनि स्वभावो कोणाचा जाय ना :" "हे कैसी कथा?" मगरू पुसे : वांनरू सांगे :

अनुक्रमणिका

कथा ८*

शाळंकायन तपोधन व जातीवर गेलेली उंदरी

[ही कथा अनेक सं. प्रतीत तिसऱ्या तंत्रात आलेली आहे. मराठी **भा** प्रतीतही ती तिसऱ्या तंत्रातच आहे. काही सं. प्रतीत रुषीचे नाव नाही. **नि**. प्रतीत ते **याज्ञ**वल्क्य आहे, काही प्रतीत 'शालंकायन' आहे. मराठी भा प्रतीत 'वाल्मिकी' हे नाव दिलेले आहे.]

“कवनी येकीं ठाईं [**मू**. **थांई**. (सकळ संकेत थ = ठ).] शाळंकायनु नांवं तपोधनु आसे : तो स्नानालागी प्रत्येहीं भागीरथीसी जाये : तवं कोन्हें येकें दीवसीं तयासी सूर्योप(पा)स्ती करीतां : तवं ससणेंनी [(सं. श्येन) ससाणा नावाचा पक्षी **भा** प्रतीत **ससाणा** हे रूप आहे. आपल्या प्रतीत 'ससणा' व 'ससाणा'– दोन्ही रूपे आढळतात] कोनी येकी मुखीका तीक्ष्णा नखाग्रेंकरौनि विदारितां तेणें देखीली : मग तयासी कृपा आली : म्हणे : “सोडी दुरात्माया चांडाळा : मुखीकेतें सोडी :” ऐसें म्हणौनि तेणें तपोधनें तया ससाणेंयातें दगडें-करौनि प्रहरिलें : तेणेंकरौनि तयासि मुर्छा आली : मुखीका भुमीवरि पडली : ते भयास्तव भीतभीत मुनेस्वरापासि [सं. मुनीश्वर. 'मुनि+ईश्वर' याचा मुनेश्वर, असा संधी जुन्या मराठीत आढळतो. उदा : 'मज वुपमा त्या **मुनेश्वरा** दीसतसे' (कृष्णदास शामा. श्रीकृष्ण चरित्र कथा. १·१०३. संपा. प्रभुदेसाई व मुंडी) रुषी+ईश्वर=रुषेश्वर, कवि+ईश्वर=कवेश्वर पुढे १३४·३ ओळीत 'रुशेस्वर' शब्द आला आहे तो पाहा. मग बोलाऊ धाडिली कामसेना : सुदेवा क**वे**श्वरातें' (नरुस्व. ६४९).] आली : म्हणे : “रक्ष रक्ष तपोधना : मी तुज सरण आलों [स्रीच्या तोंडी 'आलों' या पुल्लिंगी रूपाचा उपयोग.] :” मग वाडवेळां ससणेंयासी चेतना आली : मग तपोधनांप्रति बोलता जाला : मग म्हणे : “साळंकायेना : तुवां अयुक्त [**मू**. **य**युक्त.] केलें : जे मज पासानें ताडिलें : तरि तुं धर्मातें [**मू**. अम् धर्मातें - **असे** लिहून मग **म्** व त्यापूर्वीचा **अ** रद्द केला आहे.] बीहीत नाहि : तरी मुखीका देईं : माझा आहारु [**मू**. **च्या**हारु.] जरी न देसी : तरि माझी हत्या तुज घडैल :” ऐसें स[स*]णा बोलीला : तें आईकौनि मुनेस्वरू म्हणे : “अरे दुष्टा विहंगमा : शरणांगतातें [**मू**. 'शरांणांगतातें'.] रक्षावें : दुष्टातें दंडावें : साधुतें मानावें : गुरुतें पुजावें : ऐसी नीती आसे : जे सरणांगतातें दीजे : तरि तुं धर्मु नेणसी :” तवं ससाणा म्हणे : “विधात्रयासि सृष्टि करितां आम्हांसी आहारु रचीला [आमच्यासाठी अन्न म्हणून मूषकादिक प्राण्यांची रचना केली (निर्मिती केली).] : तुम्हांकारणें जैसें अंन : तैसें आम्हांसी मुखकांदीक : या [**मू**. **आ**.] [रा*] नीं आहारु स्रजीला [निर्माण केला. (सं. सृज्).] : तरि मी क्षुधेकरौनि पीडीतु असें : हा माझा आहारु दें : प्राणी-यासी आपुला आहारु भक्षीतां दोस नाही ॥ उक्तं च ॥

यद्यस्य विहितं भोज्यं तत्तस्य न प्रदूष्यति ।
अभक्षणेऽपि दोषः स्यात्तस्मात्कार्यो न व्यत्ययः ॥ ४० ॥

जें जयासि भोज्य विहित तें तयासी दुशे ना [त्याला दूषवीत नाही, कलंकित करीत नाही. **दुशणे** =दूषित करणे. (सं.

दूष).] : तें जरि न भक्षेत तरि दोसु असे : जैसें मद्यादिक ब्रह्मणासी दोशयुक्त ॥ उक्तं च ॥

मद्यं यथा द्विजातीनां मद्यपानां यथा हविः ।
भक्ष्यमभक्ष्यतामेति तथान्येषामपि द्विज ॥ ४१ ॥

भक्ष्यं भक्षयतां श्रेयो अभक्ष्यं तु महदघम् ।
तत्कथं मां वृथाचारं त्वं दंडयितुमर्हसि ॥ ४२ ॥

जैसें ब्राह्मणांसी मद्य अभक्ष : जैसें मद्यपासी हावी अभक्ष : म्हणौनी जो जयासी आहारु स्त्रजीला : तो भक्षतां अभक्ष म्हणौं न ये :" ऐसें ससणा बोलीला : तवं तो साळंकायनु रुशेस्वरू म्हणे : "हें माझी कंन्या : आणी तुझी बहिण : तरि ससेणेया : तुवां स्वस्थाना जावें :" ऐसें स[स*]णेनी आईकीलें : मग ससणा गेला :

ते कंन्या तेनें रुशेस्वरें : आपत्याचीयेपरि वाढवीली : थोर जाली : तारुंन्यदशेतें पावली : मग साळंकायनु तिये कन्यसी म्हणे : "हे कन्ये : तुं तारुन्य दशेतें पावलीसी : तरि तुतें वरु रुपायोग्य [तुझ्या सौंदर्याला शोभेल असा.] मेळउं :" मग स्त्रीय-प्रती बोलता जाला : मग म्हणे : "हे कन्या रुपायोग्य वरासी द्यावी : ॥ उक्तं च ॥

कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता श्रुतम् ।
बान्धवाः कुलमिच्छन्ति मिष्टान्नमितरे जनाः ॥ ४३ ॥

॥ तथा चं ॥

कुलं च शीलं च सनाथता च विद्या च वित्तं च वपुर्वयश्च ।
एतान् गुणान्सप्त विचिन्त्य देया कन्या बुधैः शेषमचिन्तनीयम् ॥ ४४ ॥

दूरस्थानामविद्यानां मोक्षधर्मानुवर्तिनाम् ।
शूराणां निर्धनानां च न देया कन्यका बुधैः ॥ ४५ ॥

अनुक्रमणिका

कंन्या ते रुपातें वरि : माता वीत पाहौनि : पीता वीद्या पाहे : बांधव कुळ ईछति : सोईरे धायैरे मीष्टांन ईछती : ऐसें साळंकायनु रुशेस्वरू बोलिला : मग म्हणे : “इये कंन्यसी : मनासी जरि भगवानु सुर्यु ये : तरी तयातें बोलाउनी तयासि देउं :” मग तेणें रुशेस्वरें सुर्यो अव्हानीला : तो ततक्षनीं यउनी मुनेस्वराप्रती बोलता जाला : “हा जि : मातें कां बोलाविलें?” मग म्हणे : “हे माझी कंन्या तुतें वरील : तरि तुं ईसी पतकरि [स्वीकार कर. पतकरणे : बाजू घेणे, स्वीकारणे. या अर्थी ‘पतिकर’ हा शब्द ज्ञानेश्वरीत येतो. पाहा : ‘ना तरी गुणाचेनि **पतिकरें** । आर्तीचेनि पडिभरें । हे कीर्तिचि स्वयंवरें । आली तुज’ (ज्ञाने. मा. २·१९४). पतिकर=अनुभव, या अर्थानेही हा शब्द योजला जातो. उदा. ‘हें सर्वही सर्वेश्वरू ऐसा प्रतीतिगतु जो **पतिकरू** । तो बाहिरी होआवा गोचरू । लोचनांसि’ (ज्ञाने. ११·२९) ‘प्रतीति+कर’ यापासून तो व्युत्पादता येईल. ज्ञाने. २·१९४ व्या ओवीत मात्र ‘स्वीकार’ हाच अर्थ चांगला बसतो. पतिकर>पतकर. त्यापासून पतकरणे. (सं. प्रतिग्रह).] :” ऐसें [**मू.** ऐसें.] म्हणौनि कंन्येपुढें सुर्यु दाखविला : मग तीयेतें म्हणे : “हा तुझीया चित्ता येईल : हा त्रीलौक्याचा गोस्वांवी : मग ते म्हणे : “हा निरंतर तावी : म्हणौनि माझीया चीता न ये : तरि यापरिस उतम तयातें बोलावी :” मग सुर्यो बोलता जाला : “जी : मजहोउनी उत्कृष्ट मेघु आसे : जेणें आछादलेयां माझें रूप न दीसें : तेनें कारणें हे तयासि द्यावी :” मग तेनें मेघ बोलाउनी ते कंन्येसी दाखवीलें : “आवो कंन्ये : यासि देउं [**मू.** दउं.]?” मग ते म्हणे : “मेघ कृष्णवर्ण : आणी जडु : तरि आनीक प्रधाना पुरुशासी [श्रेष्ठ पुरुषाला. ‘प्रधान’ हाच शब्द संस्कृत वाक्यातही वापरला आहे. (अन्यस्य प्रधानस्य कस्यचिन्मां प्रयच्छ).] दें :” तयाउपरी तेनें मुनेस्वरें : तया मेघातें पुसीलें : “तुजपरीस कोण आगळा [वेगळा, निराळा, असा अर्थ आहे. इतर सर्वाहून निराळा, अर्थात, श्रेष्ठ, या अर्थानेही तो योजला जातो. किंबहुना तोच त्याचा मूळ अर्थ असावा (सं. अग्र+ल).] आसे?” तवं तो म्हणे : “वारा असे :” मग वायो बोलावीला : तो कंन्येपुढां दाखवीला : “कंन्ये हा तुजप्रती भासैल [हा तुला योग्य दिसेल, शोभून दिसेल, सं. वाक्य ‘किमेष वायुस्ते विवाहयोत्तमः प्रतिभाति’ असे आहे, ‘**प्रतिभाति**’ (सं. प्रति+भा) या पदाचेच रूपांतर ‘**प्रतिभासैल**’ असे मराठीत केले आहे. **प्रतिभासणे** : (सं. प्रतिभास) दिसणे, सारखा दिसणे, व्यक्त होणे. पाहा : ‘हा कल्पकाळीं **प्रतिभासे** : कल्पक्षयाअंतीं नासे’ (ज्ञाप्र. ५५१). वाटणे, असाही त्याला अर्थ आहे. पाहा : ‘मज तरंगपण असे कां नसे । ऐसें उदकासि काहीं **प्रतिभासे**’ (ज्ञाने. ८·२४७). हा तुजप्रति भासैल असा पदच्छेद करूनही (तोच) अर्थ लावता येईल.] :” ते म्हणे : “हा चपळु : याहोउनी थोरु तयातें दें :” मग वारयासी पुसीलें : “जी : तुजपरीस थोर कवण असे?” तो म्हणे : “जी : पर्वत असे :” मग परवत बोलाउनी : कंन्येपुढां दाखवीला : म्हणे : “हा मनासी यईल :” ते म्हणे : “हा परवतु कठीनु : तरि यापरिस आगळा असे तयासि दें :” तवं पर्वतु म्हणे : “मजपरीस आगळे उंदीर आसति : जे आपुलेनी बळें मातें भेदीती :” मग मुनेस्वरें उंदीर बोलावीले : मग कंन्येतें म्हणे : “हा होये : यासि देउं?” तवं येरी म्हणे : “हा होये :” तयातें देखौनि आपुली जाती वोळखीली : मग सर्वांगीं रोमांचळ दाटले : मग म्हणे : “बापा : या मुख्य (ख)कासी मातें दें : जेणें कारणें स्वजातिसहित ग्रह : मग ग्रहस्थधर्म [**मू.** ग्रह**स्छा**धर्म.] अनुभवीन :” ऐसें आईकौनि ते मागुते

मुखीका केली [पुन्हा तिला उंदरीचे रूप दिले. याचा अर्थ असा की, रुषीने तिला प्रथम मनुष्य रूप देऊन पाळले व वाढविले होते. सं. कथेत तसे स्पष्ट म्हटले आहे. (मूषिकां तां स्वतपोबलेन कन्यकां कृत्वा समादाय स्वाश्रममानिनाय). आपल्या प्रतीत पूर्वी तसे स्पष्ट म्हटलेले नाही.] : मग तया मुखकासि दीधली :" ॥ उक्तं च ॥

न सुवर्णं न रत्नानि न च राज्यपरिक्रियाम् ।
तथा वाञ्छन्ति कामिन्यो यथाभीष्टतरं वरम् ॥ ४६ ॥

"तरि ते मुखीका सुर्यादिकातें त्येजुनी आपुली जातीसी भजली : याकारणें हे कथा सांगीतली :" वानरू म्हणे : "मगरा : तैसें तुवां केलें : आपुलीये जातीसी अनुसरलासी : मज तुज आंतर पडलें : तरि आरे मुर्खा : जे स्त्रीआधीन आसती ते स्त्रीकारणें सर्वही तेजती ॥ उक्तं च ॥

या ममोद्विजते नित्यं सा मामद्यावगूहते ।
प्रियकारक भद्रं ते यन्ममास्ति हरस्व तत् ॥ ४७ ॥

जे मज देखौनि प्रत्यहिं पाठमोरी [पाठीच्या समोर. (सं. पृष्ठ>म. पाठ+मुखर> मुहर>मोहर>मोर.) मुखर=पुढे असलेला. लक्षणेने, म्होरं किंवा मोर=पुढील बाजू.] नीजे : ते आजी मज [**मू.** 'ते आजी मज आजि'. **आजि** हा शब्द चुकून पुन्हा लिहिला गेला. तो संहितेत वगळला आहे.] आळींगन देत आसे : तरि प्रियकारक [मुळात 'प्रिय'– या शब्दाचे लेखन 'परिय'– असे केले आहे.] चोरा : तुज कल्याण असो : जें मज द्रव्य आसें तें तुवां प्रतदीनीं यावे : आणी द्रव्य घ्यावें :" मगरू पुसे : "ते कैसी कथा?" वानरू सांघे :

कथा ९ *
वृध्द वाणी, त्याची तरुण स्त्री व चोर

"कव्हनी येकें ठाईं कामातुर वांनीया वृधु असे : तेणें कामाचेनि लालुप्यें-करुनी : कवणां येकां दुर्बळाची कंन्या अपार वीत देउनी परणीली : ते घरासी आणीली : ते वृधातें [दे*]खौनि दुखी जाली : तयाची वास न पांहे [वास=दिशा. वास पाहणे : त्या दिशेकडे **पाहाणे**. त्याच्या बाजूला, त्याच्याकडे पाहातही नसे.] : याउपरि तेणें वांनियेसी येक शयनीं नीद्रा करे : परी तया वांनीयाची वास न पाहे : पाठी देउनी निजे : तयाचें आंग आपुले आंगासी लागुं नेदी ॥ उक्तं च ॥

श्वेत पद शिरसि वीक्ष्य शिरोरुहाणां स्थानं परं परिभवस्य तदेव पुंसाम् ।

अनुक्रमणिका

आरोपितास्थिशकलं परिहृत्य यान्ति चाण्डालकूपमिव दूरतरं तरुण्यः ॥ ४८ ॥

मस्तकीं स्वेत केश देखीले : हस्तपादादिक [(हात पाय वगैरे)] राहाले [थांबले, त्यांचे चलनवलन बंद पडले.] : दांत पडले : डोळां न देखे : ऐसेया पुरुशातें तरुणीया स्त्रीया दुर त्यजति : जैसा उतम लोक अंतेजाचा कुप त्यजति ॥ उक्तं च ॥

गात्रं संकुचितं गतिर्विगलिता दन्ताश्च नाशं गताः
चक्षुर्भ्राम्यति रूपमेव ह्रसते वक्त्रं च लालायते ।
वाक्यं नैव करोति बान्धवजनः पत्नी न शुश्रूषते ।
हा कष्टं जरयाभिभूतपुरुषः पुत्रैरवज्ञायते ॥ ४९ ॥

गात्र जें तें संकोचलें : आणी येणेंजाणें राहालें : दृष्टी मंद जालि : रूप तेंहि गेलें : मुखीं लाळ वाहे : तयाचें बंधुजन सीकवीलें ना करती [करती ना, करीत नाहीत.] : स्त्रीहि तयाचेया बोला चित नेदी : आणी पुत्रु अवज्ञा करि : ऐसा वृधु जाला पुरुश काये विटंबनेतें न पावे? ऐसी ते एकी दीवसीं भर्तारासी पाठी देउनी नीजीली आसे : तवं घरांत चोर नीगाला : तया चोरातें देखौनि भयाचकीत जाली : तया व्रधातें आळंगौनि राहिली : मग तो हास्य [मू. हस्य.] करौनि म्हणे : "आजी काये पां नवल : मातें स्त्री आळगीत आसे :" ऐसें जवं पाहे तवं येकें कोणे चोरु देखीला : मग म्हणे : "यासी [मू. आसी.] भ्याली : मग मातें आळंगीलें :" मग चोरासी म्हणे : "आगा ये मीत्रा : मज तुवां थोर उपकारु केला : जें मज स्त्री वस्ये केली : तरि मज धन बहुसाल [मू. बहुशाल.] असें : तरि येथें तुवां नीत्य यावें : माझी संपती ते तुझी संपती : ऐसें मानुनी तुवां धन न्यावें :" ऐसें तेणें वांनीयें स्त्रीनिमीत्य सर्वस्व चोरासी दीधलें :"

मग वांनरू म्हणे : "मगरा : तैसा तुं स्त्रीलुब्ध आणी मुर्ख :" ऐसें दोघी जण जवं संवाद करिताती : तवं येकें जळचरें यउनि म्हणीतलें : "अगा ये मगरा : तुझी भार्या अनासनीं बैसली आसे [अनशन (प्राणांतिक उपवास) करण्यास बसली आहे. उपवास करीत आहे. 'जरि तुज दीवस लागतील तरि ते देहेंत्यागु करैल'—एवढेच जळचराने सांगितल्याचे येथे भाषांतर करताना लेखकाने सांगितले. ती मेल्याच्या वार्तेचा निर्देश करायला लेखक विसरलेला दिसतो. मगर दुःखित होण्याचे मुख्य कारण, पत्नीचा मृत्यू. हे त्याने केलेल्या विलापावरून (सं. श्लोक ५०, ५१ पाहा) दिसून येते.] : जरि तुज दीवस लागतील : तरि ते देहेंत्यागु करैल :" तें आईकौनि थोर दुखीत जाला : मग म्हणे : "हें काये जालें मंद-भागासी ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।
गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते ॥ ५० ॥

वृक्षमूलेऽपि दयिता यत्र तिष्ठति तद्गृहम् ।
प्रासादोपि तया हीनो अरण्यसदृशः भवेत् ॥ ५१ ॥

तरी मीत्रा : मी आवघा अपराधु केला : तें वीसर : आतां मी तीयेचेनि वियोगें अग्नीप्रवेशु [**मू.** अग्नी॰.] करैन :” तें आईकौनि वांनरू हांसीनला : मग म्हणे : “आगा ये : म्यां जानीतलें : मघाचि [पूर्वीच, अगोदरच. देप्रा. **मग्गो**=पश्चात, नंतर, याचेच मराठीत **मग** हे रूप झाले. त्याचा अर्थविस्तार होऊन मगा>मघा = पूर्वी, आधीच, असा शब्द उपयोगात येऊ लागला असावा. **मगा**चेच दुसरे रूप **मागा** होय. सं. मार्ग पासून हे शब्द व्युत्पादणे चुकीचे होय.] : तुज ऐसें होईल : तुं स्त्रीजीतु : तरि अरे मुर्खा : तुं हरीख वीशादु वाउगाचि करसी : तैसीया दुष्ट भार्या नीधनातें पातलेयां हरिखु करावा ॥ उक्तं च ॥

या भार्या दुष्टचरिता सततं कलहप्रिया ।
भार्यारूपेण सा ज्ञेया विदग्धैर्दारुणा जरा ॥ ५२ ॥

जे भार्या दुष्टचरित आणी नीरंतर कळहो करि : ते भार्या त्यजावी ॥ उक्तं च ॥

माता यस्य गृहे नास्ति भार्या चाप्रियवादिनी ।
अरण्यं तेन गन्तव्यं यथारण्यं तथा गृहम् ॥ ५३ ॥

जयाची माता गृहीं नाहि : आणी भार्या अप्रीयवादीनी : तेनें आरंण्याप्रति जावें : त्यासि जैसें आरंण्य तैसें गृह : या कारणास्तव [यापूर्वी पोथीत ‘दुष्ट भार्ये’ ही अक्षरे जास्तीची चुकून लिहिली गेली आहेत. ती येथे गाळली आहेत.] दुष्ट भार्येचा सोखु न करावा :”
मगरू म्हणे : “काई हो : कैसें करूं? मज दोन्ही अनर्थ जाले : येकु घरभंगु : आनी तुजसारीखा मीत्रांचा वियोगु जाला :” “ऐसेंही कोन्ही येकें दैववशास्तव होये :”
येवीखें कथा मगराप्रती वानरू सांगे :

कथा १०*

वृध्द ब्राम्हण, त्याची छिनाल बायको, चोर आणि कोल्हा

“कोन्ही येके नगरिं ब्राह्मणु येकु वृधु आसे : तयाची स्त्री अनंगवना [मूळात हे नाव ‘अनंगवदना’ असे असावे. लिहिताना चुकून द गळालेला दिसतो : संहितेत त्याप्रमाणे दुरुस्ती करायची राहून गेली.] ऐसें तिचें नांव : ते स्त्री परद्वारीणी : पतीचेनि वृधपणें क्षणहीभरि घरिं नसे : इकडेतीकडे परपुरशातें पाहे : तवं कव्हनी येके दीवसीं रात्रीं होंडतां चोरें देखीली : पण एकांतिं तियेतें देखौनि : चोरु हाति धरुनी म्हणे :

॥ उक्तं च ॥

देहि मे मैथुनं बाले पश्य कांडं समुत्थितम् ।
बलात्कारेण गृह्णामि स्कंधौ ते चरणद्वयम् ॥ ५४ ॥

स्पष्टार्थ जाणावा [श्लोकाचा (५४) अर्थ अश्लील असल्यामुळे भाषांतरकाराने शब्दशः अर्थ सांगण्याचे टाळले आहे. भावार्थ मात्र पुढे सांगितला आहे.] : “मंगळरूपे [जिचे रूप (सौंदर्य) मंगळ (मंगल, कल्याणकारक) आहे अशी. संबोधन.] : माझी भार्या नीवर्तली : तुझेंनि दरुशनें मी मदनें पीडलौं : तरि मज [रति*] दें [**मू.** रितु. संभोग दे. ‘रति’ हा शब्द पोथीत ‘रितु’ असा लिहिलेला आहे. तो उघडउघड लेखनदोष असल्यामुळे दुरुस्त करून घेतलेला आहे.] : बळात्कारें संभोगु करिन :” मग ते म्हणे : “आरे सुभगा पुरुशा : जरि तुझें मनीं ऐसें आसें : तरि तुझी मी होईन : माझा भर्तारू व्रध असे : आणी घरिं द्रव्य बहुत असें : तरि तें द्रव्य घेउनि यउं : मग दोघी जणें जाउं :” ऐसें ते बोलीली : तें चोरासी मानलें : चोरु म्हणे : “भाख देईं : जें तुवां यावें :” मग ते भाख देउनि घरासी गेली : घरिचें सर्वस्व घेउनि आली : मग दोघी जनें नीगालीं : तवं मार्गी जातां येकी नदी देखीली : उदकें पुरन जात आसे [संस्कृत ‘पूर्ण’ या शब्दाचे लेखन ‘पुरन’. ‘पुरन’ हे ‘पूर्ण’ या शब्दाचे उच्चारांतरित लेखन होय. पाण्याने पूर्ण भरलेली अशी (ती नदी) वाहात होती.] : तिये नदीतें देखौनि चोरें वीचारु मांडीला : “येथें मी ईयसी काये करूं? जरी कथमपी मागीलेकडौनि धांवणें [पाठलाग, पाठलाग करणारा. पाहा : ‘बोंब जाली : **धांवणें** निगालें’ (लीचपू ३४).] येइल तरि वोखटें कीं : तरि ईचें वित घेउनी जाउं :” मग तीतें म्हणे : “प्रिये [**मू. प्रये.**] : हे नदी दुस्तरु : तरि मी हे मात्रा [द्रव्य, सामानसुमान यांची गाठोडी. पाहा : ‘**मात्रा** गोसावीयापासि ठेउनि बाइया अष्टतीर्थे करूनि आलीया’ (लीचपू. ६९)] पैले थडी घालौनी येईन : मग तुतें पाठीवरि बैसौनि [बसवून.] नेईन :” ऐसें म्हणौनि अवघें द्रव्य घेतलें : आवधीं वस्त्रें घेतलीं : नदी उतरौनि आपुल्या देशां गेला : तवं ते वाट पाहातचि राहिली : तो न येचि :

अनुक्रमणिका

मग सुर्यो उदो जाला : मग ते म्हणे : “मज कोन्ही नग्न देखैल :” मग कटी हात लाउनि उदकामाजी सोद्वेगें बैसलीसे : तवं ईतुका समईं : कोल्ही यकी तोंडिं मांसपींड धरौनि : ऐसी येति देखीली : तिया कोल्हीया उदकाबाहिर मासा देखीला : तयातें देखौनि मांसपींडु ठेवीला : मासयातें धरूं गेली : सवें मागीलकडौनि तो मांसपिंड ससाणे [मू. शशाणें.] नेला : मासा उदकामाजी पळाला : ऐसें देखौनी ते हांसीनली : मग म्हणे :
॥ उक्तं च ॥

गृध्रेणापहृतं मांसं मत्स्योपि सलिलं गतः ।
मत्स्यमांसप्रतिभ्रष्टे किं निरीक्षसि जम्बुके ॥ ५५ ॥

“आवो जंबुके [मू. जांबुके.] : तुझा मांसपींडु ससाणें नेला : आणी मछही सलिलाप्रति गेला : ऐसी मछमांसप्रतिभ्रष्ट [मू. ०मतिभ्रष्ट.] जाली : आतां काये पाहातेसी?” मग ते म्हणे ॥ उक्तं च ॥

यादृशं मम पाण्डित्यं तादृशं द्विगुणं तव ।
न जारो न च भर्ता च जले तिष्ठसि नग्निके ॥ ५६ ॥

“जैसें माझें पाण्डित्य : त्याहुनि तुझे द्विगुणे पांडित्य : नां सीनाळु नाहि : नां भर्तारु नाहि : जळामध्यें नग्न राहिलीसी :”

तैसे वांनरू म्हणे : “मगरा : तैसें तुज मीत्र ना घर : दोन्ही ठाय गेले : हे कथा याकारणें सांगीतली :”

ऐसें तया वांनराचें वचन आईकौनि मगरू दुखी होउनि आपुल्या स्थानासी गेला : जवं तेथें जाये तवं येकु प्रचंडु मछु तयाचिये घरिं नीगाला असे : तयातें देखौनि वीचारीता जाला : “कैसें वीधातेयाचें करणें देखीलें : तेणें मीत्रेंसी वैर जालें : तैसीचि भार्या नीवर्तली : घरिं [(घरात)] आणीक [(दुसरेच कोणीतरी)] रीगालें [(प्रवेशले)’; घरात दुसऱ्याच कुणीतरी प्रवेश केला, म्हणून घरही गेले.] : आझुनि काय होईल तें न कळे ॥ उक्तं च ॥

क्षते प्रहारा निपतन्त्यभीक्ष्णमन्नक्षये वर्धति जाठराग्निः ।

अनुक्रमणिका

आपत्सु वैराणि समुद्‌भुवन्ति वामे विधौ सर्वमिदं नराणाम्‌ ॥ ५७ ॥

जेथें खत जालें [जखम झाली, व्रण झाला. (सं. क्षत). पाहा : 'नावडि घेऊनि चंदनाचां रसीं : आंगामाजी **खत** पाहे मासी' (शिशु. २८), 'कां सीस खांडूनि आपुले । पायांचां **खतीं** बांधलें । तैसें मृत्युलोकिचें भलें । आहे आघवें' (ज्ञाने. ९·४९५).] आसें : तेथें बळें प्रहारा (र) लागे : आणी आपछु काळु [आपत्काळ, संकटाची वेळ. सं. श्लोकात 'आपत्सु' (संकटात) शब्द आहे. त्याचे रूपांतर **आपछु** असे करून त्यापुढे पुन्हा **काळ** शब्द वापरला आहे. अर्थात, **आप**छु हे रूप चुकीचे आहे. 'आपत्ति' 'संकट' असा त्याचा अर्थ येथे घेतला पाहिजे.] जाला आसतां वैरी पराभवीती : ऐसें दैव प्रतिकुळ आसतां वैरी पराभवीती : सर्वही मनुस्यासी होय : तरि आतां काय करूं? तरि काये येणेंसी जुझौं? किं सामेंकरुनी वैस्य करूं? कीं भेद उपजउं? कीं तया वांनरातें पुसौं जाउं? ॥ उक्तं च ॥

यःपृष्ट्‌वा कुरुते कर्म आत्मनः सुहृदान्‌ गुरून्‌ ।
न तस्य जायते विघ्नः कस्मिंश्चिदपि कर्मणि ॥ ५८ ॥

ऐसा संप्रधारू : तें कैसें? जो आपुला सुहृदा मीत्रा गुरूतें पुसौनि जो कृत्य करि : तयासि वीघ्न कोन्हे काळीं नोहें :"

ऐसें विचारौनि : तया वानरापासी येउनि बोलता जाला : म्हणे : "देखीलें मीत्रा माझें अभाग्य? माझें घर येकें मछें आवरिलें [माशाने व्यापले, ताब्यात घेतले. तुळा : 'नातरी मठीं आकाश जैसें । मठाकृती **आवरलें** असे' (ज्ञाने. २·१४२). **मछ** : सं. मत्स्य>म. मछ.] : तरि तुतें पुसावया [**मू.** पु**शा**वया.] आलौं : तयासि जुंझौं कीं सामेंकरौनि वस्य करूं? कीं भेद उपजउं? [**मू.** उ**च**जउं. (सकळ संकेत च =प).] किं विग्रहो करूं? ऐसा कोण उपावो करूं [**मू.** कुरूं.] : तो मजपुढां सांग : तो मी करिन :" मग वांनरू म्हणे : "आरे कृतघ्ना दुराचारा : काये मजपुढां पुडती [पुन्हा. पाहा : 'म्हणौनि **पुडती पुडती** तुमतें : विनवित असें' (सव. ५१२) **पुडुती** असेही रूप आहे. पाहा : 'मग कणिसौनि कणु झडे । तो विरूढला कणिसा चढे । पुडुती भुइ पडे । **पुडुतीं** उठी' (ज्ञाने. १८·२५१).] पुसुं आलासी? मी तुज उपदेसु नेदीं : मुर्खासी उपदेसु दिजे ना ॥ उक्तं च ॥

उपदेशो न दातव्यो यादृशे तादृशे जने ।
तेन वानरमूर्खेण सुगृहा निर्गुहीकृता ॥ ५९ ॥

जयातेयासि [**मू.** जयानें**पा**सि (अक्षर साम्यभ्रमाने **य** साठी **प** अक्षर लिहिले गेले). ज्याला त्याला, वाटेल त्याला (उपदेसुं न दयावा).] उपदेसु न द्यावा [द्यावा. द्या>दया. पाहा : 'जन्म **दया** म्हणसी अनंता : परी मी देचि ना' (मूप्र. ६४). पाठीं येणें १८७५ भागु **दयावा'** (ज्योरमा. रा. ३).] : उपदेसु दिधला म्हणौनि तेनें वानरें चीडि सुग्रो (ग्र)हि होती ते नीग्रहि केली : म्हणीजे : चिडिचें घर मोडीलें :" मगरू

अनुक्रमणिका

म्हणे : “हे कैसी कथा?” वांनरू सांगे [मू. शांगे.] :

कथा ११*
चिडी आणि वानर

“कवणा एका [मू. ऐका.] आरंन्यामाझारी : येका वृक्षावरी पक्षीयुग्में असती : ऐसा [मू. ऐसा.] बहुतका दीवसा माघमासिं हीवें पेटला [थंडीने पीडित. **पेटणे** : जळणे, जाळ होणे; याशिवाय भेटणे, लोटणे, पीडित होणे असेही या शब्दाचे अर्थ आहेत. पाहा : ‘किं मरणासि मरण **पेटलें**’ (ज्ञाने. ११·३५३); ‘आशाढिचेनि जळें । जैसि झिरपांति मौळें । तैसें खांडेहूनि लाळे । पेटति पुर’ (ज्ञाने. १३·५६६) याचप्रमाणे, हिवाने पेटलेला=लोटलेला, पीडित झालेला, असा अर्थ.] : ऐसा येकु वांनरू तया व्रक्षमुळासी आला : तो खटखटा दात वाजवी : थोर दैन्येतें पावला : तयातें देखौनि पक्षनी बोलती जाली : “हा तुं अष्टांग-पुष्टांग [ज्याच्या शरीराचे आठही अवयव पुष्ट झालेले आहेत असा. अष्टांगांनी पुष्ट आहे आंग ज्याचे, असा.] दीसतोसी : तरी आश्रमु कां करसी ना?” ऐसें [मू. ऐसें.] तिचें वचन आईकौनी विचारीता जाला : “अहो हे गृहाश्रम [(घराच्या आश्रयाने)] संतोसली [(संतुष्ट झालेली) पक्षिणी.] पक्षिणी आपणयातें थोर ऐसें मानीतु आसे :” ऐसें वीचारूनि तियेचा खोपा शतचुरण केला : मग बोलीला ॥ उक्तं च ॥

सूचीमुखि दुराचारे रण्डे पण्डितवादिनी ।
असमर्थोऽहं गृहं कर्तुं समर्थो गुहभञ्जने ॥ ६० ॥ [या श्लोकानंतर पोथीत पुढील श्लोक आहे. तो येथे असंबद्ध असल्यामुळे संहितेत घेतला नाही. श्लोक असा :
उत्क्षिप्य टिट्टिभः पादावास्ते भङ्गभयादिव ।
स्वचित्तगर्वितो लोके प्राणिनां कोऽनुभूयते ॥ ६१ ॥]

ऐसा तीयेचा खोपा शतचुर्ण केला :”

वानरू म्हणे : “मगरा दुष्टासी उपदेसु न द्यावा : तथापि तुज उपदेशु सांगैन : अपकारियासि बरवें करी तोचि साधु ॥ उक्तं च ॥

उपकारिषु यः साधुः साधुत्वे तस्य को गुणः ।
अपकारिषु यः साधुः स साधुः सद्भिरुच्यते ॥ ६२ ॥

उपकार्यासी बरवें करी तेथें काये नवल? अपकारियासि बरवें करि तोचि साधु म्हणीजे :” वांनरू म्हणे : “तेनेंसी जाउनी जुंझ करि : जुझ करिता मरण होये हें भलें ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जीवन् गृहमथो यशः ।
युध्यमानस्य ते भावि गुणद्वयमनुत्तमम् ॥ ६३ ॥

जरि युधीं मरसील तरि स्वर्ग पावसील : अथवा जीकसील तरि ग्रह पावसील : आणी येशा पावसील :” ऐसें वीचारुनी षु(शु)रपणें युध करिजे हें भलें : येवीशे कथा आईक :

कथा १२ *
चतुरक कोल्हा

कोन्ही येकें वनीं चतुरकु नांव कोल्हा होता : तो सीहाचा सेवकु आसे : तयासी वन हींडतां मेला हस्ती देखीला : तयापासि गेला : त्यासि चहुंकडे वीदारावयासी पाहे : तवं त्याचि त्वचा कोल्हयावस्तु भेदवे ना : ऐसा जवं वीचारतुसे : तवं तिकौनि [तिकडून, त्या बाजूने. या अर्थाने ‘तिकून’ हा शब्द ग्रामीण भागात आजही वापरला जातो.] येकु सीहु आला : तयाप्रति कोल्हा बोलता जाला : “स्वामी : हा तुझेनी प्रतापें गजु मारीला असे : मी राखत आसें : तरि आतां स्वांमी : तुं भक्षी :” तें देखौनी सीहु बोलीला : “आरे कोल्हया [मू. कोल्हआ.] : आणीकें गजु मारिला मी भक्षें ना : जाये तुजकारणें म्यां दिधला : तुंच भक्षी :” ऐसें म्हणौनि सीहं गेला : मग कोल्हा आनंदयुक्त जाला : म्हणे : “हा मज विधीनें उपावो केला : मासां येकाचा ग्रासु मेळवीला :”

ऐसें जवं चिंतीतुसे तवं व्याघ्रु येकु आला : तयातें देखौनि कोल्हा चींतीता जाला : “म्हणे : पहिलें येकु दुरात्मा आला : तो म्यां बुधी करौनि दवडीला : तरि आतां हा व्याघ्रु आला : यासि कोण प्रकारू कीजे? हा तवं सु(शु)र आसे : भेदावांचौनि साधु नोहें ॥ उक्तं च ॥

न यत्र शक्यते कर्तुं सामदानमथापि वा ।
भेदस्तत्र प्रयोक्तव्यो यतोऽसौ वशकारकः ॥ ६४ ॥

जया सत्रुचां ठाईं साम दान करावया समर्थ नोहिजे : त्या शत्रुचां ठाईं

अनुक्रमणिका

भेद उपजावा : त्यावांचौनि तो वस्य नोहे :” ॥ उक्तं च ॥

अन्तस्थेन विरुध्देन सुवृत्तेनातिचारुणा ।
अन्तर्भेदेन संप्राप्तं मौक्तिकेन निबन्धनम् ॥ ६५ ॥

ऐसें संप्रधारौनी तया संन्मुख होउनी बोलता जाला : “मामो : तुं येथें कोण ठाया [मू. थाया. (सकळ संकेत थ=ठ).] आलासी : मृत्याचेया घरासी? हा पैल सीहु विदारौनि गजातें : मज रक्षण ठेवीलें असें : आपुण स्नानासी गेला आसे : तेणें म्हणीतलें : ‘येथें कोन्ही यईल : तें मजपुढां हळुची सांगों यावें : ईतुकेनि मी व्याघ्र मारीन :’ ऐसें आईकौनि व्याघ्रु बिहाला : मग व्याघ्रु म्हणे : ‘आरै भाचया : मज प्राणदान दें : तुवां त्यापुढें माझीये विशे गोष्टी न करावी :’ ऐसें बोलौनि व्याघ्रु नीगाला :

तया गेलयाउपरि वांनरू येकु आला : तयातें देखौनि कोल्हा चींतीता जाला : “हो कां : बुधी येकी करिन : याचिया दाढा तिखटा असती : याकर्वी गजचर्माचा छेद करवुं : मग सुखेंचि भक्षुं :” ऐसें विचारौनि वांनराप्रति बोलता जाला : “आगा भाचया : बहुता दीवसां देखीलासी : भुकेला आहेसी : माझेया ठाया अभ्यागतु आलासी : तरि हा गजु सीहें मारिला असे : मज राखण ठेवीलें असें : तरी तो जवंवरी ये तवं तुं ग्रास येकु मास भक्षी : आपणेया तृप्ती करि : येतुकेनी जाये :” तवं तो वांनरू म्हणे : “सीहाचा तरि मी न भक्षीं : आतां मी जाईन :” तवं कोल्हा म्हणे : “सुखें भक्षीं : मी तयातें दुरौनि पाहीन :” ऐसें केलयाउपरि तेनें वानरें दांतेकरौनि गज अर्ध छेदीला : तवं तो म्हणे : “आगा भाचया : चाल चाल पळ : सीहु आला :” तें आईकौनि वांनरू पळाला :

याउपरी तयाचेनिद्वारें [वानराने हत्तीचे चामडे अर्धे छेदून त्याच्या शरीरात जे द्वार केले होते, त्या द्वाराने.] कोल्हा जवं मास भक्षीतुसे : तवं थोरें कोपें येकु कोल्हा आला : तयातें देखौनि तेनें श्लोकु म्हणतीला ॥ उक्तं च ॥

उत्तमं प्रणिपातेन शूरं भेदेन योजयेत् ।
नीचमल्पप्रदानेन समशक्तिं पराक्रमैः ॥ ६६ ॥

अनुक्रमणिका

उतम जो तो सीहु : तो प्रणीपातेंकरौनी दवडीला : शुर जो तो भेदेंकरौनी दवडीला : नीच तो अल्पमांसदानेंकरौनि दुरि केला : आतां हा समतुल्य पराक्रमें असे : हा युधावांचौनि वस्य नोहें :” तयाउपरि तेणेंसी जुझौनि : तयासी पराभउनि : मग मांसभक्षण मु(सु)खें करिता जाला :

मग वांनरू म्हणे : “मगरा : याकारणें हे कथा सांगीतली : तरि तुं आतां तेनेंसी जुझौनि तयासी पराभवी : नाहि तरी लाज होईल : जरि तुं ऐसें म्हणसील : ‘कोणें युध करावें? तो मछु तियचि घरिं आसों : मी आनिकीया देशा जाईन :’ ऐसें जरी मनों धरसी तरि नाशातें पावसी ‖ उक्तं च ‖

संभाव्यं गोषु संपन्नं संभाव्यं ब्राह्मणे तपः ।
संभाव्यं स्त्रीषु चापल्यं संभाव्यं ज्ञातितो भयम् ‖ ६७ ‖

‖ तथा च ‖

सुभिक्षाणि विचित्राणि शिथिलाश्चापि योषितः ।
एको दोषो विदेशस्य स्वजातिर्यद्विरुध्यते ‖ ६८ ‖

येवीसें कथा आईक :” मगरू पुसे : वांनरू सांगे :

कथा १३ *
परदेशात गेलेला चित्रगु कोल्हा

“कोन्हे येकें देशीं चित्रगु [कथेतील कुत्र्याचे नाव संस्कृत प्रतीत चित्राङ्ग असे आहे. भा प्रतीत चित्रांगद तर आपल्या प्रतीत ते ‘चित्रगु’ असे आहे.] नावं कुतरा असे : तो तीय देसीं सुखेंचि काळ क्रमी : ऐसें असतां तये देशीं दुर्भिक्ष [मू. दुभिक्ष.] पडलें : तया स्वानांसी आंन न मीळेचि : मग तेणें विचारिलें : ‘जेथें सुभीक्ष असैल ते देशां जाउं :’ मग तो क्षुधा-पीडीतु ऐसा आनीकेया देशां गेला : तये देसीं जाउनि येकाचा द्वारपाळ होउनि असे : तेथें सुख (खें)चि त्यासी आंन मीळे : ऐसें असतां जेधवां तो ग्रामांमध्यें पर्यट [सं. पर्यटन शब्दाचे रूपांतर.] करावया नीगाला : तेधवां ते ग्रामीचीं स्वांनें सकळ मीळौनी : तयापाठीं हांव हांव करौनि लागति : दातेंकरौनी विदारीती : मागुता पळौनि घरासी ये : ऐसा घडिभरि बाहिर नीगौं सके ना : मग तेणें मनीं वीचारिलें : “आहो : आपुला देश दुर्भिक्ष [मू. दुर्भक्ष.] तऱ्ही तो

बरा : कां आपणासंगातें कोन्ही कळहो न करि : सुखेंचि भ्रमण करीजे : तरि आतां आपुलीया देशा जाउं :” मग तो ऐसें विचारौनि मागुता आपुला देशा गेला : सुखें आसौं लागला :

तैसें” वांनरू म्हणे : “मगरा : आपुला देसु सहसा न सांडावा : तरि तुं मछासंगातें युध करौनि : पराभवौनि आपुलें स्थान [मू. स्छान.] घें :” ऐसें आईकौनि वानरातें पुसौनि : मगरू आपुलीया देशा गेला : मग तया मासयासी युध करौनि पराभवौनि आपुलीये गृहिं सुखें असौं लागला ॥ उक्तं च ॥

अकृत्वा पौरुषं या श्रीः विकासिन्यपि किं तया ।
जरद्‌गवोऽपि चाश्नाति दैवादुपगतं तृणम् ॥ ६९ ॥

“म्हणौनि पौरुशत्वेंकरौनि जे लक्ष्मी ते लक्ष्मी म्हणीजे : जरद्‌गव [(सं) म्हातारा बैल.] काये दे(दै)-वास्तव [(दैवामुळे)] उपगता तृणातें भक्षितुसे [(प्राप्त झालेल्या)] : जैसा नवा बळीवर्धु धान्यादिकें भक्षीतुसे तैसें नाही तया जगद्‌गवासी : म्हणौनि पौरुशत्वावांचौनि कांहि नाहि :” ॥ ६३ ॥

ईती श्री पंचोपाख्याने : राज्यनीतीशास्त्रे चतुरथं तंत्र समाप्तं ॥ ४ ॥

॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥ ✳ ॥

अनुक्रमणिका

तंत्र ५. अपरीक्षितकार्य

मूळकथा : मणिभद्र सेठी, क्षपणक आणि बारीक.

[पाचव्या तंत्राची मूळ कथा काही संस्कृत प्रतीत क्षपणकाला मारणाऱ्या न्हाव्याची आहे तर काही प्रतीत ब्राम्हणी व मुंगूस यांची आहे. **भा. म. पा**. आणि आपल्या प्रतीत ती पहिल्याप्रमाणे आहे.]

"आतां अपरो(री)क्षीत पांचवें तंत्र सांधैंन : तेथें प्रथम श्लोकु ॥ उक्तं च ॥

कुदृष्टं कुपरिज्ञातं कुश्रुतं कुनिरीक्षितम् ।
तन्नरेण न कर्तव्यं नापितेनात्र यत्कृतम् ॥ १ ॥

बरवें जानीतलें नाहि : बरवें सांम्यक देखीलें नाही : बरवें आईकीलें नाहि : बरवें परिक्षिलें नाहि : तें नरें न करावें : जें नापीकें [मूळ सं. शब्द 'नापित' आहे. या तंत्राच्या पहिल्या श्लोकातही तोच शब्द आहे. भाषांतरकाराने मात्र 'नापीक' शब्द वापरला आहे. निर्मळ पाठकानेही 'नापीक' असाच शब्द योजला आहे.] केलें तें न करावें :" "हे कैसी कथा?"

राजपुत्र पुसती : वीष्णुशर्मा सांगे :

"दक्षण देशीं पाटळीपुर [सं. पाटलीपुत्र अथवा पाटलिपुर. माहालिंगदासाने व निर्मळ पाठकानेही गावाचे नाव 'पाटळीपुर' असेच दिले आहे. निर्मळ पाठकाने 'दक्षण देशाप्रति । पाटलीपुरनाम हो नगर' असे म्हटले आहे. **भा** प्रतीत मात्र गावाचे नाव 'महिळारोप्य' आहे.] नाम नगर आसें : तेथें मणीभद्रु नांवं सेटी होता : तयाचें द्रव्य धर्मार्थे आनेक दानें पुन्यें [सं. पुण्य शब्द पुण्यकृत्यासाठीही वापरतात. पाहा : 'आणिकही काहि जे जे । **दानपुण्य** आम्ही कीजे । तेया फळरूप तूझें । चतुर्भुजां चि होआवें' (ज्ञाने. ११·५८७). मराठीत 'दानपुन्य' असा जोडशब्द अनेक ठिकाणी वापरलेला आढळतो.] पुरुशार्थ [सं. पुरुषार्थ. पुरुषाने करावयाची कृत्ये, पराक्रम. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. यांपैकी कोणताही एक पुरुषार्थ साधला तरी जीवन कृतार्थ होते. मणिभद्राचा पुरुषार्थ 'धर्म' हा होता. तो साधण्यासाठी (धर्मार्थे) तो दाने व पुण्यकार्ये करीत होता. 'माझे हें द्रव्यहिन ज्यालें जळो'—असा अन्वय करावा.] साधीतां [मुळात यानंतर 'द्रव्ये' हा शब्द पुन्हा लिहिला गेला आहे. तो अनावश्यक म्हणून संहितेत गाळला आहे.] आटलें : तयावरि कीतीयेका दिवसां [**मू**. दवशां.] निरधनु जाला : मग थोरें वीशादातें पावला : मग म्हणे : "जळो हें माझे ज्यालें [**मू**. ज्यलें.जीयाले, जीवित.] : द्रव्यहिन : द्रव्यावांचौनि सर्वही गुण नाशती ॥ उक्तं च ॥

शीलं शौचं शान्तिर्दाक्षिण्यं मधुरता कुले जन्म ।
यान्ति विनाशं सर्वेऽपि वित्तविहीनस्य पुरुषस्य ॥ २ ॥

स्वभावो आनी आचरि [आचार, (सं. आचरितं) अर्थात्, सदाचरण.] : शांतीपण आनी दाक्षीन्य : सौजन्यता ['सौजन्य' या भाववाचक नामाला पुन्हा भाववाचक प्रत्यय लावला आहे.] आनी कुळीं जन्म :

ईतुके पदार्थ तवंची [जवं*] द्रव्य आसें : द्रव्य गेलयां सर्वही गुण पुरुशाचे नासती :

॥ उक्तं च ॥

यावद्भाग्यमहोदयो न हि भवेत्तावन्निरर्थाः गुणाः
सर्वे वेदविवादवादकविताचातुर्यधैर्यादयः ।
भाग्ये सत्यपि निर्गुणोऽपि गुणवानग्रेसरो जायते
मान्यः पूज्य इति क्षितीशभवने भाग्याय तस्मै नमः ॥ ३ ॥

जवंपरियंत भाग्याचा उदयो नाही तवंपरियंत नीरथ (र्थ)क गुण जाणावे : ते गुण कवण कवण? वेदवीवादत्व : वाद करणें : कवीता : चातुरिये [सं. चातुर्य शब्द चातुर्ये>चातुरिये असा उच्चारांतरित होऊन लिहिला गेला आहे.] : ईत्यादीक :
भाग्यरहीत पुरुशाचे नीरर्थक गुण जानावे : आणी भाग्य जें (जैं) पुरुशासी होये : तैं तो पुरुश नीर्गुण तऱ्ही तो गुणवंत : आणी अग्रेसरू : मान्यु : राजयासी पुज्य ऐसा होये : म्हणौनि [**मू.** म्हौणि.] भाग्यासी नमस्कारू :" ऐसें वीचारौनि तो मणीभद्रु वांणीया म्हणे : "आतां प्रातःकाळीं अनाशन व्रत घेउनी प्राणत्यागु करीन : ऐसें निरर्थक जीनें काय करावें?" ऐसा नीश्चयो करूनि माचेयावरि [(सं. मंचक) उंचावर बांधलेली बैठक, या अर्थाने या शब्दाचा अर्थ रूढ आहे. उदा० : 'नाना संहार तेजाचिया ज्वाला। तोडुनि **मांचु** बांधला अंतराळा' (ज्ञाने. ११·२९७). तथापी, मंचक, पलंग, खाट या मूळार्थानेही हा शब्द वापरला जात असे. पाहा : 'गोसावियासि भीतरि **मांचेयावरि** आसन असे' (गोप्रच. ६९); 'क्षेणु येकु स्वस्त जाली : आंतु **माचेयावरि** बैसली' (नरुस्व. ३९१).] पहुडला : तवं मध्यरात्रीं तयासी पद्मनीधी [कुबेराचे एकूण नऊ निधी आहेत. महापद्म, पद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील आणि खर्व. यांपैकी दुसरा निधी तो पद्मनिधी. **पद्म** ही द्रव्य मोजण्याची एक संख्या. आहे.] क्षेपनीकाचेनी रूपें स्वप्नीं आला : मग बोलता जाला : म्हणे :
"अगा सेटी : झणीं तुं वैराग्य धरसी [तू वैराग्य धारण करू नकोस, असा विरक्त होऊ नकोस. **झणीं** : तंत्र ४. कथा ५. पाहा.] : मी पद्मनीधी तुझा पुर्वजीं [**मू.** 'पूर्वजीला'—यातील **ला** चुकून लिहिला गेला आहे.] उपार्जिला : तरि मी येनेंचि रूपें तुझीया घरा मध्यान्हीं यईन : तुवां माझी शोडशोपचारें पुजा करौनि : माझीये मस्तकीं लाकुडाचा घावो देई : इतुकेनी मी सुवर्णरासी होईन :"

ऐसा प्रातःकाळीं उठौनि : तो वांनीया स्वप्न वीचारिता जाला : म्हणे : "लटीकें होईल : जेणें कारणें मी रात्रीदीसु चिंतितुसें : या कारणें हें स्वप्न देखीलें [खोटे असेल. कारण की, ज्याअर्थी **(जेणें कारणें) मी रात्रीदीसु चिंतीतुसें;** अथवा 'जेणें' कारणें=ज्या कारणाने (द्रव्याच्या कारणाने) मी रात्रंदिवस चिंता करतो **या कारणें** (म्हणून) मी हें स्वप्न देखीलें' (मला असे स्वप्न पडले).] :

॥ उक्तं च ॥

व्याधितेन सशोकेन चिन्ताग्रस्तेन जन्तुना ।

अनुक्रमणिका

कामार्तेनाथ मत्तेन दृष्टः स्वप्नो न सिध्यति ॥ ४ ॥

व्याधीतें असतां : सशोक असतां : चिंत्तागृस्त असतां : कामार्तु असतां : मत(त्त) असतां : ऐसेनि जें स्वपन देखीलें : तें सीधीतें न पावें :” ऐसें स्वप्न स्त्रीयप्रति सांगीतलें : मग सडासंमार्जन करौनि : माधानीं [सं. मध्याह्न मधली (दुपारची) वेळ.] वाट पाहातुसे : तवं क्षेपनीकरूपें [पद्म*]नीधी आला : मग स्त्रीपुरुशें हर्खलीं : तया बैसावया ओसन घातलें : शोडशोपचारिं [मू. शोडशोउपचारि. (यातील ‘उ’ हे अक्षर जास्तीचे लिहिले गेले आहे).] पुजा केली : मग तेनें वांनीयें दंडेकरौनि : क्षेपनीकाचां मस्तकीं घावो दीधला : तवं सोनटकेनी भरली कढाये जालि : ते भुमीमध्यें तात्काळी नीक्षेपीली :

तें सर्व चरित्र धुवारावटें येकें वारिकें देखीलें : मग तो विस्मयो करूं लागला : मग वारिकु म्हणे : “जेतुके क्षेपनीक [तेतुके*] [मुळात हा शब्द नाही. तो गळला असावा म्हणून येथे सूचविला आहे.] सोनेनी भरले आहेति : तरि प्रातःकाळीं तयातें आंवतुनी [आमंत्रण देऊं. (प्रपु. अनेकवचन).] : घरा बोलाउनी [बोलावू. (प्रपु. अनेकवचन). आमंत्रण देऊन बोलावू.] : इतुकेनी मी ऐसेंचि करिन : मग ते सुवर्णांचे होतील : मग मज अपार द्रव्य होईल :” ऐसें वीचारूनी प्रातःकाळीं खैराचें लाकुड मेळउनि : मग तयाचे ठेंगे दहापांच करौनि ठेवीले : मग क्षेपनीकाचें मठासि गेला : जाउनि तयासि प्रदक्षणा केल्या : मग साष्टांगी प्रणीपात करौनि : हात जोडौनि स्तवनं करीता जाला ॥ उक्तं च ॥

ते जयन्ति जिना येषां केवलज्ञानशालिनाम् ।
अस्माकं तु प्रसीदन्तु मानसेनोषरायितम् ॥ ५ ॥

॥ तथा च ॥

सा जिव्हा या जिनं स्तौति तच्चित्तं यज्जिने रतम् ।
तावेव केवलौ श्लाघ्यौ यौ तत्पूजाकरौ करौ ॥ ६ ॥

“केवळ ज्ञानेंकरौनि शोभते ऐसें जईन जे क्षपणीक ते मजकारणें : मनेकरौनि प्रसंन होये [अनेकवचनी कर्त्याला एकवचनी क्रियापद.] :” ऐसें म्हणौनि दंडवत केलें : मग मुख्य [मू. मुस्य.] क्षेपनीक होता : तयाजवळी

अनुक्रमणिका

जाउनि वारिकें प्रार्थना केली : मग म्हणे : "स्वामी : मातें सनाथ करावें [सं. **सनाथ**=नाथ (स्वामी) असलेला, **करावें**=आपण माझे स्वामी, संरक्षक, गुरू व्हावे; मला शिष्य करून घ्यावे, असा अर्थ. लक्षणेने **सनाथ** = संपूर्ण, परिपूर्ण, कृतार्थ. पाहा : 'तैसे सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी कां **सनाथ** । तो श्रीकृष्णराऊ जेथ । तेथ लक्ष्मी' (ज्ञाने. १८·१६१९). **सनाथ करावें** : गुरू होऊन कृपा करावी.] : सकळमुनीसहित माझिया घरा प्रसादालागी यावें [मला प्रसाद देण्यासाठी यावे; भोजनासाठी यावे. **प्रसाद** : श्रेष्ठ व्यक्तीने (देवतेने) सेवन केल्यावर राहिलेले उच्छिष्ट अन्न. पाहा : 'गोसावीं बीजें केलें : तेथचे पाक चाखेति : ऐसा अवघाचि **प्रसादु** केला' (गोप्रच. ११०); 'एकु उसु आरोगीला : दोनि केळें **प्रसादु** केलीं : मग गोसावीं म्हणीतलें : आवो मेला जाय : घे घे घे नां म्हणे : म्हणौनि बडुवयासि **प्रसादु** दीधला' (गोप्रच. २३०).] : तुमतें आवघेया कारणें [सर्वांसाठी, सर्वांना] म्यां आंवंतिलें असें [आमंत्रण दिले आहे.] :" मग ते म्हणति : "आम्ही आपुलीया लिळा नगरामाजि हिंडों : मग येकाधा श्रावकु प्रार्थी : तयाचें घरिं आम्ही आनाधारु [(अन्नाचा आधार)] करू [(करतो). थोडेसे जेवतो.] : तरि तुं श्रावकधर्मु नेणसी : आम्ही न यों : तुं जायें :" ऐसें आईकौनि वारिकु म्हणे : "जी : आजी-लागौनी श्रावकधर्मामाजी रीगैन : तुमचा उपदेसु घेईन : तुम्हां क्षेपनीकालागौनी पुस्तकाछादनांकारनें [पोथ्यांच्या आच्छादनासाठी, पोथ्या बांधून ठेवण्यासाठी.] वस्त्रें आणीलें आहेती : सीस्यासी वस्त्रें : लेखकासी लीहावेया [लेखकांसाठी लिहिण्याची साधने आणली आहेत.] : धन मेळवीलें आसें :" ऐसें प्रीय बोलुनी : अवघे वस्त्राचेनि लोभें हरिखैले : तयासवें तयाचीया घरां गेले : मग तेनें बैसावेया आसन घातलें : ते स्वस्थानिं [मू. स्व**स्छा**नि.] बैसले : मग वारिकु बाहिर आला : बंधुपुत्र बोलाविले : तयातें वारिकु म्हणे : "बा हो : तुम्हांसी द्रव्याची चाड असैल : तरि हे ठेंगे घ्या : आणी येकायेकांचीया माथा सुबुध [घाये हाणावे' : मागे पा. १४७·२२ पाहा. 'सुबंध'—या अर्थी 'सुबुध' शब्द येथे आला आहे. सुबंध=घट्ट जोरदार.] घाये येकेचि वेळें हाणावे :" ऐसें म्हणौनि बंधुपुत्रा (त्र) वारिकु घरामध्यें आले : वस्त्रेकरुनि ठेंगे अछादीले आहेती : ऐसे क्षेपनीकापुढें येउनी उभे राहिले : मग क्षपनीक मनांत म्हणताती : "हे वस्त्रें अछादौनि आनीले आहेती : आतां वांटतिल :" ऐसें जवं वीचारित असति तवं माथेयावरि ठेंगयाचे घाये उडाले : ते थोरे शब्दें घराभीतरी : संखध्वनी करूं लागले : तयाचीं मस्तकें फुटलीं : कीतीयेक मुर्छागत जाले : कीतीयेके रुधीरें आलोहीत जाले [रक्ताने लाल झाले, रक्तबंबाळ झाले. **आलोहीत** : सं. अलोहित. याचा (१) एक अर्थ, अ+लोहित (लाल)=लाल नसलेले. (२) अलोहित=लाल रंगाचे कमळ. त्यावरून लक्षणेने लाल रंग. या दुसऱ्या अर्थानेच हा शब्द मराठीत वापरला जातो. पाहा : 'कीं वीरश्रीयां भांगीं भरीले सेंदुर : तैसे तल्हात **आलोहीत**' (मूप्र. ६५८); 'ते श्रीचरण वानुं कैसे : ना ना तो अरुणूचि रातला दीसे : **अह्लोहीत** श्रीचरण दीसताति तैसे : देवरायाचे' (संनरुस्व. १०९५).] : इतुका समईं तयाचें आक्रांदन आईकौनी : राजपुरुशी मागुता हाति बांधौनि [हात मागे बांधून.] : राजभुवनां चालविता जाला : तया मारितां उरले क्षेपनीक : तीहिसहित महाजनापासि गेले : मग माहाजनें तयासि पुसौं आदरीलें : "हा रे : तुवां कां कुकर्म केलें? या क्षेपनीकांतें तुवां कां मारिलें?" वारिकु म्हणे : "मज काईसा बोलु : हे मनीभद्रातें पुसावें :" याउपरि मनीभद्रातें बोलाउनी स्माति पुसीलें : "हा हो सेटी : तुम्ही येकाधा

अनुक्रमणिका

क्षेपनीकु मारीला?” तेणें मनीभद्रें म्हणीतलें : “हो जी :” मग तेणें पुर्ववृतांतु सांगीतला : मग स्मार्तिं म्हणीतलें : “हा वारीकु सुळी घाला[*]वा : येणें न वीचारितां हें केलें [यानंतर ‘जो अविचारितां हें केलें’ हे वाक्य लिहिलेले आहे. ते चुकून लिहिले गेले आहे. त्यापुढील वाक्य पाहावे.] : जो अविचारिये करे तो दुखासी पावे :” ॥ उक्तं च ॥

अपरीक्षितं न कर्तव्यं कर्तव्यं सुपरीक्षितम् ।
पश्चाद्भवति संतापो ब्राह्मणीनकुलं यथा ॥ ७ ॥

हे कथा मनीभद्रु पुसे : माहाजन सांघती :

कथा १*
ब्राम्हण व त्यांचे मुंगूस

“कोणें येकें नगरीं देवशर्मा नांवें ब्राह्मणु असे : तयाची भार्या प्रसुती जाली : येकु पुत्रु : येकु मुगुस [मू. मुगुरू. देप्रा. मंगुसो, मुग्गुसू, मुग्गसो—असे शब्द आहेत. त्यावरून मराठी मुंगूस, मुगुस, हे शब्द आले आहेत. ‘मुंगुस’ शब्द लिहितांना **मु** वरचा अनुस्वार गळाला असे समजण्याचे कारण नाही. कारण ‘मुगुस’ असा शब्दही लिहिलेला आढळतो. उदा० : ‘सर्प, नोल, **मुगुस** स्वान—’ (धर्मामृत. पा. ४५. संपा. प्रा. जोहरापूरकर). सं. ‘मद्गुश :’ या शब्दापासून हा व्युत्पादिला जातो. पण तसा शब्द आढळत नाही. असल्यास ते नंतरचे संस्कृतीकरण असावे.] : ऐसें तयासी पुत्राचियापरि वाढवीलें : पण तयासी वीस्वासती ना : कोणें येकें समईं कथमपी हें मुगुस : बाळकासि वीरोधु करैल : ऐसें एकें [मू. ऐके.] दीवसीं पुत्रातें पाळणां नीजउनि : उदकाचा घडा घेउनि पाणीयासि गेली : भर्तारासी [मू. ‘भर्तारूसी’ (**र** साठी **रू** हे अक्षर लिहिले आहे).] म्हणीतीलें : “तुम्ही या मुगुसातें विस्वासावें ना : हें बाळक रक्षावें :” ऐसें म्हणौनि ते पानिया गेली : याउपरि तो ब्राह्मणु सुनें घर सांडौनि भीक्षेसी गेला : इतुका समईं कृष्ण-सर्प वोहेंआं[तौनि नीगाला : तो मुगुसें देखीला : मुगुसासर्पा सहज वैर].... ऐसें देखौनि : बाळकातें खाईल : म्हणौनि शतखंडु केला : रुधीरें भांबळलें [रक्ताने फुलून आले, रक्तबंबाळ झाले.] तोंड : ‘म्यां पुरुशार्थ केला :’ म्हणौनि मातेजवळी सांगावया गेला : तवं मायें रुधीरें माखलें मुख : ऐसें तयातें देखौनी म्हणे : “अलोट [हा शब्द ‘निश्चित’ या अर्थाने वापरला आहे. माझे बाळ निश्चितच याने मारले असेल. ‘मज सर्वज्ञाचिये बोधीं । जे **अलोट** माने त्रिशुद्धी । तें निश्चित तवं आधीं । विचारिं पां’ (ज्ञाने. १८. १४६); ‘सुक्षेत्रिं आणि वोलटें । बिं पेरिलें गोमटें । परि **अलोट** फळ भेटे । परि वेळे पैं गा’ (ज्ञाने. १८·९९३), या ओव्यात अलोट (=लोटले न जाणारे, खोडता न येणारे, अर्थात्) निश्चित हाच अर्थ आहे.] माझें बाळ येनें मारिलें असैल :” ऐसें म्हणौनि उदकें भरली घागरि : तया मुगुसावरि [मू. मुगुशावरि.] टाकीलें [घागर टाकली. वाक्यात कर्माचा व क्रियापदाचा संबंध चुकीचा आहे.] : तेणेंकरौनि मुगुस मेला : याउपरि मुगसातें [मू. मुगशातें.] मारौनि घरासी ये :

अनुक्रमणिका

तवं पुत्र पाळनां खेळतु असे : पालकाखाली [(सं. पल्यंक) पाळणा. पाहा : 'आधारशक्तीचां अंकिं । वाढविसि तूं कौतुकिं । हृदयकोश **पालकीं** । हालवीसि पैं' (ज्ञाने. १२·५).] सर्प मारिला देखौनि थोर विळाप करुं आदरिला : "म्हणे : कटाकटा [तंत्र १. मित्रभेद. मूळ कथा : सिंह आणि बैल पाहा.] : म्यां पापीणीयां अविचारपण केलें : जें हें मुगुस [**मू.** मगुश.] मारिलें :" येतुका समईं तो ब्राह्मणु घरासि आला : तेणें पुसीलें : "तुं वीळाप कां करितेसी?" येरि म्हणे : "पापीया : माझें वचन न करिसीचि : लोभेंकरौनि ऐसें जालें : जरि तुं घरिं होतासी : तरी ऐसें कां होतें? तुज त्रुष्णा बहुत : तरि आतां दुख भोगी :

॥ उक्तं च ॥

अतिलोभो न कर्तव्यो लोभं नैव परित्यजेत् ।
अतितृष्णाभिभूतस्य चक्रं भ्रमति मस्तके ॥ ८ ॥

आति लोभु न करावा : अ (आ)नी लोभु तरी सांडावा ना : अत्यंत जो लोभु करी : तयाचें मस्तकीं चक्र वाहे [डोक्यात (डोक्यावर) चक्र आक्रमण करते; डोक्यावर चक्र जाऊन बसते.] :" "हे कैसी कथा?" ब्राह्मणु पुसे : ब्राह्मणी सांगे :

कथा २*
चक्रं भ्रमति मस्तके

"कोन्हे येकें ठाईं चौघे पुत्र ब्राह्मणाचे : ते पर्स्परें मीत्र होते : मग म्हणति : 'जळो हें जीवीत दरिद्रयुक्त [दारिद्र्याने युक्त. सं. दारिद्र्य>म. **दरिद्र**. पाहा : 'हां गा रोगु काइ रोगिया । आवडे **दरिद्र** दरिद्रिया' (ज्ञाने. १८·१२८८).] : तरि चाला जाउं देशांतरा : जेणें अर्थ जुडे तो प्रकारु कीजे ॥ उक्तं च ॥

सत्यं परित्यजति मुञ्चति बन्धुवर्गं शीघ्रं विहाय जननीमपि जन्मभूमिम् ।
संत्यज्य गच्छति विदेशमभीष्टलोकं वित्ताकुलीकृतमतिः पुरुषोऽत्र लोके ॥ ९ ॥

वित मेळउं ऐसि आहे कां मति ज्या पुरुशाचि : [तो*] सत्व टाके [आपले **सत्व**= (१) अस्तित्व, टाकून देतो; अस्तित्व विसरतो; प्राणांची पर्वा करीत नाही; किंवा (२) सद्‌गुण, अभिमान, सोडून देतो. मूळ संस्कृत श्लोकात '**सत्यं** परित्यजति—' असा पाठ आहे. येथेही 'सत्य' हाच शब्द असावा. 'सत्व' हा पाठ घेऊनही अर्थ करता येत असल्यामुळे पाठ दुरुस्त केला नाही.] : बंधु-वर्गातें टाके : जननीतें टाके : जन्मभुमीतें टाके : जेथें द्रव्य मीळे : तेथें तया देशां जाये : इतुके ठाये तजुनी [(सं. त्यज्) त्यजुनि. पाहा : 'मग देह **तेजूनि** मिळावें स्वरूपीं किं' (ज्ञाने. ८·२१४). पोथीत

'तजुनी' असे रूप आहे. तेच कायम ठेवले आहे.] : तरि द्रव्य मिळे ऐसेया देशां जाईजे :'

ऐसा संप्रधार करौनि ते चौघी जन उजनीये [उज्ञयिनी शहर.] नीगाले : तेथें स्नान करौनि

हरिसीधासी [हे तेथील देवळाचे किंवा तीर्थाचे नाव.] नमस्कारु करूनी जवं नीगाले : तवं भैरवानंद यौगी : संन्मुख

येतु देखीला : तयासि तेहीं नमस्कारु केला : मग ते ब्राह्मण तयासवें नीगाले :

तयाचिया मठा गेले : मग तेणें भैरवानंदें तयासि पुसीलें : "तुम्ही कवणें-

कडौनि बीजें केलें? कोणें ठाईं [**मू.** थाई. (सकळ संकेत थ = ठ).] जाल?" तवं तेहिं म्हणीतलें : "आम्ही

सीधयात्रेसी [**मू.** ०**आ**त्रेंसी. सिद्धि प्राप्त करून घेण्याच्या यात्रेला. **तेथे**=सिद्धियात्रेत. मूळ सं. वाक्य पुढीलप्रमाणे : 'वयं सिद्धियात्रिकाः । तत्र यास्यामो यत्र धनाप्तिर्मृत्युर्वा भविष्यतीत्येव निश्चयः'—आम्ही सिद्धि प्राप्त करून घेण्यासाठी निघालेले यात्रेकरू आहोत. जेथे धन प्राप्त होईल तेथे आम्ही जाऊ. (या कार्यात) मृत्यु आला तरी हरकत नाही. असा आमचा निश्चय आहे.] नीगालौं : तेथें धन प्राप्त होये : अथवा मरण होये : ऐसा

आमचा निश्चयो : तरि गोस्वा (सा)वियें सांगावें : येकाधा धनउपावो :

धन (व)प्रवेसु [मूळ संस्कृत कथेत ज्या उपायांचा निर्देश केलेला आहे त्यात 'विवरप्रवेश' हा उपाय सुचविला आहे. त्याचे भाषांतर 'धनप्रवेसु' असे आपल्या पोथीत आढळते. ते उघड चुकीचे आहे. 'धन' ऐवजी 'धव' शब्द असावा असे वाटते. **धव** = विवर, जमिनीतील बीळ वगैरे. पाहा : 'मुंगिया रचिति धवें : खोंपे सावजे सावें' (उगी. ४९१); लीळाचरित्र उत्तरार्ध, लीळा १० मध्ये 'मूंगियांचां **धुविं** आगि लागली' असे वाक्य आहे. नेने व तुळपुळे प्रतीत 'धुविं' शब्द आहे. माझ्याजवळील अनेक पोथ्यांत येथे धविं हाच पाठ आहे. तोच बरोबर दिसतो. सारांश, **धव** = वारूळ; व्यापक अर्थाने, जमिनीत केलेले विवर. हे लक्षात घेऊन 'धनप्रवेसु' ऐवजी 'धवप्रवेसु' असे मी सुचवले आहे. धवप्रवेसु = विवरप्रवेश.] : सांकीनीसाधन [शांकिनी नावाच्या देवतेची उपासना.] : स्मशानसेवा : यामध्यें येकाधा उपावो

सांघ : कां जें तुं निका साधकु आहेसि ॥ उक्तं च ॥

महान्त एव महतामर्थं साधयितुं क्षमाः ।
ऋते समुद्रादन्यः को बिभर्ति वडवानलम् ॥ १० ॥

महंत जे पुरुश ते मोटा अर्थातें साधुं सकति : जैसें समुद्रवांचौनि कोण

पां [व*]डवानळातें धरे? म्हणौनि समर्थु तोचि समर्था कार्यातें साधुं

सके :" ऐसें चौघी बोलीलें : मग तोही तयातें सीस्यत्वायौग्य जाणौनी

सीधमार्गु सांगता जाला : तया चौघांचिया हातीं च्यारि वाती मंत्रौनि

दिधल्या [**मू.** दधल्या.] : मग म्हणे : "तुम्ही जा हीमांचळासि : जेथें जयाचि वाती

पडैल : तेथें निधान पावाल [**मू.** पावली.] :" ऐसें आईकौनि ते ब्राह्मणांचे पुत्र नीगाले :

तवं सी[ध*]मार्गा जातां [भैरवानंद सिद्धाने सांगितलेल्या मार्गाने जात असता; किंवा ज्या ठिकाणी सिद्धी आहेत तेथे जाणाऱ्या मार्गाने जात असता.] येकांपुढां वाति पडली : ऐसा जवं तेथें खने

तवं तांबेयाची भुकी [सं. भुग्न > म. भुगा (गी) > भुकी = भुगरा, भुगा, चूर.] नीगाली : मग तेनें तयासि म्हणतीलें : "आगा : हें

आपुलीया स्वेछा तांबें घेईजे :" तवं येर तिघी म्हणती : 'आरे मुर्खा :

तांबेंनि काय काज? जेणें दरिद्र फीटे तें घेउं : जो राहील तो राहो : आम्ही पुढारे जाउनी :” तवं तो म्हणे : “आम्हांसी हेंचि [मू. हेचिं.] पुरें :” ऐसें म्हणौनी यक तांबें घेउनी नीगाला : ते तीघे पुढारे नीगाले : पुढें जवं जाती तवं दुसरि वाती पडली : तेथें जवं खणती तवं रुपयांची [सं. रूप्य. ‘रुप्याची’ या शब्दाचे लेखन ‘रुपयांची’ असे झाले असावे.] भूमीका नीगाली : तो म्हणे : “स्वीकारा : स्वेछा घेईजे रूपें : पुढारें नको जाउं :” तवं ते दोघै म्हणति : “आरे मुर्खा : पुढें सुवर्णभुमीका असैल : तरि यणें बहुतें दरिद्र नाशातें न पावें :” तवं दुसरा म्हणे : “आम्ही न यौं : आम्हांसी हेंचि बहुत :” ऐसें म्हणौनि दुसरा रूपें घेउनी नीगाला : येर दोघी पुढारें नीगाले : तवं पुढां तीसरि वाती पडली : तो जवं तेथें खणे तवं सुवर्णभुमीका नीगाली : तवं तीसरा म्हणे : “घेईजे स्वइछा सुवर्ण : यापरिस उतम काये आसे?” तवं चौथा म्हणे : “आरे मुर्खा : तुं नेणसी : आधी तांबें : मग रूपें : मग सोनें : तरि यापुढा रत्नभुमीका असैल : तरि चाल जाउं पुढारें [मू. पुढेरे.] :” तवं तीसरा म्हणे : “मी न यें : तुं जायें : मज हेंचि बहुत : मी तुझी येथें वाट पाहिन : तुं उतावळा यें [उतावीळ होऊन, लौकर ये.] :” ऐसें आईकौनि चौथा नीगाला : ऐसा पुढां मार्गी जातां सुर्याचें खडतर कीरण तातले : सीधमार्गु भुलला : चहुकडे भवे : तवं येकु पुरुश रुधीरें भांबळु : माथेंयावरि चक्र भंवत आसे : ऐसा तो देखीला : तयाजवळी जाउनी पुसौं आदरिलें : म्हणे : “आगा ये पुरुशा : येथें उदक असें की नसें? मी त्रुशांक्रांतु जाला असौं : तरि मज उदक सांघीं :” ऐसें जवं बोले तवं चक्र ब्राह्मणाचें मस्तकीं चढलें : भंवों लागलें : तो म्हणे : “हें काई गा?” तवं यरू म्हणे : “हें वज्र :” तवं तो ब्राह्मणु म्हणे : “हें काईसेनी उतरैल?” तवं येरू म्हणे : “आइक : आणी [क*] कोन्ही वाती घेउनी येईल : सीधांत(तें) बोलावील [(द्रव्य प्राप्त करून घेण्यासाठी पूर्वी आलेल्या व ज्याच्या डोक्यावर चक्र वाहात आहे अशा) सिद्ध पुरुषाला बोलावील. येथे सीध (सिद्ध) शब्दाने त्या ब्राम्हणाचाच निर्देश केला आहे. ‘सिद्ध’ (सिद्ध मार्गाने आलेला असा जो तू, त्याला. म्हणजे तुला जो बोलावील.] : तेधवां तयाचां माथां भवील :” तवं तो ब्राह्मणु म्हणे : “हा गा : तुं येथें कीती [दी*]वस होतासि?” तो म्हणे : “जै रामु राज्य करित होता : तै मी वाति घेउनी सीधमार्गें आलौं : तवं म्यां आनीकु पुरुशु देखीला : तयातें पुसतांखेवो [विचारताक्षणी.] मी ऐसा जालां :” तवं तो ब्राह्मणु म्हणे : “हा बापा : येथें असतां उदक प्राप्त होईल?” तवं तो म्हणे : “येथें उदक नाही : नां आंन : येथें नीधानाभेण कुबेरें सीधासी [(निधान प्राप्त करून घेण्यासाठी येणाऱ्या सिद्धांना) ही जागा अन्नपाणीविरहित करून कुबेराने भीती दाखविली, त्यांच्या ठिकाणी भीती निर्माण केली.] भय दाखवीलें असें : तरि मज अ (आ)ज्ञा देईं : मी आपुल्या ठायां जाईन :” ऐसें म्हणौनि तो नीगाला : तवं तो सुवर्णसीधी [सुवर्णसिद्धि, ज्याला सुवर्णाची सिद्धी (प्राप्ती) झाली होती तो तिसरा

ब्राम्हण. हेच नाव पुढे ‘सुवर्णसीधु’ असे आले आहे.] मीत्रु : तयाची सुधी [त्याच्या शोधाला, त्याला शोधूनं काढण्यासाठी शुद्धिः (द्वितीया).] तेणेंचि मार्गें यतु असे : तवं पुढां रुधीरें भांबळला : माथां चक्र भंवत ऐसा बैसलासे : तवं जवळीकें जाउनी पुसीलें : “आगा : ये काय जालें? ऐसी दसेतें कां पावलासी?” तो म्हणे : “हा वीधीचा नीरोपु [ही विधीची (दैवाची) आज्ञा आहे. संस्कृत वाक्य ‘विधिनियोगः’ ‘नियोग’ चे भाषांतर ‘निरोप’ असे केले आहे. **निरोप** = निरूपिलेले, सांगितलेले, आज्ञा. पाहा : ‘या कारणें पै बापा । जेया आपुली आथि कृपा । तेणें वेदांचेया **निरोपा** । आन न कीजे’ (ज्ञाने. १६·४५२).] : ऐसेंचि माझें कपाळीं लीहीलें असें :” मग तो म्हणे : “तुज त्रुष्णा बहुत : माझें म्हणीतलें न करिसीचि : तरि आतां काई कीजे? विद्यावंतु आणी कुळवंतु : परि बुधीहीनु ॥ उक्तं च ॥

वरं बुद्धिर्न सा विद्या विद्यातो बुद्धिरुत्तमा ।
बुद्धिहीना विनश्यन्ति यथा ते सिंहकारकाः ॥ ११ ॥

विद्यापरिस बुधी मोटी : पण वीद्या मोटी नव्हे : जैसें ब्राह्मणाचे पुत्र चौघे जाणते : जैसें बुधीहीन सीहें भक्षीले :” हे कथा चक्रधरू पुसे : सुवर्ण-सीधु सांगे :

कथा ३ *
सिंहाला जिवंत करणारे मूर्ख पंडित

कव्हणी येकें नगरिं ब्राह्मणाचे चौघे पुत्र परस्परें मीत्र होते : तयामधें तीन शास्त्रपारंगत : पण बुधीहिन : येकु : तयांतील चौथा : बुधीवंतु पण शास्त्रहीनु : ऐसें तेहिं येके दीवसीं विचारूं आदरीलें [विचार करू लागले.] : म्हणती : “ईये वीद्येचा कवण उपयोगु? जें देशांतरा जाउनी विद्येकरौनि राजा तोशवीजे [तोषविजे, संतुष्ट करावा.] : मग द्रव्य आणीजे : हें वीद्येचे फळ ॥ उक्तं च ॥

कण्ठस्था या भवेद्विद्या सा प्रकाश्या सदा बुधैः ।
या गुरौ पुस्तके विद्या तया मूढः प्रतार्यते ॥ १२ ॥

तरि आतां जाउं दक्षण देशासी : तेथें हरीहर राजा राज्य करितुसे : तरि तेथें जाउं :” ऐसें म्हणौनि चौघी नीगाले : मग तयामध्यें वडिल तो म्हणे : “आम्हांमध्यें येकु मुर्ख : पण बुधीवंतु : तरि राज्यपरिग्रहो [मूळ सं. शब्द ‘राजप्रतिग्रह’ आहे. ‘राज’ साठी भाषांतरकाराने ‘राज्य’ व ‘प्रतिग्रह’ साठी ‘परिग्रह’ शब्द योजला आहे. प्रतिग्रह व परिग्रह या दोहोंचाही एक अर्थ ‘दान, देणगी’ असा

होतो. तोच येथे अभिप्रेत आहे.] बुधीकरौनि न पाविजे : तरि विद्येनि उपार्जिलें द्रव्य यासि नेदुं :” तवं दुसरा म्हणे : “आरे सुभगा : बुधीवंता : तुं गृहासी जायें : तुज वीद्या नाहि :” तवं तीसरेंनी म्हणीतलें : “हें उचित नव्हे : कां धाकुटेंपणालागुनी येके ठाईं खेळीनलौं तरि हा येउं द्या : आमचिया जोडलेयांचा भागु देईन :”

तया उपरी मार्गीं जातां येका वृक्षाखाली विश्रांती घे[त*]ली : तेथें अस्तीचा समुहो देखीला : मग ते म्हणति : “विद्येचा प्रत्ययो पाहुं :” तयामधें येकें म्हणीतलें : “मी आस्ती मेळवीन :” दुसरा म्हणे : “चर्म-मांस रुधीरी(र) [चामडे, मास व रक्त,] आणीन [(मंत्रबळाने) तयार करीन.] :” तिसरा म्हणे : “मी संजीव करिन :” तेथें पहिलेनि मंत्रबळें अस्ती येकवाट मेळवील्या : दुसरें रक्तमांसचर्म सरिराकारु केला : तवं सीहाचि आक्रुत देखीली : तवं तीसरा म्हणे : “मी संजीव करीन :” मग बुधीवंतें म्हणीतलें : “जरि हा जीववाल [मुळात ‘जीवकाल’ हा शब्द लिहून, नंतर **व** वर काकपद दिले आहे व समासात **हो** अक्षर लिहिले आहे. ‘जीवहोवाल’ असा शब्द अभिप्रेत आहे. अर्थदृष्ट्या ‘जीववाल’ हाच पाठ योग्य वाटतो.] तरि हा अवघेयातें भक्षील :” ऐसें आईकौनि तो विद्यावंतु म्हणे : “आरे मुर्खा : मी वीद्या नीर्फळ न करि : यासि मी संजीव करीन [**मू.** क**र्सी**न.] :” मग बुधीवंतें म्हणीतलें : “राहा राहा : मी वृक्षावरि वळंघें [**मू.** वळंलेंघें.] :” तवं तो व्रक्षावरि वळंघला : याउपरि तेणें विद्यावंतें सिहुं उठवीला : तेणें भुकेलेंनी सीहें ते तीघी भक्षीले : तो बुधीवंतु सुखें आपुलीया घरा गेला :

तैसें सुवर्णसीधु [‘सुवर्णसिद्धि’ शब्दाचे चुकीचे लेखन. ‘सुवर्णसीध’—रूप अभिप्रेत असावे.] म्हणे : “चक्रधरा : तुं बुधीहीनु : माझें म्हणीतलें न करिसिचि : म्हणौनि ऐसें जालें : बुधी भलतेणें प्रकारें [भले ते> भलते. चांगल्या प्रकारे; किंवा रूढार्थाने, कोणत्या तरी प्रकाराने.] सर्व ठाईं कामासी ये :” तवं चक्रधरू म्हणे : “सुवर्णसीधा : हें लटीकें : जै दैव वाकुडें होयें तै बुधीवंतु तोहि नाशातें पावे : येविखें कथा आईक :”चक्रधरू सांगे सुवर्णसीधु आईके :

कथा ४*
एकबुध्दी बेडूक आणि शतबुध्दी व सहस्त्रबुध्दी मासे

“कवणें येके डोहीं : सतबुधी आणी [मुळात ‘आणी’ हा शब्द दुबार लिहिला गेला आहे.] सहस्त्रबुधी : ऐसे दोन्ही मासे आसती : त्यासी येकबुधी मैडुक मैत्री करिता जाला : ऐसें ते तीधै पर्स्परें अनेग गोष्टी करौनि काळ क्रमीती : याउपरि ते तीधै कवणें येके काळीं : सुभासित गोष्टी करौनि उदकामाजी प्रवेशले : याउपरि पारधी हातिं जाळ धरौनि ते वाटा [मू. वाटो. (‘वाटे’ असाही अभिप्रेत असणे शक्य आहे.)] जाताती : ते परस्परें बोलते जाले : “अगा : यें डोहिं अपार मासे असतील : तरि प्रातःकाळीं येउनी हा डोह गाळुं [डोहातील मासे पकडणे. डोहात प्रथम जाळे टाकतात. काही वेळानंतर ते उचलतात. तेव्हा जाळ्यातील पाणी गळून जाते व अडकलेले मासे सापडतात. यावरून हा वाक्प्रचार आलेला आहे.] :” ऐसें बोलौनि ते घरासी गेले : ऐसें तयाचें बोलनें आईकौनि : ते मेंडुक परस्परें बोलते जाले : म्हणति : “यां ढीवरें [सं. धीवरः > म. ढीवर = कोळी. पाहा : ‘जैं आटावे जळचर । तैं डोहिं मिळति **ढीवर**’ (ज्ञाने. १६·३१६).] काये बोलीलें?” तयामध्यें बेंडुक म्हणे : “अगा ये सतबुधी : तुवां परिसीलें या ढीवरांचें बोलनें? तरि आतां काये कीजे?” बेडुक म्हणे : “पळीजे : हेचि बुधी कीजे :” तें आ[इ*]कौनि सहस्त्रबुधी म्हणे : “ऐसें बोलणेंयासी काये बीहावें ॥ उक्तं च ॥

सर्पाणां च खलानां च सर्वेषां दुष्टचेतसाम् ।
अभिप्राया न सिध्यन्ति तेनेदं वर्तते जगत् ॥ १३ ॥

ते तवं ढीवर न येति : ऐसेनी जरि आलेती : तरि आपुलीये बुधीचेनि प्रकासें तुमतें राखैन : मी अन्येक सलीलगतीतें जाणें :” ऐसें आईकौनि शतबुधी म्हणे : “हें उचीत बोलीलें : तुं होसी गा सहश्रबुधी [‘तुं होसी गा सहश्रबुधी’ = तू खरोखरच सहस्त्रबुधी (हजारो युक्त्या जाणणारा) आहेस.] :” म्हणौनि तया ढीवराचें वचनेंकरुनी : माझें मात्रुपीतामहपर्यागत [आई, आजोबा, किंवा, आईचे आजोबा यांच्यापासून परंपरेने आलेले. येथे संस्कृत कथेत ‘पितृपर्यायागत’ शब्द आहे. ‘पर्यायागत’ शब्द ‘पर्यागत’ लिहिला आहे.] स्थान [मू. स्छान.] सांडिजे हें उचीत नव्हें : तरि मी सतबुधी जाणें [मला शंभर युक्त्या माहीत आहेत.] : तरि मी आपुलीये बुधी तुतें राखैल गा बेडुका : पण पळावें ना :” ऐसें आईकौनि बेडुक म्हणे : “मातें येकु मंत्रु असे : जरि कराल तरि सांगैन : पळीजे हाचि मंत्रु मोटा : यावांचौनि आणीकु मंत्रु नाही : म्हणौनि मी येक डोहो टाकैन [मी (दुसऱ्या) एका डोहाला जाऊन पोचेन, दुसऱ्या डोहात जाईन.] :” ऐसें म्हणौनि तो

बेडुक स्त्रीपुत्रासहित आणीके डोहीं गेला : प्रभातें ढीवरें येउनी तो डोहो गाळीला : जीतुके सुजातीचे मासे तीतुके धरिले : ते सतबुधी आणी सहस्त्रबुधी मारीले : तयाउपरि शतबुधी नांवयेक भारि : तो माथां धरिला : सहश्रबुधी लोंबतु धरिला : ऐसें तया ढीवरातें देखौनि : येकबुधी आपुलीये भार्येसी म्हणे ॥ उक्तं च ॥

शतबुद्धिः शिरःस्थोऽयं लम्बते च सहस्त्रधीः ।
एकबुद्धिरहं भद्रे क्रीडामि विमले जले ॥ १४ ॥

“शतबुधी शीरीं धरिला : सहश्रबुधी लोंबतु धरिला : येकबुधी नीर्मळ डोहीं क्रीडा करितो : प्रीये : ऐसें हे माझें म्हणीतलें न करतीची : त्यासि उधत [सं. कथेत गाढवाचे नाव **उद्धत** असे आहे.] गाढवाचि परि जाली :” “ते कैसी कथा?” बेडुक सांगे : बेडुकीनी आईके :

कथा ५*
गाणारा गाढव

“कोन्ही येक पर्येटाचा [परीट=धोबी. उच्चारांतरित लेखन.] गाढउ : तो सैरावैरा चरे : त्यासि नदी चरतां कोल्हा यकु भेटला : तो म्हणे : “मामो : तुं चहुकडे चरतोसी : परि पोट-भरि कहि न मीळेंचि : तरि मजसंगातें पैल मळयासीं यें : तेथें पीकलीं वाळुकें बोरें खाउं :” ऐसा तो गाढउ आणी कोल्हा : प्रत्यहीं मळयामध्यें जाउनी : वाळुकें बोरें सुखें खाती : ऐसा तो गाढउ मोटा जाला : मांस वळलें : तवं येके दीवसीं वाळुकें बोरें खाउनि : रात्रीं दोघी जण बैसले : तवं गाढउ म्हणे : “आगा ये मीत्रा : वेळु न गमे : तरि मी गायेन करिन : तें तुं आईक :” तवं कोल्हा म्हणे : “तुझें गायेन घंघाटाचे [गुं गुं असा होणारा आवाज तो गोंगाट; घों घों होणारा आवाज तो घोंगाट. घण्-घण् होणारा आवाज तो घंघाट; किंवा, गोंगाट अथवा घोंगाट चेच दुसरे रूप **घंघाट**=कर्णकर्शक आवाज. तुझे गायन घंघाटाचे आहे म्हणजे कर्णकठोर आहे. घणघणाट > **घंघाट** = मोठ्या आवाजाचे, भसाड्या आवाजाचे, असा अर्थ घेणे अधिक योग्य.] बरवें नव्हें :” तवं गाढउ म्हणे “भाचया : तुं रानीं वससी : गायेनाचें सुख नेनसी : गाय[नें*]करौनि रावणें ईस्वरू [शंकर.] प्रसंन केला होता ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

नान्यद्गीताद्वरं लोके देवानामपि दृश्यते ।
रावणेन महादेवो गायनेन च तोषितः ॥ १५ ॥

लोकामध्यें गायनाहोउनि बरवें नाहि : देवासि दुर्लभु : म्हणौनि रावणें गायेनेंकरौनि संभु तोखवीला : म्हणौनि मी गाईन : भाचेया आईक :” कोल्हा म्हणे : “मामो : तुझें गायेन आपणांसी बंधन होईल : रात्रीं क्षेत्रपाळ नीजैले आहाती : ते तुझें गाईन आईकौनी उठतील : मी पळीन [पळेन, पळून जाईन.] हा भर्वसा [हे निश्चित, ही खात्री.] : पण तुतें धरतील जाण : आतांचें गायेन बरवें नव्हें : आपुण मळयामधें आसौं ॥ उक्तं च ॥

गायनं वर्जयेच्चौर्ये निद्रां पुंश्चलचारकाः ।
जिव्हालौल्यं च रोगाढ्यो जीवितं योऽत्र वाञ्छति ॥ १६ ॥

चौरीय करितां गायन वर्जावें : पुश्चळीकर्म करितां निद्रा [**मू.** नि**ड्रा** (सकळ संकेत ड = द).] वर्जावी : रोगी तेणें जीव्हालौप्य (ल्य) [‘लौ[लु*]प्य’ अशीही दुरुस्ती करता येईल. ‘लोलुप’ पासून ‘लौप्य’ शब्द केलेला दिसतो. सं. श्लोकातील ‘लौल्य’ शब्दाच्या अनुषंगाने संहितेतील पाठात दुरुस्ती सुचविली आहे.] वर्जावें : ईतुकें वर्जे तरि जीवीत गाढें :” तवं गाढउ म्हणे : “तथापी माझी येकटीचे [‘एकटिक’ हा एकट्याने गाण्याचा प्रकार आहे. शिशुपाळवध ओ. ३५२ वर ‘एकटिकिया = श्रोतयाचा राहावा करुनि एकलयाचि गाणें. तथा एकताळीवरि गाणे’ अशी टीप आहे.] रंग आईक [**मू. या**ईक.] :” येरु म्हणे : “मज नीगावेया वाट पाहुं दें :” मग तेणें गाढवें सरळेनी शब्दें [सरळ शब्दाने, लांब आवाजाने.] गावौं आदरीलें [**मू. या**दरीलें.] : तवं माळी धावीनले : कोल्हा पळौनि गेला : गाढउ धरीला : सुबंध ठेंगेंकरौनी [बळकट, जाडजूड ठेंग्यांनी, दांडक्यांनी.] झोडिला : बांधौनी राखीला : त्याचें गळेंसी येकी [घंटी*] बांधली : मग माळी जाउनी नीजैला : तवं कोल्हा तेथे आला : कोल्हेनि म्हणीतलें : ॥ उक्तं च ॥

“मामो गीतं न कर्तव्यं वारितोऽपि पुनःपुनः ।
अपूर्वा घण्टिका दृष्टा मामो गीतस्य लक्षणम्” ॥ १७ ॥”

ऐसी कथा बेडुकें सांगीतली :

अनुक्रमणिका

मग सुवर्णसीधु म्हणे : “चक्रधरा : माझें म्हणीतलें न करि[सी*]चि : तरि तुज ऐसें जालें : जयासी स्वतंत्र बुधी नाही : तयासि सीकवीलेंही कांमा न यें ॥ उक्तं च ॥

यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम् ।
स एव निधनं याति यथा मन्थरकौलिकः ॥ १८ ॥

जयासी स्वयं प्रज्ञा नाहि : तयासी शास्त्र काई करे? तो नीधनातें पावे : जैसा मंथरकु [मू. मथर.] कोळीकु [मू. कोळी.] स्त्रीयेचेनि शब्दें नाशातें पावला :” चक्रधरू पुसे : सुवर्णसीधु सांगे :

कथा ६*
स्त्रीबुध्दी मंथरक कोळीक

कोन्ही येकें नगरिं मंथरकु [मू. मथकु. संस्कृत प्रतीत या कथेतील कोळ्याचे नाव ‘मंथरक’ असे आहे. आपल्या संहितेच्या पोथीत ते ‘मथर’, ‘मथकु’, ‘मथरकु’ अशा अनेक रीतींनी लिहिले गेले आहे. ते विशेषनाम असल्यामुळे सर्वत्र ‘मंथरकु’ असे दुरुस्त करून संहितेत स्वीकारले आहे.] ना[वं*] कोळी [कु*] [मू. कोळी. सं. कथेतील ‘कौलिक’ शब्दासाठी हा शब्द वापरला आहे. मागे तं. १, कथा ९, पा. २५ वरील टीपा पाहा येथे ‘कोळीकु’ अशी सुचवलेली दुरुस्ती रद्द समजावी.] होता : तयासि पाट घडावयाचा उदीमु आसे : तो कोळी [कु*] [मू. कोई. या सर्व पाठांची चर्चा टीपात केली आहे ती पाहावी.] येकें समईं : पाट घडावे- [वस्त्रे बिणणे. त्यासाठी हातमागाचा साचा तयार करावा लागतो. तो लाकडाचा असतो. त्या मागाला लागणारी लाकडे आणण्यासाठी तो डोंगरावर गेला होता.] यालागी [येथील **घ** या अक्षराचे वळण **प्प** सारखे आहे.] लाकुड आणावयासी डोंगरासी गेला : तेथें चीचेचा वृक्षु थोरु देखीला : तेणें तोडुं आदरिला : ते वृक्षीं सीधयोगी आसे : तो म्हणे : “आगा कोळीया [का*] : हा वृक्षु तोडुं नको : हें माझें स्थान [मू. स्छान.] : तुं मागसी तें मी देईन : मी तुज प्रसंन जालों :” तो म्हणे : “माझा मीत्रु असे : तयातें पुसौनि : आनि भार्येतें पुसौनि येईन :” म्हणौनि घरासी आला : मग वारिका मीत्रातें म्हणे : “मज सीध प्रसन्न जाला आसे : तो म्हणे : ‘माग : प्रस[न्न] जालों : तरि मी काये मागें?” तवं वारिकु म्हणे : “राज्य माग : तुझा मी प्रधान होईन :” मग कोळी [कु*] म्हणे : “स्त्रीयेतें पुसौं [‘मग कोळी म्हणें.....पुसौं’ हे वाक्य येथे पुन्हा लिहिले गेले आहे. पुन्हा लिहिताना ‘स्त्रीयेतें’ शब्दातील ‘तें’ वरील अनुस्वार गळाला आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे.] :” वारिक म्हणे : “स्त्रीयेतें पुसौं न ये :” ॥ उक्तं च ॥

आत्मबुद्धिर्हितार्थाय गुरुबुद्धिर्विशेषतः ।

मूर्खबुद्धिर्विनाशाय स्त्रीबुद्धिः प्रलयं गतः ॥ १९ ॥

तवं मंथरकु म्हणे : “भार्ये पुसौं [न ये*] : तथापी गृहीणीएतें [मू. गृहीणीएसे.] पुसणें लागे :” मग स्त्रीयेषासी गेला : तीसी पुसौं लागला : ते म्हणे : “राज्य (ज्यें) काये प्रयोजन?” मग स्त्री म्हणे : “वारिकु काये जाणे? रायासि सुख कैचें? राज्यासि त्रुष्णा बहुत ॥ उक्तं च ॥

शती सहस्त्रमिच्छति सहस्त्री लक्ष्मीहते ।
कर्तुं लक्षाधिपो राज्यं तृष्णायाः स्यान्न वाऽवधिः ॥ २० ॥

शती सहस्त्रातें वीछे : सहश्र जालयां लक्षातें वीछे [इछे = इच्छा करतो. शब्दातील आरंभीच्या **इ** चा उच्चार **वि** असा ग्रामीण भागात करतात.] : लक्ष जालयां राज्यातें ईछे : तरि येथें सुख कैचें? जरि तुज सीधु प्रसन्न जाला आसे : तरि तुं दुसरें सीर माग : आनीक दोन हात माग : ईतुकेनी तुं दोन पाट घडसी : मग आपली वर्तनुक बरवी होईल :” मग तो मंथरकु म्हणे : “बरवें :” मग तो सीधापासी गेला : मग सीध म्हणे : “माग :” मग तो म्हणे : “मज दुसरें सीर द्यावें : आणीक दोन हात द्यावे :” ऐसें तयाचें बोलनें आईकौनी : सीधें त्याचें मस्तकीं हातु ठेवीला [मू. **थे**वीला. (सकळ संकेत थ = ठ).] : मग सीरें दोन : आणी हात च्यारि : ऐसें रूप जालें : मग तो गावासी आला : लोकें हा [मू. ही.] राक्षेसु म्हणौनी धो (धों)डी मारिला : गांवाबाहिर घातला :”

सुवर्णसीधु म्हणे : “चे (च)क्रधरा : या कारणास्तव बहुत लोभु नीका नव्हे ॥ उक्तं च ॥

अनागतवतीं चिन्तामसंभाव्यां करोति यः ।
स एव पाण्डुरः शेते सोमशर्मा यथा द्विजः ॥ २१ ॥

जो पुढील भ[वि*]ष्याचि [मू. भाष्याची. ‘जो पुढील असंभाव्य भविष्याचि चिंता करी’— असा अन्वय करावा.] चिंता असंभाव्य [मू. ‘ससंभाव्य’—(संस्कृत श्लोकात ‘असंभाव्य’ असा शब्द आहे. तोच येथे असावा. (सकळ संकेत स = अ).] करि : तो सोमशर्मा ब्राह्मणाचीयापरी होये :” “हे कैसी कथा?” चक्रधरू पुसे : सुवर्णसीधु सांगे :

अनुक्रमणिका

कथा ७*
कल्पनासाम्राज्यात रमणारा सोमशर्मा ब्राम्हण

“कोन्ही येके नगरिं सोमशर्मा कृपण ब्राह्मणु असे : तो प्रत्यहिं सातु खाये : उरलें पीठ घागरीं घाली : बहुतां दीवसां ते घागरी भरली : ते घागरी सीकां ठेविली : आपुण सीकाखाली बाज घालौनि नीजैला आसे : तवं चींतावर्तु जाला : म्हणे : “उदया दुकाळु पडैल : तेधवां ये घागरिचे टके [मू. टेके.] दोन येतील : मग मी त्याची सेळी घेईन : मग थोडकें दीय (व)सें सेळीचा कळपु होईल : तो वीकीन [मू. वीनीन.] : मग म्हैसी घेईन [मू. घैईन.] : म्हैसीचें प्रस्तुत दुध खाईन : मग म्हैसी वीकीन : मग घोडी घेईन : कीसोरें बर्वे होईल : मग तें कीसोरें मी रायासी भेट करिन : मग राजा मजकारणें [(माझ्यासाठी, मला) पुत्र होईल.] गांव देईल : मग मी आपणयासी विवाहो करिन : तेधवां मजकारणें पुत्र होईल : तयाचें नांव सुसर्मा ठेवीन : तेधवां ते लेंकरू थांया घेईल [हट्ट घेऊन आकांत करील, रडेल. **थाया** हा ध्वन्यनुकारी शब्द असावा. ‘धाय मोकलणे’ यातील ‘धाय’ प्रमाणेच ‘थाय’ शब्द असावा. दुःख, चिंता, व्यथा अशा अर्थाने तो वापरला जातो. पाहा : ‘तरि आझूंवेन्हीं पार्था। सांडि **थाया** हो आतां’ (ज्ञाने. ११·६२१), **थाया**=हट्ट. पाहा : छंद तो सोस **थाया** तो अळि ते हट हट्ट ते’ (भाप्र. १६·१०४).] : तेधवां बाईलेसी म्हणैन : “रांडे : लेकुरू बुझावी :” ते न बुझावी : मग मी ऐसी लातेकरौनि हानीन :” म्हणौनि घागरि लातेकरौनि हानीतली : ते घागरिसी लागली : गाघरि फुटली : पीठ तोंडावरि सांडिलें : मग पांढरा जाला :”

“या कारणें पुरुसें अनेंक [(अनेकाची, पुष्कळ मिळवण्याची)] चींता न करावी :” सुवर्णसीधु म्हणे : “चक्र-धरा दैव जरि सानकुळ होये : तरि वीप्रीत [मू. ‘वीप्रीते’. पुढील ते या अक्षराच्या आभासाने येथे **त** ऐवजी **ते** लिहिला गेला असावा. ‘वीप्रीत’ असा पाठ दुरूस्त करून स्वीकारला आहे.] तें सुप्रीत होये :” [सं. विपरीत याच्या उलट सुपरीत. हा शब्द उच्चारांतरित होऊन सुप्रीत असा लिहिला आहे.]

॥ उक्तं च ॥

अन्धकः कुब्जकश्चैव त्रिस्तनी राजकन्यका।
जगन्नाथप्रसादेन ‘विप्रीतं सुप्रीतं भवेत्’ ॥ २२ ॥

चक्रधरू पुसे : सुवर्णसीधु सांगे :

कथा ८*
आंधळा, पांगळा आणि त्रिस्तनी राजकन्या

[संस्कृतातील कथेहून आपल्या प्रतीतील या कथेचे स्वरूप निराळे आहे. कुंभाराच्या घरी जाणे व तेथून राजकन्येकडे जाणे, हा कथाभाग संस्कृत कथेत नाही.]

“कोन्ही येके नगरिं : आंधळा आणी पांगळा : दोघै मैत्र असती : ते रात्रीचां समईं गोष्टी करिती : ऐसें येकें दिवसीं ते दोघी म्हणति : “आपुण देशाउरा [(सं. देशांतर) इतर देशात केलेला प्रवास; देशपर्यटन. पाहा : ‘मियां **देशाउर** केलें रासु येक’, (नरुस्व. १४२); ‘तुवां बहूत केलें **देशाउर**’ (नरुस्व. १५१).] जाईजे :” आंधळा पांगळातें म्हणे : “तुं माझी पाठीवरि बैस : माझे पाय आणी तुझे डोळे : ऐसें आपण देशाउरा जाउं ॥ उक्तं च ॥

उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः ॥ २३ ॥

उद्यमेंकरौनि कार्ये सीधीतें पावे : पण केवळ मनोरथेंकरौनि पावीजे ना : जैसा निजैला जो सींहु : त्याचे मुखीं काये आपेंआप [आपल्या आपण; आपोआप. पाहा : ‘आणि आकाशें जेथजेथौनि । जावें तेथ असे भरौनि । ह्मणौनि ठेलें कां अडौनि । **अपेंआप** (ज्ञाने. १८·४१६).] मृगें पडती? तरी प्रयत्न फळासि ये :” ऐसा विचार करौनि मग ते नीगाले : येका नगरासी गेले : तेथें विजयो नांवं राजा असे : तयाचि कन्या त्रीस्तनी : तीसी भर्तारू जो होये तो रात्री समईं मरे : ऐसें बहुतयेक मेले : मग नगरामध्यें पाळी लावीली आसे : ते दोघी जण तिये नगरिं कुम्हाराचें [(सं. कुंभकार) कुंभार.] घरीं उतरले : तवं प्रातःकाळीं कुम्हारी [**मू.** ‘कुम्हा**री**’. **री** या अक्षरातील **र** लिहिताना तो **रू** असा लिहून मग ईकार जोडला आहे.] रुदन करौं लागली : तवं तीसी पुसीलें : “बाई : तुज काई दुखत आसे? तुं कां रडतेसी तें सांघ :” कुम्हारि म्हणे : “बा हो : येथें रायाची कंन्या त्रीस्तनी आसे : तीसी प्रत्यहिं पाळी लावीलें (ली) आसे : भ्रतारू येकु प्रत्यहिं खातु असे : तरी आज माझेया भर्ताराची पाळी लावीली असे : तरि मी काये करिन? लेकुरवें धाकुटीं :” म्हणौनी रडौं लागली : ईतकें आईकौनि आंधळा पांगळा म्हणति : “तुझीया भर्ताराचें होतें आम्ही दोघी जन जाउन [(जाउनि, जाऊ. प्रपु. अव.). भर्ताराचें होतें = नवऱ्याच्या जागी, नवऱ्याऐवजी, असा याचा भावार्थ आहे. होतें = जागी, ऐवजी, हा अर्थ असेल काय? (**होदे** या कानडी शब्दाचा अर्थ आच्छादन, पांघरूण असा आहे. कानडी. हीदे > म. होते = आच्छादनाखाली, त्या रूपाने, असा याचा अर्थ असेल काय?). अभ्यासार्थ पुढील वाक्ये पाहा : ‘सर्वज्ञें म्हणीतले : “बाइ : तेयांचेया ठाया जावों : सेणें मातीया आंग माखौनि तेया आड पडो : ते यातें म्हणो : ‘आमचा **होता** आपणेयापासि असों दीयावा :’ गेले : .....आड पडिलें : ....तेयातें धुतलें : घेउनि आले : तेहीं निरोवीलें : ‘जी जी : आमचे **होते** असों दीयावें :’ सर्वज्ञें म्हणीतलें : ‘हा तुमचा **होता** येथौनि स्वीकारीजत असीजे :’ (लीळाचरित्र. पूर्वार्ध. १७४. तुळपुळे प्रत). येथे **होता, होतें** = आश्रित, शिष्य असा अर्थ दिसतो. तो अर्थ घेतल्यास ‘तुझ्या भर्ताराचें **होतें** (आश्रित, असे) आम्ही दोघे जाउ, असा अर्थ होऊ शकेल.] : तुं रडौं [या शब्दातील **र** हा **रू** असा लिहिला आहे.] नकों :” मग ते म्हणे : “मी तुमची

अनुक्रमणिका

बहिन : माझा चुडा राखावा [सं. चूडा या शब्दाचा, हातातील अलंकार, बांगडी असाही अर्थ आहे. स्त्रीच्या हातातील बांगड्या हे तिच्या अहेवपणाचे, सौभाग्याचे चिन्ह आहे. वैधव्य आले म्हणजे बांगड्या फोडून टाकतात. 'चुडा राखावा = माझ्या बांगड्यांचे (सौभाग्यचिन्हांचे) रक्षण करावे; म्हणजेच माझ्या सौभाग्याचे रक्षण करावे. माझ्या पतीला वाचवावे, हा भावार्थ.] :" मग तियां कुम्हारियां त्यासी आदरु थोरु केला :

मग रात्रीचां समईं : रायाचे सेवकु बोलाउं आले : त्या [दोघासी राजकंन्येचीया मंदीरा नेलें : मग पाटीं बैसवीले :] सेवक आपुली [या*] घरासी गेले : मग पांगळा आंधळातें म्हणे : "तुं ये राजकन्येषासी नीज :" मग ते दोघी नीद्रा केली : पांगुळ जागत आसे : तवं राजकुमरिचें मुखीहोउनी [मुखाहून, मुखातून.] स्वेत सर्पु नीगाला : तो पांगुळे खांडें हाणौनि मारिला : सर्पाचि कुटकीं केलीं [तुकडे केले. कुटकें (एव.)=तुकडा. सं. कुट्=तुकडे करणे. यापासून 'कुटिक' (= तुकडा) हा संस्कृत शब्द झालेला आहे. सं. कुटिक>म. कुटकें. 'कुटका' असे याचे पुल्लिंगी रूपही आढळते.] : मग राजकंन्येतें जागवीलें : म्हणे : "हें काई?" ते म्हणे "मज ठाउकें नाही :" मग तो म्हणे : "तुझे मुखीहोउनी सर्पु नीगाला : तो म्यां मारिला :" मग ते म्हणे : "तुं माझा भरतारू : तुझेंकरौनि माझा माथा उजळला :" मग तो म्हणे हा सर्पु आंधळातें पवाडु [हा सर्प आंधळ्याला खाऊं घालू. **पवाडणे** हा शब्द या ठिकाणी जेऊ घालणे, खायला लावणे, या अर्थी वापरला आहे, निर्मळ पाठकाच्या पंचोपाख्यानात 'तुझे करूनी माथा। उजळ झाला असे आता। तेणें हा सर्प आतां। आंधासी **भक्षउं**' (तंत्र ५. २२७) असे वर्णन केले आहे. तेव्हा, **पवाडुं** = भक्षाउं, खाऊ घालू, हाच अर्थ येथे आहे, हे निश्चित. तथापी, 'पवाडणे' या शब्दाला हा अर्थ कसा आला ते सांगता येत नाही. या अर्थाने अन्यत्र हा शब्द मला आढळला नाही.] : मग तेहिं तो सर्पु खांडौनि [**मू.** षांडौनि.] हांडीये घालौनि चुल्हावरि चढवीला : मग आंधळातें म्हणती : "पैल पत्रशाक तुं चाळी ['तुं (हांडीत शिजवत ठेवलेली) पत्रशाक (पालेभाजी) चाळी (चाळव, पळीने हलव, ढवळ).] :" आंधळा हांडी उघडि : तवं सर्पाची वाफ डोळां लागली : तयाचे डोळे उघडीले : तवं तेनें सर्पु देखीला : मग तेणें आंधळे रागेंकरौनि : पांगुळा पाईं धरूनि वोढीला : वोढीतखेवो तयाचे पाये उजु [(सं. ऋजु) = सरळ, नीट. पाहा : 'मग उजु वाटा सांवखेडेया आले : (लीचपू. ११); 'आगा ए वीरन्हो आडूनि सरा : उजू हातिएरू धरा' (शिशु. ५६३).] जाले : ऐसें दोघे कळहाउं लागले [कलह करू लागले; भांडू लागले.] : पांगुळा म्हणे : "माझी स्त्री :" आंधळा म्हणे : "माझी स्त्री :" ऐसें दोघै कळहो करितां राजकंन्ये न्हुदयें पीटलें : पीटतखेवो तीचा तीसरा स्तनु विराला : तिघी मनुस्यें धडीं [या शब्दाचा मूळ अर्थ घट्ट, न फाटलेले, असा आहे. येथे **धड** : चांगली, निर्दोष.] जालीं : मग दोघी झगडतां माहाजनांपासि गेले : तेहिं ते राजकंन्या पांगुळासी दीधली : पांगुळासी राजेनि घर दीधलें : सुखें आसौं लागले :"

अनुक्रमणिका

“या कारणास्तव हे कथा सांगीतली :” सुवर्णसीधी म्हणे : “चक्रधरा : सर्वप्रकारें प्राणीयासि दैव कारण :” चक्रधरू म्हणे : “हें सत्य : परंतु कदाचित दैवश्री [प्र*]तीकुळ आसतां : सुप्रीत तें वीप्रीत होये ॥ उक्तं च ॥

अन्यथा चिन्तितं कार्यं दैवमन्यत्र चिन्तयेत् ।
विषनालप्रयोगेन वेश्यामाता विनाशिता ॥ २४ ॥

आपुण आनीक चींतीजे : आणी दैव आणीक चिंती : जैसें विशनाळप्रयोगें-करौनी : वैस्या माता वीनासातें पावली :” सुवर्णसीधु पुसे : चक्रधरू साग :

कथा ९*
विषनालप्रयोजक वेश्यामाता

[ही कथा संस्कृत पंचतंत्राच्या बहुतेक प्रतीत आढळत नाही. मराठी **भा** प्रतीतही नाही. निर्मळ पाठकाच्या ‘पंचोपाख्याना’त ती आहे. हर्टेलने संपादिलेल्या ‘तंत्राख्यायिका’ ग्रंथात, परिशिष्ट १ मध्ये ही कथा आलेली आहे. तिचे स्वरूप मात्र वेगळे आहे.]

“कोन्ही येके नगरिं वैस्या येक सुंदर होती : तिसी वानीयाचा पुत्रु पडकला असे : घरिचिये स्त्रीयेसी संभासन न करि : अहर्नीस वेस्येचें घरिं आसे : आनी तीयेसी सताबळें खर्कु नेदी [खर्च (संभोग, उपभोगद्रव्याबद्दलचे मूल्य) देत नव्हता. पैसे देत नव्हता. ‘खर्कु’ हा शब्द ‘खर्चु’ या अर्थाने येथे आला आहे. ‘खर्च’ शब्द पुढील वाक्यात आला आहे. येथे ‘खर्क’ असे लिहिताना लेखनदोषही झाला असेल.] : आणीकें ठाईं जाउं नेदी : मग तेंये वेस्येची माता मनाआंतु म्हणे : “ऐसीयासी काई कीजे? खर्चेविण आम्ही काये करणें? हा तरि खर्चु नेदी : आणीके ठाईं जावों नेदी : तरि यासि मारूं : ईतुकेन माझीये कन्येसी अपार द्रव्य होईल :” ऐसा विचार करौनी : यरंडाची [**मू.** अरंडाची.] पावी [पोकळ दांडा. पावा=बासरी. ही बासाच्या तुकड्यापासून तयार करतात. हा बासाचा तुकडा पोकळ असतो. म्हणून त्याला ‘पावा’ = पोकळ दांडा म्हणत असावे.] आणौनि ते वीषें भरली : तया वाणीकपुत्रासी नीद्रा आली : ते म्हणे : “हे पावि याचें गुदद्वारीं लाउनी फुकुं : ईतुकेनि याचें उदरिं हें वीस जाईल : मग हा मरैल :” ऐसें वीचारौनि पावि तयाचें गुदद्वारीं लावीली : फुकुं लागली : तवं तेणेंसमईं तेणें शधा केली [पादला, गुदद्वारातून त्याने वारा सोडला.] : तें वीश [त्याने गुदद्वारातून वायू सोडल्यामुळे, त्या वेश्येच्या आईने त्याच्या गुदद्वाराशी लावलेल्या पावीतील विष त्याच्या पादाच्या वायूमुळे मागे फेकले जाऊन ते तिच्याच तोंडात व तोंडातून पोटात गेले.] तीचें उदरीं गेलें : तेनेंकरौनि ते वेस्येची माता मेली : वाणीकपुत्रु वांचला : मग दोघी जणें सुखें आसौं लागलीं :”

अनुक्रमणिका

“या कारणास्तव” चक्रधरू म्हणे : “सुवर्णसीधा : दैवगती कवणांसी न कळे :” तेव्हां सुवर्णसीधी म्हणे : “हें सत्य : परंतु अत्यंत लोभु नीका नव्हे : लोभु नाशातें करि :” ॥ उक्तं च ॥

यो लौल्यात्कुरुते कर्म नैवोदर्कमवेक्षते ।
विडम्बनामवाप्नोति स यथा चन्द्रभूपतिः ॥ २५ ॥

चक्रधरू पुसे : सुवर्णसीधु सांगे :

कथा १० *
लोभाविष्ट चंद्रभूप व वानरतेल

“कोन्ही येके नगरीं चंद्रभु [संस्कृत प्रतीत राजाचे नाव ‘चंद्र’ एवढेच आहे. मराठी **भा** प्रतीत ‘चंद्रसेन’ तर आपल्या प्रतीत ‘चंद्रभु’ असे आहे. ‘चंद्रभूपति’ असे मूळ लेखकाला अभिप्रेत असावे] नांव राजा होता : तया रायाचें घोडोंडि [**मू.** ‘घोडेंडि’. ‘घोडवडि’चे उच्चारांतरित रूप. पुढे ‘घोडौडी’ असे रूप आले आहे. घोडवडी>सं. घोंट + वाटिका; घोड्यांची पागा. पाहा : ‘गोसांवी केसवनायकाचीय घोडवडीसि बीजें केलें’ (गोप्रच. २६८);]

येकु वेंडीका [सं. एडक : > म. एडका > येडका > वेडीका पुढे हाच शब्द वेडिका असा आला आहे.] बांधला होता : तेथें बहुतयेक वानर पोसीले होते : तेथें रायाची दासी झाडावया ये : तो वेडीका [दा*]सीवरी वेंघे : त्यासि दासी मारि : परि तो राहे ना : ऐसी ते दासी कोपुनी म्हणे : “यासि आतां जाळीन :” तें वांनरें आईकीलें : ईतुकेनी येकु वडिलु वांनरू म्हणौं लागला : “आरे वांनरा हो : येथें वैर मांडलें : आतां हा ठावो सांडीजे :” तवं येर वांनरू म्हणति : “हा मुर्खु [**मू.** मुर्षु.] : आपुला ठावो सहसा न सांडावा :” तवं तो वांनरू म्हणे : “जे गृहिं वैर तें गृह त्येजावें :” ॥ उक्तं च ॥

तस्मात्स्यात्कलहो यत्र गृहे नित्यमकारणः ।
तद्गृहं जीवितं वाञ्छन्दूरतः परिवर्जयेत् ॥ २६ ॥

मग तो वांनरू म्हणे : “मी जाईन :” ते वांनरु म्ह[ण*]ती : “तुं जायें : आम्ही न यों :” मग तो वांनरू वनिं गेला :

तवं एके समई वेडिका दासिवरि वेंघला : तवं तीनें रागेंकरौनी [रागाने.] जळत काष्टें हानितला : वेडिकाचि लोव [(सं. लोमन्) केस, लोकर पाहा : ‘कैंचा लोंवेविण कांबळा । मातियेविण मोदळा’ (ज्ञाने. १८·८११).] लागली : तो कांकुळती घोडौडी रीगाला :

अनुक्रमणिका

तेथे कडवा(बा) [बैलांचा चारा. पोथीत 'कडवा' शब्द आहे. तो 'कडबा' असा असावा. जुन्या मराठीत 'कडबाड' असा शब्द येतो. पाहा : 'बैलासि **कडबाडें**' (ज्ञाने. १४·२३८). 'कडबा' हे त्याचेच रूप होय.] गवत आणि कापोसु होति : तयामध्यें गेला : मग तयासि आगी लागली : मग धवळारें लागली [धवळा**रांना** (आगि) लागली.] : घोडसाळा थोर प्रजळीली : तेणें [**मू.** **त**णें.] रायाचे घोडे जळाले : येक जळत काढीलें : तयासि उपचार करावेया वैद्य बोलावीले : वैद्ये म्हणती : "वांनरतेल होयें तरि तेजी उजरती [बरे होतील. सं. ऋजु > म. उजु. त्यापासून उजरणे = सरळ होणे—करणे; लक्षणेने, बरे होणे—करणे.] :" मग राजा म्हणे : "पारधी जाउनी वांनरू आणीजे :" त्याचे पापमुळ [पाप (पुढील सर्व अनर्थाचे व त्यामुळे घडलेल्या पापाचे) मूळ असलेले प्रधान.] प्रधान म्हणति : "डोंगरिं के उते जाईजे? घरिं वांनर असति तेची मारिजे :" राजा म्हणे : "नको :" मग तेहीं राजा न पुसतां [राजाला न विचारता. राजा पदाची विभक्ती? लिहिताना 'ते' प्रत्यय गळाला असेल काय? घोडासी : घोड्यांना. प्रत्ययापूर्वी सामान्यरूप केलेले नाही. 'घोडाउपचारालागी' ही वाक्यरचनाही या दृष्टीन चिंत्य आहे.] वांनर मारिले : घोडासी उपचारु केला :

मग बहुताकां दीवसा येकु वानरू गेला होता तो आला : तेणें लोकासि पुसिलें : तेहिं म्हणीतलें : "राजेनी घोडाउपचारालागी वानर मारिले :" ऐसा वानराचा नासु आयेकीला : मग दुख करूं लागला : मग तो म्हणे ॥ उक्तं च ॥

तत्र स्थाने न वास्तव्यं यत्र वैरं निरंतरम् ।
दासीमेषविरोधेन वानराः प्रलयं गताः ॥ २७ ॥

"जे देशीं नीरंतर वैर ते देसिं नसावें [**मू.** न**शा**वें.] : दासीमेशा [**मू.** दाशीमीशा—.] विरोधेंकरौनि वांनर प्रळयंगत जाले :" तेधवां वांनरू म्हणे : "हे अवघे प्रधान बुधीचि मारूं [बुद्धीने, युक्तीने मारू,] :" ऐसा तो वांन[रू*] तान्हेला येका सरोवरासी गेला : तवं तेथें रीगतीं पाउलें आहाती : तरि नीगतिं नाही : मग मनीं वीचारिलें : "या सरोवरा-आंतु कोन्ही येक दृष्ट असैल :" म्हणौनि कमळनाळें दुरौनि पानि प्याला : तें देखौनि नवरत्नदीप्तमाळ [नवरत्नांनी तेजःपुंज अशी माळ.] गळां : ऐसा राक्षेसु तया सरोवराआंतौनि नीगाला : म्हणे : "वांनरा : या सरोवरांतु जो रिगे : तयातें मी खायें :" वानरूं म्हणे : "कीती [खासी? सहश्र की लक्ष?" राक्षस म्हणे : "माग प्रसन्न जालों : जें] तुझें मनीं आसैल तें माग :" तो म्हणे : "माझा वैरी राजा असे : तुं आपली माळ दें : इतुकेनि सपरिवारि भुलौनि आणैन :

अनुक्रमणिका

सरोवरिं रीगती : तितुकेनी तुं खायें :” “हो कां [होय का? किंवा होय या अर्थानी हे शब्द वापरले जातात.] :” म्हणौनि माळ दीधली :

ते माळ गळां घालौनि रायापुढें नाचौं लागला : राजेनी वांनरातें पुसीलें : “हा रे : तुज रत्नें कैचीं?” तो म्हणे : “राया : सुर्योचां [(सूर्यो + चां)] अर्धोदईं [(अर्ध्या उदयानंतर). अर्धोदय = अर्धा उदय. त्याची सप्तमी अर्धोदईं. ‘अर्धोदिते सूर्ये’— असे संस्कृत वाक्य आहे. याचेच भाषांतर पुढे. सूर्याचे अर्धबिंब वर आले असतांनाचा प्रातःकाळ असे केले आहे.] जो स्नान करी : तयासि कुबेरू माळ दे :” रावो म्हणे : “हें साच?” “रावो तवं माझें गळां माळ देखत असे :” रावो म्हणे : “सरोवरू दाखवीसी?” तो म्हणे : “चाला : दाखवैन :” ईतुकेनी सपरिवारी रावो नीगाला : कां जे बोलीलें आसें ॥ उक्तं च ॥

लोभादेव नरा मूढा धनविद्यान्विता अपि ।
अकृत्येषु नियोज्यन्ते भ्राम्यन्ते दुर्गमेष्वपि ॥ २८ ॥

ऐसें तया सरोवरासि गेले : तेथ अर्धबींब प्रातःकाळीं : वांनरें रायाकरवी ते तिघै प्रधान त्या सरोवराआंतु घालवीले : राजा वांनरें राहावीला : वाडवेळु भरला : पण ते न नीगतीचि : रावो म्हणे : “वांनरां : ते अझौनि नीगती ना?” तवं तेथें कोल्हाळु जाला : मग राजेनी पुसीलें : “कोल्हाळु काईसा?” वांनरू म्हणे : “रत्नें लुटताती :” ऐसें तीघी प्रधान मारवीले : मग राजा नीगता जाला : “डोहामध्यें रत्नें कैचीं?” ऐसें म्हणौनि वांनरू उडौनि झाडावरि बैसला : म्हणे : “राजया : ते अवघे राक्षेसें भक्षीले : माझे वांनर तुझा प्रधानें मारवीले : म्हणौनि तुझे प्रधान म्यां सपरिवारि मारवीले : तुतें राखीलें : जें तुं गोसावि म्हणौनि : तरी राया : आतां तुं घरासी जायें : परि येक आईक :” तवं राक्षेसु बाहिर नीगौनि म्हणे : ॥ उक्तं च ॥

हतः शत्रुः कृतं मित्रं रत्नमाला न हारिता ।
नालेनापिबता तोयं भवता साधु वानर ॥ २९ ॥

ईतुकेनी तो राक्षेसु गेला : मग वांनरू म्हणे : “राया आईक : शठाप्रती शठपण आचरिजे :” ॥ उक्तं च ॥

अनुक्रमणिका

शठं प्रति शठं कुर्यात् सादरं प्रति चादरः ।
त्वया मे लुंचितं पिच्छं मया ते मुंडितं शिरः ॥ ३० ॥

राजा पुसे : “हे कैसी कथा?” वांनरू सांघे [मू. शां‌घे.] :

कथा ११*
कामसेना गमिका आणि रावा

[कामसेना गणिकेची ही कथा मला संस्कृत ‘पंचतंत्रा’च्या प्रतीत आढळली नाही. भा प्रतीतही ती नाही. निर्मळ पाठकाच्या ‘पंचोपाख्याना’त ती आहे.]

“कोन्ही येके नगरीं कामसेना नांवें गनीका असे : ते प्रतहीं रात्रीमध्यें : पुरुशापासि सवालक्षु लाजी [मा* [मू. अभिप्रेत शब्द ‘लाजीमा’ असावा. फारशी शब्द ‘लाज्मा’ असाच आहे. पुढे आलेल्या **मा** अक्षराच्या द्विरुक्तीमुळे एक **मा** दृष्टिदोषाने गळला असावा.]] मागे : तवं एकें [मू. ऐकें.] समईं रायाचा सेवकु मीत्राप्रति बोले : “मज आणी कामसेनेसी स्वप्नामाजि संभोगु जाला :” ऐसी गोष्टी कामसेनें आईकीली : मग ते सवालक्ष लाजी [मा*] मागौं लागली : मग ते झगडीतां दोघी रायापासि आली : रायासी संदेहो पडला : म्हणे : “हा वेवारू कैसा कीजे?” तवं तेथें रायाचा सेवकु रांवा-पासि सांगता जाला : म्हणे : “रायावस्तु कामसेनेचा वेव्हारू न तुटेचि :” रांवा [पोपट. ‘**रावां** पुंसा आणि राघू तोताही झणिजेतसे’ (भाप्र. १२·११). हा शब्द संस्कृतोत्पन्न नाही. तो सर्वस्वी देशी शब्द असावा.] म्हणे : “मी वेव्हारू बर्वा करैन :” मग रांवा तेथें आनिला : राया-करवी सवालक्ष आणविलें : सोनटकेंची रास केली : मग वारीकाचा आरसा आणवीला : मग ते रासी आरिशामध्यें कामसेनेसी दाखविलें : म्हणे : “पैल आरिसाआंतु द्रव्य दीसतसें तें घें :” ते म्हणे : “हें कैसें घेउं?” “तरि स्वप्नीचेया भोगाचें द्रव्य कैसें घेउं पाहातेसी?” मग कामसेना उगीचि राहिली :

मग तीनें रांवाचा रागु धरिला : मग येके समईं रायापासि नृत्य करितां राजा उचितासि आला [राजा दान देण्याला आला; कामसेनेने केलेल्या नृत्याबद्दल तिला बक्षीस देण्याचा विचार केला. उचित : दान, बक्षीस. पाहा : ‘मी सदा सर्वेश्वरातें वाखाणीं : तेणें तीखें विचारूनि अंतःकरणीः : मज उचित देवों पांताये रुक्मिणी : देवाचिये भेटिचे’ (नरुस्व. ६७०); ‘मग तीय दीधलें उचित : श्रीचरणीं केली रत’ (मूप्र. ५६९).] : कामसेनेतें म्हणे : “मागसी तें देईन :” काम-सेना म्हणे : “ऐसी भाका दीजे [असे वचन द्यावे. भाक < भाख < सं. भाष. मागे पान १२०·२७ पाहा.] :” रायें भाक दीधली : कामसेना म्हणे : “मज रांवा दीजे :” मग राजेनि रांवा कामसेनेसी दीधला : त्या [(तिने)] वाटा

अनुक्रमणिका

जातां [(वाटेने जात असताना)] रावांचे [(राव्याचे, पोपटाचे)] पाख [(पंख)] उपडीले : घरामध्यें नेउनी सुपेंमध्यें [सुपात. मोरी : पाणी वाहून नेणारी मातीची नाली.] ठेवीला : दासीतें म्हणे : “हा माझा वैरि : बरवेंपरि रांधावा :” ऐसें म्हणौनि आपुण बाहिर गेली : दासी कांहि कामासी गेली : तवं रांवा हळुहळुं पाणीची मोरि होती तेथें रिगाला : दासि पाहे तवं तो नाहि : मग म्हणे : “चांडाळीं मारिला :” मग कुकडें मारौनि रांधीलें : तवं कामसेना आली : तीसी भोजन जालें : तवं तो रांवा मोरीमध्यें उष्टेंपाष्टें [सं. उच्छिष्ट > म. उष्टें. याच्या आवाजाचा (ध्वनीचा) दुसरा ‘पाष्टा’ हा शब्द. अशा शब्दांना ‘सादशब्द’ (Echo words) म्हणतात. यातील दुसऱ्या शब्दाला तादृश अर्थ नसतो, हे खरे, पण त्यान पूर्वशब्दसदृश अशा इतर वस्तूंचा बोध होतो. **उष्टेंपाष्टें** या शब्दात ‘पाष्टें’ हा केवळ साद शब्द आहे. त्याला स्वतंत्र अर्थ नाही. पण पूर्वशब्द जो ‘उष्टें’ तत्सदृश इतर पदार्थांचा बोध त्यावरून होतो. म्हणून उष्टेंखरकटें वगैरे असा अर्थ. गोडधोड, भाकरबिकर इत्यादी शब्द सादशब्दच आहेत. ‘उष्टापाष्टा’ हा शब्द ‘उष्टामाष्टा’ असाही वापरतात.] खातां मोटा जाला : पांख नीगाले : मग तो देउळीं गेला : देउळीं असौं लागला : कांमसेना देउळीं प्रत्येहीं ये : देवतेपुढां नृत्य करी : तवं येके दीवसीं नृत्य करितां [देवतेआडौनि रांवा बोलीला..... “कामसेने : तुज प्रसंन जालीयें : वरु माग : तुतें स्वर्ग-भुवना इंद्रापासि [नेईन*] [पान फाटल्यामुळे पोथीतील ही अक्षरे स्पष्ट नाहीत. चिठ्ठी लावून तेथे अक्षरे गिरवली आहेत. ती **‘तरतो’** किंवा **‘नरनो’** अशी वाचता येतात. ‘नेइन’ असा शब्द तेथे असावा. तो पुढे आलेला आहे. त्याप्रमाणे दुरुस्ती सुचवली आहे.] आतां तुं ऐसें] करि : हें तुझें द्रव्य पापाचें : आंगीचे श्रृंगार वस्त्रादिकें खर्चि [**मू.** पर्चि.] क्षौरकर्म करवी : ईतुकेनि मी तुतें स्वर्ग [भुवना*] नेईन :” ऐसें आईकौनि तीनें तैसेंचि केलें : सर्व द्रव्य खर्चिलें : वस्त्रे भांडार द्रव्य आवघें वेचीलें : क्षौरकर्म केलें : डोई बोडविलें : मग स्नान करौनि वोली पडदनीसी [वोली= (१) ओले, भिजलेले; किंवा (२) रेशमी वस्त्र. भिजलेली, ओली पडदनी, किंवा रेशमी पडदनी. **पडदनी** : आंघोळीपूर्वी नेसण्याचे वस्त्र. लीळाचरित्र व गोविंदप्रभुचरित्र या ग्रंथात हा शब्द अनेक ठिकाणी याच अर्थाने आला आहे. ‘पडदणी’ गंडाळून नंतर स्नान करीत, असे त्यावरून दिसून येते. उदा० : ‘गोसावीयांसि **पडदणी** ओळगवीली : मर्दनामादनें जाली’ (लीच. उत्त. १२५); ‘**पडदनी** ओळगवीली : मग मर्दनांमादनें जालें’ (गोप्रच. ७५). ‘हें काइ वो जालें ब्राह्मणांचेया रांडांसि? **पडदणी** घेऊनि कां आंघोळि न करावी?’ (गोप्रच. १८१). देवतेची पूजा वगैरे ओल्या वस्त्रांनीच करीत असतात. पाहा : ‘**वोलिया पडदणिया** बोरी बाबुळ सींपति’ (लीच. पू. ६८). हे लक्षात घेता ‘वोली पडदनीसीं’ = आंघोळीसाठी नेसलेल्या ओल्या वस्त्रासहित, असाच अर्थ केला पाहिजे. ‘पडदनी’—(सं. पट् = आच्छादणे).] देउळीं आली : तवं तो रांवा तया देउळावरौनि बोलीला ॥ उक्तं च ॥

शठं प्रति शठं कुर्यात् सादरं प्रति चादरः ।
त्वया मे लुञ्चितं पिच्छं मया ते मुण्डितं शिरः ॥ ३१ ॥

वांनरू म्हणे : “राजया : येहीं प्रधानीं माझे वानर मारवीले : तरि यासी ऐसें केलें :” मग राजा उगाची निगाला :

तैसें वीष्णुशर्मा म्हणे : “राजपुत्र हो : भलतयासवें [(भलत्या बरोबर, कोणाही बरोबर).] बरवें

अनुक्रमणिका

आचरावें [(चांगले आचरण करावे).] : संगस्ती बरवी करावी : वोखटी संगतीस्तव वोखटेंचि पावीजे ॥ उक्तं च ॥

असंगसंगदोषेण साधवो यान्ति विक्रियां ।
एकरात्रप्रसंगेन काष्ठघंटाविडम्बना ॥ ३२ ॥

राजपुत्र पुसती : विष्णुशर्मा सांगे :

कथा १२*
काष्टघंटा विडंबना

[कपिला गाईची ही कथा विष्णुशर्म्याने राजपुत्राला सांगितली, असे आपल्या प्रतीत आहे. व्यापक अर्थाने हे खरे असले (कारण, सर्वच कथा विष्णुशर्म्याने सांगितल्या आहेत) तरी पूर्वापर संबंध लक्षात घेता ही कथासुद्धा 'सुवर्णसीधा'ने 'चक्रधरा'ला सांगितली असाच निर्देश येथे पाहिजे. या बाराव्या कथेतून निघालेली तेरावी कथाही सुवर्णसीधानेच चक्रधराला सांगितली आहे, यावरून हे स्पष्ट होईल.]

"ब्राह्मणा येकाचि कपीला दीवस सुखें चरे : तवं कोळीयांची वोढाळ गाये : लोकांचि सेतें खाये : कपीलेसी येकें दीवसीं म्हणे : "तुं मजसवें यें : स्वेस्छा दोघैं सेतामध्यें चरूं :" कपीला म्हणे : "मी न यें :" ऐसें प्रतदीनीं पाचारी : मग येके दीवसीं तयेसवें गेली : सेतांतु दोघै जणी नीगाल्या : तवं सेतकरि धांवीनला : वोढाळ निगौनि गेली : कपीला सांपुडली : मग ब्राह्मणाच्या घरासी आणीली : ब्राह्मणासि म्हणे : "गाईसी जतन करी : माझें सेत खादलें :" तें तेणें वीप्रें गाईचें गळें लोंढणें बांधीलें : गाई पुसति : "हे काये?" तवं ते म्हणे : ॥ उक्तं च ॥

असंगसंगदोषेण साधवो यान्ति विक्रियां ।
एकरात्रप्रसंगेन काष्ठघंटाविडम्बना ॥ ३३ ॥

॥ तथा च ॥

प्रत्यक्षं दृश्यते दोषो मूर्खो वै साधु मन्यते ।
वारिकस्य यथा बालाकर्पूरेण समागमः ॥ ३४ ॥

चक्रधरू पुसे : सुवर्णसीधु सांगे :

अनुक्रमणिका

कथा १३ *
छिनाल राणी व मूर्ख राजा

[ही कथा सं. प्रतीत आढळत नाही. **भा** प्रतीतही नाही. निर्मळ पाठकाने ती वर्णन केली आहे.]

“कवणां येका रायाची राणी वारिकासि रातली होति [न्हाव्याबरोबर रममाण झाली होती, न्हाव्याशी लागू झाली होती. (सं. रम् < रत) पासून तयार झालेले हे क्रियारूप ‘रातणे’ असेचे जुन्या मराठीत आढळते. पाहा : ‘जंबुखंडीं जयंताचिये गोष्ठी : **रातली** इंद्रायेणी धाकुटी’ (नरुस्व. २७८); ‘कामिए **रातलें** : विळासीनीसीं’ (शिशु. २७४).] : अति प्रीत करी : तवं येकें समईं कापुर वणजारें रायासी भेट केला : राजेनि कापुरू वारिकासि दीधला : म्हणे : “कापुर घरिं राणीहातिं वोपी :” मग तो कापुर घेउनी नीगाला : तवं ते राणी आंगनीं उभी होती : तेनें कापुरु तिचें हातिं वोपीलें : तो वारिकु तिचा मीत्र म्हणौनि प्रेमें बका दीधला [चुंबन दिले. **बका** = चुंबन. या शब्दासाठी निर्मळ पाठकाने ‘दाम’ शब्द वापरला आहे. वारीक राणीने देखीला येकला। त्याचीया मुखासी **दाम** दीधला। ते समई राजा घरासी आला। तो ह्मणे ‘हें काये?’ (तंत्र ५·३९५).] : तवं तेचि समईं मागीलेकडौनि राजा आला : तें राजेनी देखीलें : म्हणे : “हें काई?” वारिकु म्हणे : “मी आपुला आत्मा देईन [माझा प्राण मी देईन. (खोट बोलत असेन तर) — अशी शपथ न्हाव्याने घेतली.] : राणीयें माझा अनवीस्वासु धरीला : म्हणे : ‘तुवां वाटे येतां कापुर खादला असैल :’ म्हणौनि माझे मुख परमळौनि पाहिलें [वास घेऊन पाहिले. सं. परिमल > म. परिमळ पासून ‘परि(र)मळणे’ = वास घेऊन पाहाणे. न्हाव्याने राणीला चुंबन दिले होते. (म्हणजे राणीनेच त्याचे चुंबन घेतले होते). आपल्या या कृतीची सारवासारव करण्यासाठी न्हावी म्हणतो की, ‘मी कापूर खाल्ला असावा, असा राणीला संशय आला. त्यामुळे तिने आपले तोंड माझ्या तोंडाजवळ आणून माझ्या तोंडाचा वास घेऊन पाहिला.’] : आतां हा जीव मज देणें घडे :” मग राजा त्या वारीकातें बुझावी : राणीसी म्हणे : “याचा अनविस्वासु धरूं न ये :” राजेनी वारिकु पोटेंसी धरुनी बुझाविला :”

म्हणौनि भलतेणें पुरुशें : कार्ये कारण विचारौनि करावें : मग चक्रधरातें सुवर्णसीधु म्हणे : “मी आतां आश्रमासी जातों :” तवं चक्रधरू म्हणे : “मज ऐसेयातें कैसें सांडौनि [**मू.** ‘**सा**डौनि’. ‘**सां**डौनि’ अशी दुरुस्ती केली आहे. ‘**सो**डौनि’ अशीही दुरुस्ती करता येईल.] जासी?” तो म्हणे : “तुझी अवस्ता माझेनी न फीटे :” तो म्हणे : “हें साच : परि हें स्थान [**मू.** स्छान.] मानुसासी अगम्यें : मी राहालेयां मज तुझीची परि होईल ॥ उक्तं च ॥

यादृशी वदनच्छाया दृश्यते तव वानर ।
गृहीतोऽसि विकालेन यः परैति स जीवति ॥ ३५ ॥

अनुक्रमणिका

कथा १४*
राक्षस घोडा आणि वानरी

"कोन्ही एकें [**मू.** ऐकें.] नगरिं भद्रसेनु नांवें राजा आसे : तयाची कंन्या रूपवंती : तीयेतें रात्रीं येउनी राक्षेसु भोगी : परी नेउं न शके : राखणाईत [सं. रक्षण>म. राखण+आइत (सं. आयुक्त)=राखणाइत, राखणदार, राखण करण्यासाठी नेमलेला.] आपार : तिसी कंन्येसि भोगुं सरे : ईतुकेनी शीतज्वररू ऐसें कंन्येसी नीत होये : येकें दीवसीं राक्षेसु घराचां कोनीं गुप्त राहाला : तीसी न्यावया : तवं ते कंन्या सखीपुढां सांगे : "मज वीकळ समईं [सं. कथेत. 'विकाल समये' (अपवेळी, वाटेल त्यावेळी) असे शब्द आहेत. 'वीकळ' ऐवजी 'वीकाल' असा शब्द. अभिप्रेत असावा. पण 'वीकळ (सं. विकल) समईं' — मी विकल झाले असताना, गळून गेले असताना; सारांश, माझी शरीरप्रकृती ठीक नसतांना देखील—असा प्रस्तुत पाठाचाही अर्थ नीट लागतो. म्हणून दुरुस्ती केली नाही. आहे तोच पाठ स्वीकारला आहे.] राक्षेसु विचंबी [कष्ट देतो, विटंबना करतो. पाहा : 'तया बाधका : नेइजे कुंभिपाका : मग अनेगी जाचनुका । वीचंबीजे हा' (उगी. ५०९); 'जो न मोकळी मारुनि । जिवों नेदी उपजौनि । **विचंबी** खोडां घालुनि । हाडांचां इये' (ज्ञाने. १८·१०४५). ज्ञानेश्वरीतील या ओवीवरून विचंबणे = पिळून काढणे, चुरगळणे, असा अर्थ योग्य दिसतो. 'कुचंबणे' प्रमाणेच 'विचंबणे' हा शब्द आहे. उदा. : 'कां कमळावरि भवर । पार्थ ठेविती हळुवार । **कुचुंबैल** केसर । इया शंका' (ज्ञाने. १३·२४७). हे लक्षात घेता 'मज वीकळ समईं विचंबी — मी गलितगात्र असतांनाही, माझी मनःस्थिती नीट नसतांनाही हा राक्षस माझा उपभोग घेतो व उपभोग घेताना मला चुरगळून टाकतो, असा भावार्थ.] : तरि या दुरात्मयां चांडाळा खेदु होये ऐसा [**मू.** ऐसा.] उपावो करि :" राक्षेसु म्हणे [यापूर्वी सं. कथेत 'तच्छृत्वा' असा शब्द आहे. 'ते (राजकन्येचे बोलणे) ऐकून' असे एखादे वाक्य यापूर्वी पाहिजे होते. ते येथे गृहीत धरले पाहिजे.] : "ईयेतें आनीकु भोगीतु असैल : परि तोहि राखणाईताचेनि [**म.** राषणा॰.] नेउं न सके : तरि घोडा होउनि तयातें पाहुं : तो कैसा असे :" म्हणौनि राक्षेसु घोडा जाला : तवं तेथें चोरु आला : तेनें तो घोडा बरवा देखौनि : कडीयाळें घालौनि : वरी बैसला : राक्षेसु म्हणे : "हाच काळु : रागें जाणौनि मारावया नेतु असे :" वेगां चालावेया [(घोडा वेगान चालावा म्हणून, त्या चोराने तो घोडा)] चामठी हाला [चाबकाने मारला. **चामठी** : (सं. चर्मयष्टिः) चामडे लावलेली काडी, चाबूक. पाहा : 'गोसावी.... गरूडावरूनी उतरति : **चामाठी** गरूडाचीए कानीं घालीति' (लीच. ए. ५५). **हाला** = हाणितला, मारला, पिटला. 'जेणें उरी हालासि पांपरा' (ज्ञाने. ११·१०५); 'मग हातवसूनि गदा करतळीं : श्रीकृष्णें हाला वक्षस्थळीं' (शिशु. १०६५).] : भेण धांविनला : दुरि गेला : दुरी गेलेयां कडियाळें आखुडीतांहि [**मू.** याखुडीतांहि. (आखडून, ताणून धरले असतानासुद्धा)] नाखुडे [(न + आखुडे) = आखुडला जात नव्हता.] : धांवतुच भेण जाउं लागला : चोरें मनीं वीचारीलें : "घोडा आखुडीतांचि [**मू.** आषुडीतांचि.] धांवतु असे : तरि घोडयाचेनि रूपें राक्षेसु होईल [राक्षस असेल.] : तरि कैसीयां परी वांचैन?" तवं वाटें जातां वडु यकु आला : ईतुकेनी चोरु पारंबा धरौनी : वृक्षा वळंघला : तवं तेथें एकी [**मू.** ऐकी.] वानरी होती : ते राक्षसाची मित्रीणी : ते म्हणे : "राक्षेसा : तुं कां पळालासी? हें तुझें भक्ष ['राक्षसा, हे (तुझ्या, अर्थात् तू ज्याचे रूप घेतले आहेस त्या घोड्यांच्या पाठीवर बसलेले) **तुझे भक्ष** आहे. (तुझ्या खाण्याचा हा पदार्थ आहे, म्हणजेच माणूस आहे.). याला भिण्याचे कारण नाही. याला तू खा. असे म्हणून तो माणूस तेथे झाडावर आहे असे तिने सुचवले. तेव्हां त्याला खाण्यासाठी राक्षसाने आपले घोड्याचे रूप टाकले व **आपुलें** (स्वतःचे मूळ रूप,

राक्षसाचे)] :” तवं राक्षेसु सु(स्व)स्त

होउनी : आपुलें रूप धरौनि आला [वानरीने, आपण येथे असल्याचे राक्षसाला सांगितले.] : तवं तेनें वानरीचा शब्द [(बोलणे)]

आईकौनी [तेनें (त्या माणसाने, चोराने तिचे=वानरीचे)] पुस [(शेपूट, आपल्या)] तोंडीं घालौनि दातें चावीलें [(दातांनी तिच्या शेपटीचा चावा घेतला.). त्यावेळी वानरी कासावीस झाली. तिला उद्देशून संस्कृत श्लोक आहे. 'हे वानरा, तुझ्या तोंडावरील आविर्भावावरून मला असे दिसते की, तुला विकालाने (विकाल, हे त्या चोराचे नाव होते) दातांत पकडले आहे, तेव्हां आता जो पळून जाईल तोच जिवंत राहील. तिची ही स्थिती पाहून राक्षस पळून गेला, हा भावार्थ.] :” म्हणौनि 'यादृशी

वदनच्छाया इति :'

ऐसें सुवर्णसीधु म्हणे : “चक्रधरा : अवीचार्ये कार्ये करि तो नाशातें

पावें :” ॥ उक्तं च ॥

अपरीक्षितं न कर्तव्यं कर्तव्यं सुपरीक्षितम् ।
अपेतस्त्तु न जानीते रासभं सिगुजी यथा ॥ ३६ ॥

सुवर्णसीधु सांगे : येरु पुसे :

कथा १५*
सिगुजी, मेहुणा आणि फुइजी

[ही कथासुद्धा कोणत्याही संस्कृत पंचतंत्रात आढळत नाही. मराठी **भा** प्रतीतही ती नाही. निर्मळ पाठक, महालिंगदास व कृष्णराज या सर्वांनी ती वर्णन केली आहे.]

“कोन्ही येकें नगरीं भोळस्थीति [**मू.** ०**स्छी**ति. हे राज्याचे नाव. कारण, तेथील राजा, त्याचा परिवार, प्रधान वगैरे सर्व भोळे होते. कारभारही भोळा होता. तेथील सुमंत राजा 'तो भोळस्थीती' — तोही ज्याची स्थिती (वर्तन) भोळी आहे असा होता : निर्मळ पाठकाने राजाचे नाव 'भोळेश्वर' असे दिले आहे.] राज्य आसें : तेथें सुमंतु राजा राज्य

करि : तो भोळस्थीती [**मू.** ०**स्छी**ती.] : ते नगरिं जुवांरि येकु जुं खेळी : तो प्रत्येहीं हारवी :

येकी म्हांतारि करि रांधानी [त्या जुव्वेबाजाच्या घरी 'येकी म्हांतारि रांधानी करि = एक म्हातारी स्त्री स्वयंपाक करीत असे, त्याची स्वयंपाकीण होती.] : तवं येकें समईं म्हांतारि जुंवारियातें पुसे :

म्हणे : “बा : तुं कां रोडैलासि [**मू.** रो**डौ**लासि.]?” तो म्हणे : “मज जुउ खेळतां हारि

येतु आसे :” तवं डोकरी [म्हातारी. कृष्णदास शामाच्या श्रीकृष्णचरित्रकथेत (संपा : प्रभुदेसाई व मुंडी) हा शब्द '**ढोंकरा**' असा आला आहे. 'हा वुग्रसेन ढोंकरा । झाला असे ह्यातारा' (१५—११६). '**ढोकरा**' हे 'डोकरा' चेच दुसरे रूप होय. त्याचे स्त्रीलिंगी रूप 'डोकरी'.] म्हणे : “हें राज्य भोळें : तुझेनि येथें काहि उपावो

नव्हे?” तो म्हणे : “हें राज्य कैसें भोळे?” ते म्हणे : “आईक :

तेथें पर्यटाचि गर्दभीसी सीगरू जालें : तेहिं तें लाडीकें म्हणौनि : सीगुजी [शिंगरू > सीगरू=घोडा, गाढव इत्यादिकांच्या लहान बच्च्याला हा शब्द लावतात. सामान्यतः घोड्याच्या बछड्याला शिंगरू म्हणतात. येथे गाढवीच्या पोराला शिंगरू>सीगरू म्हटले आहे. **सीगुजी**—हे नाव पुढे संगुजी असेही आले आहे. (पान. १६९). निर्मळ पाठकाने '**सींगोजी** असे नाव दिले आहे.]

अनुक्रमणिका

